म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २३५८



REFBK-0020456

# खंडेराव बागल यांचे निवडक लेख

२०४५६ १।१९६५
२३५४ ३०।३।६५

'हंटर' कार

# खंडेराव गोपाळराव बागल

बी. ए. एल्‌एल्. बी.

यांचे

# निवडक लेख

REFBK-0020456

संपादक व प्रकाशक

**भाई माधवराव बागल**

किमत १५ रुपये

मुद्रक—
बी. एस. पाटील (M.L A.)
चेअरमन, दि नव महाराष्ट्र सहकारी मुद्रण व
प्रकाशन संस्था लि., शाहूपुरी—कोल्हापूर.

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

प्रकाशक—
भाई माधवराव बागल
कोल्हापूर.



जन्म १८७२ ) ( मृत्यु १ मार्च रविवार १९३१

मनुस्मृति अरबी समुद्रात बुडवून टाकावी असा मजकुर ५ ऑगस्ट १९२७ रोजी अग्रलेखात लिहला.

बहुजन समाजाचे एकमेव नेते

केंद्र मंत्रिमंडळातील महाराष्ट्राचे आधार

दे. भ. यशवंतरावजी चव्हाण

यांच्या वाढदिवसानिमित्त

प्रकाशन ता. १२ मार्च १९७४

माझ्या परमपूज्य

मातुश्री

सौ. कमळाबाई खंडेराव बागल

यांना भक्तिपूर्वक



# माझे निवेदन

माझे वडील खंडेराव गोपाळराव बागल, बी. ए., एल्एल्. बी. वकील, संपादक साप्ताहिक ' हंटर ' यांचे या साप्ताहिकातील लेख ग्रंथरुपाने छापण्याची जी बुद्धी झाली तिला कारण प्रो. शाम येडेकर हे होत. त्यानी शाहू महाराजांची व्याख्याने ग्रंथ रुपाने प्रसिद्ध केली. त्या पुस्तकाचे रॅपरवर 'माझे ऋग्वेदाचे वाचन ' ही माझ्या वडिलांची लेखमाला प्रसिद्ध करण्याचे जाहीर केले होते. पण त्या लेखांची कात्रणे ज्या बॅगमध्ये घातली होती ती बॅग प्रवासात कोणी तरी लांबवली ! हा कांही त्यांचा अपराध नव्हता. तथापी आपणच अपराधी असं समजून मला तोंड दाखवण्यास त्याना शरम वाटू लागली.

पण याच साप्ताहिकाचे सर्व अंक पद्मभूषण धनंजयरावजी कीर याना मी वाचावयास दिले होते.

माझे वडील हे शाहूमहाराजांचे अमदानीत मामलेदारीच्या जागेवर होते. त्यामुळे त्यांच्या राजकीय धोरणाची त्यावेळच्या सर्व घडामोडीची, शाहूमहाराजाना ब्राम्हण पुरोहितानी व धर्मगुरुनी कस कसे छळले, त्यांचा कस कसा अपमान केला व त्यांशी महाराजानी कसे तोंड दिले, त्याची त्याना पूर्ण माहिती होती. व त्याचा उल्लेख हंटरमध्ये वेळोवेळो आला होता. हंटरमधील लेखावरुन ब्राम्हण-ब्राम्हणेतर चळवळीची, सत्यशोधक समाजाच्या कार्याची, क्षुद्रबुद्धी धर्मपंडित ब्राम्हणांची,

राजकारणी पुढाऱ्यांची ब्राम्हणी पत्रांची व एकूण ब्राम्हण वर्गाच्या वृत्तीची कल्पना त्यातून मिळण्याजोगी होती. धनंजयरावजी हे शाहूचरित्र लिहिणार होते. तेव्हां या अंकांचा त्याना फायदा होईल म्हणून मी ते सर्व अंक त्याना वाचावयास दिले होते. त्याला बरेच दिवस झाले होते.

ते सर्व अंक मी परत मागून घेतले. त्यातले कांही अंक पूर्वीच गहाळ झाले होते. पण वडिलांचे समकालीन पत्रकार आप्त व सहकारी. "विजयी मराठ्याचे" संपादक सत्यशोधक श्रीपतरावजी शिंदे यांचे चिरंजीव आजच्या 'विजयी मराठ्याचे' संपादक माधवराव यानी ते अंक जपून ठेवले होते. त्याना येडेकरांच्या जवळची कात्रणे गहाळ झाल्याचे समजताच ते मजकडे आले व म्हणाले.

'तुम्ही चिंता करू नकात. मी माझे जवळचे सर्व अंक तुमचे स्वाधीन करतो. आबासाहेबांचे लेख तुम्ही प्रसिद्ध केल्यास बहुजनसमाजाची फार मोठी सेवा होईल.' त्यांच्या थोरवीची व समाजसेवेची कल्पना आजच्या पिढीला नाही.

ही सूचना प्रत्यक्षात आणण्याचे मी लगेच ठरवले. या सूचनेने मीच खजील झालो. आतापर्यंत माझीच ४०।५० पुस्तके मी प्रसिद्ध केली. व माझे वडील माझेहून जाडे विद्वान धर्मग्रंथाचे अभ्यासू पंडित व अनुभवी असूनही त्यांचे लेख छापण्याची बुद्धी यावेळेपर्यंत मला झाली नाही! अन् येडेकरना ती व्हावी याची मला शरम वाटू लागली. या बोचणीने मला झोपही लागेना. म्हणून जवळची सारी शिल्लक खरडून पुस्तक प्रसिद्ध करण्याचे ठरवले.

माझं वय आता ७९. प्रकृती सारखी ढासळत चालली आहे. सारखी कमी जास्ती होते. घरातच बसून राहिलो आहे. दवाखान्यात जाण्याचा प्रसंग आल्यास कोणाकडे याचना करण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून थोडीगुंजी राखून ठेवली होती. प्रोस्ट्रेट ग्लँडचे ऑपरेशनसाठी मला बाँबे हॉस्पिटलमध्ये राहण्याचा प्रसंग आला होता. त्यावेळी रोज ४०/५० रुपये खर्चावे लागले.

यानंतर काही महिन्यानी माझी पूज्य पत्नी वारली. त्या धक्क्याने मी अंथरुण धरले. तेव्हां डॉ. जाधव एम्. डी. यानी मला आपल्या सरस्वती हॉस्पिटलमध्ये नेले. महिनाभर रहावं लागलं. सर्वात चांगली डबल रुम रहावयास दिली. त्यांची इंग्लंड रिटर्नड् दोन मुले डॉ. यशवंतराव व डॉ. गजाननराव आळी-पाळीने तपासत. अगदी घरच्या प्रमाणे प्रेमळ व अगत्याची वागणूक दिली. महिनाभरा-

नंतर परतण्याची परवानगी दिली. जाताना बिल विचारले तेव्हां थोरले डॉ. जाधव बाबा, मजवरच रागावले व म्हणाले–

' माधवराव तुम्ही हे विचारलंच का ? तुम्ही तुमचं सार आयुष्य जनसेवेत घालवलं. त्या तुमची सेवा करण्याची संधी दिलीत या बद्दल आम्हीच आभार मानायला पाहिजेत.' मी फक्त कृतज्ञतेच्या अश्रूंची भेट दिली. तसंच मिरजेचे वैद्य करमरकर व सोलापूरचे वैद्य बागेवाडीकर यानीही माझे आयुष्य वाढविले. अण्णू शिंदे यांनी माझ्या पूज्य पत्नीच्या निधनानंतर निष्काम सेवेचा आधार दिला, म्हणूनच आजारासाठी राखून ठेवलेली रक्कम आता वडिलांचे पुस्तक छपाईवर खर्चायला मोकळा झालो आहे.

वडील अठरा विश्वे दारिद्र्यातून स्वकष्टाने श्रीमंत झाले. आम्ही चार भाऊ. माझ्या वाटणीची इस्टेट राखून तीत भर घालण्याऐवजी, अनेक महत्वा–कांक्षेच्या वेडाने भारावून, जवळ जवळ सर्वच इस्टेट खर्चून टाकली. कलेच्या बिन मिळकतीच्या धंद्यात मुंबईस ७ वर्षे काढली. राजकारणात वहात गेलो. हद्दपारी अटक, स्थानबद्धता सक्तमजूरी, साधी कैद यात ६/७ वर्षे गेली. साहित्य निर्मि–तिच्या नादात बायकोचाही विसर पडला. पण माझ्यावर रागा-रुसवा करण्याऐवजी उलट त्या साध्वीने पुस्तक प्रसिद्ध करण्यास आपले दागिने माझ्या स्वाधीन केले. व विवाहित संन्यासिनी सारखं आयुष्य काढलं. मीही होतं नव्हतं ते घालवून जवळ जवळ निष्कांचन बनलो. आजारासाठी राखून ठेवलेली रक्कम तीच माझी इस्टेट.

डॉ. जाधवांचा आधार मिळताच आता ती. वडिलांचा लेखसंग्रह छापण्या-साठी पवित्र कर्तव्य म्हणून खर्चण्यास उद्युक्त झालो.

वडीलांच्या बरोबर अखेर अखेर दुय्यम संपादक म्हणून काम केले. त्यांच्या अपुऱ्या महत्वाकांक्षा अल्पांशाने का असेना मला पुऱ्या करता आल्या. सामाजिक धार्मिक व राजकीय महत्वाकांक्षेचे प्रेरक तेच होत. त्यानी जगदंबा देवालयात अस्पृश्याना प्रवेश मिळावा. नृसिंहवाडीस दत्ताच्या पादुका स्पर्श करण्यास अस्पृ-श्याना हक्क असावा. असे अग्रलेख लिहूले. मी चळवळ करून ते हक्क प्राप्त करुन घेतले–

स्थानिक स्वराज्य संस्थेचा अध्यक्ष या नात्याने करवीर नगरपालिकेवर ढोर समाजातील सोनवणे नावच्या पदवीधर अस्पृश्याची नगराध्यक्ष म्हणून निवड केली.

पुणे म्युनिसिपालिटीतील ब्राम्हण सभासदानी म. फुल्यांचा पुतळा बसवावा हा दे. भ. केशवराव जेधे यांचा ठराव हाणून पाडला त्यावर वडिलानी जळजळीत अग्रलेख लिहिले.

मी पुढाकार घेऊन कोल्हापुरास बिंदू चौकात फुले व आंबेडकर यांचे पुतळे बसवले ते अखिल भारतात प्रथमच. वडिलानी राजकारणात कायद्याचे उल्लंघन केल नाही. मी कायदे भगांचा, व सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला. त्या चळवळीत अनेक वर्षे तुरुंगवास भोगला. त्या कारावासाला श्रेय लाभलं. प्रजापरिषदेचा नेता म्हणून मुख्यमंत्रीपदावर निवड झाली. मंत्रीपदाहून प्रचारकार्यंच श्रेष्ठ वाटल्यामुळं मंत्रिपद टाकून दिलं व कसल्याच सत्ता संघर्षात पडलो नाही.

वडीलांचे व शाहूछत्रपतींचे कार्य माझ्या कुवतीप्रमाणे या क्षणापर्यंत जिवंत ठेवले आहे. पण अंध अनुयायित्व, माझे वडिलांचे किंवा शाहू-फुले-आंबेडकर यांचे स्वीकारले नाही. मी सर्व धर्म बंधने टाकून केवळ मानवतावादी बनलो आहे.

पण ध्येयवादामुळे निकटच्यांचे मी कांहीही कल्याण करु शकलो नाही. मला माझ्या पत्नीला मुलाला सुनेला व नातवंडाना सुख स्वास्थ्याचा लाभ देऊ शकलो नाही. चाळीवजा चार खोलीच्या भाड्याच्या घरात अडचणीने माझी नातवंडे मुलगा, सून व मी आणि माझी पत्नी कसे बसे दिवस काढले. मालकीची जमीन नाही इस्टेट नाही इतर कसला आधार नाही.

कला व सर्व साहित्य निर्मिती सार्वजनिक संस्थेस देणगी वजा अर्पण केली. मी ऐश्वर्य भोगलं नाही. दुसऱ्यांच्या मजविषयीच्या अपेक्षा भंग केल्या. स्वकीय दुखवले गेले. पण वडिलांचं चिरंतन स्वरुपाचं धन या ग्रंथा द्वारे कुटुंबियांच्या व भावी पिढीच्या स्वाधीन करतानं पुन: जीवनातला मोठा आनंद भोगत आहे.

त्याला माझे शेजारी व हितचिंतक जयसिंगराव बागल यानी नडल्या-वेळीच्या अडचणी आपल्या छोट्या छापखान्यातला नवा टाईप कंपोज, करुन दूर केल्या, स्वत: नुकसान सोसलं व आपलंच काम समजून राबले, याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला मजजवळ शब्द नाहीत.

• • •

वरील निवेदनानंतर माझा स्वतःचा खुलासा करणं व माझी भूमिका स्पष्ट करणं मला अवश्यक वाटतं. नाहीतर माझ्या मतासंबंधी गैरसमज होण्याचा व करण्याचा संभव आहे.

मी माझ्या जीवनात शिव शाहू फुले व आंबेडकर याना दीपस्तंभ मानतो. तसंच म. बुद्धालाही मानतो. यानी कोणाच्याही प्रगतीला व विवेचक बुद्धीला, इतर धर्मसंस्थापका प्रमाणे अडवून ठेवलं नाही. माझेच विचार खरे तेच माना असा दंडक घातला नाही· स्वतःला देवाचा अवतार बनवलं नाही.

माझे वडीलही माझ्या जीवनात मला मार्गदर्शकच ठरले आहेत. त्यांची मते, मी सर्वस्वी मान्य केली म्हणून मी त्यांच्या लेखांचं हे प्रकाशन केलेलं नाही. त्यांच्या हयातीतही मी त्यांच्या कांही आचार विचाराला विरोध केला आहे. त्यांचे विचार त्या काली क्रांतीकारकच होते. व आजही अत्याधुनिक ठरतील. तेही मला दीपस्तंभच ठरले आहेत. त्यांच ॠण मान्य करून मी आजच्या परिस्थितीचा विचार करून माझ्या कल्पनेप्रमाणे पुढचे पाऊल टाकणार. कोणाचाही अंधअनुयायी बनणे ही स्वतःची मी अधोगती समजतो. ज्यांचे विचार माझ्यामते कष्टकरी बहुजनसमाजाच्या हिता आड व प्रगती आड येत आहेत असे मला वाटले. त्यांच्याविरुद्ध व्यक्तिविषयक कसलाही आकस न धरता त्यांचे नांव घेऊन टीका केली आहे. मग ती व्यक्ती कोणत्या स्थानावर आहे, तिने मजवर किती उपकार केले आहेत ती व्यक्ती भाऊ बहीण पत्नी मित्र या पैकी कोण आहे याचा विचार केला नाही.

मी स्वतंत्रपणे विचार करू लागलो की शिव शाहू फुले आंबेडकर तसेच माझे वडील यांचे विचार आचार आज तसेच स्वीकारता येणार नाहीत. ते हयात असते तर तेही बदलले असते. म्हणून ते क्रांतीकारक नव्हते असे म्हणता येणार नाही.

जी मते, जे सिद्धांत, प्रयोगाने सिद्ध करता येणार नाहीत, अनुभवाला पटणार नाहीत ते अमका म्हणतो म्हणून मान्य करा ही निव्वळ हुकुमशाही ठरेल. या हुकुमशाहीने लाखोंची हालहाल करुन हत्या केली आहे.

मूर्तिपूजा, ईश्वरपूजा, निर्मिकाचीपूजा, निसर्गपूजा तसेच स्वर्ग नरक या कल्पना कर्म विपाक दैववाद या सर्वश्रद्धा म्हणजे अंधश्रद्धा होत. धर्म-बंधनानेही

मनुष्य जखडला जातो. माझा धर्म श्रेष्ट हा अहंभाव निर्माण होतो. या सर्व गोष्टी मानवतावादाला व माणुसपणाला 'लोकशाही समाजवाद व निधर्मीराज्य' या उच्च-ध्येयाला आड येणाऱ्या आहेत. 'श्रद्धा ठेवा' म्हणजे गुलाम व्हा. 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्' हा कृष्णाचा सिद्धांत सर्वस्वी चुकीचा आहे. 'मी म्हणेन 'श्रद्धावान लभते अज्ञानम्' ज्या ज्या गोष्टी समजत नाहीत तेथून पुढील ज्ञानाची जिज्ञासा उत्पन्न होते. व प्रगतीचा मार्ग खुला होतो. विज्ञानाची प्रवृती व प्रगती या अश्र-द्धेतूनच झाली आहे. ईश्वर कल्पनेनं ती खुंटून टाकली आहे. सत्यशोधनाचा मार्गच खुंटून टाकला आहे. मी सत्यशोधक आहे व सत्यशोधकच राहणार !

वडिलांचा हा लेख संग्रह छापून पितृऋणातून अल्पाशांने उतराई व्हावं म्हणून हा प्रयत्न केला आहे

ज्यांच्या वाढ दिवशी मी हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांची तरी सर्व मते मला कुठं ग्राह्य आहेत. पण त्यामुळे त्यांच्या विषयीचा माझा आदर कांहीही नष्ट झालेला नाही. त्याच्यातील अनेक गुणांचा मी चाहता आहे.

★ ★ ★

# कै. खंडेराव गोपाळ बागल

( " विजयी मराठा " पुणें, ता. १६-३-१९३१ इ. )

आम्हास कळविण्यास परमावधीचे दुःख होते कीं, कोल्हापूर येथील सुप्रसिद्ध ब्राम्हणेतर पुढारी श्री. खंडेराव गोपाळराव बागल हे ता. १ रविवार रोजी दुपारी १२ वाजतां हृदयक्रिया बंद पडून स्वर्गवासी झाले.

कै. खंडेराव बागल यांचा जन्म करवीर संस्थानातील यळगूड गांवी १८७२ साली झाला. त्यांचे वडील अत्यंत गरीब स्थितींत होते. त्यांची छोटीशी जमीन होती पण तीहि डोईजड कर्जात पुरी बुडली होती. मराठी चौथीपर्यंत अभ्यास यळगुड गांवी झाला. शाळेत नेहमी पहिला नंबर असे. १८७७ चे दुष्काळांत तर त्यांचे फार हाल झाले. मराठी पाचवीनंतर इंग्रजी शाळेसाठी कागलहून ४कोस लांब करवीरास पायी जात असत. त्याना तालमीचा शोक असे. त्यामुळे त्यांना हा पल्ला झेपता आला. गरिबीच्या स्थितीत इंग्रजी चौथी इयत्तेत असताना वडील वारल्याने त्यांच्यावर संकटाचा डोंगर अधिकच कोसळला! पुढे त्यांनी शिकवणी करून विद्याभ्यास चालविला. शाळेची फी त्यांनीं कित्येक वेळा कोल्हापूरातील जनावरांच्या बाजारांत पावत्या लिहून देऊन मिळालेल्या पैशावर भागविली. सुदैवेकरुन कै. श्री आप्पासाहेब खर्डेकर यांनी छोटीशी स्कॉलरशिप दिली. पुढे त्यांना डेक्कन मराठा स्कॉलरशिपही मिळाली. यामुळें त्यांना अभ्यास करण्यास उत्साह आला. यापूर्वी तेलाच्या दिव्याचा खर्च निभत नसे, म्हणून त्यांना कमिटीच्या दिव्यावरहि अभ्यास करावा लागे, व शिळी भाकर व चटणीवर पोट भरावे लागे ! स्कॉलरशिपमुळें हे दारिद्र थोडेबहुत दूर झाले.

त्यांना सातव्या इयत्तेत ऑल्फ्रेड स्कॉलरशिप मिळाली आणि १८९० साली मॅट्रिक झाले. १८९३ साली ते इंटर झाल्यानंतर मुंबईच्या विलसन कॉलेजमध्ये गेले आणि १८९५ साली ते बी. ए. झाले. त्यानंतर त्याना कोल्हापूरचे रा. सा. बावाजी-राव लक्ष्मणराव सावंत, फर्स्टक्लास सबजज्ज, यांची मदत मिळाली. ते १८९७ साली एल्. एल्. बी. झाले. करवीर संस्थानापैकी पहिले मराठे लॉ ग्रॅज्युएट बागल हेच होत.

१८९८ साली सुमारे एक वर्ष त्यांनी करवीरी वकीलीचे प्रॅक्टिस केले. त्यांना १८९९ साली राजर्षि श्री शाहू महाराजानी मुद्दाम बोलावून घेऊन मुन-सिफची जागा दिली. ते १९०२ साली गडहिंग्लज येथे मामलेदारचे जागी आले. तेथे सामानगड येथील जत्रेत निव्वळ ब्राम्हणांना प्रसाद मिळत असे. ती रूढी बद-लून त्यांनी ब्राम्हणेतरानाही प्रसाद मिळण्याची व्यवस्था केली. १९०६ साली शिरोळ पेटचास त्यांची बदली झाली. गुरुद्वादशीस निव्वळ ब्राम्हणशाही माजली होती. दत्ताचे प्रसादावर फक्त ब्राम्हणांचाच हक्क असे. तेथे त्यांनी आपल्या अधि-कारात ब्राम्हणेतरांच्या पंक्ति पाडल्या. याबद्दल पुजारी वर्गानी भयंकर हाकाटी केली. पण ते डगमगले नाहीत. १९०८ साली हातकणंगले पेटचास ते मामलेदार झाले.

त्यांनी १९१० साली पेन्शन घेऊन स्वतंत्रपणे आपल्या वकिलीच्या व्यव-सायाला व सामाजिक चळवळीत भाग घ्यावयाला हळूहळू सुरूवात केली. १९१९ चे सुमारास श्री शाहू महाराजांनी त्यांना आपल्या पूर्ण विश्वासांत घेतले. पुणे फौजदारी कज्जा प्रकरण, वगैरे कामी महाराजांची त्यांनी मनोभावे सेवा केली. पूणे केसमध्ये 'महाराजांवर वॉरंट काढता येत नाही. असा पुणे मॅजिस्ट्रेटचा ठराव झाल्याची तार राजर्षि शाहू महारानी रात्री १२ वाजतां बागलानां उठवून दाखविली आणि दुसऱ्याच दिवसी स्वामींनी त्यांना पारितोषकही पाठवून दिले. श्री शाहू महाराज वेळोवेळी घरी येत व कायद्याची सल्ला विचारीत.

गडहिंग्लज पेटचावर मामलेदार असतांना व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगच्या स्थापनेच्या वेळी त्यांनी तीन हजाराची रक्कम गोळा करुन दिली. तसेच शाहूमिल भरभराटीस यावी या हेतूने त्यांनी हातकणंगले पेटचातून वीस हजारावर रुपयाचे शेअर्स गोळा करून दिले.

करवीरास मराठ्यांची संघटना करावी या हेतूने कै. कृष्णराव बाबाजीराव सावंत वकील, गुरुवर्य गोविंदराव शासने वगैरे मंडळींना घेऊन फंड गोळा केला. आज ते रुपये बुधवार (पेठेतील) बलभीम बँकेत संघाच्या नांवाने आहेत.

स्वतः त्यांनी आपल्या पैशातून राजाराम हायस्कूलमध्ये एक स्कॉलरशिप व अहिल्याबाई गर्ल्सस्कूलमध्ये प्राईज ठेवले आहे. ते सत्यसमाजमताचे होते. १९२४ साली त्यांनी सत्यशोधक समाजाचे लिस्टात मेंबर म्हणून नांव दाखल केले. पूर्वीच्या मंडळीचा मतभेद झाला, म्हणून रामचंद्र बाबाजी जाधव, डॉ. के. के. चव्हांण, खंडोबा पन्हाळकर व रामभाऊ गायकवाड यांना घेऊन नवा समाज काढला. त्या समाजास फर्निचर व श्री शाहूमहाराजाचा पुतळा दिला. पुढे काही दिवसानी दोन्ही समाज एकत्र करून व त्यांची दिलजमाई होऊन दोन्ही संस्था एकत्र करण्यांत आल्या आणि त्यांना श्री. शाहू सत्यशोधक समाज असे नांव देण्यात आले. त्या समाजाचे चालकत्व अखेर पर्यंत त्यांचेकडेच राहिले. पण त्यांनी आग्रह झाला असतांही अध्यक्षपदाची जागा स्विकारली नाही !

याच सुमारास रा. हरिभाऊ चव्हाण यांनी 'हंटर' पत्र सुरु केले. १–२ अंक काढल्यानंतर त्यांनी ते पत्र बागलांचे हवाली केले. पैसा नव्हता व वर्गणीदार नव्हते, तरी बागलांनी गांवांतून फिरुन वर्गणीदार व पैका जमा केला. पुढे स्वतः प्रेस खरेदीकरुन मालकीचा छापखाना सुरु केला. पत्राचे धोरण उदार ठेवले होते व त्यांत सर्व विषयांवर लेख येत असत. अलिकडे त्यांची दृष्टी राजकारणाकडे वळली होती. त्यांचे लेख निस्पृह बाण्याचे असत. स्वामीनिष्ठ राहूनही ते प्रजेची बाजू सरकारपुढे सनदशीरपणे निर्भीडपणे मांडीत. अखेर अखेर ते कॉंग्रेसचे भक्त झाले. महात्मा गांधीजीना करविरी आणण्यांत त्यांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. धर्माधिकारी, श्रेष्ठी, मेथे वगैरे मंडळीना घेऊन त्यांनी गांवातून तीनच दिवसांत तीन हजार रुपये जमा केले. शेवटी महात्माजींना सत्यसमाजात आणवून त्यांनी छोटीसी थैली व मानपत्र त्या समाजातर्फे अर्पण केले.

सत्य समाजात दरवर्षी सह भोजने घडवून आणली. एका विशिष्ट प्रसंगी, मूहूर्त म्हणून घरी ब्राम्हण आणण्या ऐवजी अस्पृश्य जातीतील सर्व पोट जातीना व मुसलमानापैकी एकाला व अस्पृश्यापैकी मुद्दाम भंगी गृहस्थानां बोलावून आणले. व सर्वांना जेवावयास घालून त्यांची उष्टी स्वतःचे कुटूंब कै. सौं. चंद्रादेवी बागल व सुनाकडून प्रेमाने काढविली.

गेल्याच वर्षी अखिल भारतीय सत्यशोधक परिषदेने त्यांना उपाध्यक्षाची जागा देऊन त्यांचा गौरव केला. तसेच ते निस्सीम देवभक्त होते. अभंग म्हणता म्हणता ते देहभान विसरीत. देवसेवा व लोकसेवा एकाच वेळी व्हावी म्हणून त्यांनी श्री अंबाबाईचे देवळातील रामाचा पार संगम रवरी बांधून त्यास "श्री राम सेवा पीठ" असे नांव दिले.

ते आपल्या गरीबीला केव्हांच विसरले नाहीत. घोंगडीचा बिछाना व घोंगडीचे पांघरुण हे अखेर पर्यंत त्यांनी सोडली नाहीत. मरणापूर्वी अर्धा तासच अगोदर त्यांनी गायीला चारा घातला. देवपूजा केली. मंडळीबरोबर बोलले. आणि "विश्रांती घेतो तुम्ही आता जावा" असे म्हणून कलंडले. तीच त्यांची अखेरची विश्रांति ! !

त्याना चार मुलगे आहेत. थोरले श्री. माधवराव हे त्यांचेच बरोबर 'हंटर' पत्राचे संपादकत्व चालवीत होते. व त्यांनी अलिकडे खेड्यातून दौरे काढून अस्पृश्यतानिवारण व खादी प्रचार सुरू केला आहे. ते कट्टे सत्यशोधक आहेत व या पुढे त्यांनी प्रचार द्वारे सत्यशोधक समाजाची सेवा करावी, अशी आमची आग्रहाची सूचना आहे. तसेच ते आर्टिस्ट व शिल्पकारही आहेत. दुसरे श्री. वसंतराव हे एल्. एल्. बी. असून वकिलीची प्रॅक्टिस करीत आहेत. त्यांना इंग्रजी वक्तृत्वाबद्दल पूना लॉ कॉलेजमध्ये असताना सुवर्ण पदके मिळाली आहेत, तिसरे श्री. शंकरराव हे एल्, एल्. बी. चा अभ्यास करीत आहेत. त्यानी ऐतिहासिक निबंधलेखनाच्या चढाओढीत पुष्कळ प्रसंगी पहिली बक्षिसें मिळविली आहेत. व चौथे श्री. दिनकरराव हे इंटरमिजिएटच्या वर्गांत आहेत. तसेच सर्व सुनाहि सुशिक्षीत आहेत.

★ ★ ★

# अनुक्रमणिका


| अ.नं. | | पान |
|---|---|---|
| १ | माझे निवेदन | ७ |
| २ | विजयी मराठ्याचा मृत्यू लेख १९३१ | १३ |
| १ | माझे वडील | १ |
| २ | दत्तमूर्ति स्पर्शाचा अधिकार स्त्रियाना आहे काय ? | २१ |
| ३ | गोव्यातील बाह्यशुद्धीने अंतः शुद्धी कशी होणार ? | २४ |
| ४ | ही वंश शुद्धता ! | २८ |
| ५ | टिळक म्हणतात– स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे. तसंच आम्ही म्हणतो 'समता आमचा जन्म सिद्ध हक्क आहे.' | २९ |
| ६ | ऋग्वेद | ३२ |
| ७ | धर्माधर्माचे टवाळ | ३५ |
| ८ | एक वेद आज शक्य आहे काय ? | ३८ |
| ९ | सातवळेकरांचा धर्म व त्यांची दृष्टी | ४१ |
| १० | ऋग्वेदात मूर्तिपूजा नाही | ४४ |
| ११ | ब्राम्हणी पत्रे व हिंदुसंघटना वाले | ४६ |
| १२ | महात्मा फुल्यांचे स्मारक नको ? | ५० |
| १३ | ब्राम्हण ब्राम्हणेतर ऐक्याची संधी घालवली | ५३ |
| १४ | एका ब्राम्हणाचा विचित्र नमुना | ५९ |
| १५ | कुलकर्णी आणि जोशी वतन | ६२ |
| १६ | कुलकर्ण्याची पुन्हा स्थापना म्हणजे मागासलेल्या वर्गाच्या पायात खोडा | ६६ |
| १७ | तलाठी सिस्टिमचा सु परिणाम | ६९ |
| १८ | ग्राम संस्थेची रचना | ७२ |
| १९ | पोट भरुची दुक्कल | ७६ |
| २० | करवीर दरबारातील वतने | ७९ |
| २१ | कुलकर्णी व जोशी वतन | ८१ |
| २२ | ग्राम जोशी बिल | ८४ |
| २३ | ब्राम्हणेतरांच्या उत्पन्नाची वाट काय ? | ८६ |
| २४ | बाकीच्या वतनी नोकऱ्या का कमी करीत नाहीत ? | ८९ |
| २५ | ब्राम्हण ब्राम्हणेतर वाद | ९३ |
| २६ | केसरीकारांचा तडफडाट | ९४ |
| २७ | शिखंडीची भाला फेक | ९८ |
| २८ | पीळ जात नाही | १०० |
| २९ | ब्राम्हणेतर वाद | १०२ |
| ३० | सोवळेशाही म्हणजे सनातनी हिंदुधर्म नव्हे | १०८ |
| ३१ | आम्हाला माणुसकी पाहिजे | ११२ |
| ३२ | ब्राम्हणेतर पक्षाची रचना, ब्राम्हणी मेंदूला कळणे शक्य नाही | ११५ |
| ३३ | म्हणे ब्राम्हणेतरांना काय पाहिजे | ११८ |
| ३४ | जुन्या सुधारकांची डाळ का शिजली नाही ? | १२१ |
| ३५ | आम्ही काय करावे | १२५ |

| अ. नं. | पान |
|---|---|
| ३६ हात्त तो दुर्दैवी ब्राम्हणेतर म्हणजे क्षत्रीय वर्ग | १२८ |
| ३७ पूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय | १३१ |
| ३८ सत्यशोधक समाजाची कार्य मर्यादा | १३४ |
| ३९ भालाकाराना सत्यसमाजाची भीती नाही | १४२ |
| ४० सत्यशोधकाविरुद्ध संग्रामाची ओरड | १४३ |
| ४१ वैदिकी जलसे आणि सत्यशोधकी तमासे | १४६ |
| ४२ जगदंबेच्या देवालयात | १५० |
| ४३ मूर्ति स्पर्शाची रूढी व आजचा कायदा | १५३ |
| ४४ कायदा व रुढी | १५६ |
| ४५ या बाबतीत आम्ही कायद्याच्याही पलिकडे गेले पाहिजे | १६० |
| ४६ पुरुषार्थकार सातवळेकर व आम्ही | १६४ |
| ४७ पुरुषार्थकार आणि रोटी-बेटी व्यवहार | १७१ |
| ४८ सातवळेकरांचे नांवेशास्त्री | १७३ |
| ४९ पुरुषार्थकारांची जाती मिमांसा | १७४ |
| ५० भेदाभेद मते भ्रमाचे संवाद | १७९ |
| ५१ सातवळेकरानी ओकलेले गरळ | १८२ |
| ५२ क्षात्रजगद्गुरू विरुद्ध पुरुषार्थकार | १८४ |
| ५३ क्षात्र जगद्गुरू पीठ का निर्माण केले ? | १८८ |
| ५४ ऋग्वेदांत आहे तरी काय? | १९२ |
| ५५ ऋग्वेद उपयुक्त आहे | १९५ |
| ५६ ऋग्वेदातील मंत्र तंत्र वैद्य शास्त्र | १९९ |
| ५७ ऋग्वेदातील लिंगपूजा | २०२ |
| ५८ लिंगपूजा आर्यांची की अनार्यांची | २०५ |
| ५९ ऋग्वेदातील नीतिमत्ता | २०७ |
| ६० स्त्री आणि शूद्राना ऋग्वेद बंद का ? | २१० |
| ६१ वैदिक धर्माची पक्कड किंवा घोरपड | २१२ |
| ६२ वर्णाभिमाने पडलो प्रवाही | २१५ |
| ६३ आत्महत्या सुरापानम | २१८ |
| ६४ ब्राम्हणी धनलोभाची प्राचीन संस्कृती | २२१ |
| ६५ आमच्यातील घातुक चाली | २२३ |
| ६६ शिमगा आला जपून वागा | २२६ |
| ६७ चांडाळ नवरा आणि बिचारीचे हाल | २२९ |
| ६८ सोडपत्र मिळेना तर कसे? | २३१ |
| ६९ सोड चिठीचा कायदा आणि धटिंगणाचा फायदा | २३५ |
| ७० भोजनशाही अथवा नव्या डोळ्याना जुने तमाशे | २३८ |
| ७१ देवाचे सोहाळे व भिकेचे डोहाळे | २४१ |
| ७२ कर्मयोग खरोखरीच आम्हास टिळकानी शिकवला काय ? | २४६ |
| ७३ स्काऊट मासिका वरील शिवछत्रपति आणि रामदास | २५५ |

| अ. नं. | पान | अ. नं. | पान |
| --- | --- | --- | --- |
| ७४ करवीर राज्य व इचलकरंजी जहागीर | २५७ | ८० जातिविध्वंसन हाच संघटनेचा खरा उपाय | २७८ |
| ७५ शुद्धी चळवळ करण्याला अगोदर तुम्ही शुद्ध आहात काय ? | २६१ | ८१ महात्मा गांधी व बॅ. सावरकर | २८२ |
| | | ८२ डॉ. सावरकर व महात्माजी | २८४ |
| ७६ शुद्धी चळवळीचा फार्स | २६४ | ८३ श्री. विनोबा यांची कोल्हापुरास भेट | २८८ |
| ७७ चोराच्या उलट्या बोंबा | २६६ | | |
| ७८ शुद्धी संघटना | २७२ | ८४ कोल्हापुरात महात्माजी | २९० |
| ७९ महाराष्ट्राचा मानबिंदू मराठाच | २७५ | ८५ महात्माजींना सत्यशोधक समाजातर्फे मानपत्र | २९५ |
| | | ८६ भारताचे अर्थमंत्री दे. भ. यशवंतरावजी चव्हाणांचा अभिप्राय | २९७ |

# FOREWORD

by

Hon'ble Mr. Justice **G. N. Vaidya,**

M. A., LL. B.

According to the latest census, we had in this country, in 1971, 283 million males, 264 million females, total 547 million people. Literacy rate is only 29.34 percent ( 39.51 percent among males and 18.44 percent among females ). 19.87 percent of our people live in urban areas. Cultivators are 42.87 percent. Agricultural labourers are 25.76 percent. Other labourers are 31.37 percent.

Hindu civilization classified all women and all manual workers doing essential, dusty and difficult labour such as cultivators, weavers, transport workers, fishermen, barbers, washermen, shoemakers, scavengers etc. as 'not-twice-born.' The majority of this vast and growing population are illiterate ( but please note, not so ignorant as many of their literate fellow countrymen and unsympathetic foreign tourists think or as the sophisticated cynics fancy. ) The people (both 'twice-born' and not-twice-born' with very few exceptions ) are however chained to traditional poverty-cum-superstition-cum-caste-cum-corruption complex.

Very few have written or write about Indian people from the point of view of the dumb suffering masses of India. Among these few was the learned, honest and brave father of Bhai Bagal. He wrote in the context of the revolutionary religious social, economic, cultural and administrative changes ushered by Chhatrapati Shahu Maharaj in Kolhapur State. Bhai Bagal must be congratulated for bringing out despite his physical infirmities this book which is indispensable for any one who is curious to know the social and cultural history of the masses in India in the first three decades of the 20th Century or the once sharp conflicts and controversies between the Brahmins and non-Brahmins in Western India.

What did the masses feel ? What did they think? Did the so-called 'twice-born' understand the inarticulate 'once-born' masses ? Did the masses understand the so-called high-caste 'twice-born' countrymen ?

Truth has many sides. It is terrible. It is complex. It has Vishwa-roop or cosmic reality. This book is an out-standing experiment with truth as made by Bhai Bagal's father. We may not agree with his discoveries. We are forced to think even where we may not be persuaded to agree.

The masses of India have in the recent past found their voice, generally in Mahatma Jyotiba Phule, Mahatma Gandhi, and Dr. Ambedkar. Their general views are more particularly explained by the clear and powerful views of great soldiers of truth and justice like Chhatrapati Shahu Maharaj, Bhai Bagal's father and Bhai Bagal himself

It is, therfore, praiseworthy on the part of Bhai Bagal, in the centenary year of Shahu Maharaj, to publish some important writings of his falher who with his ' Hunter ' served the cause of the Masse's welfare undertaken by Shahu Maharaj. Bagal father and son have revealed the truth as they saw it about the religious, legal, social, economic and political conditions in our country.

The collection includes ' Hunter ' Bagal's controversial editorial features, writings, pamphlets, articles or letters. The writings include his report on his meeting Mahatma Gandhi who lived and died to bring down the caste and creed barriers between man and man in our country. The social face of the masses of India is revealed in these writings. The falsity and hypocrisy practiced in the name of the Hindu Religion or culture by so called superior castes is exposed with great learning and vehemence. The author's powerful feelings for the working people described by superstitions traditions as inferior castes are expressed fearlessly. The ' Hunter ' thoughts are relevant as long as the hoary caste-cum-corruption-cum-superstition-cum-poverty culture of our society lives.

" Equality is our birthright " is the central theme of the writings included in the book, ' Hunter ' Bagals thoughts are capable of creating a new life, a brotherly life, a life governed by reason and light. They can help readers to shed the caste-cum-corruption-cum-superstition-cum-poverty complex and build a society of equals. Through these writings the ascending scale of pride and the descending scale of contempt inherent in

the practice of caste were both weighed before 1931, in the great scale of Truth and Justice by a prominent leader of the then Non-Brahmin Movement and Satya-Shodhak Samaj. 'Hunter' writings are based on the 20 th century universal, seminal ideal of Equality. They reflect Light and Reason amidst the darkness of Pride and Prejudice. for it can very well be said : "Pride and Prejudice-your Indian name is caste!"

Can this book be the herald of casteless society? Will it bring the time to stop exploitation of man by man in the name of God or Gods? Time, which is the patience of the people, can answer these omnipresent questions in Indian Society.

I hope Public opinion, the ancient law-giver, will accept this book in the right spirit and go ahead to fulfil the dreams of Bagal Father and Son. Are not such dreams stuff of our life? This may not be possible if one reads these writings as those of a mere fighting Non-Brahmin. They deserve to be studied scientifically as the writings of a man who lived as a Seeker of Truth, who was fired by the spirit of equal justice for all and who was till his death singing with Sir Henry Newbold :-

"My Caste! know thou there is a caste
Above my caste or thine;
Brahmin and Rajput are but dust
To that immortal line."
"Wide as the world, free as the air,
Pure as the pool of death-
The caste of all Earth's noble hearts
Is the right Solder's faith."

"Hunter" Bagal and his son have expressed in this book their firm faith in Liberty, Equality and Fraternity for all, everywhere and always in India. The book is "Hunter" Bagal's testament of Justice, colour-blind. creed-blind, wealth-blind, status-blind and sex-blind. It is an eternal and powerful plea for what the right-thinking members of Indian Society ought to believe to be fair.

Bombay, March 12, 1974.

G. N. Vaidya

# प्रास्ताविक

थोर व्यक्तीचा पुतळा उभारला, तिच्या नावे एखादे उपयुक्त असे सभागृह बांधले किंवा तिच्या नावे शिष्यवृत्त्या व पदके दिली तरी या सर्व स्मृतिचिन्हांहून त्या थोर व पराक्रमी व्यक्तीच्या ग्रंथरूपाने होणाऱ्या स्मारकाची गोष्ट मात्र वेगळी असते. त्या व्यक्तीचे कार्य व विचार यांची माहिती करून घेण्यास ग्रंथासारखे अन्य साधन नाही. पहिल्या तऱ्हेच्या स्मारकामुळे त्या व्यक्तीची स्मृती जागृत रहाते तर दुसऱ्या तऱ्हेच्या स्मारकामुळे त्या व्यक्तीचे विचार व कार्य ह्यांची समग्र माहिती भावी पिढ्यांस लाभते.

बहुजन समाजाचे कैवारी नि महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या चळवळीतील आघाडीचे वीर पद्मभूषण भाई माधवराव बागल ह्यांनी आपल्या पिताजींचे विचारधन वाचकांना उपलब्ध करून देऊन व त्यांच्या कामगिरीची माहिती करून देऊन जो कर्तव्यानंद व्यक्त केला आहे तो यथार्थच आहे. अशा स्तुत्य नि अभिनंदनीय रीतीने पितृऋण फेडून त्यांनी सत्पुत्राचे कर्तव्य पार पाडले आहे. शिवाय सामाजिक जडणघडणीसंबंधी वडिलांचे विचार व कार्य पुढे हिरीरीने स्वतः चालवून आपली भूमिकाही चांगली वठविली आणि सामाजिक इतिहास मांडण्यासंबंधीची आपल्या वरील जबाबदारी यथाशक्ती पार पाडली हे माधवराव बागलांना भूषणावह आहे.

महाराष्ट्रातील समाजक्रांतीच्या इतिहासात ब्राम्हणेतर पक्षाचे कांही नेते राजर्षी शाहु छत्रपतींच्या नेतृत्वाखाली झालेल्या चळवळीत गाजले. त्यापैकी प्रथम श्रेणीत गणले जाणारे प्रबोधनकार ठाकरे, जागरूककार वालचंद कोठारी दिनमित्रकार मुकुंदराव पाटील, जागृतिकार भगवंतराव पाळेकर, हंटरकार खंडेराव बागल, विजयी मराठाकार श्रीपतरावजी शिंदे व राष्ट्रवीरकर्ते शा. गो. देसाई प्रभृती संपादक ह्यांनी आपापल्या तडफदार व निर्भीड लेखणीने व वाणीने सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील अन्यायाला वाचा फोडून सामाजिक समतेच्या आंदोलनाला चालना दिली.

ह्या समाजक्रांतिवीरांचे लेखन म्हणजे गतकालातील सामाजिक नि धार्मिक झगड्याच्या स्वरूपाचे दिग्दर्शन व पुनर्दर्शन होय. खंडेराव बागल यांनी स्वतः विद्यार्थी दशेत शिळी भाकर व चटणी खाऊन आपल्या अठरा विश्वे दारिद्र्यावर मात करीत करीत अध्ययन पूर्ण केले व आपल्या कर्तृत्वाने एक नामांकित वकील, एक सामाजिक समतेचे सत्यशोधक नेते नि विद्वान संपादक म्हणून दक्षिण महाराष्ट्रात कीर्ती संपादन केली. बहुजनांच्या उपरोक्त कैवाऱ्यांप्रमाणे खंडेरावांनीही अडचणी व झीज सोसून स्वाध्यायशीलतेच्या सामर्थ्यावर ज्ञान संपादन केले. त्यांच्या पाठीमागे विद्वान मंडळीचा मेळावा नव्हता. त्यांना संदर्भ ग्रंथांची सुलभता नव्हती. सरकार व वृत्त प्रसारक संस्था ह्यांकडून येणाऱ्या माहितीपत्रकांचा पुरवठा नव्हता. तरी त्यांनी स्वाध्यायशीलतेच्या बळावर सामाजिक व धर्मशास्त्र क्षेत्रांतील प्रश्नासंबंधी विरोधी पक्षाच्या मताचे ठामपणे व खंबीरपणे खंडन केले यात त्यांची विद्वता नि धडाडी, चिंतन नि व्यासंग हे गुण दिसून येतात

भाई माधवराव बागलांनी सत्याला व औचित्याला धरून व इतर पथ्ये पाळून आपल्या पिताजींचे निवडक, मोजके पण महत्त्वाचे लेख ह्या ग्रंथात प्रविष्ट केले आहेत. या लेखांवरून खंडेराव बागल ह्यांनी केलेल्या समाज सुधारणाविषयक कार्याची माहिती मिळते. त्याचप्रमाणें त्या कालखंडात हिंदुसमाजाच्या एकात्मतेसाठी कोणते प्रयत्न झाले, विचारात व कार्यात कुठे चुकले याचे दर्शन घडते.

खंडेराव तथा आबासाहेब बागलांचे हे लेख तात्कालिक महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी विचार जागृती व मार्गदर्शन करणारे आहेत. दैनिकातील वा साप्ताहिकातील लिखाण हे प्रचलित विषयासंबंधी घाईघाईने लिहिलेले असते. त्यांत ज्ञानाची सखोलता, तपशीलाचा अचूकपणा, शास्त्र दृष्ट्या चर्चा ह्या गोष्टी नेहमीच आढळतात असे नाही. ह्या दृष्टीने पाहिले असता खंडेराव बागलांचे ऋग्वेदावरील लेख, धर्मशास्त्रावरील भाष्य, वेदमूर्ती सातवळेकरांवरील त्यांची टीका इत्यादी विचार वाचून त्यांच्या अध्ययनाची व व्यासंगाची प्रचीती येते. "खऱ्या लोकशाहीच्या वाटेत आड येणारी वतनी हक्काची झाडे झुडपे मुळासकट उपटून बाहेर फेकून दिली पाहिजेत" अशी त्यांची मनोधारणा होती. ग्रामवतने व घातुक रूढी ह्या विषयी त्यांनी व्यक्त केलेल्या मतांवरून त्यांच्या सुधारणाप्रिय व प्रगतीपर मतांना व्यापक विचारांची बैठक होती हे स्पष्ट होते.

खंडेराव बागल यांचे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादावरील लेख वाचून आम्हास प्रसिद्ध विचारक डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांच्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर

वादासंबंधीच्या अभिप्रायाची आठवण होते. ते म्हणतात. "लोकहित-वादी, रानडे, आगरकर यांनी समतेचे जे तत्त्वज्ञान सांगितले व समाजसुधारणेची जी इतर तत्त्वे सांगितली त्या अन्वये ब्राह्मणांची मनःक्रांती झाली असती तर हा अनर्थ (ब्राह्मण–ब्राह्मणेतर) बव्हंशी टळला असता असे वाटते, पण तसे झाले नाही... सावकार, कुलकर्णी आणि भिक्षुक ही त्रयी खेडयापाडयांतील ब्राह्मणे-तर समाजापुढे नित्य उभीं होतीं... आचारभ्रष्ट, स्वार्थी अशुची, द्रव्यलोभी विद्याहीन, कळाहीन ब्राह्मणांच्या जातीय श्रेष्ठतेच्या भावनेचा त्यांना संताप येऊ लागला. त्यातच वकील, सावकार व कुलकर्णी हा वर्ग इंग्रजी राज्याच्या भक्कम चौकटीच्या आश्रयाने श्रीमंत झाला आणि शेतकरी असह्य करांच्या ओझ्यामुळे दरिद्री होत चालला. आणि त्यांच्या जमिनी हळूहळू वरील तिघांच्या घरात गेल्या. हे सर्व कायद्याच्या आश्रयानेच चाललेले होते, आणि त्याकायद्याची अम-लवजावणी करणारे न्यायाधीश, शिरस्तेदार, मामलेदार, फौजदार, बेलीफ हे सर्व बहुधा ब्राह्मणच होते... या ब्राह्मणांच्या मनात नवे सामाजिक तत्त्वज्ञान रुजून, त्यांचे मतपरिवर्तन होऊन, त्यांच्या जातीय अहंकाराचा दर्प कमी झाला असता, आणि ते मतपरिवर्तन त्यांच्या आचरणात दिसले असते तरी विषमतेची तीव्रता बरीच कमी झाली असती. पण तसे मुळीच झाले नाही. जप, त्याग, अध्ययन, अध्यापन, शुचिर्भूतता, विवेक, संयम या गुणांचा वारस नसूनही ब्राह्म-णेतरांना ते हीन लेखीत, त्यांचा विटाळ मानीत, मग त्यांच्यात मिसळणं, त्यांच्या पंक्तीला खाणे पिणे, त्यांच्याशी समरस होणे हे त्यांच्या स्वप्नी आले नाही तर नवल काय ? महाराष्ट्रातील ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर समाज एकमेकांपासून दुरावले. त्यांच्यातील विषमता उत्तरोत्तर तीव्र होत चालली आणि त्यामुळे त्यांच्यातील वैराग्नी भडकून पुढे त्याचे अत्यंत अनर्थकारक परिणाम झाले त्याची कारणे ही अशी आहेत." (महाराष्ट्र–जीवन, भाग पहिला पृ. ३१३–१४)

पूर्वाश्रमीचे हिंदू काही पिढयानंतर शुद्धीकरण होऊन परत हिंदुधर्मात घेण्यासाठी त्या काळी चाललेली चळवळ नि तीर्थक्षेत्री देवाच्या व धर्माच्या नावाने भिक्षुकशाहीने स्वतःची तुंबडी भरण्यासाठी चालविलेली भोंदुगिरी ह्यांविषयी आपले परखड विचार खंडेराव बागलांनी निर्भीडपणे मांडले आहेत आणि ते विचारांती मार्मिकही वाटतात. त्या काळी महाराष्ट्रांत ब्राह्मण नेतेच शुद्धीचळवळीचे प्रणेते नि पुरस्कर्ते होते. ते केवळ शुद्धीकृतांना हिंदुधर्माचा टिळा लावीत होते. शुद्धीकृतांना रोटीबेटी व्यवहाराच्या दृष्टीने समाजात समावून घेण्याचा प्रयत्न ते करीत नव्हते. शुद्धीचळवळीचे नेते ह्या बाबतीत क्रियाशील नव्हते. जातीभेद

मोडण्याची धमक ते दाखवू शकत नसल्यामुळे शुद्धीसंघटनेचा प्रश्न ते सोडवू शकणार नाहीत, असे सांगून खंडेराव म्हणतात : " वेदांतातील समतेची तत्त्वे मराठावर्गच आज आमलात आणीत आहे. म्हणूनच आमचे म्हणणे की खरी शुद्धी संघटनेची चळवळ मराठी वर्गानेच हाती घेतली पाहिजे. तथापि प्रत्यक्षात शिवाजीचे ह्या बाबतीत आपण स्वतः अनुकरण न करता मराठे व ब्राह्मण एकमेकांना उपदेश करीत असतात ही गंमत आहे."

हिंदू असला म्हणजे त्याला जात असावी लागते. अशी हिंदू समाजरचना आहे. जात नाही तर हिंदू नाही. त्याची जात बुडाली की त्याला हिंदूधर्मात कोठे ही जागा नाही. अशा स्थितीत शुद्धीकृताना समान दर्जा व हक्क देण्यास समाजाची तयारी नसते. शुद्धीकृतांना समाजात पूर्वीचा दर्जा प्राप्त झाला असता तर परधर्मात गेलेले अनेक लोक हिंदुधर्मात स्वखुशीने आले असते. शुद्धीकृतांना हिंदुसमाज मिळून मिसळून घेत नाही असे सांगून खंडेराव बागल पुढे म्हणतात : ' हिंदू हा शब्द मागे लागला म्हणजे विचारात फरक पडत नाही व भावना बदलत नाही. कारण पुर्वीच्या महारांना हिंदुमहार म्हणून मूळच्या महारांच्या गोतवळयात आणले तरी त्याने पूर्ववत गावची गटारे उपसणे नाहीतर उकिरडे झाडणे आणि पुन्हा 'येरे माझ्या मागल्या' ह्या न्यायाने त्याला पुन्हा महारवाडाच दाखवायचा म्हणजेच चातुर्वर्ण्याच्या परंपरेत आणून सोडणे नव्हे का ? याला उपाय म्हणजे अंतस्थ शुद्धी झाल्यावाचून ही चळवळ व्यर्थ आहे, महारमांगांना कर्मस्वातंत्र्य मिळाले पाहिजे.'

खंडेराव बागलांचे वरील विधान हिंदुसमाजाच्या अंतर्गत शुद्धीच्या, समतेच्या नि बंधुत्वाच्या दृष्टीने खरे आहे अंतस्थ शुद्धी म्हणजे चातुर्वर्ण्यास मूठमाती देणे होय. वास्तव जातीभेदाला मूठमाती देण्याचा खरा निश्चय केल्या वाचून ब्राह्मणांना शुद्धीचा प्रश्न सुटणार नाही असा खंडेराव बागलांनी निर्वाळा दिला आहे. आणि खरोखर जातीभेद मानणे म्हणजे खरा धर्म नव्हे. जातीभेद मोडणे हा खरा धर्म होय. शुद्धीकरणाची चळवळ ही त्याकाळी महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी चालविल्यामुळे खंडेराव बागलांचा रोख ब्राह्मणांवरच होता; कारण त्या नेत्यांचा समाज ब्राह्मणेतरांना हीन लेखी, त्यांचा विटाळ मानी. त्यांच्यात मिसळणे, त्यांच्या पंक्तीला खाणे पिणे त्यांच्याशी समरस होणे हे त्यांच्या स्वप्नीही नव्हते.

तथापि धर्मांतर हे भारतात राष्ट्रांतर ठरते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी एक सूत्र सांगितले आहे. हिंदूचा मुसलमान

व ख्रिश्चन झाला की त्याची पुण्यस्थळे, धर्मस्थळे, स्फूर्तिस्थळे, धर्मपुरुष, धर्मग्रंथ बदलतात. त्याचा पोषाख व राष्ट्रीयवृत्ती बदलते. याचा अनुभव खंडेराव बागलांना ते स्वतः राजकारणी नेते नसल्यामुळे नव्हता.

हिंदू ख्रिश्चन झाला तर त्याची राष्ट्रीयवृत्ती बदलते कशी ह्याविषयी म. गांधीनाही आश्चर्य वाटे. हिंदूचा मुसलमान झाला म्हणजे त्याची वृत्ती अशी का होते ह्याविषयी मात्र ते मूग गिळून बसले होते. परंतु गांधीजींनी १९३६ साली चिडून जाऊन वा वैतागाने म्हटले होते की, " जर माझ्या हाती कायदा करण्याची सत्ता असती तर मी धर्मांतर करवण्याच्या चालीस बंदी केली असती." पण तसे घडले नाही. धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीने सहा महिने अगोदर सरकारला पूर्वसूचना देऊन धर्मांतर करावे असा आपल्या धर्मातीत सरकारने विवेकी व न्याय्य निर्बंध केला तरच धर्मांतरामुळे परिणामी राष्ट्रावर ओढवणारे वा मधून-मधून अशांतता निर्माण करणारे संकट टळेल.

खंडेराव बागलांचे चरित्र कथन करताना माधवराव बागलांनी समाजातील मखमखलीच्या पडद्यात व रेशमी कपड्यात वावरणाऱ्या संतमहंतानी चालविलेल्या भोंदुगिरीवर, बुवाबाजीवर व गुरुबाजीवर खंडेरावांनी कसे कोरडे ओडले यावर प्रकाश टाकला आहे. खंडेराव बागलांचे हे ढोंगबाजीवर फटके ओढण्याचे कार्य कोणाही विचारवंताला व बुद्धिवाद्याला पटावे असे आहे. बुवाबाजीला विरोध हा बागलांचा धमन्या धमन्यांतून घुमत आहे यातच त्यांचे वैशिष्टच आहे.

खंडेराव बागल मोठे विद्वान नि बुद्धिवान होते. तसेच ते देवभक्त व गांधीभक्तही होते. ते धर्मशील व भक्तिशील होते; पण पुराणमतवादी नि धर्मभोळे नव्हते. परंपरावादी मनुष्य आपले मत देशकाळाला अनुरुप असे बनवू शकतो; परंतु पुराणप्रिय मनुष्य आपले जीर्णमत बदलू शकत नाही. पण खंडेराव बागल हे पुराणप्रियही नव्हते व परंपरावादीही नव्हते. ते होते सुधारणावादी.

खंडेराव बागलांची धर्मशीलता गाईला श्रद्धेने चारा घालण्याइतकी भाविक व भूतदयावादी होती. कठोरता नि कोमलता यांचे ते एक मनोहर प्रतीक होते. असे म्हणाना. त्यांची धर्मश्रद्धा ही समाजात क्वचित आढळून येणाऱ्या एखाद्या सच्छील, समदृष्टी पंडितासारखी होती. ते एक व्यासंगी सत्यशोधक व सर्व धर्म समान मानणारे विचारवंत असल्यामुळे त्यांच्या अंगी धार्मिक सहिष्णुता व

मोडण्याची धमक ते दाखवू शकत नसल्यामुळे शुद्धीसंघटनेचा प्रश्न ते सोडवू शकणार नाहीत, असे सांगून खंडेराव म्हणतात : “ वेदांतातील समतेची तत्त्वे मराठावर्गच आज आमलात आणीत आहे. म्हणूनच आमचे म्हणणे की खरी शुद्धी संघटनेची चळवळ मराठी वर्गानेच हाती घेतली पाहिजे. तथापि प्रत्यक्षात शिवाजीचे ह्या बाबतीत आपण स्वतः अनुकरण न करता मराठे व ब्राह्मण एकमेकांना उपदेश करीत असतात ही गंमत आहे.”

हिंदू असला म्हणजे त्याला जात असावी लागते. अशी हिंदू समाजरचना आहे. जात नाही तर हिंदू नाही. त्याची जात बुडाली की त्याला हिंदूधर्मात कोठे ही जागा नाही. अशा स्थितीत शुद्धीकृताना समान दर्जा व हक्क देण्यास समाजाची तयारी नसते. शुद्धीकृतांना समाजात पूर्वीचा दर्जा प्राप्त झाला असता तर परधर्मात गेलेले अनेक लोक हिंदुधर्मात स्वखुशीने आले असते. शुद्धीकृतांना हिंदु-समाज मिळून मिसळून घेत नाही असे सांगून खंडेराव बागल पुढे म्हणतात : ‘ हिंदू हा शब्द मागे लागला म्हणजे विचारात फरक पडत नाही व भावना बदलत नाही. कारण पुर्वीच्या महारांना हिंदुमहार म्हणून मूळच्या महारांच्या गोतवळ्यात आणले तरी त्याने पूर्ववत गावची गटारे उपसणे नाहीतर उकिरडे झाडणे आणि पुन्हा ‘येरे माझ्या मागल्या’ ह्या न्यायाने त्याला पुन्हा महारवाडाच दाखवायचा म्हणजेच चातुर्वर्ण्याच्या परंपरेत आणून सोडणे नव्हे का ? याला उपाय म्हणजे अंतस्थ शुद्धी झाल्यावाचून ही चळवळ व्यर्थ आहे, महारमांगांना कर्मस्वातंत्र्य मिळाले पाहिजे.’

खंडेराव बागलांचे वरील विधान हिंदुसमाजाच्या अंतर्गत शुद्धीच्या, समतेच्या नि बंधुत्वाच्या दृष्टीने खरे आहे अंतस्थ शुद्धी म्हणजे चातुर्वर्ण्यास मूठमाती देणे होय. यास्तव जातीभेदाला मूठमाती देण्याचा खरा निश्चय केल्या वाचून ब्राह्मणांना शुद्धीचा प्रश्न सुटणार नाही असा खंडेराव बागलांनी निर्वाळा दिला आहे. आणि खरोखर जातीभेद मानणे म्हणजे खरा धर्म नव्हे. जातीभेद मोडणे हा खरा धर्म होय. शुद्धीकरणाची चळवळ ही त्याकाळी महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी चालविल्यामुळे खंडेराव बागलांचा रोख ब्राह्मणांवरच होता; कारण त्या नेत्यांचा समाज ब्राह्मणेतरांना हीन लेखी, त्यांचा विटाळ मानी. त्यांच्यात मिसळणे, त्याच्या पंक्तीला खाणे पिणे त्यांच्याशी समरस होणे हे त्यांच्या स्वप्नीही नव्हते.

तथापि धर्मांतर हे भारतात राष्ट्रांतर ठरते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी एक सूत्र सांगितले आहे. हिंदूचा मुसलमान

व ख्रिश्चन झाला की त्याची पुण्यस्थळे, धर्मस्थळे, स्फूर्तिस्थळे, धर्मपुरुष, धर्मग्रंथ बदलतात. त्याचा पोषाख व राष्ट्रीयवृत्ती बदलते. याचा अनुभव खंडेराव बागलांना ते स्वतः राजकारणी नेते नसल्यामुळे नव्हता.

हिंदू ख्रिश्चन झाला तर त्याची राष्ट्रीयवृत्ती बदलते कशी ह्याविषयी म. गांधीनाही आश्चर्य वाटे. हिंदूचा मुसलमान झाला म्हणजे त्याची वृत्ती अशी का होते ह्याविषयी मात्र ते मूग गिळून बसले होते. परंतु गांधीजींनी १९३६ साली चिडून जाऊन वा वैतागाने म्हटले होते की, "जर माझ्या हाती कायदा करण्याची सत्ता असती तर मी धर्मांतर करवण्याच्या चालीस बंदी केली असती." पण तसे घडले नाही. धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीने सहा महिने अगोदर सरकारला पूर्वसूचना देऊन धर्मांतर करावे असा आपल्या धर्मातीत सरकारने विवेकी व न्याय्य निर्बंध केला तरच धर्मांतरामुळे परिणामी राष्ट्रावर ओढवणारे वा मधून-मधून अशांतता निर्माण करणारे संकट टळेल.

खंडेराव बागलांचे चरित्र कथन करताना माधवराव बागलांनी समाजातील मखमखलीच्या पडद्यात व रेशमी कपड्यात वावरणाऱ्या संतमहंतानी चालविलेल्या भोंदुगिरीवर, बुवाबाजीवर व गुरुबाजीवर खंडेरावांनी कसे कोरडे ओडले यावर प्रकाश टाकला आहे. खंडेराव बागलांचे हे ढोंगबाजीवर फटके ओढण्याचे कार्य कोणाही विचारवंताला व बुद्धिवाद्याला पटावे असे आहे. बुवाबाजीला विरोध हा बागलांचा धमन्या धमन्यांतून घुमत आहे यातच त्यांचे वैशिष्टच आहे.

खंडेराव बागल मोठे विद्वान नि बुद्धिवान होते. तसेच ते देवभक्त व गांधीभक्तही होते. ते धर्मशील व भक्तिशील होते; पण पुराणमतवादी नि धर्मभोळे नव्हते. परंपरावादी मनुष्य आपले मत देशकाळाला अनुरुप असे बनवू शकतो; परंतु पुराणप्रिय मनुष्य आपले जीर्णमत बदलू शकत नाही. पण खंडेराव बागल हे पुराणप्रियही नव्हते व परंपरावादीही नव्हते. ते होते सुधारणावादी.

खंडेराव बागलांची धर्मशीलता गाईला श्रद्धेने चारा घालण्याइतकी भाविक व भूतदयावादी होती. कठोरता नि कोमलता यांचे ते एक मनोहर प्रतीक होते. असे म्हणाना. त्यांची धर्मश्रद्धा ही समाजात क्वचित आढळून येणाऱ्या एखाद्या सच्छील, समदृष्टी पंडितासारखी होती. ते एक व्यासंगी सत्यशोधक व सर्व धर्म समान मानणारे विचारवंत असल्यामुळे त्यांच्या अंगी धार्मिक सहिष्णुता व

उदारपणा, भूतदया नि समता बाणली होती. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे टिळक म्हणतात, तर आम्ही म्हणतो समता हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे." असे खंडेरावांचे एक घोषवाक्य होते. त्यांच्या ह्या कळकळीच्या उक्तीत त्यांच्या जीवनांची शक्ती, ब्रीद नि मोल दिसून येते.

पद्मभूषण माधवराव बागल यांनी हा ग्रंथ प्रसिद्ध करुन महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या एका दालनावर प्रकाश टाकला आहे. त्याविषयी मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

१२ मार्च १९७४

**धनंजय कीर**

सत्यमेव जयते


वित्त मंत्री, भारत
FINANCE MINISTER
INDIA.
नवी दिल्ली.


३१ मार्च १९७४

श्री खंडेराव गोपाळराव बागल यांच्या निवडक लेखांचे संकलन करुन ते प्रसिद्ध करण्यात श्री. माधवरावजींनी आपली दुहेरीं जबाबदारी पार पाडली आहे. आपल्या विद्वान, विख्यात व विचारवंत पित्याचे विचारधन प्रसिद्ध करुन त्यांनी आपले पितृऋण तर फेडले आहेच परंतु त्याचबरोबर ते विचारधन नव्या पिढीच्या समोर संकलित स्वरुपात ठेवून समाज ऋणहि फेडले आहे.

महात्मा फुले यांनी जे वैचारिक आन्दोलन महाराष्ट्रात निर्माण केले त्या वातावरणांत वाढलेल्या पिढीतील श्री. खंडेराव बागल हे एक महत्वाचे विचारवंत होते. त्यांची निष्ठा व्यासंगावर आधारलेली होती त्यामुळे त्या निष्ठेला दूरदृष्टी लाभली होती. त्या विचारातील सर्वच आग्रह सर्वांना मान्य होतील असे नाहीं. ब्राम्हण-ब्राम्हणेतर वादावरील त्यांचे विश्लेषण आणि इंग्रज विरोधी राष्ट्रीय चळवळीं संबंधीचे त्यांचे विवेचन यासंबंधी जरुर मतभेद होतील. परंतु दलित समाजाबद्दल ज्या पोटतिडीकीने त्यांनी लिहिले आहे. ते आजहि मार्गदर्शक ठरेल असे मला वाटते.

*यशवंतराव चव्हाण*

# माझे वडील दिवंगत

# खंडेराव गोपाळराव बागल

संपादक हंटर बी. ए. एल. एल. बी.

## लेखक– भाई माधवराव बागल

खाली रस्त्यावर जाणारी मंडळी थबकली होती. माडीवरच्या मंडळींचा आवाज खूप चढला होता. वाटावं थोड्याच वेळात वरील मंडळी मारामारीपर्यंत जाणार! मोठ्या माणसांच्या घरचा प्रकार. खंडेराव बागल म्हणजे कोल्हापूर संस्थानचे पहिल्या दर्जाचे नामांकित वकील. संस्थानचे पहिले मराठा एल. एल. बी. छ. शाहूमहाराजांचे कायद्याचे सल्लागार. याचमुळे माडीवर जाऊन पृच्छा करण्याचे कोणी धाडस केले नाही.

पण इतक्यात सारा गलबला शांत झाला. लोकांना समजेना भांडण झाले कशामुळे व मिटले कशामुळे. भांडण खासगी नव्हते. तात्विक मतभेदाचे होते. शहरातील प्रसिद्ध वकीलांचे रण माजले होते वादाचे. तेथे होते वकील तात्या आपटे, धर्माधिकारी, विष्णू विनायक जोशी, वगैरे मित्र मंडळीच. त्यानी माडी–वरुन खाली पाहिले व त्यांचे त्याना हंसू आले.

बागल म्हणाले,

' अहो मेहरबान पुरे झाला वाद आता, पडा बाहेर. बोलण्याच्या नादात सहा वाजून गेले ! चला घाटावर जाऊन बसू आता. सारी मंडळी बाहेर पडली.

घरचे मालक खंडेरावजी, आपल्या प्रतिस्पर्ध्याबरोबर बाहेर पडले. सारे ब्राम्हणी थाटाचे. कपड्यावरून बागल मराठे असे कोणाला वाटणार नाही. डोकीला रूमाल अंगात काळा कोट, कपाळाला गंध, कोटावर उपरणे व पायात पठाणी जोडा. वाटावं हे कोणी विद्वान ब्राम्हण पंडित असावेत. धोतर हात सुताचे, खादीचे. घरच्या मंडळींनी काढलेल्या सुताचे, कोट खादीचाच काळा रंगवलेला !

सनातनी माणसाला शोभण्याजोगा अवतार. चंदनाच्या पट्यावर लावलेला गंध. जणु हरिभक्त परायण. धर्मग्रंथाचे अभ्यासू. रामायण, भारत, भागवत, गीतेचे अभ्यासू. रोज स्नानानंतर देवपूजा, व गीतेचा एक अध्याय रोज निय-

माने वाचणार. त्यामुळे गीता मुखोद्गत. सारे ग्रंथ विकत घेऊन काळजीपूर्वक वाचलेले. महत्वाच्या मजकुरावर तांबड्या पेन्सीलीने खुणा करणार, असे शेकडो ग्रंथ मालकीचे.

रोज संध्याकाळी पंचगंगा घाटावर जाऊन उघडे बसणार. संध्या करणार. पाण्यात पाय सोडून ध्यानमग्न होणार. गळ्यात जानवं होतंच.

ऋग्वेद, मनुस्मृति तसे तुकाराम एकनाथ वाचलेले. डॉ. केतकरनी घरी येऊन आपला ज्ञानकोश दिला होता. तोही सारा तांबड्या खुणानी भरून टाकला. साहित्याचा नाद कमी. त्यामुळे त्यांच्या ग्रंथालयात कादंबरी क्वचितच आढळे. केवळ करमणूक म्हणून ते कधीही वाचत नसत. शिकावं व लोकानां शिकवावं हा हेतू. वाचनाशिवाय एक दिवस कधी सुद्धा गेला नाही.

ते धार्मिक होते, पण पुराणमतवादी नव्हते. धार्मिक व सामाजिक सुधारकच होते. शिवाशिव पाळत नव्हते. सहभोजने अनेक घडवून आणली. महार मुलाला जवळ ठेऊन शिकवले. देवपूजेचं सामान तोच तयार करून टेवी. फुले आणून ठेवी. एकदा आम्हा चौघा मुलाना व आबा व आई सर्वांना चांदीची ताटे करून आणली पण मुहूर्त केला त्या ताटात गोविंदराव माग, डी. एस्. पवार, चांभार, अक्कीवाटे मुसलमान व रामभाऊ जाधव याना जेवू घालून ती ताटे धुतली आईने, खरखटे काढले तिने नंतर आम्ही सर्व त्यात जेवलो –

खंडेराव बागलांचं मूळ गांव यळगूड. छोटसं खेडं कागल-जवळ. करवीर संस्थानच्या सरहद्दीच्या उत्तर सीमेवरचे हे अखेरचे खेडे. जन्म १८७२ साली त्यांच्या वडिलार्जित घरी झाला. हे गाव पूर्वी साखरेच्या धंद्याबद्दल प्रसिद्ध होते. पण विदेशी साखरेचा प्रसार सर्वत्र जोराने सुरू झाल्यामुळे या गावचा साखरेचा धंदा अजिबात बुडाला ! पण यळगुडी साखरेचे नाव अद्यापही पुष्कळांच्या स्मरणात आहे. हा गाव बागल घराण्याला त्यांच्या स्वामिनिष्ठेबद्दल इनाम मिळालेला आहे. महाराष्ट्रात भेटणाऱ्या बागल या आडनावाच्या बहुतेक सर्व मंडळींचे मूळगांव, यळगूड हेच होय. खंडेरावाच्या वडिलांची सांपत्तिक स्थिती अगदीच खालावलेलीं होती. उत्पन्नाबाहेर खर्च करून कर्जात बुडण्याचा मराठे वर्गाचा पिढिजात दुर्गुण खंडेराव बागलांचे वडील गोपाळराव यांचेही अंगी वसत असल्यामुळे व त्यांच्या वेताल खर्चिकपणामुळे हे बागल घराणे पूर्णपणे कर्जबाजारी बनले होते. पूर्वीच्याकाळी अशा मराठे लोकांना शेतीवाचून दुसरे उत्पन्नाचे साधन नसे. आणि ती शेतीही बहुधा कर्जाच्या डोईजड बोजामुळे सावकाराच्या हाती पूर्णपणे जाऊन ते पोटाचे साधनही हे लोक, बहुधा गमावून बसलेले असत ! तशीच हुबेहुब दिवंगत गोपाळरावांची अवस्था झाली

होती. त्यांची जी थोडीबहुत वडिलार्जित जमीन होती, ती सावकाराच्या कर्जांच्या बोजाखाली पुरी बुडाली होती. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती अतीशय अनुकंपनीय बनलेली होती. पण खंडेरावांचे वडील गोपाळराव, हे मोठे करारी, निश्चयी आणि जात्या बुद्धिवान होते. म्हणून अशा सांपत्तिक हलाखीच्या स्थितीमुळेसुद्धा ते डगमगले नाहीत. किंवा हताश होऊन कर्तव्यच्युत झाले नाहीत. आपला धाकटा मुलगा खंडेराव बुद्धिमान असून कर्तबगार आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती. आणि म्हणूनच खंडेरावावर त्यांचे अत्यंत प्रेम होते. त्याच्या बुद्धीचा विकास ज्या ज्या मार्गाने होईल त्या त्या मार्गाने ते त्याला सतत प्रोत्साहन देत असत. ह्या पित्याच्या प्रेमळ सहानुभुतीमुळे मुलामध्ये वसत असलेल्या गुणांचा विकास झपाटयाने होऊ लागला. गोपाळराव स्वत: जरी सुशिक्षित नव्हते तरी शिक्षणाचे महत्त्व ते पूर्णपणे ओळखून होते. आधुनिक चढाओढीच्या जीवनसंग्रामात शिक्षणावाचून यश:प्राप्ती किंवा लौकिक मिळवणे संभवनीय नाही ह्याची पूर्ण जाणीव गोपाळरावजीना होती म्हणूनच आपल्या पुत्राला शक्य त्या सर्व उपायानी सुशिक्षित करण्याचा त्यांनी निर्धार केला. आणि स्वत: अनंत हालअपेष्टा भोगून मुलाचा शिक्षणक्रम सुरू ठेवला. मुलग्याच्या म्हणजे खंडेरावांच्या चार यत्ता यळगूड गावीच झाल्या. जात्याच ते अत्यंत हुशार असल्यामुळे वर्गात पहिला नंबर त्यानी कधीच सोडला नाही. लहानपणापासूनच त्यांची गणीत विषयातील प्रगती वाखाणण्यासारखी असे. त्यामुळे शाळेतील शिक्षक वर्गाचीही त्यांच्यावर प्रीती असे. एकामागून एक परीक्षा ते लागोपाठ पास होत गेले.

गोपाळराव हे भाविक वृत्तीचे असल्यामुळे आपल्या प्राचीन ग्रंथाच्या श्रवणाची त्याना अतिशय गोडी होती. आपल्या मुलग्याला वाचता येऊ लागल्यामुळे महाभारत रामायण हरीविजय या सारखे हिंदूंच्या प्राचीन संस्कृतीचे आदर्शभूत ग्रंथ, त्यानी आपल्या आवडत्या चिरंजिवाकडून वाचून घेतले. त्या ग्रंथ वाचनाची खंडरावकडून अनेक पारायणे घडली. ह्याच कारणामुळे त्यांच्या बालमनावर हिंदुसंस्कृतीचा ठसा उमटला गेला. तो अखेरपर्यंत कायम राहिला पण त्या जगप्रसिद्ध ग्रंथाकडे केवळ अंधभक्तीने न पाहता अत्यंत प्राचीन अशा आर्य संस्कृतीचा चित्रमय इतिहास या दृष्टिने ते त्या ग्रंथाकडे पहात.

यळगुड गांवी मराठी चार इयत्तांचा शिक्षणक्रम पुरा झाल्यानंतर, पुढील शिक्षणासाठी त्याना आपल्या प्रिय पित्याचा आणि जिवलग संवगडयांचा सहवास सोडून पाचवीनंतर करवीरास जाणे प्राप्त झाले. शाळेत असताना त्यांना चिनी दांडू, आटयापाटया, खोखो, कुस्ती वगैरे मर्दानी खेळांची अतिशय आवड असे. ते जसे उत्तम विद्यार्थी होते तसेच खेळाडूही होते. त्यांची प्रकृति पहिल्यापासूनच

चांगली. त्यातही पुनः कुस्ती, आटापाटचा वगैरे सारख्या खेळांची भर पडल्यामुळे, भरपूर व्यायाम होऊन त्यांचे शरीर निकोप आणि पिळदार बनले होते. यळगूड गांवी उघडचा आखाडचात त्यांनी कांही प्रसंगी कुस्त्या जिंकून त्या कलेतील आपले कौशल्य लोकांच्या निदर्शनास आणले होते.

खंडराव कागलास असताना एका नाटक कंपनीचा एक प्रयोग पहाण्याची संधी लाभली. त्या प्रयोगाचा त्यांच्या बालमनावर बराच परिणाम झाला. झाले लागलीच आपणही तशी एक कंपनी काढण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात शिरली. सुटीत गावी आल्याबरोबर त्यांच्या सवंगडचांचा घोळका त्यांचे भोवती जमला. खंडेराव हे त्यांचे प्रिय पुढारी. ते सांगतील ती गोष्ट करण्याला त्यांचे सवंगडी सदैव तत्पर. मारूतीच्या देवालयात नाटक कंपनी काढण्याबाबत विचार करण्यासाठी या बालसवंगडचाची सभा भरली आणि खंडेरावांचा ठराव बिन विरोध पास झाला. प्रयोगाची सर्व जय्यत तयारी झाली. पण ऐनवेळी वडील मंडळींचा विरोध झाल्यामुळे हा सर्व खटाटोप वाया गेला !

ह्या लहानशा गोष्टीवरून त्यांच्या महत्वाकांक्षी मनाची कल्पना करता येईल. कोणत्या का उपायाने असेना पण काहीं तरी कर्तबगारी करून दाखवून नाव लौकिकास यावे ही महत्वाकांक्षा त्यांच्या ठिकाणी सदैव व जागृत होती. ते कोणत्याही धंद्यात पडले असते तरीही त्यांनी नाव लौकिक संपादन केला असता. इतका त्यांना स्वसामर्थ्याबद्दल विश्वास होता. 'हीरो इज हीरो अॅट ऑल पाइन्ट्स' ही कार्लाइलच्या उक्तीची या ठिकाणी आठवण झाल्याविना रहात नाही. लोकसंग्रहाची कला त्यांना बालवयातच निर्माण झाली होती. हे त्यांच्या बालपणीच्या सवंगडचांच्या समुदायातून सिद्द होते. लहानपणीचे बाल-गोपालांचे पुढारी पुढे संस्थानातले त्या कालचे एक पुढारी बनले.

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात अशी एक म्हण आपल्याकडे प्रचारात आहे. ती खंडरावाच्या बाबतीत अगदी सार्थ ठरली.
खंडराव आपल्या घराण्यांचं नाव काढील ही जाणीव त्यांच्या वडिलाना खंडरावांच्या बालवयातच झाली होती.

'आमचा खंडूबाबा, बागल घराण्याचं नाव काढणार'

असे ते आपल्या मंडळीत मोठचा अभिमानाने बोलत असत. आणि हे त्यांचं भविष्य खंडेरावनी खरं करून दाखवलं.

१८७७ सालचे दुष्काळात दारिद्रचामुळे इतका कहर करून टाकला कीं त्या दुष्काळाचा परिणाम बागल घराण्यावरही भयंकर झाला. त्या वेळच्या त्या हृदयद्रावक स्थिती संबंधाने ते कधी बोलू लागले कीं त्यांच्या डोळचात आसवे

उभे रहात. अशाही कठिण प्रसंगाला त्यांच्या धीरोदात्त वडिलानी धैर्याने पाठ दिली. आणि खंडरावांचे सरंक्षण केले. मराठी पाच इयत्ता झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणाची सोय कोल्हापूर शिवाय दुसरीकडे होणे शक्य नव्हते. सांपत्तिक अड-चणीमुळे करविरी राहणे त्याना कित्येक दिवस अशक्य झाले होते. तरी ते कागलहून करवीरास चार कोस रोज चालत येत. आणि संध्याकाळी पायीच परत जात. ही त्यांची शिक्षणासाठी वाटेल तितके शारिरिक सायास आणि क्लेश सहन करण्याची तयारी पाहिली म्हणजे त्यांची शिक्षणाभिरूची केवढी असमान्य होती याची कल्पना करता येईल. नाहीतर आधुनिक विद्यार्थ्यांना एक फर्लांग-वरच्या शाळेस जाण्याला देखील वहानाची जरूरी भासते. हे कागलांचे वरील उदाहरण हल्लीच्या सुख लोलुप विद्यार्थ्यांना ' अरेबियन नाइट्स ' मधील कल्पित कथानक वाटल्यास नवल नाही. त्यातही खंडेरावना तालमीचा शोक असल्या-मुळेच हा एवढा मोठा पल्ला ते झेपू शकले.

अशारीतीने एकीकडे शिक्षण संपादनाची जबर महत्वाकांक्षा आणि दुसरीकडे त्या महत्वाकांक्षेला पायबंद घालणारी सांपत्तिक दुर्दशा, त्याना अतिशय जाचक झाली होती. अशा प्रतिकुल परिस्थितीशी झगडा चालू असतानाच त्यात अधि-कच भर घालणेकरिता की काय जणू त्यांचे वडील कालवश झाले ! ज्यांच्या प्रेमळ आधारावर खंडेरावनी संकटाची कधी तमा बाळगली नाही. ज्यांच्या पितृप्रेमाच्या छत्राखाली त्याना दारिद्र्याच्या दारुण तापाची विशेष अशी कधी झळ लागली नाही, तो वृक्षच उन्मळून पडल्यामुळे त्यांची अत्यंत करुणास्पद अवस्था झाली ! दाहीदिशा शुन्य भासू लागल्या ! गोपाळरावांचे लाडके खंडेराव, पोरके बनले. त्या अफाट जगात त्याना आपले असे कोणी राहिले नाही, वडिलांच्या मृत्युमुळे त्यांच्यावर पोर वयातच दुर्दैवाचा डोंगर कोसळला ! पैशाचे साधन नाही ! मायेचा ओलावा नाही. राहण्याला विसाव्याची जागा नाही. अशी भयंकर अवस्था इतक्या लहान वयात त्याना प्राप्त झाली. त्यावेळी दुदैवी खंडेरावांच्या मनाची काय अवस्था झाली असेल ह्याची कल्पना शब्दाने देता येणार नाही. त्यांच्या सारख्या प्रतिकूल परिस्थितीच्या वणव्यात होरपळून निघालेल्या दुर्दैवी जीवा-नाच ती कल्पना करता येईल.

कर्तबगार पुरुष परिस्थितीचा दास नसून परिस्थितीचा निर्माता असतो, हे खंडेरावनी आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले. कच्च्या दिलाचा माणूस अशा संक-टानी गांगरून ' किं कर्तव्य मूढ ' बनला असता, पण खंडेराव संकटास जुमानणारे नव्हते. त्यानी आरंभिलेला शिक्षणक्रम मोठ्या नेटाने आणि चिकाटीने पुढे चालू ठेवला ! ' हरी हरि ' करत स्वस्थ निराश होऊन बसले नाहीत. कोण-त्याना कोणत्या मार्गाने जरूरी पुरते पैसे स्वतःच्या श्रमावर कमऊन शिक्षण

पुढे चालू ठेवले. त्या-विना दुसरा मार्गच शिल्लक राहिलेला नव्हता. त्याना एक शिकवणी मिळाली. पण तेवढयाशा प्राप्तीने काय होणार ! शाळेची फी भागवण्याची त्याना मोठी पंचाइत पडायची. म्हणून दर रविवारी पंचगंगा नदीवर भरत असलेल्या गुरांच्या बाजारात विक्री खरेदीच्या पावत्या लिहून देऊन शंभर पावत्या मागे एक आणा अशी त्याना जी प्राप्ती होत असे, त्या मिळालेल्या पैशावर त्यानी किती तरी वेळा शाळेची फी भागविली.

त्याना रहायला एका पाहुण्याच्या घरची वळकुटी टाकण्यापुरती जागा मिळाली. घर मालकीण त्यांच्या आप्तापैकी. तिला त्यांच्याबद्दल आपुलकी वाटत होती. पण नवऱ्याला ही ब्याद नको होती. म्हणून तो त्यांचा अपमान करी. घालून पाडून बोली. रात्री अभ्यासासाठी चिमणी घेतली. जागा पाहिजे आणि रॉकेलही जाळायला पाहिजे, म्हणून हिणवले. व चिमणी काढून घेतली. तेव्हा घराच्या समोरच्या रस्त्यावर असलेल्या कमेटीच्या दिव्याखाली बसून अभ्यास करीत. पुस्तकाना पैसे नाहीत अंगावर कपडे नाहीत अशा प्रकारे सांपत्तिक अडचणीच्या परिस्थितीतून ते मोठ्या कष्ठाने व सायासाने कसावसा मार्ग काढत होते. आणि आपला विद्याव्यासंग चालवीत होते. अशा परिस्थितीत त्याना करवीर संस्थानातील एक प्रसिद्ध जहागिरदार श्रीमंत अप्पासाहेब खर्डेकर यांचा परिचय होण्याचे भाग्य लाभले. खडेरावांच्या अंगची हुषारी विनयशीलपणा आणि शिक्षणाची तळमळ पाहून श्रीमंताना फार आनंद वाटला. त्यानी बागलाना एक छोटीशी शिष्यवृत्ती सुरू केली. त्यांचा उत्साह वाढेल असा उपदेश केला अचानकपणे ही स्कालरशिप मिळाल्याने त्यांचा उत्साह वाढला. त्यांचे दारिद्र थोडे हलके झाले. शिकवण्या पत्करून व पावत्या लिहून. वगैरे मार्गानी मिळणाऱ्या पैशावर त्यानी इंग्रजी सातवीपर्यंत मजल मारली. त्यांचे या हायस्कूलच्या विद्यार्थीदशेतील आयुष्य म्हणजे दुर्दैवाच्या दारुण दुर्विलासाची परासीमा होती. कादंबरीला एक हृदयस्पर्शी कथानक मिळेल असे हे त्याचे जीवन मधुकरी मागून, दारोदार भिक्षा मागून शिक्षण संपादन करून पुढे नाव लौकिकास चढलेले ब्राम्हण विद्यार्थी वर्गाची उदाहरणे पुष्कळ पहावयास मिळतात. तो त्यांचा पेशा असतो. त्यामुळे त्याना विशेष असे काही वाटंत नाही. पण कुलशीलवान मराठा घराण्यात जन्मास येऊन त्यांच्या मराठीमानीपणाला थोडा सुद्धा धक्का न लावतां भिक्षादेहीच्या मार्गास धिक्कारून खंडेरावनी स्वतःच्या परिश्रमाने प्रयत्नाने व चिकाटीने स्वतःच्या हिंमतीवर शिक्षणापुरते पैसे कमावले आणि पुढे नाव लौकिक मिळवला. राजमान्यता व लोकमान्यताही जनसेवेमुळे मिळवली.

भिक्षेचीं कल्पना मराठा मनाला सहन होत नाही. हा वर्ग लष्करीपेशाचा

असल्यामुळे शिक्षणाची गोडी कमी. आणि त्यातही गरीबीची स्थिती असल्यानंतर तर शिक्षणाचे नांवच नको. अशी स्थिती असताना खंडेरावनी दारिद्र्याशी झगडून, याचक वृत्ती धिक्कारून कोणाच्या मदतीची अपेक्षा न करता स्वतःच्या हिमतीच्या व कर्तबगारीच्या जोरावर शिक्षणक्रम पुरा करण्याची जी अपूर्व धडाडी दाखवली ती मागासलेल्या मराठा वर्गाला अत्यंत भूषणास्पद आहे. हायस्कूलमध्ये इंग्रजी सातवीत त्याना आल्फ्रेड स्कालरशिप मिळाली. १८९० साली ते मॅट्रिकची परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले. नंतर लागलीच त्यानी आपले नांव राजाराम कॉलेजमध्ये दाखल केले. त्यांचा भूमिती हा आवडीचा विषय असल्यामुळे, त्याना प्रिव्हीयस परिक्षा पास होणे अगदीच सुलभ गेले. इंटरमध्ये असताना त्यानी युक्लीडमध्ये दाखविलेली प्रगती पाहून त्या वेळचे त्या विषयाचे प्रसिद्ध प्रो. आर्. एन्. आपटे यांचा खंडेरावांच्यावर अतिशय लोभ जडला व त्यानी खंडेरावना विशेष प्रोत्साहन दिले.

राजाराम कॉलेजमध्ये असताना वर्गातील विद्यार्थ्यांना जमवून सभा भरवाव्यात, आपल्या आवडत्या विषयावर भाषणे करावीत आणि आपले विचार आपल्या सहाध्यायी मित्रासमोर मांडावेत व त्याना मांडावयास लावावेत, ह्या गोष्टीची त्याना मोठी हौस बालपणापासूनच होती. प्रसंगी जाहीर सभातूनही भाषणे करून ते आपले विचार श्रोत्यांसमोर मांडत असत. आपणास येत असलेल्या गोष्टी दुसऱ्यास सांगण्याची हौस त्याना दांडगी होती. विश्वविद्यालयातील वादविवाद संस्थातून, ते प्रमुखपणे भाग घेत असत. त्यांच्या भाषण पद्धतीबद्दल आणि वादविवाद कुशलतेबद्दल त्यावेळीच त्यानी कीर्ती मिळविली होती. त्यांचा स्वभाव भावनाप्रधान होता तरी बुद्धिवादापासून सुटून नव्हता. विचारसरणी आणि विषय मांडणी, विवेकपूर्ण आणि अंतःकरणाला पटणारी होती. ते केवळ रुक्ष बुद्धिवादी नव्हते. अंतःकरण प्रेममय होते. भाषणात अभ्यास होता आणि तसाच जिव्हाळा होता.

शंकराचार्यांसारख्या बुद्धिवादातील अजिंक्य वाटणाऱ्या वीरांच्या ग्रंथापेक्षा भक्तिरसाने ओथंबलेल्या महान् भगवत् भक्त संत तुकोबाराया यांच्या अभंग वाणीतून अव्याहत वाहणाऱ्या प्रीतिरसाने ते दंग होत असत. रुक्ष बुद्धीवादाने मनाचे समाधान कदाचित करता येईल. पण ती शक्ती अंतःकरणाला भूक व तळमळ शांत करण्याला अपुरी पडते ! श्री तुकोबारायांचे अभंग ते म्हणू लागले म्हणजे त्यांच्या वृत्ती इतक्या कांही एकतान होत असत कीं त्याना स्वतःचा विसर पडे व ते आनंदाश्रू गाळत.

राजाराम कॉलेजमधून इंटरमिजीयेट परिक्षा पास झाल्यानंतर त्याना

पुढील शिक्षण क्रमाकरता मुंबईस जाणे प्राप्त झाले. कारण त्या वेळी राजाराम कॉलेज हे आजच्या प्रमाणे फुलग्रेड कॉलेज नव्हते. त्यानी मुंबईस जाण्याची तयारी केली. त्यावेळी त्यांचेबरोबर त्यांचे अत्यंत जवळचे मित्र गोपाळराव खांडेकर आणि सदाशिवराव आळतेकर हे होते. हे खंडेरावाचे हायस्कूलच्या शिक्षणापासुनचे वर्गबंधू होते, इतकेच नव्हे तर त्यांचा स्नेहसंबंध सख्या भावापेक्षाही अधिक जिव्हाळयाचा होता. खंडेरावनी मुंबईस विलसन कॉलेजात नाव दाखल केले. आणि त्याच कॉलेजमधून ते मुंबई विश्वविद्यालयाचे बॅचलर ऑफ आर्टस्‌ची ( बी. ए. ) परिक्षा पास झाले. त्यावेळी त्यांचे सहाध्यायी पूना लॉ कॉलजचे प्रिन्सिपाल मि धारपुरे मुंबई विश्वविद्यालयाचे माजी चॅन्सलर मिर्झाअल्ली रेझाखान, सातारचे वकील श्री. आण्णासाहेब आपटे हे होते. श्री. गोपाळराव खांडेकर पुढे मलकापूर जहांगिरीचे कारभारी झाले. सदाशिवराव आळतेकर हे सातारा कॉंग्रेसचे प्रसिद्ध कार्यकर्ते म्हणून पुढे आले. त्याचप्रमाणे बाळू आण्णा पाटील दप्तरदार कोल्हापूर श्री. धर्माधिकारी वकील, श्रीखंडे वकील, हे त्यांचे वर्गबंधू अखेरपर्यंत जिव्हाळयाचे मित्र कौटुंबिक भावनेने राहिले. अगदी घरच्या अडीअडचणीबद्दही परस्परांचा सल्ला घेत.

माझे आबा खंडेराव मरणोन्मुख असताना त्यानी मला जवळ घेऊन सांगितल, बाबुराव (घरच नांव) तुला कांही अडचण भासली, तुझ्यावर कसलाही प्रसंग गुदरला, तर तू तात्या आपटयाकडं जा ' खांडेकरांचे व आबांचे तीव्र मतभेद निर्माण झाले. त्यानी आपल्या जहागीरीत येण्यास आबाना बंदी केली. पण त्याच वेळी मी कांग्रेस प्रचाराकरिता गेलो असता माझी जातीने काळजी घेतली. घरी बोलावून चहा फराळ दिला. सभेची व्यवस्था जातीने ठेवली. मतभेदामुळे परस्परातील खाजगी जिव्हाळा कमी झाला नाही. मला आपल्या मुलाप्रमाणें वागणूक दिली.

बी. ए. ची परिक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्याना धारवाडचे सुप्रसिद्ध फर्स्ट क्लास सबजज्ज रावबहाद्दूर बाबाजीराव लक्ष्मणराव सावंत ह्यांचे सहाय्य मिळाले. यावेळी रावबहाद्दूर हे पेन्शनर असल्यामुळे त्यानी करविरी बकीलीचा धंदा सुरू केला होता. खंडेरावांची कुशाग्र बुद्धिमता नम्र स्वभाव, शिक्षण संपादनाची तीव्र इच्छा आणि उत्कृष्ट निकोप शरीर संपत्ती व डोळयात भरणारं स्वरुप पाहून, त्यांच्याबर अकृत्रीम असा अतिशय लोभ जडला. त्यानी आपल्या शुक्रवारपेठेतील वाडयातच खंडेरावना ठेवून घेतले व प्रत्यक्ष आपल्या मुलाप्रमाणे त्यांचेवर प्रेम केले. खंडेरावना आपल्या पित्याची उणीव कमी झाली. बाबाजीराबासारख्या सधन सद्‌गृहस्थाचा सढळ आश्रय मिळाल्यामुळे खंडेरावांची आर्थिक अडचण दूर झाली. एक एक गोष्टी त्याना अनुकूल

होत गेल्या. खंडरावांचा बाबाजीरावानी आपल्या कुटुंबियातच समावेश करून घेतला. रावबहाद्दुरानी आपली आवडती नात कमलाबाई, हिचा खंडेरावशी विवाह केला. त्यांचा आर्थिक प्रश्न या विवाहाने कायमचा सुटला.

यानंतर पुढील अभ्यासासाठी पुन: मुंबईस जाणेचे ठरवले. मुंबईस गेल्यानंतर त्यानी गोव्हमेंट लॉ कॉलेजमध्यें नांव दाखल केले. पहिल्यापासूनच खंडेरावांचा कायद्याच्या विषयाकडे ओढा अधिक. कारण एकवेळ कायद्याची परिक्षा पास दिल्यानंतर स्वतंत्र रीतीनें केवळ स्वत:च्या कर्तबगारीवर नांव लौकीक मिळवणेसाठी त्या धंद्याइतकी मुबलक परिस्थिती दुसऱ्या धंद्यात नाही. कीर्ती, संपत्ती अधिकार व जनसेवा एकाचवेळी करता येईल असा हा एकच धंदा आहे. त्यांची महत्वाकांक्षा दांडगी होती. नोकरीकडे त्यांचा ओढा नव्हता. आपण गरीबीतून वर आलो. म्हणून गरीबांचीच सेवा आपल्या हातून व्हावी ही अंतरीची ओढ त्याना लागून राहिली होती. नोकरी म्हणजे व्यक्ति स्वातंत्र्य गमावणे. दुसऱ्याची तावेदारीच ती ! त्याना जात्याच गुलामगिरीचा तिटकारा होता. सावकारशाही बद्दल त्याना स्वत:ला आलेल्या अनुभवाने मनात तेढ होती. त्या शेतकऱ्यांची सेवा करण्याला वकीलीसारखा दुसरा धंदा नव्हता.

म्हणून त्यानी अत्यंत चिकाटीने एल. एल. बी. चा अभ्यास केला. त्यामुळे ते अभ्यासात रमून गेले. उत्कृष्ट स्मरणशक्ती आणि निरलस उद्योगप्रियता, यामुळे या परिक्षा त्याना अत्यंत सुलभ गेल्या. बुद्धिमत्तेला साजेल असा त्यानी विजय संपादन केला. त्यावेळच्या सहाध्यायी स्नेहीवर्गापैकी खंडेराव तेवढेच पहिल्या सपाटयाला पास झाले. त्यांची अभ्यासाची शिस्त फार वाखणण्यासारखी असे. ज्यावेळचे काम त्यावेळी पुरे झालेच पाहिजे. वकीलीतही याच स्वभावामुळे ते यशस्वी ठरले.

एल्. एल्. बी. झाल्यानंतर त्यांनी वकीलीची सनद काढली व शहराच्या मध्यभागी आज जेथे शिवाजीचा पुतळा आहे तेथे भाडयाने जागा घेऊन वकीली सुरु केली. नांवाची पाटी लावली. ती शाहूमहाराजानी पाहिली. व त्यानी खंडेरावांकडे माणूस पाठवून देऊन सर्व माहिती काढली.

खंडेराव बागल हा आपल्या संस्थानचा मराठा. संस्थानच्या मराठयातला पहिला एल. एल. बी. यामुळे भेटीपूर्वीच कुतहल व आपलेपणा निर्माण झाला व हा माणूस आपल्या पदरी पाहिजे ही तीव्र इच्छा त्यांच्यात निर्माण झाली. व त्यानी वाडयावरचा माणूस पाठवून देवून खंडेरावना बोलवून घेतले. सर्व माहिती त्यांच्या तोंडून काढून घेतली व म्हणाले.

' बागल तुम्ही माझे प्रजाजन आहात. त्यातही मराठे आहात. चांगले

शिकलेले आहात. म्हणून माझ्याच पदरी राहावे अशी माझी इच्छा आहे. तुम्हाला सुरवातीलाच अमलदारीची जागा देतो आणि पुढं वाढवत जातो.

'पण महाराज मी इथच राहाणार आहे व वकीलीचं प्रॅक्टीसही सुरु केले आहे.'

'ते कांहीही असो तुम्ही माझ्याकडंच राहिल पाहिजे, अशी माझी इच्छा आहे. नाही म्हणू नकात.'

महाराजांची आज्ञा मोडण्याची, अवमानण्याची छाती खंडेरावना झाली नाही. त्यानी तेथेच महाराजांच्या पदरी नोकरी करण्यास तशी इच्छा नसूनही मान्यता दिली.

महाराज म्हणाले

'अधिकारावर राहूनही तुम्हाला जनतेची सेवा करता येईल. मलाही सल्ला देता येईल. मलाही जनतेची सेवा करावयचीच आहे.' महाराजानी लगेच आर्डर काढून खंडेराव बागल बी. ए. एल. एल. बी. याना सुरवातीलाच मामलेदारीची जागा दिली व १९०७ साली ते कामावर रूजू झाले. महाराजांचे राजकीय धोरण सामाजिक व धार्मिक विचार त्यानी समजून घेतले व त्याला अनुसरून आपलेही धोरण आखले. केवळ दप्तरात गुरफटून बसले नाहीत.

त्यानी महाराजांच्या धोरणानुसार आपल्या टांग्यावर अस्पृश्य नेमला. तोच सदैव त्यांच्या बरोबर फिरतीवर असे. त्याचा परिणाम लोकावर साहजीकच होत असे. ते अंमलदार असल्यामुळे त्यांच्या बिरुद्ध बोलण्याची कोणाला छाती होत नसे. उलट त्याना खूष करण्याकरता अनुकूलच बोलत. यावेळी ते शिरोळचे मामलेदार होते.

● शिराळेपेटचातील वाडी नृसिंह क्षेत्री गुरुद्वादशी दिवशी प्रसाद वाटप फार मोठ्या प्रमाणावर होत असे. तो सर्व खर्च दरबारांतून होई. त्यावर मामलेदारच देखरेख करीत. पण आतापर्यंत अमलदार हे ब्राम्हणच असल्यामुळे तो प्रसाद फक्त ब्राम्हणातच बाटला गेला. सरकारचा मुळ हुकूम तसा नव्हता. हिंदूना वाटप करावे असा होता. तथापी ब्राम्हण मामलेदारानी आपल्या अधिकारात आपल्या इच्छेप्रमाणे प्रथा पाडली. त्याला कोणी विरोध केला नाही. हाताखालचे सर्व कारकून ब्राम्हणच. मग विरोध कोण करणार ? खंडेरावनी त्यात लक्ष घातले व मूळ हुकमाला धरून सर्व हिंदूना आपल्या देखरेखी खाली प्रसाद वाटण्यास सुर. वात केली. वाडीचे पुजारी कुरकुरले चडफडले, नाराज झाले. पण ते कांहीही करू शकले नाहीत. अशी एकूण समाजाची सेवा करता आल्याबद्दल नोकरीतही ते

समाधान मानून घेऊ शकले. आपल्या देखरेखी खाली मराठा तत्सम जाती व अस्पृश्यानाही प्रसाद वाटला. त्यावेळी ही क्रांतीच म्हणावी लागेल.

● आणखी एका प्रसंगाने माझे वडिलानी पुजाऱ्यांचा रोष त्यांचे एक बिंग बाहेर पाडून ओढवून घेतला. मी ही (माधवराव) त्यावेळी हजर होतो. दर गुरुवारी वाडीवर भक्तांचा जमाव भरतो. त्या यात्रेकरूवर आपल्या दैवीशक्तीचा प्रभाव पाडावा म्हणून पुजाऱ्यानी एक नाटक बसवले होते. अंगात आलेल्या बाईचं भूत गुरव आपल्या मंत्रप्रभावाने काढून टाकी. त्या भूताने पछाडलेल्या बाईला देवळाजवळच्या फरशीवर बसवलेल्या खांबाला बांधून घाली. नंतर गूरव मंतरलेल्या तांदळाचा मारा करी. त्याबरोबर भूत पछाडलेली ती बाई तो मारा सहन न होऊन 'जातो जातो' म्हणून किंकाळ्या फोडी. तरी गुरव मारा चालू ठेवी. अखेर ती तडफडल्यासारखे करून निश्चेष्ट राही. पुन्हा: गुरव भुताला विचारी. जाणार कीं नाही ? 'गेलो गेलो' असे उत्तर येई, मग गुरव तिला बांधलेली दोरी सोडून मुक्त करी. व मग ती बाई कृतज्ञतेने गुरवाचे पाय धरी. याचा परिणाम यात्रेकरूवर होऊन त्याचं गिऱ्हाईक वाढे.

या प्रकारावर वडील धार्मिक असूनही विश्वास बसला नाही. तेथून बाई मोकळी झाल्यावर वडिलानी पटेवाल्याला साध्या पोषाखात पाठवून देवून तिला आपल्या, तेथे ठोकलेल्या मुक्कामात बोलवून घेंतले., ती समोर उभा राहताच त्यानी जमदग्नीचा अवतार धारण केला. पोलीसाला बोलावले. चाबूक आणायला सांगितला व त्याला म्हणाले–

'या बाईच्या अंगावर चाबूक फोड' व त्यापूर्वी विचारलं.

'खरं बोल, हे नाटक तुला कोणी करायला शिकवलं? खरं बोल नाही तर चाबकानं झोडपाय लावून तुरुंगात डांबतो'

ती म्हणते 'सरकार आम्ही गरीब माणसं, पोटासाठी गुरवानं शिकवलं तसं करतो. त्याकरता तो दर खेपेस आठ आणे देतो'

वडील पोलीसाला म्हणाले –

'दे तिला सोडून'

● वडिलानी गुरवाची आणखी एक त्यातून ही भयंकर ठकबाजी उघडकींस आणली –

गुरवानी एक स्वामी पकडला. सर्व गुरवांनी त्याच्या विषयी अनेक चमत्काराच्या कथा पसरवून त्याचा भाव वाढवला. स्वामी कृष्णेवर घोंगडे टाकून प्रवास करतात. आज इथं आहेत तर उद्या दोनशेहे मैलावर प्रकट होतात. मना-

तली इच्छा अंत:शक्तीने जाणून भविष्य सांगतात वगैरे ... याचा परिणाम भविष्यकावर एवढा झाला की स्वामीच्या पायापुढे त्याना प्रसन्न करण्याकरता पैशाचा व दागिन्याचा ढीग पडू लागला. वडीलानी पोलीस पाळतीवर ठेवले. पण हा सुगावा गुरवाना लागताच स्वामी अकस्मात अदृश्य झाले !

● शिरोळ गांवी महारवाड्यात दरवर्षी म्हसोबांच्या जत्रेत तक्यासमोर रेड्यांची, अंगावर काटा उभा राहणारी अत्यंत क्रूर व राक्षसी हत्या होत असे. रेडा बांधून त्याचे मानेवर कुऱ्हाडीचे एकावर एक असे मरेपर्यंत घाव मारण्यात येत असत. त्याची ती भयंकर किंकाळी व ओरड आसपासचा भाग हदरून टाकी. वडीलानी शाहूमहाराजांच्या कानावर ही गोष्ट घालून ती चाल बंद केली.

– शिरोळ पेट्यानंतर गडहिंग्लज पेट्यावर बदली झाली.

तेथेही गुरुद्वादशीप्रमाणे सामानगडच्या यात्रेत प्रसादाचे केवळ ब्राम्हणानाच वाटप होई. ती प्रथाही वडिलानी बंद केली –

यानंतर ते हातकणंगले पेट्यास मुनसफीच्या जागेवर गेले. तेथे त्याना सावकार, गरीब शेतकऱ्याला कसे फसवतात नागवतात खोटे दस्तैवज कसे करून घेतात व जमीनी पदरात कशा पाडून घेतात ते प्रत्यक्ष पाहता आले. खंडरावांचे वडिलाना ते कसे भोवले याचा अनुभव प्रत्यक्षच खंडरावना आल्यामुळे केवळ वकीलावर विश्वास न ठेवता वस्तुस्थिती स्वत: समजावून घेऊन ते निकाल देत. माधवराव फिरतीत वडिलांच्या बरोबर असल्यामुळे शेतकऱ्याचं जीवन हलाकी व फसवणूक त्या लहान वयातही त्याला समजू शकलो.

● याच पेट्यावरील एका सबंध गावच्या जातीला गुन्हेगाराच्या यादीत घातलं होतं. त्यामुळे प्रत्येकाला चोर दरोडेखोर प्रमाणे रोज गाव पाटलाकडे हजेरी द्यावी लागे. हा अन्याय महाराजांच्या कानावर घालून त्यांची नव्या वटहूकूमाने या गुलामगिरीतून मुक्तता केली. तो वटहुकूमही त्यानी तयार करून दिला.

● याच सुमारास त्यांच्या पूर्वीच्या नोकरी न करता स्वतंत्रवृत्तीने जनसेवा करण्याच्या वृत्तीने उचल खाल्ली. शाहूमहाराजाना भेटून त्यानी आपले मनोगत कानावर घातले. 'बाहेर राहून आपल्याच विचाराचा प्रचार करणार आहे व आपण मला नोकरीतून मुक्त करावे.'

महाराजानीं फारसे आढे ओढे न घेता खंडेरावांच्या इच्छेस मान्यता दिली व त्याना रीतसर पेनशन दिली. खंडेराव पुन्हः वकीली करू लागले. बागलानी वकीलीचं प्रक्टीस सुरू केलं आहे हे समजताच केसीससाठी वाट पहावी लागली

नाही. महाराजांची मर्जी असल्यामुळे त्यांची प्राप्ती नोकरीच्या दसपटीने वाढली. सिव्हिलपेक्षा क्रिमनल केसीस घेण्याकडे त्यांचा विशेष कल होता. यात जीवन मरणाचा व अब्रूचा प्रसंग असल्यामुळे प्राप्ती मोठी होई व केसीसचा निकाल दिवाणीप्रमाणे वर्षानुवर्षे रेंगाळत न पडतां फार थोड्या अवधीत लागे. खुद्द महाराजांच्या कक्षेत असलेल्या अगदी अखेरच्या केसीसही त्यांच्याकडे येत. यामुळे प्रक्टीस एवढं वाढलं कीं मोठ्या क्रिमनल केसींसची एक बाजू बागलांच्याकडे व दुसरीत सर्व वकीलांची वाटणी. अशा प्रकारे बारमध्ये ते पहिल्याश्रेणीत मोडले गेले. क्रिमनल साइडला बागल व दिवाणी बाजूला तात्या आपटे हे ठरल्यासारखे होते. या वेळी सुद्धा पूर्वीच्या सदाशिव खंडो आळतेकर, तात्या आपटे, गोपाळराव खांडेकर, विष्णु विनायक जोशी यांच्या प्रेमात खंड पडला नाही. घरोबा कायम राहिला. जात निराळी विचार पुष्कळवेळा परस्पर विरोधी पण जणु एका कुटुंबातलो ही भावना अखेर पर्यंत राहिली. सामाजिक बाबतीत एकमेकावर धावून येणार. एकूण स्नेही मंडळीत मला मराठा कोणी दिसला नाही.

शाहू महाराजांचं त्यांच्यावर प्रेम होतं. विश्वास होता व आदरही होता. पण त्यानी त्याचा कधीही गैरवाजवी फायदा घेतला नाही. हुजरेगिरी पतकरली नाही. मुद्दाम बोलावल्याशिवाय ते वाड्यावर जात नसत. महाराजानी त्यांचे धंद्यातले प्राविण्य व दर्जा पाहून त्याना आपले लीगल ॲडव्हायसर नेमले.

त्यांच्या ज्ञानाची प्रामाणिकपणाची व निस्वार्थीपणाची कसोटी लवकरच लागली. महाराजानी अगदी अखेर, आपल्याकडे येणाऱ्या कामाचा निकाल कायद्याचा विचार करून बागलानी द्यावा म्हणून त्यांच्याकडे नंबरदार सरदेसाई यांचेकडून कामाच्या दप्तराचे गठ्ठे दिले. व सावकास निकाल लिहून माझेकडे सहीला आणा असे सांगितले पण वडिलानी सर्व कामे घरी नेऊन निकाल देण्याचे कबूल केले नाही. बागल म्हणाले.

' महाराज ही जबाबदारी आपण कितीही विश्वास टाकला तरी मी पत्करू शकत नाही. अमके काम मजकडे आले आहे. असे समजताच संबंधित मला घेरतील. त्या मोहात व संकटात मी पडणार नाही. इथच वेळोवेळी येऊन मी निकाल लिहून देत जाईन, आपण पाहून विचार करूनच सही करावी '

लाखो रुपये पापी मार्गाने मिळवण्याच्या मोहात गुंतून त्यानी आपला अधःपात करून घेतला नाही.

● पुण्यातील शाहूद्वेष्टयानी शाहूमहाराजावर मारामारीची फौजदारी केस घालून त्यांचा सूड उगवण्याचा घाट घातला. अर्थात महाराज गडबडले अस्वस्थ झाले. बेचैन झाले. आपण साध्या कोर्टात आरोपी म्हणून उभं रहायच व आपली

बाजू मांडायची ही कल्पना त्याना भयंकर वाटली. छत्रपती आरोपी म्हणून साध्या कोर्टात ?

यावेळी त्यांचा मुक्काम सोनतळी कँपात होता. तेव्हा त्यानी शहरातील प्रमुख वकीलाना बोलावून घेतले व त्यांचा सल्ला विचारली. सर्वानी सल्ला दिली. महाराजानी पहिल्या दर्जाचा बॅरिस्टर देऊन केस लढवावी. फक्त वडिल म्हणाले महाराज मी विचार करून वाचून मागाहून सांगतो.

त्यानी अगदी निराळी सल्ला दिली. बागल म्हणाले.

'महाराजाना केस चालवण्याची मुळीच आवश्यकता नाही. साम्राज्य सरकारच्या खास परवानगी शिवाय महाराज साहेबावर केस घालता येत नाही. ते साम्राज्य सरकारचे मांडलिक आहेत. इतराप्रमाणे त्यांच्यावर केस घालता येत नाही.'

अखेर बागलांचे मताप्रमाणेच कोर्टाने निकाल दिला व ही केस आपल्या कोर्टाच्या कक्षेबाहेरची आहे असे विरोधी वकीलाला कळवले.

केसचा निकाल रात्री बाराच्या सुमारास महाराजाना तारेने कळला. तेव्हां लगेच महाराज शुक्रवार पेठेतील आमच्या घरी आले. खडखडा दारासमोर उभा केला व खुद्द महाराजानी बागल म्हणून मोठ्याने हाका मारायला सुरवात केली. आम्ही सर्व माडीवर झोपलो होतो. खाली पाहिले तो छत्रपती शाहूमहाराज गाडीत ! वडील धावत खाली गेले व वाकून मुजरा केला.

महाराज हर्षभरांत म्हणाले 'बागल तुमच्या सल्याप्रमाणे केसचा निकाल लागला. मी संकटांतून मुक्त झालो. उद्या गाडी पाठवून देतो. सोनतळीस या'

आज्ञेप्रमाणे आबा गेले. महाराजांचे दर्शन घेतले.

दर्शन म्हणजे पायाला हात लावून मुजरा केला. जवळच सूनबाई इंदुमती राणीसाहेब उभ्या होत्या. त्याना पाहुन महाराज म्हणाले 'अगं पहातेस काय ? बागलाना नमस्कार कर. त्यानी मला संकटांतून वाचवलं व अब्रू राखली'

तेव्हां बागल म्हणाले

'महाराज आपण असं म्हणू नये. आम्ही आपले नोकर. इंदुमती देवीना नमस्कार करण्यास कसे सांगता ?'

महाराज म्हणतात

बागल मी छत्रपती असलो तरी माणूस आहे. तुमचे उपकार मी कसे विसरेन.'

● ६ मे १९२२ ला छ. शाहूमहाराज कालवश झाले !

अखिल महाराष्ट्रातील बहुजन समाजाला उच्चवर्णियांच्या अन्यायाची व विषम वागणुकीची जाणीव देऊन खडबडून जागी करणारी समाज क्रांतिकारक ज्योत मावळली ! स्वाभिमान निर्माण करणारं तेज नाहीसं झालं.

खुद्द कोल्हापूर शहरात कांही ध्येयनिष्ठ व्यक्ती वगळता महाराजांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक चळवळ ओसरली. केवळ स्वार्थासाठी छत्रपतीना खूष करणाऱ्या व्यक्ती समाजापुढे दिसेनात. सत्यशोधक संस्थेचा कांही अधिकाऱ्यानी कबजा घेतला. म्हणून दासराम जाधव, हरिभाऊ चव्हाण पन्हाळकर, रामभाऊ गायकवाड वगैरेनी संस्थेच्या शुद्धिकरणासाठी खंडेराव बागलांच्या नेतृत्वाखाली कंबर कसली व बहुमताने संस्था जिंकून कट्टर सत्यशोधक भास्करराव जाधव याना आमंत्रण देऊन त्यांचेवर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली.

हरिभाऊ चव्हाण हे यावेळी सत्यशोधक तत्वाचा प्रचार करण्याकरता 'हंटर' नांवाचे साप्ताहिक मोठ्या कष्टाने व नुकसानीत चालवत होते. ते त्यानी खंडेराव बागलांच्या स्वाधीन केले.

असे साधन बागलानाही हवे होते. ती जबाबदारी त्यानी आनंदाने स्विकारली. प्रथम कांही दिवस हरिभाऊचं संपादक म्हणून नांव ठेवलं नंतर डी. एच्. जाधवांचं घातलं. पण सर्व चालवत आपणच.

त्यानी लवकरच संपादक म्हणून नांव घालून सर्व जबाबदारी अंगावर घेतली व गावात हिंडून मदत व वर्गणीदार मिळवले. वडीलांचा दर्जा वकील म्हणून मिळवलेली ख्याती यामुळे वर्गणीदार मिळाले व मदतही मिळाली. त्यातून लगेच छापखाना सुरू केला. चँडलर ट्रेडल व टाइप घेतलं. व घरीच छापखाना चालू केला. त्यावर आम्ही चार भाऊ राबत होतो. पत्रे चिकटवणं टपालासाठी अंक तयार करणं, हे सर्व घरीच करीत होतो. आमची सावत्र आईही हातभार लावत होती. घरी संभाळलेला अस्पृश्य मुलगा व घराण्याचे स्नेही सत्यशोधक रामभाऊ गायकवाडांचे चिरंजीव गणपतराव व कंपाझिटरही वाटण्याचे काम करीत असत. प्रुफे तपासायचं काम मुख्यतः मी माधवराव बागल करीत असे व प्रुफे तपासता तपासता व आलेला मजकूर व वर्तमाने पत्रे वाचता वाचता स्फुटेही लिहायला सुरवात केली. व ती लोकाना आवडू लागली. पंडित सातवळेकरांच ( पुढे भारत रत्न झालेले ) मला पत्र आलं व माझ्या स्फुटाची ती त्यांच्या उलट असूनही वाखाणणी केली. आणखी अशीच कांही पत्रे आल्यामुळे वडीलानी आपल्या बरोबर संपादक म्हणून नांव घातलं. वडिलांचे लेख अभ्यासपूर्ण व समतोल असत. कायद्याची मर्यादा न ओलांडता ते दरबारवर टीका करीत असत.

मी भावना प्रधान, अन्याय दिसल्यास परिणामाचा विचार न करता टीका करणार, तीं लोकाना फार आवडे कारण इतकं स्पष्ट व निर्भयतेनं लिहीणारं दुसरं मराठा पत्र कोल्हापूरात नव्हतं. या माझ्या लेखामुळेच पुढे पत्र गोत्यात आलं.

वडील केवळ लेख लिहून स्वस्थ बसत नसत. त्यानी सत्यसमाजाच्या कार्य-लाही सुरवात केली. नियमितपणे दर रविवारी गंगावेस सत्यशोधक मंदिरात तर केव्हा बाहेर पटांगणात व्याख्याने व गीतेवर प्रवचने देत. अशाप्रकारे शाहू-महाराजांचं कार्य लेखनाने व कृतीने जिवंत ठेवले. अनेक सहभोजने घडवून आणली. सर्व अन्न घरीच तयार करून सत्यसमाजात अन्नाचे हंडे पाठविण्यात येत. त्या भोजनात भाग घेतल्याची यादी हंटरमध्ये प्रसिद्ध करण्यात येई. कांही पाहुण्याची व्याख्यांने ठरवून त्यांचा सारांश पत्रात दिला जाई. विरोधी विचार मांडणाऱ्यानाही संधी दिली जाई. त्यामुळे लोकांत सत्यशोधक वातावरण निर्माण होत गेलं. बाहेरच्या वर्तमान पत्रातही त्याचा उल्लेख होऊ लागला. मुख्यतः पुण्याचा ब्राम्हणी पत्रावर केसरीवर व विद्वान समजलेल्या मान्यवर पंडितावर वडीलाचे साधार स्पष्ट व निर्भय हल्ले होतं. यामुळे संस्थानाबाहेर सांगली कराड, सातारा, पुणे, मुंबई, अकोला, अमरावती, नागपूर, निपाणी, रत्नागिरी या भागाचेही वर्गणीदार वाढत गेले. 'हंटर' मधील वडीलांच्या लेखाची कल्पना यावी म्हणून कांही अग्रलेखाचे मथळे देत आहे. ते धार्मिक होते. मूर्तिपूजक होते तरी अंधश्रद्धाळू नव्हते. देवालयात अस्पृश्याना प्रवेश दिला पाहिजे. सोवळे ओवळे रोटीबंदी, बेटीबंदी मोडली पाहिजे. यावर त्यांचे अग्रलेख आहेत. धार्मिक ग्रथाचा अभ्यास 'बाबा वाक्य प्रमाण' या वृत्तीने कधी केला नाही. ऋग्वेद मनुस्मृती वगरे ग्रंथाची व विचाराची साधार चिरफाड केली. उच्चवर्णीयांच्या आदरास पात्र झालेल्या नामवंत श्रेष्ठीचाही त्यानी मुलाहिजा ठेवला नाही. त्यांच्या सनातनी प्रतिगामी आचार विचारावर बरोबरच्या नात्याने कोरडे उडवले. केसरीच्या बहुजनसमाजद्रोही कृतींवर व टिळकांच्या एकांकी पक्षपाती धोरणावर टीका केली आहे. ब्राम्हणेत्तर व मराठा म्हणून त्याच्यात जराही न्यूनगंड नव्हता हे त्यांच्या अग्रलेखावरून सहज कळून येई. या पुस्तिकेत मी हंटर मधील थोडे मोजकेच लेख देणार आहे. सर्वच ग्रंथरुपाने प्रसिद्ध करण्याची माझी कुवत नाही. 'माझे ऋग्वेदाचे वाचन' हा निबंध तेवढा समग्र दिला आहे. त्यांची वैचारिक लढत कोणाशी चाले हे खालील लेखांच्या मथळचावरून वाचकांच्या सहज ध्यानात येईल.

'टिळक म्हणतात – स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. आम्ही म्हणतो समता आमचा जन्मसिध्द हक्क आहे. पुरूषार्थकार सातवळेकर

आणि 'हंटर कार बागल' वैदिक धर्माची पकड, भिक्षुकी धर्मांचा नाच' अस्पृश्यांचा मंदिर प्रवेश' 'वैदिकी तमाशे आणि सत्यशोधकी जलसे' 'केसरी–कारांच्या नाचात त्यांच्या अंतरंगाचे प्रदर्शन'' खरोखरीच आम्ही वेदाताने भ्याड बनलो काय' 'हा धर्म की धर्मांचा तमाशा' तेजस्वी वेदांताची तिरपगडी राजा जनकानी की शंकराचार्यानी केली?, शास्त्रावरून स्त्रियाचा दर्जा कोणाचा?

सर्व यादी मी येथे देऊ इच्छित नाही. 'कोल्हापूर दरबारच्या बजेटवर' दारुवर, सरंजामदारावरही असे सडेतोड लेख लिहिले आहेत.

मी जे जे अन्याय दिसले, 'शेतकऱ्यांची वागवणूक, जबर फाळा' रेसकोर्सचा नाद व इंग्रज सरकारवरही टीका केली, मुख्यतः मी प्रजेला मूलभूत हक्क, जबाबदार राज्य पद्धती द्या, शिकारीसाठी ठेवलेल्या हरीण व डुकरे याना शेतकऱ्यानी मारण्यास बंदी केल्यामुळे तो एका दिवसात पिके नष्ट करतात. त्याना मारण्यास परवानगी द्या.

अशा कांही मागण्या हंटर मधून मांडण्यासाठी तयार केल्या. पण वाड्या–वरच्या सर्वांना मागण्या अत्यंत कटु वाटण्याचा संभव होता. म्हणून मी प्रथम वडिलाना मजकूर दाखवला.

ते कायदे पंडित, त्यानी ती मर्यादा कधीही ओलांडली नव्हती. राजद्रोहा–खाली यातली एकही गोष्ट येण्याजोगी नव्हती. याचा विचार करून त्यानी तो मजकूर छापण्यास परवानगी दिली.

पण राजशाही आणि हुकुमशाही यांच्या धोरणात विचार व कृतीत विशेष असा फरक आढळणार नाही.

वाड्यावर वाटाघाटी झाल्या व कायद्याचा किंवा जनतेच्या हितानहिताचा विचार न करता 'हंटर' वर ५००० ची जबर जामिनकी लादून पत्र बंद पाडले. व माझेवर वारंट सुटले. मला (माधवराव बागल) हद्दपार करणार असल्याचे ठरले. ही बातमी गावभर पसरली व अखेर हद्दपारी झाली.

पत्र बंद पाडल्याने समाज उत्थापनाचं वडिलांच्या हातचं प्रभावी साधन नाहीसं झालं! त्यातही त्यांच्या समाजसेवेला सतत सहकार्य देणाऱ्या त्यांच्या पत्नी आमची सावत्र आई वारलेली! या सर्वांचा त्यांच्या मनावर परिणाम झाला. ते माझा सावत्र आई वारल्यानंतर 'हंटर' मध्ये लिहीतात. "आमची सहधर्मचारिणी सौ. चंद्राबाई या क्षयाच्या विकाराने गुरूवारी पहाटे ता. १७ नोव्हेंबर १९२७ ला मृत्यू पावल्या. आमच्या उतार वयात आम्हावर हा कठीण प्रसंग आला आहे! गेले सहा सात महिने त्या अंथरुणावर पडून होत्या. आम्ही त्यांच्यासाठी शक्य ते प्रयत्न केले. पण ते वाया गेले! तथापी त्यांची शुश्रुषा

करण्यात जे परिश्रम घेतले त्या कर्तव्यातच समाधान मानल्या वाचून मार्ग नाही ! आमच्या हातून जी अल्प स्वल्प सेवा घडत आहे. तिचा मोठा भाग त्यांच्याकडेच आहे. अस्पृश्य विद्यार्थ्यांना घरी जेवावयास घेऊन त्यांची उष्टी आनंदाने काढण्यापर्यंत त्यानी सेवा केली आहे ! प्रत्येक सामाजिक कार्यात आणि सहभोजनासारख्या कठिण कामात त्यांची मदत असे. त्यांच्या सहकार्यावाचून मला कोणतेही काम करण्यास जड गेले असते. असली जिव्हाळ्याची मैत्रीण आणि प्रेमाची छाया नाहीशी झाल्यामुळे फार उदास वाटत आहे."

मी व माझी पूज्य पत्नी हद्दपारीमुळे खेदंडचाला गेलो. याही गोष्टींचा त्यांच्यावर परिणाम झाल्याखेरीज राहिला नाही. मी हद्दपारीनंतर घरी आलो. पत्र बंद पडलेले. छापखाना बंद, भरल्या घरी आपण एकाकी आहोत असं त्याना वाटू लागलं. वकीलीही कमी केली. तो उत्साह नाहीसा झाला. प्रकृतीत बिघाड होऊ लागला. तरी नेहमीची लागलेली सवय म्हणून पाहटे उठणार, थंड पाण्याचे स्नान करणार. गाईचा गोठा साफ करून तिचे अंग चोळणार, मग घरा पुढचा रस्ता झाडून सडा घालणार. नंतर जोर काढणार. हा क्रम अगदी अखेरच्या दिवसापर्यंत चालू होता. कोर्टाला जाणे बंद केले होते. दुपारच्या जेवणानंतर अंथरुणावर अंग टाकलं होतं. पाय नेहमीच दुखत असत. धाकटी सून पाय रगडत बसली होती. डोळा लागला असं समजून तिनं पाय चोळणं बंद केलं व जवळ बसली. बराच वेळ झाला पण माझ्या वडीलांची हालचाल दिसेना. अगदी निश्चेट पडल्यासारखे वाटले. तिने जरा धक्का देऊन पाहिले पण तसेच ! घाबरून जास्त हलवले. तरी तसेच ! हे पाहून तिने 'मामासाहेब म्हणून किंकाळी फोडली' आम्ही चौघे भाऊ धावत जिना चढून वर गेलो. तों आबा गेले हाते ! आमचा एकूलता एक आधार नष्ट झाला ! मी दुःखाच्या आवेगात जवळच्या भिंतीवर 'आबा' म्हणून किंकाळी फोडून डोकं बडवून घेतलं ! भिंतीच्या विटा पडल्या. माझा दुःखाचा आवेग गेला. माझं रडं थांबलें. डोळे उघडे. पण मला कांही दिसेना. आबा गेल्याची शुद्धीही नाहीशी झाली ! ज्यानी स्वतः गरीबी भोगली, अनंत कष्ट सोसले व दारिद्र्याचे लक्षाधीश बनून आम्हाला सुखात व ऐश्वर्यात ठेवलं. ते आमचे आधार गेले ! आम्ही पोरके झालो ! --'

१ जानेवारी १९३१ रविवारी दुपारी ऱ्हदयक्रिया बंद पडून खंडेराव गोपाळराव बागल बी. ए. एल.एल.बी. संपादक हंटर, सत्यशोधक, कालवश झाले.

काकासाहेब लिमयांचा ज्ञान प्रकाश त्यांचे बद्दल लिहितो–

'खंडेराव बागल यांच्या मृत्यूमुळे ब्राम्हणेतर पक्षातील एक अद्वितीय नेता व उत्कृष्ट वक्ता नाहीसा झाला. यात शंका नाही. कै. बागलांचें कोणत्याही विषया–

वरचे वाचन जबरदस्त व सूक्ष्म असल्यामुळे कोणाही वक्त्याचा त्यांच्यापुढे टिकाव लागणे शक्य नसे. त्यांचे भाषण जितके कळकळीचे व आवेशाचें असे तितकेच ते विद्वत्तापूर्ण असल्यामुळे कोणाही शास्त्री पंडितास, प्रोफेसरास अगर पुढाऱ्यास त्यांच्यापुढे नमते घ्यावे लागे. 'हंटर' पत्रामधून प्रसिद्ध होणाऱ्या त्यांच्या लेखन साहित्यावरून त्याची विद्वता व वाचन किती अमर्याद असे यांची कल्पना येते.'

● माझे वडिलानी सत्यशोधक समाजातर्फे गांधीजीना आणवून त्याना २५-३-२७ ला गंगावेस मैदानात थैली व मानपत्र अर्पण केले.

● ५ ऑगष्ट १९२७ ला मनुस्मृतीने स्त्रियावर केलेल्या अन्यायावर अग्रलेख लिहून अशा या मनुस्मृतीच्या मुसक्या आवळून ती अरबी समुद्राच्या तळाला नेऊन गाडून टाकावी असे लिहिले.

तीच मनुस्मृती १९३५ साली पुण्यश्लोक बाबासाहेब आंबेडकरनी यवले गावी जाळून टाकली.

● ● ●

# हंटरमधील खंडेराव बागल

## यांचे

## निवडक लेख

## दत्तमूर्ती स्पर्शाचा अधिकार स्त्रियाना आहे काय?

ता. ५ ऑगस्ट १९२७

आज ब्राम्हण ब्राम्हणेतर हा वाद महाराष्ट्रांत जोरानें पुढे आला आहे. जसा राजकीय बाबतीत तसाच धार्मिक व सामाजिक बाबतींतही. उच्च वर्णीयानी बंद करून टाकलेली द्वारें तो ठोठावीत आहे. देवालयांतील भेदभाव व स्पर्शास्पर्श हा ब्राम्हणेतरांना तीव्रपणानें भासूं लागला आहे. या कारणांनी श्री नरसिंहवाडीस एक प्रकरण उपस्थित झालें आहे. ब्राम्हण वर्ग जास्त सुशिक्षित आहे. ब्राम्हणेतराविरुद्ध गवागवा करण्याची हातोटी त्याना चांगली साधली आहे. सरकारांत अर्ज करणें; घाई घाईनें, मागेंपुढें न पाहातां, चोहोंकडे तारा करीत सुटणे; आपल्या विधानास आधार कितपत आहे, याची चौकशी करण्याची दगदग न घेतां वर्तमान पत्राकडे धांव घेणें; आणि इतर बाबतींत विशेषत: इंग्रज सरकारांविरुद्ध राजकीय हक्काची मागणी करणारे पत्रकारही पर नसतांनाही कावळा करीत सुटणारे बेजबाबदार लेख लिहून समाजांत बेदिली व अस्वस्थता उत्पन्न करणाचें पुण्य पदरी घेतात! नरसिंहवाडीस झालेल्या दंग्याची खरी स्थिती, ब्राम्हण ब्राम्हणेतर लोकांचे प्रतिज्ञेवर जबाब घेऊन, चौकशी अंती समोर आलेली, करवीर दरबारच्या ग्यँझेटमध्ये रा० ब० दिवाणसाहेब यांचे सहीनें प्रेसनोटरूपानें प्रसिद्ध झाली आहे. ती हंटरच्या अंकात प्रसिद्ध झालेली आहे.

श्री दत्तात्रयाचे देवालयाभोंवती अलीकडेच गज मारलेले दिसत आहेत. त्या गजाच्या आंतून प्रदक्षिणा घालणेचा आपल्याला हक्क आहे, असें ब्राम्हणेतरांचे म्हणणें आहे. ब्राम्हणांचे म्हणणें त्यांना तसा हक्क नाही. हा वादाचा प्रश्न आहे गजाच्या आंत फरशी घातलेली दिसते. ती बांधताना वगैरे कामी ब्राम्हणेतर लोक गवंडी, पाथरवट आंत गेले होते. तेंव्हा आता ब्राम्हणेतरांनी आंत जाऊं नये हा प्रश्न कोठें राहिला? असें ब्राम्हणेतरांचे म्हणणे थेईल. त्यावर ब्राम्हणातर्फे प्रत्युत्तर येईल कीं, देवालय बांधणें, आंतील गाभारा करणें, फरशी बांधणें, फार काय प्रत्यक्ष मूर्ती घडविणें ही सर्व कामे अवश्य कामापैकी आहेत. आणि ती ब्राम्हणेतरांकडूनच झालेली आहेत खरी. परंतु ही बांधकामे झाल्यानंतर मंत्र संस्कार होतात, मूर्तीची प्राण प्रतिष्ठा होते, आणि त्यानंतरच त्या दगडांना पवित्रपणा येतों. तोपर्यंत येत नाही. अर्थात मंत्राने शुद्ध व पवित्र झाल्यानंतर त्या ठिकाणी ब्राम्हणेतरांना प्रवेश करणेचा आणि मूर्तीला स्पर्श करणेचा अधिकार पोंचत नाही. हे अधिकार जन्मत:च पवित्र असलेल्या एका ब्राम्हण वर्गाचेच आहेत. तो अधिकार केवळ त्यांचाच आहे! शूद्रांचा नव्हे.

दरबारच्या प्रेसनोटमध्ये जनतेसमोर एक मार्मिक प्रश्न मांडलेला आहे. तो असा. ' ब्राम्हणांच्या स्त्रिया देवालयाच्या गाभाऱ्यांत जातात. मूर्तीला स्पर्श करतात. त्यांना पूजाऱ्याकडून हरकत झालेली नाही. शास्त्राप्रमाणें स्त्रिया ह्या शूद्र मानलेल्या आहेत. " हे जर खरे असेल तर " मग ब्राम्हणांच्या स्त्रियानां तरी मूर्तीला स्पर्श करणेचा अधिकार कसा पोचतो ? त्या जर शुद्र ठरत असतील तर ब्राम्हणेतरांना तरी मुर्तीला स्पर्श करणेला मज्जाव कसा करता येईल ? हा मुद्दा विचार करणेसारखा आहे.

वाडी नरसिंह हे दत्तात्रयाचे पवित्रस्थान आहे. क्षेत्र करवीर राज्याचे हद्दीत आहे. परंतु देवाला इनाम गांवे ब्रिटिश मुलूखांत आहेत. शिवाय गुरुद्वादशी-सारख्या दिवशी महाराष्ट्रातील व हिंदुस्थानातीलही दूरदूरचे भाविक लोक प्रसादास व दर्शनास येत असतात. प्रसादाची व्यवस्था वगैरे दरबारच्या नजरेखाली होत असते. अशी स्थिती आहे. यामुळे ब्राम्हणेतरांच्या हक्काचा प्रश्न या ठिकाणी संस्थानची प्रजा व खालसा व मुलुखातील प्रजा या उभयतानाही महत्वाचा आणि अगत्याचा वाटत आहे. म्हणून वरील प्रश्नाचा उहापोह या ठिकाणी झाला असतां तो योग्यवेळी होईल असे वाटते.

● ● ●

मनुस्मृतीमध्ये दुसऱ्या अध्यायांत संस्कारासंबंधाने विचार केला आहे. त्यांत ब्राम्हण क्षत्रियांचा वगैरे विचार झाल्यानंतर, स्त्रियांच्यासंबंधी उल्लेख केला आहे.

। अमंत्रिका तु कार्येयं स्त्रीणामावदविशेषतः ।
। संस्कारार्थं शरीरस्य यथाकालम् यथाक्रमम् ॥६६॥
। वैवाहिको विधिःस्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः ।
। पतिसेवा गुरौवासौ गृहार्थोग्नि परिक्रिया ॥६७॥

मनुस्मृती अध्याय २-६६।६७

यावरून स्त्रियांना संस्कार करणेचे ते मंत्रांनी करणेचे नाहीत असें दिसते.

देहशुद्धीसंबंधी विवेचन अध्याय ५ मध्यें केले आहे. त्यांत ग्रहस्थ, ब्रम्हचारी, वानप्रस्थ, यती यांनी देहशुद्धी कशी करावी वगैरे सांगितल्यानंतर, स्त्री आणि शुद्र यांच्याबद्दल कथन केले आहे. त्यांत त्यांनी एकेक वेळच जल पोटात घ्यावे. म्हणजे शुद्धी होते, असें सांगितले आहे. ॥ शारीरं शौचमिच्छन्हि स्त्री शुद्रस्तु सकृतसकृत ॥ ( मनु अ. ५-१३९ ) यावरून स्त्री आणि शूद्र या दोघांना एकाच दावणीत घातलेले आहेत, मनुस्मृ. अध्याय ९ यांत श्लोक १४ पासून पुढे स्त्रियांच्या स्वभावाचे स्मृतिकारांनी जे वर्णन केले आहे ते :-

स्त्रिया हृचा स्वभावतःच स्नेहशून्य आहेत. व्यभिचाराचा आश्रय करून त्या पतीच्या विरुद्ध जातात. हा त्यांचा स्वभाव ईश्वरसृष्टि जगाच्या आरंभापासून सिद्ध आहे ! ! हे सर्टिफिकेट स्त्रियांच्या कपाळावर मारल्यानंतर त्यांचा दर्जा कोणता, हे वेगळे सांगणें नकोच. नास्ति स्त्रीणां क्रिया मंत्रैरिति धर्मे व्यवस्थिति निरेंद्रियाह्य मंत्राश्च स्त्रियाऽनृतमितिस्थितिः । १८ या श्लोकावरून स्त्रियांच्या जातिकर्मादि क्रिया मंत्राने करणेच्या नाहींत, अशी शास्त्राची आज्ञा आहे. श्रुतिस्मृती ही धर्मांची प्रमाणें आहेत, पण त्यांचा स्त्रियांना अधिकार नाही. त्या धर्म जाणत नाहीत. पापाचा नाश करणारा वैदिक मंत्राचा जप त्यांना करता येत नाही. यामुळे पाप झाले तरी त्यांना ते घालवता येत नाही. याकरिता त्या असत्य आणि अशुभ असतात ! असे शास्त्राने सांगितले आहे.

वरील श्लोक देतांना आम्हाला फार खेद होतो. आमच्या माता, बहिणी, मुली, सुना, यांचा आम्ही मोठा अपराध केला असे आम्हांस वाटते. ज्या धर्म पत्नीवर, ज्या गृहलक्ष्मीवर आमचे सुखदुःख अवलंबून आहे, ज्यांच्या हृदयांतील प्रेमाच्या झऱ्यावर हा भौत्तिक प्रपंच सुखाने नेण्यास आम्हांस स्फूर्ति मिळते, त्या स्त्री वर्गाची स्मृतिकारांनी केलेली ही दैना पाहून कोणत्या सहृदय पुरुषास विषाद वाटणार नाही !

पण ब्राम्हण बंधूनो, मनुस्मृती तुम्ही पूर्वीच झुगारून दिली आहे. तिच्या आज्ञा बाजूस टाकून स्त्रियाना तुम्ही तुमच्या इतकेच पवित्र मानले आहे याबद्दल आम्हां ब्राम्हणेतरांना मनापासून संतोष होतो. असले किळसवाणे विचार ज्या स्मृति-श्लोकांत लिहिले गेले, त्याच्या मुसक्या आवळून अरबी समुद्राच्या तळाला नेऊन गाडून टाकावेत. स्मृतीची आज्ञा आमच्या ब्राम्हणबंधूनीच मोडली. स्त्रियांना आपल्या बरोबरीने मान दिला. देवालयांत व इतरप्रसंगी त्यांना अर्धांगी मानण्यात आली. हे पुरुष वर्गाला साजेसेच केले केले आहे. फक्त आतां एकच पायरी उरली आहे. ती हीच की, ज्या स्त्रियांना शूद्राच्या माळेत शास्त्राने घालण्यांत आले, तेच शूद्र ( ? ) उर्फ ब्राम्हणेतर आज मनगट पुढें करून समान हक्क स्थापन करीत आहेत. त्यांना कोणत्या तोंडानें तुम्ही हरकत घेणार ? हा पेच तुम्हांला सुटणे कठीण आहे ! अयोग्य शास्त्रांच्या आज्ञा सर्वानी पूर्वीच फेकून दिल्या आहेत. मग त्या बरोबरच ब्राम्हणेतरांचा अपमान करणें, त्यांना शूद्र लेखणें, देवधर्म संस्कार या बाबतीत त्यांचा उपमर्द करणे, या गोष्टीही तुम्ही आजपासून लाथाडल्या पाहिजेत !

ब्राम्हण आणि अब्राम्हण हा भेद देवासमोर काय कामाचा? ज्या देवाच्या स्पर्शाने चांडाळाचा ब्राम्हण होतो, तो दत्तात्रयच अब्राम्हणाच्या स्पर्शानें भ्रष्ट होतो 'हें म्हणणें किती वेडेपणाचे आहे ? उपाय हाच आहे की, देवालयाचा आंतील

गाभारा जर अगदी पवित्रच ठेवणेचा असेल तर तेथें ब्राम्हण असो अब्राम्हण असो, कोणीच जाणेचे नाहीं, असें ठरवावें लागेल. स्नान करून, स्पर्शास किंवा अभिषेकास, हरकत घेतां कामा नये अशी व्यवस्था व्हावी लागेल. किंवा एक मर्यादा ठरवून तेथें आडवा एक रोलर घालावा आणि त्या हद्दीपर्यंतच भक्तानें जाणेचें. त्याचे आंत ब्राम्हण असो अब्राम्हण असो कोणीच जाणेचे नाहीं. असें ठरवावें. आमचें स्वतःचे मत असें आहे.

● ● ●

## गोव्यातील बाहयशुद्धीने अंतः शुद्धी कशी होणार ?

केसरीमध्यें गोमांतकाकडील कांही खिस्ती लोकांना शुद्ध करून हिंदू– समाजांत घेतले या विषयावर अग्रलेख आला आहे. दगडापेक्षा वीट मऊ. यादृष्टीनें किंवा कांहीच न करण्यापेक्षां बरें यान्यायाने श्री. मसुरकर याचे मठाकडून जीं कामगिरी होत आहे. ती चांगली आहे. तथापी आजच्या कालाला ती पुरेशी नाही. आमचे मन तात्विक दृष्ठया असल्या कासास मान्यता देत नाहीं. धर्म हा विषयच व्यक्तीच्या समाधानाचा आहे. आणि तो सर्व धर्मात समाधान पावू शकेल. शुद्धी किंवा तबलीक यागोष्टी मनाच्या समाधानाच्या नसून त्याला सामाजिक स्वरूप आहे. तथापी काळ असा आला आहे की, राष्ट्रदृष्टया हिंदी समाजाचे शुद्धीकरण होणे अगत्याचे आहे.

गोव्याकडे पोर्तुगीज लोकांनी चार पांच शतकांपूर्वी कांही गांवेच्यागांवे बाटवून खिस्ती केलेली आहेत. त्यांचे मार्ग केवळ लबाडीचें आणि फसवाफसवीचे होते. सार्वजनिक तलावांत अगर विहीरींत पाव, बिस्कीट किंवा मांसाचा तुकडा टाकावा. आणि लोकांना मागाहून कळवावे की तुम्ही हे पाणी प्याला आणि बाटला. आणि असल्या टगेगिरीला फसणारे लोकही तसेंच मुर्ख होते. तथापी तसल्या गोष्टींचा परिणाम त्याकालच्या लोकांवर झाला. आणि गांवे बाटली गेली! असल्या मार्गाने जे लोक आपण बाटलों असें समजतात, त्यांची किंमत तितकीच. आणि तसल्या लोकांना ब्राम्हणाकडून पाणी शिंपून आणि वेदमंत्राच्या जोरावर हिंदु करून घेतले. म्हणून फुशारक्या मारीत सुटणें याचीही आम्हांस किंमत तितकीच वाटते !

रामदास पंथी हे काम करतील काय ? हा शुद्ध ब्राम्हणी पंथ आहे समर्थ हे राजकारणी डावपेचात प्रवीण असतील. परंतु जातीभेद मोडण्याचे काम त्यांनी केल्याबद्दल दाखला नाही. महाप्रतापी आणि कुशाग्र बुद्धीचे शंकराचार्य यांचे हातूनसुद्धा हे काम झाले नाही. मग बिचारे मसूरकर काय करणार ? गोव्यातील शुद्धी आमच्या दृष्टीने केवळ " मट्टीकुं रंग लगाया " पैकी आहे. वस्त्रांतर केल्याने मनुष्याचे अंतःकरण केव्हांही शुद्ध होणार नाही. पोर्तुगीज लोकांनी अज्ञान खेडवळांना फसविले. ' ख्रिस्ती " नांवाचा शिक्का मारला. हिंदी अंगरखा काढला आणि ख्रिस्ती झगा घातला. आज ब्राम्हणी शुद्धी पुढाऱ्यांनी तो झगा काढला आणि हिंदी अंगरखा घालून गंधाचे पट्टे लावले. अशाने ख्रिस्ती होणे किंवा हिंदू होणे म्हणजे त्या दोन्ही धर्माची थट्टा आहे.

असे सामाजिक समाजीकरण पूर्वी झाले आहे. अनेक जातीचे आणि वर्णाचे लोक आज हिंदी समाजांत समाविष्ठ झाले आहेत. नाना जाती, नानावर्ण आपणास हिंदू म्हणवीत आहेत. पण एकजीव कधीच झाले नाहीत. आजच्या टकराटकरीत आणि धुमधडाक्यांत असल्या वस्त्रशुद्धीने काम भागणार नाही. आणि सोंवळ्या, कमकुवत, नाजूक प्रकृतीच्या ब्राम्हण संस्कृतीकडून या मामल्याचे काम होणार नाही !

श्रीशंकराचार्य थकले ! रामदास फिके पडले. तेथें मसूरचा ब्रम्हश्चर्याश्रम काय करणार ? अठरा पगड समाजांत असल्याशुद्धीनें आणखी एका जातीची भर मात्र पडेल ! जाती मोडण्या ऐवजी वाढतील. यानें समाजाचें दृढीकरण काय होणार ? जे नको आहे, तेंच पुन्हां पदरीं येवून पडणार ! ब्राम्हण शुद्धी—वाले, बोलतील पुष्कळ. पत्रांतून गौरव भरपूर करतील. पण आम्ही याला शुद्धी म्हणण्यास तयार नाहीं.

**रोटीबेटी व्यवहाराशिवाय याला तोडच नाहीं.-** थोडेसे काम रोटी व्यवहारानें होईल. आणि पुढील काम बेटी व्यवहारानें होईल. रक्ताचें मिश्रण झाल्यावाचून संघटना होणेंच शक्य नाहीं. आजच्या विस्कळित समाजाला हिंदु या नांवाचा शिक्का मारणें ही स्वतःची फसवेगिरी आहे ! म्हणून आमचें सांगणें असें आहे; शुद्धीच्या पुढाऱ्यानी एखादी व्यक्ती असो किंवा कांही समाज असो, किंवा गांव असो, त्याची शुद्धी करून घेताच, सहभोजन प्रथम करावें. मुख्य पुढारी आणि मसूरकारासारखें पुरुष हें त्या भोजनांत सामील व्हावेत.आणि शुद्ध करून घेतलेल्या लोकांशीं पंक्ती प्रपंच बिलकूल न करितां सभोजन घडवून आणावे. ही प्रेमाची पहिली पायरी आहे. त्याला हात न लावितां, जातीभेद कायम ठेऊन, शुद्धी करीत सुटणें यांत नुसता सुधारकी आव मात्र दिसेल ! खरी समाजसेवा होणार नाहीं. हें हवाला देण्याचें काम नव्हे. फलटणच्या बाजी

निंबाळकरांना शुद्ध करून घेतल्या बरोबर शिवाजी महाराजानीं प्रथम त्यांचेशी पंक्ती भोजन केले आणि नंतर लागलींच निंबाळकरांच्या मुलग्याला आपली मुलगी देऊन टाकलीं ! ही धडाडी कोणीकडे, आणि वेदाचे मंत्रानीं लांबून संस्कार करून आपण अलग राहून स्वतः प्रायश्चित घ्यायचे आणि इतरांना भाराभर सुधारणेचा उपदेश करायचा, ही खरी शुद्धी चळवळ नसून ही गौड बंगाली ब्राम्हणी दिशाभूल मात्र आहे !

● ● ●

आमच्यामतें महाराष्ट्रातील मराठा कुणबी समाज या शुद्धी कार्यास समर्थ आहे. दुसऱ्या समाजाचे अंगी ही पात्रताच नाही. पहिली गोष्ट अशी कीं, या प्रांतात कुणबी मराठा वर्गांची संख्या मोठी आहे. अलीकडे कांहीं कावेबाज ब्राम्हणांना आपणांस "मराठा ब्राम्हण" म्हणवून घेण्याची एक वेडगळ हाव सुटलेली दिसते. "मराठा ब्राम्हण" असे नांव धारण केल्याने कोणी मराठा होत नाही. मराठा जैन, मराठा, लिंगायत, मराठा सोनार असे नांव जोडल्याने मराठे कसे होणार ? महाराष्ट्रात रहातो तो मराठा ब्राम्हण, ही शब्द चलाखी आहे. त्याने मराठ्यांच्या अंगचे सामाजिक व लोक संग्रहाचे सामर्थ्य येणार नाही. आज मराठा वर्गाकडे पहा. रोटी व्यवहाराबाबतीत तर त्यांचा प्रभाव अमर्याद आहे. सामान्य मराठा माणूस फक्त अस्पृश्याना वगळले तर कोणत्याही जातीच्या इसमाशी उघड सहभोजन करू शकतो. तो खासगी व सार्वजनिक असा भेद करीत नाही. सत्यसमाजसारख्या वाढत्या विचारांच्या पंथात मराठा–वर्गच बहुतेक प्रमुख आहे. आणि तो अस्पृश्यासह भोजन करण्यास मागें घेत नाही. आणि त्यांचे हातचे अन्नपाणी घेण्यासही डरत नाही. मनुष्याचे स्पर्शाने मनुष्य अमंगल होतो. ही कल्पना मराठा मानत नाही. पाणी प्याल्याने मनुष्य पतित होतो, किंवा जेवल्याने भ्रष्ठ होतो, या कल्पना त्याला मान्य होत नाहीत ! वेदांतातील समतेची तत्वे मराठावर्गच आज अमलांत आणीत आहे. डॉ. मुंजे आणि हिंदुसभांतील अनेक बडे शुध्दीवाले व्याख्याने देतील, ठराव पास करतील. परंतु अस्पृश्यांचे हातांत हात घालण्यास किंवा मराठ्यांशी सह भोजनाचा प्रसंग आल्यास त्यांची हटकून गैर हजरीच पडेल ! तशी स्थिती किंवा इंद्रजाली खेळ मराठे वर्गाचे अंगी नाहींत. तो एका बाजुने ब्राम्हणाबरोबर सह–भोजन करील, तरी दुसऱ्या बाजूने जैन लिंगायत, साळी माळी, तेली सुतार, कुंभार, सोनार गवंडी पाथरवट वाटेल त्याच्या घरी जाऊन आनंदाने अन्न–ग्रहण करील. असल्या रोटी व्यवहाराने मराठ्यांचीं जात बुडत नाही. किंवा त्यांचे धर्मास धक्का लागत नाही. ही धमक ब्राम्हण वर्गाचे अंगी नाही. स्वच्छ–तेच्या तत्वावर त्यानी सोवळे ओवळे उभे केले. पण त्यां सोवळ्याच्या कल्पना

आज इतक्या हास्यास्पद झाल्या आहेत की, वैद्य शास्त्र त्यापुढे हात टेकते, आणि त्या ब्राम्हणवर्गाचा सहवास नको अणि आपला उपमर्दही करून घ्यायला नको असे इतरानाही वाटू लागते. त्यात आणखी दु:खाची भर पडली ती अशी जैन धर्मात जातीभेद मुळात नव्हता. लिंगायत धर्मजातीभेदाचा मुळचा हाडवैरी. जातीभेदाला मूठमाती द्यावयाची ही प्रतिज्ञा करून बसवस्वामीनीं हाती यज्ञ कंकण बांधले. परंतु परिणाम झाला उलट. ब्राम्हणांचे सोवळे एकपट तर जैनांचे पांचपट आणि लिंगायतांचे दसपट. ब्राम्हणी धर्मापासून हा सोंवळ्या ओवळ्याचा रोग इतराना जडला. या स्पर्शजन्य रोगापासून पुष्कळशा प्रमाणानें एक मराठा वर्गच अलिप्त राहिला आहे, शिवाशिवीच्या पिशाच्च्याची बाधा मराठ्याला होत नाही. आणि याच कारणांनी पूर्वीपासून राजन्य वर्गानें, क्षत्रियांनी वाटेल त्या परक्या वर्गाला आपल्यात सामील करून घेतले आहे. गौतमबुध्दानीतर या बाबतीत कळस करून द्रविड सुध्दा सारा समाज एकराष्ट्रिय करून टाकला आहे. ही परंपरा सोवळ्या ब्राम्हण संस्कृतीने बुडविली. आणि चोरांच्या पहिल्यांदा... म्हणून आज हेच ब्राम्हण शुध्दी कार्याला पुढें धावत आहेत. अशानें ब्राम्हणांची पत वाढणार नाही. जातीभेदाला मूठमाती देण्याचा खरा निश्चय त्यांनी केल्यावाचून, सोवळ्याच्या सबबीवर आपण बाजूस रहाण्याचे टाकून दिल्यावाचून, हा प्रश्न त्यांच्याने कधीच सोडवणार नाही. म्हणूनच आमचे म्हणणे की, खऱ्या शुध्दीसंघटनेची चळवळ मराठावर्गानेच हाती घेतली पाहिजे.

• • •

# ही वंश शुध्दता !

ब्राम्हण म्हणवणारी माणसे स्वत: सात मुख्य ऋषींच्या वंशजांपैकी, असे समजतात व म्हणतात.

अंगिरा, भृगू, विश्वामित्र, कौशिक, काश्यप, वसिष्ठ व अगस्ति ही त्या सात मुख्य ऋषींची नावे.

विश्वामित्र हा पक्का क्षत्रिय. कौशिक क्षत्रीय. या गोत्रातली मुलगी मिळाल्यास भृगूचे गोत्र आपले विशेष भाग्य समजे.

जमदग्नीची आई सत्यवती. ही विश्वामित्राची बहीण. विश्वामित्र क्षत्रीय. बायको रेणुकाही ही जातीने क्षत्रीय.

चित्पावनाचे कुलदैवत परशूराम.

ब्राम्हण, बाप आज्याकडून, तर क्षत्रीय, आई आजी कडून, म्हणजे पक्का गंगाजम्नी गोत्रातला. असा हा एक कच्चा ब्राम्हण होता. म्हणजे धड ब्राम्हण, नव्हता धड क्षत्रीय नव्हता.

वसिष्ठ हा एका कलावंतणीचा मुलगा. त्याच्याच गोत्रातल्या पाराशराने एका मच्छिमारू कोळ्याचे मुलीस पदरी पडू लावून कामापुरते पवित्र करून घेतले!

या प्रमाणे परशुरामाच्या गोत्रात आणखी मच्छिमारू कोळ्याचेही रक्त पडले होते.

सातवा ऋषी अगस्ती. त्याची बायको लोपामुद्रा ही राजकन्या होती. त्यामुळे आज अगस्ती गोत्रातील त्यांच्या रक्तात लोपामुद्रा राजकन्येच्या रक्ताची भेसळ झालेली.

भृगू, कौशिक, वसिष्ट व अगस्ती या चारही गोत्रांचे शरीर संबंध, अंगिरी, काश्यप व अत्रि या तीन गोत्राशी होत आलेले आहेत.

या प्रमाणें सातही मुख्य गोत्रापैकी एका गोत्रात जन्मून, आज ब्राम्हण म्हणवणारी जी माणसे आमच्या देशी आहेत, त्यांच्या पिंडात क्षत्रियांचे कोळ्यांचे व दुसऱ्याचेही रक्त कमीजास्त प्रमाणात पूर्वीच पडून गेले आहे. म्हणूनच 'नदीचे मूळ व ऋषीचे कूळ पाहू नये' अशी म्हण आबाळ चांडाळांचे तोंडी रुढ झालेली आहे. म्हणून आज ब्राम्हण म्हणवणाऱ्यांचो शुद्ध, रक्ताची घमेंड व्यर्थ आहे. खुद्द धर्मराजाने नहुषला उत्तर दिले– वर्ण संकर हा झालाच आहे !

• • •

## टिळक म्हणतात .........

**स्वराज हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.**

**'तो मी मिळवीनच मिळवीन'**

**तसंच आम्ही म्हणतो.**

**'समता आमचा जन्मसिद्ध हक्क आहे.'**

**तो मिळेपर्यंत आम्ही उच्च म्हणणाऱ्या वर्गाला स्वस्थता मिळू देणार नाही.**

२३ आक्टो. १९२५

'दुसऱ्यानी तुम्हाशी जसे वागावे असे तुम्हाला वाटते तसेच तुम्ही दुसऱ्याशी वागले पाहिजे.'

जगाची रचना पहाताना अनेक ठिकाणी विषमता दिसून येते खरी. दोन भावांपैकी एक बुद्धिवान दुसरा निर्बुद्ध निपजतो असे पाहण्यात येते.

सृष्टीमध्ये कमजास्तपणा दिसून येतो. हा अधिकार निसर्गाचा आहे. परंतु तो अधिकार स्वार्थाच्या नादी लागून आपणच बळकावून एक मनुष्यप्राणी दुसऱ्यावर सत्ता गाजवू लागतो. उच्चनीचपणाची शिडी अथवा सोपान तयार करतो. आपल्या सुखासाठी दुसऱ्याचे सुखावर पाणी ओततो आणि आपल्या खोटचा कृत्रीम, जन्मजात हक्काची आपलपोटी उभारणी करून, दुसऱ्या वर्गाच्याला वर्गहीन जातीचा ठरवून त्याला कायमचा रसातळास पोचवतो यास काय म्हणावे ? मनुष्याने मनुष्यास कमी मानावा, एकाने दुसऱ्यास हीन मानावा, सोवळ्या ब्राम्हणाने महारास अस्पृश्य मानावा, या समाजाच्या रचनेस काय आधार आहे?

कृत्रीम विषमता निर्माण करण्याचा हक्क मनुष्यास कसा पोचतो. ब्राह्मण मनुष्य ब्राह्मण आई-बापाचे पोटी आला हा एक अँक्सिडेंट आहे. अपघात आहे. पण तेवढ्या आधारावरून तो ब्राह्मणप्राणी किंवा उच्च वर्गाचा म्हणविणारा मनुष्य खरोखरच काही वेगळ्या रचनेचा बनतो ही गोष्ट अनुवंशिक संस्काराच्या पुराव्याने शाबीत झालेली नाही. ब्राह्मणाच्या रक्ताचे घटक फार वेगळ्या प्रकारचे असतात किंवा त्याच्या मेंदूतील द्रव्ये त्याची रचना किंवा क्रिया ( फंक्शन ) भिन्न असतात असे आधुनिक शास्त्राने शाबीत होत नाही. उलटपक्षी हीन मानलेल्या वर्गाची किंवा अस्पृश्याची रक्ताची आणि मेंदूची रचना घटक द्रव्ये किंवा क्रिया या कमी प्रतीच्या असतात किंवा जन्मतःच त्याचे अंगी दुर्गुणाचे

मिश्रण झालेले असते किंवा प्लेग कॉलरा देवी अशा स्पर्शजन्य रोगाचे ते एक घर बनलेले असते ? आणि या कारणास्तव इतरांनी या हीन मानलेल्या वर्गापासून दूर राहिले पाहिजे हा सिद्धांत आधुनिक शास्त्राच्या अनुभवाने शाबीत होत नाही. असे जर आहे तर एका जातीने दुसऱ्या जातीस हीन ठरवून कायमच्या गुलामगिरीत ठेवावे हा न्याय एका सैतानाच्या राज्यातच खपू शकेल. सरळ मनाचे मानवाला ही विषमता सहन होणार नाही.

एका देशाने दुसऱ्या देशास जिकून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घ्यावे आणि त्यावर आपले साम्राज्य स्थापावे ही गोष्ट राज्यनीती तत्वास सुटून आहे. पण दुर्दैवाने हा अप्रिय चमत्कार सर्व काळी झाला आहे. ' लोभ मूलानि पापानि ' या न्यायाने आपली राक्षसी महत्वाकांक्षा तृप्त करण्यासाठी एखाद्या हुषार किंवा बलवान राक्षसाने दुसऱ्या गरीब निरपराध आणि भोळ्या राष्ट्राचा पराभव करून त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन त्याला कायमच्या दास्यात ढक न दिला आहे. हा कटु प्रत्यय वारंवार दृष्टीस पडतो. ही अरेरावी ही बेबंदशाही झुगारून द्यावी म्हणून अनेक थोर पुरूषानी स्वार्थत्यागाचे अनेक प्रयत्न केले आहेत. अशा राष्ट्रीय थोर विभूतींच्या बुद्धिबलाने पारतंत्र्याच्या दास्यातून त्यानी आपला देश स्वतंत्र केला आहे.

स्वतंत्र विचाराचा माणूस या घाणेरड्या गोष्टीं डोळ्यानी पहात असता स्वस्थ बसणार नाहीं. आपल्या लोकांचे दास्य नष्ट करावे म्हणून तो कामास लागतो. यश अपयशाकडे तो मुळीच पहात नाही.

ब्रिटिश राजसत्ता म्हणजे केवढी जगढव्याळ अशा बलाढ्य राष्ट्राने आमचा देश आपल्या सत्तेखाली घेतला. देशाला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देणे आपल्या शक्ती बाहेरचे आहे, आपल्या आवाक्यापलीकडचे आहे हे जाणून हळूहळू प्रारंभ केला. केव्हां सिव्हिल सर्विसची परीक्षा समकालीन व्हावी, अशी मागणी करावी केव्हा न्याय व अंमल बजावणी खाते वेगळे करावे केव्हा लोकांना उच्च प्रतीच्या नोकऱ्या मिळाव्यात असे म्हणावे केव्हा लष्करी खर्च कमी करावा अशी विनवणी करावी असे तुटक प्रयत्न चालले होते. परंतु एवढ्याने मनाचे समाधान होईना म्हणून कै. महर्षि दादाभाई यानी कलकत्त्याचे काँग्रेसमध्ये व्यासपीठावर उभे राहून दीर्घ कंठाने उर्ध्वबाहू करून जाहीर केले. काँग्रेसद्वारे आम्ही जी मागणी करीत आलो त्या सर्व ठरावाचा मतितार्थ आणि सार सर्वस्व एका शद्वात बोलून दाखवायचे तर हेच कीं स्वराज्य हीच आमची अखेरची मागणी आहे. या पुढे आणखी दोन पाऊले पुढे जाऊन मागणी बिगणी हा शद्व बाजूस सारून कै. बाळ गंगाधर टिळक यांनी स्पष्ट शद्वांनी सर्वांना सांगून टाकले कीं हे ' स्वराज्य ' मागणीचा प्रश्न नाही तर तो आमचा जन्मसिद्ध हक्क आहे.

हे टिळकांचे शद्ब ऐकून ब्राम्हणवर्गाला मोठा अभिमान वाटतो. टिळकांची मागणी तरी समतेच्याच पायावर उभारली आहे. माणुसकीच्या हक्काची त्याना पूर्ण जाणीव आहे. ब्रिटिश राज्य आणि दीनदुबळा हिंदुस्थान यांच्यात जमीन अस्मानचे अंतर. ही गोष्ट टिळकाना ठाऊक आहे. परंतु कशाचीही पर्वा न करता एका सत्य पक्षाच्या व माणुसकीच्या पायावर उभे राहून त्यानी आपला आयुष्य-क्रम पार पाडला.

उच्च म्हणविणाऱ्या बंधूनो आम्ही तुम्हाला स्पष्ट बजावून सांगतो की तुमच्या गुरुजींचीच शिकवण तुम्ही समोर ठेवा. राजकीय हक्काचे बाबतीत समतेच्या तत्वावर जे प्रयोग केले तेच प्रयोग त्याच तत्वावर उभे राहून मागासलेला वर्ग आज करीत आहे. टिळकानी फक्त एकाच बाबतीत शिक्षण दिले त्यांच्याच पाऊलावर पाऊल ठेवून आम्ही आज धार्मिक व सामाजिक तत्व पुढेठेवून चळवळ करीत आहोत. आमची तुमची वीण एकच आहे. ज्या डोक्यातून राजकीय विचार सुचले त्याच डोक्यातून सामाजिक समतेचे विचार सुचत आहेत.

इंग्रज सरकारला तुमच्या राजकीय मागण्या अप्रीय होत असल्या तरी त्या तुम्हाला योग्य वाटतात. हा न्याय स्वतःच्या घरच्या सामाजिक बाबतीत लावावा. मागासलेल्या ब्राह्मणेतरांच्या सामाजिक मागण्या तुम्हाला अप्रीयच वाटतील. हिरव्या मिरचीप्रमाणें झोंबतील. विषाप्रमाणें कटु वाटतील. परंतु त्याला उपाय नाही. इंग्रज सरकारला आमच्या स्वराज्याच्या मागणीने कसे काय वाटेल याची पर्वा खऱ्या देशभक्ताने कधी केली आहे? त्याचप्रमाणें इकडे रुढीचे दास बनलेल्या ब्राह्मण वर्गाला प्राण गेल्यानंतर प्रेताचे मागे लागलेल्या धर्माच्या अभिमानावर नाचणाऱ्या, भटशाहीवर तत्वहीन सत्वहीन जन्मजात भेदभाव आणि उच्चनीचपणा व खोटी सोवळेशाही यात गुरफटून गेलेल्या, गुलामगिरीला पोटाशी धरून स्वातंत्र्य मिळवू पाहणाऱ्या ब्राह्मणाला, अस्पृश्याला गावाबाहेर ढकलून देऊन, ऑफ्रिकेच्या उच्च पठाराच्या पठारावर हिंदुचा समान हक्क असावा ह्मणून ओरड करणाऱ्या वर्गाला आमची मागासलेल्या वर्गाची समतेची मागणी कशी काय वाटेल याची पर्वा करण्याची आह्माला जरूर नाही. आमचा मार्ग सत्याचा आहे. मनुष्यपणाच्या हक्काचा आहे. त्या हक्काचे अमल बजावणीस कोणी कट्टा मार्तंड आडवा आला किंवा रूढीच्या मडयाचे सोंग मांडणारा कोणी भट्ट भट्टाचार्य आला तरी त्याच्या मुस्काटात देऊन आम्ही समतेच्या हक्काची अमल बजावणी केल्यावाचून राहणार नाही.

• • •

मिश्रण झालेले असते किंवा प्लेग कॉलरा देवी अशा स्पर्शजन्य रोगाचे ते एक घर बनलेले असते ? आणि या कारणास्तव इतरांनी या हीन मानलेल्या वर्गापासून दूर राहिले पाहिजे हा सिद्धांत आधुनिक शास्त्राच्या अनुभवाने शाबीत होत नाही. असे जर आहे तर एका जातीने दुसऱ्या जातीस हीन ठरवून कायमच्या गुलामगिरीत ठेवावे हा न्याय एका सैतानाच्या राज्यातच खपू शकेल. सरळ मनाचे मानवाला ही विषमता सहन होणार नाही.

एका देशाने दुसऱ्या देशास जिंकून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घ्यावे आणि त्यावर आपले साम्राज्य स्थापावे ही गोष्ट राज्यनीती तत्वास सुटून आहे. पण दुर्दैवाने हा अप्रिय चमत्कार सर्व काळी झाला आहे. 'लोभ मूलानि पापानि' या न्यायाने आपली राक्षसी महत्वाकांक्षा तृप्त करण्यासाठी एखाद्या हुषार किंवा बलवान राक्षसाने दुसऱ्या गरीब निरपराध आणि भोळ्या राष्ट्राचा पराभव करून त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन त्याला कायमच्या दास्यात ढक न दिला आहे. हा कटु प्रत्यय वारंवार दृष्टीस पडतो. ही अरेरावी ही बेबंदशाही झुगारून द्यावी म्हणून अनेक थोर पुरुषानी स्वार्थत्यागाचे अनेक प्रयत्न केले आहेत. अशा राष्ट्रीय थोर विभूतींच्या बुद्धिबलाने पारतंत्र्याच्या दास्यातून त्यानी आपला देश स्वतंत्र केला आहे.

स्वतंत्र विचाराचा माणूस या घाणेरड्या गोष्टीं डोळ्यानी पहात असता स्वस्थ बसणार नाही. आपल्या लोकांचे दास्य नष्ट करावे म्हणून तो कामास लागतो. यश अपयशाकडे तो मुळीच पहात नाही.

ब्रिटिश राजसत्ता म्हणजे केवढी जगढव्याळ अशा बलाढ्य राष्ट्राने आमचा देश आपल्या सत्तेखाली घेतला. देशाला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देणे आपल्या शक्ती बाहेरचे आहे, आपल्या आवाक्यापलीकडचे आहे हे जाणून हळूहळू प्रारंभ केला. केव्हां सिव्हिल सर्विसची परीक्षा समकालीन व्हावी, अशी मागणी करावी केव्हा न्याय व अंमल बजावणी खाते वेगळे करावे केव्हा लोकांना उच्च प्रतीच्या नोकऱ्या मिळाव्यात असे म्हणावे केव्हा लष्करी खर्च कमी करावा अशी विनवणी करावी असे तुटक प्रयत्न चालले होते. परंतु एवढ्याने मनाचे समाधान होईना म्हणून कै. महर्षि दादाभाई यानी कलकत्त्याचे कॉंग्रेसमध्ये व्यासपीठावर उभे राहून दीर्घ कंठाने उर्ध्वबाहू करून जाहीर केले. कॉंग्रेसद्वारे आम्ही जी मागणी करीत आलो त्या सर्व ठरावाचा मतितार्थ आणि सार सर्वस्व एका शब्दात बोलून दाखवायचे तर हेच कीं स्वराज्य हीच आमची अखेरची मागणी आहे. या पुढे आणखी दोन पाऊले पुढे जाऊन मागणी बिगणी हा शब्द बाजूस सारून कै. बाळ गंगाधर टिळक यांनी स्पष्ट शब्दांनी सर्वांना सांगून टाकले कीं हे 'स्वराज्य' मागणीचा प्रश्न नाही तर तो आमचा ज मसिद्ध हक्क आहे.

हे टिळकांचे शद्ब ऐकून ब्राम्हणवर्गाला मोठा अभिमान वाटतो. टिळकांची मागणी तरी समतेच्याच पायावर उभारली आहे. माणुसकीच्या हक्काची त्याना पूर्ण जाणीव आहे. ब्रिटिश राज्य आणि दीनदुबळा हिंदुस्थान यांच्यात जमीन अस्मानचे अंतर. ही गोष्ट टिळकाना ठाऊक आहे. परंतु कशाचीही पर्वा न करता एका सत्य पक्षाच्या व माणुसकीच्या पायावर उभे राहून त्यानी आपला आयुष्य-क्रम पार पाडला.

उच्च म्हणविणाऱ्या बंधूनो आम्ही तुम्हाला स्पष्ट बजावून सांगतो की तुमच्या गुरुजींचीच शिकवण तुम्ही समोर ठेवा. राजकीय हक्काचे बाबतीत सम-तेच्या तत्वावर जे प्रयोग केले तेच प्रयोग त्याच तत्वावर उभे राहून मागासलेला वर्ग आज करीत आहे. टिळकानी फक्त एकाच बाबतीत शिक्षण दिले त्यांच्याच पाऊलावर पाऊल ठेवून आम्ही आज धार्मिक व सामाजिक तत्व पुढेठेवून चळवळ करीत आहोत. आमची तुमची वीण एकच आहे. ज्या डोक्यातून राजकीय विचार सुचले त्याच डोक्यातून सामाजिक समतेचे विचार सुचत आहेत.

इंग्रज सरकारला तुमच्या राजकीय मागण्या अप्रीय होत असल्या तरी त्या तुम्हाला योग्य वाटतात. हा न्याय स्वतःच्या घरच्या सामाजिक बाबतीत लावावा. मागासलेल्या ब्राह्मणेतरांच्या सामाजिक मागण्या तुम्हाला अप्रीयच वाटतील. हिरव्या मिरचीप्रमाणें झोंबतील. विषाप्रमाणें कटु वाटतील. परंतु त्याला उपाय नाही. इंग्रज सरकारला आमच्या स्वराज्याच्या मागणीने कसे काय वाटेल याची पर्वा खऱ्या देशभक्ताने कधी केली आहे ? त्याचप्रमाणें इकडे रुढीचे दास बनलेल्या ब्राह्मण वर्गाला प्राण गेल्यानंतर प्रेताचे मागे लागलेल्या धर्माच्या अभिमानावर नाचणाऱ्या, भटशाहीवर तत्वहीन सत्वहीन जन्मजात भेदभाव आणि उच्चनीचपणा व खोटी सोवळेशाही यात गुरफटून गेलेल्या, गुलामगिरीला पोटाशी धरून स्वातंत्र्य मिळवू पाहणाऱ्या ब्राह्मणाला, अस्पृश्याला गावाबाहेर ढकलून देऊन, आफ्रिकेच्या उच्च पठाराच्या पठारावर हिंदुचा समान हक्क असावा ह्मणून ओरड करणाऱ्या वर्गाला आमची मागास-लेल्या वर्गाची समतेची मागणी कशी काय वाटेल याची पर्वा करण्याची आह्माला जरूर नाही. आमचा मार्ग सत्याचा आहे. मनुष्यपणाच्या हक्काचा आहे. त्या हक्काचे अमल बजावणीस कोणी कट्टा मार्तंड आडवा आला किंवा रूढीच्या मडयाचे सोंग मांडणारा कोणी भट्ट भट्टाचार्य आला तरी त्याच्या मुस्काटात देऊन आम्ही समतेच्या हक्काची अमल बजावणी केल्यावाचून राहणार नाही.

● ● ●

# ऋग्वेद

अति प्राचीनकाळी आर्य लोकांची एक वसाहत पंजाबात झाली. हे लोक, तेथे आले ते आपल्या पूर्वजांच्या चालीरीति संस्कृती घेऊन आले. यज्ञ-संस्था ही येथे येण्यापूर्वी फार दिवस त्यांच्यात रूढ असावी, कारण प्रार्थनेमध्ये पूर्वीच्या ऋषीनी यज्ञद्वारे देवतापासून फलप्राप्ती करून घेतल्याचा उल्लेख वारंवार येतो. यांची संख्या थोडीच असावी असे वाटते. निदान ऋग्वेदकाली तरी पंजाबच्या पलीकडे यांची वसाहत गेलेली नसावी कारण, अनेक प्रार्थनांमधून नद्यांचा उल्लेख येतो. त्या नद्या म्हणजे, हल्ली पंजाबात झेलम, चिनाब, सतलज वगैरे ज्या पांच नद्या आहेत त्यांचाच उल्लेख होत आहे. ऋग्वेदातील सर्वंच सूत्रे ब्राम्हणानी रचली आहेत असे नाही. क्षत्रियानीही रचलेली आहेत आणि कांही सूत्रे स्त्रियानींही रचलेली आहेत ! ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

जे आर्य लोक पंजाबात आले. त्यांच्यापूर्वी तेथल्या मूळच्या लोकांची संख्या ही बरीच मोठी होती. त्या लोकाना आर्यांनी दास, दस्यू, अनार्य काळे राक्षस पिशाच्च, लिंगपुजक अशी तिरस्कारयुक्त नावे दिलेली आहेत ! हे अनार्य लोक नव्या आर्याना फार त्रास देत होते, त्यांच्यामध्ये सारख्या लढाया चालू असत. यांच्या घराला ते आग लावीत. चोरून छापे घालीत. त्यांचे बाणही तीक्ष्ण होते. बाणास ते वीषही लावीत होते. येथील मुळचे अनार्य लोक, यज्ञ-संस्था मान्य करीत नव्हते या शत्रूपासून आपले रक्षण व्हावे म्हणून आर्यलोक देवाच्या प्रार्थना करीत असत.

त्याच्या प्रार्थनेची पद्धत असे ती अशी – यज्ञकुंड करणेचे, त्यात अग्नि (लाकडे) एकमेकावर घासून अग्नि उत्पन्न करणेचा आणि तो पेटला म्हणजे त्यात आहुती टाकावयाच्या. ते गव्हाचे गोळे होते. ते अग्नीत टाकावयाचे. दूध-तूप असे पदार्थ अग्नीत टाकीत असत. आणि देवताना घेऊन येण्याबद्दल ते अग्नीची प्रार्थना करीत.

हे आर्य लोक संख्येने फार थोडे, अगदी परके, चोहोकडून शत्रूनी घेरलेले अडचणीने गांजलेले असहाय्य असे होते. यामुळे केविलवाण्या मनाने, मात्र भक्ति–भावाने देवाचे सहाय्य मागण्यावाचून त्याना गत्यंतर नव्हते. सृष्टीच्या प्रचंड शक्तित सूर्य, पाऊस, समुद्र, वीज, अग्नी या शक्तीमध्ये देवतांचे वास्तव्य आहे अशी कल्पना करून ते देवतांची करूणा भाकीत. त्यांच्या घरी संपत्ती नव्हती. पशू, धन-धान्य किंवा मोठाले वाडे असेही नव्हते. म्हणून या सृष्टी–देवताकडे त्यांची मागणी सारखी होत असे. की देवा, तू आम्हाला जनावरे दे. घोडी दे. बैल दे. गाई दे. रथ दे. पैसा वाडे दे. आमच्या शत्रूना मारून टाक.

त्यांच्यापासून आम्हाला त्रास न होईल असें कर. हीच त्यांची मागणी असायची.

ऋग्वेदांतील पुष्कळश्या सूक्तांतील देवतांची नांवे जर वगळली तर सर्वांच्याकडे प्रार्थनेचे मागणे एकच आहे. आणि बहुतेक देवांचे गूण, विशेषणे पुष्कळ अंशी एकच धर्तीची आहेत. किंबहुना देवतांची तीच तीच वर्णने आणि त्याच पदार्थांच्या वारंवार मागण्या या खरोखरी कंटाळवाण्या वाटतात. सर्वांचा मुद्दा बहुतेक एकच, आणि यात कांही आश्चर्यहि वाटावयास नको. सर्व ऋग्वेदांत या आर्य लोकांना सुखाचें आणि शांतीचे दिवस मिळाले असतील असे दिसत नाहीं

अनार्य लोकाबरोबर सततचे तंटा बखेडे आणि लढाया यातच त्यांचा काळ गेलेला आहे. यामुळे शांततेच्या काळच्या सुधारणा त्यात म्हणण्याजोग्या दिसून येत नाहीत. आता ही गोष्ट खरी आहे. मधून मधून सृष्टिचे ज्ञान, आकाशाचे ज्ञान सूर्यचंद्राचे गोलाचे ज्ञान त्यानी संपादन केलेले होते असे दिसते, मात्र ऋग्वेदामधून एखाद्या शास्त्राचा पद्धतशीर विचार किंवा एखाद्या विषयाची पद्धतशीर मांडणी झालेली आढळून येंत नाही.

पंजाबच्या पलिकडे त्यांचे लोक गेलेले नव्हतें. त्यामुळें त्या बाहेरचा भूगोल ऋग्वेदांत दिसून येत नाही. व्याघ्र बंगालचा प्राणी आहे. तिकडे आर्यांची दृष्टि मुळीच गेलेली नव्हती. वाघाचे नांव या वाङ्‌मयांत दिसून येत नाहीं. ज्या कमलपुष्पाच्या सौंदर्यावर आमच्या पुढील कवींनीं आपली कल्पनाशक्ती फार खर्च केली आहे त्या कमलपुष्पाचा नामनिर्देषहि ऋग्वेदात नाहीं. तांदळाचा उल्लेख नाही. प्रांतापलीकडे त्यांचा प्रवास झाला नसल्यामुळें साहजिक भाताचें रोप दिसले नसावे.

ब्राम्हण आणि क्षत्रीय अर्थात पुरोहित आणि राजे लोक यांचा उल्लेख वारंवार दिसून येतो. आणि अग्नीत आहुती टाकणेची कामे व मंत्रद्वारे देवाना आमंत्रण करणेची कामेही ब्राम्हण पुरोहित करीत.

हा पुरोहितवर्ग तेव्हांपासून द्रव्याचा फार लोभी आहे ! क्षत्रीय राजांचेकडून या तांत्रिक कामाबद्दल दक्षिणेच्या रुपाने ते गाई बैल नाणी वगैरे फार धन मिळवीत. ब्राम्हण आणि क्षत्रीय ही नाती जरी त्यांत आलेली असली तरी आजच्यासारखी पोलादी थाटाची जातीभेदाची रचना त्यावेळी मुळीच नव्हती. स्पृशास्पृश्यता म्हणजे काय याचे स्वप्नही नव्हते. क्षत्रिय वर्ग हाच महत्वाचा वर्ग होता. आणि त्याच्यावरच या आर्यांच्या वसाहतीचे अस्तित्व आणि संरक्षण अवलंबून होते.

त्याकाळचे आर्य लोक केवळ निष्पाप होते हे म्हणणे दुराग्रहाचे आहे. ते

मनुष्यस्वभावाला सुटून आहे. किंबहुना अनैसर्गिक आहे, ऋग्वेदात भरपुर पुरावा आहे की त्यावेळी पुरुष व स्त्रिया अनैतिक मार्गानेही जात होते. जे आज ते त्यावेळीही चालले होते. ठकबाजी चोरी दरवडा व्यभिचार हे दोष त्यावेळीही होते. आर्यांची प्रार्थना केवळ संतती व संपत्तीसाठी होती.

पुढील काळांत जनकादी राजानी ब्रह्मज्ञानाचे जे दिव्यरत्न शास्त्रीय पध्दतीनें साऱ्या जगताला अर्पण केले त्या परमात्म ज्ञानाचा वास त्या कालच्या आर्यांना होता असें दिसत नाहीं.

दहाव्या मंडलात पुरूष सूक्तामध्यें या आत्मज्ञानाचीं थोडीशी छटा दिसून येते हीं गोष्ट खरी आहे. परंतु हा पुरूष सुक्ताचा भाग ऋग्वेदात मागाहून घुसटला आहे असे कित्येक पंडितांचें म्हणणें आहे. आणि ते आम्हालाहि संयुक्तिक वाटते.

कारण विराट पुरुषाचा दृष्टांत देताना देवाच्या पायापासून शूद्र उत्पन्न झाले, या कल्पनेचा नऊही मंडळात बिलकुलही संबध आला नसता, एकदम ही शूद्र शब्दाची कोती कल्पना कोठून आली हे कळत नाही.

हे पुरुष सूक्त अगदी अखेरचे आहे. जादू टोणा मंत्रतंत्र शकून-अपशकून, साप विंचवावर मंत्र, मृत पिशाच्यावर मंत्र, घुबड कपोत यांच्या दर्शनावर मंत्र सवतीच्या उच्चाटणावर मंत्र, हे मंत्र पाहिले म्हणजे आज आपल्याला आश्चर्य वाटते !

खरोखरीच या मंत्राच्या मार्गानें त्यांना इंद्र, वरूण अग्नी वगैरे देवता प्रसन्न होऊन त्यांचा कार्यभाग करीत होतें कीं काय ? भूत पिशाच्चें नष्ट होत होती कीं काय ? आणि वस्तुत: ती होतीं तरी काय ! असल्या मंत्राच्या उपायानें रोग परिहार होत होता काय ? याविषयीं आज कांही सांगता येणार नहीं. मात्र त्या सूक्तातील भाषा देवाना आळवणे वगैरे प्रसंगी त्यांच्या भावना अत्यंत उद्दीपित होत असत ही गोष्ट खरी दिसते. यावरून ते अत्यंत श्रद्धाळू मात्र होते याबद्दल शंका घेण्याचे कांही कारण नाहीं.

पुरुष सूक्तामधील शूद्र या शब्दाचा प्रथम उल्लेख आणि तांत्रिक मांत्रिक विद्येचा या साध्याभोळ्या लोकांमध्ये प्रवेश, याचे बारिक निरक्षण केले तर असे दिसते की या गोष्टी मागाहून घुसवलेल्या असाव्यात. जारण मारणादी प्रकार आणि अभिचार मंत्र हे अनार्य लोकांच्या अथर्व वेदापैकी आहेत. कालांतराने या मुळच्या अनार्य लोकांच्या संस्कृतीचा परिणाम आर्य लोकावर होऊन त्या लोकांना शूद्र ही संज्ञा दिली असावी. आणि त्या अनार्यांच्या चालीरीती आर्य लोकांनी स्वीकारलेल्या असाव्यात असे दिसते.

● ● ●

# ॥ धर्माधर्मांचे टवाळ ॥

तारीख १ जुलै १९२७

**देव आणि धर्म हीं मानवाच्या कल्याणार्थ आहेत :–** धर्मांच्या गर्भात देवाचे अधिष्ठान आहे. भक्तिभावांच्या पोटी देव आहे. सर्व धर्मात परमेश्वराच्या ठायी लीनता हेच धर्माचे प्रधान अंग आहे, त्या देवाला अनन्य भावाने शरण जाणे, यांतच नरदेहाचे सार्थक आहे.

**मनुष्यप्राणी स्वार्थाच्या मागे लागला. :–** खरा देव सुटला. भलत्याच मार्गांना खरे मानून अविचार आणि अनाचार करू लागला. आणि खरी भक्ती सुटत चालली. अशा वेळी कालाकालाचे ठायी आणि भिन्न भिन्न देशामध्यें सत्पुरुष निर्माण झाले. मनुष्य खरा मार्ग चुकत आहे, हे पाहून आपल्या बुद्धिप्रभावानें, चातुर्याने, तपोबलाने आणि योगसामर्थ्यांने आपल्या बांधवाना ते मार्गदर्शक झाले.

वैदिक ऋषीनी जगामध्ये सर्वत्र परमेश्वरांची स्वरूपे पाहिली. सृष्टीमध्ये शक्ती आहेत. त्या शक्तीपुढे ते लीन झाले. सूर्याची प्रभा, आकाशाची अगाधता, अनंत मार्गांनी वाहणारा वायु, अफाट भू भाग, या शक्ती देवाची वेगवेगळी स्वरूपे आहेत असे त्याना वाटले. प्रपंचात येणारी संकटे, आपत्ती, दुःखे यांचा परिहार करणारी शक्ती, या स्वरूपात खास असली पाहिजे अशी त्याना भावना झाली. त्याच्या पुढे पदर पसरून, करुणस्वरानें प्राचीन ऋषीनी जी हाक मारली आहे, तिचे खरे हृदय ऋग्वेदांच्या ऋचेत दिसुन येते ! आणि त्यांचेबद्दल आपल्याला कौतुक वाटते, व याबद्दल मनाला आश्चर्यही वाटते.

सामवेद हें नुसते गाणे आहे– ईश्वराला आळविण्याचे आलाप आहेत. ऋग्वेद आणि सामवेद याबद्दल आम्हांला कांहींच आक्षेप घेतां येणार नाहीत. परंतु पुढे स्वार्थाचा पगडा बसला. श्रेष्ठपणा मिरविण्याची हांव सुरू झाली. एकाचा पाडाव, दुसऱ्याचा द्वेष, तिसऱ्याचा मत्सर वाटण्यास सुरुवात झाली. यजुर्वेदातील त्या गुंतागुंतीच्या जाळचा, पशुयज्ञाचे अवडंबर, प्राणीवधाचा कसाईखाना, अथर्ववेदांतील जादूटोणा, मंत्रांचा छा छू, परक्याचे अज्ञानाचा फायदा आणि केव्हां केव्हां दुष्ट मार्गाचे अवलंबन, आणि नीच साधनाचा उपयोग, ही पाहिली म्हणजे तो यजुर्वेद व तो अथर्ववेद याचा मनाला किळस येतो ! आणि पुन्हा त्यांचे तोंडही पाहू नये, असे वाटू लागते. असें असता, पुराण मताभिमानी, पोकळ धर्माभिमानी, वैदिक कर्मकांडी लोक, स्वर्ग नरकाच्या बाता मारून, जनतेला पुन्हां या फंदात पाडण्याचे धाष्टर्य करितात; हे पाहून त्याची मना-

मनापासून चीड येते ! हे कर्मकांड म्हणजे धर्म नसून केवळ धर्माचे थोतांड आहे ! असे आम्हास वाटू लागते. आणि असल्या लबाड धर्माची बढाई मिरवून कोणी पुढे पुढे मिरवू लागला, तर त्याचा कपाळ मोक्ष करावा, असेंही विचार मनांत येतात. परंतु ही त्या गलिच्छ संस्कार धर्माची प्रेत यात्राच आहे, आमच्या म्हणण्याचा अर्थ इतकाच कीं, ऋग्वेदांतील साधा भोळा धर्म हा खरा धर्म आहे. त्यांतील मानवी आशा, वासना वगळल्या म्हणजे मनुष्याच्या शुद्ध अंतःकरणाचा तो शुद्ध विचार आहे, असें वाटते आणि संस्कारी अवडंबर धर्माचा वीट येतो.

संस्कार, आशा कर्म आणि साधने यांची परमावधी झालेली पाहून, आणि त्याचे प्राप्तीसाठी अत्याचारी हिंसा होत असलेली जाणून, जैनधर्माचा आणि बुद्ध धर्माचा उदय झाला. या धर्मानी अहिंसा तत्व प्रामुख्याने जगासमोर आणले. कर्मकांडाचा वैदिक धर्म उदो उदो करीत होता. त्यालाच गौतमबुद्धानी मुठमाती दिली ! येथपर्यंत ठीक झाले. बौद्ध धर्म तरी बिचारा या भरत भूमीतून नाहीसाच झाला. आचार्यांच्या मागून आलेले महाप्रतापी हिंदू कर्मवीर ( ! ) यांनी योग्यायोग्यतेचा विचार केला नाही. वाटेल तशी साधनें उपयोगांत आणली. आणि ज्या बुद्ध धर्मातील अलौकिक तत्वे पाहून, युरोप खंडातील विद्वान पंडित आज तोंडांत बोटे घालीत आहेत. त्या सांप्रदायाची पाठपुरवून, ऋषीचे वंशज म्हणविणाऱ्या भारतीय विद्वानांनी या देशात त्या धर्माचे नांवही राहू दिले नाही ! ज्या दिवशी बुद्ध धर्म आमच्या हिंदुस्थानांतून नाहीसा झाला, तोच दिवस आमच्या दुर्दैवाचा पहिला होय ! यापुढें आमची वाढ खुंटली, धर्मप्रसार बंद झाला. पुरोहिती दांभिक वर्गाचा वरचष्मा झाला. हिंदुधर्म कुपमंडुक बनला तो सावळा झाला. त्याला कोणाची सावली खपेनाशी झाली ! अपसांत लाथाफळीचा सुकाळ झाला. सतरांची तोंडे सतरा दिशेकडे झाली. मुळच्या हिंदुधर्माला आजचे हिडीस स्वरुप प्राप्त झाले !

असल्या छिन्नविच्छिन्न झालेल्या देशांत, फाटलेल्या घरांत, आडे मोडलेल्या इमारतीत, शत्रूंचा प्रवेश झाला. यांत नवल काय ? मुसलमानांनी हे मोडके घर पाहिले. त्यांची एकजूट तर आमची फाटाफूट. त्यांची एक जात तर आमच्या छपन्न जाती. ते कोणालाही आपल्यांत घेणारे, कोणाच्याही ताटांत बसून, आनंदाने जेवणारे, तर आमच्या इकडे चार पुरभय्यांत पांच चुली करून, तुसडेपणाचे प्रदर्शन करणारे. असल्या देशाला जिंकण्याला उशीर कशाचा ? हा हा म्हणतां सारा हिंदुस्थान त्यांनी जिंकून टाकला ! पण पुढें त्यांच्यातही धर्मभावनेपेक्षा धर्मवेडाचा जोर जास्त दिसू लागला. हिंदूच्या मूर्ती फोडणे, देवालयांचा नाश करणे. हे वेड नव्हे तर काय ? आणि हे वेडच त्यांच्या नाशाला कारण झाले.

गरीब सालस धार्मिक, क्षत्रिय मराठ्यांच्या मनोभावना, दुखविल्या गेल्या. आणि त्या दुखविण्यापासूनच मराठी बादशाहीची स्थापना झाली.

आज हिंदूनाही किंमत नाही. आणि मुसलमानानाही किंमत नाही. दोघेही एकाच घिरटीत पडले आहेत. दोघांनाही सारखे भरडण्यात येत आहे ! अजून डोळे उघडत नाहीत. एकाच्या देवळांतील मूर्ती दुसऱ्याच्या डोळ्यांत लसतात. एकाचे गायीचा वध दुसऱ्याला सलतो. कःपदार्थ गोष्टीबद्दल मनुष्य प्राण्याचे बळी पडतात. आणि त्या पवित्र रुधिराने भूमीमाता माखली जाते !

येशुख्रिस्ताचा धर्म किती शांतपणांत समोर आला. केवळ निरुपद्रवी धर्म सहनशीलतेने लोकांच्या मनांत भरू लागला. कोंन्या कोपऱ्यांत पडूं लागलेले बिचारे ख्रिस्ती सदाचरणांनें आणि लीनपणाने देवदयेस पात्र झाले. रोमन बादशहानीच त्यांना कडेवर घेतले! सारा युरोप एका ख्रिस्ती प्रेमाचे पाशात ओढला गेला. प्रयत्नाला फळ मिळाले. तिकडे अमेरिका तर इकडे हिंदुस्थान व्यापून, विष्णुचे त्रिपाद स्वरूप दाखवून, त्रिखंड किर्ती केली! कांही काल गेला. पण लौकरच तसल्या स्वच्छ धर्मालाही कीड लागली ! माझा येशूच तेवढा खरा तारक माझा आकाशातील बापच तेवढा खरा देव. बाकी झाडून सारे लोक नरकांत पडणार !" असल्या खुळचा कल्पना पवित्र येशु ख्रिस्ताच्या गळ्यांत आणि परक्याला बाटविण्याच्या ओंगळ मार्गाला ते लागले. मिळून आज कोणताही धर्म घ्या. जो तो म्हणतो ! " माझाच धर्म तेवढा खरा. आणि बाकीचे सारे खोटे. लठ्ठालठ्ठी सुरू झाली. आणि जगदवंद्य वैदिकऋषी गौतमबुद्ध महावीर शंकराचार्य, जीजस ख्राइस्ट, महमद पैगंबर, असल्या अवतारी पुरुषानी या पृथ्वीतलावर जन्म घेऊन, ज्ञानाचा दीपस्तंभ उभारला परंतु त्यांच्या दिवटचा अनुयायांनी हाती दिवटचा घेऊन, परस्परांची तोंडे भाजून काडली ! आणि साऱ्याच धर्मांची तोंडे काळी केली ! हा परिणाम लक्षांत घेऊन, आम्हो म्हणतो त्या धर्मांना फेकून द्या.

● ● ●

# एक वेद आज शक्य आहे काय?

ता. ३० सप्टें. १९२७

परवां पुणें सार्वजनिक सभेमध्ये श्री. चित्रावशास्त्री यांचे अध्यक्षतेखाली ना. जाधवराव माजी शिक्षण मंत्री यांचे व्याख्यान झाले. त्यांत सत्यसमाजाचे तत्वाबद्दल उहापोह झाला, व " एक वेद ग्रंथ " मान्य असावा किंवा कसे? याबद्दल चर्चा झाली. यावरून सुचलेले विचार आह्मी वाचकासमोर मांडीत आहोत.

एक राष्ट्र होण्याला अनेक कारणें आणि साधनें ठरलेली आहेत. त्यापैकी धर्म हे एक महत्वाचे साधन आहे. आणि याच हेतुनें आमच्या पूर्वजांनी आर्य ह्मटला कीं त्याला वेद ग्रंथ मान्य असलेच पाहिजेत असा निर्बंध घातला. हे समाज शास्त्राच्या नियमास अनुसरूनच झाले आहे. वेद हे फार प्राचीनचे आमच्या पुर्वजांचे विचार आहेत. त्यांत इतिहास आहे. ते आमच्या समाजाचे विश्वसनीय चित्र आहे. फार प्राचीन म्हणजेच तें सनातन आहेत. तें देवाच्या प्रत्यक्ष मुखाचे उश्वास आहेत, म्हणजे अपौरुषेय आहेत, किंवा पौरुषेय आहेत. या वादाचे आज प्रयोजन नाही. इतकी गोष्ट खरी कीं, निदान पांच हजार वर्षा पूर्वीचे आमच्या राहणीचे ते लेख आहेत. असा जुना ग्रंथ अर्थातच सनातन धर्म ग्रंथ मानला जावा हे योग्य आहे. आणि त्याप्रमाणें तो मानला गेलाही. आणि त्या धारणानेंच आर्य संस्कृती आज तागायत चालत आली आहे.

त्या कालचे वेदाचे स्वरूप आणि त्याचा सामाजिक हेतू पुढे पाळण्यात आला असता, तर त्याबद्दल तक्रार करण्यास फारशी जागा राहिली नसती. त्या ग्रंथाचे ज्ञान सर्वांना असावे. सर्वाचा त्यावर वडलार्जित इष्टेटीप्रमाणें समान हक्क असावा. या हेतूस धरून पुष्कळ काळ ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य या तिन्ही वर्णांना वेदाचें मुक्तद्वार होते. कोणालाही मना नव्हती. दुसरीही गोष्ट लक्षात ठेवणें-सारखी आहे कीं, समाजाची धार्मिक सत्ता किंवा श्रेष्ठत्व अगर केंद्र एखाद्या वर्गात आणून ठेवले, तर त्या मध्यवर्ती सत्तेच्या जोरावर समाजाची सारखी प्रगती होत राहील. या कल्पनेने समाजाने, ब्राम्हण वर्ग हा धार्मिक सत्तेचा केंद्र (सेंटर) म्हणून मान्य केला. यांच्याकडे विशेषतः हेच काम ठेवले. ब्राम्हण वर्गाला धार्मिक श्रेष्ठपद देण्यात आले. ते काही निष्कारण दिले नाही. तो काही जन्मासारखा " चान्स " नव्हता. जन्माचा आणि श्रेष्ठ-पणाचा कांही संबंध ठेवला नव्हता. त्या कालचा आमचा ऋषी वर्ग इतका गुणवान आणि कडकडीत कर्मवान होता की, त्या गुणावर त्यांना समाजात शोरवी येणे भागच होते. ॥ शमो दमः तपः शौचं शान्तिः आर्जवं ज्ञानं विज्ञानं ॥

असल्या गुणानी ते युक्त होते आणि म्हणूनच त्यांना ब्रम्हज्ञ हे पद प्राप्त झाले होते. पूर्ण वैराग्य, पराकाष्ठेचा निस्पृहपणा, निर्लोभता आणि समदृष्टी असल्या गुणांनी ते मंडित होते. त्या आमच्या पूर्वजांची किर्ती भरतखंडात तर काय, परंतु साऱ्या दुनियेभर आज तागायत दुमदुमून राहिली आहे ! असली उदाहरणे इतर कोणत्याही देशात ग्रीक, रोमनांकी संन्यास वृत्तीचे "स्टोइक" लोकामध्ये-सुद्धां पाहणेस मिळत नाही ! असल्या लोकांचे हाती वेद होते. असल्या लोकांच्या हाती धार्मिक मुख्य सत्ता होती. म्हणून आमच्या समाजाचे धारण, पोषण आणि प्रगती त्या कालात होत गेली.

परंतु ते दिवस गेले! गुणकर्माची थोरवी बाजूस राहिली. बापके बेटे म्हणून जन्मावरच थोरवी ठरूं लागली. वास्तविक गुणकर्माच्या अधिकारावर वर्ण ठरल्या नंतर, मग संस्कार करायचे, त्या ऐवजी केवळ जन्मावरच वर्ण ठरून संस्कारही होऊं लागले ! अशी उलटीगती समाजाला प्राप्त झाल्यावर गुण कर्माची जरूर काय ? गुण नसतांनासुद्धां आणि काही कर्म केल्याविना पदव्या मिळूं लागल्या, तर गुण आणि कर्म ही दगदग कोणी कां म्हणून करावी ?

समाजाची मूळची घडी बिघडली. प्रगती खुंटली. ब्राम्हणाचे वैराग्य गेले. निस्वार्थपणां एका बाजूस राहिला. शुक, याज्ञवल्क्य यासारखे माझे आजे पणजे होते, याच आधारावर गुरुवर्ग थोरपणाचा हक्क सांगू लागला ! बाकीच्याना तुच्छ मानू लागला. विशेष वर्णाला विशेष संस्कार ठरवून दिले. यामुळे वर्गा-वर्गातील सलगपणा नष्ठ होऊन वेगवेगळे अलग संघ निर्माण झाले. याज्ञिकी बोकाळली ! पुरोहित वर्गाला ऊत आला. दक्षिणा उपटण्यासाठी ( ज्ञानकोश–विज्ञानेतिहास ) संस्कारांची नवी नवी जाळी तयार केली ! संस्कार धर्म म्हणजे एक मोठे "खेंकटेच" उत्पन्न केले. आपला बडेजाव वाढण्यासाठी इतर वर्गाना वेदाचे मार्गच बंद करून टाकले. या वेळेपासून समाजांत बिस्खळितपणा उत्पन्न झाला. ज्ञान, विज्ञानहीन ब्राम्हण वर्ग आपल्या पूर्वीच्या भांडवलाबरच श्रेष्ट म्हणवून घेऊं लागला. एकमेकांत प्रेम नाही. संबंध नाही. गोडी नाही. उच्चनीच–पणाचे कंटाळवाणे संबंध पुढें आले. आणि समाजाचा ऱ्हास दत्त म्हणून पुढें उभा राहिला.

साऱ्या हिंदु समाजाचा "एक वेद" हा धर्मग्रंथ असावा. ही कल्पना चांगली दिसते. परंतु आम्हांला अत्यंत कठीण वाटतें. आज या देशाची रचनाच उलटी झाली आहे. खाली डोकें वर पाय 'टॉप्सीटर्व्ही' झाली आहे ! कशी ती पहा. तीस कोटी लोकांपैकी १० कोट मुसलमान आहेत. ते तुमच्या वेदाला कवडीचीही किंमत देणार नाहींत. ते आपले कुराणच आपल्या पोटाशीं घट्ट

धरून बसणार. उरला वीस कोट हिंदु. पैकीं सात कोटी अस्पृश्य आहेत. त्यांना ज्ञानच बंद केल्यामुळें आज त्यांची गणना पशु कोटीतच आहे असे म्हटलें तरी चालेल. ते अक्षर शून्य. वेद हा पदार्थ काय आहे. याचें त्यांना स्वप्नही नाहीं ! बाकीचा समाज स्पृश्य गणला आहे. पैकी जैन हे वेदबाह्यच आहेत. ब्राम्हणेतर वर्ग, क्षत्रिय, वैष्य, माळी, कुणबी वगैरे हाही वेदा बाबतींत तितकाच शहाणा ! वेद जाणण्याची त्यांचें अंगी कुवतच नाहीं. ब्राम्हण वर्ग सारा मिळून सुमारें पाऊण कोटी येईल. हा शहाणा सुर्ता खरा. परंतु एक नंबरचा अप्पल पोटचा ! याला वेद ज्ञान नाहीं. आणि विज्ञानही नाही. यांनी वेद पूर्वीच टाकून दिलेले आहेत. जगाच्या नियमाप्रमाणें, दुसऱ्याचे नुकसान करतांना यांचेच नुकसान झाले आहे ! " ब्राम्हणेतरांना वेदाचा अधिकार नाहीं. " असा कंठशोष करतां करतां यांचेच वेदाचें ज्ञान नष्ट झाले ! ब्राम्हण गृहस्थ तर राहोंच. पण चांगले जोशी, पुरोहित, उपाध्ये म्हणवून घेणारे यानाही वेद नको झाला आहे ! यांची आणि वेदाची फारकत झाली आहे ! वेद पारंगत ब्राम्हण माणूस आज दहा हजारांतही मिळणारा दुर्मिळ ! तो या नादी लागतो कशाला ? यांची ज्ञानधन परंपराच सुटली. व्यापारहाट, नोकरी चाकरी, सेवावृत्ती करावी आणि " संभावित " पणाने पोट भरावे, हा या वर्गाचा " लोकमान्य धर्म " झाला आहे. अशा स्थितींत ऋग्वेद हातीं घेतो कोण आणि तिकडे लक्ष देतो कोण ?

ब्राम्हण वर्गांचा वेदाबद्दलचा अभिमान आमचे मते केवळ पोकळ आहे ! ती एक नुसती " मिजास " आहे. सनातन धर्माचा खोटा आव आहे. याबाबतीत ब्राम्हणेतर आणि ब्राम्हण यांची पायरी सारखीच आहे. आमच्या या विचित्र कालांत आणि समाज रचनेंत " एक वेद " ग्रंथ कोण मान्य करील ? आम्ही या विधानानें वेदाविरुद्ध लिहीत आहोत. किंवा वेद ग्रंथाबद्दल आमचा आदर कमी आहे, अशी गोष्ट नाही. मुद्दा इतकाच आहे की, आजच्या या स्थितीत बायबल अगर कुराणाप्रमाणे ऋग्वेद हा प्रत्येक हिंदुचे हातात धर्मग्रंथ म्हणून देता येईल किंवा कसे ? हे ठरविणे मुष्किलीचे आहे. ऋग्वेद हा संशोधकाचा आवडीचा विषय असू द्या. परंतु घरोघर तो पवित्र ग्रंथ म्हणून रोजच्या वाचनांत येणे आम्हाला अशक्य कोटीपैकी दिसते !

सत्यसमाज मत तर स्वतंत्र विचारांचे आहे. सर्वच धर्मात त्याला सत्य दिसते तो कोणाचाही अपमान करूं शकत नाही. मात्र अमुकच एक ग्रंथ देवाचा लाडका, आणि तोच गळचात अडकून घेतला पाहिजे. अशी सक्ती तो कोणावर करीत नाहीं. सर्व पवित्र ग्रंथ देवाचे आहेत. वाटेल त्यानें वाटेल तो आवडीने वाचावा. त्यास कोणाची मना असू नये. " सार्वजनीक सत्यधर्म " या पुस्तकात म. जोतीराव फुले यांनी जी मतें प्रगट केली आहेत, ती याच अर्थाची आहेत.

अशी आमची समजूत आहे. सत्यसमाजामध्ये वाटेल त्या धर्माचा इसम येऊ शकतो. त्याला धर्माची आडकाटी नाही. सत्य, मग ते कोठेही असो, हाच त्याचा धर्म आहे. वेद ज्यांना मान्य नाहीत, असे जैन ग्रहस्थही या समाजाचे मेंबर आहेत. त्यांना " एक वेद " ही कल्पना कशी पटणार ? धर्मग्रंथ हे पवित्र वङ्मय आहे. वाटेल तो मेंबर वाटेल तेव्हां वाटेल तो ग्रंथ आवडीनें व प्रेमानें वाचील. सर्व ग्रंथात देव आहेच. मग अमका एक ग्रंथ सत्यसमाजाच्या मेंबराच्या गळी कसा बांधता येईल ? सारेच धर्म त्याचे आहेत आणि तो सर्व धर्माचा आहे. ' असत्य, विषमता, भेदाभेद, ' याचा मात्र तो शत्रू आहे. या दृष्टीनें पहातां, " एकवेद " ही कल्पना सत्यसमाजाचे मेंबराला रुचेल असे वाटत नाही.

● ● ●

# सातवळेकरांचा धर्म व त्यांची दृष्टी

३ मे १९२९

## ही तुमची परंपरा

महाभारत अनुशासन पर्वामध्यें एका क्षत्रिय राजाने आपल्या राणीचे एका भटाला शय्यादान केले. आणि त्या पुण्याईचे मार्गाने तो राजा स्वर्गाला जाऊन पोचला ! या कथा वाचल्या म्हणजे त्या ब्राम्हण वर्गाची आणि त्या भिक्षुकी धर्माची चीड आल्यावाचून कोणास राहील ? आज त्या महार मांगाना मनुस्मृतीच्या द्वारे हुकमत चालवून कायद्याने बद्ध करुन टाकलेले सांप्रदाय, असेच ठेवायचे कीं काय ?

## आणि शाहूंचे कोल्हापूर पहा

पूर्वी भोजनामध्ये शुद्ध सोवळे ब्राम्हण, जैन, सारस्वत, क्षत्रीय, मराठे, कुणबी, सुतार, गवंडी, न्हावी, महार, मांग, चांभार, ढोर, मुसलमान, ख्रिस्ती आणि भंगी सुद्धा पावणे दोनशेहे मंडळी द्वैतभाव विसरून भोजन करीत होते. आणि महार मांग सर्वांना वाढत होते. आजपर्यंत करवीरात ब्राम्हणशाहीचा संबंध होता तेव्हां उच्च वर्गाला मानकरी आणि इनामदार याला कचेरीतील एखाद्या कारकुनाची भेट घेण्याची तर, एखाद्या बंदिवानाप्रमाणे हात जोडून लपत छपत मोठ्या मिनतवाराने मुंगीच्या पावलाने कचेरीतील जाजमावर यावे लागत

असे ! ती स्थिती आज अगदी पालटून गेली. सर्व जातीची बोर्डिंगे करवीरात दिसत आहेत. ही गोष्ट पाहून जातिद्वेषामुळे तुमच्या डोळ्यातून मात्र रक्ताचे अश्रू निघाल्यावाचून राहाणार नाहीत. तुमच्या भिकारड्या संस्कृतीमुळे उच्चनीच पणा व गुंठित चातुवर्णामुळे द्वेषाची रेलचेल झालेली, वरील प्रकार पाहून तुम्हाला धडा घ्यावा असे वाटेल. हे सर्व काम सत्यसमाजाने केले.

सातवळेकर आम्हाला विचारतात कीं सत्यसमाजाकडून एक तरी चांगलीगोष्ट झाली आहे काय ? आम्हाला वाटते तुम्ही वेड पांघरून पेडगांवला जात आहात. निःपक्षपातीपणाचा आविर्भाव खूप घेतला आहे. परंतु पक्षपातात तुम्हाला कोठेच कांही दिसत नाही. कोल्हापुरात तुम्ही अनेकवेळा आला आहात. येथील अस्पृश्य वर्गाची स्थिती तुम्ही अनेक वेळा पाहिली आहे. त्यांची बोर्डिंगे शाळा शिक्षणाची दिशा, त्यांच्या समाजामध्यें दर्जा कसा कसा वाढत आहे हे तुमच्या मार्गात आल्यावेळी कनीनिका मुद्दाम बंद ठेवल्या होत्या काय ? कोणत्याही कचेरीत कोणत्याही सभेला कथा किर्तनाला आज या अस्पृश्य वर्गाला कोठेही जाण्यास मना नाही. वकीलीचा धंदा सरकारी नोकऱ्या, पोलीस स्वार अशा जागेवर आणि न्याय खात्यात सुद्धा महार चांभार, ढोर, मांग, परिट, न्हावी या लोकाना ब्राम्हणाचे बरोबर गादीस गादी लावून काम करीत असलेला पाहून तुमच्या-सारख्या ब्राम्हणाना या नवखंड पृथ्वी, आणि दहाखंड काशी, सात समुद्र वेष्टित जंबु द्वीपावर एक अद्भूत चमत्कार चाललेला आहे असे दिसेल. महालक्ष्मीचे देवळात ब्राम्हण आणि ब्राम्हणेतराची मुक्तद्वार प्रसंगी एक पंगत पडलेली पाहून तुमचे डोके ठिकाणावर राहणार नाही ! आणि परवाच घडून आलेल्या सत्य-समाज मंदिरा समोरील मैदानातील सहभोजन पाहून तर तुमचे देहभानच जाग्यावर राहाणार नाही ! ब्राम्हणी संस्कृतीचे पोवाडे गाणारे, चातुवर्ण्याचे उठता बसता अवास्तव स्तोम माजवणारे आणि बेडकाप्रमाणे बडबड करणारे वैदिक भटजी यानी तुमच्या वेदाचे रक्षण केल्याची शिफारस करणारे उच्चवर्णीय ब्राम्हणानी तो सत्यसमाजातील सहभोजनाचा प्रसंग पाहून डोक्यात राख घालून पळता भुई तुम्हाला थोडी झाली असती !

सातान्यास जाऊन पहा. भाऊ पायगोंडा पाटील यानी सत्यसमाजाचे तत्वास अनुसरून जातिभेद विरहित बोर्डिंग चालू ठेवले आहे. सर्व जातीचे विद्यार्थी स्वाभाविक बंधुभावाने सत्यधर्मीच्या पायावर नवा इतिहास रचत आहेत. अशा एक कीं दोन, शेकडो संस्था सत्यशोधकाने चालवल्या आहेत. आणि जोमाने ते पुढही चालवतील.

'सत्यशोधकी अत्याचाराची' पुरुषार्थ कारानी उदाहरणे दिली असती म्हणजे बरे झाले असते. ती त्याना मिळाली असल्यास कोण जाणे ! आमच्या

इकडील शेकडा नव्वद उदाहरणामध्ये ब्राम्हणांची द्वेषबुद्धी मराठ्या विरूद्ध स्पष्ट दिसून येते. येथील न्यायालयासमोर कांही अत्याचाराचे प्रकार आले होते खरे. एका ब्राम्हणाने मासाचा तुकडा शेजारच्या ब्राम्हणाच्या घरी टाकून पलीकडील सत्यसमाजी मराठ्यावर आळ घालून, ब्राम्हणाच्या घरी मास टाकले म्हणून फिर्याद झाली होती. हे सर्व स्पष्ट कोर्टासमोर पुराव्यात येऊन सत्यसमाजीयन आरोपी सोडण्यात आला. मॅजिस्ट्रेट ब्राम्हणच होते.

कांही ब्राम्हण सावकारानी आपल्या गरीब कुळाना चेंगरून टाकले ! त्याने असल्या सावकाराच्या कचाट्यातून सुटका होण्यासाठी जमीनीत औते घातली. सावकाराने सत्यसमाजाविरूद्ध उगाच कांगावा केला. जळिताची उदाहरणे सत्य-समाजाचा इकडे जन्म होण्यापूर्वी पुष्कळ घडून आलेली आहेत. शिरोळ पेट्या-पैकी हेरवाड गांवी एका सावकाराचे घरावर त्यांचेच रॉकेलचे डबे ओतून पेट-वून दिलेले उदाहरण आमच्या आठवणीत आहे. तेव्हा सत्यसमाजाचा येथे माग-मूसही नव्हता. सत्यसमाजावर आक्षेप घेताना आपला ब्राम्हण वर्ग अगदी धुतल्या मोत्यासारखा स्वच्छ आणि गोगल गाईसारखा गरीब आहे असे गृहीत धरून चालायचे ही भिक्षुकी विचाराचीं दिशा आहे.

## सत्यशोधकी तमाशे–

एक मोठा आक्षेप उच्चवर्गाकडून नेहमी येत असतो. की सत्यशोधकी तमाशामध्ये ब्राम्हण वर्गाची चेष्टा केलेली दिसून येते पण यात वावगे काय आहे ? उच्च संस्कृतीच्या ब्राम्हणी नावाखाली त्या समाजात जे हास्यास्पद निंद्य घाणेरडे प्रकार आज चालू दिसत आहेत त्याचे प्रदर्शन या तमाशातून होत असते. तो ब्राम्हण विधवांचा प्रकार, विधवांच्या वपनाचा प्रसंग ! तीन ताल उड्या मारत सोवळ्याच्या देवाव्याने रस्तेबंदी करीत निघालेला भिक्षुक पाहून कोणाला हसू येणार नाही ? आजवर ज्ञानाच्या शिखरावर चढून डोके ढगामध्ये खुपसले ! समाजात गोंधळ घातला. चातुर्वर्ण्याचा प्रयोग अयशस्वी ठरला. जातिभेदामुळे राष्ट्रीय दृष्टी नष्ट झाली. इतके होऊन सुद्धा ब्राम्हण वर्गाची दृष्टी उघडत नाही ! तेव्हां ब्राम्हणेतर वर्गाला आपली सुधारणा आपल्या शिरावर घेणे भाग पडले. भिक्षुकी संस्कृतीनें इतर वर्गाची मने गुलाम वृत्तीची बनून गेली !

याला उपाय एकच. ब्राम्हणेतर वर्गाला ज्ञान देणे आणि ब्राम्हण वर्गाबद्दल जो भलताच पूज्य भाव ब्राम्हणेतराचे मनामध्ये साठून राहिला होता त्याची हाकलपट्टी करणे. ब्राम्हणेतराना आत्मविश्वासची दिक्षा देणे आणि ब्राम्हण वर्गाला स्पष्टपणे सांगणे की तुमची संस्कृती अत्यंत हलक्या प्रतीची आहे. वेदातील

समाजरचनेस सुटून तुम्ही देश घातक संस्कृती सुरू केली, चातुर्वण्य किंवा जातिभेद या संस्था निसर्गाच्या घरी रुजू नाहीत. मानव जातीचा उपमर्द करणाऱ्या आहेत. हे डोळयाना पहात असून ब्राम्हण वर्ग डोळे झाकून स्वस्थ बसला आहे. 'देश रसातळी गेला' ही हाक प्रथम ब्राम्हणवर्गाने मारली! पण ती केवळ आपल्या पुरतीच होती. इतरासाठी नव्हती. इतरानी ते काम आपले हाती घेतले. नांगर कुळप मारून समता प्रस्थापित करण्याचे काम मागासलेल्या लोकानी सुरू केले. ही गोष्ट या घमेंडानंदास खपेना. त्यापैकीच एक पुरुषार्थकार आहेत आणि त्यानी या मागासलेल्या चळवळीत शुद्ध द्वेश आहे असली खोटी समजूत करून घेऊन सत्यशोधकी लोक धर्माचे शुद्ध पायावर काम चालवीत नाहीत अशी ओरड चालविली आहे. आणि हा समाज द्वेषाचे पायावर उभा राहिला आहे. असा कांगावा करीत आहेत.

• • •

# ऋग्वेदात मूर्तिपूजा नाही.

२८ जाने. १९२९

ऋग्वेदात मूर्तिपूजा मुळीच नाही. अर्थात देवालये मुळीच नव्हती. लिंगपूजा ही आर्यांची नव्हे. ती पूजा मूळ अनार्यांची. लिंगपुजकांचा, हे आर्य लोक मनापासून अगदी तिटकारा करीत. परंतू जगात कोठेही न दिसून येणारा चमत्कार या हिंदुस्थान देशात घडून आलेला आहे. वैदिक कालाच्या ऋषीचा धर्म आणि संस्कृती ही पाहिली आणि आजची हिंदु म्हणवून घेणाऱ्यांची संस्कृती, धर्म, आचार विचार पाहिले तर भयंकर क्रांति झालेली दिसून येते. आणि पुर्वग्रह बाजूस ठेऊन केवळ निस्पृहपणाने विचार केला तर असेही दिसून येईल कीं या देशातील मुळच्या अनार्य लोकांवर प्राचीनच्या आर्यानी आपल्या संस्कृतीचा छाप घातला कीं, मुळच्या अनार्य संस्कृतीच्या जोराखाली ते दडपून जाऊन निरुपायास्तव त्या अनार्याची संस्कृतीच या आर्याना पत्करावी लागली! म्हणजे आजच्या आर्याना आर्य म्हणण्यापेक्षां अनार्यं म्हणणेच भाग आहे. असे आम्हास तरी वाटते. या मताबद्दल कित्येक लोक आम्हाला अभिमान शन्य असे म्हणतील. हिंदुधर्माभिमानशून्य असेही म्हणतील पण इलाज नाही. ऋग्वेदकालाचे ऋषीलोक अग्नीकुंडात आहुती टाकीत आणि मंत्रद्वारे इंद्र वरूण अश्वनि इत्यादी देवताना, सोमरसाच्याद्वारे खेचून आणून यश धन धान्य संपादन करीत असलेले वाचले

म्हणजे ती परंपरा चालवीत आहोत असे म्हणणारे आजचे ब्राम्हण हे खरोखरी आर्य आहेत कीं, अनार्य आहेत, हे ओळखतांना आमची बुद्धी बुचकळचात पडते. आजच्या मुर्ती त्या काली नव्हत्या. देवालये मुळीच नव्हती, लिंगपूजा अर्थात शैव पंथ त्या आर्यांना त्याज्य असतांना तद्रुप शंकर देवतास आमच्या देवतामध्ये आज प्रधान स्थान मिळवीत आहे. यज्ञमार्ग आज नष्ठ झाला आहे. आणि स्वामी दयानंदजीच्या कटचा अभिमान्यांनी आर्य समाजाने कंठशोष करून जरी व्याख्याने दिली तरी त्या कालाची राज्यपद्धती आज सुरू होईल ही कल्पनाही करणे अविचाराचे होईल

ऋग्वेदामध्ये श्राद्ध नाही, पक्ष नाही, पितृपूजा दिसत नाही. तसेच ज्या कल्पनेवर हिंदूतत्वज्ञानाची इमारत उभी आहे त्याची व्यवस्थित मांडणी कोठे जाहलेची दिसत नाही. ऋग्वेदकाली पशुयज्ञ, अश्वमेध या गोष्टी चालत असत, या प्रश्नासंबंधी आमचा आर्यसमाजियन काही लोकांचा वाद झालेला आहे. त्यांचे म्हणणे वेदकाली पशुयज्ञ मुळीच नव्हता. आम्ही ऋग्वेद काळजीपूर्वक पाहिला त्यातील काही सूक्तावरून हे प्राचीन आर्यलोक पशुचा यज्ञ करीत होते. त्याच्या मांसाच्या आहुती यज्ञामध्ये इंद्र वगैरेना अर्पण करीत होते या गोष्टी निर्विवाद दिसून येतात.

त्या वेळचे ऋषीलोक मनाने साधेभोळे श्रद्धाळू असे होते असे दिसते. शकुनावर वगैरे त्यांचा विश्वास होता, आणि अपशकुन झाल्यास शांतीसाठी ते देवाची प्रार्थना मंत्रद्वारे करीत असत. ऋग्वेदातून सोमरसाचा उल्लेख वारंवार आणि पदोपदी आढळून येतो, ही एक वनस्पती असते. हिमालयातून काही ठिकाणाहून ती आणीत असत. ती दगडानी चेचून तिचा रस काढीत. लोकरीच्या वस्त्रातून तो गाळीत. आणि दूध वगैरे घालून आवडत्या इंद्राला तो अर्पण करीत असत. हा सोमरस इंद्राचे अत्यंत आवडते पेय दिसते, ते मनसोक्त पिऊन आनंदाने आणि त्याच्या कैफाने इंद्र बेफाम होऊन जाई. मग तो आपल्या भक्तांना वाटेल ते देत सुटे. आणि आर्यांच्या शत्रुचा तो फडशा पाडीत असे, हा सोमरस ही खरोखर कोणती वनस्पती आहे. त्याचा आज बरोबर शोध होत नाही, युरोपियन पंडीत आणि इकडील शास्त्रीलोक यांच्यामध्ये या सोमवल्लीबद्दल फार मतभेद आहे. ताग आंबाडीसारखी ही औषधी असावी, कोणी म्हणतात तो भांग गांजा असावा, कोणी म्हणतात दारू सारखे ते एखादे मादक द्रव्य असावे. ही वस्तु अमुक असावी हे निश्चितपणे आज सांगता येत नाही. वनस्पती शास्त्रज्ञ या सोमवल्लीबद्दल निर्वीवादपणें काहीच सांगण्यास तयार नाहीत, अशी स्थिती आहे. मात्र ऋग्वेदाचे सर्व मंडळातून या सोमवल्लीचे वारंवार वर्णन फार गौरव पूर्ण असे केलेले आहे. मात्र आज या वनस्पतीचा काहीच पत्ता लागत नाही.

## ब्राम्हणी पत्रे व हिंदुसंघटनावाले

१८ मे १९२८

भिक्षुकी शुद्धी चळवळ आता पुरे झाली. पूर्वी राजेलोकाजवळ कांही पंच हत्यारी नोकर असत. त्याना पगार भला मोठा असे. कामगारी मात्र चुकून केव्हां तरी येई. बाकी बारा महिने हे पंच हत्यारी नुसते तैनातीला हजर राहत असत. परंतु केव्हां तरी आणिबाणीचा प्रसंग येई. त्यावेळी मात्र हे नोकर इकडे तिकडे बिलकूल न पाहता जिवाचीही परवा न करता, राजाची सेवा करीत. या त्यांच्या ऐन प्रसंगाच्या चाकरीमुळे ते लोकांना प्रिय असत. बाकी सारे दिवस त्यानी बसून पगार खाल्ला तरी त्याचे दुःख होत नसे.

बोलक्या सुधारकाना केवळ बोलून भागत नाही. त्यांची भाषणे व्याख्यानें काहीं दिवस लोक ऐकतील परंतु केव्हा तरी प्रत्यक्ष अंग मोडून काम करावे लागते. स्वार्थ बाजूला ठेवावा लागतो. 'माझे भाऊबंद मला काय म्हणतील' हा विचार बाजूला फेकावा लागतो. असले प्रसंग मात्र आल्याशिवाय राहात नाहीत. आणि असल्या प्रसंगी जर त्यानी दगा दिला तर ते दिखाऊ सुधारक केवळ बोल घेवडे आहेत, दगलबाज आहेत. घातकी आहेत. असा परिणाम लोकांचे मनावर झाल्याखेरीज राहाणार नाही

आजच्या शुद्धी चळवळीच्या आणि संघटनवाल्यांच्या म्होरक्यांची हीच अवस्था झाली आहे. आम्हाला राहून राहून आश्चर्य वाटते कीं, ही शुद्धी चळवळीची लोखंडी चळवळ कांकणासारख्या तलख भिक्षुकानी हाती कशी घेतली ? कांही तट्टे अशी असतात, कीं त्यांचे पाठीवर नुसता हात ठेवला तरी ती चौफेर दुगाण्या झाडीत सुटतात. आज कालच्या सोवळ्या ब्राम्हणाना इतर कोणी नुसता हात लावला तर ते ब्राम्हण तीन गोलांट्या घेतील ! चुकून इतर कोणत्या जातीपैकी कोणाचे हातचे पाणी पोटात गेले तर एरंडेलाचा जुलाब घेतल्याप्रमाणे त्यांची स्थिती होते ! आणि कोणा ब्राम्हणेतरांचे घरचे शुद्ध धान्याचे पक्वान्न गळयाखाली उतरले तर हगवण, अतिसार होतो, किंवा स्पर्शजन्य विकार होतो. आणि त्या ब्राम्हणाला ४/६ महिने तरी आंथरुणाला खिळून पडावे लागते ! असल्या नाजुक प्रकृतीच्या थकलेल्या पोटाच्या आणि भागलेल्या आतडीच्या ब्राम्हणाने शुद्धीचा आणि संघटनेचा प्रश्न हाती घ्यावा हे काय गौड बंगाल आहे? असे वाटून सामान्य माणूस अगदी बुचकळयात पडतो.

परंतु या विषयात जरा आत शिरून पाहिले, म्हणजे यात आरपार ब्राह्मणी कावा आहे असे खास दिसू लागते. ब्राह्मण वर्ग खोटया धर्म कल्पनेने जो

एकदा घसरगुंडीला लागलेला आहे, ती आजवर तशीच चालू आहे. सनातन आर्य धर्म याच भिक्षुक वर्गाने जरी साफ बुडवून टाकला आहे. तथापी त्यांचा पोकळ अभिमान मात्र सुटत नाही. आणि अंगात कुवत नसतानाही गुरूपदाची हाव आणि महत्वाकांक्षेची धाव सुटत नाही. राजकीय बाबतीत प्रथम प्रथम त्यांनी तोंडची आघाडी मारली. परंतु आजपर्यंत कमी मानलेला ब्राह्मणेतर बरोबरीला येत आहे हे दिसताच, ब्राह्मणानी पगडी फिरवली, आणि जे इंग्रजा-विरूद्ध मांड थापटून सामन्याला उभे राहिले होते, त्यांनी त्यांचीच आता पाय-धरणी करून ब्राह्मणेतराना ढकला ढकलीचा मार्ग पतकरला आणि राजकारणात पक्षोपक्षांच्या चिंध्या घालून विचित्र गोधडी तयार केली !

जो गोष्ट राजकारणाची तीच धार्मिक आणि सामाजिक विषयाची ! आजवर बरीच वर्षे ब्राम्हणानी सामाजिक सुधारणेची कोल्हेकुई केली पण आता आम्हाला दिसू लागले की ती त्यांची सामाजिक सुधारणा एका ब्राम्हण वर्गापुरतीच होती. त्या पलीकडे एक मोठा बहुजनसमाज जगात आहे ही त्याना कल्पनाही नव्हती. पण कालाचे ओघात तो बहुजन समाज आज आपले डोळे उघडू लागला आहे. त्यांचे अंगावर उच्च ब्राम्हण वर्गाने अज्ञानाचे मेंढरी पांघरूण घातले होते. डोळे उघडले नसल्यामुळे ब्राम्हणेतराना आजवर वाटत होते की आपला दर्जा देवानेच कमी केला असावा, आपली पायरी वेगळी, आपण त्यांच्या बरोबरीचे आहोत किंवा त्यांच्या बरोबरीचे हक्काची मागणी करू ही गोष्ट देवालाच रूजणार नाही.

ब्राम्हणाच्या विशेष हक्काला नुसता स्पर्श करणे म्हणजे मोठे पातक आहे. धर्माचे बाबतीत ब्राम्हण सांगतील ते देवाचे शब्द, ते करतील ते कर्म, सांगतील तो मुहूर्त आणि दाखवतील ती दिशा. देवा पुढे प्रकार हाच. दीड दमडीचा पुजारी असेना का, सांपत्तिक दृष्टीने बुद्धिमत्तेने किंवा नैतिक दृष्टया त्याचे पूर्ण बारा वाजले आणि भरपूर दिवाळे निघाले असले तरी हरकत नाही. देवापुढे तो उभा राहिला की साऱ्या देवालयात त्याचे पूर्ण साम्राज्य ! आणि अप्रतिहत बादशाही. ब्राम्हणाच्या तोंडून निघालेला शब्द म्हणजे वेदवाक्य. त्याचे वाक्य म्हणजे मनुस्मृतीचा श्लोक आणि त्याचा आवाज म्हणजे मूळ ओंकाराचा ध्वनीं !

आज नरसिंहवाडीला काय चालले आहे ! वाडी साऱ्यांची. दत्तात्रय सर्व हिंदू लोकांचा. देणगी राजाची, भक्तिभाव भाविक ब्राम्हणेतरांचा. दक्षिणा साऱ्या मुलखाच्या, पंचपक्वानांची चंगळ मात्र पुजाऱ्यांची ! प्लेग असो दुष्काळ असो, पुजाऱ्याना त्यांची पर्वा नाही. त्याच्या घरी मनमुराद मिष्टान्न ! अशी स्थिती आज शेकडो वर्षे चालली आहे. आम्ही पुजाऱ्यांची हेवा करीत नांही. ते अखंड

मनमुराद तुडुंब भरले असोत. ते भाग्यवान आहेत. आमचा प्रश्न इतकाच ? की प्रेमाने भक्तिभावाने श्री दत्तात्रयाला आम्हाला भेटू द्या. त्यांचे चरणी मस्तक ठेवण्यास तुम्ही हरकत करू नका. या वाचून आमची दुसरी मागणी नाही. खाल्या मिठाला जागा. आमचेच खाऊन आमचा उपमर्द करू नका. ही आमची विनवणी आहे. आणि ती गुण्या गोविंदाने ऐकण्याचा काल आता आला आहे. वहिवाटीची सबब सांगू नका. नव्याण्णव पाचे केली म्हणून शंभरावे पाच करण्यास हक्क उत्पन्न होत नाही अन्याय तो अन्याय. आजवर चालला म्हणून तो पुढे चालला पाहिजे हा पुजाऱ्यांच्या घरचा न्याय असेल. पण देवाचे घरचा खास नाही.

महाराष्ट्रात हा वाडीचा प्रश्न जिव्हाळ्याचा आहे. मुसलमानाना तोंड देण्यासाठी शुद्धी आणि संघटनेचा विषय निर्माण झाला. पण वाडीच्या प्रश्नाकडे सरळ दृष्टीने ब्राम्हण वर्ग पहात नाही. मसूरकराना गोव्याकडची खेडी दिसतात. कुर्तकोटीना युरोप अमेरिका जवळची वाटते. परंतु वाडी नरसिंहासारखी पवित्र क्षेत्री ब्राम्हणांचा आणि क्षत्रियांचा जुनावाद नव्या स्वरुपात येत असतानां आस्थापूर्वक तिकडे कोण पहात नाही. ब्राम्हणी पत्रे बिचाऱ्या पुजाऱ्यांना भलत्यात भरीस घालत आहेत ! जुना पुराणा वेदोक्त प्रश्न जाज्वल्य पंचाक्षरी मंत्र्याकडून गाडला गेला असताना, पुनः त्याचे डोके वर काढण्यास ब्राम्हणी पत्रे सूचना देत आहेत ! नव्या कुरापती काढीत आहेत ! पुजाऱ्यांना भलत्या मार्गाची दिशा हिंदू सभेची चालक पत्रे दाखवित आहेत ! वाडीची घरे दारे सोडून देऊन ब्रिटिश हद्दीत जाऊन रहा. असा आत्मघातकी सल्ला शुद्धी संघटनावाल्यानी द्यावा हे पाहून नवल वाटते. अथवा नवल तरी कसले ! राघोबा दादानी राज्य लोभासाठी इंग्रजाना घरात घेतले. बाजीरावांनी इंग्रजांचे हाती मराठी राज्याचे उदक सोडले. बाळासाहेब नातूनी शनवारवाड्यावर इंग्रजाचा बावटा स्वहस्ते रोवला ! ती चितपावनी परंपरा वाडीच्या पुजाऱ्यांना इंग्रजाना शरण जाण्याची सल्ला देत आहेत. त्यांच्या रीतीस हे धरूनच आहे.

पण पुजाऱ्याना आमचे जिव्हाळ्याचे सांगणे आहे की तुमची आमची जन्माची गांठ आहे. ताटात पडले काय किंवा वाटीत पडले काय ? देवालयाचे मालक आम्ही आहोत. लबाडांच्या नादी लागू नका. वेदोक्ताचा ताजा इतिहास विसरू नका.

देवाला स्पर्श करणें आणि अभिषेक करणें हा विषय मात्र सार्वजनीक आहे. बोलके पंडित विद्वान लेखक शुद्धि संघटनेचे खरें कार्य नरसिंहवाडीत व रामाचे पारावर व्याख्याने देऊन भोळ्या श्रोत्यांच्या टाळ्या हस्तगत करून काम पुरे होत नाही ! एका हातात मराठा आणि दुसऱ्या हातात पुजारी आणि

मध्ये शुद्धिसंघटनवाला अशा थाटाने अनेक मंडळींनी जाऊन दत्तास अभिषेक केला तरच ते संघटन होय. मुसलमानांचा जुना इतिहास उकरून काढून द्वेष माजवण्यात कांही हशील नाही.

संघटना हिंदुची करणेची आहे. महाराष्ट्रातील मराठा जर देवळाबाहेर ढकलला तर देवाचे आणि देवालयाचे रक्षण कोण करील ! ज्यांचा तुम्ही उपमर्द करण्यास तयार झाला आहात त्यांनी देवाचा आणि धर्माचा अभिमान कां आणि कसा धरावा ? मुसलमानाकडून देवालयाच्या आणि मूर्तीच्या अपमानाप्रसंगी रक्षण करण्याचे सामर्थ्य ब्राम्हणाचे अंगी आज आहे काय ?

दरबारला आमची नम्र विनंती आहे की हे प्रकरण सलोख्याने मिटले नाही तर स्वस्थ राहून चालणार नाही. सार्वजनिक शांततेची आणि स्वास्थ्याची जबाबदारी दरबारवर आहे. इंग्रज सरकार इकडे मुळीच पाहणार नाही. आणि त्याना पहाण्याचे कारण नाही. कोल्हापूरचे छत्रपति हे जातीचे मराठे आहेत. क्षत्रीय आहेत ब्राम्हणेतर आहेत हा विचार गौण आहे. तो एक चान्स आहे. ते एक राजे आहेत. ब्राम्हणेतरांच्या योग्य हक्काचे पालन करणे हे राजाचे कर्तव्य आहे. असा तंटा पुन: न होईल, या बद्दल काळजी घेणे हे दरबारचे कर्तव्य आहे. ब्राम्हण आणि मराठे हे दोन्ही पक्षकार आहेत. दरबार हे न्यायधीश आहेत. कोणाचाही पक्षपात न करता ज्यांच्या त्यांच्या हक्काचे रक्षण करणे आज अगत्याचे आहे. वाडीचा प्रश्न केवळ धार्मिक किंवा सामाजिक उरलेला नाही.

ब्राम्हण वर्गात आज मध्यवर्ती सत्ता राहिलीच नाही. परमपूज्य ब्राम्हणाने किंवा निस्वार्थी ब्राम्हण मंडळाने या बाबतीत कांही सल्ला दिला तरी दुराग्रही ब्राम्हण आणि वेडे दुराभिमानी पुजारी ऐकतील असें दिसत नाही. योग्य सल्ला अमलात येण्यास तिच्या मागे राजाचा पाठिंबा पाहिजे. हा अधिकार राजाचा आहे. भाग्याने प्रजा प्रतिपालक क्षत्रीय राजा आज अधिकारावर आहे. ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर हिंदु या सर्वांना छत्रपतीची आज्ञा प्रमाण आहे. म्हणूनच आम्ही म्हणतो की वाडी दत्तात्रया समोरील अनिष्ट जातिभेद कायद्याने कायमचा मोडून टाकावा. आणि मुर्तिस्पर्शाचे बाबतीत सर्व हिंदुना समान हक्क द्यावेत. म्हणजे एका जिव्हाळयाच्या धार्मिक प्रश्नाचा निकाल अखेर करवीर दरबारने लावला असे होईल. आणि त्याचा परिणाम महाराष्ट्रभर होऊन पुढे मागे इंग्रज सरकारनाही एक चांगले उदाहरण घालून दिल्यासारखे होईल. या कामास आता विलंब लावण्याची सोय नाही.

• • •

# महात्मा फुल्यांचें स्मारक नको ?

ता. २४ जुलई १९२५

भाला पत्रांमध्यें म. जोतीराव फुल्यांच्या स्मारकासबंधाने लेख आलेला आहे. भालाकारांना सत्यशोधक समाजाचे नांव ऐकून कपाळ शुळाची व्यथा उत्पन्न होते. त्यांचे म्हणणे जोतीरावांनी सार्वजनिक कांही काम केले नाही, ते जातीचे माळी होते, ब्राम्हणांचे द्वेष्टे होते. त्यांचे ज्ञान अल्प होते, आणखी एका विशिष्ट जातीची व स्वरुपाची चळवळ त्यानी उत्पन्न केली. आम्ही भालाकारांना विचारतो की, टिळकांचे तरी लक्ष एका ब्राम्हण जातीकडेच नव्हते काय? अफाट ब्राम्हणेतर समाजाबद्दल त्यांनी काय केले आहे ? तसे कांही नसून मागासलेल्या लोकांच्या पैशांतून अशा ब्राम्हण लोकांची जर स्मारके होतात, तर फुल्यांचे बद्दल तुमच्या पोटांत कळ कां उठावी ? फुले हे माळी होते. आणि खरोखरीच ते धोतर बडवे किंवा पाणके किंवा पळीपंचपात्रे बहाद्दर अगर ओगराळाचार्यंही नव्हते. किंवा सोवळेपणाचे ढोंग माजवून, धर्मबुडवी हॉटेलेही काढली नव्हती. त्या माळ्याने हातात कोयता घेऊन बागेतील घाणेरडी झाडे झुडपी नाहीशी केली. त्यांचा सांप्रदाय राष्ट्रीय बागेतील गचाळ आणि रद्दड राष्ट्रसेवक या नांवाखाली खऱ्या लोकशाहीची हानी करणारा माजलेला झाडोरा खणून काढण्याचे काम करीत आहे. युनिव्हर्सिटीच्या पदव्या घेऊन, खरी जनता कोण, हे तुम्हास अद्याप कळत नाही. परंतु त्या अल्पज्ञ कुणब्याने साठ वर्षापूर्वी खरी लोकशाहा म्हणजे ब्राम्हणेतरशाही हे बरोबर ओळखून जनतेला नवीन दिशा दाखविली. ही गोष्ट तुम्ही जाणली नाही तरी जग जाणते आहे.

पुण्यास त्यांचे स्मारक होवो अगर न होवो. कोल्हापुरास होईल अगर न होईल, त्याची काळजी तुम्हांस घ्यावयास नको. फुल्यांचे स्मारक कोठेही असले, तरी त्यांचे सर्वव्यापी स्वतंत्र विचार ऐकल्याने तुमच्या सारख्या एकांगी मठ्ठ ब्राम्हणाचे उरात धडकी भरविण्याला पुरे आहे. कांही पुर्वग्रह दूषित रोटीबंद-बेटीबंद सोवळ्या ब्राम्हणांना वगळले तर अखिल जनतेला जोतिराव प्रिय झाले आहेत. तथापी ॥ सकलांशी रवि प्रिय असता । घुबडांना दुःसह होतो ॥ याला आमचा उपाय काय !

पुणेरी मंडळींनीं जवळ जवळ राष्ट्रीय अक्कल गमावलेली आहे दिसते. कोणी मनुष्यानें कांही विशेष प्रकारची लोकसेवा केली म्हणजे त्याचे नांव रहावें व आपल्या डोळ्यासमोर एक कित्ता उभा असावा, हा स्मारकाचा हेतू असतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 20544 दि: 10/6/62
क्रमांक 23448 नोंद दि: 30/3/69



सर्वांगपरिपूर्ण असा मनुष्य जगात नसतो. टिळकांच्या स्मारकापूर्वी लोकमत घेण्यांत आले असते तर त्याला ब्राम्हणेतर समाजानें खास नाकबुली दिली असती. कारण समुद्रासारखा अफाट ब्राम्हणेतर जनसमूह. त्याजकडे टिळकांची दृष्टी जावी तितकी खोल गेलीच नाही. त्यांची दृष्टी फक्त सरकारकडे; आणि हक्क संपादन करणेसाठी त्यांना लोकांची जूट पाहिजे होती; आणि या बाबतीत मत देणारा समाज म्हणजे कांही थोडेसे मूठभर ब्राम्हण व पांढरपेशे. ब्राम्हणेतर समाज निद्रिस्त असल्यामुळे टिळकानी तिकडे लक्षही दिले नाही, आणि त्यांच्या सामाजिक स्थितीचा विचारही कधी केला नाही. हा समाज जर जागा झाला तर भटशाहीच्या कृत्रीम थोरपणावरच घाला येणार. ते टिळकांना नको होते. म्हणून मी तू व माझा गोतावळा. एवढीच टिळकांची जनता होती. या समाजासाठी जर टिळकांनी काही श्रम घेतले नाहीत तर त्यांच्या पैशातून टिळकांचा पुतळा का उठावा ? केवळ राजकीय हक्कासाठी धडपडणारे थोडेसे जहाल काँग्रेसवाले आणि काही कर्मठ ब्राम्हण यांच्याच पैशातून टिळकांचे स्मारक करणें योग्य होते. अज्ञान जनतेचा पैसा टिळकांच्या स्मारकासाठी का घालावा ? आणि त्यांना राष्ट्रीय पुरुष तरी का म्हणावे ? टिळकांनी रहस्य लिहिले ते तत्वज्ञान्यासाठी, ओरायन किंवा आर्कटिक होम ही पुस्तके लिहिली, ती प्राचीन संशोधकासाठी, मग एवढ्याच लोकांचा एक क्लब बनवून त्यांनी पाहिजे तर गोंधळ घालावा. आमचा काय त्यांत संबंध ? अज्ञानी जनतेसाठी जे लोक मनोभावाने काम करीत होते त्याना तरी हस्ते परहस्ते मदत करायची होती पण तसें त्याना कांही न करता, उलट त्यांच्यावर धोंडेच घातले आहेत. देशमुख व आगरकर या सारख्या खऱ्या थोर विभूती, आमच्यातील सामाजिक विषमता दूर करण्यासाठी अहर्निश स्तुत्य प्रयत्न करीत असता, त्यांची टवाळकी करून नालस्ती करण्यास पुणेकरांनी कमी केले नाही. शास्त्रीबुवा व टिळक यांनी जी घातकी मोहीम सुरू केली, त्यामुळे खऱ्या लोकशाहीचे कांही चालेनासे झाले. आणि तीच राष्ट्रघातकी परंपरा हल्लीच्या पुणेकरांनी चालविली आहे. अशा स्थितीत टिळकांबद्दल अभिमान इतरांना कां वाटावा ? म. जोतिबा फुले हे विद्वान पंडित नव्हते. गोष्ट कबूल. परंतु लोकसेवेला विद्वतेची गरज नसते.

खरे अंत:करण पाहिजे. आमचे खरे कल्याण ज्यात आहे, अशा गोष्टीस म. फुल्यानी सुरवात केली. स्त्री शिक्षण, अस्पृश्यांच्या शाळा, वगैरे गोष्टीकडे मन घालून खऱ्या कार्यकर्त्या पुरुषाने काय केले पाहिजे, तें त्यांनी दाखविले. इतकेच नव्हे तर अनाथ विधवाश्रम काढून ब्राम्हणांच्या डोळ्यात अंजनही घातले. आणि समतेची व सत्याचीं तत्वे घालून उच्चनीचतेंच्या भावनेवर उभारलेल्या समाजवृक्षावर पहिला कुऱ्हाडीचा घावही घातला. म. फुल्यांची खरी योग्यता या विचार-

बीजांत आहे. ह्या रुजत घातलेल्या बीजाला कै. राजर्षि शाहू महाराजांनी योग्य जीवन व खत देताच त्या बीजाचा आता इतका अफाट व अक्राळ वृक्ष झाला आहे की पुणेरी पोटनिष्ट भटशाहीचो आता किंमतच उरली नाही. ब्राह्मणेतर समाज आता जागा होऊन या वाघिणींच्या दुधावर पोसत आहे. या चौवड्यापुढे ब्राह्मणशाहीची टिमकी आता ऐकू देखील येणार नाही.

म. फुल्याचें स्मारक करण्याचे ते या तेजस्वी मूलभूत विचाराबद्दल करणेचें आहे. नदीचा उगम पवित्र मानला जातो. याचे कारण तेथे शुद्ध जीवन असते ह्मणून गंगेचा पाण्याचा संग्रह कमी आहे. या गोष्टीवर कांही नाही. ओघ पुढे पुढे मोठा होत गेला आहे. परंतु हेच ठिकाण अत्यंत पवित्र कां मानावे ? याच कारणासाठी म. फुल्याचे स्मारक करण्याचे आहे, स्वार्थत्यागाचे उदाहरण घालून हालात जन्म काढून ज्यांनी आपला देह खर्च केला, तेच खरे थोर पुरुष होत. लावालावी, जातीद्वेश, थोरांचा मत्सर आणि संतांची निंदा करणाऱ्या भिक्षुकांचे आणि धिंगाणा घालून, क्षुद्रपणा व्यक्त करणाऱ्या पत्रकाराचे कधी स्मारक होत नसते. खरा थोरपणा किती पुस्तके वाचली, या गोष्टीवर नसून, अंतःकरणांत दिव्य ज्योत कितपत पेटली होती, याच गोष्टीवर ठरवणेंचे असते. नाहीतर ।। व्यर्थ भाराभर केले पाठांतर ।। जोवर अंतर शुद्ध नाही ।। या साधू उक्तीस धरून स्मारक करणेचे ते पोट निष्टेने डौल मारणाऱ्या येरा गबाळांचेच नव्हे.

० ० ०

# ब्राम्हण ब्राम्हणेतर ऐक्याची संधी घालवली

१८ सप्टेंबर १९४५

फुल्यांच्या स्मारकाचा प्रश्न पुणे म्यु. समोर आल्यापासून आम्हाला वाटत होते की, याचा कांहीतरी गोड शेवट होईल. पण आपसांतील दुही कौन्सिलपर्यंत पोचून तेथेही आमच्या शाहाणपणाचा प्रकाश पडत आहे. आणिबाणीच्यावेळी एकोप्याची जरूर असता आमच्यांत खंड पडत आहेत आणि तिसऱ्याचा फायदा होत आहे. ही गोष्ट ध्यानी आणून दोन्ही पक्षांतील मंडळी विचारपूर्वक शांतपणानें या प्रश्नाचा कड लावतील असें वाटत होते. ब्राम्हण ब्राम्हणेतर पक्षाचा समेट होण्याची चांगली संधी आलेली होती. पण तिचा उपयोग न करता पक्षाभिमानानें अंध होऊन या स्मारकप्रश्नाचा शेवट अति वाईट झाला. यावरून आमच्या दुर्भाग्याचा अजूनही शेवट झालेला नाही असेच म्हणावे लागेल.

ब्राम्हण बंधूवर जबाबदारी जास्त होती. त्यांचे संस्कार, त्यांचे शिक्षण आणि अंगावर घेतलेल्या जबाबदारीचा बोजा यांकडे पाहून थोडीशी दृष्टी मोठी करून या स्मारकाकडे त्यांनी पाहिले असते तर शेवट बरा झाला असता. श्रीयुत गंगाधर देशपांडे किंवा वीर वामनराव यांच्यासारखे थोर मनाचे गृहस्थ ब्राम्हणाना उच्चबाहुकरून सांगत आहेत की, यावेळी ब्राम्हणांनीच पडते घेऊन पूर्ण स्वार्थत्याग केला पाहिजे तरच ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाचा निकाल सुखाचा होईल. परंतु सर्व व्यर्थ ! कित्येक ब्राम्हणी पत्रे मनापासून पद्धतशीर द्वेशबुद्धीचे लेख लिहून समाजांत दूही माजवतात. अशा पत्राना उत्तर म्हणून श्रीयुत जवळकर यांनी 'देशाचे दुष्मन' हे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यातील भाषा तिखट असेल. ब्राम्हणाना ती कडक औषधाप्रमाणे असह्य वाटेल. परंतु त्यातूनही पुष्कळ गोष्टी ब्राम्हणांना शिकण्याजोग्या आहेत. खऱ्या गोष्टी अप्रीय असल्या तरी ऐकणारा आणि सांगणारा दूर्मिळ असतो. पक्षाभिमानाने अशी भाषा केव्हां केव्हा वापरली जाते. दोन हजार वर्षापूर्वी ग्रीक कवी ॲरिस्टीफनिस यांने साक्रेटिसारख्या सत्पुरुषावरसुद्धा अतिशय जहाल नाटक लिहून ते रंगभूमीवरसुद्धा आणले होते. ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहे. ही सटायर लेखाची पद्धती आजची नसून फार जुनी आहे. जवळकरांनी तरी तेच केले आहे. त्यांतील अप्रीय गोष्टीवर टिका करून त्या नाशाबीत केल्या असत्या तर नड नव्हती परंतु कडक शब्दाने माथें फिरून घेण्यात आमच्या ब्राम्हणबंधूनी फार अधीरपणा दाखविला आहे. आजवर ब्राम्हणमंडळीनी कांही विद्वान ब्राम्हणांना देवाप्रमाणे बनवून त्यासमोर डोळे उडवून, त्या भपक्याने पुष्कळांचे डाळचांत केर घातला होता. तो

जवळकरांनीं आपल्या पुस्तकाने नाहीसा करून वस्तुस्थिती काय आहे, ती पहाण्याची नवी दृष्टी पुष्कळांना लावून दिली. याबद्दल खरोखर ते स्तुतीला पात्र आहेत.

पुस्तकाची भाषा तिखट असेल, अगर कायद्याचे सीमेचे उल्लंघन होत असेल, तर ती जोखीम त्यांनी समजून उमजून आपल्या शिरावर घेतली आहे. त्याबद्दल कोणालाच काळजी नाही. परंतु सोवळेशाहीच्या हॉटबेडमध्ये हे छोटे-खानी पुस्तक लिहून त्यांनी ब्राम्हणेतरांची दिशाभूल होत असलेली दूर करून एक प्रकारे मोठी सेवा केली आहे असे आह्मास नमूद केल्यावाचून राहवत नाही. श्रीयुत केशवराव जेध्यांची भाषा मराठी वळणाची असेल, वागणूक शिपायाची असेल परंतु पुण्यनगरी सारख्या ब्राम्हणी शहरात एका मराठ्या पुरुषाचा पुतळा उभारावा असा ठराव पुढे मांडून त्यांनी अलौकिक धैर्य दाखविले आहे. याबद्दल आम्ही त्यांचे कौतुक करतो. त्यांनी मोठ्या मिनतवारीचे शब्द वापरले नसतील शेकडो ठिकाणी फडकत असलेला भट शब्द त्यांनी म्यु. चे कौन्सिलमध्ये वापरला असेंल, त्यांची इटीकेट किंचित बाजूस झुकली असेल, परंतु तेवढ्यावरून इतका कांगावा, इतके आकांत तांडव करणेचे काय प्रयोजन होते ? प्रे. श्रीयुत आपटे यांनी इतके उसळण्याचे काय कारण ? ब्राम्हण शब्दा ऐवजी भट शब्द वापरला एवढ्यावरून म्यु. चे राज्य डळमळत नव्हते ! किंवा भट शब्दाने ब्राम्हणावर बाटही थोडाच पडत होता ! मुद्याची बाब बाजूस सोडून शब्दावर तारे तोड-ण्यात काय फायदा झाला ? श्रीयुत आपटे हे बरेच जुने वकील आहेत. उलट बाजूच्या वकीलाकडून शब्दानो प्रतिकार सारखा होत असतो. मधून मधून न्याया-धीश रोज राजदंडाचे सारखे तडाके देत असतात. अशा शब्दांच्या कोर्टाच्या तालमीत इतके दिवस धूळ खाऊनही अजूनसुद्धा श्रीयुत आपटे यांनी सनदशीर-तेचा धडा शिकलेला दिसत नाही. आणि नसत्या गोष्टोस महत्व देवून अध्यक्ष नात्याने धाकदपटशा आणि डिसमिसलचा जो अविर्भाव केला. त्यांत त्यानी स्वतःच्या कोत्या मनाचेच प्रदर्शन केले असे आम्ही समजतो. असो.

मुख्य मुद्दा जोतीराव फुल्यांच्या चरित्राचा. ते कुणबी होते. ते ग्रॅज्युएट नव्हते. किंवा ते शास्त्री पंडीतही नव्हते. गोष्ट कबूल. परंतु ज्या विद्वान, शास्त्री पंडीता-जवळ इतकी साधन सामुग्री असूनही ज्यांनी त्याचा उपयोग आपल्या आणि आपल्या पोराबाळांच्या पोटापलीकडे कधीं केला नाही असे पंडित लोक जगांत पुष्कळ आहेत. त्यांचे पुतळे करूं लागल्यांस पुणें शहरांस जिवंत मनुष्याला वावर-ण्यास जागा उरणार नाही ! जोतीरावानीं कामगिरी किती महत्वाची केलेली आहे, इकडे निर्विकार मनानें पाहिले पाहिजे. त्यांचा जन्म होऊन शंभर वर्षे होत आलीं. आमच्या सारख्या मराठ्यांच्या तोंडून जोतीरावांची प्रशंसा ऐकणें हा कदाचित पक्षपात होईल. म्हणून ब्राम्हण वर्गाचे पुढारी, टिळकांचे चेले खुद्द

नरसिंह चिंतामण केळकर हेच फुल्यासंबंधानें काय लिहतात ते पहा. टिळक चरित्र ( गुरू चरित्र ! ) खंड १ ला पान ६९।७० ) आंम्ही त्यांचेच शब्द आनंदाने खाली देत आहोत. ' ब्राम्हणेतरातील सुशिक्षित पिढीमध्ये अग्रस्थानाचा मान जोतीराव फुले यानाच दिला पाहिजें. लहानपणापासून त्यांचे अंगी स्वदेशाभिमानाचें वारें शिरलें होते. पूण्यांतील प्रमुख ब्राम्हण मंडळींचा त्यांचा स्नेह जमला होता. त्यानां गोळीबार, दांडपट्टा अवगत होता. ही विद्या इंग्रज सरकारला पालथे घालण्याचे उद्देशानें मी शिकलों. असे ते म्हणत. वयाचे २१ वे वर्षी त्यानी भिडचाचे वाडयांत मराठे लोकांसाठी शाळा घातली. आंपले पत्नीस स्वतः शिकवून तिला शिक्षकीण तयार केली. मुलौंची शाळाही काढली. नानाचे पेठेत अस्पृश्यासाठी शाळा काढली. पंढरपूराच्या धर्तीवर अनाथ बालाश्रम काढून पोरक्या मुलांच्या त्यांनीं सोयी केल्या. १८५२ साली विश्रामबागेच्या वाडचात दरबार भरवून या त्यांच्या कामगिरीबद्दल बहुमानार्थ ह्मणून ब्रिटिश सरकारानी त्यांना २०० रुपयांची एक शाल अर्पण केली. सर अस्कीन पेरी व कर्नल मेडोज टेलर, सरदार गोपाळराव देशमुख, माधवराव रानडे वगैरे लोक जोतीरावानां चाहत असत. १८७३ साली त्यांनी सत्यशोधक समाजांची स्थापना केली. सामाजिक सुधारणा करावी, व्यसनापासून निवृत्त व्हावे, कोणाच्याही घरात कोणाही अन्नग्रहण करावे. ब्राह्मणाची गुलामगिरी टाकून द्यावी. वगैरे (समतेची) मते त्यांनी प्रसिद्ध केली. त्या नंतर समाजाचे हृगदत प्रगट करणारी पुस्तके प्रसिद्ध केली. त्यांच्या स्फुर्तीने आणि शिकवणीने ब्राह्मणेतर समाजात अनेक कार्यकर्ती मंडळी निर्माण झाली. या नात्याने विशेष महत्व आहे. त्यांनी ब्राह्मणेतर समाजाकरिता एक छापखाना काढून एक वर्तमानपत्रही सुरू केले. न्यु. इंग्लिश स्कूलचे स्थापनेपूर्वीच ब्राह्मणेतर समाजाची चळवळ सुरू झालीं होती. व या समाजाचे एक चांगले पत्रही केसरीच्या पुर्वीच तीन वर्षे जन्मास आले होते. विद्वान ब्राह्मण मंडळीनी केलेला स्वार्थत्याग या ब्राह्मणेतर मंडळीना पटला होता. टिळक, आगरकर तुरुंगांतुन सुटले त्या वेळी त्यांचा सत्कार करण्यांत व टिळकांची १० हजार रुपयाची जामिनकी देवविण्यात जोतीराव हे प्रमुख होते. श्री. शिवाजी महाराजांची समाधी प्रथम यांनीच शोधून काढली व शिवाजी स्मारक सभेत जोतीरावानी पुढाकार घेतला होता. अखेर १८९० साली जोतीराव वारले.'

वरील उतारा आम्ही थोडा विस्तृत घेतला आहे. कारण उघड आहे. आमच्या सारख्या ब्राम्हणेतरांनी जोतीरावांची प्रशंसा करण्यापेक्षा केसरीसारख्या जबाबदार ब्राम्हण पुढाऱ्यानें त्यांचे गीत गायलेले ब्राम्हणांच्या नजरेस आणावे; हा आमचा हेतू आहे. इतक्या काळापूर्वी जोतीरावांनी एका गरीब कुलात जन्म घ्यावा. आणि आज ज्या सुधारणेच्या गोष्टी लोक आनंदाने डोक्यावर घेऊन

नाचतात. त्या गोष्टी अत्यंत प्रतिकुल वातावरणात धाडसाने समोर आणून त्या अमलातही आणाव्यात या गोष्टी अभिमानाच्या आणि आनंदाच्या नाहीत असे कोण ह्मणेल ? या पैकी कित्येक गोष्टी अजूनही कृतीत उतरत नाहीत हे पाहिले ह्मणजे कोणीही त्यांच्या धैर्याची तारीफच करील.

परंतु वर्णाभिमानाने हतबुद्ध झालेल्या वर्गाला ही जोतीरावांची कामगिरी दिसली नाही. जातीद्वेष किंचित बाजूस सारला असता तर प्रत्येक ब्राह्मणाने वरील फुल्यांचे कामगिरीबद्दल त्यांच्या स्मारकाचा ठराव आपण होऊन मांडला असता. परंतु आज पुण्याची स्थिती वेगळी झाली आहे. कित्येक ब्राह्मणी पत्रे संघटनेचे ऐवजी आग लावण्याचे काम करीत आहेत. आणि हा ठराव हाणून पाडण्याचे कामी आपण कृतकृत्य होत आहोत असे मनाचे समाधान करून घेत आहेत !

खेदाची गोष्ट या पुढेच आहे. जोतीरावांचे जन्मास आज १०० वर्षे झाली. त्यांनी सार्वजनिक कामास आरंभ करून ७५ वर्षे झाली. त्यांनी इहलोक सोडल्यास ३५ वर्षे झाली. इतक्या कालात त्यांचेवर प्रतिपक्षाकडून अनेक प्रहार झाले आहेत. कै. विष्णू शास्त्र्यासारख्या कलमबहाद्दराने यांना " शूद्र जातीचे " ह्मणताना आनंदाच्या उकळ्या फुटण्याइतके समाधान दाखविले आहे. जातीजातीत जोतीबाने द्वेष वाढविला, ब्राह्मणांचा द्वेष केला. वगैरे टीका झालेली आहे. त्याचे आह्मास कांही वाटत नाही. परंतु म्यु. सभेच्या बैठकीच्या सुमारास जोतीराव फुले यांचेवर जे निंद्य आक्षेप घेण्यांत आले आहेत, त्यांच्याबद्दल आह्माला अत्यंत तिटकारा वाटतो.

" जोतिबा हे ख्रिस्ती झाले होते असे मला कळले आहे. " असला धर्मद्रोही माणूस फुल्यांच्या घराण्यात जन्मला म्हणून आम्हांस लाज वाटते. " हे शब्द बाबुराव याने उच्चारले. त्याच्याबद्दल कोणते विशेषण लावावे, हे आम्हास कळत नाही. " ते के न जानीमहे " असे म्हणून भर्तृहरीनेही जेथे हात टेकले, तेथे आमच्या सारख्यांनी काय करावे ? अहो बाबुराव, आम्ही तुम्हाला सांगतो की, हा तुमचा घरबुडव्याचा मार्ग अत्यंत निंद्य आहे. ज्या तुमच्या आजाची कीर्ति ब्राम्हणेतर समाजात आज दुमदुमत आहे, ज्या फुल्याचे भक्त म्हणवून घेण्यास ब्रिटिश सरकारांच्या श्रीयुत जाधवरावासारख्या मराठ्या प्रधानास अभिमान वाटत आहे. आणि ज्या फुल्यांची समतेची तत्वे कै. महर्षि शाहू महाराज यांनी अमलांत आणणेसाठी अहर्निश जिवापाड श्रम केले, तेच तुमचे आजे ' ख्रिस्ती झाले होते ' असे शब्द उच्चारून स्वतःच्या जिभेला विटाळण्यांत आणि सरस्वती देवीच्या पवित्र भूमीस स्पर्श करण्यास तुम्हास शरण वाटली

नाही, याबद्दल तुम्हाला कोणीही पाहून लज्जेने मान खाली घालील. ज्या महात्म्याचे थोरथोर ब्राम्हणानी आणि अखिल ब्राम्हणेतरानी पोवाडे गावेत; आणि परकीय सरकारने त्यांच्या कृत्याचे कौतुक करावे, त्यांच्याच कुळात तुम्ही जन्म घेऊन ते " जोतिबा ख्रिस्ती झाले होते. " हे शुभ वर्तमान आज कळवण्यास, यावेळेपर्यंत तुमचा धूमकेतू कोणत्या ठिकाणी गेला होता! तुळशीच्या बागेत भांग उत्पन्न झाल्याप्रमाणे तुम्ही आपला प्रकाश पाडून जगाकडुन हंसे करून घेत आहात! विष्णुशास्त्र्यासारख्या कट्टया शत्रूनीही जो आक्षेप घेतला नाही. त्यांच्या हयातीत त्यांच्या पक्षाकडून ब्राम्हणावर सारखा मारा होत असतांना कोणीही ब्राम्हण असे म्हणण्यास समोर आला नाही.

शाहू महाराजांनी एका हातांत सत्यसमाज आणि दुसऱ्या हातांत समता ही निशाणें घेऊन सर्व महाराष्ट्रभर ज्या फुल्यांची तत्वे चोहाकडे सर्वासमोर मांडली, ज्या ब्राम्हण मंडळीनीं महाराजांच्या या कृत्याबद्दल आकाशपाताळ एक करून सोडले आणि याला खाऊं की गिळू असे म्हणून करकरा दात चावले त्या ब्राम्हणांचीही जी छाती झाली नाही ते शब्द बाबूराव तुम्ही उच्चारलेत, बेशरम छातीच्या गेल्या पाऊणसे वर्षात इतक्या उलाढाली झाल्या, सत्यसमाजावर कित्येक ढग आले आणि जोतीरावांचे नांव बुडवून टाकणेच्या वाटले तितक्या खटपटी झाल्या. इतक्या अवधीत ' जोतीराव फुले हे ख्रिश्चन होते, ' असे बोलण्याची कोणाची छाती झाली नाही. मग बाबूराव, तुम्हांलाच हा नवा शोध कोठून लागला ? कोणत्या ब्राम्हणासंबंधाने तुमचे कान फुंकले ? कोणत्या जुनाट वटवृक्षाच्या ढोलीत तुम्ही आजवर लपून बसला होता ? असल्या मोठमोठ्या तंटाभाडणांचे प्रसंगी तुमच्या या शोधाचा कोठें मागमूस नव्हता. आजवर ।। कोठे गेला होता नवा शोध ।। ? आम्ही स्पष्ट कळवितो की, ही कोणातरी शिखंडीची कल्पना आहे ! बाबूराव फुले तरी जोतीबा ख्रिस्ती झाले होते, असे साफ म्हणीत नाहीत. ' असे मला कळले आहे. ' असे म्हणतात. मग ज्या गोष्टीबद्दल तुमच्या जवळ कांहीं पुरावा नव्हता त्या सभेपुढें मांडण्यात तुम्हाला शरम वाटली नाही ? हा पुरावा मिळणें कठीण नव्हते. जोतीरावांची सार्वजनीक कामगिरी तारीख सालवार नमूद आहे. त्यानी बाप्तिस्मा घेतला असला तर त्या मिशनरी खात्यांत त्याबद्दलचा दाखला मिळालाच पाहिजे. तेवढें श्रम न घेतां आततायीपणा करून वाऱ्यावर उडालेल्या खोट्या गप्पांचा आश्रय करून म्यु. हॉलमध्यें भलतेच विधान करण्यास तुम्ही समोर यावे आणि कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ झाला अशी अपकीर्ति करून घ्यावी यांत कोणते पुण्य संपादन केलेत ?

भाऊबंद म्हणजे पक्का डाईज ! मात्र जोतीबाचे हयातीत हा ख्रिस्ताचा

वास लागला असता तर त्याचे निराकरण झाले असते. जोतीबाचा सरळ वंश पुत्र किंवा कन्या वारस आहे अगर नाही; हा पुरावा समोर येत नाही. मि. नलावडे यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या– " सत्यशोधक की ख्रिस्तसेवक " पुस्तकात वंशावळ दाखविली आहे. त्यावरून जोतीबाचा नष्टांश दिसतो. जोतीबांची इष्टेट घेणारा त्यांचा कोणी सरळ वारस अजून असता आणि मग हा ख्रिस्त वासांचा प्रश्न निघाला असता तर त्या वारसाकडून त्या गोष्टीची शहानिशा झाली असती. परंतु बाबुराव व विश्वनाथ हे तेढें वारस असल्यामुळे आणि जोतीबाचा नष्ठांश असल्यामुळे मयतावर वाटेल ते आक्षेप घेण्यास या फुले बंधूना चारी दिशा मोकळचा आहेत. नफा नाही नुकसान नाही किंवा कोणी सामन्याला येऊन उभा राहणेची भिती नाही अशी स्थिती आहे. निराधार ऐकीव गोष्टीवरून बाबुरावाने जे हे विधान केले आहे. त्याला फुटक्या कवडीची'ही किंमत देता येणार नाही. आजपर्यंत त्या गोष्टीचा मागमूस नाही. सत्य समाजाचे जनकाचें उट्टे काढण्यात ब्राह्मण मंडळी डोळचात तेल घालून जागत बसले आहेत. दोनच वर्षापूर्वी टिळक भक्त केसरीकार नरसू तात्या आपल्या गुरुचा देव्हारा मांडीत असताना जोतीबांचा उल्लेख करतात, त्यानाही जोतीबा ख्रिस्ती झाले होते, असा वासही लागला नाही. अशा ब्राह्मणांच्या कच्छपी लागलेल्या जोतीबाचे तेडे दायाद बाबुराव यांत म्यु. हॉलमध्ये " असे मला कळले आहे " म्हणून काल्पनिक, निराधार बेभरंवशिक आणि खोटी बडबड करावी हा सवंच प्रकार आम्हांस गर्हणीय वाटतो !

जोतीबांनी किती धाडसाची, थोर विचाराची, समतेची, स्वतंत्रतेची आणि भूतदयेची कामे केली आहेत, याला नरसु तात्यांचीच कबूली आम्ही पुराव्यांत घालतो. म्हणजे त्यावरून अशा थोर विचाराचा ज्याने ओ नामा घालून दिला; आणि छातीठोक प्रयोगही करून दाखविले. त्या जोतीबाचा पुतळा पुण्यनगरीस असणें अवश्य आहे असे कोणासही दिसून येईल.

जेधे यांना आम्ही नम्रपणे सुचवित आहोत की क्षत्रियाला योग्य अशी कामगिरी आपण केली आहे. रणांगणांत पाय घालणाऱ्याचाच पराभव होत असतो. तो वास्तविक पराभव नसून पुढच्या जयाचा आरंभ असतो ! दिवाभितासारखें अंधारकोठडीत रहाणाऱ्या लोकांना जयही नाही अपजयही नाही ! जुन्या ब्राम्हणी संस्काराची भुरळ अद्याप आमच्या पैकी कित्येकांची गेलेली नाही. क्या बडा तो दम बडा है ! या पेक्षा जोराची चळवळ आणि एकीचे शिक्षण आम्ही घेतले पाहिजे. ब्राम्हण बंधूना आम्ही जाहीर करतो कीं, ह्या ठरावाने तुम्ही शेफारून जाऊ नका. समेट करण्याची सोन्यासारखी संधी तुम्ही वाया दवडली आहे. म्यु. हालचे बाहेर अफाट जनतेचा हॉल आहे. ! जोतीरावाची किंमत तुम्हांला कळली

नाही. तरी ती लोकांना पूर्ण कळत आहे. त्या ठरावाने ब्राम्हणेतरांचा मोड केला असे तुम्हांस वाटत असेल, तर तो तुमचा वृथाश्रम आहे ! ब्राम्हणेतरांच्या फोपावणाऱ्या वृक्षाला तुमच्या द्वेषानेच तुम्ही पाणी घालीत आहां. आम्ही तुम्हांस निक्षून सांगतो, हे वाक्य सदैव खरे ठरत आले आहे.

॥ की तोडितां तरू फुटे आणखी भरानें ॥

या न्यायानें ब्राम्हणेतर पक्षाचे किंचितही नुकसान न होता तो सारखा वाढतच राहील.

● ● ●

## एका ब्राम्हणाचा विचित्र नमूना

२ आक्टोबर १९२५

येथील श्री शाहूसत्यशोधकसमाज मंदिरांत गेल्या सोमवारी समाजाचे वाढदिवसानिमित्त व्याख्यान झाले. येथील वकील मि. विष्णू विनायक जोशी यानी " सत्य विषय संशोधन " हा विषय घेतला होता. विशेष प्रसंग म्हणून कोणीतरी बाहेरचा इसम आणणेचा विचार होता, परंतु तसे जमले नाही; म्हणून वरील योजना झाली. वकीलांनी आमचेकडून एक शर्थ कबूल करून घेतली की, आपल्या व्याख्यानानंतर दुसरे कोणीही बोलणेचे नाही. श्रोत्यांनी मंदिर भरून गेले होते. आमची इच्छा होती की, योग्य प्रमाणें मांडून ब्राम्हणेतर पक्षाचे दोष असतील, तर ते जोशी बुवानीं मांडावेत, परंतु सर्वच प्रकार विपरित. त्यांनी आपला आवडीचा विषय प्लँचेट समोर मांडून त्या विषयावर केवढे अचाट प्रयत्न केले आहेत. ते दाखविले. ३-४ रिमांचा लेखाचा रुमाल त्यानी टेबलावर ठेविला होता. शिवाय आणखी कित्येक प्लँचेटनें लिहिलेली कागदाची रिमें घरी आहेत. असे त्यांनी सांगितले. शाहू महाराजांचा आपण दरबार भरवला आहे. वारल्यानंतर २०-२० तास त्यांचेशी आपण खासगी संभाषण केले आले आहे. रामदासहि सत्पुरुष, यांच्या आत्म्याशी आपला निकटचा परिचय आहे. आणि प्रपंचातील आपले प्रत्येक कृत्य वरील थोर मृतांच्या आज्ञेप्रमाणे चालत असते, हा माझा अनुभव आहे. मी सांगतो ते खरें मानावे. प्लँचेटनें आपल्या आत्म्याची उन्नती झाली आहे. आचार जास्त कडक झाले आहेत, यामुळे इतरांशी संबंध दूरून ठेवलेले चांगले असे वाटत आहे.

वरील विषय आम्हाला अगदीच अज्ञात आहे. जोशीबुवा सांगतात त्यामुळे आम्हीं आश्चर्य मूढ होऊन बसलो. येथपर्यंत ठीक झालें. आमचे विचार कसे तरी आम्ही कोंडून ठेविले. परंतु जोशीबुवांचे एवढयाने समाधान झाले नाही. स्पँचेट हे एक त्यांनी नुसते निमित्त केले होते. त्यामार्गे ब्राम्हणी संस्कृतींचा आणि परंपरेंचा थोरपणा दाखवून त्याला धक्का देणारे ब्राम्हणेतर यांचा सुड घ्यावयाचा होता आणि तसें करताना त्यांनी जे तोंडसुख घेतले, ते पाहून समाज थक्क झाला. जितकी कांही दुष्टपणाची आणि नीचपणाची विशेषणे ब्राम्हणेतराना लावता येतील तितकी त्यांनीं मनसोक्त लावून घेतली. आणि अखेर तर कोणीही सुशिक्षीत व जबाबदार मनुष्याला न शोभतील असे शब्द उच्चारण्यास कै. शाहू महाराजांच्या पुतळ्यासमोर आणि त्यांची साक्ष ठेवून व त्याच मृतात्म्याचें आज्ञेनुसार (!) उद्‌गारावरून आमच्या व गरीब मागासलेल्या समाजास पवित्र केले. आणि त्यांचा दर्जा वाढविला ! प्लँचेंटच्या अहोरात्र सहवासाने ब्राम्हणाची आत्मोन्नती किती होते, याचा मुर्तिमंत मासला आपल्या शिव्याशापानें व प्रत्यक्ष कृतीने जोशीबुवानी दाखविला याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक धन्यवाद गात आहोत. जोशीबुवानी आपल्या अगाध अनुभवात अनेक गोष्टी पाहिल्याचे सांगितले. आणि ब्राम्हणेतरांच्या कोणत्याही चळवळीचा समाचार घेणेचे त्यांनी वर्जिले नाही. वर्णाश्रमाचा त्यांना अभिमान मोठा. जातीभेद अगदी योग्य. विधवावपनाचे वर्म केवळ जोशीबुवानाच ठाऊक. भूत, पिशाच्चे, समंध, ब्रम्हराक्षस (!) यांची त्यांना पुरी ओळख. इतकेच नव्हे तर रात्रंदिवस त्यांच्याशी खेळणे बागडणे. अशा स्थितीत त्यांचा परिणाम जोशीबुवावर का होऊ नये ? असो. त्यापेक्षा जास्त लिहिण्याची आमची इच्छा नाही. फक्त एकच उणीव पडली की, आह्मी कोणासही जोशीबुवाविरुद्ध बोलू दिले नाही. त्यामुळें सत्र यथासांग पार पडले. बागल वकील जोशीबुवानां वचन देऊन बद्ध झाले होते, यामुळे कोणासही काही बोलता येईना. पण अखेर निरुपाय म्हणून आणि हृदयातील तळमळ असह्य झालीं ह्मणून आभार प्रदर्शनासाठी चार शब्द जोशीबुवाचे परवानगीने बोललो. ते इतकेच की, ' भारतीय युद्धासमयी कर्णाला कोणीं सारथी मिळेना आणि अखेर ते सारथ्य सुप्रसिद्ध शल्याने पत्करिले. ती शर्त ह्मणजे युद्ध चालू असता, कर्ण रथात असता, शल्याने वाटेल तसल्या आणि वाटेल तितक्या कर्णालाच कर्णाच्या तोंडावर शिव्या देत रहाव्यात. आणि कर्णाने उलट एक चकार शब्द काढणेचा नाही. तीच अवस्था माझीं झाली आहे. जोशीबुवाचे उलट कांहीएक बोलणेचे नाही या शर्तीवर मी त्यांना पाचारण केले. त्यांनी महत्वाची कामगिरी पत्करली आणि अगदी एकनिष्टपण ने आपले हृदय फोडून बवकळ मोजून अडीच तास आपल्या वाग्प्रहाराचा ( शिव्याशापाचा ) अस्खलित ओघ चालू ठेवला आणि

शल्याची भूमिका फारच उत्तमरीतीने तंतोतंत वठविली याबद्दल मी जोशीबुवाचे आभार मानतो. आणि शेवटी एकच गोष्ट सांगतो की, ज्या मृतात्म्याचे प्रेरणेने अंतरिक्षांत जोशीबुवा आपला कालक्षेप करितात त्याच इशप्रेरणेने दीन दुबळ्या आणि अज्ञान व जिवंत मागासलेल्या वर्गाची सेवा चाकरी करण्यात मी आपले आयुष्य खर्च करण्याचा निर्धार केला आहे. ही गोष्टही खरी असेल इतके मानण्याजोगे मनाचे औदार्य जोशीबुवा बाळगतील अशी आशा आहे'

अशारितीने सभेचे काम संपले. ब्राह्मणेतरांनी आपले आत्मसंयमन इतके दाखविले की त्याबद्दल कोणासही आश्चर्य वाटेल. आणि ब्राह्मणबंधूना तरी ते पाहून मान खाली घालावी लागेल.

● ● ●

# कुलकर्णी आणि जोशी वतन

२ ऑक्टोबर १९२५

## १

सर्वच वतनाचा इतिहास आमच्या वाचकासाठी आम्ही देणार होतो, तूर्त वरील दोन वतनापुरताच आज सारांश रुपाने विचार कर्तव्य आहे. बाकीचे वतनांचा इतिहास मनोरंजक आहे खरा, परंतु आज बहुजन समाजापुढे कुलकर्णी आणि जोशी यांचा उहापोह चालू असलेमुळे तोच प्रश्न आज आम्ही हाती घेत आहोत.

करवीर इलाख्यात आता कुलकर्ण्यांची वतने नाहिशी झाली आहेत. त्यांची गांवकामगार नात्याची नोकरी अजिबात कमी करून त्यांचे ठिकाणी तलाठी नेमण्यात आले आहेत, आणि जमिनी इनामातून कमी करून निव्वळ रयताव्यात दाखल केल्या आहेत. कै. राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कारकीर्दीत जी अनेक धाडसाची आणि क्रांतीकारक कामे केली त्यापैकी हे एक अत्यंत महत्वाचे काम झाले आहे. फार काय या कुलकर्णी वतनाच्या कामी महाराजांचा मतभेद झाल्यामुळें माजी जगद्‌गुरु कुर्तकोटी यांना आपल्या मठाधिपतीच्या जागेस कायमचे मुकावे लागले आहे.

कुलकर्णी आणि जोशी हे दोघेही एकाच ब्राम्हण जातीपैकी आहेत. ते बहुधा देशस्थवर्गापैकी असल्यामुळे ते परस्पर आप्त व सगेसोयरे असे आहेत. कुलकर्णी वतन हे जरी बरेच जुने असले तरी ते पाटील वतनाच्या मानाने अगदी अलीकडचे आहे. कुळकर्ण्याच्या वतनाबद्दलची सरकारी सनद बहुधा मिळत नाही. विजापूर आदिलशाहीच्या कारकिर्दीतील किंवा दिल्लीच्या मुख्य गादीच्या वेळचे कागदपत्र पाहिले तरी त्यात कुलकर्णी वतनाचा उल्लेख मुळीच येत नाही. आला तर अगदीच क्वचीत. वतन फार प्राचीन वे ह्मणजे पाटलाचे यात काही शंका नाही. वारसा चौकशीच्या कामात कित्येक प्राचीन सनदापत्रे हजर झालेली दिसतात, ती पाहिली ह्मणजे पाटलानीच मूळ गांव वसविला. आहे. गुरेढोरे, आणून, घरे बांधून गांवची वसाहत पाटलानीच केली आहे. देवाची स्थापना करणारे तेच. बाराबलुते व इतर नोकर आणून गांवची व्यवस्था त्यानीच केली आहे, रयताना राहण्यास कळवून त्यांच्या संरक्षणाची त्यानीच तजवीज केली आहे. अशा प्रकारे गांवची स्थापना अबादानी आणि स्वस्थता ही काही दिवस करून, पडजमीन लागवडीस आणून खेडयाच्या सुधारणेस

आरंभ पाटलानीच केला आहे. कित्येक वर्षे व्यवस्थितपणें राजाला नजराणा व करभार वगैरे पोहचविल्यानंतर राजांनी खूष होऊन, पाटीलकीची सनदापत्रे दिलेली आढळतात. कित्येक सनदापत्रे पाहून मनाला आनंद व अभिमान वाटतो. शेकडो वर्षापासून ही पाटीलकीची संस्था आज तागायत चालत आली आहे. अनेक राज्यक्रांत्या होऊन गेल्या तथापी त्यांचा परिणाम या संस्थावर काही झाला नाही, आणि ही संस्था पूर्वीप्रमाणें राजाला पूर्ण राजनिष्ठ आणि लोकांनाही प्रीय अशी राहिलेली आहे.

पाटील संस्था ही एकाच जातीत आडकून राहिलेली नाही. बहुतेक सर्व जातीचे लोक पाटीलकीचे मालक आहेत. आजही मराठे, जैन, लिंगायत, धनगर, कोळी, मुसलमान, बेरड वगैरे जातीत पाटीलकी चालत आली आहे. असे दिसून येते. कांही ठिकाणी महार देखील पाटील आहेत. हे पाहून कौतूक आणि आनंद वाटल्यावांचून राहत नाही. सर्व जातीमध्यें अशा प्रकारे पाटीलकी वसत असल्यामुळे ती संस्था सर्व लोकांना प्रिय झाली आहे.

पाटील हे बहुतेक शेतकरी वर्गापैकी आहेत. तो गांवचा कारभार पहात असलातरी त्याचा मुख्य पेशा शेतकऱ्याचाच आहे. आणि आमच्या देशाची रचना आणि निर्वाहाचे साधन मुख्य शेतकीचे असलेमुळे पाटील मोठा श्रीमान अगर कर्तबगार झाला तरी त्याची दृष्टी आपल्या शेतावरून कधी कमी होत नाही. खेडेगांवची लोकसंख्या सर्व ब्राम्हणेतर. पाटील त्यापैकींच एक, व्यवसाय एकच यामुळे पाटील म्हणजे गांवचा हितकर्ता, गांवचा बंधू आणि गांवचा स्नेही असाच झालेला असतो. या रयतेंतच त्यांचे गणगोत पाहुणे; इष्टमित्र सर्व रयतेतच. यामुळे खेडेगांवात पाटील हाच रयतेचा खरा प्रतिनिधी असतो. रयत म्हणजेच पाटील व पाटील म्हणजेच रयत अशी स्थिती असते. महारापोरापासून थोरापर्यंत त्याचे संबंध सारखे प्रेमाचे अगत्याचे असतात. आणि पाटलाला वतनाचा गांव एकच असलेमुळें त्याचे हितसंबंध त्याच्या गांवाशी अगदी निगडीत झालेले असतात.

आतां एकादा पाटील स्वार्थाला बळी पडून रयतेच्या त्रासास कारण होत असेल परंतु ही गोष्ट अपवाद आहे. त्याचें प्राचीनत्व त्याचे जातभाई व त्याचे हितसंबंध पाहिले म्हणजे आम्ही जे म्हणतो तेच अगदी खरे आहे. असे दिसून येईल.

आता कुलकर्ण्यांची स्थिती पहा. कुलकर्ण्याला कोणी बादशहाने अगर राजाने सनद दिली आहे असे बहुधा आढळून येत नाही. प्राचीनच्या ग्रामसंस्थेत कुलकर्ण्याला स्थान नाही. कुलकर्णी हा पाटलाचा एक कारकुन आहे. तो केवळ लेखक आहे. सुरवातीस पाटील रसद आपणच हुजूर खजिन्याकडे

पोंहचवी. लिहिल्यापुसण्याची तितकी गरज नव्हती. पुढे पुढे गांवची रचना गुंतागुंतीची होत चालली, येणी देणी वाढू लागली; सरकार बाकी केव्हा केव्हा थकू लागली. यामुळें लेखकाचे अगत्य पडले. आणि याच कामासाठी पाटलानी त्या कामावर एक नोकर नेमिला. तोच हा कुलकर्णी होय. कालांतराने लिहिण्याची, हिशेब ठेवण्याची आवश्यकता कायमची होऊन बसली आणि याच कारणाने कुलकर्ण्याची नोकरीही कायमची झाली. तिला वतनी स्वरुप प्राप्त झाले. आणि कुलकर्णी पाटलाबरोबरच हक्कदार गावकामगार म्हणून मिरवू लागले.

दुर्दैवाने पाटील ब्राम्हणेतर वर्गांपैकी पडला. अनेक कारणामुळे आणि कित्येक पिढ्या विद्येचे संस्कार नाहीत यामुळे जरी तो गांवचा प्रमुख रयत आणि राजाचा प्रमुख नोकर असला तरी बिचाऱ्याला शिक्षण नसलेमुळे लिहिण्यावाचण्याच्या कामी तो परावलंबी झाला. जो कुलकर्णी त्याचा नोकर त्यावाचून त्याचे अगदी चालेनासे झाले. एका शिक्षणाचे अभावी नेहमी तो अंधळ्यासारखा झाला. कुलकर्णी हे दिवाणजी झाले, दिवाणजी सांगतील तो व दाखविल तो हिशेब. गावची खरी स्थिति, जमाखर्च वगैरे कोणीही पाटलाला विचारल्यास त्याने दिवाणजीकडे बोट दाखवायचे. अशी त्यांची केवीलवाणी स्थिती झाली. काही थोड्या गावी पाटील सुशिक्षित मिळाला म्हणजे तेथे हा प्रकार दिसत नसे. पण अशी उदाहरणे फार विरळा.

पाटलांची पोझिशन किती हास्यास्पद असते आणि तो कित्येकवेळां अगदी कसा मुर्ख असतो आणि " पाटीलबुवा " हा शब्द कसा खुळचाचा द्योतक झाला आहे, ही गोष्ट कित्येक प्रहसनामधून अगर तमाशांतून आपणास पाहावयास मिळते.

सर्व कुलकर्णी एक जातीने सर्व सुशिक्षित आणि एकाच आचार विचाराचे त्यांच्या मागे वर्णाभिमानाची भरभक्कम संस्कृती, जातीभेद, उच्चनीचपणाच्या भावना, सोवळ्या ओवळ्याचा वेडगळ पण दंभाच्या कल्पना आणि मी सर्वापेक्षां श्रेष्ठ, जन्मतःच मी वरिष्ट असल्या अनिष्ट विचाराचे व विकाराचे ओझे सर्वांनी पाठीवर घेतले असल्यामुळे समान आचार विचार याच्या जीवावर कुलकर्ण्याचा एक अमोल्य असा गट झालेले होता. मुसलमानी कारकीर्द व इंग्रजी कारकीर्द कुलकर्णी वर्गाला जास्त सुखाची झाली. गांवचे पाटीलसुद्धा सर्व रयत आडाणी आणि एकटा कुलकर्णीच काय तो शहाणा. कुलकर्णी सांगेल तो कायदा असे होऊन बसले. अतिशय महत्वाची गोष्ट ह्मणजे सरकारचे दप्तर हे पूर्णपणे कुलकर्ण्याच्या हाती. यामुळे तर अडाणी रयतेला त्रास देण्याला स्वार्थी कुलकर्ण्यांला फारच साधिले. दाद मागण्यास वरती जावे तर अधिकारी

वर्गही त्या कुलकर्ण्यांच्याच जातीचा, गावची सुत्रे हलविणारा ! असल्यामुळे रयत असहाय झाले. कुलकर्ण्यांची संख्या फार मोठी. इतर वतनदार नोकराना सरकारानी कमी करून त्यांचे जागीं पगारी नोकर नेमले तीच स्थिती या पूर्वीच कुलकर्ण्यांच्या नोकरीचीही व्हावयास पाहिजे होती परंतु कुलकर्णी सर्व गांवांतून एकदम कमी केले तर त्याजागीं भरती कशी करणेची ? आजवर ब्राम्हणेतर वर्ग मागे पडला असल्यामुळे इच्छा असून सुद्धा सरकार कांही करू शकले नाही. परंतु आज आमच्या सुदैवानें मागासलेला वर्ग जागा झाला. गांवचे दप्तरचें काम चांगले रीतीने करणेस तो तयार झाला आहे, आणि या वर्गात स्वामीभक्तिचे रक्त पूर्णपणे खेळत असल्यामुळे तो वर्ग कुलकर्ण्यांचे काम करणेस समर्थ झाला आहे.

शिक्षणाचा प्रसार सर्व जातींत सारखा व्हावा ही सरकारची इच्छा प्रथम-पासूनची आहे. आज तसा काळ आला आहे. राजकीय शिक्षण, कौन्सिले लोकल बोर्डे ग्रामपंचायती यांत काम करण्यास सर्व जातीचे लोक तयार व्हावेत हें अगदी जरूर आहे.

कुलकर्ण्यांचें मुलकी दप्तर म्हणजे रेव्हेन्यू कामाचा पाया, ते दप्तर आजपर्यन्त एका ब्राम्हणवर्गातच होते. यामुळें इतर वर्गाला मुलकी वर्गाचे ज्ञान मिळणे अशक्य झाले होते. अशी राजकीय शक्ती एका विशिष्ट वर्गात राहू देणें हें अनिष्ट आहे. सर्व जातीत राज्यकारभाराचे ज्ञान आले पाहिजे. गांवचे सरकारदप्तर सर्वांना सारखे खुले असले पाहिजे. हा उच्च हेतू समोर ठेऊन सरकारने कुलकर्ण्यांच्या हातात असलेल्या, वतनी हक्कदार म्हणून मक्तेवाले होऊन बसलेल्या, कुलकर्ण्यांना कामावरून दूर केले. आणि नवीन तलाठी पद्धती सुरु केली. ही तलाठी पद्धती म्हणजे खरी लोकशाही.

आता कोणत्याही जातीचा मनुष्य तलाठी म्हणून हे काम करू शकतो. या तलाठ्याचे भाऊबंद स्नेहसंबध सर्व जातीत सारखे असल्यामुळें आज गांवचे दप्तर गांवच्या रयतेच्याच स्वाधीन सरकारने केले आहे असे म्हणण्यास नड नाही. येथं सर्वांचा दर्जा सारखा आहे. भेदभावाची अगर उच्चनीचपणाची येथें आडकाठी नाही. या तलाठी पद्धतीने किती सुपरिणाम होतो याचे प्रत्यक्ष उदाहरण पाहणें असल्यास कोल्हापूर संस्थानची स्थिती कोणीही येऊन पाहावी. म्हणजे गरिबाचा श्रीमंत होण्यास, अज्ञानाचा सज्ञान होण्यास, रंकाचा राव होण्यास मनुष्यास संधी मिळाली म्हणजे कसा चमत्कार होतो हे पाहून कोणालाही समाधान वाटल्या वाचून राहणार नाहीं.

# २

## कुलकर्ण्यांची पुन्हा स्थापना म्हणजे मागासलेल्या वर्गाच्या पायात खोडा

शककर्ते श्री शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतील राजकारणाची आणि मुत्सदेगिरीची महत्वाची बाब म्हणजे राज्यकारभारातील नोकर हे पगारीच असले पाहिजेत ही होय. वंशपरंपरेचे नोकर राज्यकारभारांत असल्यानें परिणाम इष्ट होत नाही. आपल्या वतनी हक्काच्या जोरावर ते कोणाला मानीनासे होतात आणि मुख्य राजाचीं सुत्रे ढिली पडत जातात वतनी नोकरी राजालाच पुष्कळवेळां अडचणीची आणि त्रासदायक होते.

म्हणून महाराजानीं आपले मंत्रीमंडळ केवळ पगारीच असलें पाहिजे, असा निर्बन्ध घालून दिला; इतकेच नव्हे तर वतनी नोकरीला केव्हांही उत्तेजन देऊ नये, अशी त्यानी आंपली पॉलिसीच आखून ठेविली होती. ही गोष्ट कैं. माधवराव रानडे यांचा मराठ्यांचा इतिहास हें पुस्तक पाहिलें असतां सहज कळून येईल.

परंतु दुर्दैवानें ही पद्धती पुढें सुटत चालली आणि पेशव्यांच्या आमदानींत तर जवळजवळ ती नाहीशीच झाली. सातारच्या महाराजांची सत्ता कमी करावी, ते नुसते नांवाचे राजे, गादीवरील बाहुले म्हणून रहावे आणि सर्व अधिकार आपल्या हाती राहावेत, आपल्या जातीचा, चितपावन वर्गाचा बडेजाव होत जावा; ह्या स्वार्थांच्या हेतूने आपण नवीन नोकर, सरदार, सुभेदार उत्पन्न केले, आणि वंशपरंपरेच्या हक्काची पुनः स्थापना केली. त्याचा परिणाम पुढे कसा घातुक झाला तावेदार नोकरच श्रीमंताना कसे शिरजोर झाले, ही गोष्ट इतिहास सांगत आहे.

मुसलमानांच्या कारकीर्दीत वंशपरंपरेची वतनीं उत्पन्नें कित्येक लोकांना देऊन, नवीन जहागिरी आणि संरजाम उत्पन्न केले. ह्याचाही परिणाम तसाच घातुक होऊन नोकर लोकच कसे शिरजोर झाले, आणि मध्यवर्ती दिल्लीची गादी निराधार होऊन तावेदारांच्या महत्वाकांक्षेला कशी बळी पडली हीही गोष्ट आतां सर्वांना कळलेलीच आहे. ब्रिटिश सरकार धोरणीं आणि दूरदर्शी. मागच्या दाखल्यावरून ह्याना पूर्णपणें कळले होते कीं, राज्यकारभारातील महत्वाच्या नोकऱ्या केव्हांही आपल्या इच्छेवरच अवलंबून असल्या पाहिजेत, म्हणून नोकरांचा शिरजोरपणा

केव्हांही येऊ देता उपयोगाचा नाही. नोकर असा असावा कीं, त्याचा गैरशिस्तपणा यत्किंचित दिसून आला तर ताबडतोब त्याला डिसमिस करतां यावे. पगाराचा पैसा भरपूर गेला तरी हरकत नाहीं. देसाई, देशपांडे, देशमुख, सरदेशमुख सर नाडगोंडे हे प्राचीन राज्यकारभारांतील फार महत्वाचे ऑफिसर्स होते. त्या त्या प्रांतातील आणि परगण्यातील सरकारचा पैसा वसूल करणें, त्या त्या भागात सुव्यवस्था ठेवणें व न्यायमनसुभा करणें ही त्याची कामगिरी होती परंतु वतनी कामगारांची नेहमीच ही उणीव असते कीं त्यांच्या घराण्यात केव्हा केंव्हा बुद्धिमान पुरूष निपजतात, तसेच पुष्कळ वेळा अडाणी. अजागळ, क्रूर आणि रयतेला लुबाडणारे असेही निपजतात. सरकारला या वतनदारांतून नेहमीच योग्य माणूस मिळेल असा नियम नाही म्हणून ह्या वतनी नोकरीचे लिफडे सरकारच्या गळचात नेहमी राहिले तर राज्यकारभार बरोबर रीतींने चालणार नाही, हे पूर्णपणे ओळखून इ. स. १८४० च्या सुमारास गॉर्डन सेटलमेंट सुरू करून, देसाई देशपांडचांच्या नोकऱ्या अजिबात कमी करून टाकल्या आणि त्या नोकरीबद्दल त्यांचेकडून पैशांच्या रूपाने मोबदला म्हणून घेण्याचा ठराव केला. त्यांनी बसून जमिनीचे उत्पन्न खावयाचे आणि नोकरी तर नको ! यांत नुकसान आहे हे पाहून त्यांचेकडून जो पैसा हल्ली घेण्यांत येतो त्यालाच खंडणी, नोकरीअंश किंवा सेटलमेंट जुडी अशी सरकार दप्तरची नांवे आहेत.

याच तत्वाला अनुसरून कुलकर्ण्यांनांसुद्धां त्याचवेळी वतनी नोकरीतून कमी करावयास पाहिजे होते. परंतु अनेक कारणामुळे तसे करतां आले नाहीं. देसाई, देशपांडे यांच्या ऐवजी सरकारांना युनिव्हर्सिटीचे पदवीधर बी. ए, एम. ए., एल्–एल्, बी., असे लोक मिळाले. कलेक्टर, प्रांत, मामलेदार वगरे योग्य अधिकारी पगारी मिळाल्यामुळे, सरकारांना कांही अडचण पडली नाही. लायख इसमामुळे मुलकी कारभार चांगल्यारीतीने चालू झाला.

कुलकर्णी वतनाची स्थिती वेगळी. अगोदर कोणत्याही जिल्ह्याला पाहिले तर कुलकर्ण्यांची संख्या मोठी, पगार वेताचा मिळणार. आज इतकी संख्या कुलकर्णी नोकरी करण्यास आणावी कोठून ? हा प्रश्न आडवा आला, उच्च दर्जाचा सुशिक्षित माणूस असल्या गांवनोकरीस कोण येऊन राहणार ! बहुजन समाज मागासलेला कित्येक पिढचांच्या संस्कारामुळे ब्राह्मणेतर वर्गांत शिक्षणाची आवश्यकताच वाटली नाही. मराठा वर्गाचे हातचे शस्त्र गेले, आणि खुरपे आले, ह्या कारणामुळे वतनी नोकरी आजिबात नष्ट करुन टाकण्याची जरी सरकारला इच्छा होती, तरी एवढी मोठी अफाट कुलकर्ण्यांची संस्था आजवर कमी करतां आली नाही.

आज स्थिती अगदी बदललेली आहे. मराठा, जैन, लिंगायत, मुसलमान वगैरे

जातींच्या लोकातून कुलकर्ण्याचे काम करण्यास लायक असें वाटेल तितके लोक तयार झाले आहेत. गावच्या खाते, कीर्दी, पावत्या, चोपड्या, रिपोर्ट करणें व गांवचे अठरा नमुने, इतक्या साध्या गोष्टींचे ज्ञान झाले की कोणालाही कुलकर्ण्याचे काम करता येईल. आजची बदललेली स्थिति पाहून फार दिवस मनांत सलत असलेले हे शल्य–हा कुलकर्णी पायांतील कांटा अगदीं काढून टाकावयाचा, असा ब्रिटिश सरकारने निश्चय केला आणि कुलकर्णीवतन कित्येक जिल्ह्यातून नष्ट करून त्या ठिकाणीं नवीन तलाठी सिस्टिम सुरु केली. या गोष्टीचा परिणाम खेड्यातील रयतांना फार सुखाचा होत आहे, हे अनुभवाने सांगता येईल.

कै. राजर्षि शाहू महाराजांच्या धडाडीच्या राजकीय धोरणाने आणि रयतेच्या खऱ्या लोकशाहीच्या कळकळीने प्रेरित होऊन मोठ्या अडचणीत आणि प्रतिकूल स्थितीत विरुद्ध पक्षाचे प्रहार सोसून नवीन तलाठी सिस्टिम संस्थानांत सुरुं केली आहे. गोष्ट लहान दिसते, परंतु ही फार मोठी क्रांति झाली आहे या तलाठी सिस्टिमने खऱ्या लोकशाहीचा पाया घातला आहे. मोठमोठ्या वादग्रस्त मुलकी अगर वतनी वादाचे कज्जे पहा. हायकोर्ट घ्या किंवा सरकार घ्या तेथे वादाला जे मोठे भयंकर स्वरुप प्राप्त झालेले असते, त्या सगळ्या कामाचा उगम आणि बीजारोपण चावडीच्या दप्तरातच सुरुं झालेले असते.

कुलकर्णी वतन म्हणजे एका ब्राम्हण वर्गाचा अप्रतिहत मुलकी राज्यकारभार. दप्तरची किल्ली कुलकर्ण्याच्या हातात ठेवल्याने मागासलेला वर्ग आजवर केवळ परावलंबी झाला होता. कोणत्याही कामांत आपणाला यश येणेचे तर अगोदर कुलकर्णी अप्पाची तजवीज करणें, त्याची मर्जी संपादन करणे, हेच रयतेचे कर्तव्य होऊन बसले, आणि सर्व गांवातील सर्व कुलकर्णी एकाच ब्राम्हण वर्गांतले असल्यामुळे ही मक्तेबाब एवढी प्रचंड होऊन बसली होती की त्यापुढे रयत म्हणजे नुसते मेंढरू आणि सरकारचाही निरूपाय अशी स्थिति झाली होती. कुलकर्णी सत्तेचे असे हे मुलुखभर कणखर जाळे बनून गले होते कीं त्या पुढे मी मी म्हणणाऱ्याचें कांही चालत नसे. ब्राम्हणी कुलकर्ण्यांच्या सोवळ्या बरोबर चावडीचे दप्तर सुद्धा सोवळे झाले. ब्राम्हणावाचून त्या दप्तराची गांठ सुटेना आणि कोणालाही गांवच्या स्थितीचें ज्ञान मिळेना. आज तलाठी कसा आहे तो पहा.

त्याला वंशपरंपरेच्या हक्काच्या नोकरीचा ताठा नाही. थोडेसुद्धां त्याचे गैरशिस्त वर्तन आणि रयतेशी फाजील वागणूक किंवा त्रास दिसून आला तर त्याला लागलीच बदलता येते. सस्पेंड करता येते; बडतर्फ करता येते, अशी

त्याची असहाय स्थिती असल्यामुळे लोकाबरोबर प्रामाणिकपणाने आणि सरळ-पणाने वागणें त्याला भाग होते. " केले म्हणजे सर्व कांहीं होते " या नियमाचा उत्तम परिणाम पाहणे झाल्यास करवीर संस्थानासारखे ठिकाण कोठेही मिळणार नाही. प्रत्येकाला वाटते कीं तलाठी हा माझा इसम आहे. सर्व जातीतून तलाठी घेतले असल्यामुळे तलाठ्यांचे जाळे आणि त्यांचे संबंध सर्वत्र पसरले आहेत. गावांत सर्व लोक त्याच्याबरोबर असतात, मध्यम वर्गातले असतात कोणालाही दुखवून त्याला भागत नाही, आणि मुलकी माहितींचे धागे दोरे सर्व खेड्यांतील लोकांना मोकळे झाले आहेत. आणि यांतून कामांत हुषार तलाठी निघाला तर तो कारकुनाच्या नोंकरीलाही लायख होतो अशी उदाहरणें पुष्कळ झाली आहेत.

## ३

## तलाठी सिस्टिमचा सुपरिणाम

या शिवाय आणखी कित्येक सुखाचे परिणाम ह्या तलाठी सिस्टिमने झालेले दिसून येत आहेत त्यापैकी एक महत्वाची बाब आम्हास नमूद केल्यावाचून रहावत नाही. ही गोष्ट म्हणजे वरिष्ट अम्मलदाराची सर्फराई, मामलेदार, प्रांत व कलेक्टर यांचा ठाण्याबाहेरचा दौरा ही एक फार मोठी गमतीची गोष्ट आहे. त्यांचा तो तळ तो कारकून शिपायांचा परिवार म्हणजे एक यात्राच होऊन बसलेली असते, मात्र पुष्कळवेळा या दौऱ्यांचा परिणाम गरीब रयतेला भोगावा लागतो.

> वरिष्ट अम्मलदाराची सर्फराई म्हणजे गरिबांच्या पैशावर नैवेद्य दाखवून देवाला सुपसन्न राखणेचा एक सोपा आणि मोठा मानाचा मार्ग आहे.

अम्मलदाराचे स्वागत करणें योग्य जाग्यावर ऑफिस मांडणें, त्याचें निजणें, बसणें, खाणें, जेवणेची बरदास्त ठवणें हा उत्तम सर्टिफिकेट मिळविण्याचा कुलकर्ण्याला मार्ग मिळाला होता. कच्चे काम करणारे कारकून, व दप्तरचे जावजबाब घेणें, काम रंगवणें वगैरे शिरस्तेदारचे हाती असल्यामुळे मुख्य देवता व जवळचे हे गण ह्यांना खूष ठेवणे ही महत्वाची कामगिरी झाली होती. आणि या बाबींत स्वागताच्या आरंभापासून अखेर अम्मलदाराची रवानगी होईपर्यन्त देव बसल्यापासून देव उठेपर्यन्त जवळच्या पूजाऱ्यांचा सहवास अवश्य होता. ह्याचा परिणाम रयतेवर

विलक्षण झाला होता. ऑफिसरच्या तोंड धुण्याच्या सोयी पासून, व स्नानाच्या सुखापर्यन्त, वगैरे सर्वच गोष्टी कुलकर्ण्याच्या हवाली असल्यामुळे त्यांचे जबरदस्त वजन रयतेवर पडे. कुलकर्णीही मोठा हुषार आणि लबाड माणूस, अंगावर माशी बसून न घेणारा, ऑफिसर असला तरी हुषार कुलकर्णी त्याचा कबजा घेईच घेई. हृचा बरदास्त ठेवण्याचे कामी हा कुलकर्णी प्राणी मोठा निष्णात. अम्मलदाराच्या मुखामध्ये आपला सेवेचा सुखाचा पक्वानांचा घास कसा काय जातो. ही त्याला सारखी चिंता! ऑफिसरच्या गादीवर चुकून एखादा केस जरी पडला तरी त्याची झोप मोड होईल, येथवर त्याची दक्षता! ऑफिसर तरी काय आमच्या सारखा मनुष्य प्राणीच अशा हृया प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आर्जव शक्तीच्या, लांगुलचालनाच्या, चोमडेपणाच्या भरभक्कम माऱ्यापुढे बिचाऱ्या ऑफिसरचा कितीसा टिकाव लागणार? अशा हृया दाट परिचयामुळे आणि अगदी खासगी सुखसोयीच्या सानिध्यामुळे कुलकर्ण्यांचे गांवात इतके भयंकर वजन आणि प्रचंड दरारा असे कीं, कुलकर्ण्याच्या इच्छेविना गांवांतील काडींसुद्धा हालेनाशी झाली. रयतेच्या कामाचा आरंभ कुलकर्ण्यांच्या चावडीत. त्याला रंगरुप देऊन, चित्राची औटलाईन करुन सगळी तयारी होते ती मामलेदार कचेरीत, आणि अखेरचा सफाईचा हात किंवा फिनीशिंग स्ट्रोक हा वरिष्ट कचेरीत. सर्व ठिकाणी अथ पासून इतिपर्यन्त चढउतार करणेस आणि भरती ओहोटी आणणेस हा कुलकर्णी प्राणी सतत हजर. "हजीर सों वजीर" या न्यायाने येथून तेथून सर्व ठिकाणी सतत उभा राहुन अव्वलच्या सफराईपासून तो अखेर निकालापर्यन्त कुलकर्ण्याचा संबंध असल्यामुळे हा एक बिनमोल प्राणी होऊन बसतो. सरफराईचा केव्हां केव्हां खर्च मर्यादेबाहेर होतो. आणि ती वेळ कुलकर्णी अशा सिताफीने पार पाडतो की, सरकारी नोकरीचा स्टाफ हे कुलकर्ण्यांचे श्रम पाहुन थक्क होऊन जातो. तसाच तितका मिंदाही बनतो.

पण इकडे रयताची स्तिथी फार कष्टाची झालेली असते. ही गोष्ट त्यांच्या नजरेस येत नाही. बिचारा शेतकरी सरकारचा सारा व सावकाराचे व्याज भरतां भरतां त्याचे नाकी नव येतात. जाडे भरडे अन्नही त्याला मिळत नाही. पण सरफराईसाठी कुलकर्ण्याच्या जुलुमाखाली मान वाकवून मुकाट्याने तो दारिद्र्याचे चिखलात जास्ती जास्तीच रुतत जातो कुळकर्ण्याचे वजन लोकावरही फार. आणि तिकडे सरकारी ऑफीसातही फार. केव्हां केव्हां लुच्चा, लबाड आणि स्वार्थी कुलकर्णी मिळाला तर रयतेचे हाल कुत्रेही खात नाही सरफराईचे खर्चाचे बिल १०० रु चे होत असले तर दुप्पट तिप्पट बिल रयतेचे बोडक्यावर येऊन बसते. हा जास्तिचा पैसा कुळकर्ण्याचे खिशांत. क्वचित ऑफीसरचा दौरा कुलकर्ण्यांला इतका फायदेशीर होतो. की

त्याची प्रपंचाची वर्षभराची सोय होते आणि केव्हां केव्हा या निमित्ताने त्याच्या मुलाभुलीच्या लग्नावामाचा खर्चही बाहेरच्या बाहेर होऊन जातो.

आता तलाठ्याकडे पहा. तलाठी सिस्टिमने हा रयतेवरचा जुलूम अजिबात टळला आहे. तलाठ्याला त्या गावी जमीन नाही तो उपलाणा इसम. पगारही वेंताबाताचा. पराई इसम असल्यामुळे लोकांचा परिचयही कमी आणि वजनही कमी. आपले दप्तरचे काम आणि आपण यांतच तो गुंतलेला असतो. गांवातील उठाठेवी छिद्रें पाहणें व चिगळाचिगळी करणें हे त्याला जमत नाही. या पवित्र कार्यास त्याला फुरसतच नसते. वरिष्टाची स्वारी आली तर मानव स्वभावास अनुसरून त्यानां खुष ठेवणे चांगले असे जरी त्याला वाटत असले, तरी त्याच्याने ते होणेच शक्य नाही । उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथः ।। या न्यायाने हे विचार त्याचे मनातले मनातच मरून जातात. कसे तरी करून लोकाशी सलोख्याने वागून चार दिवस काढावेत, हीच त्याची सेवा. ती रयतेकडून कांहीं मागू लागलीं तर देतो तरी कोण ! हा शेतकऱ्याचा पैशाचा झराच बंद झाल्यामुळे सरफराईही मंद होते. आणि हक्काच्या पगार भत्यावरच आपला दौरा पूर्ण पुरा करणें कारकुनाना भाग पडते. अशा रीतीने रयतेवरचा एक मोठा भूर्दंड ऊर्फ सरफराईचा खर्च नाहीसा झाला आहे.

ब्रिटिश सरकारांना आता पूर्णपणें कळले आहे की, मागासलेला वर्ग म्हणजेच खरी लोकशाही. सरकारचे खरे कल्याण चिंतणारे हे रयतच आहेत. आणि सरकारा-वर कल्याणाची जबाबदारी पडणेची तर या रयतेचीच. ग्रामसंस्था, म्युनिसिपालिट्या लोकल बोर्ड, जिल्हा बोर्डे व कौन्सिले ही एका विशिष्ट वर्गाच्याच आजवर हाती होती. लोकशाहीची खरी स्थापना करणें तर ती खेड्यातच केली पाहिजे. तेथे सरकार दप्तर किंवा मुलकी कारभाराचा ओनामा एका ब्राह्मण वर्गाच्या हातात गुंतून ठेवणें केंव्हांही सुखाचे होणार नाही. लोकांच्या वाढत्या ज्ञानाला आणि आकांक्षेला कुलकर्णी वतन अगदी विरूद्ध आहे. सरकारच्या हळुहळु लोकांना स्वराज्याचे हक्क देण्याच्या धोरणाला अगदी विसंगत आहे. वतनी मिजास, परंपरा-शाही ही लोकांच्या स्वातंत्र्याला विघातक आहे. धावत्या गाड्याला खीळ आहे. खेड्याचे वाढीला आडकाठी आहे. स्वतंत्र विचाराच्या प्रवाहात विषाची कालवण आहे. खेडेकऱ्यांना गळफास आहे, विषारी नांगी आहे. ती कित्येक जिल्ह्यातून नष्ट केली आहे हें लोकांचे भाग्य आहे. सरकारनी कशालाही मीक न घालतां, उरलेल्या जिल्ह्यातून कुलकर्ण्यांची वतनी नोकरी नष्ट करून ही आवडती तलाटी सिस्टीम सुरु करावी. आणि खेड्याचे चावडीवर लोकशाहीचा बावटा उभा करावा. अशी आमची आगत्याची शिफारस आहे.

विलक्षण झाला होता. ऑफिसरच्या तोंड धुण्याच्या सोयी पासून, व स्नानाच्या सुखापर्यन्त, वगैरे सर्वंच गोष्टी कुलकर्ण्याच्या हवाली असल्यामुळे त्यांचे जबरदस्त वजन रयतेवर पडे. कुलकर्णीही मोठा हुषार आणि लबाड माणूस, अंगावर माशी बसून न घेणारा, ऑफिसर असला तरी हुषार कुलकर्णी त्याचा कबजा घेईच घेई. ह्या बरदास्त ठेवण्याचे कामी हा कुलकर्णी प्राणी मोठा निष्णात. अम्मलदाराच्या मुखामध्यें आपला सेवेचा सुखाचा पक्वानांचा घास कसा काय जातो. ही त्याला सारखी चिंता ! ऑफिसरच्या गादीवर चुकून एखादा केस जरी पडला तरी त्याची झोप मोड होईल, येथवर त्याची दक्षता ! ऑफिसर तरी काय आमच्या सारखा मनुष्य प्राणीच अशा ह्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आर्जव शक्तीच्या, लांगुलचालनाच्या, चोमडेपणाच्या भरभक्कम माऱ्यापुढे बिचाऱ्या ऑफिसरचा कितीसा टिकाव लागणार? अशा ह्या दाट परिचयामुळे आणि अगदी खासगी सुखसोयीच्या सानिध्यामुळे कुलकर्ण्यांचे गांवात इतके भयंकर वजन आणि प्रचंड दरारा असे कीं, कुलकर्ण्याच्या इच्छेविना गांवांतील काडीसुद्धा हालेनाशी झाली. रयतेच्या कामाचा आरंभ कुलकर्ण्यांच्या चावडीत. त्याला रंगरुप देऊन, चित्राची औटलाईन करुन सगळी तयारी होते ती मामलेदार कचेरीत, आणि अखेरचा सफाईचा हात किंवा फिनीशिंग स्ट्रोक हा वरिष्ट कचेरीत. सर्व ठिकाणी अथ पासून इतिपर्यन्त चढउतार करणेस आणि भरती ओहोटी आणणेस हा कुलकर्णी प्राणी सतत हजर. "हजीर सों वजीर" या न्यायाने येथून तेथून सर्व ठिकाणी सतत उभा राहुन अव्वलच्या सफराईपासून तो अखेर निकालापर्यन्त कुलकर्ण्याचा संबंध असल्यामुळे हा एक बिनमोल प्राणी होऊन बसतो. सरफराईचा केव्हां केव्हां खर्च मर्यादेबाहेर होतो. आणि ती वेळ कुलकर्णी अशा सिताफीने पार पाडतो की, सरकारी नोकरीचा स्टाफ हे कुलकर्ण्याचे श्रम पाहुन थक्क होऊन जातो. तसाच तितका मिंदाही बनतो.

पण इकडे रयताची स्तिथी फार कष्टाची झालेली असते. ही गोष्ट त्यांच्या नजरेस येत नाही. बिचारा शेतकरी सरकारचा सारा व सावकाराचे व्याज भरतां भरतां त्याचे नाकी नव येतात. जाडे भरडे अन्नही त्याला मिळत नाही. पण सरफराईसाठी कुलकर्ण्याच्या जुलुमाखाली मान वाकवून मुकाट्याने तो दारिद्र्याचे चिखलात जास्ती जास्तीच रुतत जातो कुळकर्ण्याचे वजन लोकावरही फार. आणि तिकडे सरकारी ऑफीसातही फार. केव्हां केव्हां लुच्चा, लबाड आणि स्वार्थी कुलकर्णी मिळाला तर रयतेचे हाल कुत्रेही खात नाही सरफराईचे खर्चाचे बिल १०० रु चे होत असले तर दुप्पट तिप्पट बिल रयतेचे बोडक्यावर येऊन बसते. हा जास्तिचा पैसा कुळकर्ण्याचे खिशांत. क्वचित ऑफीसरचा दौरा कुलकर्ण्यांला इतका फायदेशीर होतो. की

त्याची प्रपंचाची वर्षभराची सोय होते आणि केव्हां केव्हा या निमित्ताने त्याच्या मुलाभुलीच्या लग्नावामाचा खर्चही बाहेरच्या बाहेर होऊन जातो.

आता तलाट्याकडे पहा. तलाठी सिस्टिमने हा रयतेवरचा जुलूम अजिबात टळला आहे. तलाठ्याला त्या गावी जमीन नाही तो उपलाणा इसम. पगारही बेताबाताचा. पराई इसम असल्यामुळे लोकांचा परिचयही कमी आणि वजनही कमी. आपले दप्तरचे काम आणि आपण यांतच तो गुंतलेला असतो. गांवातील उठाठेवी छिद्रें पाहणें व चिगळाचिगळी करणें हे त्याला जमत नाही. या पवित्र कार्यास त्याला फुरसतच नसते. वरिष्टाची स्वारी आली तर मानव स्वभावास अनुसरून त्यानां खुष ठेवणे चांगले असे जरी त्याला वाटत असले, तरी त्याच्याने ते होणेच शक्य नाही । उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथः ।। या न्यायाने हे विचार त्याचे मनातले मनातच मरून जातात. कसे तरी करून लोकाशी सलोख्याने वागून चार दिवस काढावेत, हीच त्याची सेवा. ती रयतेकडून कांहीं मागू लागलीं तर देतो तरी कोण ! हा शेतकऱ्याचा पैशाचा झराच बंद झाल्यामुळे सरफराईही मंद होते. आणि हक्काच्या पगार भत्यावरच आपला दौरा पूर्ण पुरा करणें कारकुनाना भाग पडते. अशा रीतीने रयतेवरचा एक मोठा भूर्दंड ऊर्फ सरफराईचा खर्च नाहीसा झाला आहे.

ब्रिटिश सरकारांना आता पूर्णपणें कळले आहे की, मागासलेला वर्ग म्हणजेच खरी लोकशाही. सरकारचे खरे कल्याण चिंतणारे हे रयतच आहेत. आणि सरकारा-वर कल्याणाची जबाबदारी पडणेची तर या रयतेचीच. ग्रामसंस्था, म्युनिसिपालिट्या लोकल बोर्डं, जिल्हा बोर्डे व कौन्सिले ही एका विशिष्ट वर्गाच्याच आजवर हाती होती. लोकशाहीची खरी स्थापना करणें तर ती खेड्यातच केली पाहिजे. तेथे सरकार दप्तर किंवा मुलकी कारभाराचा ओनामा एका ब्राह्मण वर्गाच्या हातात गुंतून ठेवणें केंव्हांही सुखाचे होणार नाही. लोकांच्या वाढत्या ज्ञानाला आणि आकांक्षेला कुलकर्णी वतन अगदी विरूद्ध आहे. सरकारच्या हळुहळु लोकांना स्वराज्याचे हक्क देण्याच्या धोरणाला अगदी विसंगत आहे. वतनी मिजास, परंपरा-शाही ही लोकांच्या स्वातंत्र्याला विघातक आहे. धावत्या गाड्याला खीळ आहे. खेड्याचे वाढीला आडकाठी आहे. स्वतंत्र विचाराच्या प्रवाहात विषाची कालवण आहे. खेडेकऱ्यांना गळफास आहे, विषारी नांगी आहे. ती कित्येक जिल्ह्यातून नष्ट केली आहे हें लोकांचे भाग्य आहे. सरकारनी कशालाही भीक न घालतां, उरलेल्या जिल्ह्यातून कुलकर्ण्यांची वतनी नोकरी नष्ट करून ही आवडती तलाटी सिस्टीम सुरु करावी. आणि खेड्याचे चावडीवर लोकशाहीचा बावटा उभा करावा. अशी आमची आगत्याची शिफारस आहे.

कित्येक ब्राह्मणी पत्रें अलीकडे पुन्हा ही बाब समोर आणीत आहेत. आपले हक्क स्थापन करुन घ्यावेत. सरकारावर दावे लावावेत. असा मोहाचा इशारा, कुलकर्णी लोकांना देत आहेत आणि काही हायकोर्टाचे ठरावही ते दाखवित आहेत परंतु आम्ही साफ सागतो की, कुलकर्णी लोकानी इकडे बिलकुल लक्ष देऊ नये. असे दावे लावल्यास काही दिवस काही वकीलांची वर्णी लागेल. परंतु अखेर कुलकर्ण्यांलाच नुकसान भोगावे लागेल. आणि ही सल्ला देणारे वकील बाजूस राहून, बिचारे कुलकर्णी मात्र फशी पडतील

आमच्या या लेखाचा कोणी विपर्यास करून घेऊ नये ब्राम्हणवर्गाच आमचा द्वेष नाही. कुलकर्णी वर्गाशी आमचे वाकडे नाही कित्येक कुलकर्णी फार सभ्य आणि अत्यंत स्वामिनिष्ट आहेत. आणि कित्येक कुलकर्णी लोकांना त्रास न व्हावा, अशाबद्दलही काळजी वाहतात. परंतु ही उदाहरणें अपवादाची आहेत. आमचा कटाक्ष व्यक्तिवर नाहीं. सुस्वभावी मनुष्य असला तरी सुद्धा या वतनी परंपरेच्या गर्तेत एकदा सापडला तर सद्‌गुणाचा ऱ्हास होऊन, नीच मनोवृत्तीचा विकास होणे अगदी स्वाभाविक आहे. ही कुलकणी वतनी सिस्टिम जगाच्या वाढत्या विचाराला विरोधक असल्यामुळे याउपर माझ्या कुलकर्णी बंधूनीही या मोहात पडू नये आणि सरकारांनी धाडसाने, धडाडीने निर्भिडपणे, एकसहा सर्वत्र तलाठी सिस्टीम सुरू करावी. या कामांत सर्व मागासलेल्या वर्गांचा, खऱ्या लोकशाहीचा पूर्ण पाठिंबा आहे, असे आम्ही आश्वासन देतो.

## ४

## ग्रामसंस्थची रचना

( ३० आक्टोबर १९२५ )

वतनी नोकरी ही समाजाच्या बाल्यावस्थेतील एक चिन्ह आहे. ज्या वेळी व्यवहार फारसे वाढले नव्हते, संबंध गुंतागुंतीचे झाले नव्हते. व्यापार देवघेव व मालाची अदलाबदल ही मोठ्या प्रमाणावर नव्हती. जमीन हेच एक निर्वाहाचे साधन होते, नाण्याचा प्रचात म्हणण्यासारखा नव्हता, अशा वेळच्या ग्रामसंस्था अगदी साध्याच असणार. गावच्या लोकांची उपजीविका व सुखसोयी साध्या व सोप्या होत्या, अशा वेळचा समाज साधाच असणार. तेवढ्यापुरते गांव अगदी

परिपूर्ण होते. ग्रामरचनेत व व्यवस्थेत म्हणण्यासारखे फेरफार होत नसत. पैशांचे फारसे कारण पडत नसे त्यामुळे सर्वांचा गुजारा जमिनीच्या उत्पन्नावरच होई. रयतानी जमिनीत कष्टकाम करून पीक उत्पन्न करावे. जास्त येईल त्यातून, अन्नवस्त्र व सुखाची साधने याला लागणारा खर्च करावा. न्याय, चौकशी, तंटे बखेडे याचा खर्च जमिनीच्या उत्पन्नावरच चाले. पाटील, कुलकर्णी चौगला, तराळ, मगदूम, सनदी, प्यादा, रक्षक, जागल्या वगैरे गांवच्या नोकऱ्या होणेच्या त्याबद्दल पैसा कोठुन येणार? खर्चासाठी पगार अगर मुशाहिरा म्हणून जो देणेचा, त्याबद्दल गांव स्थापण्याचे वेळी त्या त्या गांव नोकरी–बद्दल गांवच्या जमिनीतील तुकडेच देऊन टाकले. वसाहत पक्की व्हावी गांवाला कायमपणा यावा, लोकानी गांव सोडून दुसरीकडे जाऊ नये. आणि नव्या लोकानाही आपल्या गांवी येऊन राहणेची सवलत द्यावी, म्हणून सर्वांना नोकरी पगाराच्या मोबदला कायम वंशपरंपरेच्या जमिनीच देऊन टाकल्या. फार काय गांवी सुतार गवंडी, पाथरवट, तेली, तांबोळी वगैरे साधे कारागीर व उपयुक्त नोकर आले पाहिजेत यासाठी त्यांना आणून जमिनी देऊन टाकल्या. साध्या समाजालासुद्धा करमणूक व आल्हाद हा पाहिजेच. काम धंदा, तंटे, बखेडे व दुसऱ्या लोकाशी लढाया मारणें व मधून मधून मुलुखगिरी करून बाहेरून संपत्ती मिळवून आणल्यानंतर विश्रांती पाहिजे, मनोरंजन पाहिजे, गाणे बजावणें कला–कौशल्य हेही पाहिजे. आणि या कारणासाठी गोंधळी, डवरी, भाट वगैरे स्तुतिपाठ गाणारे व इतिहास पोवाडे करणारे व शास्त्रीय रागरागिणी गाणाऱ्या गुणीजन कलावंतगीलाही जमिनी देऊन त्याची कायमची सोय करून ग्रामसंस्था होता होईल तो सर्व बाजूनी परिपूर्ण करण्यांत आली.

समाज असा बाळपणात असता, रांगण्याच्या स्थितीत असता, पांगुळगाड्याने चालत असतां जमिनीवरील वतनी नोकऱ्या उत्पन्न झाल्या. आणि याच वेळी कुलकर्णी व जोशी ही वतने निर्माण झाली. लिहिणारे वाचणारे लोक थोडे. स्नान संध्या, पूजा अर्चा करून राहणारे थोडे आणि धर्माचरणात काल घालवणारे व वेदादि जुने ग्रंथ पठण करणारे लोकही थोडेच आणि ही कामें प्राचीन कालाच्या विशिष्ट तऱ्हेच्या समजुतीमुळे व संस्कृतीमुळें कुलकर्णी व जोशी ही वतनें फक्त ब्राह्मण जातीतच देण्यांत आली. याला उपायच उरला नाही. सर्व जातीत विद्येचा प्रसार झाला नव्हता. आणि कुलकर्णी काम व जोशी काम याचा विद्येशीं अगदी निकट संबंध असल्या कारणाने ही दोन्हीं वतनें एका ब्राह्मण वर्गातच गुंतून राहिली. त्या वेळी बाकीच्या लोकांना या गोष्टींचे महत्व वाटले नाही. कुलकर्णी व जोशी यांचा चरितार्थ सर्वस्वी शेतकऱ्यावर असल्यामुळें एकमेकाशीं सहानुभूति अगदी आवश्य होती. कुलकर्णी व जोशी लोकांच्या जमिनी कसण्याला रयतच

पाहिजे. या शिवाय बैतेंबलुते मिळण्याचे तर ते रयताकडूनच. एकाची दुसऱ्यावाचून सुटका नाही. अशा स्थितींत ग्राम्यव्यवस्थेतील वेगवेगळीं अंगे आपापली कामे सुखाने करून एकंदरीत गांव सुखामध्यें राहिला.

परंतु स्थिती पुढे टिकली नाहीं. हा नियमच आहे की, ज्याच्या हातात एकवार सत्ता आली ती दुसऱ्याला आपल्या सत्तेचा अंश देऊ इच्छित नाही. सत्ता विद्या, शहाणपण, लिहिणें पुसणें या गोष्टीं ज्या एका ब्राह्मण वर्गाने साधून घेतल्या त्याचा उपयोग त्यानी सर्वांना मिळू दिला नाही. कुलकर्ण्यांच्या हाती राजकीय ज्ञानाची सत्ता आणि जोशाच्या हाती धार्मिक व सामाजिक ज्ञानाची सत्ता. या सत्तेचे हे दोघे बंधु मालक होऊन बसले, पुढे पुढे या ज्ञानाला सोवळचाची काटेरी, कुंपणे, धर्माची कवचे आणि सामाजिक वडचा कल्पनेची कोंडणें इतकी घट्ट करून टाकिली कीं या ज्ञानाचा वास इतर जातीनां लागू नये, इतरांचा प्रवेश या मक्तेबाबींत किवा लायसेन्सात होऊ देऊं नये ह्मणून पद्धतशीर लक्षपुर्वक काळजी घेण्यांत आली. या पवित्र कोठडीकडे इतरांनी पाहूं नये. ही बाब केवळ ब्राह्मणाच्या हक्काची अशा समजुती करून देऊन मंत्र, तंत्र, वेद, स्मृत्या याचा इतका बाऊ करून ठेवला की या गोष्टीला कोणी हात लावला तर तो इसम पाखंडी, धर्मलंड, धर्मद्रोही, देशद्रोही असा त्याचा ब्राम्हणी शिक्कामोर्तब करून त्याला शिक्षा होण्यापर्यंत पाळी आली. केव्हां त्याला देहदंड होई, केव्हां बहिष्काराचे शासन मिळे. राजा क्षत्रिय वर्गातला परंतु त्याच्याही गळचात हा अज्ञानभूषणाचा नांगर अडकून दिला. मी, मी, म्हणणारा क्षत्रिय असो, त्याच्या दारी एका दिडकीने संतुष्ट होणारा भिक्षुक आला तरी त्याने उत्थापन देऊन आपले राजासन क्षणभर तरी त्या भिक्षुकाला दिलेच पाहिजे. अशा वेडगळ समजुती समाजांत पेरुन टाकल्या. परिणाम असा झाला की एक ब्राम्हणवर्ग खेरीज करून बाकीचा सर्व समाज बौद्धिक गुलामगिरीत खितपत पडला. कुलकर्णी सांगेल तो न्याय आणि जोशी सांगेल तो धर्म अशी विलक्षण समजूत होऊन बसली. राजाचे दप्तर चावडीच्या गजात आणि कुलकर्ण्याच्या कुलपात. आणि हिंदुधर्माचे ज्ञान उपाध्येबुवाच्या पंचागांत आणि श्रृतिस्मृतीच्या लोणच्याच्या बरणीत. त्याला दुसऱ्यानी कुणी हात लावावयाचा नाही. आणि ही गुलामगिरी इतरावर इतकी नकळत थंड वाऱ्याच्या झुळकेंत आणि उंदराच्या चाव्याच्या फुकारांत बसत चालली की इतरांना याची कल्पनाच होईना. बाकीचा समाज डोळे असून आंधळा, आणि कान असून बहिरा झाला आहे.

खरी धर्माची तत्वे शुद्ध आत्म्याचे ज्ञान आणि खऱ्या वेदांतील ज्ञानसूर्य बाहेरच्या घाणेरडचा ढगांनी वेडगळ समजुतीनी अंध समजुतीच्या धुळींनी इतका

गुरफटून गेला कीं खरा धर्म कशात आहे हेच मुळी कोणास कळेना. खरी लोकशाही बाजूस पडून ब्राम्हणशाहीचे एक सोवळेशाहीचे साम्राज्य बनत चालले.

धर्माच्या कल्पना हास्यास्पद होत चालल्या. ब्राह्मणी वर्चस्वाची नवीन बांडगुळे कल्पनेतून तयार झाली. खरी श्रुति बाजूस राहून ब्राह्मण वर्गाचे स्तोम माजविणाऱ्या स्वार्थपरायण स्मृतिच वेदतुल्य होऊन बसल्या. नवीन घुसळाघुसळ करून इतिहासात व पुराणात खोटयानाटया भाकडकथा घालून आपले व इतरांचे पुराण हे एक थट्टेचे ठिकाण करून ठेवले. ब्राम्हण हा केवळ पवित्रच नव्हे तर ब्राम्हणाने विष्णुच्या वक्षस्थलावर लाथ मारली तरी विष्णूने त्याचे कौतुकच करावे, असा प्रकार पुराणात करून सोडला. सिंहासनाधीश्वराचा राजदंड सोसेल परंतु ब्राह्मणाचा शाप सहन होणार नाही. वेद हे केवळ ब्राम्हणाच्या तोंडीच आपल्या सौद्याचे पोतडे ठेवणारी भिकारडी वाणी होऊन बसली. घरी दारी, खातां, बसता, उठतां, निजतां वामन पंडितांनी भगवत चिंतन करण्यास सांगितले आहे. तो त्याचा उपदेश थोडयाशा फरकाने इतर सर्व जनांनीं गर्भी-दानापासून सरणावरील कमालमोक्षापर्यंत पदोपद अहर्निश सदैव ब्राम्हणाच्या स्वाधिन होऊन सोळाच्या सोळाशें संस्कारांत सर्व समाज " ब्राम्हण चिंतन करी " आणि ती समस्ताची " लज्जा त्यजुनी " इतका ब्राम्हणभक्त बनला, पूर्ण कपाळ-करंटा झाला ! त्याबिचाऱ्याची गांवची ऐहिक सुखदु:खाची सूत्रे कुलकर्णी आप्पाच्या हातांत आणि स्वर्गनरकाचे रेल्वे टिकिट जोशी कलेक्टराच्या हातांत. युरोपचे पोप एका वाक्यासरशी बाप आजाला वारंटाने देवाच्या बागेत किंवा सैतानाच्या नरकात घालीत. तद्वत आमचे पोपभडजी एका चुटकीसरशी आमच्या पितराना इंद्रसभेत किंवा रौरव नरकात टाकण्यास समर्थ असत. मात्र हे परलोकाचे प्रवासाचे मार्ग उपाध्ये वर्गाने गुळगुळीत करून ठेवले होते. मधले खडक वगैरे फोडण्याला खर्चाचा बोजा ज्याच्या त्याच्या ताकदीवर सोपवला होता. गरीब शेतकऱ्याच्या बापाला स्वर्गांत पाठवणी करणेची तर फार तर चार गाडगी मडकी साधा खण नारळ कसले तरी मांडे कुंडे किंवा एखादे गादीचे रकटे त्यांना चालते. वरच्या पायरीचा माणुस मेला तर त्या मानाने त्याचा प्रपंचही वाढे केव्हां गोप्रदान, अश्वदान, गृहदान अशावर जोशांचा निर्वाह चालतो. एखादा बडा राजा भडजींच्या सुदैवाने वारला तर फर्स्टक्लास डब्याचे तिकीट त्याला देण्यात येई आणि इकडे भटजीचा लवाजमाही वाढे. अशा प्रसंगी या अडत्याची कमिशन पट्टीही भरचक्का असे. हत्ती, घोडे, गाडयाचेही भटजीला दान मिळे आणि केव्हां केव्हां असल्या उत्तरकार्यांनिमित्त साडे तीन हात लांबीच्या सरणांत निजणाऱ्या राजाच्या पुढच्या गुप्त स्वर्गासाठी भरपूर उत्पन्नाची भूमिदानाचीही

इकडे व्यवस्था होई. सोळा संस्कारात कोणताही संस्कार पहा त्यांत ब्राम्हणेतराच्या बोडक्यावर या वामन अवतारी भडजींनी आपला पवित्र पाय ठेऊन त्याला रसातळाला पाठविण्याची काळजी यांनी घेतली आहे. आणि या काळजीचा परिणाम बिचाऱ्या शेतकऱ्याच्या काळजाला भिडुन त्याला कधींही जन्मांत डोके वर काढण्याची संधी मिळत नसे.

५

## पोटभरूचो दुक्कल

अशा ह्या दोन पेंडाच्या दोरखंडांत, दोन दिडांच्या गुळाच्या चरकांत, या दोन पातींच्या कात्रींत, कुलकर्णी व भटजीच्या अडकुत्यांत शेतकऱ्याच्या सुपारीचे डोके फुटून तिच्या शिरानशिरा केसाप्रमाणे कापून शेतकरी वर्ग लोण्याप्रमाणें मऊ झाला, परकी राजांनी आमचे द्रव्य लुबाडले. पतकरले, परंतू ही आमची घरची पोखरण आणि वंशपरंपरेची बौद्धिक गुलामगिरी ही आमच्या बोकांडी इतकी घट्ट बसली आहे कीं धूर भरलेल्या अंधार कोठडीत कोंडून घातल्याप्रमाणें आमचा जीव नुसता गुदमरून गेला आहे. सरकारनी शाळा, कॉलेजे तयार करून ज्ञानाची द्वारे मोकळी केली खरी, पण ती कोणासाठी ? तिचा सर्व उपयोग जोशी कुलकर्ण्यांनांच झाला. डोळयांत बोटे घालून ती फोडून टाकल्याने ब्राह्मणेतराना ती दारेच दिसेनात ! पूर्वीची मगरमिठ्ठी आणि ही नवीन घोरपडमिठ्ठी यांत कांहीच फरक झाला नाही. तोच कुलकर्णी आणि तोच जोशी खेडयातला पंचां आणि धाबळी टाकून दुसऱ्या रुपाने मोठा पगार खाऊन कचेरीच्या चावडीस मोठा राजदंड घेऊन आमच्या डोक्यावर थयथयाट करायला तयार आहेच ! खेडे बरे पण शहर नको. हे छोटे भाई ते वडे भाई. आमची दया कोणालाच नाही. राज्याच्या क्रांत्या झाल्या. डार्विनच्या उत्क्रांत्या झाल्या. तरी आमच्या चुलीचे तीन दगड सुटत नाहीत. आमच्या चटणीभाकरीचे पक्वान व लंगोटीचा ड्रेस हा आमचा वतनी परंपरेचा हक्क आमच्या खडतर नशिबाला लागलेला ढिला होत नाही.

हजारो वर्षे वाट पाहिली. चातकाची मार्गप्रतिक्षा फुकट गेली. उच्चवर्ग कधीतरी आमचे कांहीं चांगले करील याबद्दल आम्हाला आतां बिलकूल आशा नाहीं.

मोठमोठ्या भारदस्त परिषदांच्या ठरावाचा आह्माला अगदीं वीट आला आहे. सुधारलेल्या वर्गांचा स्वार्थ सुटणें शक्य नाही. आमचें झाकलेले डोळे थोडेथोडे उघडूं लागतांच येवढे मात्र ज्ञान आह्मांस झाले कीं हे आमचे जय विजय रक्षक आतां आह्मांला पुरे. आह्माला चांगली अद्दल घडली. हे लोक आमचे कल्याण करतील, हें पाहण्यास आम्हाला आयुष्य पुरले नाही. आमचे कल्याण कशात आहे हे आम्हास कळूं लागले आहे. " आत्मैव आत्मनोबंधुः आत्मैव रिपुरात्मनः " हे गीतावाक्य आम्ही आता कधी विसरणार नाही. वरील मंत्रांची जाणीव आमच्या प्रेमळ ब्राम्हणबंधूनी आम्हांस चांगला खरपूस मार देऊन, हाडेनिहाडे खिळखिळी करून दिली आहे. आतां त्यांना मागणी एकच, आणि ती जिससख्राइस्टने देवाजवळ मागितलेली. ती कोणती तर " बापा माझे मित्रापासून माझें रक्षण कर. " आह्मी थोडा बदल करून म्हणतो — " मायबाप सरकारा आमच्या धर्मगुरूपासून आमचें रक्षण कर. "

चावडी आमची, सरकार आमचें, दप्तर आमचे. त्यावर सर्वांचा सारखा हक्क आहे. एकट्या कुलकर्ण्यांचे बापाचे हे गाठोडे नव्हे. दोन दिवस त्याला काम सांगितले तर कुलकर्णी आम्हास शिरजोर झाला आहे. एक स्वार्थ समोर ठेऊन त्याने आपले काम केले. आम्हाला भीक लावली. आमचे आम्ही पाहून घेतो. सरकारानी बदलेली स्थितीं ओळखली आहे आमचें गांवकाम आमचे हाती दिल आहे. " आमचे वतन आमचे वतन " म्हणून तुम्ही घसा कोरडा केला तरी तुमचे आता कोंणी ऐकणार नाही. त्याचा अनुभव आम्हाला चांगला आला आहे. जोशीबुवांनी आपले पंचाग व आपली हांसबी ही दोन्ही आता बी लिस्टात टाकून द्यावीत. तुमच्या धर्मज्ञानाचे गुप्त गांठोळे आता बाहेर पडले आहे. भ्रमाचा भोपळा फुटला आहे. एकाच गाडग्यात हे लोणचे फार दिवस राहिल्याने त्यांत कीड पडुन घाण सुटली आहे. त्याला आता बाहेरचा ऊन वारा द्यावयास पाहिजे. धर्मांची बाब ही आमच्या कल्याणाची आहे. आमच्या कल्याणाचा जेरबंद यापुढे उगीच तुम्ही आपल्या हातात ठेऊन घामाघुम होऊ नये, आमच्या घोड्याला आतां जेरबंद नको लगाम नको आणि कोणाचे लाथेखालची रिकबीही नको. तूम्हालाही त्या वेदाचे ज्ञान नाही. आणि आम्हालाही गरज नाही. आणि लागलीच गरज तर ती आमची आम्ही पाहून घेऊ.

वतनी नोकरीचे दिवस आतां निघून गेले. निदान कुलकर्णी व जोशी वतनाची शंभर वर्षे तरी पुरी भरली. तो इतिहास आता संपला. चांगली असो, वाईट असो त्यांची कामगिरी झाली. नवाकाळ, नवे विचार सुरूं झाले. जन्मजात उच्चपणा किंवा माणसांचे स्टेटस संपत चालले. स्वतःची कर्तबगारी प्राप्त झाली.

स्टॅटस जाऊन काँट्र्याक्ट येऊ लागला आहे. एकाचे दुसऱ्यावर कृत्रीम वर्चस्व नकोसे झाले आहे. राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा कसल्याहि बाबतीत मी जन्माने थोर, माझा हक्क जास्त, असली वटवट कोणी करुं लागला तर त्याचे मानेवर अर्धचंद्र देऊन, त्याला धराबाहेर घातल्या शिवाय कोणी राहणार नाही जो तो आपले कर्तबगारीवर पुढें येईल. नसेल तर मरुन जाईल. प्रत्येकाच्या " कराग्रे वसते लक्ष्मी, करमध्ये सरस्वती। करमूले तु गोविंदः " हें प्रातःस्मरण अक्षरशः खरे आहे. जो (जन्मा) वरी विश्वासला। त्याचा कार्यभाग वुडाला ।। जो आपणची करीत गेला। तोची भला ।।

ही समर्थाची उक्ती कोण खोटी म्हणेल? वतनी अथवा जन्म हक्काचे थोतांड या गोष्टीचे पुराण आता संपले आहे. त्याच्या नादी सरकारनीही आता लागू नये आणि ब्राम्हण वर्गानेही लागू नये.

कैं. राजर्षी शाहु महाराजांची दिव्य दृष्टी पूर्ण तयार झाली होती. नवा काळ नवा विचार नवा ओघ त्यानी पूर्ण जाणला होता. पार्लमेन्टचे खरे हक्कदार कोण याची जाणीव त्यांना चांगली झाली होती. म्हणूनच रूढीच्या आणि शेकडो वर्षांच्या परंपरेने वतनी हक्काचा आळ आलेला त्यांनी पार तोडून टाकला, आणि किल्ले बुरुज फोडून, सर्वत्र स्वच्छ वाऱ्याचा प्रवाह मोकळा करून, या महत्वाच्या पण कुचंबणीत पडलेल्या कुलकर्णी आणि जोशी बाबीला कायमची मूठमाती दिली. कुलकर्ण्यांनी नरडयाच्या शिरा तुटून तुकडे पडेपर्यंत आक्रोश केला, परिषदा भरवल्या, शिव्याशाप दिले, शत्रुच्या गोटाला जाऊन मिळाले, वाटेल ती रुपे दाखविली, परंतू त्या भीमबहाद्दराने निधडया छातीच्या मर्दाने, कशालाही भीक न घालता, आपला निश्चय कडेला नेला. आणि " पुत्रात् इच्छेत् पराजयं " या न्यायाने कैं. राजर्षिचा पवित्र आत्मा संतुष्ट होईल अशीच राजनीतीची वागणूक आमचे छ. श्री. राजारामही करीत आहेत. हे पाहून आनंदाचे भरते आल्यावाचून राहत नाही! खऱ्या लोकशाहीच्या वाटेत आड येणारीं वतनी हक्काची झाडेंझुडपे मूळासकट उपडून बाहेर फेंकून दिली. तर त्यांच्या पुत्रानीं तो लोकशाहीचा मार्ग स्वच्छ करून सुन्दर वृक्षानी भूषित करण्याचा शांतपणाचा मार्ग सुरूं केला आहे. हे पाहून प्रजेला आनंद वाटल्यावाचून राहणार नाही. महाराज साहेब, आपले प्रत्येक कृत्य आम्ही मोठ्या उत्सुकतेने आणि काळजीने पहात आहोत. आपली राज्यपद्धती खऱ्या लोकशाहीच्या प्रेमावरच आपण आखीत आहांत; आपले प्रत्येक पाऊल प्रेम, प्रतापी वडीलांचे राजनीतीची दिशा, ब्रिटीश सरकारवरील अढळ निष्ठा आणि मनाचा निश्चय ही पूर्णपणे दिसून येतात. आणि कैं. शाहूरायांनी लावलेले लोकशाहीचे प्रत्येक झाड आपल्या प्रेमाच्या आणि जिव्हाळयाच्या उदकाने आपण

वाढवीत आहात, हे पाहून आपल्या प्रजेला सानंद अभिमान वाटत आहे. आपण आंखलेल्या पद्धतीस पूर्ण यश येवो व आपल्या इतिहास प्रसिद्ध संस्थानची कीर्ती सारखी वाढत राहो हीच अपेक्षा.

## ६

## करवीर दरबारातील वतने

( २० नोव्हेंबर १९२५ )

आतां आमच्या करवीर दरबाराकडे बघू, कोल्हापूरच्या वतनी नोकरांचा इतिहास पाहणे हे एक मोठे मौजेचे व फलप्रद काम आहे. या कामीं कै. राजर्षि शाहू महाराज यांनी जे बुद्धिकौशल्य दाखविले आहे ते पाहून कोणासही आश्चर्यच वाटेल आणि त्यांच्या राजनीतीचे कौतुक वाटल्याविना राहणार नाही.

कै. राजर्षि शाहू महाराजांना मराठेशाहीच्या पूर्व वैभवाबद्दल अभिमान होता, व वतनि नोकराबदलचे त्यांचे प्रेमहि तसेच अलौकिक होंते, आपल्या मराठेशाहीचे वैभव श्रीशिवछत्रपतींची पवित्र गादी ह्या तत्वाचा परिवार व प्राचीनच्या सरदार मानकऱ्यांचा मरातब आणि त्यांच्या पूर्वजांनी केलेली अचाट धैर्यांची कामे, ही सर्वदा त्यांचे दृष्टी समोर उभी असत. इतकेच नव्हे तर कोल्हापूरचे राज्य म्हणजे श्री शिवछत्रपतीच्या पुण्यप्रभावाचे प्रत्यक्ष हुबेहुब चित्र कोल्हापुरच्या राजधानीत पहावयास मिळावे, अशी त्यांची योग्य महत्त्वाकांक्षा होती. इनाम जमिनी संबंधाचे अलीकडे त्यानी केलेले नियम, सरंजाम बाबतीत त्यांनी ठरलेले वट हुकुम आणि पहिल्या प्रतीच्या सरंजामपासून तो तहत महार रामोशांच्या क्षुद्र वतनी नोकरी पर्यंत त्यांची अष्टपैलू दृष्टी सारखी फिरत राहिली होती. पूर्वीचे वैभव या वतनी नोकरांच्या दृष्टीपुढे आणून ठेवावे, नोकरीचा त्याना अभिमान वाटावा, ( Majesty of labour ) शारिरीक श्रमाची थोरवी काय आहे, हे या लोकांना पटवून द्यावे अशी महाराजांना अहोरात्र चिंता लागून राहीली होतीं. इंग्रजी राज्याची स्थिती वेगळी आणि आमच्या मराठेशाहीची स्थिती वेगळी. तिकडील राजा विलायतेत, त्याचे राज्य इंग्लंडात. त्याचे सिंहासन लंडनच्या राजधानीत इकडील राज्यकारभार गव्हर्नर सारख्या प्रतिनिधी मार्फत होत असल्यामुळे खालसा मुलखात राजवैभव काय असते हे प्रत्यक्ष पाहण्यास मिळत नाही. परंतु आमच्या सुदैवाने काही हिंदवी संस्थाने अद्याप आपल्या पुरातन वैभवाची साक्ष पटवीत

स्टेटस जाऊन काँट्राक्ट येऊ लागला आहे. एकाचे दुसऱ्यावर कृत्रीम वर्चस्व नकोसे झाले आहे. राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा कसल्याहि बाबतीत मी जन्माने थोर, माझा हक्क जास्त, असली वटवट कोणी करूं लागला तर त्याचे मानेवर अर्धचंद्र देऊन, त्याला धराबाहेर घातल्या शिवाय कोणी राहणार नाही जो तो आपले कर्तबगारीवर पुढें येईल. नसेल तर मरुन जाईल. प्रत्येकाच्या "कराग्रे वसते लक्ष्मी, करमध्ये सरस्वती। करमूले तु गोविंदः" हें प्रातःस्मरण अक्षरशः खरे आहे. जो (जन्मा) वरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला ।। जो आपणची करीत गेला । तोची भला ।।

ही समर्थाची उक्ती कोण खोटी म्हणेल ? वतनी अथवा जन्म हक्काचे थोतांड या गोष्टीचे पुराण आता संपले आहे. त्याच्या नादी सरकारनीही आता लागू नये आणि ब्राम्हण वर्गानेही लागू नये.

कै. राजर्षी शाहु महाराजांची दिव्य दृष्टी पूर्ण तयार झाली होती. नवा काळ नवा विचार नवा ओघ त्यानी पूर्ण जाणला होता. पार्लमेन्टचे खरे हक्कदार कोण याची जाणीव त्यांना चांगली झाली होती. म्हणूनच रूढीच्या आणि शेकडो वर्षांच्या परंपरेने वतनी हक्काचा आळ आलेला त्यांनी पार तोडून टाकला, आणि किल्ले बुरुज फोडून, सर्वत्र स्वच्छ वाऱ्याचा प्रवाह मोकळा करून, या महत्वाच्या पण कुचंबणीत पडलेल्या कुलकर्णी आणि जोशी बाबीला कायमची मूठमाती दिली. कुलकर्ण्यांनी नरडयाच्या शिरा तुटून तुकडे पडेपर्यंत आक्रोश केला, परिषदा भरवल्या, शिव्याशाप दिले, शत्रुच्या गोटाला जाऊन मिळाले, वाटेल ती रूपे दाखविली, परंतू त्या भीमबहाद्दराने निधडया छातीच्या मर्दाने, कशालाही भीक न घालता, आपला निश्चय कडेला नेला. आणि "पुत्रात् इच्छेत् पराजयं" या न्यायाने कै. राजर्षिचा पवित्र आत्मा संतुष्ट होईल अशीच राजनीतीची वागणूक आमचे छ. श्री. राजारामही करीत आहेत. हे पाहून आनंदाचे भरते आल्यावाचून राहत नाही ! खऱ्या लोकशाहीच्या वाटेत आड येणारीं वतनी हक्काची झाडेंझुडपे मुळासकट उपडून बाहेर फेंकून दिली. तर त्यांच्या पुत्रानीं तो लोकशाहीचा मार्ग स्वच्छ करून सुन्दर वृक्षानी भूषित करण्याचा शांतपणाचा मार्ग सुरूं केला आहे. हे पाहून प्रजेला आनंद वाटल्यावाचून राहणार नाही. महाराज साहेब, आपले प्रत्येक कृत्य आम्ही मोठ्या उत्सुकतेने आणि काळजीने पहात आहोत. आपली राज्यपद्धती खऱ्या लोकशाहीच्या प्रेमावरच आपण आखीत आहांत; आपले प्रत्येक पाऊल प्रेम, प्रतापी वडीलांचे राजनीतीची दिशा, ब्रिटीश सरकारवरील अढळ निष्ठा आणि मनाचा निश्चय ही पूर्णपणे दिसून येतात. आणि कै. शाहूरायांनी लावलेले लोकशाहीचे प्रत्येक झाड आपल्या प्रेमाच्या आणि जिव्हाळयाच्या उदकाने आपण

वाढवीत आहात, हे पाहून आपल्या प्रजेला सानंद अभिमान वाटत आहे. आपण आंखलेल्या पद्धतीस पूर्ण यश येवो व आपल्या इतिहास प्रसिद्ध संस्थानची कीर्ती सारखी वाढत राहो हीच अपेक्षा.

## ६

## करवीर दरबारातील वतने

( २० नोव्हेंबर १९२५ )

आतां आमच्या करवीर दरबाराकडे बघू, कोल्हापूरच्या वतनी नोकरांचा इतिहास पाहणे हे एक मोठे मौजेचे व फलप्रद काम आहे. या कामीं कै. राजर्षि शाहू महाराज यांनी जे बुद्धिकौशल्य दाखविले आहे ते पाहून कोणासही आश्चर्यच वाटेल आणि त्यांच्या राजनीतीचे कौतुक वाटल्याविना राहणार नाही.

कै. राजर्षि शाहू महाराजांना मराठेशाहीच्या पूर्व वैभवाबद्दल अभिमान होता, व वतनि नोकराबदलचे त्यांचे प्रेमहि तसेच अलौकिक होंते, आपल्या मराठेशाहीचे वैभव श्रीशिवछत्रपतींची पवित्र गादी हृया तत्वाचा परिवार व प्राचीनच्या सरदार मानकऱ्यांचा मरातब आणि त्यांच्या पूर्वजांनी केलेली अचाट धैर्यांची कामे, ही सर्वदा त्यांचे दृष्टी समोर उभी असत. इतकेच नव्हे तर कोल्हापूरचे राज्य म्हणजे श्री शिवछत्रपतीच्या पुण्यप्रभावाचे प्रत्यक्ष हुबेहुब चित्र कोल्हापुरच्या राजधानीत पहावयास मिळावे, अशी त्यांची योग्य महत्त्वाकांक्षा होती. इनाम जमिनी संबंधाचे अलीकडे त्यानी केलेले नियम, सरंजाम बाबतीत त्यांनी ठरलेले वट हुकुम आणि पहिल्या प्रतीच्या सरंजामपासून तो तहत महार रामोशांच्या क्षुद्र वतनी नोकरी पर्यंत त्यांची अष्टपैलू दृष्टी सारखी फिरत राहिली होती. पूर्वीचे वैभव या वतनी नोकरांच्या दृष्टीपुढे आणून ठेवावे, नोकरीचा त्याना अभिमान वाटावा, ( Majesty of labour ) शारिरीक श्रमाची थोरवी काय आहे, हे या लोकांना पटवून द्यावे अशी महाराजांना अहोरात्र चिंता लागून राहीली होतीं. इंग्रजी राज्याची स्थिती वेगळी आणि आमच्या मराठेशाहीची स्थिती वेगळी. तिकडील राजा विलायतेत, त्याचे राज्य इंग्लंडात. त्याचे सिंहासन लंडनच्या राजधानीत इकडील राज्यकारभार गव्हर्नर सारख्या प्रतिनिधी मार्फत होत असल्यामुळे खालसा मुलखात राजवैभव काय असते हे प्रत्यक्ष पाहण्यास मिळत नाही. परंतु आमच्या सुदैवाने काही हिंदवी संस्थाने अद्याप आपल्या पुरातन वैभवाची साक्ष पटवीत

आहेत. जुन्या काळातील उत्तम गोष्टी जीवाप्रमाणें जतन करून ठेवाव्यात आणि त्यांना पॉलीश देऊन त्याचे पूर्वीचे तेज काय होते हे लोकांना दाखवावे या हेतूने महाराजांनी फार श्रम घेतले. जुने पुराणे दुमालदार अज्ञानाने आणि दारिद्र्याने अगदी मोडकळीस आले होते त्याना महाराजांनी आपल्या जवळ घेतले. आपल्याच रक्तामासाची मंडळी, पण काल चक्राच्या फेऱ्यात पडलेली, हे जाणून महाराजानी कित्येक मागे पडलेले इनामदार दुमालदार. याना प्रेमाने पोटाशी धरून आपल्या राज्यातील अठरा कारखान्यापैकी कोठेना कोठे त्यांची नेमणूक करण्यात आली. खेड्यापाड्यांत खितपत पडलेले, धनवानाच्या कर्जाखाली चिरडून गेलेले आणि लोकांच्या शिव्या खात पडलेले, कित्येकांच्या तरी अंगावर वस्त्र नाही, पोटास अन्न नाही अशा दारिद्र्यात आणि चिंतेत कशीतरी या जगांतील जीवित यात्रा कंठित असलेले, असे अनेक पिढीजाद मराठे लोक इलाख्यांत पसरून राहिलेले होते. त्या लोकांना कोणास मानकरी सदरांत घातले कोणाच्या हुजूर सनदी नोकऱ्या सुरूं केल्या. कोणास घोडी देऊन नवीन शिलेदार पथक तयार केले, कोणास नाईक हवलदाराच्या जागा देऊन उजेडांत आणून सोडले. अनेक लोकांच्या बंद पडलेल्या नोकऱ्या पुनः चालू केल्या आणि सारा माफ करून नवीन मंत्रीमंडळ नवीन शिबंदी आणि नवीन खास विश्वासू नोकर असे तयार करून कोल्हापूर दरबार म्हणजे नवीन अवतार धारण करून आलेले श्री शिवछत्रपतींचे राजमंडळ हुबेहुब त्यानी बनवून दाखविले. कोल्हापुरच्या मराठ्यात या नव्या नोकरीनें नवा जोम आला; ज्या मराठ्याला ऑफिसरच्या दारांत उभा राहुन त्याची गांठ घेण्यासाठी तासाचे तासे वाट पहावी लागे, तो मराठा हल्ली दरबारांत मानकरी बनून आपल्या मूळच्या तेजाने दरबारला शोभा आणीत आहे. निर्जीव झालेल्या संस्थेला त्यांनी आपल्या सामर्थ्याने नवजीवन प्राप्त करुन दिले. जुनी वतनी नोकरी आणि नव्या कालचे नवे विचार यांचा उत्कृष्टमिलाफ झालेला आहे. वतनदारावर महाराजांचे इतके प्रेम होते कीं कांही वटहुकमात त्यांनी 'माझ्या राज्यांत या पुढे केव्हांही इनामी उत्पन्न खालसा होणार नाहीं.' अशी वचने दिलेलीं अढळुन येतात.

ही राजनीती पाहून महाराजाबद्दल लहानापासून थोरापर्यंत किती आदर आणि भक्ती असेल याची कल्पना करावी.

महार लोकांची स्थिती सुधारण्यासाठी त्यानी फारच सायास केले. हलक्या नोकरीचा त्यांचा यापुढे संबंध अगदी तोडून टाकावा म्हणून ऑफिसरांची लाकडे फोडणे किंवा त्यांना वेटीस लावणें या गोष्टी त्यांनी कायद्याने बंद करून टाकल्या ज्या जमिनीचा असल्या घाणेरड्या नोकरीशी प्राचीन कालापासून जोड जमला

होता ती जमीन एकदम इनामांतून कमी करून त्यांनी रयताव्यात दाखल केली. सरकारी वेट वेरोळा व नोकऱ्या तर उठल्या पाहिजेत, काम तर चालले पाहिजे आणि महार तर नोकरीस जुंपणेचे नाहीत. या कारणाने दरबारला इतर जातीचे पगारी नोकर ठेवावे लागले, तो खर्चाचा बोजा दरबारावर फार पडला. पण तिकडे न जुमानता महाराजांनी साफ ठराव केला की, माझ्या तिजोरीवर वाटेल तितका खर्चाचा बोजा पडो पण माझ्या राज्यांत महारांना कोणीही वेठीची हलकी नोकरी सांगणेची नाही आणि तशी नोकरी कोणी सांगितल्यास तो दंडास पात्र होईल'. कोल्हापूरचा महार हा रयतेचा बंदा गुलाम नसून तो इतर रयतेप्रमाणें माझ्या प्रजेपैकीच एक बरोबरीचा हक्कदार आहे.

करवीर राज्यांत कोणीही येऊन पहावें, महारा पोरापासून थोरापर्यंत सर्व वर्गात सारखीच जागृती झालेली आहे. जेथे वतनी नोकरी सुरु केल्याने लोकांचे कल्याण होईल तेथे त्या सुरु केल्या आहेत आणि जेथे वतनी नोकरीने कायमचे दास्यत्व येऊन मनुष्यपणाची हानी होईल तेथे त्या नष्ट केल्या आहेत. राज्य लहानच परंतु थोर पुरुषांच्या हाती पडल्यामुळे कसे उदाहरण घेण्यासारखें होते, आणि एका मनुष्याने मनांत आणल्यास किती लोकांच्या सुखात वाढ करता येते याचा प्रत्यक्ष मासला तेथे दिसून येतो.

हा वतनी नोकरीचा लेख बराच लांबला खरा परंतु माझ्या ब्राम्हणेतर बांधवांना त्याचे खरे स्वरूप प्रगट करून दाखवावे ही प्रबळ इच्छा मनांत असल्यामुळे लेख थोडा जास्त लांबवावा लागला. त्याचप्रमाणें माझ्या ब्राम्हण व्यवसाय बंधूनी कुलकर्णी वतनाचा प्रश्न उत्पन्न करून वतन नोकरीचा संक्षिप्त इतिहास लिहिण्याची मला संधी दिली ह्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

## ७

## कुलकर्णी व जोशी वतन

( २ जुलई १९२६ )

समाजाची सुधारणा स्वतंत्रतेच्या मार्गाने चालू आहे. त्या प्रवाहाची गती मंद आहे. परंतु आत सामर्थ्य इतके मोठे आहे कीं, त्या मार्गाआड पर्वत आला तरी त्याचा चुराडा होऊन जाईल. समाज बाल्यावस्थेत होता. तेव्हां कांही माणसे अधिक शहाणी होती. आणि कांही माणसे ज्ञानात मागे पडली

होती. त्यावेळी शहाण्यांचे वाटेल तसे चालले. चांगले असो वाईट असो, त्या शहाण्यांनी आपली कारकीर्द बरी वाईट पार पाडली. पुढे अज्ञानाचें सज्ञान झाले. ज्याला त्याला आपली शक्ती अजमावता येऊ लागली. एकत्र कुटुंबात इतर मंडळी बाल्यदशेत असतांना, वडील पुढारी, घरचा कारभार पहातो. परंतु अठरा वर्षे झाल्यानंतर ज्याचा तो कारभार पाहू लागतो. कोर्ट ऑफ वार्डस्ने अज्ञानाच्या इस्टेटीची वहिवाट कांही दिवस केली. परंतु २१ वर्षें पुरी झाल्यावरसुद्धा वार्डाच्या ताब्यात इस्टेट देत नाही, असे जर जज्ज म्हणेल तर त्याला कोण जुमानणार ? इस्टेटीच्या कब्जाची चटक लागल्यामुळे, ज्याची मिळकत त्याला देतांना कसेसेच जरीं वाटले तरी, त्याला कांही उपाय नाही. ओढाताण होऊं लागल्यास, तंटा खास होणार. तीच स्थिती या वतनी बाबींची आहे. वतन म्हणजे मक्ता बाब. अमुक एक काम मांझ्याकडूनच झालें पाहिजे, असला पोर दशेतील समाजांतील हक्क कांही दिवस चालेल. पण नेहमी कसे चालणार ? ब्राम्हण वर्ग हा समाजातील पुढारलेला वर्ग आहे. ते समाजाचे नेते. कुलकर्णी वतन म्हणजे राजकारणाची मक्ते बाब. आणि जोशी वतन म्हणजे धर्म कारणाची मक्ते बाब. हे हक्क जन्मावर उभारले गेले. चावडीचे दप्तरची गांठ कुलकर्ण्यांवाचून सुटायची नाही. आणि गांवचे पंचांग व लग्न-विधीसारखे संस्कार हे जोश्यावाचून कोणीही करायचे नाहीत ! अठरापगड जातीपैकी इतर जातीत कोणी राजकारण निष्णात झाला, किंवा कोणी जोतिष शास्त्र विशारद झाला तरी त्याने सरकार दप्तरला हात लावता कामा नये किंवा देवालयात जाऊन शिमगा पुराण सांगेन असे म्हणेल अगर अंतःपट धरुन मंगलाष्टकसह " सुमुहूर्त सावधान " म्हणण्याचे धाडस करील तर, तो राजाचा बंडखोर झाला आणि धर्माचा पाखंडी झाला ! जमाबंदी दप्तरला इतर हस्तांचा विटाळ सोसत नाही, आणि मंगलाष्टकाला इतरांच्या मुखातून आलेले शब्द सहन होत नाहीत. तात्काळ " विटाळ " होतो. कायद्याचा भंग होतो. धर्माचा उच्छेद होतो !

अशी जुन्या काळची परंपरा अजूनसुद्धा कोणी चालवू म्हणेल तर, ह्या स्वतंत्रतेच्या कालात त्यांचे म्हणणें कोण ऐकून घेईल ? आणि त्याला किंमत तरी कोण देईल ? वतन म्हणजे कांही दुसऱ्याची कायमची डोकेफोडी नव्हे. गरज होती. आम्ही मागे पडलो होतो, तोपर्यंत ते कसे तरी चालले. परंतु नेहमीच कसे चालावे ? राजकारण आणि धर्मज्ञान ही सर्वांची समाज मिळकत आहे. एकाच वर्गाचा हक्क कोणी का मानावा ? तो जूलूम सोसण्यास कोण तयार होईल ? हिंदी आय. सी. एस. झाल्यानंतर, युरोपचाच सिव्हल सर्व्हंट

या बड्या जागेवर आला पाहिजे असे सरकार म्हणतील तर ते पटणार कोणाला ? त्याचप्रमाणे गांवचे जमाबंदीचे हिशेब करण्यास सर्व जातीचे लोक तयार झाले तरी सुद्धा, चावडीच्या कट्यावर ब्राम्हण कुलकर्णीच बसला पाहिजे असे कोणी म्हणेल तर त्याचे हसे होईल ! तसेच ऑस्ट्रॉनॉमि शिकून तयार झालेला मराठा राव विद्यार्थी उभा असता पंचागाला त्याने हात लावायचा नाही आणि संस्काराचा स्पर्श त्यांच्या हातून होणेंचा नाही. असे कोणी म्हणले तर तो एक थट्टेचा विषय होईल.

कुलकर्णी व जोशी हे दोघेही वतनदार एकाच ब्राम्हण जातीत जन्मास आलेले. त्यांचे परस्पराशी सूत गोताचे नाते जमलेले. एकाने चावडीत बसून सत्ता चालवायची तर दुसऱ्याने हमवी खांद्यावर टाकून पांच पानाच्या पंचागाच्या अगाध ज्ञानावर रयतेच्या राशीवर अंमल गाजवायचा. दोघेही टोळधाडी पैकीच ! रयतांचे डोळे दोघानीही घट्ट झांकून टाकलेले. अंधळ्या कोशिंबिरीचा खेळ. रयतेची डोळेझांक करून दोघांनी मनसोक्त खेळायचा. एकाने लपायचे दुसऱ्याने शोधायचे, हा आळीमिळीचा डाव खेळून दोघानीही आपापली पोतडी भरली. परंतु त्याबरोबर शेतकऱ्याची दाण्याची मोट रिकामी झाली त्यांची वाट काय ? खेड्यापाड्यात अज्ञान रयतेवर ह्या पुरोहित वर्गाचा मूहूर्तासारख्या निमित्तानी हरघडी आणि पावलोपावली किती त्रास आणि जुलूम होतो याची कल्पना खेड्यात रहाणाऱ्या लोकांना चांगली येते. " टाक पैसा " चा महामंत्र रयतेपासून पैसा दोन पैसेच उकळतो खरा परंतू ते प्रसंग आणि ठिकाणें अनेक असल्यामुळे त्या गरिबाचे भांडे भोके पडून लवकरच रिकामे होते. आणि त्या थेंबाथेंबाचे तळे पुरोहितांचे घरी जमते दक्षणा दिसते लहान परंतु वर्गाच्या आणि घनाच्या प्रमाणाने वाढत असल्यामुळे गरीब शेतकऱ्याला तो भार जबर होतो. शिवाय खरे नुकसान होते ते निराळेच मानसिक गुलामगिरी हा परिणाम समाजाला घातक झाला आहे आणि यातच खरे नुकसान आहे. या वतनी रूढीचा खरा आणि दुष्ट परिणाम म्हणजे " भट्ट सांगे आणि मठ्ठ ऐके. " हा इतका हानिकारक आहे कीं त्यापुढे दक्षिणेची खरोखरी काहीच किंमत नाही.

धर्माचे ज्ञान एकाच वर्गात आणि गाढ अज्ञान बाकीच्या साऱ्या वर्गात ही समाजाची विषम घडी राष्ट्रीय घाताला कारण झाली. देवालयाच्या गाभाऱ्यात बडव्यानी बसून रयतेचा पैसा खोऱ्यानी ओढावा आणि पोत्यानी माडीवर चढवावा आणि महमंद गिजणीच्या सोटयाचा प्रसंग आला म्हणजे

पुजाऱ्यानी दाही दिशा सैरावैरा पोबारा करावा. आणि अर्थशुन्य पोकळ धर्माचा फुकटचा अभिमान इतरानी पाहिजे तर घेऊन आपल्या माना कापून घेऊन देवाचे रक्षण करावे अशी विपरीत स्थिती समाजाची झाली आहे,

देवालयाचे संरक्षण इतर जातींनी काय म्हणून करावे ? एकाने दरवाज्यांतून दुसऱ्याने महाद्वारातून, तिसऱ्याने गरुड मंडपातून, चौथ्याने कासवावरून, पांचव्याने चांदी दरवाज्यातून, सहाव्याने मुख्य गामाऱ्यांत येऊन आणि सातव्याने खास स्पर्श करून आणि आठव्याने प्रत्यक्ष अभिषेक करून देवदर्शन घ्यावे आणि पुजा करावी अशी भेदनीती आणि उच्चनीचपणा ज्या पुजाऱ्यांनी आणि पुरोहितानी निर्माण करून समाजात खोटी शिडी तयार केली आहे त्या देवाचा, त्या धर्माचा, त्या आचार विचाराचा आणि असल्या पोटभरू पुरोहितांचा अभिमान इतर ब्राह्मणेतरांनी काय म्हणून बाळगावा ?

## ८

### ग्राम जोशी बिल

( ९ जुलई १९३६ )

हिंदूचे संस्कार हे आम्हाला नसते थेर वाटत आहे. खुद्द ब्राम्हण समाजांतच पाहिले तरी "लग्न मुंजीचे" खरे धार्मिक स्वरूप पुरते नष्ट होऊन तो एक बडेजावीचा, थाटामाटाचा, आपल्या संपत्तीचा आणि चैनीचा व उधळपट्टीचा देखावाच होऊन राहिला आहे. आणि पाक शास्त्राचे एक टोलेजंग प्रदर्शनच होऊन बसले आहे. ब्राम्हणाचे असो, ते धनवान आहेत आणि त्यांनी आपल्या संपत्तीची आतषबाजी केली तरी ते त्यांना झेपण्यासारखे आहे. पण हे संस्काराचे लिफडे आणि त्याद्वारे, मंडपात ब्राम्हण पुरोहिताचा हक्काचा प्रवेश आणि आमच्या मानसिक गुलामगिरीचे स्मारक हा आखाडा आम्हाला नको आहे. ते लग्नविधीचे अवडंबर आणि ते उत्तर कार्याचे गंडांतर ब्राम्हणाचे हातूनच झाले पाहिजे ही सक्ती कोणालाही सोसणारी नाही. खरोखर पाहता हे संस्कार ज्याचे त्यांनीच करण्याचे आहेत. वधुवरानीं एकमेकाच्या हातात हात घालणें, आणि ते चार मंडळीसमोर. संपले. इतक्या साध्या आवश्यक

गोष्टीत 'भट्ट' पडल्यामुळे इतके गुंतागुंतीचे जाळे बनून राहिलें आहे की, गरिबाने या लग्न संस्कारातून सुखासमाधानाने बाहेर पडणें म्हणजें एक मोठी सत्वपरिक्षाच होऊन बसली आहे. संस्काराचे मुळचे हेतूच सारे नाहींसे झाले आहेत. मग हा मध्ये भट्ट कशाला ?

बॉम्बे हायकोर्टकडुन कांही ठराव ग्राम जोश्यांच्या वतीनें झाले आहेत. ही गोष्ट खरी. परंतु त्यात विशेषत: रूढीकडेंच पाहिलेले दिसते. तसेच कांही ठराव जोशाविरूद्धहीं आहेत आणि त्यांत मत स्वातंत्र्यालाही महत्त्व दिले आहे. ब्राम्हणे-तरांतही कोणी अजून असे लोक असतील की ते ब्राम्हण पुरोहिताकरवीच आपले संस्कार झाले पाहिजेत असे म्हणत असतील. तर त्यास आंम्ही काय करणार ? देव त्यांचे भले करो ! ज्याला त्याला मत स्वातंत्र्य आहे. परंतु कोणी इसम ह्या ब्राम्हणी बडेजावाला कंटाळला असेल आणि सर्व संस्कार दलालावाचून आपले आपणच करील तर त्याला आडकाठी कां ? किंवा एकटयाचे हातून होत नसतील तर मदतीस कोणा इसमास घेतले आणि आपले कार्य शेवटास नेले तर त्याला तरी हरकत काय म्हणून ? धर्मसंस्कार हे ज्याच्या त्याच्या पारमार्थिक हितासाठी आहेत. जो वाटेल त्या मार्गांने वाटेल त्याच्या सहाय्याने हे काम करील. असे विचार हल्ली समाजात उत्पन्न झाले आहेत. आणि ते ब्राम्हण वर्गाच्या तुसडया वागणुकीचेच फल आहे. मध्येच कोणी " टेंकुजी " येऊन म्हणेल कीं हा माझाच हक्क आहे, मग तो " टेकुजी " ब्राम्हण असो, मराठा असो, नाही तर मसण्या असो, आपला हक्क म्हणून सांगू लागला तर " अर्धचंद्रं दत्त्वा " त्याला बाहेर काढणें प्राप्त आहे. अशी " तिस्मारखानी " आता कोणी चालू देणार नाही.

" भट्टांचा बैठा हक्क " हे नुसते ढोंग आहे. कोणी काम फुकट करील, कोणी मोबदल्याने करील, आणि तो वाटेल त्याजकडून करील, अडूनच राहिले तर एखाद्या ब्राम्हणाकडूनही कोणी करील ही गोष्ट ज्याच्या त्याच्या मर्जीची आहे. " मीच संस्कार करणारा " असा दीड शहाणा आम्हाला नको आहे. हा मत स्वातंत्र्यावर आणि इच्छा स्वातंत्र्यावर हल्ला आहे. तेंव्हा ग्राम जोश्यानी असल्या तुसकट हक्कासाठी वाद मांडुन लोकांना दुखविण्यांत कांही अर्थ नाही गोडी मागेच निघून गेली आहे. काल पुढे धावत चालला आहे. तो कोणाच्या देवाला थांबत नाही, म्हणून समाजात गोडी रहावी आणि आजवर खाल्लेल्या अन्नाचे स्मरण ठेऊन, माणुसकीच्या हक्काला मान देऊन, जोशी बिलाला मुकाटयाने आणि आनंदाने मान लववावी हे चांगले. या उपर ज्याचे त्याने अनहित केले। यांत कुणाचें काय बा गेले ।। श्रीयुत बोले साहेब यांच्या जोशी बिलास आमचा मन:पूर्वक पाठिंबा आहे.

## ब्राम्हणेतरांच्या उत्पन्नाची वाट काय ?

कुलकर्णी आणि जोशी उपाध्ये ही वतने केवळ ब्राह्मण जातीतच गुंतून पडली आहेत.

पैकी कुलकर्णी वतने मुंबई इलाख्यांत बऱ्याच जिल्ह्यातून ब्रिटिश सरकारनी कमी करून टाकली आहेत. आणि करवीर संस्थानात सर्वत्र नाहीशी केली आहेत. या विधानाचा कित्येक वेळा मुद्दाम गैरसमज केला जातो. म्हणून आम्ही स्पष्ट खुलासा करीत आहोत. कै. राजर्षि शाहु महाराजानी लोकशाहीचे धोरण लक्षात ठेवून हे कार्य केले आहे. त्यावरून धंद्याचा गांवच्या कुलकर्णी कामाचा मक्ता जो एका ब्राम्हण वर्गातच बांधुन ठेवलेला होता, त्याची चतु:सिमा फोडून सर्व जातीत खुला करून दिला.

आज कोल्हापुराविरुद्ध ब्राम्हणी पत्रांचा जो गवगवा आहे, त्याचा सरळ मनाने विचार केल्यास दोष देण्याला खरोखरीच जागा रहाणार नाही.

ब्रिटीश मुलखात जे केले आहे तेच करवीर संस्थानात केले आहे. त्यांच्या जमिनीला बिलकूल हात लावलेला नाही. उलट त्या जमिनी निवळ रयताव्यांत घालून कुलकर्णी लोकांचा फायदाच करून दिला आहे. दहावीस रूपड्यांच्या बेडीत पाय अडकून घेऊन, बारा महिने गांवची तराळकी करण्यात आणि वरिष्टांची पायधरणी करण्यात व आकडम् तकडम् कुठले-तरी कसलेतरी चार पैसे उचलण्यात ब्राम्हण गुरुवर्गाचा जो आयुष्यक्रम चालला होता, त्याला धक्का देउन त्यांना धंद्याला चारी दिशा मोकळ्या केल्या, आणि वतनी अॅक्टखालचे पायबंद तोडून टाकल्यामुळे, जमिनीवर त्यांची मालकी पूर्ण स्वातंत्र्याची स्थापिली गेली. म्हणूनच आम्ही म्हणतो कुलकर्ण्याचा नुकसानीऐवजी उलट फायदाच झालेला आहे.

वतनीबाबी म्हणजें धंद्याच्या वतनी बाबी. त्यामुळें इतर धंद्याना आणि इतर लोकांना स्वातंत्र्यास आडकाठीं येते. राजकारण आणि धर्म विचार, हे हक्क लोकांचे जीव कीं प्राण आहेत. त्याची सूत्रे आणि नाड्या एका ब्राह्मण जातीच्याच हाती ठेवून दिल्यामुळे, इतरांची गळचेपी करण्याला ब्राम्हण वर्गाला संधी मिळाली होती पैकी कुलकर्ण्यांचा काम करण्याचा हक्क नष्ट झाल्यामुळे, सर्व वर्गाना उसासा टाकण्याला आतां सवड झाली आहे.

ब्राम्हण वर्गात आणखीही वतने आहेत. देसाई, देशपांडे, नाडगौडा, मुजमदार वगैरे. पण ही वतने इनाम कमीशन आणि गार्डन सेटलमेंटनी नाहीशी

केली आहेत. त्यावर जुडी बसवून त्यांची कामे बंद केली आहेत. ब्राम्हणेतर वर्गांत चौगुला, मगदूम तराळ वगैरे महत्त्वाची वतने आहेत, आणि डौरी, गोंधळी न्हावी, परीट, सुतार, कुंभार वगैरे वतनी नोकऱ्या आहेत. ही वतने तरी कां ठेवावीत ? असा आक्षेप भालाकारासारख्या कांही ब्राम्हण पत्रकारांचा येतो. त्यास आमचे उत्तर खाली लिहिल्या प्रमाणें आहे.

या वतनी नोकऱ्या, जवळ जवळ नाहीशा झाल्याच आहेत. आणि या नोकऱ्याचे स्वरूपच असे आहे की, हे लोक नोकरीचे निमित्त पुढे करून दुसऱ्या कोणाच्या डोक्यावर नाचत नाहीत, आपल्या जातीवर्चस्वाची शेखी मिरवीत नाहीत. ब्राम्हणी भिक्षुकाप्रमाणे भिक्षा तर मागायचीच, पण धडीपगडी आणि अंगरखा घालून, हरदासी थाटमाट करून, यजमानांच्याच तक्याचा अधिकार उपटून, पैसा दोन पैसा दक्षिणा घेऊन जावयाची, तशी गोष्ट ब्राम्हणेतर वतनी नोकर करीत नाहीत. वतनदार न्हावी आपला धंदा करीतच आहेत. इकडे अनेक गृहस्थ जिलेट सेफ्टीरेझर बाळगून आपली नोकरी आपण करीत आहेत. अनेक मराठे गृहस्थ, सुतारकी, लोहारकी, पाथरकी गवंडीकाम स्वतःकरून पोट भरत आहेत. सोनार काम, शिंपी काम, तर ब्राम्हणातसुद्धां सर्व जातीचें लोक सरसहा करीत आहेत. गाणेबजावणें, तबला पेटी, ही कामेही ब्राम्हणांसुद्धां सर्वातच सारखी चालू आहेत. परंतु कोणी बलुतेदार किंवा वतनी हक्कदार इतरांच्या आडालाही येत नाहीं. किंवा तंटाबखेडा नाही किंवा या धंद्यामुळे सोवळेपणा किंवा उच्चनीचपणाही प्राप्त होत नाही. हा धंद्याचा संकर मनुस्मृतिच्या कालापासून आज तागायत सारखा चालू आहे. पाश्चात्य सुधारणा आणि कला जसजशा या देशांत येतील तसतसा हा कर्म संकर किंवा धंदे स्वातंत्र्य खास वाढत जाणार यांत कांही शंका नाही. आणि यापुढेही कोणी इसम आपल्या वतनी नौकरीचा नांगर गळ्यात अडकवून घेऊन गांवोगांव फिरत राहील तर तो देशोधडीला लागल्या वांचून राहणार नाहीं !

जाती घट्टमुट्ट करण्याचा वेडगळ प्रयत्न झाला, त्याची कटु फळे आज आमचा देश भोगीत आहे. त्यातल्या त्यांत सुदैवच ह्मणायचे की, धंद्याची जातवारी मात्र टिकली नाही.

ब्राम्हणानीच आपला खरा मुळचा धंदा, " अध्ययन अध्यापनाचा " फेकून देऊन इतर धंद्यात पाय घातला. आणि त्याच दिवशी त्यांचा धर्म बुडाला ! त्यांची जात बुडाली ! आणि त्यांचा सोवळेशाहीचा बालेकिल्ला जमीन दोस्त झाला !

ब्राह्मण जर हलके धंदे करू लागले तर त्यांचा उच्च गुण रहाणार कसा ? टांगे हाकण्याचे धंदे ब्राह्मणच जर करू लागेल तर " शमोदम: सारखा " उच्च गुण त्यांच्यात राहील कसा ? एवंच वतनी नोकरीचा पुढेही हट्ट धरू नये.

ब्राह्मणेतर वतनी नोकरांनी आपल्या वतनी नोकरीचा हट्ट धरला नाही. कधी दुसऱ्यास कमी मानिले नाही. समाजाच्या वाढीला, बुद्धीच्या विकासाला किंवा राजकारणाच्या स्वातंत्र्याला याचा कोठें प्रतिबंध झालेला नाही. " माझ्याशिवाय ही नोकरी कोणाला करता येणार नाहीं किंवा दुसऱ्या कोणाला ती करुं देणार नाही. " असला भलताच आग्रह बाकीच्या वतनदारानी धरला नाही. त्यानी आपली कृत्रीम जात उठवून दिली नाही. सर्वांशी ते मिळून मिसळून वागत आले आहेत आणि सर्वांची नोकरी पेशा सुखासमाधानी करीत आहेत. म्हणून इतर वतनी नोकऱ्या चालू ठेविल्या किंवा नष्ट केल्या तरी त्याचा चांगला वाईट परिणाम समाजावर कांही होणार नाही. याच कारणासाठी या नोकऱ्या वगळून कुळकर्णी आणि जोशी या वतनी नोकरावर समाजाची वाकडी नजर आहे.

करवीर संस्थानात जोशी वतन म्हणजे काम करण्याचा हक्क, जरी आहे तसाच ठेविला, तरी समाजच आतां जागा झाला आहे. श्रीक्षात्र जगद्गुरूच्या नजरेखाली चालू असलेले वैदिक विद्यापीठ, आणि सत्यसमाज मताचा वाढता प्रसार, यांचे कार्य या समाजांत इतके मोठे चालू आहे कीं, प्रत्येक इसमाला धर्म विधीत आणि संस्कारात भरपूर स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. कितीएक लग्ने मराठा वैदिक विद्यार्थ्यांकडून आणि सत्यसमाजाकडून होत आहेत; कोणी कोणालाही कसलाही अडथळा करीत नाही. जोशी बिला सारखा लिखित कायदा येथे नसला तरी त्याचा अंमल मात्र संस्थानात सर्वत्र चालू आहे. आणि या स्वातंत्र्यामुळे वैतागलेला कोणी ब्राम्हण ग्राम जोशी वर्दळीला आला किंवा डोक्यात राख घालून फिरूं लागला, असे उदाहरणही आमचे ऐकिवात आलेले नाहीं !

# ९

## बाकीच्या वतनी नोकऱ्या कां कमी करीत नाहीत ?

महाली हक्कदार खुतातील देसाई, देशपांडे वगैरे उच्चप्रतीच्या नोकऱ्या बंद होऊन पुष्कळ वर्षे झाली, याचा उल्लेख आम्ही पूर्वीच केला आहे, कुलकर्णी आणि जोशी वतनाचा संबंध लोकांच्या प्रत्यक्ष सुखदु:खाशी कसा पोहोचतो, याचेही विवेचन यावेळपर्यंत होऊन गेले आहे. सरकारच्या नोकरीशी एकाच ब्राम्हण जातींतील नोकराचा संबंध असणें चांगले नाही. लोकांच्या वाढत्या राजकीय सामाजिक विचाराला ही एक आडवी धोंड येऊन पडत होती, ती दूर करणे हे सरकारचे कर्तव्य आहे, या गोष्टीचा येथवर विचार झाला. आता बाकीच्या जमीनीवरच्या नोकऱ्या तरी का ठेवाव्यात असा एक प्रश्न आमच्या ब्राह्मण व्यवसायी बंधूंनी काढला आहे, त्याचा या लेखात विचार करावा, अशी इच्छा आहे.

नोकऱ्या दोन प्रकारच्या आहेत. कांही उच्च दर्जाच्या कांही हलक्या प्रतीच्या, सरकारच्या प्रत्यक्ष कारभाराशी ज्यांचा संबंध येतो, सरकार खजीन्याच्या पैशाची आवक जावक ज्या नोकऱ्यावर अवलंबून असते ज्यांची हुकमत लोकांच्या कल्याणास किंवा अकल्याणास कारणीभूत होते. आणि सरकारच्या पैशाचा नगदी हिशेब आणि जमाबंदी ही दप्तरची कामे, ज्या नोकराशी ग्रंथीत झालेली असतात, त्या नोकऱ्या उच्चप्रतीच्या असे आम्ही मानीत आलो आहोत, पंतप्रतिनिधी, पंतसचीव, पंतअमात्य वगैरे मंत्रीमंडळी, याचा राज्याशी व परकीयाशी महत्वाचा दर्जा असतो हे उघड आहे. देसाई, देशपांडे, देशमुख, नाडगौन्डा यांच्या प्रांताच्या सरकारच्या वसूलाशी प्रत्यक्ष संबंध पडतो म्हणून या नोकऱ्या उच्चदर्जाच्या ठरल्या होत्या, तथापी या नोकऱ्या वंशपरंपरेच्या ठेवण्यात हित नाही. या घराण्यातून नेहमी चांगलेच नोकर मिळतील असा भरंवसा नाही. म्हणून या वतनी सरंजामी नोकऱ्या अजिबात कमी करून पगारी नोकर सरकारनी आणले. रोख पैशातून वाटेल तेव्हां योग्य, लायख, विद्वान माणूस मिळू लागला. कुलकर्ण्यांची तीच अवस्था. या नोकऱ्या पूर्वीच बंद व्हावयास पाहिजे होत्या, परतु परिस्थिती प्राप्त झाली नव्हती, या कारणाने निरुपाय म्हणून हा गांवगाडा कुलकर्ण्यांच्या हाकण्याखाली कसा तरी आजवर

आढीत आणला. पण आता कुलकर्ण्यांचे काम करण्यांस सर्व जातीत वाटेल तितके लोक मिळू लागले म्हणून तलाठी सिस्टीम सुरू केलीं. आणि ती लोकाना सुखाची वाटत जाऊन गांवच्या कारभारात तलाठ्याच्याद्वारे आपल्या सर्वांचे अंग सामील होत चालले असा अनुभव लोकांना येऊ लागला आणि हळूहळू ही तलाठी सिस्टिम सर्वत्र लागू केल्यास, खेड्यातील लोकांना सरकारानी राज्य-कारभाराची एक प्राथमिक शाळाच उघडून दिली, असे होऊन ही एक सुखाची क्रांतीच होईल असे आम्हास वाटते.

आता बाकीच्या हलक्या जमीनीच्या नोकरीची वाट काय? हा एक प्रश्न उभा राहतो. या पैकीही कांही पूर्वीच उलघडून गेल्या आहेत. पूर्वीच्या ग्रामरचनेत मनोरंजनासाठी म्हणून कांही सुखाची साधने करून ठेवली होती. मुलूखगिरीच्या दिवसांत वीरांचे पोवाडे तयार करून गाणारे लोक होते. असे भाट, गोंधळी, डवरी वगैरे व शास्त्रीय पद्धतीत गाणाऱ्या नायकिणी व गवई यानाहीं जमिनी दिल्या होत्या पण जुनी ग्रामव्यवस्था आता पुरेनाशी झाली, बाळपणाचे आंगडे टोपडें मोठ्या मनुष्याचे अंगास येईनासे झाले. मोठ्या प्रमाणावर जलसे नाटके वगैरे खेळ निर्माण झाले आणि या संघशक्तिची कामे थोड्या पैश्यांत लोकांना उप भोगण्यास मिळू लागली, म्हणून गोंधळी वगैरे लोकांना बाजेइनाम नांवाचे खुतात ज्या जमिनी इनाम दिल्या होत्या, त्यावरच्या नोकऱ्या एकदम बंद करून त्यावर सरकारानी रीतसर सारा बसवला, त्याला जुडी असे म्हणतात. या जमीनी आज जवळ जवळ रयताव्या सारख्या आहेत. झाल्या आहेत आणि या लोकांना बहुतेक नोकरीतून मुक्त केले आहे. इनामदार, दुमालदार वगैरे यांना पूर्ण गांवे अगर मोठ्या प्रमाणावर जमिनी दिल्या होत्या. त्याचा हेतु परचक्राचे प्रसंगी किंवा मुलुखगिरीवर जाणेचे वेळी, आपआपली लहान लहान फौजफाटा बरोबर घेऊन सरंजामानिशी राज्यांचे पाठीस मदतीसाठी सज्ज होऊन उभे रहावे हा होता. ही आमची प्राचीनचीं "फ्यूडल" सिस्टिम होती. ही गोष्ट लक्षात घेताच इतिहास वाचणाऱ्यांना नार्मंडीच्या विल्यम धि कॉंकररची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. इंग्लंडवर स्वारी करून त्याने तेथे हीच सरदार दुमालदार पद्धती लागू केली होती आणि ती अजूनही तेथे पुष्कळांशी चालू आहे हे पाहून कौतूक वाटते. असो इकडे आता राजशाही बदलली आहे. मराठेशाही नाहीशी होऊन इंग्रज बादशाही चालू झाली आहे परराष्ट्राशी संबंध आणि युद्ध तहनाम्याच्या बाबी सरकारनी सर्वस्वी आपले हाती ठेवल्या आहेत. सुधारलेली लढणेची पद्धती, कवायती सैन्य शिस्तीचे आरभार आणि उच्चप्रतीचा दारू गोळा

अशी साधनें सरकारांनी सुरु केली आहेत. एका नजरेखाली एका शिस्तीत खडे कवायती सैन्य ठेवण्याची युरोपियन पद्धती येथे अंमलात आल्यापासून जुयान पद्धतीचे इनामदार दुमालदार याचे आतां कांही कारण उरले नाही. सरकारना हा बारभाईचा कारभार लढाईचे कामी सोईचा वाटेना; या सैन्याची गरज उरली नाही म्हणून याही पोलिटिकल नोकऱ्या सरकारनी अजिबात कमी करून टाकल्या. या लोकांस घरी बसणेस सांगितले, आणि त्यांचेकडून नोकरी ऐवजी रोकड पैसा घेण्यात येऊ लागला आणि त्यास नोकरी अंश किवा खंडणी असे नांव देण्यांत आले,

पूर्वी ज्यावेळी लँड रेव्हेन्यूकोड लागू नव्हता, अशा वेळी सरकारचा महसुल वसूल करणे ही भारी जड व जबाबदारीची कामे पाटील कुलकर्ण्यांवर पडत होती, परतु हळू हळू जमीन महसुलाचे कायद्याचा अम्मल जसा जसा होऊ लागला तस तसे लोकाना कायद्याचे ज्ञानही होऊ लागले आणि आणि शेतीपासून उत्पन्न होणाऱ्या धान्याची किमत वाढत चालली आणि सरकारानाही अनुभव येत चालला की आता जमिनींचा वसूल करणे ही काही गोष्ट कठीण नाही. शेतसारा आता रयताकडून यंत्राप्रमाणें सुसूत्र वसूल होत आहे. या बाबीसाठी चावडीला पूर्वीप्रमाणें गावसनदी म्हणजे शेंतसनदी लोकांची संख्या पूर्वीप्रमाणें मोठी ठेवणेचे कारण नाही. मोठ्या कसब्याचे गावास जेथे पूर्वी हप्त्याचे वीस शेतसनदी पुरत असत, तेथे हल्ली ते काम चार पाच शेत सनद्याकडून सहज होऊ शकते. पूर्वीइतक्या गावसनदींची हल्ली जरूरी नाही. या कारणाने इंग्रज सरकारने राज्यात अगदी जरूरी पूरते थोडेसे शेतसनदी चावडीवर ठेवून बाकीची सर्व सनदी इनांमे खालसा करून टाकली आणि त्या नोकऱ्याही कमी केल्या. मामलेदार किंवा प्रांत यांच्या स्वाऱ्या गावगन्नावार फिरतीवर ज्ञातात त्या प्रसंगी गावाला कामाचा बोजा पडतो, तसेच गावाचा आणि तालुक्याचा नित्याचा संबंध असल्यामुळे शाळा चावडी यांचा पत्रव्यवहार तालुक्याशी सारखा चालू असतो. गावची शिबंदी गावरक्षणापुरती पाहिजे आहे. गावची रखवालदारी गावचा घस्त पहारा, लोकांच्या वित्ताचे व प्राणाचे रक्षण करणे अवश्य आहे. या गोष्टीकडे लक्ष देऊन सरकारनी जरूर तितके शेतसनदी व तराळ तहशीलदार महार रामोशी जागल्या या वतनी नोकऱ्या कायम ठेवल्या आहेत. आणि त्या तशा ठेवणे जरूर आहे. या वतनी नोकऱ्याने रयताच्या कसल्याही ज्ञानाला अडथळा येत नाही. यांचा सामाजिक चालीरितींशी उच्चनीचपणाच्या भावना जोशी कुलकर्णी निर्माण करतात त्याप्रमाणें होत नाही. महार, रामोशी वगैरे नोकर अगदी हलक्या प्रतीचे हरकामे, अगदी जरूरीचे, आणखी गावाच्या संरक्षणास अवश्य असे आहेत.

त्यांचा पूर्व इतिहास आणि हल्ली गावचे लोकांशी त्यांचे संबंध याचा विचार केला म्हणजे कोणासही या लोकाबद्दल प्रेम आणि दयाच उत्पन्न होईल. यांच्या वतनी नोकरीने लोकांच्या वाढीला अडथळा किंवा कुचंबणा होत नसून उलट ते सरकारला सोईचे आहेत आणि रयतेच्या सुखाला पोषकच आहेत. म्हणून या वतनी नोकऱ्या कां ठेवल्या त्याचा उलघडा होतो.

★ ★ ★

# ब्राम्हण ब्राम्हणेतर वाद

विश्वामित्र क्षत्रिय होते. ते आपल्या तपोबलाने अखेर ब्राम्हण वर्णात समाविष्ट झाले. या पुढचे परशुरामाचे उदाहरण मात्र फार कमीपणाचे वाटते. त्यांचा बाप जमदग्नी त्याला ब्राम्हण कसा म्हणावा कळत नाही. तो फार तामसी व क्रूर होता. त्याची बायको रेणुका ही क्षत्रियाची मुलगी. नदीला स्नानाला गेली असतां, कुठल्यातरी एका राजाकडे तिने पाहिलें. एवढ्या अपराधाबद्दल तिला फांशीची शिक्षा. आणि ती कोणाकडून तर त्यांचे चिरंजीव परशुराम यांचेकडून ! जमदग्नीस ६ मुलें होती. त्या प्रत्येकास बापाने सांगितले कीं आईचे वरील अपराधाबद्दल तिला ठार मारावे. कोणी ऐकेना. हे कनिष्ट चिरंजीव परशुराम उठले आणि त्यांनी परशुने आपले जन्मदात्री मातोश्रीचा गळा तोडला. शमदमादी गुणप्रधान ब्राम्हण वर्गातील या आडनांवी ब्राम्हणाने मोठे काम केले ! मुडदे फरासाचे काम करतांना मुद्दां हल्लीचे काळीही क्रूर कर्म करणाऱ्यालाही दया आली असती. यापुढची आणखी कामगिरी तर फारच मोठी. या भारत वर्षात क्षत्रीय राहूच द्यावयाचा नाही. अशी यांनी प्रतिज्ञा केली. आणि २१ वेळा निःक्षत्रिय पृथ्वी करण्याचा फुका गोंधळ घातला. याच आधारावर हल्लीचे ब्राम्हणांना जागा झाली आहे कीं, आतां कलियुगांत क्षत्रीय उरले नाहीत. आणि मग रामकृष्ण हे कोण ? आणि कौरव पांडवांचे युद्धांत लढण्यास आलेली मंडळी कोण ? हे क्षत्रिय नव्हेत काय ? यापुढेही असाच हा द्वेष वाढत चालला.

पुढे पुढे पुरोहित क्लास दुराग्रहि, हट्टि निपजत चालला. आणि यज्ञ-यागाच्या मिषाने स्वतःची महती व मांसाहाराची त्याची इच्छा इतकी प्रबळ झाली कीं यज्ञात पशुपक्षांचे ढीगच्या ढीग मक्ष्यस्थानी पडू लागले. यावेळी क्षत्रींयसंघ पुढे होऊन या गोष्टीचा प्रतिकार होऊ लागला. आणि अखेर क्षत्रीय राजपूत्र गौतमबुद्ध यानी अहिंसा धर्माने खऱ्या धर्माची पताका उभी केली.

क्षत्रीय जगांत नाहीत हे ब्राम्हणांचे रडगाणें चालुच होते. नंदराजाच्या अखेर पर्यन्त मात्र क्षत्रीय होते. त्यापुढें क्षत्रीय आणि वैश्य हे दोन्हीही वर्ण नाहीसे झाले असा त्यानी नवा डाव मांडला. 'नंदान्तम् क्षत्रीय कुलम्' किंवा 'कलौ आदि-अन्तो स्थितिः' म्हणजे या कलियुगांत फक्त पहिला वर्ग ब्राम्हण आणि अन्त्यवर्ग शूद्र हे दोनच वर्ग राहिले आहेत. क्षत्रिय आणि वैश्य हे दोन्हीही वर्ग नाहिसे झाले असे त्यांचे म्हणणें. म्हणजे हिंदुस्थानांतले हे सगळे स्वामी व उरलेले सर्व लोक सेवक, ही त्यांची राक्षसी महत्वाकांक्षा ? हा क्षत्रियाचा प्रश्न पुन्हां शिवाजी महाराजांच्या वेळी उत्पन्न झाला. शिवाजी महाराज हे क्षत्रीय नव्हेत अशी कोल्हेकुई सुरू झाली. शिवछत्रपतींना ते क्षत्रिय नव्हते असे म्हणून राज्याभिषेकाला याच वर्गाने अडथळा आणला. साताऱ्च्या प्रतापसिंहाचा यानीच छळ केला, पुनः शाहू छत्रपतींच्या घराण्याचे धर्मविधी वेदोक्ताने करण्यास नकार दिला. त्याला टिळक, विजापूरकर आणि शंकराचार्य यानी पाठिंवा दिला. केळकरानी नवा पक्ष काढून गांधीजीना विरोध केला. हा तडफडाट आजही चालू आहे. महात्मा गांधींच्याकडे त्यांच्या कार्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन पण जुनाच आहे. गांधीही केसरीकारांच्या दृष्टीने ब्राम्हणेतरच त्यांची चळवळ खादीची असो की सत्याग्रहाची असो.

० ० ०

१

## वरील ध्येय धोरणास धरुन हा केसरीकारांचा तडफडाट

( १२ जून १९२५ )

"महात्मा गांधी चरख्याचा उपदेश करून आर्थिक उन्नति नष्ट करीत आहेत,' ( तारीख २ जून १९२५ केसरी ) असा कांगावा सुरू केला. **टीपरा**-बंगालचे लोक गांधीना भेटले. आम्ही शेंकडा नव्वद शेतकरी आहोत. **चार**

महिने आम्हांस बिलकूल धंदा नाही असे त्यांनी कळविले. अशा स्थितीत महात्मा गांधीनी पुरुष, स्त्रिया व मुले या सर्वांना, बिन मांडवली अगदीं सोपा आणि घरी बसून करता येणारा सुताचा मार्ग सांगितला, यात गैर काय केले? पण या साध्या गोष्टीचाही विपर्यास करून, त्यावर भलताच आरोप तुम्ही करतां, यांत आर्थिक उन्नति नष्ट होते हे अर्थशास्त्र तूम्हांसच ठाऊक?

दुसरी गोष्ट अशी. अराजकांच्या तामस वासना नष्ट व्हाव्यात, भलता मार्ग दाखवून, भकलेल्या लोकांचेच त्यांच्या कुटुंबांचे नुकसान होऊं नये, म्हणून चरखा चालविण्यास महात्माजी सांगतात. तुमच्या मते तामस वासनाची उन्नति व्हावी आणि अराजकांना प्रोत्साहन द्यावे असे असल्यास न कळे. अराजकता हा मार्ग केवळ क्रुर व दुष्ट माणसाशिवाय सर्वच राजनितिकारानी त्याचा धिक्कार केला आहे, यात अहिंसेचाही संबंध नाही किंवा अर्थशास्त्राचींही तत्वे चुकत नाहीत; फक्त गांधीद्वेषाचा चष्मा वापरणाऱ्या तूम्हास मात्र त्यांचे प्रत्येक कृत्य भलत्याच रंगाचे दिसते.

ब्राम्हणेतरांच्या नांवाने खडे फोडण्याची यापुढे तुम्ही तसदी घेऊं नये. त्यांत तुह्याला केव्हांही यश येणार नाही. ज्यांनी कागद-शाई या बाबतीत एक दिडकीचा देखील कधी खर्च केला नाही, त्यानी वरपांगी, दीनदुबळ्या ब्राम्हणेतरांचा कैवार घेण्याचे सोंग कधी आणू नये. राजकीय, सामाजिक, धार्मिक व औद्योगिक या पैकी कोणत्यातरी कामात ब्राम्हणेतरांना बरोबरीने हक्क द्यावेत. त्यांच्यातील विषमता काढून टाकावी. एकाच अधिष्ठानावर सर्वांनी सारखे उभे रहावे. जातिभेदाचे निर्मूलन करावे, स्पर्शास्पर्श नष्ट करावा, ह्यावद्दल तुह्मी सक्रीय सहानुभूति कधी दाखविली आहे काय? किंवा पांढरपेशा वर्गाला त्याचा कान पिळून कधी सुबोध केला आहे काय? कधी नाही. एका बाजूने सरकारकडे समतेचे हक्क मागायचे आणि आपल्या घरांत विषमतेची आणि उच्चनीच भावनेची गुलामगिरी चालू ठेवायची हा जबाबदार मनुष्याचा मार्ग खास नव्हे. आमच्या सामाजिक हक्कांचा तुह्मी कधी विचार करीत नाही. सोवळ्यां ओवळ्यांत स्पृश्यास्पृश्यात आणि स्वयपाकघरात हिंदुधर्माचे गठळे भरले आहे, असे समजून पदोपदी ब्राह्मणेतरांचा अपमान करता, तर तुमच्या राजकीय चळवळीला मात्र ब्राम्हणेतरांना पान्हा कां फुटावा! जसे द्यावे तसे घ्यावे.

तुह्मी म्हणता! फक्त एका महाराष्ट्रांतच काय ते ब्राह्मणांना एक शतकभर राजकीय वर्चस्व प्राप्त झाले होते, मग इतका त्यांचा द्वेष कां? त्यास आमचे म्हणणें असे कीं, इतक्या थोड्या अधिकारमदाने तूमच्या अंगात शिरलेले जहाल

विष अद्याप शिल्लक उरलं आहे. तुमचा क्षणभराचा प्रताप अजूनही महाराष्ट्राला भोवतो आहे, तर तेच राजकीय वर्चस्व तुम्हास देऊन तो कटू प्रयोग आम्ही कां करावा? बाकी तुह्मी ब्राह्मणांचे सामाजिक व धार्मिक वर्चस्व गेले ह्मणता ही मात्र गोष्ट अगदी खोटी आहे. पुण्याच्या बाहेर खेड्यापाड्यांतून तुह्मी जाऊन पाहिलेत किंवा निस्पृहपणाने खुद्द पुण्यांतच पाहिलेत, तर कोणासही ही गोष्ट कळून येण्यासारखी आहे. पण पक्षांध ब्राह्मणांना काय दिसेल ते आह्मी काय सांगावे.

ब्राह्मणास सूत कातावयास नको ह्मणून ते गांधींना विरोध करितात, असे बागडे ह्मणतात, ते केसरीकारांना हास्यास्पद वाटते. पण ब्राह्मणेतरांना काय वाटते त्याचा केसरीकार विचार करीत नाहीत. वरील गोष्ट खोटी आहे असे केसरीकारांचे ह्मणणे आहे काय? कोणत्या पुणेरी ब्राह्मणपत्राने खादी प्रसाराची खटपट केली आहे? उलट अहर्निश खादी प्रसारासाठी प्रयत्न करणाऱ्या महात्मा गांधींच्या पायात तुह्मी सारखे काटे मात्र पसरीत आहांत. बरोबरच आहे, पेशवाईच्या पगडीथाटांत मिरविण्याची हौस आणि पंचपक्वानाच्या अन्नरसाने नाजूक झालेल्या देहाच्या कातडीस खरमरीत खादीची भीति हे बीज गणिताचे समीकरण सोडविणें ब्राह्मणांस फार कठीण झाले आहे! केसरीकारानी ब्राह्मणेतरांना या बाबतीत तरी उपदेश करू नये. ही कुंकवाचीं उठाठेव न करण्यातच त्यांच्या अब्रूचा बचाव आहे. शेंकडा ८० ब्राह्मणेतर वर्ग गरीब कुणबी, उन्हांत श्रम करणारे, सतत श्रमाची मोड फोड करणारे शेतकरीं, सुतार, गवंडी, असे आहेत. त्याना साधी जाडी भरडी भाकर मिळण्याचे कठीण, मग पक्वान्नाचे दर्शन कोठून होणार. गांवठी खादी व मोमनी मुंडासे यांत ज्यांचा जन्म गेला त्याना रेशमी पगडी किंवा तलम सुताचे मऊ मऊ कपडे यांचा स्पर्श कसा होणार? तात्यासाहेब आम्ही खास सांगतो की, गांधी द्रोहाचे पाप करण्याचे सोडून तुम्ही त्यांना खादी कामी हातभार लावला असता तर महाराष्ट्राची अशी फटफजीती कधीही झाली नसती. आणि कर्तव्य शून्यही लोक बनले नसते. पण तुम्हा पांढरपेशांच्या चैनबाजीकडे पाहून गरीब ब्राह्मणेतरही भुलत आहेत. आणि आधीच दारिद्र्यात लोळत असलेले ब्राह्मणेतर सामर्थ्या बाहेरच्या चैनीच्या खोट्या कल्पनेने चिखलात बुडत आहेत ह्याची आठवण करा.

'ब्राह्मणेतरांनीच इंग्रजांच्या सत्तेस भर दिली आहे,' असे तुमचे म्हणणें. ठीकच आहे! आज शे दीडशे वर्षे ब्राह्मणांनी काय केले, हे स्पष्ट दिसत आहे. पांच रुपयाच्या उमेदवारापासून हजारों रुपयांचे पगार खाणारे आज कोण लोक आहेत? महत्त्वाच्या खात्यामधुन सुखाने छायेखाली खुर्चीत बसून काम करणारे

हजारो नोकर लोक कोण आहेत? शेजारच्या ब्राह्मणेतरांना भीक लावून टोलेजंग इमारती उठवून बँकांना पूर आणविणारे वकील लोक कोणत्या वर्गांतले आहेत! येथून तेथून मोठ्या नोकऱ्या ब्राह्मणांच्या हाती. या सर्व गोष्टी उघड उघड दिसत असतां पुन्हा केसरीकारांचीं उलट ओरड आहे की नोकर भरतीत ब्राह्मणेतरांचा भरणा आहे. या केसरीकारांच्या विधानास हसावे की रडावे हेच कळत नाही? नाही, पण विसरलो. केसरीकार तसें कधी चुकायचे नाहीत, त्यांनी एक गोष्ट समोर आणली आहे. ती अशी कीं ब्राम्हणेतरानीं इंग्रजांच्या सत्तेखालच्या नोकऱ्या येथून तेथून सर्व भरून टाकल्या आहेत. ते म्हणतात लष्कर भरती, पोलीस खाते, पट्टेवाले, चपरासी, पंखेवाले वगैरे भरणा कोणत्या वर्गातील आहे. ? आम्हीं नम्रपणाने कळवितो की यांत खरोखरीच ब्राह्मणेतरांचा भरणा आहे खास, आणि यावरच इंग्रजी सत्ता जर उभारली असेल तर ब्राह्मणेतर वर्ग या सर्वं जागा एक सहा सोडून देण्यास तयार आहे, मोबदला इतकाच की ब्राम्हणांनी यापुढे हॉटेल सारख्या भिकार आणि देशबुडव्या धंद्यात न शिरता पोलिसांत व लष्करांत शिरावे आणि कारकुनापासून कोणत्याही उच्च प्रतीच्या कोणत्याही नोकरीस ब्राम्हणांचा अर्ज येणार नाही अशी हमी जामीनासह केसरीकार देतील तर हा मोबदला पत्करण्यास ब्राह्मणेतर वर्ग तयार आहे. महाराज, अशा प्रकारच्या हात चलाखीनें आता ब्राम्हणेंतर वर्ग भूलुन जाईल काय? पैशाच्या प्रमाणानें पाहिले तर एक एक ढेरपोटचा ब्राह्मण नोकराच्या लठ्ठ पगाराबरोबर शंभर ब्राम्हणेतरांचे पगार घातले, तरी ब्राम्हणांचे पारडे खालीच जाईल दुसरी गोष्ट अशी, ब्राम्हणेतरानी ज्या पट्टेवाल्याच्या नोकऱ्या पत्करल्या आहेत त्या तरी कशासाठी? तुमच्या व सर्वांच्या शिव्या खाण्यासाठी आणि प्रसंग आला ह्मणजे लढाईवर जाऊन जिवाचा बळी देण्यासाठी! "खानेकु हम और लढनेकु तुम" अशी ही नोकरीची वाटणी झाली आहे. आतांही केसरीकार तुमचे ह्मणणे पोटाशी धरून बसणारच काय? ब्राह्मणेतरांनी आजपर्यन्त हाल सोसले, प्राण खर्ची घातले, तुह्मी गादीवर वसून आमच्यावर राज्य केले. मग आता बागडयांनी यापुढे नोकऱ्या ब्राह्मणेतरांनीच कराव्या असा प्रश्न समोर मांडला तर तेवढ्याने तुमच्या पोटांत तिडीक उठण्यास काय झाले? आजपर्यंन्त खाऊन खाऊन अडाणी गरीबांना गांजून पैशाच्या थैल्या मोजून मनाची समाधानी झाली नाही काय? ह्मणन आह्मी म्हणतो की यापुढे तरी तुह्मी असली घातुक खोड सोडून द्यावी, आणि निस्वार्थ बुद्धीने राष्ट्रकार्य करण्यास पुढे यावे, ह्मणजे तूमच्या बोलण्यांत व चालण्यात कांही तरी मेळ आहे असे दिसेल.

ग्रामपंचायती व लोकलबोर्डे वगैरे या जाग्यांचा राजिनामा ब्राम्हणांनी दिला असे केसरीकार आढ्यतेने सांगतात. अहो जे तुह्मास मिळेना ते तुह्मी कृष्णार्पण केले, हे आता जगजाहिर झाले. हाती द्राक्षे येईनात सबब आंबट ह्मणून सोडून जाणाऱ्या कोल्ह्याप्रमाणेंच तूमची स्थिती आहे. ही फुसकी फुशारकी आता काय कामाची. इथून तिथून सर्व जागा, ग्रामपंचायती पासून कौन्सिलपर्यन्त सर्व महत्त्वाची ठिकाणे ब्राह्मणांनीच पटकावयाची, ह्मणून तुह्मी नानाप्रकारचे प्रयत्न केले, परंतु तुम्हांला आधार कोठेच मिळेना. खेड्यापासून शहरापर्यंत कोठे तुह्मांला पाठबळ नाही, तुमच्या शब्दांवर ब्राह्मणेतरांचा विश्वास नाही उघड सामन्यांत ब्राह्मणेरांनी तुमचा पाडाव केला, इतके करून अपेश आल्यानंतर आता ब्राह्मणांनी या जागेचे राजिनामे दिले, अशा बढाया माराव्या, असल्या पाणचट थापाना कोण किंमत देईल !

या आमच्या उत्तरावरून केसरीकारांची बाजू कशीं लंगडी आहे आणि ब्राह्मणेतर पक्ष कसा सत्याच्या बळावर बळावत चालला आहे, ही गोष्ट सरळ बुद्धीच्या जनतेस तेव्हांच दिसून येणारी आहे.

० ० ०

## २

## शिखंडीची भालाफेक

( तारीख १० जुलई १९२५ )

ता. ६।७।१९२५ चा 'भाला पहा. हे ब्राह्मणगडी ब्रह्माच्या घोटाळ्यात पडले आहेत. त्यांना महात्माजींचे तेज सहन होत नाही. राष्ट्रातील पक्षांची मिमांसा करतांना सगळ्यावरच त्यानी दुगाण्या झाडल्या आहेत. मवाळ हे मऊ ह्मणून त्यांना नको आहेत. सरकारी शाळेवर त्यांनी नांगर फिरवणेचा सल्ला दिला आहे. दास्यात जन्म गेल्याने त्यांना स्वतंत्र प्रतिचे शिक्षणच नको आहे. व्यापाराबद्दल त्यांची कल्पना अजब आहे. शेतकीचे काम सुशिक्षिताला अयोग्य, पांढरपेशांचे कपडे मलिन होण्याची यांना भीती आहे. जे महात्माजी सर्व जगाला वंद्य झाले आहेत, त्यांच्याबद्दल त्यांच्या व्याकरणांत बहुवचनी प्रत्यय-

सुद्धा मिळत नाही म्हणून आपल्या कृपणवृत्तीस अनुसरून गांधी असा एकवचनी प्रयोग करण्याचा थोरपणा दाखविला आहे.

" खादी " शब्दाबद्दल त्यानी आपल्या बुद्धीची हरदासी कुशाग्रता दाखविलेलीं पाहून आश्चर्य वाटते. खादीबद्दल भालाकारांची कल्पना अगदी चुकलेली आहे. यंग इंडिया डोके ताळ्यावर ठेऊन वाचल्यास कोणाचीही या विषयाबद्दल खात्री होईल. परंतु ऐदीपणाने आणि मिष्टान्न खाऊन मऊ झालेल्या कातडीस खादीचा राठपणा कसा सहन होईल ! या मठ्ठ डोक्यापुढे कोणाचा इलाज चालेल !

भालाकार म्हणतात " गांधींना अलौकिकत्व पाहिजे. कांहीतरी विलक्षण सांगून लोकांना फसविल्याशिवाय महात्मा कसे म्हणतील ? " हे वाक्य वाचून कोणाही सहृदय मनूष्याला गांधीजीबद्दल जितकी पूज्यता वाटेल, तितकीच भोपटकराबद्दल कीव वाटेल. भालाकारांच्या वर्तनावरून

॥ निज नीचपण प्रकटिशी ।
॥ तू श्वान भल्यावरीही भुंकोनी ॥

या चरणाची आठवण होते. भालाकारांची तपश्चर्या, स्वदेश प्रीती, स्वार्थत्याग मनाचा थोरपणा आणि दीनाबद्दलचें दयालूत्व हे गुण इतके त्रिखंड गाजत आहेत कीं, आजवर भालाकारांना " महात्माजी " ही पदवी न देण्यांत सर्व भरतखंडाची सपशेल चूक झाली आहे ! सत्पुरुषांची अहर्निश कुचेष्टा करण्यांत सारा जन्म खर्ची घातला तरी अजून यांची प्रतिष्ठा वाढत नाही, याबद्दल खेद होतो. कसे कां होईना, विलक्षण मते मांडून अलौकिकत्व मिळवण्याची भालाकारांची खटपट आतांतरी यशस्वी होवो !

सत्याग्रहाचा आणि शांततेच्या असहकारितेचा प्रताप काय आहे ? या उपायाने आफ्रिका, खेडजिल्हा व चंपारण्य येथे गांधीना किती अकल्पित यश मिळाले ही गोष्ट भालाकारांना माहित आहे. परंतू पैशाला आणि देहाला चवलीचाही खार न लागता जर स्वराज्य मिळाले तर भोपटकरांना पाहिजे आहे. आम्ही त्याना कळवतो की, स्वराज्यासारखी वस्तू केवळ बडबडण्याने मिळत नाही

म. गांधीजींचा आजचा उपाय सोपा आहे. अस्पृश्यता निवारण, हिंदु मुसलमानांत एकी व खादी. परंतू पुणेरी राष्ट्रबहादुराना हे साधे औषधही पचनी पडत नाही. ' रोटीबंद बेटीबंद ' ही ज्यांची धर्माची कल्पना, किंवा चुलीभोवती सोवळे गुंडाळून धर्मरक्षण करण्याची ज्यांची जय्यत तयारी, त्याना गांधीजींचे

औषध कसे आवडणार? अर्थात वेळी अवेळी, कारण असो, नसो, गांधीजींची निंदा करणे यातच ज्यांची देशसेवा गुरफटत आहे त्यानी दुसरे काय करावे! ह्मणूनच आत्मस्तूती आणि परनिंदा या जोडगोळीनी गांधीजींचा पाडाव करण्याचा भालाकारांचा डाव आहे परंतू

।। सकलांशी रवि प्रिय असतां, ।
।। घूकाते दुःसह होतो ।।

या न्यायाने भालाकार करतात ते योग्यच आहे!

## पीळ जात नाही

स्वराज्याचा पहिला ओनामा शिव छत्रपतीनीं घालून दिला. तो साधु–संतांचा काळ घ्या, त्यावेळीही रेकार्डातून असाच दाखला मिळतो. त्यावेळीही स्वराज्य नष्ट झाले होते, आणि हल्लीही जळून गेले आहे, आणि त्याबरोबर ब्राह्मणांचा धर्म गेला, आचार गेला, आणि सत्ताही गेली. इतके झाले म्हणून त्यांच्या स्वभावात कांही सुधारणा होईल अशी कल्पना करावयास नको. मोठे तत्त्वनिष्टच ते! सुंभ जळला म्हणून कांही पीळ जळत नाही. नाक गेले म्हणून भोके बुजत नाहीत! रामदासाचे वेळीही या वर्गाविरुद्ध हीच ओरड आहे. रामदासाचे शद्व असे आहेत–

हे ब्राह्मणास कळेना। त्यांची वृत्तीच वळेना। मिथ्या अभिमान गळेना। मूर्खपणाचा ।। राज्य नेले म्लेंच्छी क्षेत्री। गुरुत्व नेले कुपात्री। आपण आरत्री ना परत्री। कांहीच नाहीं ।। ७ (रामदास)

हा समर्थांचा आहेर इतक्या दिवसानीसुद्धां अगदी घडीप्रमाणे आजच्या ब्राह्मणावरही खडखडीत घातल्यास काही हरकत नाही,

परवाचे कौन्सिलचे धिडवडे पहा, पुढारी म्हणविणाऱ्यानी अक्कला गहाण ठेवल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यांचा मुख्य प्रश्न पोटापाण्याचा. ही त्यांची दुराशा राष्ट्रीय पांघरुणाखाली आणि थोरा मोठ्याचे नांवाखाली कितीही झांकून ठेवण्याची खटपट केली, तरी आता ह्यांची पार्टी फाटून जी भोके पडली आहेत, त्या प्रत्येक भोकातून त्यांचा स्वार्थ, दुराभिमान उच्चनीच भावना आणि वृथा डौल ही सारखी डोकावून पहात आहेत. लपंडावाची वृत्ती लपून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 20846 वि: ...
क्रमांक 23548 नोंद दि 2/2/2012



किती दिवस राहणार ? आज नाही उद्या कुंभाराची सून आव्यावर आलीच पाहिजे ! कौन्सिलमध्ये स्वराज्य पार्टीने तारे तोडूत आपल्या थोरपणाचे व शहाणपणाचे प्रदर्शन चांगलेच केले आहे. आडवणुकीचा मार्ग संपला. आता "शठं प्रति शाठ्यं" उर्फ टिळकांची प्रतियोगी सहकारिता सुरू केली. आमच्यामते हे नुसते खूळ आहे. यात काही अर्थच नाही. "प्रसंग येईल तसे वागावे, वाटेल ती लपंडावी करावी, उलटया गोलांटया माराव्यात, आज थोरांच्या पाया पडावे, क्षणाभराने त्यांचेच डोके पायाने तुडवावे." असे हे कपटद्युत अथवा चाणक्यनीती आहे. या नीतीला जगात कोठेही मान मिळत नाही, हे पोटभरुंचे भांडवल आहे. ब्राह्मणेतर समाज आजवर झोपून होता, तो पर्यंत हे हातचलाखीचे चाळे करून तुम्ही आजवर जनतेची दिशाभूल केली. परंतु आता प्रचंड लोकशाही जागी झाली आहे. आता हे लपंडाव चालणार नाहीत.

तुमचा अडवणूकीचा मार्ग जसा खोटा तसाच कालचा असहकारितेचा किंवा रुसव्याचा मार्गही खोटा, रुसून तुम्ही लोकसेवा काय करणार ? फुगून जनतचे कल्याण तुम्ही काय करणार ? गेल्या बैठकीत बिलावर मते न देता तुम्ही हात जोडून बसलात. याने सारी दुनिया तुम्हाला हंसत आहे. । प्रीतीवीण रुसू नये कदाकाळी ।। असे तुमचेच राजकारण. पुढारी रामदास तुम्हाला सांगतात. "वरमायी रुसली आणि उपाशी बसली" अशी तुमची केवीलवाणी अवस्था झाली आहे. तुमचा रुसवा आता काढणार कोण ? कौन्सिलच्या इमारती बाहेर आमच्या समाजात पहावे तर तुमची तीच अवस्था. महारा पोरापासून उच्च क्षत्रियांच्या पायऱ्या चढुन जाऊन सारस्वतादि वर्गांपर्यंत पाहिले तरी तुमची मनोभावना स्पष्ट गुलामगिरीची आहे. "मीं उच्च व तू नीच" हे तुमचे जन्माचे कोष्टक कांही सुटत नाही. धार्मिक बाबीचे आणि सामाजिक बाबीचे हे विषमतेचे बीज कायदे कौन्सिलच्या पवित्र भूमिवरही तुम्ही नेऊन पोचविलेत. आणि तेथेही लंपडाव सुरू केला. परंतु पक्के समजुन रहा की, असल्या हीन पायाबर रचलेला स्वराज्याचा डोलारा केव्हाही टिकणार नाही. "प्रसंग पडेल तसे वागावे" ही तुमच्या गुरु टिळकांची विद्या तुम्हा चेल्याना आता फळलेली आहे. आता शोक करून उपयोग नाही. जसे द्यावे तसे घ्यावे. कौन्सिलमध्ये हात मागे करून स्वस्थ बसला होता तोपर्यंत ठीक होते. परंतु श्रीयुत बोले यांनी म्युनिसिपालटीत मागासलेल्या वर्गांना जागा राखून ठेवाव्यात हा ठराव मांडला. पण इतका साधा ठरावही तुम्हाला सहन झाला नाही. मागासलेल्या लोकांनी नुसते डोकेही वर काढू नये ही तुमची नेहमीची वृत्ती जागृत होऊन, त्या ठरावास विरोध

करण्याचा निर्लज्यपणाचा अविर्भाव केलात यांत तुम्ही काय केले ? तळहात उघडा करून आपल्या रेघा दुसऱ्याना दाखवून फक्त अपशकून मात्र केलात !

श्रीयुत जयकरांसारख्या थोर गृहस्थाबद्दल आम्हास मात्र मनापासून वाईट वाटते. ब्राह्मणी अस्वलाला साध्या स्वभावाने आपलेच घोंगडे असे मानून जयकरांनीच एकदा पोटाशी घेतले. परंतु ते खरोखरी घोंगडे नसून अस्वल आहे. असे त्या मासेमाऱ्या प्रमाणे जरी आता जयकरांना कळले असले तरी ते अस्वल याना कांही सोडीत नाही, आणि गळयातली घोरपड निघत नाही ! आणि त्या कोळयाप्रमाणे "मैं छोड तू कम्मलकुं। पर कम्मल मझकुं छोडते नहीं।।" अशी स्थिती या पुढाऱ्यांची झाली आहे असे दिसते. केलेले निस्तरणे आता भाग आहे. असो.

अखेर आमच्या ब्राह्मण स्वराजिष्ट बंधूंना आमची शिकवण अशी आहे कीं, आजवर झाले ते झाले. यापुढे तरी खरी जनता कोण, हे तुम्ही डोळे उघडून पहावे, पेशवाईपासून आजपर्यंत लोकांच्या कुरणांत चरून, या कुरणावर आपला हक्क आहे असा जो तुम्हास भ्रम झाला आहे, तो दूर करावा आजवर खाल्लेले तृण दाती धरून तुम्ही आमचेकडे आलात, तर आम्ही सर्व गोष्टी राष्ट्रहितासाठी विसरण्यास तयार आहोत. तुमचा ताठा, तुमचा तोरा आणि दुराभिमान या प्रस्थानत्रयीची गाठ ताडदिशी तोडून टाका आणि प्रतियोगी सहकारितेचे ढोंग माजवून रुसव्या फुगव्याची भिती घालू लागाल तर पाच वर्षांचे पोरही तुम्हास भिणार नाही.

## ३

## ब्राम्हणेतर वाद

(१३ नोव्हे– १९२५)

अलीकडे केसरीतून 'ब्राह्मणेतर वादाचे स्वरूप' या मथळयाखालीं कांही लेख आलेले आहेत. त्यावरून सुचलले विचार सर्वांपुढे मांडीत आहे. प्रथमतः ब्राह्मणेतर चळवळीकडे दुर्लक्ष करावे; पुढे हेटाळणी करावी, नंतर निंदा करावी असे कांही दिवस ब्राम्हण वर्गाने केले. पण अलिकडे या वादाला इतके महत्त्व आले आहे की, साध्या उपायानी त्याचा अनादर करून भागत नाही, असे दिसून

आल्यावर, कांही मंडळींनी पोक्तपणाने वरील वादाचा विचार हाती घेतला आहे. आणि यापैकीच मि. वासुदेव कृष्ण भावे हे एक आहेत. असे आम्ही समजतो. त्यांचे हेतू चांगले आहेत असे आह्मी घेऊन चालतो, आणि त्यांच्या विचाराची भेट घेऊन अगदी थोडक्यात उहापोह करतो.

पुराणमतवादी हे नेहमीच दोन्ही पक्षात असणार. जीर्णमतावर कुऱ्हाड घालण्यासाठी आणि निंद्य चालिरीतीचा नायनाट करण्यासाठी कै. विष्णु परशराम पंडीत व गोपाळराव आगरकर या सारखी मंडळी निर्माण झाली. लोकप्रियता झुगारून देऊन अन्तःकरणास सत्य वाटणाऱ्या गोष्टी त्यानी ब्राह्मण समाजासमोर मांडल्या. ब्राम्हणेतर समाज त्या काळी नव्हताच म्हटले तरी चालेल. महात्मा जोतिराव फुल्यांनी अगदी नव्या मताचा अरूणोदय जरी लोकांना दाखविला होता तरी आगरकराना काय किंवा जोतिरावांना काय त्यांच्या काळात यश मिळाले नाही, दुःखी मनानेच त्या काळच्या सुधारकानी इहलोकीची यात्रा संपविली. पुराणमतवाद्यांनी आपला हट्ट, आपला दुराग्रह, व आपला वर्णाचा दुरभिमान यत्किंचितही ढिला केला नाही. वेडे आचार विचार आणि सनातन धर्मा सभोवार वाळवीने केलेली दुर्दशा घासून काढण्यासाडी ब्रम्हसमाज, आर्यसमाज, प्रार्थना–समाज, वगैरे मते स्थापन झालीं. परंतू यावे तितके यश या सुधारकाना आले नाही, याचे मुख्य कारण या सुधारकांची ती चळवळ बहुतांशी जनतेच्या अगदी वरच्या थरातच गुंतली होती. शुद्ध धर्म ह्मणजे काय? मूर्तिपूजा योग्य की अयोग्य वगैरे तांत्रिक विचार याचा संबंध बुद्धिवान लोकांशीच येऊन पडत होता. तसेच स्त्रीशिक्षण, बालविवाह, पुनर्विवाह, विधवा केशवपन वगैरे सुधारणेचा संबंध ब्राम्हण जातीतच विशेषतः वावरत होता. समुद्रासारखा अफाट मागासलेला खालच्या थरातील वर्ग या सामाजिक सुधारणेकडें ढुंकूनसुद्धा पहात नव्हता. त्याकालच्या सुधारकांचे नवे विचार तळच्या जनतेत मुळी पोहचत नसत. या खालच्या वर्गाने मुळी डोळेच उघडले नव्हते. पुरुषाना " कका कि की " ची माहिती नाही तर स्त्रीशिक्षण त्यांनी कशाशी खावे! येथून तेथून सारा अंधःकार असल्यामुळे राजा राममोहन राय, माधवराव रानडे किंवा स्वामी दयानंद हे काय नवे विचार सांगतात याची आम्हाला दादही नव्हती व त्या कालच्या बुद्धिमान आणि पूज्य सुधारकांना सामन्यास विष्णुशास्त्री आणि टिळक यांच्यासारखे तोडीचेच गृहस्थ उभे राहिले. त्यानी जुन्या मताचा ब्राम्हण वर्ग आपल्या पाठीशी घेऊन त्यांच्यासमोर राष्ट्रीय स्वातंत्र्याची मोहक आणि भुलविणारी वस्तू उभी करून लोकप्रियता संपादन केली; आणि त्यांच्या जिवावर आपले एकांगीं कार्य साधण्यासाठी, सामाजिक सुधारकांचो हुर्यो उडवून दिली;

आणि पुराणमतवाद्यांचा झेंडा पेशव्यांच्या पुण्यनगरीत उभा केला ! येथे सामाजिक सुधारणेचा पहिला अध्याय संपला.

आज दुसऱ्या अध्यायास प्रारंभ झाला आहे. मागासलेल्या वर्गाची किंवा ब्राम्हणेतर वर्गाची आजची स्थिती पालटली आहे. तो गाढ निद्रेतून जागा झाला आहे. पूर्वीच्या ब्राम्हणी सामाजिक सुधारणा पाहून आज आम्हाला हसूं येते ! पुर्नविवाहाची धडपड आम्हाला काय करावयाची ! थोडासा मूठभर वर्ग बाजूस ठेवला म्हणजे बहुतेक ब्राम्हणेतर समाजांत पूर्नविवाह पूर्वीपासून चालूच आहे. विधवा केशवपनाची अमानुष चाल मराठा वर्गाने केव्हांच पत्करली नाही, तिचा लखलाभ ब्राम्हणानांच मिळू दिला. स्त्रीशिक्षणाबद्दल ब्राह्मण अब्राह्मणांपैकी कोणीच हल्ली तक्रार करीत नाही, बालविवाह मराठा वर्गांत बहुधा नाहीच आणि या बाबत कोणताही पक्ष हरकत घेणार नाही असे दिवस आता आले आहेत.

वरील सर्व सुधारणा आह्मास आता पोरखेळ वाटू लागल्या आहेत. कै. टिळकानी जशी मोठ्या अभिमानाने किरकोळ मागण्याची वटवेरीज करून सरकारकडे स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ह्मणून मागणी केली तीच मागणी आज मागासलेला वर्ग पुढारलेल्या वर्गाकडे करीत आहे. ती मागणी म्हणजे जन्मसिद्ध हक्कावर ( Prerogative ) उभारलेली कृत्रीम खोटी समाजरचना मोडून पूर्ण समता येथून तेथून सर्वत्र स्थापन झाली पाहिजे अशी उघड उघड आहे. आणि ह्या मागणीस जो कोणी अडथळा करील त्याला सुखाचा घास किंवा समाधानाची डुलकी मिळू देणार नाही, अशी ह्या नव्या चळवळीची प्रतिज्ञा आहे.

आपल्याच कल्पनेतून, कांहीतरी कल्पना उभारून या नव्या चळवळीचे समाधान करणें व्यर्थ आहे. सत्यसमाजाच्या मागण्या अमूक आहेत, तमुक आहेत असा पूर्व पक्ष करण्यांत कांही अर्थ नाही. लग्नाला ब्राम्हण न बोलावता आपली लग्ने करावीत, वाटले तर पुराणोक्त करावे, किंवा वेदोक्त करावे आमची त्यास हरकत नाही, असल्या स्वार्थत्यागाच्या देखाव्याने कांही भागणार नाही. ही नवीन चळवळ अमूक विशेष तत्व घेऊन समोर येत नाही. प्रार्थना समाज ब्रम्ह समाज अगर आर्य समाज यांच्याही पुढे ही नवीन चळवळ धाऊन गेली आहे. आजच्या ह्या नव्या चळवळीत कसलाच एकांगीपणा नाही. कृत्रीम विषमता आणि भेदाभेद जसा ब्राम्हणेतर समाजांत हल्ली आहे तसाच तो ब्राम्हणांच्या पोटभेदांतही आहे.

बहुजनसमाज आपल्या उलट आज बराच आहे हे त्याला ठाऊक आहे. जोतीबा आगरकरांनाही ते माहीत होते.

कोणत्याही काळी कोणत्याही स्थळी कोणी नवे मत सुरू केले तर बहुजन समाज त्याच्या उलट असतो, ही गोष्ट कांही आजची नाही. ती जुनी व परंपरा चालत आलेली आहे. ऋषभ, महावीर या अहिंसा मत प्रवर्तकांना जनसमाज उलट होता. गौतम बुद्धानी तर त्या लोक मतांची पर्वा न करता तो तट फोडूनच टाकला. महाराष्ट्रीय संतमालिकेचे जुन्या लोकांनी पुरे हालच केले. पश्चिमेकडेही तोच इतिहास दिसून येतो. कृत्रीम विषमता आणि धर्माच्या नावाखालचा अनाचार लोकासमोर मांडताना. येशुख्रिस्ताला फक्त थोड्याच शिष्यांचा सांप्रदाय मिळाला होता. महमद हजरत यांनी, प्रेम धर्माला सुरूवात केली. आणि समान बंधुत्वाचे मानवाचे हक्क लोकासमोर मांडले त्यावेळी त्याना लोकमत पूर्ण प्रतिकूलच होते. आणि आपल्या जिवाच्या रक्षणासाठी त्याना मक्केहून मदिनेस पलायन करावे लागले. चोहोकडे हीच तऱ्हा आहे. समान हक्काचे तत्त्व कोणीही समोर आणिले, आणि पुराण मतवाद्यानी एकदम त्याचा अंगिकार केला अशी गोष्ट कधीच झाली नाही. मग येथेही ब्राह्मणेतर चळवळीला बहुमत उलट आहे ही सबब नवी का वाटावी ! आज बहुजन समाज कितीही उलट असला तरी त्या गोष्टीला ही नवीन चळवळ भीक घालणार नाही. सुदैवाने हा मात्र चमत्कार दिसून येतो की सुशिक्षित ब्राह्मणेतर हा बहुदा सुधारकच बनतो आणि सुशिक्षित ब्राम्हण मात्र जुन्याचा अभिमानी बनतो. हा चमत्कार खरा. सरस्वती देवीचे दोन शिष्य असे विरूद्ध विचाराचे का निपजावे ? आमच्या मते त्याचा एकच खुलासा आहे आणि तो हाच, ब्राम्हण हा, जन्म जात उच्चपणाच्या विषारी हवेत वाढला जातो आणि ब्राम्हणेतर हा विषमतेच्या चिखलातून त्रासून जागा झालेला डोळे उघडून पाहणारा, असा प्राणी तयार होतो. ब्राम्हणाची संस्कृती वेगळी ब्राम्हणेतरांची, वेगळी यात तडजोड किंवा तहनामे होणे शक्य नाही. हे दोन्ही तट पूर्वीचे सर्व संस्कार फेकून देऊन ज्यादिवशी पूर्ण एकमेकात मिसळून जातील, त्याच दिवशी हा तंटा मिटेल. परकीय राजाची व नव्या आचार विचाराची भाजून काढणारी आंच सर्व देशाला सारखी लागली, त्या तापलेल्या स्थितीत खोटे भेदाभेद आज ना उद्या नष्ट झालेच पाहिजेत, वितळून गेले पाहिजेत. नष्ट होऊन हवेत उडून गेले पाहिजेत, आज ना उद्या ते जाणारच. खोटया पायावरची समाज रचना, कायमची कधीच टिकू शकणार नाही. जपानच्या सामुराई सरदार लोकानी आपले विरोध हक्क भराभर फेकुन देऊन कमी मानलेल्या लोकाशी एक जीव करून घेतले आणि जगभर कीर्ती केली, त्याचप्रमाणे हिंदुस्थानचा उच्चवर्ग जर करणार नाही, तर केव्हाही देशाचे कल्याण

होणार नाही. ब्राम्हणेतर वर्गाचे हेतू सत्यतेच्या पायावर स्थापले आहेत. आणि काल चक्रात उच्च वर्गाने जर आपले हक्क देशहितार्थ सोडून दिले आणि समान हक्काच्या पायावर हिंदु समाजाची नवी रचना केली तर देशाचा भाग्योदय होऊन आजपर्यंत जगांत कोठेही आणि कोणीही पाहिली नाही अशी क्रांती येथें घडून येईल. यात शंका नाही.

ब्राम्हणांनी राजकीय चळवळ सुरूं केली, तिला ब्राम्हणेतर आड आले हे म्हणणे खरे नाही. आम्हांला मागे टाकून तुम्ही पुढे जाऊ लागलात म्हणून तशी दिशा आम्ही धरली, बाकी स्वराज्य संपादनेच्या कामी तुमच्या आमच्यांत मतभेद असणेंचे कारण नाही. ब्राम्हणेतर वर्ग कौन्सिलमध्ये यावा, म्युनिसिपालिटीत त्यांचा प्रवेश व्हावा ही गोष्ट तुम्हांस इष्ट नाही. त्यांचा प्रवेश होण्यास तुम्ही काहीही उपाय सुचविले नाहीत, इतकेच नव्हे तर त्यास जोराने विरोध केला. जातवार निवडणूक हा कायमचा उपाय नव्हे. कै. शाहू महाराज यांनी "लंगोटा धरून पाण्यांत घालून पोहण्यास शिकविण्याचा हा एक मार्ग आहे. काम करितां करितां मनुष्य शहाणा होतो," हे तत्व जगांपुढे मांडिले. पण तुमचा विरोध निकराचा; अशा स्थितीत आत्मसंरक्षणार्थ, राजकीय बाबतीत जशास तसे या न्यायाने तुम्हाला विरोध करणे आह्मांस भाग पडले

'देशाचे दुष्मन,' सारखे जहाल उपाय ब्राह्मणेतरांनी तुमच्यापुढे टाकले आहेत खरे, परंतु यांत दोष कोणाला देणार? पूना म्युनिसिपालिटीतील कारस्थाने जेध्यांची हेटाळणी, भलतेच उलट ठराव आणून ब्राह्मणेतरांची चेष्टा आणि अगदी निराधार असे म. जोतिबाविरुद्ध खरडलेले "ख्रिस्त सेवक की सत्यशोधक?" या नांवाचे लाजिरवाणें भिकार पुस्तक कमिटीत वाटणे, अध्यक्षांची अरेरावी आणि संभावित ब्राह्मणेतरांचा उघड अपमान, या गोष्टींनी मराठ्यांना तुम्ही इतके चिडविले आहे कीं कोणीही थोडातरी मानाचा मनुष्य हे सर्व सहन करून गप्प बसणार नाही. उलट थोडीशी ब्राह्मणांनी पडती घेतली असती; थोडासा स्वार्थत्याग दाखविला असतां, तर पुण्याची हल्लीची दुर्दशा झाली नसती.

कै. म. जोतीबांच्या पुस्तकातील विचार ब्राम्हणांना अप्रिय वाटणार यांत नवल नाही. पण ब्राम्हण लोक म्हणजे सर्व हिंदू लोक नव्हेत, किंवा ब्राम्हणी, सोवळा, तूसड, आप्पलपोट्या, मत्सरी, जन्मजात भेदभाव उत्पन्न करणारा धर्म ही कुत्सित विचारांचा पाशवी म्हणजे सनातन हिंदू धर्म नव्हे, थोर थोर विभूतीनी आणि संतमंडळाने, ज्याप्रकारचे हल्ले जुन्या अज्ञानमूलक प्रचलित रूढीवर केले, तेच हल्ले म. जोतिरावांनी चढविले आहेत. आणि मंबाजी सारख्या अधम ढोंगी

धर्मवाल्यांनी तुकाराम महाराजांचे जे छळ केले, तेच तुम्ही म जोतिबांचे आज करीत आहांत! म. जोतिबा हे मिशनरीही नव्हते किंवा हिंदूधर्म विध्वंसकही नव्हते; जुन्या तेडाने भारलेल्या पिशाच्चांची तशी केवळ समजूत आहे. ब्राम्हणेतरांच्या चळवळी बीभत्स नाहीत किंवा आत्याचारीही नाहीत. तशा त्या ब्राम्हणी चष्म्यांतून दिसनात इतकेच; प्रचंड ब्राम्हणेतर समाजाला, देशातील खऱ्या जनतेला, ते विचार प्राणाप्रमाणें प्रिय झाले आहेत!

धार्मिक बाबतीत लग्नकार्यं, उत्तरकार्यं, वगैरे बाबतीत, आम्हांला कोणाचे वर्चस्व नको, ब्राम्हणांचे तरी मुळीच नको. ब्राम्हणेतर स्त्रीपुरुषांचा विटाळ मानणे, त्यांना पंक्तित न घेणे, समारंभात बरोबरीचा मान न देणे, या गोष्टीं केवळ तपशीलाच्या आहेत. ब्राम्हणेतरांना काय पाहिजे आहे याचे स्वच्छ उत्तर एकाच शद्बात देणेचे तर "परिपूर्ण समता" या एकाच शद्बात देता येईल. हाच आमचा महामंत्र आहे. जन्मजात कृत्रिम विषमता नाहीशी करून, तिला खळग्यात गाडून, त्यावरच ही समतेची इमारत उभारणेची आहे.

ब्राम्हण जात पहिल्यापासून आचारसंपन्न, विचारवंत, वुद्धिमान, नितिमान आणि सर्वांत श्रेष्ठ आहे ही कल्पनाच आम्हाला पटत नाही, त्यांना कृत्रीम उपायांनी, खोटया लाडांनी आणि फाजील चेष्टांनी तसे करून ठेविले आहे. 'जुहोवा' च्या लाडक्या इसराईल लोकाप्रमाणें इतरांचे डोळे फोडून, त्यांना चांगले (?) अंधळे करून पुनः त्यांना विचारतां 'तुम्हांला रंगाचे ज्ञान आहे काय?' तसीच आमची स्थिती झाली आहे. ते ज्ञान कडीकुलपांत तुम्ही घालून ठेविले, आणि पुढे इथून तिथून सर्व ब्राम्हणेतराना चांगले अंधळे करून ठेविल्यानंतर, ब्राम्हण जात तेवढी ज्ञांनवान म्हणून पुन्हा मिरवायला तुम्ही तयारच! हे शद्ब उच्चारतांना तुम्हांला खरोखर शरम वाटायला हवी! इतर जातीना तूमचा नुसता हेवाच वाटतो असे नव्हे, तर तुम्ही आमचे पिढयानपिढयाचे नुकसान केले. कायमचा बहिष्कार घालून इतरांना तुम्ही पशू-वर्गात ढकलून दिले, तुम्ही आमचे शत्रू, तुम्हीच आमचे डाईज, तुम्हीच आमचे वाटोळे केले आहे. आणि जवळकरांच्या शद्बात बोलावयाचे म्हणजे तुम्हीच "देशाचे दुष्मन," या विचारसरणीत काय दोष आहे? ब्राम्हणेतरांनीं चालविलेली आडवण, त्यांचे शिव्याशाप आणि ब्राम्हणी मने दुखविण्याचे सत्र, हे खरोखर जर दोषी असेल, तर ते तुमच्याच कृतकर्माचे प्रायश्चित्त आहे. तुमच्याच पापाची ती कडू फळे आहेत.

# ४

## सोवळेशाही म्हणजे सनातनी हिंदू धर्म नव्हे

( २७ नोव्हेंबर १९२५ )

श्री शिव छत्रपतींना शूद्र ठरवून "अभिषेकास नालायख" अशी आज्ञा काढली आणि कै. शाहू छत्रपतींचे वंशपरंपरा अन्न खावून, त्यांच्या राजवाड्यात वेदोक्त करण्याचा प्रश्न निघाला असतां, त्यानाही शूद्र ठरविण्याचा यत्न केला, आणि आपली तोंडे काळीं करून घेतलीत. हाच का तुमचा सनातन धर्म?

मि. भावे बुवा, तुम्ही ब्राम्हणांच्या बाजूला पोथी पुस्तके आणि पळीपंचपात्री मात्र उरली असा कांगावा करून, दिशाभूल व हातचलाखी करण्याचा प्रयत्न केला आहे तो वाखाणण्यासारखा आहे, आम्ही क्षत्रियांनी ब्राम्हणांवर राजकीय आणि आर्थिक गुलामगिरी लादली, हा तुमचा शोध नावाजण्यासारखा आहे; बाकी राज्ये क्षत्रियांनी केली ही गोष्ट खोटी नाही. परंतु तुम्ही,

जेव्हां राजवैभवाच्या चौऱ्या मिरवूं लागला, तेव्हा मात्र ग्रामण्याचा वरवंटा इतरांच्या डोक्यावर फिरवून, त्याना रसातळाला घातलेत. ही गोष्ट कांही खोटी नाही! आणि साताऱ्च्या छत्रपतींना नांवाचे बाहुले करुन आपणच राजे बनून, खऱ्या मालकाला वेळेला अन्नपाणीही मिळू दिले नाही, हीच ब्राम्हणांची राजकीय गुलामगिरी काय?

आर्थिक गुलामगिरीचा मासलाही तसलाच. ब्राम्हणांना दारिद्र्य आले खरे! हजारो रुपये पगार खाणाऱ्या पहिल्या प्रतिच्या सरकारी नोकरांपासून रुप्याची तिरी मिळविणाऱ्या उमेदवारापर्यंत पहावे, तर सर्वत्र ब्राम्हणांचा भरणा! मोठमोठ्या पेढीच्या दुकानांपासून, तो शिंप्याच्या दुकानापर्यंत, पहावे तर हे व्यापार ब्राम्हणानीच अडविलेले. भव्य सरदार गृहापासून तो दमडीच्या चिवडा विक्यापर्यंत ब्राम्हण उभाच! अंडो-ब्रँडीची दुकाने आणि बूट-पायतानांची दुकाने व तमाशात सोंग घेऊन नाचणाऱ्या पठ्याबापू कुळकर्ण्यापर्यंत पहावे तर ब्राम्हण उभा आहेच! हीच ब्राम्हणांची आर्थिक गुलामगिरी काय? धन्य असो त्या हिंदू धर्माला आणि तुम्हां हिंदू धर्म रक्षकांना! पोथी पुस्तकांवर, आणि पळी पंचपात्रावर, किंवा वैदिक ज्ञानावर उपजीविका करणारे आणि महारुद्र सांगणारे खरे वैदिक ब्राम्हण, आज किती तूमच्यात मिळतील? सर्वस्वी तुमचा धर्म तुम्ही टाकून दिला आहे, आणि पुन्हा वर्चस्व सांगण्याला तयार!

बौद्ध, जैन, लिंगायत, या जातींनी हिंदू समाजाची विस्कटा विस्कट केली हे तुमचे म्हणणे वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे. तुमच्या यज्ञास, तुमच्या हिंसेस, तुमच्या निंद्य जातिभेदास कंटाळून, तिटकारा येऊन, लाथाडून वरील क्षत्रिय धर्मसंस्थापकांनी स्वतंत्र सात्विक धर्मांची स्थापना केली. वृथाभिमानाने तुम्हांस पछाडले ! त्या मोत्याची किंमत तुम्हा कुक्कुटांना कळली नाही आणि तुमच्या नेहमीच्या द्वेषी स्वभावास अनुसरून, तुम्ही तुमचा ब्राम्हणी सवतासुभा उभा केला आणि त्याला तोड म्हणून जैन, लिंगायत, विश्वब्राम्हण ( सोनार ) यानीही आपली स्वतंत्र मते स्थापन करून तुटक समाज स्थापन केला.

क्षत्रियांवर ब्राम्हणांचे प्रेम जगविश्रुत आहे; ह्याला दस्तैवजी पुरावा भार्गवरामाचाच आहे. इकडे क्षत्रिय हे धर्मरक्षक असे म्हणावे तर तिकडे एकवीसवेळा निःक्षत्रिय पृथ्वी केल्याचा वृथा पराक्रम गाजावावा! चाणक्यासारख्या मोठ्या बुद्धिमान पण दुर्बुद्धि ब्राम्हणाने मानापमानाचे वेड डोक्यात भरून घेऊन नंदाच्या भरदरबारात शिखा सोडून, हात पाय आपटून, डोक्यात राख घालून 'नंदाचा निःपात करीन तेव्हांच शेंडी बांधीन' अशी दुष्ट राक्षसी प्रतिज्ञा वाहून जी पुढे कृत्ये केली ती ब्राह्मणाची क्षत्रियावरील अलोट प्रेमाची साक्ष देत नाहीत असे कोण ह्मणेल ? तुमच्याच दुर्बुद्धिने क्षत्रियांचा अपमान केलांत, घरचे सोडून दारचे आत घेतलेत, शनिवार वाड्यावर टोपीवाल्याचे निशाण उभे करणारे तुह्मीच, आणि थोड्याच वेळात पेशवाईच्या राख रांगोळी बरोबर साताऱ्च्या गादीवर निखारे ठेवणारे तुह्मीच; आरंभापासून आतापर्यंत इतिहास साक्षीस उभा राहुन जगाच्या न्यायासनासमोर प्रतिज्ञेवर साक्ष देत आहे की, क्षत्रियांचा नायनाट करण्याचा संकल्प आतापर्यंत तुह्मी एकनिष्टपणे चालविला आहे. अशी स्थिती डोळ्यांना दिसत असता ब्राह्मणेतरांच्या नांवाने खडे फोडण्यात काय अर्थ आहे? वर्चस्वतेचा तोरा, नवीन नवीन जातिभेद उत्पन्न करणे; आणि कशास कांही मेळ नाही असल्या सत्रा भोके पडून फाटलेल्या हिंदू समाजावर परचक्र आले आणि स्वातंत्र्य हिराऊन घेऊन गेले; ह्या गोष्टीचे खापर कोणाच्या माथ्यावर मारणेचे; हा निर्णय विचारवंतानीच करणेचा आहे. सत्यसमाज, आर्यसमाज, ब्राह्मणेतर समाज हे समतावादी आहेत, त्याना दयाधर्म पाहिजें; प्रेमाचा धर्म पाहिजे; वेदांतात सांगितलेला शुद्ध सात्विकधर्म पाहिजे; या चळवळीला ब्राम्हणांपासून चांडाळा-पर्यंत एकमेकांनी हातात हात घालून पोटाशी धरून प्रेमाने बद्ध होऊन एकजीव होऊन देशसेवा करावयास पाहिजे. वर्णसंकराच्या भीतीचे ढोंग नको. जन्मजात चातुर्वर्ण्याचे सोंग नको, आणि तूसड व स्वार्थी वेदाचा बागुलबुवा नको. हे सर्व खोटे तट नांगरुन टाकून शुद्ध सत्य धर्म सर्वांना कवटाळण्यास तयार असा धर्म

पाहिजे. ज्ञानदेव, एकनाथाचा धर्म पाहिजे. नामदेव तुकारामाचा प्रेम धर्म, पाहिजे; कबीर चोखामेळ्याचा दयाधर्म पाहिजे, चालू काळांतील सत्पुरुष, विवेकानंद अरविंद घोष, महर्षि टागोर, महात्मा गांधींचा समतेचा व दयेचा धर्म पाहिजे. महात्मा फुले यांचा विश्वव्यापी धर्म पाहिजे, कै. राजर्षी शाहूराजांचा विश्वबंधुत्वाचा धर्म पाहिजे, हिंदुस्थानांत ज्या ज्या प्रांतात हा धर्म चालू आहे तेथे ब्राम्हणांचा वरचष्मा नाही. तेथे सोवळ्या ओवळ्याचे थोतांड नाही, तेथे ब्राह्मण ब्राम्हणेतर हा वादही निर्माण झालेला नाही. फक्त ह्या महाराष्ट्रात पेशवाईस गाढलेल्या आणि त्यांची परंपरा पुनः चालविण्याची खोटी हाव धरणाऱ्या या प्रांतात हा ब्राम्हण–ब्राम्हणेतर वाद निष्पन्न झाला आहे.

मि. भावे यांनी आपले लेखांत देश काल वर्तमान पाहून ब्राम्हणांनी आपलें वरेंचसे हक्क सोडून द्यावेत अशी ब्राम्हण वर्गाला शिफारस केली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यास आम्ही मागे घेत नाही. राजकीय, धार्मिक, सामाजिक बाबतीत व बुद्धि विषयात आज कांही अंशी ब्राम्हण वर्गाला जे मार्कस मिळतात, त्यांचे कारण जन्मतःच ब्राम्हण श्रेष्ठ असतो हें नव्हे तर बुद्धिपुरस्सर समाजाची रचनाच तशी घातकी बनवली आहे. म्हणून शेजाऱ्याचे घर जाळून पोळून, त्याचे सर्वस्व लुबाडून, नंतर त्या लुटलेल्या संपत्तीचे संरक्षण मनुस्मृती सारखे कायदे, करून शेजाऱ्याला मात्र कायमची भिक लावली, असे असून थोरपणा कशाला मिरवावा ! ब्राम्हणेतराला कोणतेही बाबतीत, ब्राम्हणाची बरोबरी खास करता येते. फक्त व्यवहार खुला ठेवावा आणि कसलाही जन्मजात हक्क समोर आणू नये.

मि. भावे यांनी हॉटेले आणि सोडावॉटरच्या दुकानात ब्राम्हण ब्राम्हणेतर एकत्र खातात, पितात आणि हजामाचे दुकानात, एकत्रच दोघेंही केस कापून घेतात, ही गोष्ट समोर आणली आहे. याबद्दल आह्मी आभारी आहोत. फक्त तीच गोष्ट ब्राह्मणांच्या नाकावर टिचून, आह्मी विचारतो कीं, वरील दुकानातला ब्राह्मण, लाज बाजूस टाकून दुकानांत जसा वागतो, तसेंच त्याने हॉटेलचा उंबरा ओलांडल्यावर, बाहेर व घरी मराठ्या स्नेह्याशीं वागले पाहिजे. हॉटेलात महारकी आणि आपले घरी शिवाशिवीचे ढोंग त्यानी आणू नये, अशी दुतोंडी वागणूक ब्राह्मण ठेवतात ह्मणूनच त्यांच्या थोबाडांत थप्पड देऊन, त्याना चोळीत बसविणें भाग पडते !

मि. भावे यांनी बरेच विवादाचे हक्क ब्राह्मणांनी सोडून द्यावेत ह्मणुन ब्राह्मणांना सुचविले आहे. हाही खरोखरी त्यांचा थोरपणा आहे. परतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, तसें आचरण मात्र ब्राह्मण करीत नाहीत. ब्राह्मणेतरानी देवास अभिषेक

करू नये; ब्राम्हण हौदाचे पाणी शिवू नये; वगैरे हट्ट ब्राम्हणांनी सोडावेत. जोशी-वृत्तीबद्दलही आग्रह धरूं नये. हा मि. भावे यांचा उपदेश ब्राम्हण ऐकतील तर या वादाला किती गोड फळे येतील! परंतु या बाबतीत आम्ही अगदी निराश आहोंत. अलीकडे आमचे असे मत होत चालले आहे की, बिचारे वृत्तीवाले भट व जोशी यांना हा तांडव नाच नको आहे. कित्येक या वादात पडतही नाहीत. इतकेच नव्हे तर कोणी सज्जन मराठा प्रत्यक्ष दत्तास अभिषेक करण्यास गेला, तर प्रतिकार न करता, पुजारी मंडळी अगदी तटस्थ राहतील आणि कित्येकानी असले हे पिढीजाद धंदे सोडूनही दिले आहेत. मि. भावे यानां आम्ही एक विश्वासातील कान गोष्ट सांगतो ती ही कीं, अलीकडे सुशिक्षित म्हणणारा ब्राम्हण समाज पिशाच्याचे पावलाने उलटा मार्ग चालत आहे. नांव पदवीधर पण सामाजिक बाबतीत ब्राम्हणेतरांचे विरूद्ध. सक्का बंधु आणि पक्का डाईज असा झाला आहे. स्वराज्याची बात निघाली की यानी पुढील पान पत्रावळ धरायची. एक पैचीही धस न सोसता, पान तंबाकू विडचा झोडावयाच्या, देह आडवा करून आकाशांतल्या बापाकडे पहायचे. टिळकांचे नांव निघाले कीं हारदम त्यांची आरती ओंवाळावयाची. पण स्वतःची कामगिरी शून्य! "जाऊं दे कीं हळुंहळुं चाललेच आहे. सुधारणा होतच आहे. अशी दुसऱ्याची मनें दुखवून सुधारणा होत नाही." या महामंत्राची पोपटपंची सारखीं सुरूं. आपण कांही एक न करितां, स्वस्थ खोलीत पडून, दुसऱ्याची निंदा करावयाची हाच यांचा ब्राह्मण धर्म आणि हाच त्यांचा स्वार्थत्याग. परंतु आम्हाला आतां कळले आहे कीं, असल्या कर्तव्यशून्य आणि विघ्नसंतोषी पंचकडीच्या प्रलापांशी तोंड देऊन काहीं फलप्राप्ती नाही. यांचेकडे दुर्लक्ष करून आपण आपले मार्गाला लागावे मि. भावे यांनी देवाच्या अभिषेकाबद्दल, हौदाच्या पाण्याबद्दल, पूजेउजेबद्दल ब्राम्हणानी हार खावी असे जे सुचविले आहे. त्याचा ब्राम्हणानीच चांगला विचार करावा. हे समान हक्क आम्हाला मिळाले, म्हणजे आम्हाला पै पैसा जास्त मिळाला, किंवा आमच्या पटक्यात एक पीस जास्त मिळाले, अशी गोष्ट नाही. आम्हाला देवाची भक्ती करायची तर करता येईल. वैकुंठीचा देव आम्ही याच मृत्युलोकावर आणवूं. अमक्याच हौदाने आमची तहान भागते, ब्राम्हण हौदाशिवाय सर्व जलाशय आटले आहेत, अशातला प्रकार नाही. लाथ मारूं तेथे पाणी काढूं. ही गोष्ट कठीण नाही. परंतु ही मनुष्याचे हक्काची बाब आहे. माणुसकीचा प्रश्न आहे, मताभेदावर उभारलेल्या समाजाच्या पायावर सुरूंग आहे. आणि हाच समतेच्या विजयाचा आरंभ आहे.

५

## आम्हाला माणुसकी पाहिजे

( ११ डिसेंबर १९२५ )

बोलघेवडे ब्राह्मणबंधू उगीच टिळकांची स्तुती करून आणि महात्मा गांधी व महात्मा फुले यांना शिव्याशाप देऊन, वर्गाभिमानी धर्ममार्तंड बनू पाहतात. वस्तुस्थिती अशी आहे की, टिळक मेले तरी याना परवा नाही, आणि महात्माजी काँग्रेसमधून गेले तरी यांना दिक्कत नाही. यांना खरा पक्षच नाही, यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता ह्मणजे उगीच निंदा, उगीच स्तुती, कोणाची तरी करीत रहायची. स्वत: कांहींही न करता, 'खानापीना सुखसे सोना" या पलिकडे कांही करणेचे नाही. मि. भावे यांना आह्मी सुचवतो की; त्यानी आपला मोर्चा ब्राह्मणेतरांच्याकडे न फिरवता असल्या ऐदी, खादाड, आइतखाऊ, ब्राह्मणबुवांकडे फिरवावा आणि ज्या दिवशी मि. भावे यांना आपल्या उपदेशांनी या लोकांची प्रेतकळा जाऊन कांही जीवकळा आली आहे असे दिसेल, त्या दिवशी आह्मांवर हल्ले करावेत. आह्मी प्रत्युतरास एका पायावर तयार आहोत.

मि. भावे संपत्तीसंबंधाने लिहतांना अगदी चुकत आहेत, असे आमचे मत आहे. वरवर पाहिले तर मराठें लोकांत सरदाऱ्या, जहागिऱ्या, जमिनी आहेत, असे दिसते खरे पण विद्येच्या आणि त्यामुळे शहाणपणाचे अभावी, मराठा रयत जमीनीचा नांवाचा खातेदार, पण खरा भोक्ता उच्च ह्यणविणाऱ्या वर्गात. इनामदार, सरदार हे दरबारदिवशी किंवा समारंभाला, दरबारड्रेसमध्ये हजर, परंतु त्यांची सूत्रे त्यांचे दिवाणजींचे हातात. सुदैवाने ही स्थिती थोडीशी बदलत चालली आहे. इंग्रज सरकारच्या उदार राजकीय धोरणाने संस्थानिक व जहागिरदार यांच्या प्राचीनच्या मिजाशीच्या वेडगळ कल्पना जात चालल्या आहेत. आणि त्यांना व्यवहारातील नवी दृष्टी कालानुसार येऊं लागली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. मात्र हे स्थित्यंतर होण्याची पुण्याई ब्राह्मणांनी आपले हाती कधी घेतली नाही. त्यांचे इच्छेविरुद्ध, अगदी वेगळ्या कारणांनी ही क्रांती होत चालली आहे.

वर्णसंकराला शिव्याशपथा घालूनही तो होण्याचा राहिला नाही. आपद्धर्माच्या लपंडावाखाली ब्राह्मणांनी वाटेल ते धंदे सुरूं केले, वर्णसंकराप्रमाणेच

धंदेसंकर इतका बोकाळला आहे की, ब्राम्हणांनी आता कांहीएक करणेचे ठेवले नाही. खेटराचे व्यापार आणि अंड्याकोंब्रड्यांचे मक्ते बिन दिक्कत कोणासही न लाजता सुरूं केले आहेत. " विवेक भ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः " प्रमाणें गंगा जशी हजार तोंडानी खाऱ्या समुद्रात शिरते, तद्वत उच्च म्हणविणारा ब्राम्हण वर्ग भीड मर्यादा गुंडाळून ठेवून, पैशाचे लोभांनी, चांभार महाराचीही कामे करू लागला आहे. आपद्धर्माचे सोंग आता नको आहे. तुम्ही पोटांसाठी इतर लोकांचे धंद्यात शिरून आगळीकेचे गुन्हे करता, तसे आम्ही करीत नाही. ब्राम्हणाचे हौदावर, दत्ताचे पादुकांवर, सहभोजनावर आणि बेटीव्यवहार किंवा ग्रामजोशीच्या धर्मविधीचे हक्कांवर, आम्ही जे लेखनाद्वारे आणि व्याख्यानद्वारे मोहरे करीत आहोत, ते पोटापाण्यासाठी नव्हे, दीडदमडीच्या लाभासाठी नव्हे, हा आमचा खटाटोप ' माणुसकीच्या हक्कांसाठी आणि दीनजनांच्या सेवेसाठी आहे.

कर्मसंकर बंद करणे, आता कोणाचेही हाती राहिले नाही. वाटेल त्यांनी वाटेल तो धंदा करावा, एखादा मराठा भटशास्त्री होईल किंवा वैदिक होईल. उलटपक्षी एखाद्या भटजीचा मुलगा कोंबडीविक्या होईल, किंवा मिशा काढून तमाशांत नाचू लागेल. या विसाव्या शतकात स्वातंत्र्याच्या राज्यात कोणी कोणाचा हात धरावा ? पण ब्राह्मणांनो, पुनः तुम्हांला बजावून सांगतो की. चार वर्णांचे व चार आश्रमाचे, आणि ब्राह्मणी सोवळ्या आचारांचे असे तीन तेरा नऊअठरा पोटासाठी वाटोळे करून पुनः मी गोपाळ भटजीचा म्हणून श्रेष्ठ असे मात्र मिरवण्याचे धाडसी काम करूं नका. यांत तुम्हांला काडीची किंमत कोणी देणार नाही.

सर्व धंद्याबद्दल आता सर्वांना सारखी मोकळीक झालेली आहे. शिवशील असे म्हणण्याचा तुम्हांला बिलकूल अधिकार राहिलेला नाही. पोटासाठी शेण विक्याचे धंदे करून, पुनः या पुढे कोणाला ' येथे बसू नकोस, तेथे बसूं नकोस, या भांड्याला शिवूं नकोस, आणि त्या मडक्याला हात लाऊ नकोस, अंबाबाईला तू लांबून नमस्कार कर, आणि दत्ताचा निरोप वाळवंटातूनच घे, " असल्या सोवळ्या ओवळ्याच्या चेष्टा जर तुम्ही करूं लागाल, तर म्हारवाड्यांतले एखादे भिकारडे पोर तुमचा कान धरून बजावील, की असले फंद आता करूं नका. तुमचे अंतरंग व बहिरंग काय आहे, ते आम्हांस कळले आहे. ते थोतांडाचे दिवस गेले. ज्याने त्याने आपापली अब्रु बचाऊन राहावे हे चांगले.

मि. भावेबुवा, धार्मिक, सामाजिक, उच्चनीचपणा हा तुम्हाला काल्पनिक हक्काचा वाद दिसतो पण यातच सर्व मेख आहे. एक वैदिक गुलामगिरी तुम्ही

आमच्यावर लादल्याने, प्रथम आमचे ज्ञान गेले. त्याबरोबर अक्कल गेली, आणि सर्वच बाबतीतला स्वाभाविक हक्क नष्ट झाला. ब्राम्हणेतर वाद, म्हणजे त्याच समान हक्काबद्दलचा वाद आहे. आतल्या बाबी ह्या तपशीलाच्या आहेत. अमूक इतक्या गोष्टी दिल्याने ब्राम्हणेतर शांत होतील, ही कल्पना खोटी आहे. हा वाद विराट स्वरूपाचा आहे. एका अंधळ्याला हत्तीची पूर्ण कल्पना न येता कोणी सोंडेलाच हत्ती म्हणतो, कोणी पायालाच हत्ती म्हणतो, कोणी शेपूट धरून हत्ती असला आहे म्हणतो आणि चौथा आंधळा कानाला लोंबकळून हा हत्ती सुपासारखा आहे ह्मणतो, पण तशा वेगळ्या वेगळ्या पाहण्याने खऱ्या संपूर्ण हत्तीची कल्पना येत नाही., त्याचप्रमाणें हा ब्राम्हणेतर वाद आहे. ब्राम्हण बंधुनी अकुंचित दृष्टी करून आमच्या वेगवेगळ्या मागण्याकडे पाहिले तर ती चूक होते. तुमची लग्ने तुम्ही लावा, श्राद्ध पक्ष तुमचे तुम्ही करा, घरी ब्राम्हण बोलावू नका. एकाने म्हणावे मराठ्यांना जगदंबेला प्रत्यक्ष स्पर्श करावयास पाहिजे, दुसऱ्याने म्हणावे अरे त्यांना आमच्या पंक्तीत बसावयास पाहिजे. भालाकारांनी म्हणावे अरे रोटीव्यवहाराची यांना मुभा दिली. तर उद्या हे आमच्या बेटी मागू लागतील, होय आम्ही जरूर मागू. कारण आम्हाला जातिभेद कायमचा मोडून टाकायचा आहे.

कोल्हापूर हे तुमचे नाकावर टिच्चून सांगत आहे की, "आधी करावे मग बोलावे" यांचे मूर्तिमंत उदाहरण पहाणे असल्यास या कोल्हापूराकडे कशी तरी छाती करून डोळे फाडून पहा म्हणजे पक्के समजेल की त्या कै. शाहू बहाद्दराने तुमच्या छाताडावर बसून मानवी दगडातून मूर्ती कशा करता येतात हे प्रत्यक्ष करून दाखविले आहे. अखिल ब्राम्हणेतर सामाजिक परिषद ही तुम्हाला सवत वाटते काय? तो मान घेऊन पंक्तीला बसण्याची हाव तुम्ही सोडून द्या. तुमच्या संघटना आम्हाला कळलेल्या आहेत. ब्राम्हणांच्या अंगी गुणवर्चस्व काय आहे याचे धिंडवडे प्रत्येक धंद्याचे दुकांनात लागले आहेत. आणि तुमचे जाति वर्चस्वाला आरतीं ओवाळायला भिक्षुकाशिवाय दुसरा कोणी साक्षीदार मिळणार नाही. हा वर्चस्वाचा तोराही अजून विसरला नसाल तर लवकर विसरा. तुमचे "ऐक्यदृढीकरण, अस्पृश्यता निवारण, हिंदुसंघटना, स्त्रीशिक्षण व धर्मपालन" असले जिन्याचे टप्पे चढण्याचे तुम्ही कितीही शाब्दिक दिमाख मानले आणि असले मणाचे मण आणि घटनांचे टन खंडोगणती मांडले तरी हा सर्व पोकळ वासा आहे. ब्राम्हणाचे हातून सामाजिक सुधारणा होणें शक्य नाही. हा आमचा ठाम सिद्धांत आहे.

० ० ०

# ब्राम्हणेतर पक्षाची रचना ब्राम्हणी मेंदूला कळणे शक्य नाही !

(१० सप्टेंबर १९२६)

त्यांनी प्रथमत: या नव्या चळवळीकडे कित्येक दिवस मुळी पाहिलेच नाही. ढुंकून पुसले नाही, दुर्लक्ष केले, चेष्टा केली. हेटाळणी केली. पुढे निंदेला सुरवात झाली. मत्सर बुद्धिने पाहू लागले. शत्रु दृष्टी धरली. उभा दावा मांडला. आणि आता तर ही ब्राह्मणेतर चळवळ मारण्यासाठी केसरीच्या अग्रलेखाचे तीन चार रकाने भरून काढावे लागले त्यात तर्क शास्त्राची रेलचेल.

पण आता केळकरांनी पक्के समजून ठेवावे की, या तर्क कुतर्क वितर्क शास्त्राने ब्राह्मणेतर पक्षाचे काडिमात्र वाकडे होणार नाही. श्री. सयाजीराव गायकवाड यांच्यापासून तो थेट अंत्यज वर्गापर्यंत आणि कोळी कातकऱ्यापासून तो थेट इंग्रजापर्यंत चट सारा भरत खंडातील यच्च यावत मनुष्य समुदाय या ब्राह्मणेतर समाजात बेधडक सामील होतो. त्याला कशाचीच आडकाठी नाही. या देशातील जो मनुष्य आहे आणि ज्याला म्हणून या देशाचा थोडा तरी अभिमान आहे त्या साऱ्या जनतेवर या पक्षाचे समानतेचे छत्र आहे. साप, विंचू, खेकडे हेचसे काय परंतु त्याहुनही कांही विषारी मानव प्राणी आमच्यात आहेत. त्यांनाही निर्विष करून आपल्यात सामील करून घेण्याची धमक या पक्षात आहे. 'हास्यविनोदाची" बाडे लिहून थोरवी मिळवू इच्छिणाऱ्यांनी ब्राम्हणेतर पक्षाला हासून थोरपणा मिळविण्याची हाव आतां सोडून द्यावी. ते दिवस निघून गेले आहेत. या पक्षाचा व्याप आता इतका मोठा झाला आहे की त्याला गवसणी घालणें कोणाच्याच हाती राहिले नाही. अठरापगड जाती आणि छपन्न भाषेचे देश आत्मसात करणेची त्याची आज कुवत आहे. त्याला जातीधर्म आणि पंथ याची मर्यादा घालणे पोरचेष्टा वाटत आहेत.

ब्राह्मणेतर पक्षाची रचना शुद्धतर्काच्या पायावर उभारली आहे. जैन, लिंगायत, मराठा, साळी, माळी, तेली, तांबोळी असले पोटभेद या पक्षाच्या ध्यानी मनी स्वप्नीही येत नाहीत. "हात लावला की सोने" या तत्वावर तो चाल चालत आहे. कोणत्याही जातीचा इसम असो तो ह्या पक्षात सामील होण्यास पात्र आहे. समता हेच या चालीचे निशाण आहे. आणि 'विषमतेचा काळ' या पडघमवर तो शत्रुचे धाबे दणाणवीत आहे. ब्राह्मण वर्गाला आमचे सरळ सांगणे आहे की जाती गोतीच्या, उच्च नीच पणाच्या आणि भेदभावाच्या तत्वावर ही विभागणी झालेली नाही. ही बरोबर डिव्हिजन बाय डायकॉटमी आहे. हा अब्राह्मणपक्ष

पूर्ण न्यायावर उभारला आहे. ब्राह्मणवर्ग वर्णाश्रमाची जन्मजात जातिभेदाची गुणकर्म विहीन रचनेची माडणीं मांडून विषमतेचा डौल मिरवीत आहे, तो एका बाजूस. अर्थात समतेचे तत्व मान्य करणारा ब्राम्हणेत्तर वर्ग दुसऱ्या बाजूला हा ठाम सिद्धांत आहे त्याला पक्षपात कोणाचाच करता येत नाही. समतेचे पुरस्कर्ते म्हणून मुस्लिम इंग्रजाना जो आपल्या पोटांत घेऊं इच्छितो, तो आप-ल्याच रक्तामांसाच्या जातीगोतीच्या आणि गोत्राच्या ब्राम्हणवर्गाला बाहेर ढकलील हे शक्य नाही, हा त्याना तात्पुरता चटका आहे. विषमतेचे बीज या हिंद-भूमीत, पेरून सर्वत्र विषारी जाळे ज्या एका वर्गाने तयार केले आहे, त्याची खोड मोडावी, त्याच्या पापाची त्याला आठवण करुन द्यावी, त्याला खरा पश्चाताप होऊ द्यावा, ह्मणून हा एक प्रकारचा सत्याग्रह आहे. "आमच्या शिवाय चालायचे नाही" असे म्हणणाऱ्यांचा ताठचाचा काटा मोडून टाकावा म्हणून हा डाव आहे. आमचा ब्राम्हण वर्गाशी मत्सर नाही. द्वेष नाही, आमचे ते शत्रू नव्हेत. एका घरचेच बंधू आहेत, परंतु उच्चनीचपणाचे ढोलगे गळचात अडकऊन जोपर्यंत ते फिरत आहेत, तोपर्यंत हे ब्राह्मणेतराचे सुदर्शन, पाहिजे तर शुक्लकाष्ट ह्मणा (ब्राह्मण दृष्टीने) त्यांच्या मागचे सुटणें शक्य नाही. धार्मिक, सामाजीक, शिक्षणविषयक औद्योगिक, राजकीय, कोणताही विषय घ्या विषमतेचे पिल्लू कोणी पुढें आणू लागेला तर त्याच्या नाकावर तडाखा देण्यास हा नवा पक्ष सदोदित तयार राहणार ! त्या वाचून त्याचे चालणार नाही. ती गोष्ट कोणाच्या इच्छेवर आता राहिलेली नाही. ब्राह्मण वर्गाने आपले विषमतेचे गाठोळे फेंकून दिले, जन्माचा थोरपणा कमी केला, जातीचा डौल दूर सारला, सोंवळचा-ओवळचांचा गावाळ ग्रंथ फाडून टाकला आणि समान नात्याने, समान भूमीवर समतेच्या हक्कावर, सहानुभुतीचा आणि प्रेमाचा हात देण्यास तयार झाला, तर हा ब्राह्मणेतर पक्ष ब्राह्मणबंधू बरोबर सुद्धा सहकार्य करण्यास आनंदाने तयार आहे.

परंतु हे अजुनी होणें कठीण दिसते. विषमतेच्या रक्ताचा कांटा अद्यापी खाली उतरतच नाही. वामनानी बलिराजाला पाताळांत घातला, परशुरामानी एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रीय केली, " नंदांतं क्षत्रिय कुलम " असली काल्पनिक स्मृती पाणक्यासारख्या ताठलेल्या भटजीनी घुसडून दिली, पेशव्यानी साताऱ्च्या मालकाना बंदीवासात झुणका भाकर खायला लावले, फडणीस नानानी छत्र-पतीना राजरोसपणे चार अक्षरें वाचण्यासही मज्जाव केला, परशुराम भाऊनी, जातीच्या दुराग्रहास बळी पडून करवीर शंकराचार्यांचा मठ जाळण्यापर्यन्त सना-तनी धर्माचा फज्जा उडविला ! परवापर्यन्त पुणेकर ब्राह्मण बंधुनी कै. राजर्षीना राजद्रोही आणि देशद्रोही ठरविण्यापर्यन्त पुण्याई खर्च केली. त्याच परशुरामी

संस्कृतीच्या हक्काच्या गादीवर, चितपावनी वारसा सांगणारे केळकर, ब्राह्मणेतर मराठ्यांना कोणत्या दृष्टीने पहात असतील, याचा जगानेच विचार करावा ! आणि असल्यांच्या लेखणीतून वेगळे विचार येण्याची आह्मी कधी आशाही बाळगीत नाही,

कुर्तकोटी :– हे विद्वान सुप्रसिद्ध सुधारक म्हणूनच महाराजानी विश्वासाने या करवीर पीठावर आणले. महाराजांची आशा फार की, ब्राम्हण सुधारकाकडूनच आपले नवीन समाज सुधारणेचे तत्व अमलांत आणावे. आणि ब्राह्मणेतर चळवळींला जोर द्यावा. कांही वेळ हा गाडा कुर्तकोटीनी चालविला. त्यांनी गादीचे दूध पाहिले होते. परन्तु समतेचा वडगा पाहिला नव्हता. त्यांच्या गाडीला लवकरच एक खडक लागले.

कुळकर्णी आणि जोशी ही वतने जोपर्यंत अस्तित्वांत आहेत, तोपर्यत राजकीय सुधारणेला तो एक मोठा ब्रेक आहे, हे महाराजांनी जाणलें होते. ही वतने खालसा करणे आहेत, त्यावाचून ब्राह्मणेतरांची चळवळ यशस्वी होणे शक्य नाही. अशी त्यांची बालंबाल खात्री झाली होती. म्हणूनच कुर्तकोटींना त्यांची सूचना होती कीं, ह्या कामी आपल्याला सहाय्य मिळावे. परंतु महाराजांची या कामी मनुष्य परिक्षेची चूक घडली. महाराजांचा निश्चय सुटेना. कुर्तकोटीना हा विचार पटेना. लाथाफळीला सूरूवात झाली. अखेर निर्वाणीचा प्रसंग आला. आणि कुर्तकोटींनी भिडेचा पडदा बाजूस सारून महाराजांना साफ कळविले की, "कुळकर्णी आणि जोशी यांच्यावाचून माझे अगदी चालावयाचे नाही." संपले. मार्ग खुंटला. महाराजांना असा प्रसंग आला की कुर्तकोटींना तरी सोडले पाहिजे, किंवा ब्राह्मणेतर चळवळ तरी बाजूस टाकली पाहिजे. दोघेही निश्चयाचे बळकट. अर्थात कुर्तकोटीना पीठाचे सन्यासावाचून दूसरा मार्ग नव्हता. आणि तो त्यांनी पत्करला. आता ब्राह्मणेतर जगद्गुरु वाचुन हे कार्य होणे कठीण आहे, हे महाराजांनी जाणले. पूर्वीपापासून, क्षत्रिय राजे हेच धर्मसंरक्षक, याबद्दल शिवछत्रपतींच्या प्रथम दिवसापासून; तो सातारच्या अखेर कालापर्यंत, याबाबतीत राजा हाच मुख्य सूत्रधार आहे. असा दप्तरचा पुरावा भरपूरआहे. दरम्यान कांही स्वार्थी लोकांनी अधिकाराचा दुरुपयोग केला. तेव्हां छत्रपतींनी तिकडे लक्ष दिले नाही. या कारणाने छत्रपतींच्या हक्कावर कांही वेळ केरकचरा पटला होता. तो झाडून साफ केला. किती जरी कौतुक केले, वाटेल तसे प्रेमाने वागविले, तरी ब्राह्मणांचे हातून समाज सुधारणेचे कार्य धडाडीने होणे शक्य नाही. हे कुर्तकोटीनी दाखवून दिले. आणि महाराजांनी स्वतंत्र क्षात्रजगद्गुरु पिठाची

स्थापनाकेली. पाटगांव मठ हे मौनीबुवांचे पवित्रस्थान, शिवछत्रपतींनाही पूज्य आणि त्यावर सदाशिवराव पाटलासारखे एक सद्गृहस्थ कॉलेजमध्ये विद्यार्थीदशेत असलेले, त्यांचे अंगचे गुण ओळखून, त्यांची या पीठावर योजना केली,

६

## म्हणे ब्राम्हणेतराना काय पाहिजे

( २८ जानेवारी १९२७ )

बारा वर्षे रामायण ऐकून पुन्हां रामाची सीता ही कोण? हा प्रश्न आहेच:– सत्यशोधकाना काय पाहिजे? हा मोठा गूढ प्रश्न आमच्या पुणेकरांसमोर येऊन पडला आहे. जणूं काय, त्यांच्या कानावर आमची हाक गेलीच नाही! बरोबरच आहे: झोपेचे सोंग घेतलेल्या इसमास जागे करणें कठीण आहे. खरा झोपलेला माणूस असला तर हाका मारुन, मोठ्याने ओरडून किंवा फार तर "हंटरचे" चार तडाखे पाठीवर उडवून, त्यास उठवता येईल. परंतु सोंगाड्यास जागें कसे करायचे? ब्राम्हणेतर चळवळीने आज सारा महाराष्ट्र व्यापला आहे. सामाजिक आणि धार्मिक चळवळ हाती घेऊन "अरे तर कारे" असे म्हणत, कोणा बरोबरही तो सामना करण्यास तयार झाला आहे. म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डे, त्याने व्यापुन टाकली आहेत. कौन्सिलात त्याचे अस्तित्व सर्वांना चांगले भासू लागले आहे ब्राह्मणाच्या डोळ्यात तर हा नवा पक्ष सर्वत्र मारखा सलत आहे. इतक्या गोष्टी झाल्या असून पुन्हा तुम्हाला पाहिजे तरी काय असा प्रश्न, परक्याना चांगला, गोंडस आणि माळसूदपणाचा दिसत असेल, परंतु आम्हांस ती थट्टा वाटते, आम्ही उलट विचारतो की ब्राम्हणवर्गाचें मनांत खरोखरच आणि मनापासूनच हा प्रश्न सोडवायचा आहे काय? असेल तर आमचा हात तुमच्याहून दोन इंच जास्त पुढेंच खाम येईल! परंतु आजपर्यंतच्या ब्राम्हणांच्या वागणकीकडे पाहिले असता, आणि पुणेरीपत्राचा "रोख आणि झोक" लक्षात घेतला असता, आम्हांस हा केवळ लंपडाव वाटत आहे! ते असो, परंतु

आम्हांस देण्यासारखे तुमच्याजवळ काय राहिले आहे ! – तुम्हाला सत्तेच्या ऐन अमदानीत प्रधानकीची वस्त्रें मराटयांनी दिली त्याचा परिणाम काय झाला? हे सर्वांना दिसतच आहे मालकालाहि तुम्ही बुडविले व त्या बरोबर तुम्हीही बुडाला. मराठा बादशाही तुम्ही बुडविली आणि ब्राम्हणी पेशवाईही लयाला गेली. अष्टौल ब्राम्हणी सत्ता चक्राप्रमाणे सर्वांना सारखी भोवली. तिचीच पुनरावृती पुन्हा होऊ नये, कौन्सिलमध्यें घुसून, सरकारच्या आडाने ब्राम्हणेतरांची खोड जिरवण्याची संधी तुम्हाला पुन्हा मिळू नये, हीच आमची इच्छा. पण त्या आपल्या राजकीय सत्तेत कोणी विभागी होऊ नये म्हणून पुणेरी पत्रांचा सारखा हव्यास. परंतु सत्यापुढे ब्राम्हणवर्गांचें कांही चालेना अशी स्थिती झाली आहे.

धर्मज्ञानाचें दिवाळे वाजलेल्यांनी आम्हास काय द्यावयाचे ? :– पूर्वीचा काल निघून गेला. ते सत्वशील ब्राह्मण आज आहेत कुठे ? सर्वसंग परित्याग करून केवळ ज्ञानधनसंतुष्ट, असा एखादा ब्राम्हण दृष्टीस पडणे हे आज दुर्मिळ. ब्रह्मचर्चेत आयुष्य खर्च करणारा पूर्वीचा ब्राम्हण कोठे, संपत्तीला लाथेने झुगारून देऊन, ईश्वरी चिंतनात काल घालविणारा पवित्र ऋषी कोठे; आणि दीड दमडीच्या नोकरीसाठी बंगल्यावर हेलपाटे घालता घालता, देहाचे पाणी करून घेणारा; किंवा भाजी, पुरी आणि दुसऱ्याच्या उष्टया कपबशा धुताधुतां हाडाची काडे करणारा आजचा आडनावी ब्राम्हण कोठे ! ज्याला वेदाचा स्पर्श नाही वेदांत कशाशी खातात हे ठाऊक नाही, त्याने आम्हास द्यायचे ते काय ?

सोवळयाचे ढोंग माजविणाराने सामाजिक बाबींचे नांव तरी कसे घेऊन चालेल ? :– आजकालचा ब्राह्मण दुतोंडी माणूस दिसतो. खानावळीत पाटावर बसलेला मुसलमान उठतो केव्हां, ही मार्गप्रतिक्षा करणारा; हॉटेलमध्ये आपण कोण याचे विस्मरण ठेऊन, महारामांगाबरोबर एका टेबलबाकावर बसून, श्रीखंड पुरी, पाव, बिस्किट आणि भाजी चटणी याची चटणी करणारा; असला नखशि–खांत पूर्ण बुटलेरी, पक्का नेटिव्ह साहेब, घरी आला की झाला ब्राह्मण ! वशिष्ट विश्वामित्राची ग्वाही देऊन पुन्हा सनातन हिंदूधर्माभिमानी म्हणविण्यास तयार. मग कोणाचे अन्न पाणी नव्हे तर सावलीही अंगावर पडतांना तीन ताड उडचा मारणारा, अशी लपंडावी वृत्ती लज्जा मर्यादा विहीन व भीड मूर्वतशून्य वागणूक, असले आचार विचार जोपर्यंत ब्राह्मणवर्ग ठेवीत आहे, तोपर्यंत तो देणार काय आणि आम्ही त्यांचेपासून घेणार काय ? तथापी ब्राह्मण वर्ग काय म्हणतो हे तरी एकदा कळू द्या.

हिंदु धर्माने सामाजिक स्वातंत्र्य निषिद्ध मानले आहे काय ? :– हा एक मोठा महत्वाचा प्रश्न आहे. आमची पूर्ण खात्री आहे की, हिंदुधर्म हा कसल्याही स्वातंत्र्याच्या आड येणार नाही. आमच्या सनातन धर्मांचा एका काळी तसा लौकिक होता. तो लोकसंग्रही होता, सर्वव्यापी होता. साऱ्या जगाला खाऊन पचवून पुरवणारा होता.

सनातन धर्माला पूर्वी कोणत्याही परकीय लोकांच्या खाण्यापिण्याने, लग्न संबंधाने बाट पडत नव्हता. शक, मग, यवन, हूण, बर्बर असले भिन्न संस्कृतीचे समाजाचे समाज आमच्या संस्कृतींत घेऊन त्याना पूर्ण सनातन धर्मी करून टाकले आहे. त्या सनातन धर्मास पूर्वी भारतभूमी पुरली नाही. आणि ऑस्ट्रेलिया, जावा, कंबोडिया तर दुसऱ्या बाजूस मेक्सिको, पेरू असल्या दूर दूरच्या देशावर आपले पाय रोऊन सनातन धर्मानें तेथे कायमचा छाप मारला होता.

त्याच धर्माची आजची दशा पहा ! शुद्ध मार्गाने हिंदू करून घेतांना ज्या पुरोहितानें तो विधी केला, ते पाप धुण्यासाठी त्याला आता प्रायश्चित शेण ( पंचगव्य ) खाण्याचा प्रसंग येतो त्या ब्राह्मणी धर्माची थोरवी काय वर्णावी ! त्या पराक्रमी, आजा पणज्यांच्या नातू पणतुनो, धिःकार असो, तुमच्या त्या ब्राह्मणी धर्माला, चालीरीतीला, आचार विचाराला आणि खोट्या ढंगाला ! जोपर्यन्त तुमच्या घरातला एकाचा पायपोस दुसऱ्याच्या पायांत नाही, एकाचे अन्न पाणी दुसऱ्याचे पोटांत गेले तर वांति होते ! तुमच्यासारख्याच दुसऱ्या एका माणसाने तुमच्या विटाळाच्या देहास स्पर्श केला, तर तुमचा धर्म धाडकन खाली पडून त्याचे तुकडे तुकडे होतात, असल्या धर्माचे ओझे तुम्ही वाहता कशाला आणि त्याचे गोडवे गाता तरी कोणत्या तोंडाने ?

ब्राह्मणेतराला पाहिजे आहे ते इतकेच कीं, माणसाने माणसास माणसाप्रमाणेंच वागवावे :– यावांचून दुसरे त्यांस कांही नको, त्याला पंढरीच्या बडव्यांच्या तीन मजली हवेल्या नकोत किंवा काशीच्या पंड्याचे वाडे हुडे नकोत किंवा गयावळचे ऐरावत नकोत. वशिष्ट वामदेवांच्या खास वारसांची लबाड बुद्धीही नको किंवा तसल्या कुबुद्धीच्या सामर्थ्यावर गोर गरींबाला भिकेस लावून मिळवलेल्या पैशाच्या पिशव्या नकोत, किंवा दागिन्याची ओझी नकोत. सत्यशोधकांना काय किंवा ब्राह्मणेतरांना काय एकच गोष्ट पाहिजे. आणि ती दुसरी कोणती नसून सर्वांशी समतेची वागणूक. आज तिचाच दुष्काळ पडला आहे.

अपृस्श्य वर्गास आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तो धंदा करण्यास आणि प्रामाणिकपणाने निर्वाह करण्यास पूर्ण सवलती पाहिजे. इतर वर्ग मराठे, वैश्य, ब्राह्मण यांच्याशी, सर्वत्र सर्वदा प्रपंचातले व्यवहार, सार्वजनिक कामे, आणि सर्व प्रकारचे ज्ञान संपादन करण्यास मोकळीक पाहिजे. नदीनाला, तलाव, विहीरी, हौद अगर नळ येथें इतराप्रमाणें पाणी घेण्यास अडथळा राहू नये. शाळा, धर्मशाळा, देवालये वगैरे ठिकाणी त्यांना प्रतिबंध असू नये. पुराणे व्याख्याने प्रवचनें, याप्रसंगी कसलाही भेदभाव राहूं नये. सर्वत्र त्यास जेवणाखाण्याची परवानगी असावी. त्या कारणांने कोणावरही बहिष्कार पडूं नये. इतर कोणीही हिंदू म्हणविणारा यांच्यात रोटीबेटी व्यवहार केवळ इच्छेवर ठेवावा. कोणावर सक्तीही नाही किंवा कोणाची आडकाठीही नाही. जोश्याची, पुरोहिताची, किंवा धर्मगुरुची या बाबतीत काडीमात्र भीती राहू नये. सारांश आज हिंदू या नांवाखाली जे कोणी येतात त्यांच्या जातींच्या कारणावरून कसलाही भेदभाव राहता कामा नये.

## ७

## जुन्या सुधारकांची डाळ कां शिजली नाही ?

( ६ ऑगस्ट १९२६ )

आजवर आमच्या हिंदू समाजात अनेक थोर लोक निर्माण झाले. त्यांनी आपआपल्या परी लोकांची सेवा केली. आणि त्याचा परिणामही थोडाबहूत का होईना कांही लोकांवर झाला. त्या थोर लोकांचे हेतूही थोर होते, त्यावर आक्षेप घेण्याचे कांही कारण नाही. परन्तु आमच्या मते त्यांच्या विचाराचा परिणाम जनतेवर जितक्या प्रमाणांत व्हावयास पाहिजे होता, तितका झाला नाही. याचा दोष त्या पुरुषांवर नाही तर आमच्या समाजाच्या रचनवर आहे. आमच्या समाजाची रचना अशी आहे की, त्यांत पुरातन कालापासून एका विशेष ब्राह्मण वर्गाचाच नेंहमी पुढाकार झालेला. त्या वर्गाने उच्च प्रकारची मानस शास्त्रे, वेदांतिक विचार, जोतिष शास्त्र, स्वच्छतेचे आचरण, निस्पृहतेचा बाणा आणि अत्यंत कडकडीत वैराग्य या गोष्टीत ब्राह्मण वर्गाने एकाकाली शिकस्त करून सोडली, ती इतकी की त्या पुरातन कालच्या भांडवलावर आज सुद्धां ब्राह्मण वर्ग आपला श्रेष्ठपणा बजावू पहात आहे.

एक वर्ग ज्ञानाच्या शिखरावर पोचला खरा. परन्तु मध्ये पुरोहित वर्गाने आपला स्वार्थ साधण्यासाठी तुसडेपणा. सोवळेशाहीची विलक्षण कल्पना आणि आपला सवता सुभाच स्थापन करण्याचा अट्टाहास केला. या गोष्टीमुळे मुळचे शुद्ध स्वरूप अजिबात बदलून त्यांत एक उच्चनीच जातिभेदाची परंपरा तयार झाली. आणि वेगवेगळचा पायऱ्यांची एक शिडीच बनून राहिली. उच्च विचार एका ब्राह्मण जातीशिवाय खालीं कोठे आढळूनच येईना, चोहोंकडे गाढ अज्ञान. या स्थितीमुळे जे उदार मताचे लोक समाज सुधारणेच्या कामास प्रवृत्त झाले, त्यांची हांक आणि भाषा ब्राह्मणेतरांना मुळीच कळेनाशी झाली.

बंगाल्यांत ब्रह्म समाज उत्पन्न झाला. राजा राम मोहनराय, बाबू केशव चंद्रसेन, ईश्वरचंद्र विद्यासागर या सत्पुरुषांनी समाजाची बिघडलेली घडी पाहिली. मुंबई इलाख्यांत गोपाळ हरी देशमुख, गोपाळराव आगरकर, डॉ. भांडारकर, महादेव गोविंद रानडे, महात्मा जोतिराव फुले, विष्णु परशुराम पंडीत, अशा धैर्यवान पुरुषांनी मोठ्या धडाडीने धार्मिक आणि सामाजिक बाबतींत नवीन सुधारकी विचार जनते समोर मांडिले. पण ब्राह्मण वर्ग हा रुढीच्या जाळयांत इतका गुरफटून गेला होता की, त्यांना रुढीची गाठ सुटेना. सुधारकांचा विचार पटेना. आणि लाथाफळी होऊ लागली. सुधारकांना इतर खालचा अफाट लोक समुदाय मुळी दृष्टीस पडेना. तो गाढ अज्ञानात पडलेला. हे वरच्या थरातले सुधारक आणि मठ्ठ दुर्धारक यांचे गायन आणि भाषण बिलकुल कळेना. म्हणजे हे नवे सुधारक आपले विचार ब्राह्मण वर्गापाशीच काढु लागले आणि तो ऐकणारा ब्राह्मण वर्ग, रुढीने आणि जातिभेदाने चढेल झालेला, नव्या विचारांना मुळीच मानेना. चकीत हरणाप्रमाणें कान टवकारून पाय झाडण्यास तयार झाला. आणि शेवटी सुधारक म्हणजे समाजाचे शत्रू, धर्मलंड, पाखंडी, बाटके अशी विशेषणे मिळून त्यांची पूजा होऊ लागली. उदार मताचे सुधारक खरे, परन्तु त्यांचे सारे प्रश्न या सुधारकांपुढे वाया गेले. आणि सुधारकांच्या नाड्या बंद पडल्या ! समाजामध्ये एक सुबुद्ध ब्राम्हणाचा वर्ग. त्याच्याखाली ब्राम्हणेतरांचा वर्ग. समजूतदार पण त्याच्या डोळयाला पडदे घातलेले ! हा दुसरा थर आणि सर्वांच्या खालचा थर चांगला चालता बोलता माणसाचाच, परन्तु चातुर्वर्ण्याच्या घातकी कोटकिल्ल्याने नळांत रुतून चिंधड्या झालेला ! केवळ पशू बनलेला अस्पृश्य वर्ग! असा हा तीन थरी समाज ! किंवा तीन मजली इमारत. सुधारणा बिघारणा सर्व हालचाली या एका वरच्या थरांत. कांही डोळे उघड हालचाल झाली तर ती वरच्या सर्वांत वरच्या, ब्राम्हणी गुरुवर्गात. खालच्या वर्गाला त्याची मुळीच

दाद नाही ते सुधारक म्हणजे कोण, त्यांचे विचार कशांशी खावयाचे, याचा आम्हाला पत्ताही नाही.

ब्राम्हणेतर वर्ग म्हणजे एक मेंढरांचा कळप. त्याचीं गणना पुच्छविषाणहीन जनावरांच्या वर्गांत झालेली. त्यांचा विचार आणि त्याचे अस्तित्व सुधारकांनी मुळी आपल्या विचारांतच घेतले नाही.

जी धार्मिक आणि सामाजिक सुधारणेची वाट तीच राजकीय सुधाणेची वाट. या राजकीय सुधारणेतही कांही खरे थोर लोक देशासमोर आले. राष्ट्रीय सभेच्या द्वाराने इंग्रज सरकार समोर देशाच्या मागण्या त्यांनी मांडल्या. आणि जागृतिही बरीच केली. परन्तू ते विचारसुद्धा एका पुढारलेल्या वर्गातच होते. खरी लोकशाही कोणती ? आपले राजकीय विचार राष्ट्राच्या सर्व घटकांसमोर मांडिले पाहिजेत.

खरी जनता म्हणजे शेतकरी वर्ग, कारागिर वर्ग, व्यापारी वर्ग, ही गोष्ट त्यांच्या लक्षात आलीच नाही. एक डोळा पुढारलेल्या वर्गांकडे आणि दुसरा डोळा सरकारच्या हाताकडे. ही राष्टीय सभेची वृत्ति परवापर्यन्त चालू होती. अगदी अलिकडे हा भिक्षांदेहींचा मार्ग बाजूला सारून महात्मा गांधीनी देशाला अगदी नवी दिशा दाखविली, सर्व हक्क मिळवणेचे ते लोकांसाठी. सर्व देशासाठी. मिळवायचे ते सर्व लोकांनी. राजकीय हक्क हे एका सुशिक्षित पुढारलेल्या वर्गासाठी नव्हत. देशाचे खरे मालक म्हणजे सर्व लोक. त्यांत भेदाभेद नाही. एका वर्गानें कितीही ओढाताण केली तरी त्यांत अखेर यश केव्हाही मिळणार नाही. सर्व राष्ट्रच्या राष्ट्र एक मुखाने तयार होईल, आपल्या पायावर उभे राहील. तरच आपल्याला खरे राजकीय हक्क मिळतील. तसे न झाल्यास हा कौन्सिलचा फटवा फटवीचा खेळ अगदीच चालू रहाणार. ही नवी दिशा महात्मा गांधींनीं आम्हाला लाविल्यापासून सर्व समाजांत नवजीवन उत्पन्न झाले आहे. आणि ब्राम्हणेतर वर्गाची खरी योग्यता सर्वांना पटु लागली आहे.

केळकर विचारतात, या जाति भेदाने आणि धर्म भेदाने स्वराज्याची नालायकी कशी शाबीत होते ? :- आमचे म्हणणे खास शाबीत होते. स्पॅनिश आरमेडाच्या दपटशहाने कॅथोलिक आणि प्रॉटेस्टंट हे एकरूप झाले, म्हणूनच त्यावेळी इंग्लंड बचावले, तसला धर्मभेद पुढे नाहीसाच झाला. ग्रीस, इटालीत नानाभेद आणि नाना पंथ होते परन्तु मॅझीनी, गॅरीबाल्डी यांच्या प्रखर तेजानें ते भेदवितळून जाऊन, सर्व इटाली एक झाला. त्याचवेळी ऑस्ट्रियाची

हाकालपट्टी झाली. जपानच्या पिढीजात सरदारांनी आपल्या विशेष हक्काचे उदक सर्व लोकांच्या हातावर सोडले, तेव्हांच जपान पुढे आला! यावरून आमचे मत पक्के झाले आहे कीं, आजच्या स्थितीला, जन्मावर उभारलेला जातिभेद आणि हिंदुमुस्लिम धर्मभेद कायम ठेवून, राजकारणाचा खेळ चालवावयाचा असेल, तर तो आकाश पुष्पाप्रमाणे व्यर्थ आहे. हा भेद जर कायम राहिला, तर परकीय सत्तेचा दंडुकाही आमच्या डोक्यावर कायम राहील ?

आज आमचे कित्येक सुशिक्षित व अशिक्षित ब्राह्मणेतर बांधवाना असे वाटूं लागले आहे की, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद मिटावा. ह्यामुळे देशाची हानी होत आहे. ब्राह्मण ते आपले बंधूच आहेत. त्याचप्रमाणें ब्राह्मणबंधूनाही हा वाद मिटून आपण सर्व एक होऊन स्वराज्य प्राप्त करून घेऊं असे मनातले मनांत मांडे खाऊन त्याप्रमाणे ते मोठ्या कळकळीने आमचे लोकांना ऐक्याचा उपदेश करूं लागले आहेत. परन्तु हा वाद मिटावा म्हणून ब्राह्मणेतरांची जशी मनापासून इच्छा आहे तशी ब्राम्हण लोकांची नाही. निव्वळ ही त्यांची लबाडी आहे. आमचे लोकांना भुरळ घालून लटका स्वदेशाभिमान दाखवून आम्हाला तोंडघशी पाडण्याचा हा त्यांचा डाव आहे. आपणास आठवत असेलच की, आमचे लोकांना पाडाव करण्यासाठी व सत्यशोधक समाजास हाणून पाडण्यासाठी खोटे देशभक्तीचे बुरख्याखाली मुसलमान बांधवांना पुढे करून, त्यांचेकडून इंग्रजसरकारला आडवून स्वराज्य प्राप्त करून घ्यावे व ते प्राप्त झाल्यावर मुसलमानांना व ब्राह्मणेतरांना ढकलून देऊन हळूच आपली लाडू पोळचांची सोवळी पेशवाई भाजवूं असा त्यांचा ब्राह्मणी डाव होता. परन्तु हा त्यांचा शकुनी डाव मुसलमानांनी पक्का ओळखून ह्या भटभाईना दूरच ठेविले. हिंदुमुसलमान एक, मूसलमान व आम्ही भाई. असे भाई भाई करुन त्याचे गळचाला मिठ्या मारल्या तरी या भाईने आमच्या मायावी शद्बाला न भुलता आम्हांला दूर सारले ! ह्या धूर्त मुसलमानांपुढे जेव्हां यांची शाठचनीती चालेनाशी झाली तेव्हां ह्या धूर्तांनी त्यांना सोडून आपला मायावी बाजार पसरून अज्ञान व धर्मभोळे ब्राह्मणेतर लोकांना लटके देशभक्तीचा आव आणून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद मिटला पाहिजे तुह्मी आम्ही एक आहोत. कांही झाले तरी हा वादाचा तंटा आपले घरचाच आहे, तो आपण एक होऊन मिटवूया, तेथे परक्याचे कांही कारण नाही, इंग्रज लोक परके आहेत त्यांचे नादी लागू नका, आमचे जातभाई ब्राम्हण हे कर्मभ्रष्ट झाले आहेत, त्यांनी आपला ब्राह्मणपणा सोडला आहे, तेव्हां तुम्ही आम्ही एक होऊन अगोदर ब्राम्हणांची सुधारणा करूया वगैरे मतलबी गप्पा मारू लागले आहेत. पूर्वी हेच ब्राम्हण लोक आमचे लोकांना म्हणत की, ब्राम्हणेतर लोक हलकट आहेत, शुद्र आहेत, मूर्ख आहेत त्यांचे मदतीची जरूर नाही. असे भकणारे जे हे ब्राम्हणभाई त्यांना आताच

ब्राम्हणेतर लोकांचे मदतीची आवश्यकता वाटून आमचे विषयी प्रेमाचा व ऐक्याचा रस कां वाहू लागला हे कळत नाही.

माझे मते ह्याला एक कारण आहे ते हे कीं, आज शेकडो वर्षे ब्राम्हणलोक लटक्या गुरूपणाखाली सामाजिक व धार्मिक बाबींत आम्हांला चेपीत आले व आम्हीही त्यांचे सत्तेमुळे त्याना मान वाकवून देवबापा मानीत आलो. आमची ही जनावराची स्थिती ५० वर्षापूर्वी महात्मा ज्योतिराव फुले यांनी जाणून हा त्यांचा वरचढपणा व लटका भुदेवपणा नाकारण्यासाठी व ब्राम्हणेतर लोकांस समान हक्काची व आपले माणुसकीची जाणीव व्हावी म्हणून सत्यशोधक समाजाची स्थापना करून या चढेल भटांभिक्षुकांना पक्का शह देऊन ब्राम्हणेतर लोकांना त्या महात्म्याने जागे केले. त्याप्रमाणें बरेच ब्राम्हणेतर बांधव खडबडून जागे होऊन या नादान भटांभिक्षुकांपासुन अलग होऊन त्यांचा धार्मिक हक्क त्यानी अजिबात झुगारून दिला. ह्या समाजाचा कारवार. हुबळी, धारवाड, बेळगांव, कोल्हापूर, सातारा, पुणें, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, खानदेश वऱ्हाडप्रांत वगैरे ठिकाणी प्रसार होऊन त्याचा जोर इतका वाढला कीं, सर्व ब्राह्मणेतर वर्ग एक होऊन नाठाळ लोकांच्या झुलकावणीला भीक न घालता त्यानेएक जुटीने कौन्सिलात प्रवेश करून घेतला. इतकेच नव्हे परन्तु सर्व हिंदुस्थानांत ब्राह्मणेतर लोकांची एकजूट होऊन भटभाईना मागे ढकलून सर्व लोकलबोर्डे आपल्या ताब्यात घेतली व हे भटभाई जागचे जागी चुरमुरे फाकीत बसले. हा सत्यशोधकांचा प्रताप पाहून व सर्व ब्राह्मणेतरांची एक जूट झालेली पाहून ह्या भटभाईना आता चिमटा बसला आहे व मनांतले मनांत दांत ओठ चावू लागले आहेत. वरवर लटकी सहानुभूती दाखवून आपण आपसातील ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद मिटवूया असे आता म्हणू लागले आहेत. यात प्रामाणिकपणा असेल काय ?

## ८

## आम्ही काय करावे

( १८ डिसेंबर १९२५ )

आम्ही आज उमरावतीस भरणाऱ्या कॉंग्रेसला अत्यंत नम्रपणाने कांही सूचना करणार आहोत, त्यांचा योग्य विचार करावा. आमच्या मते ब्राह्मणेतरांच्या वेगवेगळचा विषयासंबंधी वेगवेगळचा परिषदा नकोत. ब्राह्मणेतर कॉंग्रेस वेगळी,

ब्राह्मणेतर सामाजिक परिषद वेगळी सत्यसमाज परिषद वेगळी, अशा वेगवेगळ्या परिषदा करण्याचे कांही कारण दिसत नाही त्यामुळे पैशाचा व्यर्थ खर्च आणि वेळ व श्रम निष्कारण जातात. पंचवीस वर्षांपूर्वी कॉंग्रेस आणि सामाजिक परिषद या वेगळ्या होण्यास तशीच कारणे होती टिळक पक्षाला राजकीय हक्क मिळवायचे होते. परंतु ब्राम्हणवर्गास जन्मजात हक्क इतरा कोणास द्यावयाचे नव्हते, किंवा मूर्ख रूढीची घट्ट गांठ सैलही करायची नव्हती. या भिन्न मतामुळे लढा उत्पन्न झाला. आणि जीर्ण मताचे अभिमानी टिळक, श्रीधर विठ्ठल दाते यांच्यासारख्या मनुष्याला हाती घेऊन नाचू लागताच, जुन्या नव्यांत वागवानी भांडणे उत्पन्न होऊन सामाजिक परिषद त्यांनी उधळून दिली! शहाण्या पुढाऱ्यांत मवाळ आणि जहाल असे पक्ष पडून मवाळ पक्ष बाहेर पडला. स्वराज्याचा पुकारा केल्यानंतर थोडया दिवसांनी महात्माजीनी असहकारिता पुकारिली. मेंग्या शिलेदारांनी कशीवशी मेटाकुटीला येऊन ही कॉंग्रेसची गाडी रूळावर आणली. पण त्यातला एक बैल स्वराज्यपक्ष हा पडचा निघाला. त्याने जमिनींशी धरणे धरले, पुढे पाऊल पडेना, गाडी जागची हालेना. पं. नेहरू पुढे ओढताहेत तर केळकर जयकर मागे पड खाताहेत, ही रंगी बेरंगी तिरंगी सरडयाची चाल पाहून सारे जग हांसते आहे नव्हे थुंकते आहे. बारा पुरामध्ये आणि तेरा चुली अशांतला हा खेदाचा प्रकार झाला आहे. ज्याला त्याला माझे मत काय ते खरे आणि माझ्या मताविरुद्ध जाईल तो माझाहि शत्रू आणि देशाचाहि शत्रू अशा क्षुद्र भावना या अतिशहाण्यांत उत्पन्न झाल्या आहेत. आणि आजची कॉंग्रेस म्हणजे सतरा ठिगळाची गोधडी झाली आहे. कॉमन ग्राउंड कोणाला करायला नको. मतभेद झाला की फुटाफूट झाली. हा यांच्या आंगचा थोरपणा, राष्ट्राचे कोणीच पहात नाही ; कोणी यांच्या स्वार्थाच्या आड आला, कोणी शारिरीक घस सोसण्यास सांगू लागला, कीं ही पुणेरी मंडळी कावळ्यासारखी काव काव करून त्याला भाजून काढण्याचा यांचा नेहमीचा स्वभाव आहे. ते महार असोत ते पंडीतजी असोत नाहीतर तो ब्रह्मदेव असो, यांच्या आड कोणी येता कामा नये. खरे ह्मटले तर या दुरभिमानाने आणि आप्पलपोटेपणाच्या व्यसनाने कॉंग्रेस म्हणजे एक दिवाळखोरांचा देखावा आहे असे दिसू लागले आहे. त्यांच्यांत कांही राम उरला नाही. जेथे सज्जनाला किंमत नाही तेथे दुर्गुणाच्या सवंग मालाची भरभराट होणार, हे उघडच आहे ! ही भिन्नमते, भाऊबंदी वाटण्या आणि पोटवाटण्या, भांड भांडून करून घेऊन, मूळच्या इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे आज इतके तुकडे तुकडे होऊन गेले आहेत, की खरी कॉंग्रेस कोणती, हेच समजेनासे झाले आहे.

माझ्या ब्राम्हणेतर " बंधूना पोटीच्या कळवळ्याने " सांगणे आहे की हा प्रकार आमच्यांत होऊ नये. या बद्दल आम्ही आजपासूनच काळजी घेतली पाहिजे.

या ब्राम्हणेतर काँग्रेसला अनेक शत्रू आहेत. पहिला शत्रू ब्राम्हण वर्ग हा डोळ्यांत तेल घालून बसला आहे, त्या वर्गात आज कांही किंमत राहिली नाहीं. ही गोष्ट खरी तथापि लावालावी घरभेदीपणा करुन कळ लावणारे क्षुद्र नारद पुष्कळ आहेत. आमचा समाजही तसा भक्कम मनाचा नाही. महात्मा फुल्यांच्या पुतळ्याचे वेळी यांचे चित्र दिसून आलेच आहे. ब्राह्मणेतर या शब्दांत भिन्न भिन्न जाती येतात. त्याच्यात अद्याप प्रेम व एकोपा असावा तितका नाही. समान हक्काच्या भूमीवर आज जरी ब्राम्हणेतर ह्मणून एक समाज निर्माण झाल्यासारखा दिसतो, तथापि रेशमाच्या दोऱ्यानी त्यांची अंतःकरणे बांधुन त्यांचा एकजीव करण्याची फार मोठी कामगिरी पर्वतप्राय समोर दिसत आहे. नाताळचे सुट्टीत एका मंडपात मराठा, जैन, लिंगायत, सोनार, शिंपी, तेली, तांबोळी, कुंभार, धनगर, चांभार, महार एकत्र बसून वक्त्यांची भाषणें ऐकून निघून गेले, एवढ्याने ब्राह्मणेतर समाज एकजीव झाला असे होत नाही. तीन दिवस एकत्र भोजने झाली एका गांवचे हवा पाणी प्याले, म्हणजें प्रेमबंधन होत नसते. ; जे काँग्रेसचे कार्य करण्याचे माझ्या मते उपाय आहेत ते मी नमूद करीत आहे :–

आज ब्राह्मणेतरांत निदान त्यांचे पुढाऱ्यांत तरी राजकीय सामाजिक किंवा धार्मिक मतांत फारसे अंतर नाही. पुढारी ब्राह्मणेतर स्वराज्य मागतो, सामाजिक समता मागतो, व पूर्ण धार्मिक स्वातंत्र्यही मागतो. ब्राम्हणेतर काँग्रेस काय, ब्रा. सामाजिक परिषद काय किंवा सत्यसमाज काय याच्या विचारात आणि आचारात म्हणण्यासारखा भेद नाही. शूचिर्भुत आणि सोवळा मराठा किंवा जीर्णमताचा लिंगाईत जैन, या चळवळींकडे भाग न घेता, तटस्थ वृत्तीने पहात आहे. हल्लीचा जातिभेद, उच्चनीचपणा गळ्यांत आडकवून घेऊन कोणी ब्राम्हणेतर आमच्या समाजासमोर येऊं शकत नाही. उमरावतीस येणारे ब्राम्हणेतर बहुधा एक मताचेच असणार. तोच स्वराजिष्ट, तोच समाज सुधारक आणि तोच सत्यसमाजिष्टही असणार अशी वस्तुस्थिती आहे आता आमच्यातला जीर्णमताचा मागासलेला वर्ग आहे, त्याला मागे टाकून मुळीच चालणार नाही. बारा महिने त्यांना शिक्षण, व्याख्यान, लेखन वगैरे देऊन, त्याला कार्यक्षम करणे हे आमचे काम आहे. उमरावतीच्या बाहेरची कामगिरी ती हीच. परंतु जीर्णमतवाले सोवळे मराठे वगैरे लोक व नवमतवादी सुधारक लोक यांची एकच जर पोथडी बांधली आणि परिषदा भरविल्या तर त्याचा शेवट तंटे भांडणात खास होईल. अशी आम्हांस भिती वाटते. म्हणून भेदजनक वर्णभेद आणि जातीभेद नाहींसे करणें. हे ब्राह्मणेतर काँग्रेसने आपले ध्येय ठेविले पाहिजे.

# हाच तो दुर्दैवी ब्राम्हणेतर म्हणजे क्षत्रिय वर्ग

( ४ फेब्रूवारी १९३० )

गेल्या चार पांच लेखांमध्ये राष्ट्रीय सभेबद्दल आम्ही आमचे विचार प्रकट केले आहेत आणि तिच्या स्वरूपात कसे अंतर पडत चालले आहे, तेही सारांश रूपाने मांडले आहे. मवाळ पक्ष काय म्हणतो ।– विशेष धक्का धक्कीच्या मामल्यात न पडता, इंग्रज सरकारच्या धोरणास अनुसरून हळू हळ आपला राजकीय ध्येयाचा मार्ग आक्रमण करीत जावा, हे त्या पक्षाचे मत सारांश रूपाने मांडण्यात आले आहे. मोठा पक्ष मुसलमान वर्गाचा आहे. हा वर्ग पूर्वीपासून जोरदार आहे. ते लोक केव्हा केव्हां धर्मश्रद्धेच्या भावनेवर हमरी तुमरीत येतात. ही गोष्ट कांही खोटी नाही. कांही झाले तरी मुसलमानांना वगळून केवळ लोकसंखेच्या बहुमतांवर हिंदुलोक आपण प्रामुख्याने हिंदुस्थानचा राज्यकारभार पाहूं, असे म्हणतील तर ती गोष्ट फार कठीण जाईल. मुसलमान लोकांचे संख्याबल पंजाब, सिंध, वायव्येकडील प्रांत आणि बंगाल येथे जास्त आहे. तसेच वरील प्रांत वगळून मुंबई, मद्रास, सी. पी. प्रांतात मुसलमानांची संख्या कमी आहे तेथे हिंदूचे संख्याबल फार मोठे आहे यात शंका नाही. तथापि आज मुसलमान लोक आमच्या सारखेच हिंदुस्थानचा एक बराच मोठा भाग आणि महत्वाचा वर्ग होऊन राहीला आहे यात कांही शंका नाही. मुसलमानांना वगलेस सारून किंवा त्याना वगळून किंवा संख्याबलाचे जोरावर कौन्सिलमध्ये वगैरे त्यांचा पराभव करून आपणच एकतंत्री राज्य कारभार चालवू असे मानणें हे हिंदू लोकाना योग्य नाही.

वास्तविक आज ना उद्या "धर्म" या विषयाचे महत्वच कमी होईल, असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे. भिन्न भिन्न मते, सांप्रदाय व धर्म ही, मनुष्याचे आवडीनुसार संस्काराप्रमाणें आपापल्या प्रकृतीच्या आणि स्वभावाच्या गूणास अनसरून जाण्याचे ते मार्ग आहेत,

ती अंत:सुखाची साधने आहेत, अमूक समाजाला अमुक धर्मानेच सुख कां वाटावे. हा प्रश्न करण्यास इतराना अधिकार नाही. धार्मिक स्वातंत्र्य हे नजिकचे ध्येय आहे. यात तंटा बखेडा नको.

मुसलमानानी बरेच वर्षे हिंदुस्थानवर राज्य केले आहे. आणि अकबरासारख्यानी तर हिंदू लोकांना मोठ मोठ्या अधिकाराच्या जागा दिलेल्या आहेत.

आणि त्याना बरोबरीच्या मानानेही वागविले आहे. विजापूरची आदिलशाही वगैरे मुसलमान नबाबानी अनेक हिंदूना प्रधानगिरीची वस्त्रे दिलेली आहेत. हिंदू देवताना कायमची गांवे व जमिनीही इनाम दिली आहेत. मुसलमानांची पाळेमुळे भरतभूमित कायमची पेरली गेली आहेत. आमच्या अनुभवास आले आहे की, असा एकही गाव मिळणार नाही की, जेथे मुसलमानांची मशीद नाही आणि मुसलमान वतनदार नाही. ही सर्व स्थिती लक्षात घेतली असता मुसलमान हे आपले बरोबरीचे भाईबंद आहेत असा निश्चय करून राजकारणांत त्यांच्या हातात हात घालून काम करण्यास आपण सुरवात केली नाही तर स्वराज्य इंग्र–जासारख्या चतुर आणि धोरणी सरकारच्या हातातून मिळविणे ही गोष्ट फार लांबणीवर जाईल,

ऐतिहासिक आणि धार्मिक उदात्त विचारात क्षत्रियानीच आघाडी मारलेली आहे. आपला अत्यंत प्राचीनचा सर्वसामान्य इतिहास म्हणजे ऋग्वेद. हा येथून तेथून सर्व क्षात्रधर्मानीच भरून गेला आहे. त्यांच्यात पुढे पुढे काही वेगवेगळ्या चालीरीतीच्या क्षात्र वर्गाच्या टोळया समाविष्ट झाल्या. थोडे फार आचार विचार बदलले गेले. भिन्न वंशाचे आणि रक्ताचे समाज आमच्यात समाविष्ट झाले. तथापि त्या सर्व समाजावर क्षात्रधर्माची छाप कायमची राहिली. अनेक सूक्ते क्षत्रियांचे नांवावरच ऋग्वेदात नमूद झालेली आहेत. चारी वेदाचा सार किंवा सर्व ज्ञानाचे अंतीम ज्ञान, ज्यात गच्च ग्रथीत केले आहे, असे उपनिषद ग्रंथ ही क्षत्रियांचीच मत्ता आहे, ब्राम्हण वर्ग हा केवळ पुरोहिताचा वर्ग. क्षत्रियांची धर्मकृत्ये या पुरोहितांचे हातून केली जात असत. आणि त्यावर त्यांचा उदर निर्वाह चालत असे. केव्हां केव्हां या पुरोहित वर्गाला दक्षिणा रूपाने द्रव्याचा चांगलाच लाभ होत असे. प्राचीन काळी क्षत्रीय, ब्राह्मण वैश्य, असा हा त्रिवर्णांचा नावाचा अनुक्रम होता. पण पुढे कालांतराने तो बदलण्यात आला. आणि आज क्षत्रियाला ब्राह्मणानंतरची दुय्यम प्रतीची जागा मिळाली आहे.

(डॉ० केतरकर कृत ज्ञानकोश मंडळाचा इतिहास पान १४० पहा)

"इराणी, दुराणी, टर्क, मोगल, पठाण आले गेले. घोरी, गिझणी यांच्या स्वाऱ्या झाल्या. या परक्या लोकांच्या धुम धडाक्याला टकरा देऊन पुन्हा क्षत्रिय वर्ग हा आपली समशेर हातात घेऊन उभा आहेच आहे परकियांची वादळे आणि ओढे तटवून क्षत्रिय वर्ग आजही तसाच जिवंत आहे. सूर्यावरचे ढग क्षणभर आले. छाया पडलेली गेली. पुन्हा ते तेज कायम ते कायम; मध्ये काही काल मोगलांचे राज्य झाले. क्षत्रियाला कांही काळ दबून रहावे लागले. पण वेळ येताच डोंगर कटा-रीच्या आश्रयाने दऱ्या खोऱ्यांचे मार्गांने, लपाई छपाईच्या उपायाने, क्षत्रियांनी

आपले डोके वर काढलेच. क्षत्रियांचा भाग्य सूर्य पुन्हा तळपू लागला. त्या वृक्षाला सर्वत्र अफाट फाटे फुटले. आणि पंजाब ते कन्याकुमारी आणि द्वारका ते आसाम जिकडे पहावे तिकडे क्षत्रियांची राज्ये उदयाला आली. मराठा हा महारथी. शेतकरी तोच क्षत्रिय. आर्त. दु:खित, जर्जरीत संकटग्रस्त समाजाला हाती घेऊन आपल्यात पूर्ण समरूप करून घेऊन, हा वर्ग सर्वत्र लोकसंग्रहाचे काम करीत आहे. मराठ्या इतका निर्मळ मनाचा आणि सर्व व्यापी समाज पहाण्यासही मिळणे दुर्मिळ ! एका बाजूस तो राजाचा हितचिंतक, आप्तइष्ट, मानकरी, राजनिष्ट सेवक आणि राष्ट्राच्या इमारतीचा विश्वासू खांब बनून राहिला. तर दुसऱ्या बाजूस कोळी, भुई, साळी, माळी, गवंडी, कुंभार, कुणबी, शेतकरी यांच्या हातात हात घालून गळ्यात गळा घालून प्रेमाची मीठ भाकरीही खाण्यास तयार आहे. पुन्हा काल चक्राच्या फेऱ्यात हा समाज सापडला. आपले अस्तित्व न विसरता आपले ब्रीदास जागून, राज्यात आपण एक मोठा महत्वाचा घटक आहे ही जाणीव त्याला आहे आणि सरकारलाही तो तसा जाणवीत आहे. इंग्रज सरकारचा खजिना फारच मोठ्या प्रमाणावर आज ब्राह्मणेतर वर्ग भरीत आहे. शेतकरी नात्याने ३७ कोटी जमीन महसूल तो बिलकुल जमा करीत आहे. कारागिर, शिल्पकार. या रूपाने तो समाजाचा अत्यंत जरुरीचा सेवक म्हणून काम करीत आहे. वस्त्र प्रावरणाची समाजाची लज्जा राखण्यास साळी, कोष्टी, गवंडी, पाथरवट, सुतार या रूपाने समाजाला निवाऱ्याच्या जागा करून देणारा हा ब्राह्मणेतर वर्गच गादीवरचा मजूर, आगगाडीचे स्टेशनावरील उतारूंची ओझी उचलणारा, सातारा, खानदेश, दिल्ली येथील हमाल हा ब्राह्मणेतर वर्गच अहोरात्र जिवापाड श्रम करून गलिच्छ हवेत कोंडलेल्या वातावरणात ग्रीष्म ऋतुच्या कडक सूर्यकिरणात, जल धारानी भिजलेला केवळ भाजी भाकरी पुरता मुशाहिरा घेऊन, जनतेची जरूरीची कामे करीत राहणारा वर्ग हाच. आणि तसेच आपल्या प्राणापेक्षा प्रिय दुसरी कोणतीही वस्तु नसता, ते सर्व खर्च घालून, गिरणीच्या मालकाचे आणि भांडवलवाल्यांचे इमले तयार करुन देणारा वर्ग हाच. आणि मोटारी, बगचा आणि रेशमी गाद्या आंगाखाली घालून लोळत पडणारा धनाढ्य हरीचा लाल, यांचे वैभव, मजले, महाल चढवित जाणारा हाच काबाड कष्टी ब्राह्मणेतर वर्ग. ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट. पण सांगितल्यावाचून गत्यंतर नाही, ही कथा अशी आहे, आज इंग्रज सरकारच्या फायनान्समध्ये ( वसूलात ) पहिल्या नंबरचा आकडा ज्या बाबीचा लागतो ती बाब नव्याण्णव अंशाने पुरी करणारा, दुर्दैवी आज्ञानग्रस्त आणि विपन्नावस्थेत स्वत:ला विसरून जाणारा हाच ब्राह्मणेतर समाज. हिंदुस्थान सरकारचे बिल आज जे दुर्दैवी भारतावर पडत आहे, ते शंभर कोटी रुपयांचे बिल ( प्रोहिबिशिन परिषद ) दारू, गांजा, भाग अफू असली हाला-

हल द्रव्ये पोटात घेऊन, एवढे अवाढव्य बिल हूं की चूं न करता तिजोरीत भरणारा हाच तो ब्राह्मणेतर समाज.

९

## पूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय

( ३१ जानेवारी १९३० )

ह्युम साहेबांची मुंबईची पहिली कॉंग्रेस कोणत्या स्वरुपात होती, याची कल्पना कोणासही येईल. ह्युम साहेब आज जर जिवंत असते, तर त्याना खास आश्चर्य वाटले असते. आपण लावलेले रोपटे आज लाहोरला अफाट वृक्ष रूपाने कसे फोफावले आहे हे पाहून आनंदाचे भरते आल्यावाचून राहिले नसते. लॉर्ड मेकॉले यानी तर हिंदुस्थानच्या तरूणाना युनिव्हर्सिटीचे नवे शिक्षण देऊन आपण वाघि-णीचे दूधच पाजवीत आहोत असे उद्‌गार काढले होते. आणि हिंदी लोक इंग्रजांचे ताब्यात कायमचे दास म्हणून राहवेत ही ब्रिटिश लोकांना भूषणाची गोष्ट नाही. मेंढरांचे पालक म्हणजे धनगर हे नामाभिदान धारण करण्यास थोरवी ती कोणती? यापेक्षा जाळ्यात बांधून ठेवलेला वाघ योग्य वेळी ते बंधन तोडून टाकून जंगलात स्वैर विहार करीत असलेला आणि आपली स्वाभाविक गर्जना करून त्या निनादाने सर्व जंगल भरुन टाकीत असलेला पाहून स्वातंत्र्य अभिलाषी खऱ्या हाडाच्या इंग्रजाला संतोष वाटल्यावाचून राहणार नाही. असो.

लाहोरच्या राष्ट्रीय परिषदेने पूर्ण स्वातंत्र्य पुकारले. ही अत्यंत अभिमा-नास्पद व दूरदर्शी व मार्गदर्शी गोष्ट ठरेल. स्वातंत्र्यप्रेमी इंग्रजाना यात जराही वाईट वाटणार नाही. आपल्याच इंग्रजी शिक्षणाच्या ज्ञानाने, आपल्याच साम्राज्याचा एक महत्वाचा भाग जाग्रत झाला आहे या बद्दल इंग्लंडच्या लोक-शाही धारणेच्या जनतेला समाधानच वाटेल. पण हे स्वातंत्र्य कोणाच्या पदरात पडणार हाच महत्वाचा प्रश्न आहे. पहिल्या कॉंग्रेसचा ठराव असा झाला होता की वेगवेगळया जाति, धर्म, आणि वंश यांच्या-

तील द्वेश व भेदभाव नाहीसा करून या हिंदुस्थान देशात एक जीव उत्पन्न करावा. ४४ वर्षांच्या आयुष्यानंतर राष्ट्रीय सभेपुढे पाहिले तर तो हेतू सफल झाल्याचे दिसून येते काय ? आमच्या मते तर तसे न होता. उलट जाति द्वेष आणि धर्म भेद वाढतच चाललेला आहे. मोंगल आणि विजापूर यांच्या तडाख्यात सापडलेल्या महाराष्ट्राने शिवछत्रपतींच्या नेतृत्वाखाली पूर्ण स्वातंत्र्य जाहिरही केले आणि ते संपादनही केले. त्या वेळचा जो महाराष्ट्र तोच आजचा महाराष्ट्र. परन्तु त्या महाविभूतीने अवघ्या ३३ वर्षांचे अल्पावधीत हिंदुपद बादशाहीची स्थापना केली आणि त्याच पायावर आपल्या पराक्रमाने बाजीराव बल्लाळ, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर, दमाजी गायकवाड आणि राघोजी भोसले या तेजस्वी पुरुषानी टोलेजंग मराठशाहीची इमारत उभी केली. नानाधर्म. नानाजाती त्याही वेळी होत्या आणि आजही आहेत. बुद्धिमत्ता आणि राजनीती नैपुण्य ही पाहिली तरी विसाव्या शतकातील हिंदुस्थान १७ व्या शतकाच्या. हिंदुस्थानचे मागे पडले. असे वाटत नाही. टक्के टोणपे. खांचा खेचा आणि ठेंचा आपल्या अनुभवाच्या कसोटी लावल्या तरी आपला नूतन भारत चांगला तावून सुलाखून निघाला आहे. असे म्हणण्यास हरकत नाही. मग पंडित जवाहरलाल यानी "पूर्ण स्वातंत्र" हे शद्ब बाहेर काढतानाच त्यांच्याहून जास्त व ज्ञान वृद्ध आणि अनुभव वृद्ध अशा लोकांनी नाक मुरडावे, तोंडात क्विनाईनचा कडू डोस गेल्यासारखे करावे, हा काय चमत्कार ! त्याना पूर्ण स्वातंत्र्य नको काय ? हिंदुस्थान देश युगेच्या युगे कल्पनांच्या अंतापर्यंत इंग्रज लोकांच्या ताब्यातच रहावा अशी त्यांची खरोखरीच इच्छा आहे काय ? आपल्या देशाचा राजकारभार पहाणेची योग्यता आणि पात्रता कधीच आपणास येणार नाही, अशी त्यांची बाळंबाल खात्री झाली आहे काय ? आमच्या मते असल्या हीन कल्पनेचा आरोप त्यांचे माथी मारणे हे धाडस आह्मी करू शकत नाही. मग कॉंग्रेसच्या मंडपामध्ये आणि त्या पवित्र छताखाली असले भेदभाव उत्पन्न करावेत आणि दुतोंडी मारुतीसारखे दहाजणांच्या दहा आरोळ्यामध्ये कॉंग्रेसचा खरा निनाद काय आहे, यांची खरी कल्पना येण्यास अडथळा यावा, ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

लाहोर कॉंग्रेसच्या अध्यक्षांचे ठराव कांही जणाना अशक्य कोटीपैकी वाटणेचा संभव आहे. परंतु नवद पक्षी पुढाऱ्यांचे "वसाहतीचे स्वराज्य" तरी शक्य आहे काय ? कित्येकाना हे तर मनचे मांडेच वाटत आहेत. जबाबदार ब्रिटिश मंत्री सुद्धां "डोमिनियम स्टेटस" "तो अबि बहोत दुर है." असे सांगत आहेत. हे वाक्य ऐकून त्या पक्षाला काय वाटत असेल ! वादाकरिता

क्षणभर आम्ही असे मानू की, आपल्याला थोड्याच दिवसात डोमिनियम स्टेटस मिळाले, एवढ्यावरून स्वातंत्र्याची खरी भूक तृप्त होईल काय ? " युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका " हे स्वतंत्र राष्ट्र लिबरटी, इक्वॉलिटी आणि फ्रॅटरनिटी या दिव्य ध्येयाचा ध्वज अहर्निश जगापुढे फडकावित असताना पूर्ण स्वातंत्र्याची कल्पना करणे हे मानव स्वभावांस अनुसरून नाही असे कोण म्हणेल ?

धनुर्धर अर्जुन यास ऐन संग्रामाचे वेळी सन्यास मार्गाचे विचार आले. आणि " श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके " म्हणजे असल्या पापी युद्धांत पडल्यापेक्षा हाती भिक्षापात्र घेणे बरे. असे बोलून हातचे गांडीव धनुष्य टाकून संचित उभा राहिला. त्यावेळी श्रीकृष्णांनी निक्षुन सांगितले कीं, तू वाटेल ते कर, आढे वेढे घे. परन्तु मी खास सांगतो कीं, " तू क्षत्रियाचा बच्चा आहेस, तुझे हाड, मांस, रक्त, तुझी प्रकृति ही युद्धांसाठीच केली आहे. आणि ती प्रकृतिच तुला युद्ध करण्यास भाग पाडील. " याठिकाणी प्रकृति हा शब्द फार महत्वाचा आहे. त्यास इंग्रजीमध्ये टेंपरामेन्ट म्हणा, कॉन्सिटट्यूशन म्हणा अगर कांही म्हणा, मानवाचे देहाची रचना, त्यांचे घटक आणि त्यांचे विचाराची मोटली हीच पुष्कळ अंशाने त्यांचे आचार विचारास आणि कृतीस कारणीभूत होत असते. मवाळ पक्ष असो, प्रतिसहकारपक्ष असो, लिबरल असो किंवा जहाल असो, कट्टर किंवा फट्टर असो, हेतू सर्वांचे स्तुत्य असून, त्यांच्या कृतीत अंतर कां पडावे ? आमचे समजुतीने याचे उत्तर असे आहे की, " प्रकृतिस्तं नियोक्षती, " केळकरांची धाव अमुक पल्याला जावी, मुंज्यानी इतका इतका पल्ला गाठावा, मालवियानी इतक्या पायऱ्या ओलांडाव्यात, जीनांचे स्वरूप असे कां ? आणि आयंगार तसे कां? मुसलमानांचा आडेलपणां आणखी किती दिवस चालणार ? आणि ब्राह्मण ब्राह्मणेतर विरोध केव्हां सुटणार ! अस्पृश्यांचे नाकदाबीचे उपाय इतके जोराने चालू असताही उच्च म्हणून घेणारा वर्ग असेच आपल्या डोळ्यावर कातडे किती दिवस ओढून घेणार. पं. मोतिलाल नेहरुंची धांव मिश्र विवाहापर्यंत पोचावी, तर वे. शा. चित्राव शास्त्री सारखे पंडित किंवा भालाकार सारखे आंग्ल विद्याविभूषित पदवीधरही शिंगे मोडून वासरांच्या दावणीत कां जावेत? या बुचकळ्यात पाडणाऱ्या सर्व प्रश्नांचे उत्तर एकच. आणि ते हेच कीं, ज्यांच्या त्यांच्या प्रकृतीस शक्य तितकाच प्रवास आणि तितकेच टप्पे राजकारणाचे मार्गात ते ते पुरुष नेत आहेत, या फक्त त्या प्रवासातील क्षणभर विश्रांतीच्या जागा आहेत. ते ते टप्पे हे अखेरचे नव्हेत, पूर्ण स्वातंत्र्याचे तारे किंवा निशाण हे अखेरचे ध्येय आहे. ते आज ना उद्या गांठल्या शिवाय चैन पडणार नाही.

★ ★ ★

# सत्यशोधक समाजाची कार्य मर्यादा

( ता. ३० ऑगस्ट १९२९ )

महात्मा जोतिराव फुले यांनी १८७३ साली पुण्यनगरीत सत्यशोधक समाज स्थापन केला. अज्ञान आणि दारिद्र्य यांत ब्राह्मणेतर समाज खितपत पडला होता. लेखनकला आणि त्या बरोबर बुद्धिमत्तेची कामे ही या पूर्वी ब्राह्मण वर्गाने बळकावलेली होती ! राजकीय चळवळीतही ब्राह्मणेतर वर्गाला अगदी खालच्या पायरीला ढकलून दिले होते. ही गोष्ट महात्मा फुले यांनी चांगली निरखून ठेविली होती. हा समाज स्थापन करणें पूर्वी आपल्या हीन दीन समाजाबद्दल त्यांच्या अंत:करणामध्ये कर्तव्याची स्फूर्ती उत्पन्न झाली. आणि त्यांनी जळजळीत स्वाभिमानाने हा समाज उभा केला. सर्वच बाजूने विपन्न अवस्थेत ब्राह्मणेतर वर्ग पडला असलेमुळे सर्व बाजूने या समाजाला जागे करणे भाग होते. धर्म विषयांत मराठा पूर्ण आंधळा ! सामाजिक विषयांत सर्वांनी बाजूस ढकलून दिलेला ! बुद्धिमत्ता गेली. सत्ता गेली, तरवारीला जागा राहिली नाही. हलक्या कामाची सवय नाही. देहाचे श्रम करणे आणि हमाल मजुराचा धंदा करणें, यांत कर्तव्यतत्परता आणि धैर्य लागते. ते नसल्यामुळे हे धंदे करण्यात अब्राह्मणाला कमीपणा वाटतो. बुद्धि नेली ब्राह्मणांनी, राज्यसत्ता नेली इंग्रजांनी, हमाल मजुराचा श्रमाचा पैसा घेतला कुलीनी ! अशा परिस्थितींत एका कालचा मानधन ब्राह्मणेतर वर्ग, अपमान गर्तेत, आणि दारिद्र्याच्या पापात लोळत होता ! अशा आणिबाणीच्या प्रसंगी महात्मा फुले यांचा जन्म झाला. पेशवेशाही १८१८

साली गेली. क्षत्रियशाही त्याबरोबरच ओहोटीला लागली. अधिकाराची ताजी आठवण महाराष्ट्राच्या अब्राम्हण वर्गाला दुःखावर डागण्या देणारी होती ! अशा समयी महात्मा फुले, हे एक अगदी गरीब वर्गातील जुन्या पिढीतल्या मराठ्याच्या साध्या भोळ्या कुळातील, एका कुणबी फुलमाळ्याच्या घरी जन्मास आले, यावेळी मराठशाहीच्या अत्यंतप्रीय अशा इमारतीची हीन दशा झाली होती. मदत मिळेल तितकी थोडी, आकाश चोहोकडून फाटलेले, धर्म शिक्षण पाहिजे होते. समाज शिक्षक हवे होते, कलाकौशल्य आणि उद्योगधंदे यातील गुरु पाहिजे होते. राजकीय चळवळीचे नेते पाहिजे होते. शिक्षण खाते, स्थानिक स्वराज्य, अशा संस्थेंचे प्रचारक यांची वाण भासत होती. कोणत्याही मार्गाने महाराष्ट्राला अगदी थोडासा हातभार लावणारा मनुष्य देवाप्रमाणें वाटणारा होता. तेव्हां काय आणि आता काय ? संख्या बलाचे प्रमाण एकसारखेच होते. ब्राम्हणसंख्या फार थोडी अब्राम्हणसंख्या कल्पनातीत मोठी, ब्राम्हण वर्गांत विद्वान आणि सुशिक्षित प्रमाणाबाहेर निपजले होते. अब्राम्हणांला कोणही विचारीत नव्हता. परक्याच्या लाथा आणि घरच्याच्या थपडा खाता खाता अब्राम्हण वर्ग मातीमोल होऊन गेला होता! अशा कचाट्यात सापडलेल्या अब्राम्हण वर्गाला कोणीतरी नावाडी कैवर्तक मिळावा असा सर्वांना ध्यास लागला होता ! ती जागा महात्मा फुल्यानी भरून काढली आणि त्या वेळी ही बुडण्याच्या स्थितीत लागलेली ब्राम्हणेतरांची नाव जी या सत्पुरुषांच्या हाती गेली, ती नौका, आज तारखेस अनेक स्थित्यंतरे हेलपाटे टक्के, टोपणे, धक्के, बुक्के, सपाटे, खात खात, आली आहे, आणि आज या ब्राह्मणेतर वर्गाला अग्रेसरत्वाचा मान मिळू पहात आहे. तथापि आमच्या अनुमान शास्त्राच्या होऱ्यात आमच्या समाजाची भवितव्यता खास दिसून येत आहे की, प्राचीन काळची पहिल्या प्रतीची पदवी निःसंशय पुढे मागे आम्हालाच मिळणार आहे !! शर्थ इतकीच आहे की, आमच्यातील कांही विद्वान म्हणवून घेणाऱ्या अब्राम्हण गृहस्थानी सत्यशोधक समाजाचे ध्येय काय आहे, ही गोष्ट ओळखण्यात चूक करू नये. दिशाभूल होऊ देऊ नये ! खोट्या कल्पनेला व भलत्या दुराग्रहाला बळी पडण्याचा मोह झिडकारून द्यावा. व्यापक ध्येय समोर ठेवावे म्हणजे या समाजाला यश ठेवलेले आहे.

कांही मंडळीच्या मते सत्यशोधक समाजाचे कार्य केवळ " धर्म जागृती " पुरतेच आहे. अब्राम्हण वर्गाच्या धर्मज्ञानाची जी पकड बसली आहे, ती नाहीशी करणे अब्राम्हण वर्गाचा धर्म श्रद्धाळूपणा नष्ट करणे आणि ब्राम्हणांचा जू झिडकारून देणे, हाव एक सत्यसमाजाचा हेतू. याच हेतूने म. फुले यानी सत्यशोधक समाजाची प्राणप्रतिष्टा केली " असे या मंडळींचे म्हणणे आहे.

म० फुले यांच्या चरित्राचा गोषवारा सारांश रूपाने पाहणेचा असल्यास आजचे केसरीकार श्री. न. चिं. केळकर यांनी लिहिलेले कै. टिळक यांचे चरित्र खंड १ पान ६९ पहावे ; केळकर हे आज निदान पुण्याच्या ब्राम्हण वर्गाचे तरी अग्रेसर खास आहेत. ६९, ७०, ७१ या पानावर त्यांनी म. फुले यांचे सारांश रूपाने चरित्र दिले आहे, ते म्हणतात, 'ब्राम्हणेतरातील सुशिक्षित पिढीचा जन्म टिळकांचेही पूर्वी झाला होता. या पिढीतील अग्रस्थानाचा मान जोतीराव गोविंदराव फुले यानाच दिला पाहिजे" तसेच आणखी पुरावा पहा, महाराष्ट्रीय ज्ञानकोश विभाग ७ पान ६४२.

डॉ. केतकर यानी श्री. फुले यांचे, निरभिमानाने आणि जातीचे पूर्ण संस्कार बाजूस टाकून, गुणवर्णन केले, याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन, मनःपूर्वक करीत आहोत. त्यांचे वाक्य असे आहे "बंगाल प्रांतात राजाराम मोहनराय यानी इ. स. १८३१ मध्ये ब्राम्हसमाजाच्या रूपाने सर्व आद्य प्रगतीची ध्वजा उभारली तरी "अस्पृश्यता निवारण्याचा अग्र आणि अप्रतिम मान महाराष्ट्रालाच आणि विशेषतः म. जोतीबा फुले या महात्म्यानेच मिळविला."

आजच्या काळांतील चालू ब्राम्हण-ब्राह्मणेतर चळवळीच्या कडक वातावरणांतही, या बंधुद्वयांची मते पाहून त्यांच्यातील कित्येक भोळसट किंवा जात्याच संताचा मत्सर करणारे, म. फुले यांचे बद्दलचा गैरसमज किंवा दुराग्रह टाकून देतील अशी आशा आहे.

चालू विषय सत्यसमाजाच्या "कार्याची व्याप्ती" असा आहे. या समाजाचे नांवाडी म. फुले होते. त्यांचे स्वतःचे वर्तन कसे होते, त्यांनी आपल्या कार्याची दिशा कसकशी आखली होती, आणि आपल्या हयातीत कोणकोणते विषय हाती घेतले होते, ही गोष्ट पहाण्यासारखी आहे. सत्यशोधक समाजाची स्थापना १८३० साली झाली. त्यावेळी त्या समाजाची मूल तत्वे घातली आहेत. तिचा आशय, रोख अणि दिशा पहाणे ही फार महत्वाची गोष्ट आहे. मूळच्या प्रतिज्ञा लेखाखाली केवळ तीनच नियम नमूद केले आहेत. (१) सर्व मनुष्ये एका परमेश्वराची लेकरे आहेत. त्यांत उच्चनीच भाव नाही. (२) देव आणि भक्त यांच्यांत किंवा धर्म संस्कारामध्ये दलालाची गरज नाही. (३) प्रत्येकाने आपल्या मुला मुलीला शिक्षण दिले पाहिजे.

हेच ते तीन नियम. पण जरा सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर सत्व, रज तम या त्रिगुणानी जसे सर्व जग व्यापून टाकले आहे, तद्वत या वरील तीन नियमानी महाराष्ट्राच्या सर्व चळवळी व्यापून टाकल्या आहेत असे खास दिसेल ! सर्व

मनुष्ये समान हक्काची आहेत. याचा अर्थ काय ? केवळ धार्मिक आणि सामाजिक बाबतीतच आपली प्रगती व्हावी असा याचा अर्थ आहे काय ?

ब्राम्हण, भट, देव, आणि दक्षिणा लग्न, पक्ष, धर्मसंस्कार व अंत्यक्रिया हेच वर्तुळ म. फुले यांनी आखले आहे काय ?

वासुदेव बळवंत फडके, यांसारख्या बंडखोराच्या तालमीत आणि सुप्रसिद्ध लहुजी बुवा वस्ताद यांच्या आखाड्यांत दांडपट्टयाच्या फेका करणारे पुर्वाश्रमीच जोतीराव हे " ब्राह्मणेंतरानो आम्ही यापुढे परकीयांच्या अखंड जुवाखाली सतत गुलामगिरीत दिवस काढा. युरोप अमेरिकेच्या प्रचंड व्यापाच्या ओघात नामशेष होऊन जा. कुणबी व मजूर ही खरी लोकशाही आहे, पण ती अडाणी आहे, तिच्याकडून सरकारखजिना फुगविण्यासाठी घशात मद्य ओतून तिची राखरांगोळी झाली तरी तोंडातून ब्र काढू नका, स्वदेशी वस्तू आणि खादीचा कपडा यास स्पर्शही करू नका, स्वतःचा देशाभिमान, स्वदेशी कलाकौशल्य, देशी हरहुन्नर या सर्व गोष्टी अजिबात विसरून जाऊन कलेक्टर, कमिशनर दिसताच, किंवा देशी ऑफिसर पहाताच, साष्टांग लोटांगण घालीत चला, नखशिखांत वस्त्र प्रावरण, अन्नपान, उच्चार, आचार, यानी पुनित अशा आपल्या प्राचीन संस्कृतीला, आग लावून देऊन, सर्वस्वी नोकरशाहीचे गुलाम बनून रहा " असे बादशाही फर्मान म. फुले यानी सोडले आहे काय ? असले विचार त्या महात्म्याच्या पाठी लावल्याने आम्ही त्या सत्पुरुषाचे अपराधी होऊ ! असले पापमय विचार त्याना कधीही शिवले नाहीत ! आणि या पुरुषाने आपल्या हयातीत प्रत्यक्ष कार्यांत आणि लेखणीने विशेषतः " सत्यधर्म " या पुस्तकाने आपल्याला कोणती मर्यादा ठरवून घेतलेली नाही. तरी त्या काली जरी भटांचा चढेलपणा त्याना मारण्याचा असला तरी आज कालच्या ओघाबरोबर आणि प्रगतीच्या मार्गांवर समाजाची व्याप्ती वाढली आहे. धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक वगैरे कोणत्याही चळवळीच्या मार्गांत भेदाभेद आणि उच्चनीचता दिसून आल्यास सर्व ब्राम्हणेतर वर्गांने आणि विशेषतः सत्यशोधक समाजाच्या अभिमान्याने आपला निस्पृहपणाचा आणि समतेचा दंड त्यांच्या कपाळावर फेकून, विषमता, मग ती कोणत्याही बाबतीत असो, तिचे तुकडे तुकडे करून टाकणे हे आपले आज परम पवित्र कर्तव्य आहे असे समजले पाहिजे.

एखादा देश, अगर प्रांत अगर नगर सत्याला जन्म देणारे आहे आणि इतरत्र कोठे सत्यशोधक निर्माण झाले नाहीत ही कल्पना तर्कशास्त्रास सुटून आहे. सत्य हे त्रिकालाबाधित आहे. देश काल वर्तमान यानी परिछिन्न झालेले नाही.

या जगताच्या पाठीवर प्राचीन काळापासून सर्व देशामध्ये आणि सर्व कालाच्या ठायी महात्मे उपजले आहेत. आणि त्यांनी आपली पाउले काटेरी मार्गाने टाकून अज्ञ जनाला वाटा दाखविलेल्या आहेत. कालाच्या प्रभावाने पूर्वीच्या संतांनी चोखाळलेल्या वाटा बुजत जातात. स्वार्थी लोक त्या वाटांचा नाश करतात.

म. फुले यांनी आपल्या आयुष्यामध्ये समतेच्या सिद्धीसाठी आपल्या स्वतःच्या घराकडून, प्रत्यक्ष वडिलांकडून किती त्रास सोसला, आणि पुण्यांतील रिकामटेकडचा टवाळ लोकांच्या कडून कसा अपमान आणि हाल सहन केले, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. त्यांनी पेशवाईच्या अंतकालानंतर इंग्रजीच्या अव्वल अमदानीत, सामाजिक परिस्थिती चोहोकडून करवतीच्या दात्यासारखे करकोचे काढण्यास तयार असतांना, मुलींची शाळा काढून दाखविली, आणि यशस्वी रीतीने ती पार पाडली. पुण्यासारख्या ब्राह्मणशाहीच्या जाळचांत अस्पृशांची शाळा काढली. अस्पृशांच्या घरी स्वच्छपणाची शर्थ ठेवल्यास आपण जेवण्यास तयार आहोत अशी जाहीर नोटीस त्यांनी दिली. अस्पृश्य समाजास पाणी मिळण्यास अडचण पडू नये, म्हणून, त्यांनी स्वत.च्या घरची विहीर त्यांना खुली केली.

सार्वजनिक सत्यधर्म या त्यांच्या छोटचाशा पुस्तकामध्ये त्यांनी आपले विचार संवाद रूपाने प्रसिद्ध केले आहेत. त्यावरुन सत्यशोधकाचा मार्ग सर्वव्यापी कसा आहे, याची शंका रहात नाही.

लोकलफंडाचा पैसा सरकारानी लोकांच्या हितासाठीच खर्च केला पाहिजे. शिरस्तेदारावर खरमरीत टिका करून कोर्टामध्ये लाचलुचपतीला जागा राहू देऊ नये, याबद्दल सरकारकडे त्यांची मागणी आहेच. देवस्थान, धर्मादाय, असल्या औदार्यबुद्धिने निर्माण केलेल्या संस्था केवळ लोकहिताच्या बुद्धिने चालू ठेवाव्यात याकडे त्यांचे लक्ष गेले आहे. देव, धर्म, पूजा, अर्चा लग्न, मुंज व इतर सोळा संस्कार अशा द्वाराने भट वर्ग अज्ञानी शेतकऱ्यांना पैशापरि कसा बुडवित आहे, कुणबी लोकांना मुद्दाम तो अज्ञानात कसा ढकलीत आहे, आणि ब्राम्हण वर्गाची श्रेष्ठता पद्धतशीर उपायाने कशी शाबित होत चालली आहे, आणि आपला गरीब काबाडकष्ट करणारा मजूर, दिवसानुदिवस अज्ञान आणि दारिद्रचपंकांत कसा बुडत चालला आहे, ही गोष्ट म. फुले यांनी अनेक प्रकारची नेहमीची उदाहरणें देऊन सोप्या भाषेत कशी व्यक्त केली आहेत, हे पाहण्यासारखे आहे. ह्या त्यांच्या सर्वव्यापी सुदर्शनासारख्या कर्म मार्गाने उघड उघड "सत्यशोधकाने काय केले पाहिजे," हे दाखवून दिले नाही काय ? हा कित्ता समोर ठेवल्यानंतर आजच्या

सत्यशोधकांनी आपल्या कार्यांचा कोंडमारा करावा, हे योग्य होईल काय? "सत्यशोधक" हा शद्व आमच्या मते फार मार्मिक दिसतो. 'सत्य' ही गोष्ट सांपडणे फार कठिण आहे, तिच्या संशोधनातच जन्म घालवणे हे आमचे कर्तव्य आहे. मोठ मोठे विद्वान, नामांकित पंडित, जगाच्या कल्याणार्थ आयुष्य खर्च करणारे मोठमोठे सुधारक ह्यांची मनःस्थिती पाहिली तर त्यांची स्पष्ट कबुली दिसते की, 'आम्हांला जे सत्य सापडल्यासारखे दिसते, ते खरोखर अगदी थोडे आहे. महासागराच्या अतिविस्तीर्ण वाळवंटापैकी एक वाळूचा कण देखील आह्मांस अद्याप मिळाला नाही,' असे ते म्हणतात, आणि त्या एवढ्याशा कणाने जनसेवा फार मोठ्या प्रमाणांत त्यांनी केली आहे. आणि आपल्या जन्माचे सार्थक करून घेतले आहे. दिवसेदिवस सत्याचा रथ समुद्र ओलांडून त्रिखंडात प्रवेश करू पहात आहे. सत्य आपल्यास कळले असे प्राचीन काळच्या एका ऋषीच्या आश्रमातील विद्यार्थ्याने आपल्या गुरुना सांगितले. त्याच गुरुकुलात पुण्यश्लोक श्री. युधिष्ठिर हे एक विद्यार्थी होते. परन्तु त्यांनी आपल्या आचार्यांना सांगितले की, 'गेल्या परिक्षेस एक वर्ष होऊन गेले, 'सत्य बोलावे' हे वाक्य मला घोकून पाठ झाले!' पण कृतीत येत नाही. असे सांगून सर्व विद्यार्थी आणि गुरु यांच्या देखत ते घळघळा रडू लागले! ही गोष्ट महाभारतामध्ये सांगितलेली आहे. हे असिधारावृत आहे. बोलणे सोपे पण करणे कठिण श्रुति, स्मृति सहा शास्त्रे अठरा पुराणें यामध्ये प्रवीण असे विद्वान ब्राम्हण पंडित 'सत्यं ब्रूयात्, प्रिय ब्रूयात्' असे बोलत आले आहेत खरे. वेदांताची वाणी आणि वेदाचे मंत्र म्हणणारे जटापाठी, घनपाठी अनेक होऊन गेले. परन्तु 'प्रपंचात राहून परमार्थ कसा साधावा? हे प्रत्यक्ष कृतीत उतरून दाखविणारे पुण्यश्लोक राजे जनकच. आणि हेच खरे कर्मयोगी होते. हा कर्मयोग क्षत्रिय परंपरेने आजतागाईत जिवंत ठेविला आहे. क्षत्रिय राजे, महावीर, शाक्यमुनी, गौतमबुद्ध, महाभाग अशोक आणि अगदी अलिकडील श्री. छत्रपति शिवाजी महाराज, सत्य समाज संस्थेचे आद्य संस्थापक महात्मा फुले आणि नूकतेच कैलासवासी झालेले अस्पृशोद्धारक पुण्यश्लोक श्री. शाहु महाराज. १५ व्या शतकांत वेदांताची लाट भक्ति रूपात प्रगट झाली. शंकराचार्य रामानुज यांनी जो अद्वैताचा मार्ग उपनिषद, सूत्रे, आणि महाभाष्यात बोलून दाखविला, तो मार्ग पुढील संतांनी प्रत्यक्ष कर्मांत ओतून दाखविला! ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ महाराज, तुकोबाराया, कबीर कमाल, सावंतामाळी, नरहरी सोनार, रोहिदास चांभार, शेख महंमद, चोखाभेळा, मुक्ताबाई, जनाबाई, या आपल्या प्रांतात प्रगट झाले. तुलसीदास, मिराबाई, नानक, गुरु गोविंद, रामानंद हे उत्तरेकडील आणि चैतन्य, स्वामी रामकृष्ण परमहंस, ही मंडळी बंगाल प्रांतात. यांनी सारा देश आपल्या उपदेशाने खडबडून

जागा केला. धार्मिक समता, सामाजिक भेदाभेदाचा नाश याचे पाठोपाठ सर्वत्र समतेचा विजय ठरलेला. ल्यूथर, होल्टेअर, रुसो यांनंतरच क्रॉम्वेल, नेपोलियन, वाशिंग्टन जन्माला आले. याच परंपरेत याच संतमालिकेमध्ये पुण्यासारख्या एकांगी ब्राह्मणी वर्चस्वाच्या कोंडमाऱ्यांत महात्मा जोतिराव फुले जन्माला आले. वरील संतांचे आह्मी अल्पज्ञ किंकर आहोत. त्या महापुरुषांनी चोखाळलेल्या वाटा आमच्यादृष्टीसमोर आहेत.

त्रिकाल अबाधित तत्वे ज्या धर्मांत सांगितली असतील, तोच एक खरा धर्म होय. स्थल, काल अगर परिस्थिती कोणतीही असली तरी या तत्वाला बाध येत नाही. सांप्रदाय बदलतील, आचार विचारांत फेरफार होईल, चालिरीतीत अंतर पडेल, परन्तु मनुष्याला कांही अनादि नियमाने बांधलेले आहे. ते चिरकाल तसेच राहणार.

लग्नाची वयोमर्यादा कमीजास्त होईल, विधवा पुनर्विवाह व्हावा किंवा नाही, याबद्दल मतभेद असेल, एकाच पुरुषाने एकच लग्नाची स्त्री करावी, अगर एका स्त्रीने एकाचवेळी अनेक नवरे करावे या पद्धतीत फेरफार होत असल्याचे दिसून येईल.

मूर्तीपूजेसंबंधी धर्माधर्मात समजुती भिन्न असतील, देवतांना पशूचे बलिदान द्यावे अगर न द्यावे यांत विद्वानांच्या मतांत फरक पडेल, ब्राह्मणांचा श्रेष्ठपणा मानलाच पाहिजे, अस्पृश्यता राखून ठेवणे जरूर आहे, चातुर्वर्ण्य हा धर्मांचा पाया आहे या गोष्टींत सर्वांचे एकमत होणार नाही.

या गोष्टी कालाकालांत, देशादेशांत आणि स्थितीनुरुप बदलत जातात. हे खऱ्या सनातन धर्माने वरती पांघरलेले पोषाख आहेत !

पोषाख म्हणजे आंतील पुरुष नव्हे. चालीरीती, आचार विचार हा धर्म नव्हे. ती त्या त्या देशकालवर्तमनास अनुसरुन धर्माने धारण केलेली वस्त्रे आहेत. म्हणून आचार विचार हा धर्म नव्हे. धर्म हा सदैव अबाधितच राहिला पाहिजे. असा धर्म म्हणजे एक सत्यधर्म होय. सत्यसमाजियनांचा तोच खरा धर्म होय. सत्यसमाजियन, वरच्या देखाव्याला, ढोंगी आचाराला, कपटी कारस्थानाला, भेदभाव मानणाऱ्या चालीला, उच्चनीचपणा मान्य करणाऱ्या विचाराला बिलकूल जुमानित नाही. धर्माच्या बाह्यांगाला भुलून समाजाच्या फळ्या आणि तुकडे करण्याला सत्यसमाजियन तयार नाही. सत्य

हेच त्याचे ब्रीद आहे. समता हा त्याचा मार्ग आहे. आणि विश्वकर्म ही त्याची भावना आहे. या ईश्वरी सनातन तत्वाला कोणताही धर्म अगर सांप्रदाय अडथळा करील, तर तसल्या धर्माचा आणि सांप्रदायाचा सत्यसमाजियन मुलाजा राखणार नाही.

असाच उदार मताचा मुळचा आमचा सनातन धर्म आहे. स्वार्थी, पोटार्थी लोकांनी घालघुसड करून, सनातन धर्माला डाग लावला, भेदभाव घुसडून समाजाचे तुकडे केले आणि जन्मांवर जातीची रचना करून एकाच धर्माच्या फारकती केल्या, चौघांची तोंडें चार दिशेला केली, आणि राष्ट्राचा द्रोह केला, म्हणूनच या सत्यसमाजाच्या तत्वावर ब्राह्मणेतर पक्षाची उभारणी झाली. एक ब्राह्मण वर्ग, खोटा पवित्रपणा गळ्यात अडकवून, इतर वर्गाला दडपून टाकू लागला, याच कारणासाठी ब्राह्मणेतर पक्षाचा जन्म झाला. अवडंबर मोडून टाकणारा हा खरा धर्म आहे.

यज्ञाच्या कर्मकांडाला धुळीस मिळविणारा, दया धर्मास अग्रपूजेचा मान देणारा, हाच सत्यसमाजाचा धर्म आहे. मनुष्याच्या इतिहासापासून याचा आरंभ आहे. आणि सनातन सत्याला जेव्हां जेव्हां अडथळे आले, तेव्हां जनक जनार्दनासारखे पुण्यश्लोक राजे, भगवंताचे अवतार ; महावीर बुद्धासारखे तेजस्वी वीर, अशोकादि प्रेमाचे पुतळे, शिवरायासारखे देशभक्त निर्माण होऊन. त्या सनातन सत्यधर्माचा दीपस्तंभ त्यांनी कायमचा उज्वलित करून ठेवला आहे ! म्हणून आम्ही म्हणतो, सत्यसमाज धर्म म्हणजेच सनातन धर्म आणि सनातन धर्म म्हणजेच ब्राह्मणेतर पक्षाचा धर्म.

वर्चस्वाला हपापलेल्या अदूरदृष्टी लोकांनी सत्यसमाजाचे नांवाने खडे फोडणे किंवा ब्राह्मणेतराला शिव्या देणे, ही गोष्ट मनाच्या क्षुद्रपणाची आणि पाखंड मताची द्योतक आहे. आह्मी तरी स्पष्ट म्हणतो की असले लोकच सनातन धर्माचे खरे शत्रू आहेत.

# भालांकाराना सत्यसमाजाची भिती नाही ?

( ता. २५ मार्च १९२७ )

प्रथमत: शिवाजी महाराजांचा स्तुतिपाठ गाऊन ते सत्यसमाजावर घसरले आहेत. वस्तुत: त्यांना सत्यसमाजाची मुळीच भिती नाही. ते म्हणतात " सत्य-समाजाची भीती वाटण्याचे कारण ब्राम्हणांना किंवा चातुर्वर्णियांना वस्तुत: मुळींच नाही. " मग वस्तुस्थिती अशी जर होती, सत्यसमाजाचे अस्तित्व विशेष महत्वाचे आपल्यास वाटत नव्हते, तर अग्रलेख खरडण्याइतकी जरूरी वरे आपल्यास भासली ? चिपळूणकरांनीसुद्धां म. फुले ही व्यक्ति कालौघात महाराष्ट्राच्या स्मृति-पटावरून नाहिशी होणार असे भविष्य केले होते ; पण सत्यसमाजियनांचीच आता ब्राह्मणांना कशी आंच लागून राहिली आहे, हे कांही नव्याने सिद्ध करण्याचे कारण नाही. आता ब्राह्मणांची कारवाई आमच्यांत फूट पाडावी म्हणून सुरूं आहे. त्यांना भोळ्या भाबड्या मराठ्यांबद्दल पान्हा फुटतो. केव्हां केव्हां मराठे हे फार स्वार्थी लोक आहेत म्हणून ते दुसऱ्या जातीचे लोकांना प्रेमाचा इशारा देतात. पण हे चित्पावनी डावपेच आता ब्राम्हणेतरांना कळू लागले आहेत. त्यांच्यात चौकस बुद्धी जागृत होऊ लागली आहे. आमचा सत्यसमाज आपली तत्वे पटवून देतो, रूढीने केलेले अत्याचार, ब्राह्मणांची पोकळ बडेजावी, सत्यसमाज लोकांचे डोळे उघडून दाखवित आहे, हेच फक्त त्यांचे काम आहे. तो आपला सांप्रदाय बनवीत नाही. मग त्याची जात कशी तयार करील ? कोणत्याही जातींचा त्यांत समावेश होतो. समाज वाढविण्यासाठी त्याने बाप्तिस्मा देणे नाही सुरूं केलेले. आज लहान दिसणारा सत्यसमाज तुम्हालाही पूर्ण ग्रासल्याशिवाय राहणार नाही. ब्राम्हण लोकांतही उदारमतवादी आगरकर, देशमुखांच्या सारखे होऊन गेले आणि आजही आहेत. प्रत्येक धर्मातील सुधारणा करणारा आह्मी सत्यशोधकच समजतो !

शिवाजी महाराजांनी राजकीय स्वातंत्र्य प्रस्थापित केले– त्यांना त्यात यश आले. पण आजच्या स्थितीत शिवाजी महाराजांनी काय केले असते ? त्यांना काय धार्मिक स्वातंत्र्य नको होते असे म्हणता येईल ? ज्यांनी स्वातंत्र्यासाठी जीवित्व खर्च केले, त्याना धार्मिक गुलामगिरी काय ठेवायची होती ? शिवाजी महाराजांची स्तुति करण्यांतही पुणेरी डावपेंच !

शिवाजी महाराजांना सर्व जनता मानते, याचा फायदा रामदासी पिल्लू घुसडण्याकडे करायचा ? नुसती खुळचा भाबड्यांची फसवणूक !

राजकीय स्वातंत्र्य या पवित्र नांवाची नुसती विटंबना चालविली आहे. पुणेकरांचे राजकीय स्वातंत्र्य म्हणजे पेशवाईची पुनरावृती. निव्वळ आपलपोटेपणा ! अज्ञानी कुणब्याना फसवून त्यांची गळचेपी ! सत्यशोधकांना ब्राह्मणेतराना सुराज्यासाठी खटपट करायची आहे. भेदाभेद तो कोठेही असो तो आह्मांला नको आहे. सत्यशोधक म्हणवून घेऊन जे त्या तत्वाला सोडून वागत असतील त्यांचा आह्मीही निषेध करूं. पण यासाठी सत्य समाजाला नांवे ठेवता येतील? भालाकार "वर्णानां ब्राम्हणो गुरुः" असा केवढाही कंठशोष करा, त्या स्थानापासून ब्राम्हण हा केव्हांच पदच्युत झाला आहे. स्वतःच्या गुणदोषावरुनच आता ब्राम्हणत्व मिळणार आहे. मी जातीचा ब्राम्हण म्हणून श्रेष्ठ, नि पोकळ बडेजाव "नुसत्या भुश्याप्रमाणें उड्न जाणार आहे. सत्यसमाजाची व महात्मा फुल्यांची किती नालस्ती करा, त्यांची किर्ती व सत्यतत्वे बेगुमान पुढे जाणार. यात तिळमात्र शंका नाही,

० ० ०

## सत्यशोधकाविरुद्ध संग्रामची ओरड.

( ता. २७ मे १९२७ )

संग्रामकार उठल्या बसल्या सत्यशोधकांना शिव्या देतात. बेजबाबदार, निरर्गल जीभ सुटण्यापेक्षा, विचारासाठी थोडी अडलेली बरी. पण सत्यसमाजाची तत्वे आणि आचरण या गोष्टींचा विचार करून त्या प्रत्येकाबद्दल निर्विकारपणे उहापोह केला असता तर बरे झाले असते.

फार दिवसांच्या जुलमामुळे मनुष्य गांजून गेला असला तरी संवयीने आणि निरुपाय म्हणून तो मुकाटयाने सहन करीत असतो. याचा अर्थ या दीन दुबळयांना जुल्म आवडतो असा नव्हे. त्यांचे चालत नाही. थोरांच्या दडपणाने ते मुक्के झालेले असतात. पण जर का कांही कारणाने थोडीशी संधी मिळाली, आणि वाचा फुटली, तर ते आपले मनोगत बोलून दाखवितात. चळवळ सुरूं होते. धडपड होऊ लागते. असे प्रकार कोणत्याही नवमत प्रसारावेळी होतातच.

जागा केला. धार्मिक समता, सामाजिक भेदाभेदाचा नाश याचे पाठोपाठ सर्वत्र समतेचा विजय ठरलेला. ल्यूथर, होल्टेअर, रुसो यांनंतरच क्रॉम्वेल, नेपोलियन, वाशिंग्टन जन्माला आले. याच परंपरेत याच संतमालिकेमध्ये पुण्यासारख्या एकांगी ब्राह्मणी वर्चस्वाच्या कोंडमाऱ्यांत महात्मा जोतिराव फुले जन्माला आले. वरील संतांचे आह्मी अल्पज्ञ किंकर आहोत. त्या महापुरुषांनी चोखाळलेल्या वाटा आमच्यादृष्टीसमोर आहेत.

त्रिकाल अबाधित तत्वे ज्या धर्मांत सांगितली असतील, तोच एक खरा धर्म होय. स्थल, काल अगर परिस्थिती कोणतीही असली तरी या तत्वाला बाध येत नाही. सांप्रदाय बदलतील, आचार विचारांत फेरफार होईल, चालिरीतीत अंतर पडेल, परन्तु मनुष्याला कांही अनादि नियमाने बांधलेले आहे. ते चिरकाल तसेच राहणार.

लग्नाची वयोमर्यादा कमीजास्त होईल, विधवा पुनर्विवाह व्हावा किंवा नाही, याबद्दल मतभेद असेल, एकाच पुरुषाने एकच लग्नाची स्त्री करावी, अगर एका स्त्रीने एकाचवेळी अनेक नवरे करावे या पद्धतीत फेरफार होत असल्याचे दिसून येईल.

मूर्तीपूजेसंबंधी धर्माधर्मात समजुती भिन्न असतील, देवतांना पशूचे बलिदान द्यावे अगर न द्यावे यांत विद्वानांच्या मतांत फरक पडेल, ब्राह्मणांचा श्रेष्ठपणा मानलाच पाहिजे, अस्पृश्यता राखून ठेवणे जरूर आहे, चातुर्वर्ण्य हा धर्मांचा पाया आहे या गोष्टींत सर्वांचे एकमत होणार नाही.

या गोष्टी कालाकालांत, देशादेशांत आणि स्थितीनुरुप बदलत जातात. हे खऱ्या सनातन धर्माने वरती पांघरलेले पोषाख आहेत !

पोषाख म्हणजे आंतील पुरुष नव्हे. चालीरीती, आचार विचार हा धर्म नव्हे. ती त्या त्या देशकालवर्तमनास अनुसरुन धर्माने धारण केलेली वस्त्रे आहेत. म्हणून आचार विचार हा धर्म नव्हे. धर्म हा सदैव अबाधितच राहिला पाहिजे. असा धर्म म्हणजे एक सत्यधर्म होय. सत्यसमाजियनांचा तोच खरा धर्म होय. सत्यसमाजियन, वरच्या देखाव्याला, ढोंगी आचाराला, कपटी कारस्थानाला, भेदभाव मानणाऱ्या चालीला, उच्चनीचपणा मान्य करणाऱ्या विचाराला बिलकूल जुमानित नाही. धर्माच्या बाह्यांगाला भुलून समाजाच्या फळया आणि तुकडे करण्याला सत्यसमाजियन तयार नाही. सत्य

हेच त्याचे ब्रीद आहे. समता हा त्याचा मार्ग आहे. आणि विश्वकर्म ही त्याची भावना आहे. या ईश्वरी सनातन तत्वाला कोणताही धर्म अगर सांप्रदाय अडथळा करील, तर तसल्या धर्माचा आणि सांप्रदायाचा सत्यसमाजियन मुलाजा राखणार नाही.

असाच उदार मताचा मुळचा आमचा सनातन धर्म आहे. स्वार्थी, पोटार्थी लोकांनी घालघुसड करून, सनातन धर्माला डाग लावला, भेदभाव घुसडून समाजाचे तुकडे केले आणि जन्मांवर जातीची रचना करून एकाच धर्माच्या फारकती केल्या, चौघांची तोंडें चार दिशेला केली, आणि राष्ट्राचा द्रोह केला, म्हणूनच या सत्यसमाजाच्या तत्वावर ब्राह्मणेतर पक्षाची उभारणी झाली. एक ब्राह्मण वर्ग, खोटा पवित्रपणा गळ्यात अडकवून, इतर वर्गांला दडपून टाकू लागला, याच कारणासाठी ब्राह्मणेतर पक्षाचा जन्म झाला. अवडंबर मोडून टाकणारा हा खरा धर्म आहे.

यज्ञाच्या कर्मकांडाला धुळीस मिळविणारा, दया धर्मास अग्रपूजेचा मान देणारा, हाच सत्यसमाजाचा धर्म आहे. मनुष्याच्या इतिहासापासून याचा आरंभ आहे. आणि सनातन सत्याला जेव्हां जेव्हां अडथळे आले, तेव्हां जनक जनार्दनासारखे पुण्यश्लोक राजे, भगवंताचे अवतार ; महावीर बुद्धासारखे तेजस्वी वीर, अशोकादि प्रेमाचे पुतळे, शिवरायासारखे देशभक्त निर्माण होऊन. त्या सनातन सत्यधर्माचा दीपस्तंभ त्यांनी कायमचा उज्वलित करून ठेवला आहे ! म्हणून आम्ही म्हणतो, सत्यसमाज धर्म म्हणजेच सनातन धर्म आणि सनातन धर्म म्हणजेच ब्राह्मणेतर पक्षाचा धर्म.

वर्चस्वाला हपापलेल्या अदूरदृष्टी लोकांनी सत्यसमाजाचे नांवाने खडे फोडणे किंवा ब्राह्मणेतराला शिव्या देणे, ही गोष्ट मनाच्या क्षुद्रपणाची आणि पाखंड मताची द्योतक आहे. आह्मी तरी स्पष्ट म्हणतो की असले लोकच सनातन धर्माचे खरे शत्रू आहेत.

० ० ०

## भालांकाराना सत्यसमाजाची भिती नाही ?

( ता. २५ मार्च १९२७ )

प्रथमतः शिवाजी महाराजांचा स्तुतिपाठ गाऊन ते सत्यसमाजावर घसरले आहेत. वस्तुतः त्यांना सत्यसमाजाची मुळीच भिती नाही. ते म्हणतात " सत्य-समाजाची भीती वाटण्याचे कारण ब्राम्हणांना किंवा चातुर्वर्णियांना वस्तुतः मुळींच नाही. " मग वस्तुस्थिती अशी जर होती, सत्यसमाजाचे अस्तित्व विशेष महत्वाचे आपल्यास वाटत नव्हते, तर अग्रलेख खरडण्याइतकी जरूरी वरे आपल्यास भासली ? चिपळूणकरांनीसुद्धां म. फुले ही व्यक्ति कालौघात महाराष्ट्राच्या स्मृति-पटावरून नाहिशी होणार असे भविष्य केले होते ; पण सत्यसमाजियनांचीच आता ब्राह्मणांना कशी आंच लागून राहिली आहे, हे कांही नव्याने सिद्ध करण्याचे कारण नाही. आता ब्राह्मणांची कारवाई आमच्यांत फूट पाडावी म्हणून सुरूं आहे. त्यांना भोळ्या भाबड्या मराठ्यांबद्दल पान्हा फुटतो. केव्हां केव्हां मराठे हे फार स्वार्थी लोक आहेत म्हणून ते दुसऱ्या जातीचे लोकांना प्रेमाचा इशारा देतात. पण हे चित्पावनी डावपेच आता ब्राम्हणेतरांना कळूं लागले आहेत. त्यांच्यात चौकस बुद्धी जागृत होऊ लागली आहे. आमचा सत्यसमाज आपली तत्वे पटवून देतो, रूढीने केलेले अत्याचार, ब्राह्मणांची पोकळ बडेजावी, सत्यसमाज लोकांचे डोळे उघडून दाखवित आहे, हेच फक्त त्यांचे काम आहे. तो आपला सांप्रदाय बनवीत नाही. मग त्याची जात कशी तयार करील ? कोणत्याही जातींचा त्यांत समावेश होतो. समाज वाढविण्यासाठी त्याने बाप्तिस्मा देणे नाही सुरूं केलेले. आज लहान दिसणारा सत्यसमाज तुम्हालाही पूर्ण ग्रासल्याशिवाय राहणार नाही. ब्राम्हण लोकांतही उदारमतवादी आगरकर, देशमुखांच्या सारखे होऊन गेले आणि आजही आहेत. प्रत्येक वर्मातील सुधारणा करणारा आह्मी सत्यशोधकच समजतो !

शिवाजी महाराजांनी राजकीय स्वातंत्र्य प्रस्थापित केले– त्यांना त्यात यश आले. पण आजच्या स्थितीत शिवाजी महाराजांनी काय केले असते ? त्यांना काय धार्मिक स्वातंत्र्य नको होते असे म्हणता येईल ? ज्यांनी स्वातंत्र्यासाठी जीवित्व खर्च केले, त्याना धार्मिक गुलामगिरी काय ठेवायची होती ? शिवाजी महाराजांची स्तुति करण्यांतही पुणेरी डावपेंच !

शिवाजी महाराजांना सर्व जनता मानते, याचा फायदा रामदासी पिल्लू घुसडण्याकडे करायचा ? नुसती खुळ्या भाबड्यांची फसवणूक !

राजकीय स्वातंत्र्य या पवित्र नांवाची नुसती विटंबना चालविली आहे. पुणेकरांचे राजकीय स्वातंत्र्य म्हणजे पेशवाईची पुनरावृती. निव्वळ आपलपोटे-पणा ! अज्ञानी कुणब्याना फसवून त्यांची गळचेपी ! सत्यशोधकांना ब्राह्मणेतराना सुराज्यासाठी खटपट करायची आहे. भेदाभेद तो कोठेही असो तो आह्मांला नको आहे. सत्यशोधक म्हणवून घेऊन जे त्या तत्वाला सोडून वागत असतील त्यांचा आह्मीही निषेध करूं. पण यासाठी सत्य समाजाला नांवे ठेवता येतील? भाला-कार " वर्णानां ब्राम्हणो गुरुः " असा केवढाही कंठशोष करा, त्या स्थानापासून ब्राम्हण हा केव्हांच पदच्युत झाला आहे. स्वतःच्या गुणदोषावरुनच आता ब्राम्हणत्व मिळणार आहे. मी जातीचा ब्राम्हण म्हणून श्रेष्ठ, नि पोकळ बडेजाव " नुसत्या भुश्याप्रमाणें उड्न जाणार आहे. सत्यसमाजाची व महात्मा फुल्यांची किती नालस्ती करा, त्यांची किर्ती व सत्यतत्वे बेगुमान पुढे जाणार. यात तिळ-मात्र शंका नाही,

० ० ०

## सत्यशोधकाविरुद्ध संग्रामची ओरड.

( ता. २७ मे १९२७ )

संग्रामकार उठल्या बसल्या सत्यशोधकांना शिव्या देतात. बेजबाबदार, निरर्गल जीभ सुटण्यापेक्षा, विचारासाठी थोडी अडलेली बरी. पण सत्यसमाजाची तत्वे आणि आचरण या गोष्टींचा विचार करून त्या प्रत्येकाबद्दल निर्विकारपणे उहापोह केला असता तर बरे झाले असते.

फार दिवसांच्या जुलमामुळे मनुष्य गांजून गेला असला तरी संवयीने आणि निरुपाय म्हणून तो मुकाटचाने सहन करीत असतो. याचा अर्थ या दीन दुब-ळ्यांना जुल्म आवडतो असा नव्हे. त्यांचे चालत नाही. थोरांच्या दडपणाने ते मुक्के झालेले असतात. पण जर का कांही कारणाने थोडीशी संधी मिळाली, आणि वाचा फुटली, तर ते आपले मनोगत बोलून दाखवितात. चळवळ सुरू होते. धडपड होऊ लागते. असे प्रकार कोणत्याही नवमत प्रसारावेळी होतातच.

सत्यशोधकांच्या समतेच्या नवीन विचारानी कांही लोक जागे झाले. कांही विचार करूं लागले. कांहीनी उघड बोलण्याला सुरवात केली. आणि कांही जणांची डोकी समाजातील विषमता, जुलूम आणि अन्याय पाहून भणानून गेली. संतापली किंवा भडकलीही असतील. तो भिन्न प्रकृतीचा परिणाम आहे. नवीन वळवाचा पाऊस पडला, म्हणजे पाणी कांही वेळ गढूळ होते. पण पुढे थोडया वेळांनी ते जास्त निर्मळ व गुणकारीही होते, असा अनुभव आहे.

ब्राम्हणांच्या जमिनी :– हा प्रश्न मजुराचा, कष्टाळू शेतकऱ्याचा, गांजलेल्या कुळाचा आहे. स्वतः अंगाला मातीचा स्पर्शसुद्धां सहन न करणारा एक उच्च वर्ग आहे. तो सालोसाल आपल्या जमिनीचा खंड वाढवित जातो. उपाय नाही, म्हणून कोणी जमिनी करतात. त्या बिचाऱ्याना दुसरा धंदाच नाही. जमिनीच्या मालकाची भूक मर्यादित फाळचांनी भागत नाही. कुणब्याना पिळून, आडवून फाळा चढवतो. पैन पै जास्तीत जास्त तो जमिनीतून काढण्याचा प्रयत्न करतो. ज्या कुणब्याच्या जिवावर उच्च वर्ग पक्वान्नाची पाने उठवीत असतात. त्या शेतकऱ्याना पोटभर भरडी भाकरी मिळत नाही. अशा स्थितीत जमिनी करण्याचे त्यानी नाकारले, आणि त्या पडून राहिल्या तर यांत दोष कोणाचा ? पैशाला हपापलेल्या जमिनीच्या धन्याचाच नव्हे काय ?

अशात कोणी सत्यशोधकाने त्या बिचाऱ्या शेतकऱ्याला सांगितले की, इतका डोईजड फाळा देऊन जमीन करून भिकेला लागण्यापेक्षा, जमीन केलीच नाही तर काय वाईट ? हे कुणब्याला पटते. उच्च वर्गाला पटत नाहीं. झाला बेबनाव. जमीन पडली. सत्यशोधकांचे नांवे खडे फोडण्याला संग्रामकार तयार, हा प्रश्न अर्थ शास्त्राचा आहे पोटापाण्याचा आहे. कोणावर सक्ती करता येत नाही. जुलूम चालत नाही. कायदाही तेथल्या तेथेच थांबून राहतो.

सामाजिक आणि धार्मिक पाखंड :– वरीलप्रमाणेंच ही एक वरीष्ठ वर्गाची गिल्ला आहे. कोणा वर्गाला अमुक जातीचा, म्हणून विशेष हक्क या कालात कोणाला आवडत नाही. देवाधर्माच्या ठायी सामाजिक, सार्वजनिक विशेष प्रसंगी एका वर्गाने दुसऱ्यावर श्रेष्ठपणा मिरवणें, आता खपत नाही. अंगी गूण असले तर मान हा मिळणारच. त्यासाठी ओढाताण करावी लागत नाहीं. हा वायफळ श्रेष्ठपणा मानू नये. देवाची भक्ती करण्यास कोणी मध्यस्थ नको. ही सत्यशोधकांची शिकवण आयत्या बिळांतल्या जन्म थोरांना अप्रिय होते. त्याची भाषा पाखंडी ठरते. वर्तन बंडखोर होते. हाही कोत्या विचाराचा परिणाम आहे.

जन्मावरूनची थोरवी ब्राम्हणाचीच काय पण ब्राह्मणेतरांचीही आह्मांला नको आहे. मानसिक गुलामगिरी सर्वत्र वर्ज आहे.

संग्रामकारांचे गोंधळी, डवरी आणि कडक लक्ष्मी :– असली भटक्या पोटभरूंची उदाहरणे दिल्याने भिक्षुक शाहीचे मंडन कसे होणार? हे सारेच लबाड भिक्षुक आज त्याज्य आहेत. हा जातीचा प्रश्न नाही. ही समाजाची कीड आहे. कोणी पिसवा, कोणी उवा, कोणी चिलटं, कोणी गोचीड, कोणी ढेकून अशी त्यांची नंबरवारी लागेल इतकेच. सर्वांत ब्राम्हण भिक्षुकशाही हिचा नंबर पहिला लागेल! खळयावरचे बैते, राशीवरचे बलुते, जन्मापासून सरणापर्यंतची सोळा संस्कारांची. उटल्या सुटल्या ब्राह्मणी भिक्षूकांची डोईपट्टी, लग्नाचा बोजड खर्च आणि पंचांगाचा पैसा, देवाचा नैवेद्य किंवा संकल्पाची दिडकी याची बेरीज संग्रामकारांना हल्कीशी दिसत असेल, परन्तु "वट गोळा" कांही लहानसा होणार नाही. तथापि ही गोष्ट आह्मी बाजूस ठेवतो. इंग्रज सरकारांनी आमचे देशातला पैसा खोऱ्यांनी ओढला आणि ओढीत आहेत. कबूल. नाकापेक्षा मोती जड इंग्रजी सिव्हिल सर्व्हंटची नोकरशाही आमच्या कमरा मोडते. पत्करले. इंग्रजांनी आह्मांला नव्या नव्या चोंचल्याने आणि विदेशी विचाराने देशाभिमानापासून भ्रष्ट केले, हे नुकसान फार मोठे आहे. ना. गोखले नेहमी म्हणत की, आमचे सत्व नाहीसे होऊन आह्मी विदेशी बनत चाललो. हे नुकसान कधीही भरून निघणार नाही. हुबेहुब तोच प्रकार ब्राम्हणी भिक्षुक शाहीचा आहे. डवरी, बहुरुपी, डोंबारी, नाडलक्ष्मी आमचा पै पैसा घेत असतील. समाजाला ते वृथा भार होत असतील. पण ब्राम्हणी गोचीडशाहीची शक्ती कांही अजब आहे. ब्राम्हणी भिक्षुक वर्ग आमच्या द्रव्याचे आणि रक्ताचे शोषण करतो, याची आम्हांला फारशी परवा वाटत नाही.

परन्तु भिक्षुक ते भिक्षुक, पण "तेरे उपर मेरी" ही त्यांची वागणूक आमचेच अन्नावर पोसून आम्हांलाच गुलाम बनविण्याची त्यांची हातोटी. आणि झाडून साऱ्यांना मानसिक दास्यात कायमपणे ढकलून देण्याची कला ही पाहिली म्हणजे इंग्रजी नोकरशाही, आणि ब्राम्हणी भिक्षुकशाही ही सख्खी भावंडेच लागतात.

किंवा चुकलो असल्यास ब्राह्मण भिक्षुकशाहीचा नंबर वर लागेल. म्हणून संग्रामकारांना आम्ही कळवितो की ही दुधारी ब्राम्हणशाही इतर साऱ्या वर्गांवर चढेलपणा करून डोक्यावर मिरे वाटीत आहे की नाही ते पहावे. आणि मग सत्यशोधकांना खुशाल चौफेर शिव्या द्याव्यात.

## वैदिकी जलसे आणि सत्यशोधकी तमासे.

(ता. ५ जुलै १९२९)

वेद हा सर्व मान्य ग्रंथ ! अस्सल पवित्र बायबल ! वाटेल तसले पाप असो. नीति भ्रष्टता असो, आजच्या समाजाने एखादी गोष्ट केवळ निंद्य आणि त्याज्य म्हणून. फेकून दिलेली असो, ती आमच्या वैदिकांच्या समोर ठेवावी, ते त्यांच्या वेदाच्या सोनखोडाच्या दगडाला घासली की पुरे, तिच्यावर बिनचूक सशास्त्र असा मोहरबंद शिक्का पडायचाच. कारण वेद ह्मटला की त्यापुढे डोके घासघासून सहा महिन्याचे हजामतीचा खर्च त्यांनी वाचवायचाच ! हा त्यांचा धर्म. कारण वेद हा देवानी म्हटलेला आणि ब्राम्हणांनी ऐकलेला. ब्राम्हणांची क्रिया आणि त्यांचे कर्म ब्राम्हणांकडून मोहरबंद सर्टिफिकेटानें हुकमत करून चालवणार.

सत्यशोधक समाज ब्राम्हणांचा पाळण्यापासूनचा वैरी. कारण तो सत्यच बोलतो, परन्तु ते ब्राम्हणांना पटत नाही. पक्वान्नाच्या माऱ्याने गोड खाण्यास लाचावलेली त्यांची जिव्हा त्याना सत्यशोधकी पण अप्रिय भाषण कडू जहर लागते. ब्राम्हणी कोशामध्ये नीतीची देखील व्याख्या पार बदलून गेलेली आढळते असे दिसते. व्यभिचार तो व्यभिचार. कोणत्याही धर्माने किंवा सांप्रदायानी त्याचा पाठपुरावा केलेला नाही. कोणत्याही धर्मात पहा आणि त्यांचे धर्मपुस्तक पहा. सर्वत्र व्यभिचार हा पापातच बाजला आहे परन्तु भ्रष्ट झालेल्या बुद्धिवान ब्राह्मणवर्गाला व्यभिचार देखील समर्थनीय दिसतो. त्याचे मंडन करण्यास ते तयार होतात.

हा विचार सुचण्याचे कारण असे. ब्राह्मणेतर वर्गाकडून सुद्धां अनेक वेळा प्रशंसेस पात्र असलेले मासिक चित्रमय जगत् पण ते देखील वरील मोहातून सुटलेले नाही. त्यांच्या एका अंकामध्ये एकदा एक जाहिरात फडकलेली आमच्या सहज वाचनात आली. असल्या महत्वाच्या वजनदार मासिकामध्ये प्रसिद्ध झालेली ती जाहिरात पाहून जीव थक्क झाला. बापूराव म्हणून कोणी एक कुलकर्णी आहे. त्यांनी एक महापराक्रम केल्या कारणाने यच्चावत भट दुनियेने त्यांना पठ्ठे बापूराव अशी ब्राम्हणाला शोभेलसी बहुमोल पदवी अर्पण करण्यात आली आहे. अजागळ सत्यसमाज आणि टाकाऊ ब्राम्हणेतर चळवळसुद्धां या पठ्ठे बापूचा अलौकीक धर्म पाहून, घाबरून गेला आहे. केवळ भांबावून गेला आहे. सत्यसमाजाच्या सवगोलंकारी सुधारकी चळवळीने झक मारली आहे. अरे, आहात कुठें ? जातीभेद

निर्मूलन आणि अस्पृश्यता निवारण ब्राह्मणेतर समाज नुसता नांवाने पुकारीत आहे. सुधारकी लोक क्रियाशून्य म्हणूनच त्यांना कोणी विचारीत नाही. पठ्ठे बापुराव देशस्थ कुळकर्णी ब्राम्हण. ते कधी हिंदुमहासभेला गेलेले नसतील. ब्राम्हणेतर चळवळीचा त्यांना कधी वास पुरवत नसेल. सत्यसमाजी लोक आणि पठ्ठे बापुराव यांच्यातून आडवा विस्तव जात नाही. कारण हे मराठे धर्मलंड पाखंडी हिंदुधर्माचे शत्रू. मराठ्यांचे चुकते ते येथेच. नुसती बडबड करून सुधारणा काय होणार ? हे बोलक्या विद्वानाचे काम नव्हे. त्याला पठ्ठे बापुरावासारखा कार्य धुरंधरच पाहिजे. आमचा महार हा अत्यंत नीच अस्पृश्य वर्ग मनुस्मृतीने गांवाबाहेर हाकलून दिलेला. पाहण्याला देखील इतका भयप्रद, की पवित्र ब्राह्मणाचे ब्राम्हण्य देखील खाडकन नष्ट करून पाताळापर्यंत खणून काढून शेषाच्या मस्तकाला नेऊन भिडविते. महासभा खास चुकली; हे ब्राम्हणेतरांना मॉडेल आजवर मिळाले नव्हते. उछृंखल सत्यसमाजियनाने या पठ्ठे बापुरावाची कीर्ती आजवर ऐकली नव्हती. १९२९ एप्रील अंक चौथा पान १७६ च्या पुढील जाहिरात, ब्राम्हण आणि हिंदू म्हणून घेणारे एकूण एकचित्ताने ही जाहिरात लक्षपूर्वक वाचावी आणि तिचे चिंतन, मनन निदिध्यास प्रेमळ भक्तिभावाने करावे. अशी आमची अंत:करणापासून शिफारस आहे.

"पठ्ठे बापुराव" कामशास्त्र निपूण असावेत. मदनाचे पुतळे असावेत. याशिवाय अंत्यज वर्गातील पौळी महारीण यांच्यावर फिदा कशी झाली असेल! हा तमाशा घेऊन सहकुटुंब सहपरिवार वेदमूर्ती पठ्ठे बापुराव आपल्या पट्टराणी समवेत करवीर नगरींत आगमन करून आपल्या चरण धुलीनें करवीरास पवित्र करण्यास चार दोन वेळा येते झाले होते, आणि येथील सर्व लोकांस आणि विशेषत: ब्राम्हण वर्गातील कांही गुणज्ञ आणि रसिक वकील मंडळीसही त्यांनी मोहित केले होते ! आमच्या कमनशिबाने त्या पठ्ठ्याबापुच्या दर्शनाचा अलभ्य लाभ घेता आला नाही. याबद्दल दिलगीर आहोत. परन्तु आपल्या धर्मांतील पुनर्जन्माचे कल्पनेवर विश्वास ठेवून या जन्मी नाही तर पुढील जन्मी तरी हा प्रसाद मिळेल. अशी आम्ही काळभैरव देवापाशी प्रार्थना करीत आहोत !

द्रव्यलोभाने चित्रमय जगतने या जाहिरातीचे द्वारे पठ्ठेबापूची अल्पशी ओळख करून दिली, याबद्दल आभारी आहोत. पठ्ठे बापुराव हे रेटरे गांवचे अत्यंत प्रसिद्ध शुद्ध ब्राह्मणी वर्गात जन्मलेले आहेत गंधर्वाचे नाटक यांच्यापुढे थंडगार झाले आहे, शृंगार रस यांच्यापुढे हात जोडून उभा आहे. या रत्नाने आपल्या चरित्राने महाराष्ट्राला वेडे करून सोडले आहे. हा पट्टा उच्च ब्राम्हण जातीचा पण त्याच्या शुद्ध प्रेमाखाली पौळी महारीण तमाशातील नाची येताच एकदम

तिचे रूपांतर झाले. पठ्टेबापू तिच्याशी समरस झाले. प्राचीन काळी एका मासे-मारू कोळयाची अजाण पोरगी, एका उच्च वर्गाच्या पाराशर नामक ऋषीच्या दृष्टीस पडताच त्याही मत्स्यगंधेचे मुळापासून रूप पालटून जाऊन, वर्णसंकर संबंध झाला. आणि तिच्या पोटी जन्म घेणारे कृष्णद्वैपायन व्यासानी ब्रह्मज्ञानाचा झेंडा या भारतावर उभा केला. आमचा तर्क असा वाहतो की, या आधुनिक नूतन पाराशर मत्स्यगंधेच्या गंधर्व विवाहापासून थोडयाच दिवसात नवधर्मप्रवर्तक व्यास उत्पन्न होणार आहेत. आणि आचार भ्रष्ट आणि विचार शून्य ब्राम्हण वर्गाला, ते नवी दिशा देणार आहेत !

सुप्रसिद्ध साधु रामोशी यांच्या पायपोसाची ज्याला किंमत नाही, असल्या कवडीमोल बापूरावाची आमचे कडून या लेखाद्वारे इतकी खेटरपूजा झालेली बस्स होईल असे आम्हांस वाटते. या पेक्षा जास्त लिहून आमच्या मागासलेल्या बंधूना आह्मी या पापी मनुष्याचे चित्र जास्त वेळ दाखवू शकत नाही. पण आमचे वे. स. सातवळेकर हे काय म्हणतात कोण जाणे ! ते वेद पढलेले आहेत. पंडित सातवळेकरांनी आपली मखलाशी करून आपला पुरुषार्थ जगासमोर मांडावा अशी आमची नम्रपणे विनती आहे.

सत्यशोधकी तमाशे अगदी गचाळ, गावंडळ लोकांनी चालविलेले. येथून तेथुन ब्राम्हणांची भरमसाठ निंदा आणि चेष्टा. बिचारा पुण्यवान ब्राम्हण नदीहून स्नान करून येतो. आपला पवित्र देह रस्त्यातील अमंगळ पदार्थांनी बाटू नये, अब्राम्हणांचे स्पर्शाने आणि अत्यंजाचें सावलीने घाण होऊ नये, म्हणून यथाशक्ती तीनताड टाणटूण उडया मारीत रस्त्यावरून जाताना बेअकली सत्यसमाजी त्यांची चेष्टा करतो. ब्राम्हण विधवा वैराग्याचो केवळ पुतळा. हा मोहक पदार्थ दृष्टीस पडेल, अनीतीचा प्रसंग ओढवेल ! इतराचे दृष्टीस पडेल, तर अनाचार खास घडेल ! या बिनचूक तर्कशास्त्राने आज्ञा केल्यावरून त्या बिचाऱ्या बाईला विद्रूप करण्यात आली. कसलाही अलंकार विधवेने घालणेचा नाही. दिडकिची कांकणेही भरणेंची नाहीत साधी खादीची चोळीही लेणेची नाही. नवरा गेला तर केश कलाप कशाला ? खाणेपिणे कैद्यास योग्य ! उपास तापास घालुन तिला अर्धी-मेली करायची ! अशा उच्च हेतूने ही वैराग्याची मूर्तिमंत संख्या हिंदुधर्मात घुसडली असता. हे ब्राम्हणेतर लोक, भर चव्हाटयावर त्या विधवांचे सोंग आणून हिंदुधर्माची टवाळी करण्यास मागे पुढे पहात नाहीत ! शुद्ध चरित्र आचारी. पाणके, केवळ तबकातील पैशावर दृष्टी ठेवणारे, पगडी, दरबारी अंगरखा आणि पुष्पाहार सुशोभित ब्राम्हण कीर्तनकार चारी बोटातुन हिऱ्यामाणकाच्या आंगठया घालून बोटे पसरून भोळया भाबड्या अज्ञान आणि अनाथ स्त्रियांच्याकडे (?)

दृष्टी ठेवून जे आहे ते आणि ज्या काळाचे ठायी असल्या पावन प्रणव शब्दांनी पुराण सांगताना हाताचे हातवारे करून शृंगाररसिक चेष्टांचे प्रतिबिंब उठवणारा विद्वानपुराणिक, पावसाळ्यातील बेडकासारखे मान खालीवर करून डरांव डरांव करीत ओरडणारे भिक्षुक भटजी, आपल्या अर्थशून्य पूर्ण अज्ञानाने वैदिक धर्माची परंपरा चालू ठेवणारा पुरोहित, अशा जगमान्य (भटमान्य) ब्राह्मण धर्माधिका-ऱ्यांची चेष्टा सत्यसमाजाच्या तमाशातून स्टेजवर पाय आपटीत लोकांना दाखवून हंशा पिकविलेला आहे. असा धर्माचा हंशा या मराठ्यांनी नित्य चालविलेला पहावा ? ब्राह्मणेतरात निंद्य गोष्टी नाहीत काय ? त्या मात्र झाकून ठेवायच्या आणि ब्राम्हणांची तेवढी पापे, अपराध निंद्य कर्मे आणि निंद्य आचरण तमाशाचे द्वारे चव्हाटयावर आणायचे.

पठ्ठेबापू चुकला असेल पण त्यात रस तरी आहे. आणि त्या पौळीच्या पवित्र रसमुखाला भाळणारा पठ्ठेबापू. मग तो रसिक कसा नव्हे ? आमची आग्रहाची मागणी ब्राम्हण बंधूना आहे, पठ्ठेबापूनी शृंगाररसाची पूर्तता करून दाखवली. आता उरलेले रसाविस्करण इतर ब्राम्हणांनी तमाशाचे द्वारे सुरू करावे, आणि सरणावर ठेवलेला भिक्षुकी धर्म ब्राम्हण वर्गाने रक्षण करावा. या कामी सेनापतीचे काम करण्याला कसलेंले धुरंधर " पठ्ठेबापू " सज्ज आहेतच. अडाणी, अक्षरशून्य आणि रानटी मराठ्यांचे हातून होणेचे हे काम नव्हे.

★ ★ ★

# कायदा व रुढी

## जगदंबेच्या देवालयांत.

(२६ नोहेंबर १९२६)

।। खट नट यावे, । शुद्ध होऊनी जावे ।।

।। दवंडी पिटी भावे । चोखामेळा ।।

कोल्हापूरच्या अंबाबाईवर महाप्रसंग गुदरला आहे – अब्राम्हण लोक आणि खुद्द श्री छत्रपती महाराज हे गैरशिस्त रीतीने गाभाऱ्यांत प्रवेश करीत आहेत. "न भूतो न भविष्यति" ! मुसलमानाचे काळात सुद्धा असला कठीण प्रसंग देवीवर आला नव्हता. तो या अब्राम्हणानी आज आणला आहे. वहिवाट पवित्र वहिवाट, पायाखाली तुडवली जात आहे. देवालय भ्रष्ट झाले आहे. मूर्ती अपवित्र केल्या आहेत. असा हाकाटीचा अर्ज मुंबई सरकारकडे रयतेने केला आहे. असे केसरीकार जीव तोडून साऱ्या हिंदुना कळवित आहेत.

स्वराज्य ठेवा बाजूला, कौन्सिल ठेवा गुंडाळून. अगोदर या कोल्हापूरच्या बंडावर मोर्चा लावा. आणि सारे भट एकत्र गोळा करून ब्राम्हणेतरांची चांगली खोड मोडून त्यांना ताळयावर आणा. यांनी फार गमजा चालविल्या आहेत !

गव्हर्नर साहेबाकडे रयतेचा अर्ज गेला आहे :– रयत म्हणजे कोण ? आणि हिंदू म्हणजे कोण? केवळ ब्राम्हण की ब्राम्हणेतरांचा सुद्धा अर्ज आहे? ब्राम्हण वर्ग देवाच्या पायी धावून जाणे ही गोष्ट इतिहास प्रसिद्धच आहे ! सोमनाथ, गुलबर्गा वगैरे देवस्थानावर संकट आले तेव्हां या भूदेवानीच धावणे केले अणि सनातन धर्माचे रक्षण केले. असले खंबीर वीर बहाद्दर पाठी-वर असताना, छत्रपति शिवरायांनी उगीचच्या उगीच दगदग घेतली ! आज ब्राम्हण वर्ग स्वतः आणि आडाणी रयतेच्या तोंडाने इग्रज सरकारकडे जाऊन दाद मागत आहे. हा काय पराक्रम थोडा आहे ? आता ब्राम्हणेतरांची तार असल्या अर्जापुढे काय चालणार ?

आम्ही सरकारना कळवतो की, त्या अर्जाला १२ वर्षाची मुदत द्यावी. आणि नंतर सगळ्या सह्यांची मोजदाद करावी. त्यातून ब्राम्हणेतर लोक वग–ळावेत म्हणजे अर्जांचा खरा भरीवपणा कळेल. भरतभूमीची प्रजा ३२ कोटी आहे. त्यातून सहीवाले वगळावेत. बाकी राहिलेले सारे लोक हे ब्राह्मणेतराला अनुकूल. हे उघड आहे.

कारण कोणत्या मायेचा ब्राह्मणेतर पूत समोर येऊन सांगेल की, आह्मी देवीस स्पर्श करण्यास अपात्र आहोत ? आणि छत्रपतिंच्या स्पर्शाने देवी अपवित्र होते.

वस्तुस्थिती ही असावी की या भूदेवांनी रयतेच्या सह्या घेत गांवोगाव फिरावयाचे आणि सरकारकडे बाऊ करून दाखवायचा. अशाने काय होणार आहे ?

ब्राह्मणाच्या स्पर्शानेच देवी अपवित्र होण्याची आता वेळ आली आहे :– कित्येक ब्राह्मण केवळ आडनांवाचेच आहेत. खासगी वर्तणूक लाजवील अशी आहे. कित्येक सुधारलेल्या व्यसनांत गर्क आहेत, तर कित्येक पुरातन चिख-लांतच लोळत आहेत ! आचार विचाराची आणि यांची कंप्लीट फारकत झाली आहे. डोहभर पाण्यांत यांना बुचकळले तरी त्यांचा दुर्गुण जाणार नाही. असल्या ब्राह्मणांकडून देवीला रोज स्पर्श होत आहे. त्याबद्दल देवीला अगोदर प्रायश्चित दिले पाहिजे ! आणि सारे देवालय फिनाइलच्या पाण्याने साफ धुवून काढले पाहिजे ! तरच बिचारा साधा भोळा शेतकरी तेथे जाऊं शकेल. आमचे तर म्हणणे असे आहे की, मागासलेल्या ब्राम्हणेतर वर्गातच कांही धर्मबुद्धी राहिली आहे म्हणूनच त्यांच्या औदार्यावर ब्राम्हणांचा निर्वाह चालला आहे. यांत तर शंकाच नाही. ब्राम्हणेतर नाहीत तर देवही नाही आणि धर्मही नाही. आता एवढी गोष्ट खरी की,

पोशाखी थाटमाट आणि खोटा सोवळेपणा ब्राम्हणेतर वर्गाला करता येत नाही :– त्याला दहा हाती धोतर मिळत नसेल. इस्त्रीचा कपडा स्वच्छ नसेल आणि दिखाऊं टिळेमाळाही घालता येत नसतील ! परन्तु त्याची वागणूक निर्मळ, आयुष्यक्रम साधा, देवावर पूर्ण श्रद्धा, आणि मूर्तिच्या ठायी खरी भावना ! एव-ढेच त्यांचे साहित्य असते. असल्या भाविकांना स्पर्शाला मज्जाव करणेचा असेल तर उद्या खास देवालयच ओस पडेल.

कारण ब्राम्हण वर्गात आज भक्तीभाव राहिला आहे कोठे ? भिक्षुक पोटामागे धावत आहेत, सुशिक्षित ब्राम्हण नास्तिक तरी बनले आहेत किंवा मिजासखोर झाले आहेत. त्यांना देवही नकोत व धर्मही नको !

" वहिवाटी " ने माणसाचे पशु बनले आहेत :– आजवर या वहिवाटीच्या जोरावर किती अनर्थ घडले आहेत, हे पाहूं लागलो तर मानव जातीचाच इतिहास द्यावा लागेल.

जबरदस्तीने अशक्तांच्या माना वांकवायच्या, त्या वहिवाटीच्या जोरा-वर ! दांडग्यांनी गरीबाला बळी द्यायचे ही वहिवाटच ! श्रीमंतांनी माणसाचे गुलाम करून दावणी बांधायच्या आणि मुलाबाळांची सुद्धां भर बाजारात जनांवराप्रमाणें विक्री करायची, ती वहिवाटीचे जोरावर ! लॉर्डानी कॉमन्स लोकांना दूर सारायचे, त्याला वहिवाट आहेच ! गतभर्तकेला सक्तीचा सन्यास देऊन तिला विद्रूप करून, सनातन हिंदु धर्माची शेखी मिरवायची, याला आधार वहिवाटीचाच ! सतीची चाल कित्येक दिवस रूढीवरच दिवसा ढवळ्या खून करीत होती ! यज्ञोपवित घालणेचा अधिकार काय तो एका ब्राम्हण जातींला ! वेदाचा अधिकार या एकाच वर्गाला. आणि दुसऱ्याने याज्ञिक चालवायचे नाही, यालाही पुरावा वहिवाटीचाच ! सहा सात कोट आमच्या सारखीच माणसे, पण माणसातून काढून, महारवाड्यांत ढकलण्याचा अधिकार रूढीच देण्यास तयार ! देवाला स्पर्श करणे किंवा अभिषेक करणे हा विशेष वारसा हक्क एका ब्राम्हण वर्गाचा ! महाराजांनी गाभाऱ्यात प्रवेश केला किंवा महाराजांनी अभिषेक केला तर देव विटाळला जातो ! भ्रष्टा–कार होतो ! देवालय अपवित्र होते ! याला टेक वहिवाटीचे अॅक्टाचा ! आणि समतेच्या तत्वावर पार्लमेंट वजा कौन्सिले मागणारे स्पेन्सर हक्झले वाचणारे, केसरीकारासारखे महाविद्वान, कोल्हापूर संस्थानावर असल्या पोकळ बाबी घेऊन हल्ला चढविण्यास येणारे, हेही रूढीचे गुलाम, वहिवाटीच्या कायद्याचाच आधार दाखवितात !

पण दुरभिमानाने अंध झालेले हे लोक वहिवाटीचे एकसारखे वाटोळेच होत आले आहे, ही गोष्ट अगदी विसरुन जातात ; ही ही आजवरची वहिवाट अगर रीतच आहे. समतेचा विषमतेचा झगडा हा कांही आजचा नाही. हजारो वर्षांपासूनचा आहे आणि प्रत्येक लढ्यांत समतेचाच विजय होत आलेला आहे. आम्हांला ही सर्व कोल्हेकुई वाटते. हा उन्माद वायू झालेल्या लोकांचा गोंधळ वाटतो. ही नेहमीचीच रडकथा आहे.

ब्राह्मणेतराने गाभाऱ्यांत जाऊं नये याला कारण काय ?:– "वहिवाट" "वहिवाट" म्हणून किती जरी आक्रोश केला, तरी त्याला कोणी काडीचीही किंमत देणार नाही. ब्राम्हण वर्गाच्या भावना दुखावतात ! खरेच की काय? इतक्या त्या नाजुक झाल्या असतील तर त्यांनी देवालयाकडे बघण्याची तसदी घेऊं नये. ब्राम्हणाला भावना असतात. आणि ब्राम्हणेतराला नसतात, असे तुमचे म्हणणें आहे की काय ?

सुख दुःख, राग, द्वेष, मान अपमान हे मनोविकार जसे ब्राम्हणांना आहेत. तसेच ब्राम्हणेतरांस आहेत.

तुमच्या स्वार्थी नीतीने, कपटाने आणि लबाडीने आजवर ब्राम्हणेतर वर्गाला अंधार कोठडीत कोंडून टाकले होते, कै. शाहू छत्रपतींच्या कृपाप्रसादाच्या किरणाने ते जागे झाले आहेत. गतकालच्या जुन्या गोष्टी सांगून त्यांना त्या पटणार कशा ?

समतेच्या कालात विषमतेची विषवल्लीही लागू कशी होईल ?

० ० ०

## मूर्तिस्पर्शाची रूढी व आजचा कायदा.

( ता. २ डिसेंबर १९२७ )

इंग्रजांनी आपली राजकीय सत्ता आमचे देशांत स्थापन केली. लोकांमध्ये शांतता रहावी, नियंत्रण असावे, स्वस्थतेचा भंग होऊं नये, हा कायद्याचा हेतू आहे. इंग्रज सरकार पडले परधर्मी. धर्म हा विषय, लोकांच्या भावनेला जाऊन पोचवणारा आहे. हा मानव स्वभाव पाहून इंग्रजांनी पीनलकोडची रचना केली. धर्म ही भावनाच नाजुक आहे. इंग्रजांचा धर्म ख्रिश्चन, तेव्हा सत्तेच्या जोरावर

इंग्रज लोक हिंदी प्रजेवर आपला धर्म लादूं इच्छितात अशी शंकाही कोणास वाटू नये म्हणून, चालत आलेल्या वहिवाटीस व रूढीस इंग्रजांनी मान्यता दिली. आणि कोणाच्या धर्मभावना कोणी दुखवूं नयेत असे नियम केले.

खिरस्चन धर्माला मूर्तिपूजा मान्य नाही. हिंदू लोक मूर्तिपूजक आहेत. प्रजेपैकी दुसरा एक मोठा भाग वर्ग मुसलमानांचा, त्या धर्मालाही मूर्तिपूजा मान्य नाही. अशा घोटाळ्याच्या स्थितीत, धर्मामध्ये आणि मतामध्ये नाना भेद असले तरी कोणी कोणाचा अपमान करूं नये, धर्मभावनेला परस्परांनी मान द्यावा, ही समतोल बुद्धी इंग्रजांनी ठेवली आणि कोणाचाही आपल्यावर आक्षेप येऊं नये असे कायदे केले.

देवाच्या मूर्तिसंबंधीचा कायदा इंडियन पीनल कोड कलम २९५ मध्ये ग्रथीत केला आहे. त्यातील आशय असा आहे :— जो कोणी इसम एखाद्या पवित्र मानलेल्या मूर्तिचा नाश करील (डिस्ट्रॉय) किंवा विद्रुप करील (डॅमेज) किंवा अपवित्र (डीफाइल) करील आणि हे कृत्य करितांना त्याचा हेतू एखाद्या धर्माचा उपमर्द करावा असा असेल, तर त्याला दोन वर्षांची शिक्षा किंवा दंड करण्यांत यावा.

या शद्वावरुन आणि त्याच्या अर्थावरून गुन्हा ठरणेचा आहे. उमरावतीस ' अस्पृश्य मांगुजीने ' देवाच्या मूर्तिला स्पर्श केला ही गोष्ट आरोपीने कबूल केली आहे. आरोपी अस्पृश्य आहे. आजवरची रूढी पहाता अस्पृश्याने मूर्तीला स्पर्श करण्याची चाल नाही. मॅजिस्ट्रेट वर्ग १ नी गुन्हा शाबीत मानला शिक्षा दिली. अपीलांत सेशनजज्जांनी गोष्ट शाबीत मानली परन्तु त्याचा हेतू दुसऱ्या कोणाला त्रास द्यावा असा दिसत नाही म्हणून सोडून दिला. कलमातील शद्वावरून पाहतां हे कृत्य (डिफाइल) अपवित्र करणे या शद्वात पडेल की काय हाच महत्वाचा प्रश्न आहे आणि कलमाच्या रचनेवरुन नाश करणे, विद्रुप करणे ही क्रिया त्या मूर्तिच्या द्रव्यात (सबस्टन्स) अगर घटनेत फेरफार करणे ही आहे. संदर्भावरून अपवित्र करणे म्हणजे ही तशाच प्रकारचे काही तरी कृत्य पाहिजे केवळ मनाचा नाजुकपणा आणि त्याला धक्का पुरे होणार नाही. देवतेच्या कल्पना तरी माणसावरून बसविलेल्या आहेत. मनुष्याला जे पवित्र, तेच देवाला पवित्र आणि मनुष्याला जे अपवित्र ते देवाला अपवित्र. आपल्या घरी कोणी थोर सत्पुरुष आला, त्याचा आपण सन्मान करतो सुगंधी द्रव्ये, गंध अक्षता फुलेमाळा, अत्तरगुलाब, देऊन स्पर्शास्पर्श करतो. तोच प्रकार देवाचा. याच्या उलट म्हणजे त्या सत्पुरुषाचा अनादर करणें अपवित्र करणे त्याची योग्यता कमी करणे तर तो उलट प्रकाराने. म्हणजे एखाद्या चांगल्या मनुष्यावर चिखल उडवला, मूर्तीच्या किंवा पुतळ्याच्या

तोंडाला डांबर फासले, किंवा घाणेरडे पदार्थ त्यावर टाकले तर खास अपराध होईल. डिफाइल अपवित्र करणे या शद्बांतच घाण किंवा गलिच्छ क्रिया करणेचा बोध होतो, तशी जर क्रिया नसेल तर तो गुन्हाच होणार नाही.

आता रूढी पाहणेची. याबद्दल वहिवाट भिन्न ठिकाणी भिन्न प्रकारची आहे. काशीस विश्वेश्वराचे देवालय आहे. ते साऱ्या हिंदूना मान्य व पवित्र आहे. तेथे सर्वच हिंदू देवास स्पर्श करतात. अभिषेक करतात. रामेश्वराची तशीच गोष्ट आहे. जगन्नाथपुरीस तर 'समता' याचेही पुढे गेलेली आहे. तेथे अन्नसेवनालाही भेदाभेद नाही. भालाकारांचे शद्बात बोलायचे तर 'रोटीबंदी नष्ट झाली आहे. पंढरपुरास विठोबारायाला अडाणी शेतकरी, कुणबी, पुरुष—बायका यापासून तो तहत शास्त्री पंडित आणि वेदशास्त्रसंपन्न ब्राम्हणापर्यंत कोणीही जाऊन मूर्तीला प्रत्यक्ष मिठी मारतो. असा प्रकार रूढीचा आहे. यावरून एका तत्वावर चालणे कठीण आहे.

आता ब्राम्हणेतर चळवळीचा विचार करणे जरूर आहे. देव सर्व हिंदूचा देवालय साऱ्यांचे. पैसा रयतेचा. नित्यनैमिक पूजा अर्चा करणेसाठी नोकर म्हणून कोठे ब्राम्हण नेमले. कोठे मराठे गुरव व कोठे लिंगायत नेमले. भक्तांना मज्जाव करणे, अमक्याने शिवावे व अमक्याने शिवू नये असे म्हणण्याचा अधिकार ब्राह्मणाला नाही व गुरवालाही नाही. तुळजापूरच्या भवानीस भोपेराव मराठे पुजारी आहेत. तेथे ब्राम्हणालाही मज्जाव आहे म्हणतात. पूजेचा हक्क त्यांचा आहे याबद्दल तक्रार नाही. पण यात्रेकरू आणि भक्तगण यांच्या मर्यादा ठरवणे हे यांचे काम नव्हे. ते जागत्या समाजाचे आहे. ब्राम्हणेतर समाज आजपर्यंत निजला होता. तो आता जागा झाला आहे. त्याचे स्वाभाविक हक्क त्याला कळू लागले आहेत. झाला तो उपमर्द झाला. यापुढे आपण असला भेदाभेद मान्य करणार नाही व चालू देणार नाही असे त्याचे म्हणणे आहे. हे म्हणणे सर—कारांनी मंजूर करणे भाग आहे. गेल्या वर्षी अशा प्रकारचा एक खटला झाला होता. अस्पृश्याने रूढीविरुद्ध जाऊन एका विहिरीचे पाणी ओढले होते. खालच्या कोर्टात शिक्षा झाली होती. परन्तु मनुष्याच्या जन्मसिद्ध हक्काची पायमल्ली करणारी रूढी आपणास कबूल नाही असे ठरवून हायकोर्टाने आरोपीस सोडून दिले. उमरावतीचे उदाहरण तर अगदी ताजेच आहे. करवीर राज्यांत तर कै. राजर्षी शाहू महाराजांनी वटहुकूम काढूनच अस्पृश्यता बंद केली आहे.

ही आजकालची परिस्थीती लक्षांत घेता सरकारनी आपण होऊन कायदा दुरुस्त केला पाहिजे. डिफाइल या शद्बाचा अर्थ स्पेशल दुरुस्ती करून स्पष्ट केला पाहिजे. ती क्रियाच अमंगल असेल, घाणेरडी असेल, तर तसले कृत्य करण्यास

ब्राह्मणेतर पुढे येणार नाही. परन्तु जन्मतःच मनुष्य उच्चनीच ठरविणे, आणि तसल्या जातिभेदावरुन देवाजवळ जाणेचा, हक्क अगर मज्जाव सांगत सुटणे या गोष्टी सरकारनीच फर्मानाने रद्द केल्या पाहिजेत. स्पर्शास्पर्शाचे तत्वच नष्ट करून टाकले पाहिजे. सरकारनी याप्रसंगी स्वस्थ राहून असली जुनी रुढी चालू दिली आणि तटे बखेडे होऊ लागले. सत्याग्रहापर्यंत पाळी आली, तर सरकारच्या हेतूबद्दल लोकांचा खास गैरसमज होईल. तंटेबखेडे सरकारला प्रिय आहेत असा अर्थ होऊ लागेल. तरी सरकारने राष्ट्रघातक रूढीचे पाय मोडून विषमतेचे तत्व कायद्याने मारुन टाकावे. त्याच्यावाचून हा प्रश्न लवकर सुटणे शक्य दिसत नाही.

० ० ०

## कायदा व रूढी.

( ता. ६ एप्रील १९२८ )

राजकीय बाबतीत समान हक्क मिळविणे जिताचे ध्येय आहे. इंग्रज सरकारांनी राज्यकारभारास आरंभ करताना आपल्या स्वार्थाकडे दृष्टी ठेवली. आज पर्यंत हिंदी लोकांनी ही विषमता निरुपायास्तव सहन केली. यापुढे त्यांच्या समोर "स्वराज्याचे" ध्येय आहे. गेल्या काँग्रेसने तर "स्वातंत्र्य" हेच आपले ध्येय आहे, अशी धैर्याची गर्जना केली आहे. तेव्हा इंग्रज आणि हिंदी मनुष्य याच्यात आतां कसलाही भेदभाव ठेवून चालायचे नाही. तो मार्ग सरकारास सुखाचा होणार नाही.

सामाजिक सुधारणा म्हणजे खरोखर नव्या कालास आणि नव्या विचारास अनुसरुन हिंदु समाजाची मूलतः पुनर्घटना करणें होय. सामाजिक सुधारणा अगोदर कि राजकीय सुधारणा अगोदर, हा वाद निरर्थक आहे. दोन्ही सुधारणांची योग्यता सारखीच आहे. आणि दोन्हीही एकाच मूळ तत्वावर उत्पन्न झाल्या आहेत. राजकीय हक्कात इंग्रज आणि हिंदी भेद खपणार नाही. तद्वतच हिंदु समाज रचनेत ब्राह्मण आणि मराठा किंवा मराठा आणि महार यांच्यात उच्चनीचपणाचा भेद खपणार नाही. इंग्रजा समोर अढी धरुन जर समान हक्क आह्मी मागणेचे तर इकडे महारही मराठ्यास आणि ब्राह्मणांस मनगट धरुन विचारीत आहेत की,

यापुढे अस्पृश्यांनी महारवाड्यांतच जन्म काढायचा की काय ! आणि महाव्याधी झालेल्या रोग्याप्रमाणें गांवाबाहेरच वेगळी वसाहत करुन राहणेचे की काय ! "समान हक्क तुह्मांस मिळणार नाहीत" असे म्हणून आता चालणार नाही. इंग्रजांनी राजकीय हक्क "देत नाही" म्हणून जसे चालणार नाही, तसेच उच्च वर्गाचे हिंदूनी कनिष्ट दर्जाच्या हिंदूना "देत नाही" ह्मणून चालणार नाही तुह्मी नाहीं दिले तरी, ते हिसकावून खास घेतील. मुकाट्याने नाही दिले तर दंडेली करण्यास ते तयार होतील. अस्वस्थता माजेल. शांततेचा भंग होईल. राजकीय हक्क एका हाताने इंग्रजांकडे मागणार तर दुसऱ्या हाताने आपल्या जवळचे विशेष सामाजिक हक्काचे गाठोळे खालच्या वर्गांला आणि अस्पृश्यांना देऊन टाकण्यास उच्च हिंदुनीही तयार झाले पाहिजे.

तसा वारा वहात आहेसा आज दिसतो. भिन्न वर्ण, भिन्न धर्म, भिन्न जाती यांनी हिंदु समाजाची शकले झालेली आहेत. त्यामध्ये समतेची प्रेमसूत्रे घातल्या–वाचून, जातीभेद नष्ट केल्यावाचून, राष्ट्रात एकजीव केव्हांच उत्पन्न होणार नाही. आह्मी सर्वांनी आता डोळे उघडले पाहिजेत. लांबणीवर टाकण्याची ही गोष्ट नाही.

राजा एकधर्मी असला म्हणजे सामाजिक सुधारणा हां हां म्हणता घडून येतात. करवीर राज्य एवढेसे खरे. परन्तु कै. श्री. शाहू महाराजांनी सामाजिक समतेचा विचार मनांत आणला. सर्वच संस्थानची सूत्रे त्यांचे हांती. सुखदुःख, कल्याण करण्यास ते समर्थ. मनापासून हेतू चांगला. अस्पृश्यांचे हाल दूर झालेच पाहिजेत, हे त्यांचे मनांने घेतले ! अशी सदिच्छा आणि राज्यसत्ता एकत्र झाल्यावर सामाजिक समतेला वेळ कितीसा लागणार ? लोकमताची धाव कुठवर पोचली आहे, हे त्यांनी बरोबर जाणले.

आणि मनांत आल्याबरोबर कायद्याच्याच मार्गाने आपले विचार अमलांत आणले. सार्वजनिक प्रसंगी कोठेंही विषमता दाखवायची नाही, असा त्यांनी कायदाच केला. आज अस्पृश्यतेचा अतिशय महत्वाचा पण नाजूक प्रश्न हाती घेण्यास खालसांतील उच्च वर्ग कांकूं करीत आहे. तो प्रयोग करवीर राज्यांत यापूर्वीच सुटून गेलेला आहे.

आणि आज अस्पृश्य वर्गाला करवीर राज्यात जी सवलत आणि जो मान व सद्‌बुद्धि अंतःकरणपूर्वक दाखविण्यांत येते. तितकी दुसरीकडे पहावयासही मिळणे कठिण.

" लग्नाची वयोमर्यादा. " हा प्रश्नही संस्थानामधून चांगल्या रीतीने सोडविला जात आहे.

बडोदा, म्हैसूर, कोल्हापूर वगैरे संस्थानांतून लग्नांची वयोमर्यादा कोठेकोठे १६ आणि २१ येथपर्यंत वाढवण्यांत आली आहे. तिकडे खालसा मुलखात पहावे तर सरकार रेंगाळत चाललेले दिसते. ते परधर्मी पडल्यामुळे सामाजिक बाबतीत धैर्याने पाय टाकणे त्यांना होतच नाही. धार्मिक प्रश्न, सामाजिक प्रश्न, असल्या देवाधर्माच्या बाबतीत इंग्रज सरकार तटस्थ वृत्ती धारण करते. अंधारात चाचपडत जाणाऱ्या मनुष्याप्रमाणें पाय खड्डयात पडेल काय? ठेच लागेल काय? पाय मुरगळेल काय ? स्वतःचे देहाला इजा होईल काय ? ही विवंचना सदैव तिकडे नोकरशाहीच्या मागे लागली आहे. धार्मिक वेडया समजूती, सामाजिक गैरसमजूती, अंधश्रद्धा, या अनिष्ट गोष्टींचा नाश व्हायचा असेल तर त्याला उपाय सार्वत्रिक आणि सक्तीचे शिक्षण हाच होय. यादृष्टीनेही कित्येक संस्थानांतून आघाडी मारलेली दिसून येते पण इंग्रज सरकारांकडे पहावे तर या अत्यंत जरूरीचा आणि पवित्र अशा शिक्षण दानाच्या बाबतीत देखील इंग्रज सरकार " जवळ पैसा नाही " म्हणून हाकाटी करते !

इच्छा आहे तेथे मार्ग आहे. सरकार परधर्मी असले म्हणून काय झाले ? लोकांना काय पाहिजे ते समजून घेण्यासाठी लोकमतालाच मान दिला पाहिजे. आणि त्यासाठी लोकांच्या पुढाऱ्यावर विश्वास टेवुन, त्यांच्या मतास अनुसरून; सरकारांनी हे कठिण प्रश्न सोडविणे योग्य आहे. इंग्रज सरकारांनी धार्मिक बाबतीत पूर्वी हात घातलेला आहे. सती जाण्याची दुष्ट चाल लॉर्ड बेंटिंगच्या वेळीच कायद्याने बंद केली आहे. तेव्हां कशाची आड आली नाही. लोकमत दूषित झाले नाही. त्यावेळचे लोकांचे पुढारी कै. राजा राममोहनराय यांच्या नव्या मताला बेंटिंगसाहेबांनी योग्य मान दिला आणि अशा गोड स्नेहाने विधवांना जिवंत जाळण्याची अमानुष चाल एकदम बंद केली.

आज तुर्कस्थानांत मुस्तफा कमालपाशा कशी गरुडाची भरारी मारीत आहेत, हे जगाला दिसत आहे. स्त्री शिक्षण, बालविवाह, पडदापद्धती, धर्मवेड वगैरे जुन्या चाली तिकडे समूळ नाहिशा होत चालल्या आहेत. अफगाणचे अमीर अमानुल्लाखान, अफगाणचा जुना कोंडमारा फोडून नव्या विचाराची सूर्याची किरणं आपल्या लोकांना दाखवित आहेत. आणि राष्ट्रमालिकेत अफगाणिस्थान वरच्या दर्जाला नेऊन पोचवावे कसे ? या अहर्निश चिंतेने परिश्रम घेत आहेत. त्यांचे फळ त्यांना मिळत आहे.

इंग्रज सरकार नेहमी चाचपडतात. आपल्या जीवाला भितात. तुर्कस्थान, अफगाण आज समाजाच्या नवीन रचनेंत जे पुढाकार घेत आहेत. त्याचे कारण लोकांवर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. आणि लोकांचा विश्वास राजावर आहे. हिंदुस्थानांत प्रकार वेगळा आहे. हिंदी लोकांना स्वराज्याचे अधिकार ज्या प्रमाणाने देण्यात येतील, त्या प्रमाणाने इंग्रजी नोकरशाहीच्या हातचे कमीकमी होत जातील. यांत थोडी ओढाताण होणार ही गोष्ट खरी आहे. परन्तु सामाजिक प्रश्नांची बाब तशी नाही.

लोकांना शहाणे करुन सोडायला खरा मार्ग सक्तीच्या मोफत शिक्षणाचा आहे. लग्नाची वयोमर्यादा वाढविणे, जातिभेद नष्ट करणे, देवापुढील भेदभाव नाहीसा करणे, अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी समान हक्क देणे, सार्वजनिक विहिरी, तलाव वगैरे ठिकाणी त्यांना इतरांप्रमाणे सारखे वागविणे, वगैरे ज्या बाबी आज प्रामुख्याने पुढे येत आहेत, आणि ज्या साठी सामाजिक सुधारक जिवापासून तळमळत आहेत, त्या गोष्टीना नोकरशाहीने प्रेमाचा हात देणे अत्यंत आवश्यक आहे.

हिंदी मुस्लीम तंटे समूळ नाहीसे करणे नोकरशाहीला जड जाईल असे आम्हाला वाटत नाही. फक्त त्यांनी मनोभावे करुन, थोर मनाने कायद्याचा आधार द्यावा पण सरकारची शंका फिटत नाही. "कसे होईल काय होईल" "कसे करूं काय करूं" हा संशयाचा मंत्र बारामहिने त्यांचे कानी गुणगुणत असतो. "संशयात्मा नेहमी भ्याडच राहणार." या न्यायाने सरकार सामाजिक बाबतीतसुद्धां कांही ना कांही अडथळा घेत असते. परवा बॅ. जयकर यानी या संबंधी असेंब्लीमध्ये एक ठराव आणला होता. लालालजपतराय, पंडित मालवीय यांनीही त्या ठरावाला पुष्टी दिली होती. ठराव असा होता अस्पृश्य आणि मागासलेल्या वर्गाला शिक्षणासंबंधी विशेष सवलती द्याव्यात सर्व सरकारी नोकरीत, विशेषतः पोलीस खात्यांत त्यांना घेण्यात यावे, अस्पृश्यांना सर्व खात्यांत बरोबरीच्या रीतीने वागविण्यांत यावे. सर्व सार्वजनिक विहिरी, तलाव रस्ते आणि सार्वजनिक संस्था, ज्यांना लोकांचा काहीतरी पैसा पोचतो, अशी सर्व ठिकाणे अस्पृश्यांना खुली व्हावीत. या अर्थाचे हुकूम सर्व प्रांतांच्या गव्हर्नरना जावेत, आणि या लोकांचे शिक्षणासाठी व्हाइसरायांनी एक कोटी रुपये स्पेशल मंजूर करावेत." इतक्या उदार बुद्धीच्या ठरावालासुद्धां सरकारतर्फे मंजुरी मिळाली नाही. आणि पोलीस खात्यांत आज अस्पृश्याला घेण्यात येत नाही. असे फायनान्स मेंबरनी कळवल्यानंतर बॅ. जयकरांच्या ठरावाला सरकारतर्फे उत्तर देण्यात आले की, "ज्यावेळी सर्व जातीचे हिंदू लोक अस्पृश्यांना

सर्वत्र सर्व बाबतीत बरोबर रितीने वागविण्यास तयार होतील, आणि ज्यावेळी अस्पृश्य वर्ग सर्व प्रकारचे नोकरीस आपली पात्रता आहे, असे सिद्ध करील, तेव्हां सरकार आपल्या सर्वप्रकारच्या नोकरीची द्वारे त्या लोकांना खुली करून देतील;" या उत्तराने अस्पृश्यांच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षताच मिळाल्या म्हणायच्या. कारण सर्व हिंदू जाती सर्व बाबतीत सर्व ठिकाणी अस्पृश्यांना बरोबरीच्या रितीने वागविण्यास अद्याप किती शतके लागतील, हे भविष्य कोणताही जोतिषी आज बिनचूक सांगेल, असे वाटत नाही. ही सरकारची वागणूक लोकांना मुळीच पसंत नाही. हिंदी जनता सुबुद्ध व्हावी, त्याचे सामाजिक एकीकरण आणि दृढीकरण व्हावे, असे सरकारला वाटणार तरी केव्हां ?

० ० ०

## याबाबतीत आम्ही कायद्याच्याही पलिकडे गेले पाहिजे.

( ता. ८ मार्च १९२९ )

प्राचीन कालापासून ही ओरड आहेच. सामाजिक विषमता खणून काढण्याचे कामी प्रचलित कायद्याचा कांही उपयोग होत नाही. उलट त्याची आडकाठीच येते. कायदा हा नेहमीच अपुरा असतो.

सर्वांना, लहान थोरांना, गरीबाना सुद्धा चोख न्याय द्यावा ही कायद्याची इच्छा असते खरी, परन्तु त्याप्रमाणें घडून येणे कठिण, कारण न्याय देणारा माणूस म्हणजे न्यायाधीश हा अपूर्ण असतो, त्याच्यापुढे येणारा पुरावा हाही तसल्याच अपूर्ण माणसांचा. असल्या अपुऱ्या साधनांनी, अपुऱ्या मनुष्याच्या नेत्रानी, स्वतःच्या ग्रहांनी पूर्वीच झालेला, हा प्राणी बेताबेताने मनोविकाराला आणि मोहाला बळी पडतो. त्य . कडून पूर्ण न्याय मिळणे अशक्य होते. तेव्हां ह्या मर्यादित मार्गांनी आमच्या इच्छा बेताबेताने पुऱ्या होणार. याला उपाय नाही. नेहमीचीच ही रडकथा आहे.

कायद्यालाच हलविले पाहिजे. त्याचीच मुळासकट दुरुस्ती केली पाहिजे. चालू कायद्याला सरकारचे पाठबळ असते. सरकारही अनेकवेळा अपुरेच पडते. अशा प्रसंगी काय करावे हा महत्वाचा प्रश्न आहे.

देवाच्या मूर्तीला बेलाशक स्पर्श करावा असे आह्मी उघडपणे म्हणतो. सरकारही म्हणते, न्यायाधीश म्हणतात. कित्येक समंजस पुजारीसुद्धां या विचाराचा स्वीकार करतात. नव्या विचाराचा वाढता नवा वर्ग हा तर सर्वस्वी देवाच्या स्पर्शाला अनुकूल आहेच. मग आडकाठी राहिली कोठे? याला उत्तर एकच. आणि ते दुसरे तिसरे कोणतेही महत्वाचे उत्तर नसून रूढी या गूढ शद्बांतच आहे. विचार पटतो पण रूढी मोडवत नाही. कायद्याला रूढीची किंमत कळते. रूढी अन्यायाची आहे हे समजते. पण उमजत नाही. लोकांना रूढी मोडण्याचे धैर्य होत नाही. मॅजिस्ट्रेट पिनल कोडाच्या शद्बाबाहेर जाऊं शकत नाही. रूढीचा बंदा गुलाम होऊन, तो आपल्या हातून अन्याय होऊं देतो. असा चोहोकडून कोंडमारा चाललेला आहे. याला पहिला उपाय. सत्याग्रहाचा आहे, याची शिकवण महात्मा गांधींनी आफ्रिकेत सुरू केली. हिंदुस्थानात आणली. खेड, चंपारण्य, बारडोली या ठिकाणी यशस्वी करून दाखविली, तथापि स्वार्थावर पाणी सोडणारे लोक नेहमी थोडेच असणार. कायदा अन्यायाचा आहे, देवीला स्पर्श करण्याचा तुझा हक्क आहे. मद्यपान बंद करण्यासाठी पिकेटिंग करणे हा धर्म आहे, असे कित्येकांनी सांगितले. आणि कांही उदाहरणेही घडवून आणली, तरी हा देह झिजविणेचा मार्ग, कष्ट सोसण्याचा मार्ग, सदैवच आचरणात येईल असा नियम नाही. उच्च भावना सर्वत्र नेहमीच जागृत राहिल्या. त्याची शीग नेहमीच जोराने फडकत राहिली तर राक्षसाच्या नाकांत वेसण घालता आली असती! अन्याय अजिबात नष्ट झाला असता, परन्तु गोष्ट अनुभवास येत नाही. समुद्राच्या भरती ओहोटीप्रमाणें उच्च भावनाही नेहमी चढतात व उतरतात. सत्याग्रहाच्या लाटेची भरती येताच जादूच्या कांडीप्रमाणें सारा भरतखंड विद्युन्मय झाला! स्वार्थत्यागाची डिग्री उंचीच्या आंकड्यावर गेली, सरकारच्या नोकऱ्या, मानाच्या, कोर्टांच्या वकिल्या आणि सरकारच्या शाळा, भराभर सोडून देण्यात जन्माचे सार्थक वाटू लागले; सरकाराला या विचारानी दे माय धरणी ठाय होऊन बसले, परन्तु राष्ट्राच्या महत्वाकांक्षा पूर्ण होण्यापूर्वीच ओहोटीला सुरवात झाली. उच्च भावनेला खळगा पडला, लंबक दुसऱ्या दिशेला पोचला, सत्याग्रहाची थट्टा होऊं लागली, आंकडे मोडीचे विचार सुरू झाले, विचाराचा उर्फ भित्रेपणाचा अम्मल सुरू झाला! शक्याशक्यतेचे शास्त्र उर्फ भागुबाईपणा बोकाळत चालला. आणि उलटी दिशा अखेर अशा परमावधीला पोचली की साधे अर्थशास्त्रसुद्धां कळेना, राष्ट्रहित करवेना, जातिभेद धर्मभेदाचा सुळसुळाट झाला, कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही अशी दैन्यावस्था आली. स्वार्थाचे गुणच गाण्यांत येऊं लागले, आणि साधी रहाणी व उच्च 'विचार सरणी' हे एक पुराणातले वांगे शास्त्र होऊन बसले.

जगांत सत्य भरुन राहिले आहे. जगाचा ओघ पुढे चाललाच आहे

रूढीवाले लोकही समतेचे तत्व कबूल करतात. परन्तु त्यांचे पोट पैसा, सवयी, सुखाची लालसा, ही त्यांना समतेच्या मार्गाने जाऊं देत नाहीत. लोकांचे विचार कधी मरत नाहीत, कांही दडपून जातील परन्तु पुन: ते पेट घेतातच ! साधुसंतांच्या विचारातसुद्धां उत्क्रांती होत आहे. पूर्वीचे थोर लोक आणि आजचे थोर लोक यांतही अंतर दिसून येते, तुकाराम महाराज एका देवाच्याच ध्यानी लागले. प्रपंचाकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. शिवाजी महाराज हे साधूही होते. महा नीतिमान होते, आणि उत्तम प्रापंचिकही होते. अग्रभागाला गेलेला पुरुष व्यापक विचाराचा दिसून येतो, स्वामी रामतीर्थ ब्रह्मानंदात मग्न असतच परन्तु व्यवहा- रातही ते मागे नसत. उदयोन्मुख राष्ट्राला प्रत्येक बाबतीत स्वावलंबन पाहिजे हे तत्व ते मान्य करीत, खादी परिधानाचे तत्व मान्य करुन ते आचरणातही आणित असत. स्वामी विवेकानंदांच्या धर्मतत्वाला हिंदुस्थान पुरेनासा झाला समतेचे तत्व त्यांनी अमेरिकेत नेऊन पोचविले. महात्मा गांधी तर आज सर्वच बाबतीत समतेचे आणि स्वातंत्र्याचे तत्व पुकारीत आहेत. समान हक्काची पायरी त्यांनी सर्वांना दाखविली, त्यांचा स्वराज्याचा अर्थच अमर्याद आहे. प्रत्येक बाबतीत पूर्ण स्वावलंबन हाच त्यांचा माटो आहे. खादी हे स्वातंत्र्याचे दर्शक आहे. व्यक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य आहे, अस्पृश्यता हा मानव जातीचा उपमर्द आहे. धर्मभेद जातिभेद हे भेदा भेदाचे जाळे, धर्मालाही नाशक आहे ! व देशालाही घातक आहे. त्यांचा संदेश एका हिंदुस्थानालाच आहे असे नाही. तर फ्रान्स जर्मनी या सारख्या पाश्चात्य राष्ट्रालाही त्यांचे विचार इतके पटत आहेत की, महात्मा गांधी हे खरेखुरे दुसरे कोणी नसून येशूख्रिस्ताचे पुनरावतार आहेत. आणि बाय- बलातील नव्या करारातले सिद्धांत प्रत्यक्ष आचरणाने जगांपुढे मांडीत आहेत असे पंडितांचे म्हणणे आहे. परन्तु आह्मा अभाग्याना त्यांची किंमत नाही, दुर्भाग्य! लोकांना सुबुद्धी सुचत नाही. आणि म्हणूनच स्वार्थी लोकांकडून त्यांची अवहेलना होत आहे. थोर पुरुष हे विचार क्रांतीचे निदर्शक आहेत. त्यांचे मत अनुसरणारे लोकांची संख्याही वाढत जाणार खास. नकळत आणि बोभाटा न करता या लोकांच्या विचाराचा ओघ नव्या मार्गाने जात राहणार, सत्पुरुष जसे जगाचे निदर्शक तसेच जगही सत्पुरुषाचे अनुचर बनत राहणार. देहावर सत्ता चालेल. राजाकडून शिक्षा होईल, उच्च वर्गीयांकडून मानखंडणा होईल. बरोबरीचे व कमकुवत लोकांचेकडूनही सज्जनांची निराशा होईल, परन्तु कांही झाले तरी सम- तेच्या विचाराची शक्ती जबरदस्त असते. प्रश्न काय तो काळाचा आहे. महायुद्धाने युरोपातील उच्चनीच भाव नाहीसे करून बुरुज तटबंदी पाडून टाकली. समान

हक्काचा वारा सारखा वाहू लागला. तीच स्थिती हिंदुस्थानातही होणार. राजकीय बाबीत हळूहळू कां होईना, पण या तत्वावर कारभार चालू आहे. धर्मभेद खोटे वाटू लागले आहेत. त्यात पोर खेळाचे डोके फुटणार, जातिभेदाचा कपाळमोक्ष होणार, गुणकर्म विरहित केवळ जन्मावर उभारलेली मरतुंगडी सोवळेशाही आणि अरेरावी आणि मगरुरी, मिजास ही खास धुळीस मिळणार यात कांही शंका नाही.

★ ★ ★

# पुरुषार्थकार सातवळेकर व आम्ही

( ता. २६ मार्च १९२६ )

बागल यांनी मराठी शद्ब न वापरता " हंटर, " " के. जी. " बागल, " मॅनेजर, " " इस्टेट " हे इंग्रजी शद्ब वापरले आहेत. म्हणून आह्मांस दोष दिला आहे. मुद्दा सोडून आमचे मित्रानी हा वाया उपद्व्याप केला आहे. व्यवहारात आलेले इंग्रजी शद्ब वापरण्याने अर्थात कांही बिघाड होतो, असे आह्मांस वाटत नाही. मग अस्पृश्य निवारणाचे कागदी ठराव करणाऱ्या ब्राम्हण वर्गाला चार दोन इंग्रजी शद्ब वापरण्याने मराठी भाषेला विटाळ होतो, असे वाटत असल्यास नकळे. सोवळे शाहीला भाषेचासुद्धां विटाळ होणे हे त्यांच्या संस्कृतीस धरुनच आहे. यापेक्षा या मुद्यावर जास्त लिहिण्याची गरज आह्मांस वाटत नाही.

" मागासलेल्या लोकांची दिशाभूल " कोण करीत आहे. हे तो वर्ग जाणण्याला आता समर्थ झाला आहे. बाकी जनकाची आणि त्या बरोबर ब्राम्हणेतर वर्गाची निंदा करण्याचा प्रयत्न आमचे मित्र कसे करीत आहेत, हे कोणीही पहावे. श्रीयुत सातवळेकर, जनकादि राजाना केवळ 'तुटपुंजे' ज्ञान झाले होते, असे म्हणतात. आणि या विद्येन ब्राह्मणालाच काय तो मान होता; क्षत्रियाला तो कोणत्याही कालांत मिळाला नाही. असे म्हणतात. हे विधान वाचून आह्मांला अगदी नवलच वाटले.

वैदिकाना ज्ञानाचा गर्व फार मोठा, आणि याच कारणासाठी श्रीकृष्णानीही भगवत्गीतेत या वैदिकांच्या कर्मकांडावर कोरडे ओढले आहेत.

" ब्रह्मज्ञान क्षत्रियापासूनच ब्राह्मण शिकले. " असा आमचा सिद्धांत आहे. आणि त्याबद्दल आधार म्हणून उपनिषदांतील जनक आणि याज्ञवल्क्य, जैवली व श्वेतकेतू यांची गोष्ट संक्षेपतः बाबू रमेशचंद्र दत्त यांच्या ग्रंथावरुन दिली होती पण आमच्या मित्राना तो आधार बरा वाटत नाही. ब्रह्मज्ञान याचे दोन अर्थ आहेत. एक वेदाचे ज्ञान व दोन ब्रह्माचे ज्ञान याबद्दल आमचीही फारशी तक्रार नाही. वैदिक ज्ञान हे ब्राह्मणांचे, आणि त्याचा त्यांना लखलाभ असो. पण ब्रह्मज्ञानाचा दर्जा वेगळा आहे. शब्दांचे अवडंबर, यज्ञाचा ढिगारा आणि मंत्र–तंत्राचा फवारा, ही खास पुरोहिताची इस्टेट, या वर्तुळाबाहेर त्यांनी डोकाऊ नये. मानसिक थोरपणा, खरे औदार्य, देहसुखाची विरक्ती, संसार सुखाचा सन्यास, आत्म्याची गती, व खरा निष्काम कर्मयोग जर पहावयाचा असेल, तर तो केवळ क्षत्रिय परंपरेतच पहावयास मिळेल. विवस्वान, विदेही राजा जनक, मनु, इक्ष्वाकु म. गौतमबुद्ध, या राजर्षि परंपरेतच दिसून येईल. आणि तीच परंपरा ऐतिहासिक काळात राणा प्रताप, श्री. शिवछत्रपति आणि रंजले गांजलेल्यासाठी आयुष्य खर्ची घालणारे नुकतेच निजधामास गेलेले श्रीशाहू महाराज, असा उज्वल इतिहास या तारखेपर्यंत क्षत्रियांनी कायम ठेवला आहे. असे असून आमचे मित्र वृथाभिमानात तिकडे काना डोळा करून, ब्राम्हणांचा कैवार घेत आहेत. हे पाहून खरे काय आहे, याचा विचार वाचकानीच करावा. यांच्या जोडीला दुसऱ्या पारड्यांत वाटेलतर ब्राम्हण ऋषींची ? नामावळी वाचावी. ते बली शत्रू वामन, क्षत्रियांचा निःपात करणारे परशुराम, त्यांचे वडील जमदग्नी, तपस्वी दुर्वास ही मंडळी आणि त्यांचे एकएक गुण आणि प्रताप पाहिले म्हणजे आमचे मित्र सातवळेकरसुद्धां लज्जेने तोंड मागे फिरवतील आणि त्यांचा डंका जगांत वाजत असेल तर तो कोणत्या पराक्रमासाठी हेही जग जाणत आहे.

यांची कृत्ये फार पुण्याईची ; नऊ महिने नऊ दिवस ज्या आईने याला आपल्या पोटी पाळले, त्या आई रेणुकेचा गळा याने कुऱ्हाडीनें तोडला.

आणि तो हाकनाक. जमदग्नी यांचे तीर्थपुरुष. त्या जमदग्नीचा, क्षत्रिय कार्तवीर्यांचे मुलांनी खून केला. यामुळे यांनी प्रतिज्ञा करून, क्षत्रियांच्या निःपाताला हे लागले. २१ वेळा यांनी क्षत्रियांचा निःपात केला म्हणे! असे जे आहे ते पुराणें सांगत आहेत, क्षत्रियांचे रक्ताचे पांच प्रचंड डोह याने तयार केले. आणि त्या रक्ताचे ओंजळीचे आपल्या बापाला परशुरामाने तर्पणाने पाणी पाजले. अखेर

क्षत्रियांचे हत्येचे पातक धुवून टाकावे म्हणून सर्व पृथ्वी कश्यपाला दान दिली. ( नाहीतर या भटजीला राज्य कसे चालविता आले असते, देव जाणे.) कश्यपाने तीच पृथ्वी पुन्हा क्षत्रियांचे ताब्यात देऊन टाकली. एवढाच परशुरामाचा अट्टाहास सर्व फुकटा फुकटी फसकीतच गेला! कश्यपाने परशुरामाला आज्ञा केली की, " तू घातकी आहेस." या उप्पर तू या पृथ्वीवर राहूं नकोस. कोठेतरी दुसरीकडे चालता हो." या डिक्री प्रमाणें परशुराम एखाद्या बहिष्कृत रक्तपित्याप्रमाणें महेंद्र पर्वतावर निघून गेला. या ईश्वरी अवताराच्या आईबापाचे श्राद्धप्रसंगी एकही ब्राम्हण मिळाला नाही. म्हणून समुद्राच्या चित्तास्थानी आढळलेल्या कोळ्यांना चितपावन ब्राह्मण बनवून त्यांच्याकडून श्राद्धविधी उरकला. ही पुण्य कथा लक्षांत घेऊन, परशुरामाची राज्याला नालायखी, कश्यपासारख्या ब्राम्हणास आलेला त्याचा तिटकारा, त्याचा भिक्षुकी खुनशीपणा, आणि त्याला झालेली काळे पाण्याची शिक्षा, हल्लींच्या ब्राम्हणाला शोभाच आणणारी आहे.

० ० ●

## पुरुषार्थकार सातवळेकर यांची देवस्थाने.

(ता. १ आक्टोबर १९२६)

जगांत प्रगती वाटेल तितकी होते. बैलगाडीचे वाहन संपून आकाशयानाने थोड्यां तासात जाता येतो.

ब्राह्मण वर्गांचा रूढीचा गाडा, आणि सोवळयाची मगरमिठ्ठी हिच्यात काडीचीही हालचाल होणे शक्य नाही ! " सर्व सुधारणा परस्पर होवोत, माझ्या हक्काला कोणी धक्का लावता कामा नये." मग तो देव गोकर्णांचा असो, नरसिंहवाडीचा असो, नाहीतर करवीर निवासिनी असो ? क्षत्रिय राजा झाला म्हणून काय झाले ? त्याची पायरी जन्मानेच सटवाईने पांचवीला ठरवून दिली आहे ! ते १० लाख लोकांवर राज्य करोत. देवता त्यांचीच असो. देवालय जैनांचे असो, नाहीतर बुध्दाचे असो बांधणारे मजूर असोत, पैसा ब्राम्हणेतर रयतांचा असो, देव साऱ्या जगाचा असो, देवाला स्पर्श एका ब्राम्हणावाचून कोणीच करावयाच नाही ! त्याने देव भ्रष्ट होतो; देवालयात भ्रस्टाकार होतो ! ब्राम्हणांचे देवीवर ( व्हेस्टेड राइटस ) हक्क उत्पन्न झाले आहेत ! आणि जगाची प्रगती कशीही होत असो, समाजात दुफळ्या होवोत नाहीतर शंभर फळ्या होवोत. ब्राम्हणांचे ते ब्राम्हणांचे, छोडणेकी बात नहीं ! वाटले तर राजाने दुसरे देवालय बांधावे, " .

अशा अर्थांचे विचार आंधकर सातवळेकर आपल्या पुरुषार्थांतून प्रगट करीत आहेत, योग्यच आहे. एका जातीचा श्रेष्ठपणा कायम ठेवणेसाठी साऱ्या समाजाचे वांगे झाले आणि देशाचे भरीत झाले तरी त्याची पर्वा पुरुषार्थकारांना काय ? देवी कोणाची ? ब्राम्हणाना तिचे हक्क दिले आहेत, असे कोणी सांगितले आहे ? देवस्थानाचे कामी ब्राम्हणानी तीनचवल कधी खर्च केले आहेत ? आणि देवाच्यापुढे आपणच आसन मांडी घालून, गंजीवरच्या कुत्र्याप्रमाणें इतर जातीच्या भक्तावर भंकत सुटण्याचा सनदशीर हक्क, एका ब्राम्हण वर्गाने कोणच्या बादशहाकडून मिळविला आहे, ती दाखले नक्कल तरी एकवार जगापुढें मांडावी ! महालक्ष्मी ही एका कोल्हापूरची नव्हे. ती दक्षिण काशी आहे. सारा हिंदुस्थान तिचा भक्तगण आहे. हे आह्मांला पक्के ठाऊक आहे. करवीर राज्याबाहेर भक्त आहेत. एक ब्राम्हणच तेवढे देवीचे लाडके, आणि त्या लाडक्या पुत्रांवाचून, बाकी सर्व लोक तिच्या सवतीची मुले आहेत, असे ती देवी खास मानीत नाही. ब्राम्हणेतर हिंदूनी देवीस अभिषेक करावा हा त्यांचा हक्क आहे. हा प्रश्न केवळ कोल्हापूरचा नाही. तो साऱ्या महाराष्ट्राचा आहे. " आह्मी देवळात नको काय ? आह्मी म्हणतो तुह्मीच नको. " आमचे डोळ उघडले नव्हते.

" ब्राम्हण म्हणजे आकाशातील देवाचें पवित्र आत्मे. " असली वेडगळ समजूत होती. ब्राम्हण आपल्या शापे करून क्षत्रियाना " जे है ते " एका क्षणात भस्म करून टाकतील, असला भ्रम आमचे डोक्यात होता ; तोपर्यंत " जाऊं दे की " म्हणून या बाबीकडे दुर्लक्ष केले. तोच हा वर्ग आमचेवर फिरून पडला. आणि आमच्याच दक्षिणेवर, आमच्याच अन्नावर चांगला पुष्ट होऊन आमच्याच अंगावर शिंग उगारू लागला, तर त्याच्या मस्तकावर लगुड प्रहाराशिवाय दुसरा काय उपाय आहे ! श्रीमत् राजाराम छत्रपति महाराजांनी देवीस अभिषेक केला खास, आणि वैदिक शाळेतील मराठा विद्यार्थ्यांनी स्पर्श पूर्वक पूजा केली खास, सातवळेकरांच्या दृष्टीने गुन्हा घडला. फिर्यादिची कामगिरी ब्राम्हण वर्गावर. पुराव्याचा बोजा त्यांचेवरच, तेव्हां या रूढीच्या हक्काचा न्याय निवाडा एकदा हायकोर्टापर्यंत आणि शक्य तर प्रिव्ही कौन्सिलपर्यंत नेऊन फज्जा पुरवावा. ह्मणजे पुरुषार्थकारांचे " मनाची हौस तरी एकदाची फिटेल ! " ब्राम्हणेतर समाज आरोपीच्या पोझीशनमध्ये आहे. त्याला कांही कर्तव्य नाही. " माझ्या देवाला मी भेटलो. हा माझा कबूल जाब. " होईल तो निर्णय, आणि ठरेल ती शिक्षा भोगण्यास समाज तयार आहे. आता पुरुषार्थाच्या मुखपृष्ठावर क्षत्रियाचे चित्र दिसत नाही. क्षत्रियाचे निशाण हाती धरून, पुन्हा क्षत्रिय राजावर शिव्याशापाचा वर्षाव

करण्यास अडथळा येईल, म्हणून क्षत्रियाचे चित्र कमी केले आहे काय ? किंवा कुजक्या " नंदांतं क्षत्रियकुलं " या स्मृतीप्रमाणें सारा क्षत्रियवर्ग नष्ट झाला तर सातवळेकरासारख्या ब्राम्हणानी पुन्हा आपल्या मासिकावर तरी क्षत्रियाचा पुनरावतार कसा होऊ द्यावा ? काही असो, ही एक आडकाठी दूर झाली. आता आमची एक त्याना शिफारस आहे. आणि ती हीच की, वामनाचे देवालय कोठे दिसत नाही. आणि बलीसारख्या पुण्यप्रतापी क्षत्रियाला केवळ औदार्याच्या गुन्ह्याबद्दल त्याला पाताळात घातले, त्या वामनाच्या शतकृत्याचे स्मारक म्हणून सातवळेकरानी आपल्या मासिकाच्या मुख पृष्ठावर वामनाचे चित्र फडकवीत ठेवावे !

० ० ०

## ब्राह्मणशाहीची वामनी तुतारी !

( २२ आक्टोबर १९२६ )

श्रीयुत सातवळेकर हे जाडे वैदिक विद्वान आहेत. त्यांनी "स्वधर्माची" अर्थात ब्राम्हणी धर्माची कलगी आपल्या पुणेरी पगडीत खोवली आहे. मुख–पृष्ठावरील क्षत्रियाचे चित्र " ओंगळ " ठरवून त्यांनी बाजूस टाकले आहे. वामन अवतार एका हातांत आणि ब्राह्मणशाही दुसऱ्या हातांत घेऊन, क्षत्रियांचा पाणउतारा आणि भटशाहीचे गौरव करण्यासाठी त्यांनी आपली ज्ञान ज्योत बाहवत ठेविली आहे. त्यांचे भाषाचातुर्य, शिव्याशापाची वडलार्जित देणगी आणि गाली कौशल्याचे पोतडे जर पाहायचे असेल तर पुरुषार्थ क्रमांक २·१ पहावा. म्हणजे अद्यापही ब्राम्हणवर्गाची 'वचसि' श्रीमंती किती भरून राहिली आहे, हे कळून येईल. तितक्या प्रमाणांत त्यांचे अनुकरण करणे आह्मास शक्य नाही. त्यावर वामन परशुरामी वंशजांचाच खास वारसा हक्क आहे !

वामनावतार :– श्री. सातवळेकरांनी येथून तेथन आपल्या कथानकाला भागवत ग्रंथाचा आधार दिला आहे. क्षत्रियांनी उपनिषद्, आरण्यके, महाभारत, वगैरे ग्रंथातून कोठेही पहा. तेथे सर्वत्र क्षत्रियांचा जयजयकार आहे आणि त्या क्षत्रियांना जगाने परमेश्वर अवतार मानले. हे योग्यच झाले.

त्या क्षत्रियांच्या जोडीला अखिल दुनियेत कोठेंही जोड मिळणार नाही ! पुरोहित वर्गाच्या कुशीतून असले दैदीप्यमान हिरे निपजणेंच अशक्य. ती खाणच वेगळी.

विष्णूच्या अवतारांत आपले ब्राम्हणी अवतारही ठेवून द्यावेत, अशीं बुद्धी ब्राम्हणाना झाली आणि हा अलौकिक वामनपरशुरामाची जोडी कुजक्या डोक्या-तून निघाली ! वेअकली शिल्पकार करावयाला गेला गणपती पण होऊन बसले माकड. असली ब्राम्हणी अवताराची दुक्कल पुराणी गोधडीतून निघाली खरी, पण त्यांची डाळ कशी शिजणार ! श्री. रामकृष्ण, आसेतुहिमाचल आबालवृद्धांना वंदनीय झाले, त्यांच्या धवल कीर्तिला आणि प्रसाराला, भरतखंड पुरेना. समुद्र उल्लंघन करून जावा, सुमात्रा, कंबोडिया अशा द्विपांतरीसुद्धा श्रीरामकृष्णांची देवालये आज गाजत आहेत. वामन अगर परशुराम यांची देवालये त्यांच्या जन्म-भूमीत तरी कितीशी दिसतील ? श्रीमत् भागवताच्या भटी भाकडकथांत, त्यांची वर्णने खोटीनाटी वाटेल तशी लिहिली तरी जनतेची अक्कल कांही गेलेली नाही. एखादे देवालय कोठे असेल नसेल तर ते श्री. सातवळेकरांसारख्या क्षात्र द्वेषी ब्राम्हणांच्या विशाल नगरीत असेल !

भागवत हा आधार नव्हे :– वामनावताराला मुळी थांग ना पत्ता. ती एक कल्पित कादंबरी आहे. विष्णुने आपल्या तीन पावलांनी तिन्ही लोक व्यापून टाकले. हा ऋग्वेदांत एक उल्लेख आहे. त्या आधारावर हे वामनी नाटक रचले आहे. ( ज्ञानकोश भाग ७ पांन ते६९ ) श्री राम व श्री कृष्ण हेच कायते हिंदु-धर्मामध्ये पूर्ण अवतार आहेत. परन्तु ही वस्तुस्थिती भटशाहीला खपेना, म्हणून भागवतासारख्या पूर्ण ब्राम्हणी ग्रंथात, ब्राम्हणी वर्चस्व स्थापन करण्याच्या हेतूने, वामन आणि परशुराम हे काल्पनिक अवतार घुसडून दिलेले आहेत. म्हणून अशा गोष्टी शाबीत करणेच्या तर त्याला महत्वाचा तसलाच दस्तऐवजी पुरावा यावा लागेल. भागवत ग्रंथ हा केवळ भक्तिप्रेम प्रधान ग्रंथ आहे. म्हणून हा आधार अशा कामी बाजूस ठेवावा लागेल.

श्रीयुत ऋग्वेदी काय म्हणतात :–यांनी आर्यांच्या सणाचा इतिहास लिहिला आहे. ते म्हणतात "बली हा पूर्वकाली एक मोठा विख्यात चक्रवर्ती राजा होऊन गेला. तो पापभिरू व सदाचरणी असून त्याच्या दातृत्वाची कीर्ति दिगंवत पसरली होती, प्रजा आनंदाने त्याच्या सत्तेखाली सुखसमृद्धी भोगीत होती. देवा-नाही तो त्रास देत नसे देव व दैत्य किंवा सुर व असुर हे भाऊबंद असुन त्यांच्यात वारंवार लढाया होत. बली हा सद्धर्मनिष्ट होता, प्रजा संतुष्ट व राजनिष्ट होती.

तरवारीच्या जोरावर त्याला जिंकणे देवालाही शक्य नव्हते. म्हणून देवांनी कपट-नीतीचा अवलंब करून, आपला हेतू तडीस नेला. ही गोष्ट वेदकाला पूर्वीची आहे. आणि पुढे बराच काल लोटल्यावर, अस्तित्वात आलेल्या वेदात, हीच गोष्ट वेगळचा रीतीने सांगून विष्णूनी तारीफ केली आहे." या कथेपासून कुटिलनीति, कपट नाटक, आणि विश्वासघात कसा करावा, हे मात्र चांगले शिकता येण्याजोगे आहे.

वामन द्वारपाल झाला म्हणजे काय ?:– इतका अट्टाहास केला. अक्राळ–विक्राळ स्वरुप दाखवले आणि शेवटी मिळविले काय? दाराजवळची जोडे पायतान संभाळण्याची जागाच ना! आणि कायमची गुलामगिरी! बरे देवांनी दैत्यांचा पाडाव केला. आणि पुढे सिंहासनावर कोण बसला? एखादा वामनी ब्राम्हणी बच्चा बसला नाही. किंवा त्याला प्रधानकीही मिळाली नाही. अखेर गादीवर त्यांचा सवाई पराक्रमी बाणासूरच बसला. या बली वामन झगड्यांत ब्राम्हण आणि क्षत्रिय यांच्या मनोवृत्तीचे चित्र मात्र चांगले रेखाटल्याचे दिसते. एखादे नीच कृत्य करावयाचे असेल, अधमपणाचा स्वार्थ साधावयचा असेल, विश्वासघाताचा गुन्हा करावयाचा असेल, तर तसल्या कृष्णकारस्थानाला सोंग घ्यायचे असेल, ते देखील एखाद्या खिरटलेल्या, भिकार भट पोराचेच घेणे जरूर. आणि म्हणूनच विष्णुनी असले दिव्य सोंग घेऊन आपल्या कौटि–ल्यास आरंभ केला. (ठाकरे कृत ' भिक्षुकशाहीच्या बंडातील ' आधारावरून)

असली कुटिल नीति कोठे कोठे पचते :– आणि याच शठनीतीचे उदाहरण पुढे ठेवुन, ब्राम्हणी कारवाई पुढे झाली. नंदराजाचे वेळी चाणक्यांनी असलाच-दुष्टपणा करून, एका राजघराण्याचा नाश केला आणि आपल्या कौटिल्याचे उदाहरण कायमचे लोकांपुढे ठेविले. छत्रपतींच्याच गादीला लाथ मारून, अलौकि-बेईमानी करून दाखविली ! त्यांचीच विद्या त्यानाच पुढे फळली. दुसऱ्या बेई–मानी चित्पावनांनी, त्याच पेशवाईला लाथाडून स्वराज्य निखाऱ्यावर ठेवले. हेच वामन अवताराचे शिक्षण व श्रीयुत सातवळेकरांची शिकवण !

हंटरकार बागल हे कुणबीच आहेत ।– त्यांना निर्वाहाला त्यांचे मनगट समर्थ आहे. नोटीसा भरून, पोटभरण्याची आठवण पुरुपार्थकाराना आपल्या भाऊबंदाच्या प्रतापावरून होत असेल. ब्राम्हणांनी आपला मूळचा मांत्रिकी धंदा, पुरोहिती लटपटशाही आणि परगुणगानाचे भाटशास्त्र, एवढेच करून पोट जाळले असते तर बरे होते. परन्तु हा त्यांचा वैदिक शास्त्रसिद्ध पुरातन मार्ग सोडून, राजकारणांत नाक खुपसण्याचा अव्यापारेषू व्यापार करण्यास प्रारंभ केला, म्हणजे शेतकऱ्याला "हंटर" हाती घेणे भाग पडते. आणि पाठीवर चारदोन

चांगले तडाखे देऊन, त्यांना ताळ्यावर आणणे अगत्याचे होते. ब्राम्हणांनी कधी राज्ये कमावली नाहीत. कधी चालवली नाहीत. राज्यकर्त्यां क्षत्रियांचा मत्सर करून त्यांचा जन्म गेला. फसवेगिरीने त्यांना लूबाडण्यात त्यांचे आयुष्य गेले.

० ० ०

## पुरुषार्थकार आणि रोटीबेटी व्यवहार

(ता. २९ जुलै १९२७)

पुरुषार्थकांराचे म्हणणे रोटी बेटी व्यवहारामध्ये कांही महत्व नाही. कारण काय, तर जर्मन, इंग्लिश, फ्रेंच यांच्यात रोटी बेटी व्यवहार असूनही युद्धे होतच आहेत. आणि ज्यांच्यात हा व्यवहार नाही, त्यामध्ये सलोखा आहे" विचारसरणी शक्य तितकी भ्रामक आणि फसगत करणारी आहे. मानव जात एकत्र करण्याला अनेक बंधने असतात. एक धर्म, एक इतिहास, एक भाषा, एक कायदा, एक शास्त्रे ही आहेतच. पण याशिवाय एकत्र खाणे, जेवणे व बेटी व्यवहार होणे ही मोठी बलवान साधने आहेत. आज देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे याचा नुसता रोटी व्यवहार होत आहे. तरी त्यांचा एक गट बनला आहे. आणि यांच्यात जास्त बळकटी येण्यासाठी बेटी व्यवहाराचे प्रयत्न चालू आहेत. सारस्वत वर्ग हा अगदी पूर्णपणे ब्राह्मणच आहे. परंतु त्यांचा वरील स्त्रीवर्गाशी बेटीव्यवहार होत नाही. यामुळे तो वर्ग वेगळा झाला आहे. त्यांचा सलोखा तितका नाही. आज ब्राह्मण संघटना करण्याचा विचार चालू आहे, त्याचा अर्थ काय? पोटजाती मोडणे म्हणजे तरी कांय ? त्या पोटजातीत बेटी व्यवहार सुरु करणे, असाच अर्थ नाही काय ? आणि बेटी व्यवहारा शिवाय दुसरा भेद तरी राहिला आहे कोठे ? जेवणे न जेवणे, बेटी व्यवहार करणे न करणे यातच उच्चनीचपणाचे विष भरून राहिले आहे. इंग्लिश, जर्मन, फरेंच यांचे राष्ट्रिय हितसंबंध, पैशाचे नफा नुकसान आणि व्यापारी हिताहित ही समोर येतात, तेव्हां त्या कारणाने लढाया होतात. परंतु ही कारणे नसतात तेव्हां ही एकरुप असतात. साऱ्या युरोपखंडात ख्रिस्ती राष्ट्रे आहेत. फक्त टर्कीच काय ते एक परधर्मी आहे. धर्म भावनेला आजपर्यंत प्राधान्य होते. यासाठी टर्की त्यांच्या डोळ्यात सलत होता. तो कांटा नाहीसा करून टाकावा म्हणुन सारी राष्ट्रे एकोप्याने यत्न करीत होती.

पुरुषार्थकारांची विचारसरणी कशी चुकीची आहे ती पहा, एखाद्या कोर्टास पक्षकाराचे निरिक्षण करा त्यांत मराठे मराठे, जैन जैन, लिंगायत लिंगायत मुसलमान मुसलमान, एकमेकाविरुद्ध खडा दावा मांडीत असतात. त्यांच्यात वितुष्ट असते. ते वारस वादी एक जातीचे, एक धर्माचे, एक भाषेचे असून सुद्धा वैरी होत आहेत. यावरून, जाती भाषा धर्म यात कांही अर्थ नाही, असे अनुमान काढले तर श्री. सातवळेकर काय म्हणतील ? उत्तर इतकेच आहे की, द्वेषाला अनेक कारणे असू शकतात. खासगी नफानुकसानीची बाब आली म्हणजे सख्या भावाशीसुद्धा तंटे होतात हे खरे. परतु त्यावरुन रक्त संबंधात कांही अर्थ नाही. असे कसे म्हणता येईल ? स्नेह जडण्याला जी सुभाषितकारांनी सहा कारणे सांगितली आहेत. त्यात "भुंक्ते भोजयते" ही दोन कारणे महत्वाची सांगितली आहेत. एखाद्याला बरोबर घेऊन भोजन करणे आणि त्याचे घरी आपण भोजनास जाणे हे महत्वाचे मित्र लक्षण आहे. परंतु आजची समाज रचना अशी घाणेरडी झाली आहे की, एखादा अस्पृश्य डॉक्टर असो, बॅरिस्टर असो, कमालीच्या स्वच्छतेने वागणारा असो, तो ब्राह्मणांच्या पंक्तीला अपात्र ठरतो! आणि मळकट, घामट व अनीतिमान ब्राह्मणसुद्धा वेलाशक पंक्तीत येऊन बसतो तो खपतो आणि कर्मठ ब्राह्मणही त्याच्या विरुद्ध ब्र काढू शकत नाही, ही व्यस्त रुढीच आज समाजाचे तुकडे करीत आहे.

हिंदूधर्माची जातीची उतरंड पहा. सामाजिक बाबीत ब्राह्मण वर्ग मुसलमानाना आणि मराठ्यांना तितकाच मानतो. आणि खरे पाहु गेले तर या जातीच्या घाणीमुळे मराठा आणि मुसलमान यांच्यात आज जितके अंतर आहे, त्यापेक्षा मराठा आणि ब्राह्मणात जास्त आहे. तुसड्या, वैदिक, याज्ञिकी, सोवळ्या संस्कृतीत (?) गुरफटलेल्या श्री. सातवळेकरांना या परिस्थितीची कल्पना येणे कठीण आहे. म्हणून बागलाना त्यांनी शिव्या द्याव्यात हे ठीकच आहे. आणि त्यांच्याच गलिच्छशाहीत जन्मास आलेले परंतु स्वतंत्र विचाराचे जोरावर तिला लाथाडून मोकळ्या मैदानात पडलेले श्रीयुत देवधर यांच्या नावाने खडे फोडण्यात "पुरुषार्थ मानणारे श्री. सातवळेकर खुशाल बोटे मोडोत ! आत्मघातकी आणि अज्ञानी कोण ? आणि समाजात फाटाफूट करणारे कोण ? याचा सूज्ञ लोक विचार करतीलच. मुसलमान आणि मराठे हे आज मनगटाने बरोबर आहेत. ते एकमेकांना पूर्ण जाणतात. दोन सपाटे देतील तर दोन घेतील. तो जोर ब्राह्मणांचे मनगटात असता तर "काटी लाठी आणि नमस्काराची हाकाटी" हिंदूमहासभेने भिक्षुकशाहीपुढे का केली असती ?

# सातवळेकरांचे तांबे शास्त्री

(ता. २८ आगष्ट १९२५)

पुरुषार्थ मासिकात तांबे शास्त्रीबुवांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांचा समाचार न घेणे म्हणजे त्यांचा अपमान केल्यासारखे होईल.

पहिली रडकथा हल्लीची सुधारणा घाईने होत आहे. तेव्हां तशी न करता ' मुंगीच्या चालीने ' करावी. आणि कोणाच्या ' अंतरास धक्का न लागेल. ' अशी वागणूक ठेवावी. आह्मी शास्त्रीबुवाना विचारतो की, आज दोन हजारावर वर्षे होत आली. तूम्ही कोणाला धक्का दिला नाही. आणि मुंगीच्या पायाने चालत आलात. पण या सुधारणेच्या दृष्टीने इतक्या कालात तुमचे पाऊल एक तिळभर तरी पुढे गेले आहे काय ? उलट अस्पृश्यांचे दारिद्रय आणि गळचेपी दिनदीन वाढतच गेली. तेव्हा हा हळुं हळुंचा मार्ग म्हणजे न करणाऱ्याचा शनवार आहे.

अस्पृश्याबद्दलच्या चळवळीने जर कोणाचे ' अंतरास ढका ' लागत असेल तर तो कूप मंडूक भटजीना. त्यानी ढका लागल्याची काळजी घ्यावी. आणि इकडे हजारो वर्षे काळयापाण्याचे शिक्षेने पशूच्या स्थिती पर्यन्त पोचून अस्पृश्यांची प्राणांतिक अवस्था होत आहे. या ' महारक्यांची ' वाट काय ? तेव्हा या भटजीना ढका लागणेची आह्माला आता परवा नाही परंतु शास्त्री बुवानी एक अजब शोध लावला आहे. आणि तो खरोखरीच युरोपीयन जर्मिनॉलजिष्टच्या (कृमीशास्त्रवेत्ते) प्रयोग शाळेकडे पाठवून दिला पाहिजे तो शोध असा: अस्पृश्यांना खरजेसारखा स्पर्शरोग झालेला आहे. आणि या खरुजले मुलास मिठी मारली तर आपणासही खास खरुज होईल. शास्त्रीबुवानी आमच्या कल्याणासाठी ही ' अलार्म बेल ' आह्मास दिली म्हणून बरे झाले. नाही तर येथून तेथून सर्वच खरुजल तट्टाची पागा व्हावयाची. आम्ही तुम्हाला विचारतो अस्पृश्यांना शारिरीक, मानसिक, नैतिक यापैकी कोणता स्पर्शजन्य रोग झाला आहे. ? शारिरीक रोग म्हणावे तर एकटा महार शास्त्रीबुवासारख्या चौघाना भारी होईल. नुसते मनगट धरील तर पाणी मागू देणार नाही, मानसिक रोग म्हणावा तर कॉलेजमधून कित्येक अस्पृश्य विद्यार्थी आपल्या बुद्धीने तेजस्वी झाले आहेत आणि याच खाणीतून डॉक्टर आंबेडकरासारखे विद्वत्‌रत्न शास्त्रीबुवाचेही डोळे दिपवतात! अस्पृ-

त्यांच्या नीतिमत्तेला रोग झाला आहे म्हणावे तर श्री क्षेत्र पंढरपूर येथील अनाथ बालाश्रमाचा पुरावा कोणाची नीतिमता कुजलेली आहे याची साक्ष देत आहे.

म्हणून शास्त्रीबुवा, आम्ही तुम्हास नम्रपणे विनंती करतो की, कार्य करणारे माणसांचे तरी आडवे येऊ नका ' गप बसण्यास काय घ्याल, ' तुम्ही आम्ही मिळून महारवाड्यात जाऊन त्यांच्यात मिळून मिसळून काम केले पाहिजे, नुसत्या उंटावरून शेळ्या राखण्याने हे काम होणार नाही. जपून सुधारणा करणेची वेळ निघून गेली आहे.

## पुरुषार्थकारांची जाती मिमांसा :

श्री सातवळेकर यांना वैदिक संस्कृतीचा अभिमान फार. त्यामुळे हल्लीची सामाजिक सुधारणा , ब्राम्हणेतर पक्ष व सत्यशोधक समाज यावर त्यांची जबरी करडी नजर ! त्यांच्या मते हे सारे लोक राष्ट्रघातकी आहेत. कारण या नव्या पक्षाचे म्हणणे असे आहे की, पोट जाती एक करा, जातीच मोडून टाका, सर्वां- मध्ये सर्रास रोटीबेटी व्यवहार करा, विवाहाच्यावेळी सुद्धां जाती पाहूं नका वगैरे... यांच्या म्हणण्याप्रमाणें कोल्हापुरांत जाती विषयक छळ चालू आहे.

श्री सातवळेकर यांची विधाने किती भ्रामक आणि फसविणारी आहेत, हे वाचकांनी पहावे. आह्मी बेधडक सांगतो की, कोल्हापूरास जातिद्वेषाचा काटा

जवळ जवळ मोडून काढला आहे. राज्यकारभारात सर्व जातीच्या लोकांना प्रवेश झाला आहे. आणि आपापली बुद्धिमत्ता दाखवण्यास सर्वांना भरपूर संधी दिली आहे. सभामध्ये, सार्वजनिक कार्यामध्ये, शाळा कॉलेजात, जातिभेदाचा वासही लागणार नाही. वारंवार घडलेल्या सहभोजनप्रसंगी त्या द्वेषाचा मागमूसही नाही. अशी स्थिती असतां पुरुषार्थकार कोल्हापुरांस जातिविषयक छळ होतो म्हणतात. आणि अशा प्रयत्नांनी, जातिभेद नाश पावणार नाही असे स्वतःचे मत ठोकून देतात. कदाचित याचा अर्थ असा असेल, बऱ्याच दिवसापासून कोल्हापुरांस बर्वे- शाही उर्फ पेशवेशाही गाजत होती. सर्रास ब्राम्हणवर्ग राज्यसूत्रे हाती घेऊन बसला होता. तो मक्ता नष्ट होऊन सर्व जातींना समान मुभा ठेवली आहे. ब्राम्हण वर्ग आज तितका अधिकार पदावर नाही ही गोष्ट खरी आहे. यातच सातवळेकरांना छळ दिसत असेल तर त्याला उपाय नाही.

" जाती अनादि आहेत. त्या मोडणे शक्य नाही. कोणत्या ना कोणत्या वेशांत त्या सर्वकाळी सर्वत्र दिसून येत आहेत. मग उगीच त्या फुगवून दाख-

विण्यात काय अर्थ ?" श्री सातवळेकरांना आह्मी उत्तर देतो की, गुणावर आणि कर्मावर जे भेदाभेद जगांत दिसून येतात ते आमच्या देशात आहेतच. श्रीमंत, गरीब, बुद्धिमान आणि अडाणी, मानकरी मजूर, व्यापारी गिऱ्हाईक, हे भेद ज्यांच्या त्यांच्या अंगच्या सामर्थ्यावर आहेत. या भेदाबद्दल ब्राम्हणेतरानी तक्रार केलेली नाही. मनुष्य स्वभावात बुद्धिमध्ये आणि गुणकर्मात नेहमी अंतर असायचेच. त्याची परवा सत्यशोधकांना नाही. परन्तु गुणकर्म विहीन आणि केवळ जन्मावरच टेकूं देणारा गुंडोपंतांचा धोंडोपंत आपण श्रेष्ठ मानतो. इतरांना कमी लेखतो. दुसऱ्यांना जवळ येऊं देत नाही, आणि दूसऱ्याच्या स्वाभाविक हक्काची पायमल्ली करतो. असल्या नीच जातिभेदाचा ब्राम्हणेतर वर्ग शत्रू आहे.

"विभक्तात अविभक्तपणा," "भेदांत एकी" ही शाद्बिक हातचलाखी आहे ! वरील अनिष्ट जातिभेद नष्ट करण्यांत ब्राम्हणेतर पक्ष कृतीने हात घालीत आहे. खरे पाहता ब्राम्हणी वर्ग आज चुलीत आणि स्वयंपाक घरांतच बोकाळला आहे ! तो नाहीसा करावा, असे सातवळेकरांना एकदा उघड आणि स्पष्ट भाषेत सांगितले की, बराच कार्यभाग होईल. किंवा हे भेदसुद्धां असे राहिलेच पाहिजेत. त्यांत देशाचे कल्याण आहे. असे म्हणणे असेल तर तसे स्पष्ट मांडावे. उगाच शद्बाचे श्लेष काढीत बसण्यात वेळ घालवूं नये.

श्री. सातवळेकरांनी ऋग्वेद मंडळ ९ सूक्त ११२ यातील मंत्र दिला आहे. त्यावरुन वैदिक काळीही "एकाच कुटुंबात मुलगा सुतार आहे. दुसरा कवी आहे, तिसरा चितारी आहे. बाप वैद्य आहे, आई दळणीण आहे, अशी कुटुंबरचना दिसते. आणि सर्वच मंडळी एकाच गोठ्यात राहतात." हा मंत्र आह्मांलाच अनुकूल आहे. हे चित्र आजच्या समाजाला लावा. त्याकाळी सर्व कुटुंब एकाच दावणीत राहत असे. आज एका दावणीत तर राहूं देत, परन्तु एका घरांतही एक ब्राम्हण, एक सुतार, एक वैद्य, एक कवी आणि एक मजूर असे घातले तर सारा घोटाळा होऊन ब्राम्हण मेंबर सोवळ्याचे नांवावर पहिल्यांदाच लाथा फळी करूं लागेल !

पुरुषार्थकारानी आपल्या जूनच्या अंकामध्ये वेदांची योग्यता या मथळ्याखाली, एक लेख लिहिला आहे आणि आह्मांला मनसोक्त वैदिक शिव्या दिल्या आहेत. एवढ्यावर भागत नाही. आणि आपल्या ब्राम्हणवर्गाची यथास्थित स्तुती केली आहे. आणि विजातीय (?) क्षत्रियांची अवास्तव निंदाही केलेली आहे. पं. सातवळेकर हे जाडे वैदिक विद्वान असतील पण त्यानी आपले वैदिक ज्ञान कोठे संपादन केले कोणत्या संहिता म्हटल्या आणि कोणती ब्राम्हणे मुखोग्दत केली

याची पृच्छा करण्याचे आह्माला प्रयोजन नाही. तसे प्रश्न करणे शिष्टाचारास संमत नाही आणि सौजन्यासही शोभत नाही. सातवळेकर विचारतात "बागलानी कोणत्या संहिता ह्मटलेल्या आहेत. या व्यासंगात त्यांनी किती वर्षे घालविली, वेदाचा अर्थ कळण्याइतके संस्कृतचे ज्ञान बागलाना आहे की कसे" असले प्रश्न करणे अप्रस्तुत आणि अप्रासंगिक आहे, बागलानी कोणत्याही संहिता ह्मटल्या असोत,मूळ पाहिले असो अगर त्याचे मराठी किंवा इंग्रजी भाषांतर वाचले असो. तपेच्या तपे " घोकंपट्टी बाळपट्टी " केली असो किंवा वर्ष दोन वर्षांतच त्यातील महत्वाच्या गोष्टी अवगत केल्या असोत, हे प्रश्न व्यक्तिवाचक अर्थात अनाठायी आहेत. पं. सातवळेसारखे पूर्वग्रहाने गर्विष्ठ बनलेले, वर्षेच्या वर्षे वेद म्हणून शेवटी मुद्दा बाहेरच बोलू लागतील, म्हणून आह्मी असले प्रश्न लेखाच्या बाहेरचे म्हणून बाजूस ठेवून देतो. बागलाना संहिता पाठ असोत वा नसोत, त्यांचे स्वर बरोबर असोत किंवा नसोत आणि ऋचा म्हणताना मृगातल्या बेडका-प्रमाणें त्यांची मान ठरीव बाक आणि कोना देऊन वरखाली हासडे मारो वा न मारो या गोष्टीही वाचकाना पाहणेचे कारण नाही विषय काय आहे. आणि बागल म्हणतात काय, इतकेच जर शांत वृत्ती ठेवून सातवळेकर यांनी पाहिले असते तर निशाण सोडून बाण मारणाऱ्या पारध्याप्रमाणें पं. सातवळेकरांची हास्यास्पद स्थिती झाली नसती.

येथील महालक्ष्मीच्या आवारात परवा आर्यसमाजातर्फे व्याख्यानमाला झाली. त्यात एक वादाचा प्रश्न निघाला. " वेदकालीन समाज आणि वैदिक काल हा सुवर्णयुगाचा होता, अत्यंत पुण्यवान आणि निष्पाप होता. परमोच्च पदाला तो समाज पोचलेला होता आणि आजचा समाज धर्महीन पाखंडी, अनाचारी, दुरा-चारी आणि पापी असा झालेला आहे. वैदिककालच्या थोर पदापासून भ्रष्ट होऊन तो अधोगतीला लागला आहे, हा पक्ष येथील आर्यसमाजाचे प्रि. डॉ. बालकृष्ण प्रभृतींचा. हा सिद्धांत बागलाना मान्य नाही. त्यांचे म्हणणे ही नेहमीची ह्मातारीची रडकथा आहे. सारासार विचार न करता असली विधाने केलेली असतात.

बागलांचे म्हणणे असे की वैदिक कालची माणसे ही आमच्या सारखीच होती. आमच्यासारखीही त्यात होती आणि सातवळेकरांसारखीही होती. आमच्या सारखेच त्या कालीही पुण्यवान लोक होते व पापीही होते. चोरी, दरोडे, व्यभि-चार, मद्यपान, द्युत, अमली कामे त्याकाळीही होत होती व आजही होत आहेत. सर्वथैव पाप किंवा सर्वथैव पुण्य असे वैदिक कालीही नव्हते आणि आजकालही नाही. वैदिककाल किंवा वैदिक समाज येथून तेथून सर्व दुराचारी, पापी होता

असे आमचे म्हणणे नाही आणि आमचा काल केवळ सदगुणानी ओतप्रोत भरलेला आहे , पापाचा लेशही नाही असेही आह्मी म्हटलेले नाही. उत्क्रांतीच्या नियमा-प्रमाणें मानव समाजाचे अवलोकन केले तरी दिवसानुदिवस मनुष्य प्राण्याची उत्क्रांती होत आहे. तो सुधारत चालला आहे. हा उत्तर पक्ष आहे. हा वाद सातवळेकरांनी लक्षात घ्यावयास पाहिजे होता. आणि वेदकालीही माणसे दुरा-चरण आणि पापाचरण करीत होती, हे दाखविण्यासाठी वेदांतील तसल्या प्रकारची कांही उदाहरणे आह्मी मांडू शकतो. येथून तेथून वेद त्याज्य आहे, या कोपऱ्या पासून त्या कोपऱ्यापर्यंत सर्व घाण भरलेली आहे, असे आह्मी केव्हांही आणि कोठेही म्हटलेले नाही.

यजुर्वेदामध्ये आणि त्यावरील ब्राम्हण ग्रंथामध्ये पशुयज्ञ जो सांगितला आहे, तो सर्वथैव निंद्य आहे, त्याज्य आहे, गलिच्छ आहे असे आमचे म्हणणे आहे. आणि आजही ते तसेच आहे. ऋग्वेदातील कित्येक सुक्ते ब्राम्हणांनी रचलेली आहेत. कित्येक क्षत्रियानीही रचली आहेत. सर्व आर्यांना मान्य आणि आज ब्राम्हणांना वंद्य असा जो गायत्रीमंत्र तो राजर्षि विश्वामित्र यांनी रचलेला आहे! यजुर्वेदातील कसायीखाना मात्र सर्वांशाने ब्रह्मर्षीनीच रचलेला आहे! असे आमचे मत आहे, पूर्वीची ऋग्वेद कालची साधीभोळी प्रार्थना, इंद्र वरुण, अग्नीकडे पाहून समाधान वृत्तीने लीन होऊन त्या सृष्टीच्या शक्तीना साह्यासाठी पाचारण करणे, या गोष्टी साध्या सरळ मनाला पटण्याजोग्या आहेत. त्यात वावगे काही दिसत नाही. परन्तु पुढे कांही कालाने पुरोहितांची मांत्रिक पद्धती प्रचारात आली. अतर्क्यं, अगम्य, गूढ, अतींद्रिय, कल्पनातील, असले वैदिक मंत्र अमलात आणून त्या गूढ द्वाराने देवताना खेचून मनुष्याच्या कामाला लावणे आणि तद्वारा आपले हित आणि परक्याचे अनहित करण्याचा पशुवधाचा हिंसामय यज्ञयागाचा मार्ग शोधून काढला, तो मात्र भट दीक्षितानी. आमचा आक्षेप याच मंत्र मार्गांवर आहे. त्याकालचे क्षत्रियवीर चक्रवर्ती सम्राट पदासाठी चारी दिशेस घोडा सोडून चतुरंग सेना बरोबर फिरवून अजिक्यपद मिळवीत होते. क्षत्रियानी त्यावेळी जे पराक्रम केले ते दुनियेला ठाऊक आहेत. तेच क्षात्रतेज आजही तसेच तेजस्वी आणि रखरखीत आहे. ही गोष्ट गेल्या जगद्व्यापी महायुद्धामध्ये फ्रान्स देशात मार्नच्या रणभूमीवर शूर मराठा मर्दांनी प्रचंड जर्मन सेनेला खेचुन जगाला शाबीत करून दाखविले आहे. विश्वामित्राची क्षत्रिय परंपरा आजही तशीच जिवंत आहे.

परन्तु अश्वमेधाच्या नांवावर राजसूय यज्ञाच्या मिषाने हजारो दीन आणि अनाथ प्राण्याना बुकलून मारून पेटलेल्या अग्नीत त्यांचा होम करणे, आणि

तसल्या राक्षसी मार्गाने इंद्रपदाची प्राप्ती करून देणारी यजुर्वेदाची मांत्रिकी विद्या ही खरीं आहे की काय ? हा मुद्याचा प्रश्न आहे. यज्ञवल्क्यासारख्या ब्रम्हर्षीनीच या मंत्र विद्येचा पुरस्कार केला. स्वर्गांतली सुखे आणि देवांची सिंहासने क्षत्रिय राजांच्या कल्पना चक्षूपुढे नाचविली आणि त्या महत्वाकांक्षी क्षत्रिय वीराना या घाणेरडया यज्ञ मार्गाला भट पुरोहितानी लावले. याला उत्तर पळवापळवीचे नको. पूर्वीच्या क्षत्रियांना मुर्ख कोण म्हणणार आहे ? वेदाची सूत्रे वेदाच्या पोथीत, त्या वेदाच्या किल्ल्या पुरोहितांच्या कनवटीला. आणि त्या भुलथापीवर क्षत्रियांना धर्म म्हणून त्या यज्ञाच्या मार्गांने चालविणारा भटवर्ग. हे पाहिले म्हणजे क्षत्रि-यांच्या डोळयांत ब्राम्हणवर्गाने धूळ फेकली हे आमचे म्हणणे आहे.

जग जिंकण्यास निघालेला अश्व, विजयी होऊन आल्यानंतर त्यावर निंब-लोण उतरून टाकण्यास राजाच्या राण्याही पुढे धाव घेत, ही गोष्ट क्षत्रिय स्त्रियाना शोभेसीच आहे परन्तु यापुढे मंत्र सुरू झाले ! घोडयाला मारणे, त्याबरोबर एका कुत्र्याला मारणे, घोडयाला पर्यंकावर निजविणे, राजपत्नीलाही तसेच करून त्यावर भटानी पांघरूण घालणे. आणि तद्वारा आकाशातल्या इंद्राची जागा राजाला मिळवून देणे. ही मंत्र विद्या, हा लज्जास्पद प्रकार, थोरांच्या डोक्यांत कोणी घुसडला ? धर्मकर्ते, क्रियाकर्ते, प्रोसीजर लिहिणारे आणि सांगणारे, यज्ञविधी बिनचुक करवून घेणारे हे कोण ! यज्ञ चालविणारे कोण ? यज्ञोपवि-ताच्या जोरावर इतरांच्या बुद्धिला भ्रंश करणारा वर्ग कोण ? आणि त्या निमित्ताने लाखो रुपयांची सुवर्ण दक्षिणा उपटणारे आणि हजारो गाईचे तांडे लाटणारे कोण ? तसल्या धार्मिक भाविक क्षत्रियराजाना यज्ञसमूहात गुरफटून त्याना पुढे खरोखरीच इंद्रपदाची प्राप्ती झाली किंवा काय ! हे एक त्यांचे मृतात्मे जाणोत किंवा त्रिकालज्ञ यज्ञमार्तंड जाणोत ! परन्तु क्षत्रियांच्या घरचा खजिना दक्षिणा रूपाने भटवर्गाने रिकामा पाडला. आणि राजांचा भरचक्का गोकुळवाडा, गोदानाने ओस पाडला, याला मात्र अन्य पुरावा नको ! तो ब्राम्हण-ग्रंथातच भरपूर भरलेला आहे. असल्या अमानुष अश्वमेधाचा आह्मी मनापासून तिटकारा करतो.

हे आमचे म्हणणे आमचे मित्र श्रीयुत सातवळेकर नाकबूल करीत नाहीत. परन्तु " इदं न मम इदं न मम " असे म्हणून हे मांसाचे यज्ञयाग ब्राम्हणांचे नव्हेत, हे क्षत्रियांचेच आहेत. असा कांगावा करीत आहेत. पण इतिहास तशी गोष्ट सांगत नाही. हा पशू-यज्ञ कर्मकांडीय मार्ग ब्राम्हणवर्गांचाच होता. व त्याच गोष्टीचा वीट क्षत्रियांना आला. याच कारणाने क्षत्रियांचा संघ निर्माण झाला आणि या संघाचा पुढाकार भगवान गौतम बुद्ध आणि महावीर या क्षत्रियांनी

घेऊन पशुयज्ञ रसातळाला पोचविला. यावरून काय शाबीत होते ? अलीकडे अलीकडे मात्र जे यज्ञाचे सोंग वाईला आणि वाडीला केले गेले, त्यात मात्र किती थोडे बोकड मारले जातात, याचा रिपोर्ट आमचेकडे आला नाही. याची माहिती कदाचित आमच्या मित्राना असेल. आणि पशू मारणेचे परवासुद्धां क्षत्रिय राजांनीच बंद केले, अशी स्थिती आहे. तेव्हां सातवळेकरांचा गोमांसाचा यज्ञ क्षत्रियांचाच होता याला इतिहासाचे प्रमाण नाही.

श्री सातवळेकर म्हणतात " विजाती क्षत्रियांचा प्रवेश स्वधर्मात (?) झाला म्हणजे मुळची शुद्धता रहात नाही. व शुद्ध धर्माचा पुढे डोंबारखाना बनतो." हा आमच्यावर मोठाच हल्ला आहे. क्षत्रिय विजातीय आणि इजिप्शियन जिप्शियन चितपावन हे स्व जातीय !! हे मूळ आह्मी काढ़ इच्छित नाही. ते ग्रंथातरी पूर्णपणे शाबीत झाले आहे. मात्र इतके खरे की, शुद्ध सनातन धर्मामध्ये मंत्रविद्या आणि अतर्क्य पशुवध घुसडून त्या धर्माचे कुलंगडे या लोकानीच केले याबद्दल कोणास शंका घेण्याचे कारण नाही.

श्रीयुत सातवळेकरांनी लेखाचे शेवटी एक मोठीच हातचलाखी केली आहे. "वेद हे अध्यातम ज्ञानाचे अमूल ग्रंथ आहेत" हे त्यांचे विधान आहे. आह्मांस कबूल आहे. मात्र वेदामध्ये या आध्यातम ज्ञानाचे विचार जे आले आहेत ते कोठे तरी चुकून माकून आले आहेत. ते व्यवस्थित रीतीने एकत्र करून अमूल्य उपनिषद् ग्रंथाची जी रचना केली ती, श्री सातवळेकर साहेब, कोणी केली ? आपण समजून उमजून अज्ञान पांघरीत असाल. परन्तु ही गोष्ट झांकत नाही. ते अमूल्य ग्रंथ ब्राम्हणांचे नव्हेत. त्यांचा त्यात काही एक संबंध नाही. त्या परमार्थ ज्ञानाचे विचार आणि बरहुकूम आचरण हे काम क्षत्रियांचे. ही ब्रह्मविद्या ब्राम्हणाला अज्ञात होती. जनकादि राजांच्या पाठी लागून त्यांची मनधरणी करून, याज्ञवल्क्यासारख्यांनी ती संपादन केली आहे.

० ० ०

## भेदाभेद मते भ्रमाचे संवाद.

(ता. सप्टेंबर १९२९)

तारीख २३।८।२९ चा "हंटर" यात "ब्राम्हणी धनलोभाची प्राचीन संस्कृती" या मथळयाखाली ऋग्वेद मंडळ १ सूक्त २४ मधील हरिश्चंद्र आणि शुनःशेप हा कथा भाग दिला आहे. मूळ सूक्त न देता, सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

यांच्या भाषांतर ग्रंथापैकी पान १२ खालील टीप सारांशरूपाने आह्मी दिली आहे. मात्र अखेर संपादक नात्याने आह्मी एक टीकात्मक वाक्य लिहिले आहे. ते हे "पैशासाठी बापाने (अजीगर्ताने) पोटच्या गोळचाला (शुन:शेपाला) कापण्यास तयार व्हावे, ही वेदकालीन ब्राम्हणांची संस्कृती "मासलेवाईक" आहे. यात काय संशय ?" या वाक्यावरून आमचे मित्र सातवळेकर आमचेवर संतप्त झाले आहेत. ते जरीं आज ब्राम्हण वर्गात मोडले जात आहेत, तरी त्यांच्या सप्टेंबर १९२९ च्या "पुरुषार्थ" मधील ३५ पानावर "ब्राम्हणाचा बली या सदराखाली" म्हणून जो अग्रलेख प्रसिद्ध झाला आहे, त्याचे सूक्ष्म अवलोकनावरून आमचे दृढ अनुमान होत आहे की त्यांच्या रक्तांमध्ये रजोगुणाचाच प्रभाव जास्त दिसून येतो. त्यानी जी वेदोक्त शिव्याशापाची माला आह्माला अर्पण केली आहे. त्यावरुन आह्मी किंचित धैर्याने त्यांचे समोर उभे राहून वरील श्री तुकोबारायांची अखंड अभंग वाणी आहेर करीत आहोत. रजोगुणाचे पलिकडे आमच्या मित्रांची धांव अजून जात नाही. " श्लेश आणि शब्दच्छल या गुंतागुंतीचे जाळचात ते गुरफटून गेलेले दिसतात. प्रतिपक्षकार बागल म्हणतात तरी काय ? त्यांच्या टीकेचा मतलब तरी काय, याचा विचार करणेस त्याना सवडही राहिलेली दिसत नाही. श्रीमद् भगवत्गीतेत चातुवर्ण्यांची गुणप्रधान व्यवस्था श्री कृष्णांनी दिलेली आहे. ती व्याख्या आमच्या मित्रानाही मान्य आहे ! शमो: दम: तप: शौचं शान्ति: आर्जव मेवच ।। ज्ञानं विज्ञानं आस्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।। ही कसोटी ब्राम्हण वर्ण ओळखणेची आहे. असा उच्च कोटीतील मनुष्य दृष्टीस पडेल तर "हंटर" कारांची काय बिशाद ? जाती भेदाची कठिण सीमा फोडून सर्व हिंदू समाज अशा थोर पुरुषांच्या चरणी लोळण घेण्यास तयार होईल ! परन्तु आज स्वप्नसृष्टीत सुद्धां असा पुरुष दिसून येत नाही, ही खेदाची गोष्ट आहे. पुन्हा पुन्हा आमच्या मित्राना आह्मी सांगत आहोत की, आह्माला "जाती द्वेष" माजवायचा नाही. तर आज जो तत्व विहीन पाया विरहित, कृत्रिम उच्चनीचपणाचा बडेजाव मारणारा, मानव जातीचा अपमान करणारा, समाज छिन्नविछिन्न करणारा, विराट पुरुष भरत खंडाची हाडे मोडून टाकणारा, गुलामवृत्तीची हिंदु मनुष्यास पाळण्या पासूनच दिक्षा देणारा, दास्य वृत्तीची जोपासना करून, मनुष्य प्राण्याला गुलामातला गुलाम बनवणारा आणि सगळचा पृथ्वीतलावरील राष्ट्राना आपला अस्थि पंजर मोकळा करून दाखवून, देशाची हानी, स्वदेशाचा नाश आणि स्वराज्य संपादनाची आशा नष्ट करणारा, जगात इतर कोठेही दिसून येणार नाही, अशा जाती भेदाची इमारत उभी करून सर्वत्र द्वेषाची आणि विषाची बीजे पेरून त्राही करून सोडणारा असा जो हिंदू समाजातील "जाती भेद" त्याला कायमची मूठमाती देणेसाठी "हंटरचा" जन्म झाला आहे.

"पुरुषार्थ" कारांनी "हंटर" काराना आपल्या "पुरुषार्थ" मधील अग्रलेखाची एक छापील नक्कल खाजगी पत्र व्यवहाराने पाठविली आहे. व सोबत एक पत्रही पाठविले आहे. त्यांच्या सौजन्याबद्दल आह्मी आभार मानीत आहोत. "आज आपसात ऐक्य स्थापनेची खास आवश्यकता आहे. देशहिताच्या दृष्टीने निष्कारण विषारी लेख कोणासही लिहिणे योग्य नाही." आमच्या मित्राना आह्मी खात्री देत आहोत की ऐक्यासाठी आणि राष्ट्रहितासाठी आजच्या स्थितीत दिसून येणारा जातीभेद नष्ट करण्याचे कामी मि. सातवळेकर आह्मास सक्रिय सहानुभूती दाखविण्यास तयार होतील तर आह्मी त्याना प्रेमाचे अलिंगन देऊन ।। माझिया जातीचे मज भेटो कोणी । निर्वाणीचा धनी फेडावया ।। या साधू उक्तीत तल्लीन होऊन जाऊ ! परन्तु शब्दांपेक्षा जास्ती, त्यांच्या लेखात आह्मास कांही दिसून येत नाही. "परोपदेशे पांडित्यम्" या म्हणीचा अनुभव त्यांच्या या लेखात दिसून येत आहे. ज्यांनी आह्माला विषारी लेख लिहिणे बरे नाही असा बोध करावा त्यानी "कोरडे सत्यशोधक संपादक" संबोधून आमची निंदा करावी 'हंटरकार' भल भलती विधाने करतात, असा आक्षेप घ्यावा, प्राचीन पवित्र गोष्टींचा विपर्यास करणारे 'कोरडे संपादक आणि त्यांच्या गोत्रातील अन्य सत्यशोधक' असा पोक्त आणि संभाव्य शब्दांनी गौरव करावा ! 'कोरडेकार जर आंतून बाहेरून अगदी खरोखरच जर कोरडे बनले नसतील तर त्यानी (आह्मी) यापुढे आपल्या लेखणीस चांगले वळण लावावे ! अधिकारवाणी उत्तम आहे. 'पुरुषार्थांतील अग्रलेख आह्मी लक्षपूर्वक वाचला. त्यांच्या वेदाच्या ज्ञानाबद्दल आह्माला आदर वाटत आहे. परन्तु आदराबरोबर प्रेमाची भावना उत्पन्न होण्याला त्यांच्या लेखात सत्व गुणाचा अंकूरही आलेला दिसून येत नाही.

परद्वेष करू नये असे बजावणारे मि. सातवळेकर यांनी या शुनःशेपाचे कथेतून जी अनुमानाची मुक्ताफळे मंथनातून बाहेर काढली आहेत, ती पहाण्यासारखी आहेत. ब्राम्हण वर्गाची स्वार्थी, द्रव्य लोभी, दयारहित, पैशासाठी जीव देणारी, दक्षणा उपटणारी, नेहमी दुसऱ्याचे असली कनिष्ट प्रतिची, अज्ञानाचा फायदा घेणारी, संस्कृती त्या शुनःशेपाचे कथेतून स्पष्ट दिसत आहे. ही वरील संस्कृती आमच्या राष्ट्राचा पुन्हां पुन्हां घात करण्यास तयार झाली आहे आणि आज तागायत राष्ट्रैक्याला हीच प्राचीन संस्कृती आड येत आहे. हा कार्यकर्त्या आणि विद्वान नवीन पुढारी चळवळ्यांचा ओरडा आहे. याचा उलगडा मि. सातवळेकर करीत नाहीत. कपटी, आपमतलबी, स्वतःचे हितासाठी राष्ट्राच्या हितावर निखारे ठेवणारे असे थोर म्हणविणारे वरील प्रकारचे ब्राम्हणहृदयी निर्माण झाले नसते तर भारताला आजची केविलवाणी स्थिती प्राप्त झाली नसती.

यांच्या भाषांतर ग्रंथापैकी पान १२ खालील टीप सारांशरूपाने आह्मी दिली आहे. मात्र अखेर संपादक नात्याने आह्मी एक टीकात्मक वाक्य लिहिले आहे. ते हे "पैशासाठी बापाने (अजीगर्ताने) पोटच्या गोळ्याला (शुनःशेपाला) कापण्यास तयार व्हावे, ही वेदकालीन ब्राम्हणांची संस्कृती "मासलेवाईक" आहे. यात काय संशय ?" या वाक्यावरून आमचे मित्र सातवळेकर आमचेवर संतप्त झाले आहेत. ते जरीं आज ब्राम्हण वर्गात मोडले जात आहेत, तरी त्यांच्या सप्टेंबर १९२९ च्या "पुरुषार्थ" मधील ३५ पानावर "ब्राम्हणाचा बली या सदराखाली" म्हणून जो अग्रलेख प्रसिद्ध झाला आहे, त्याचे सूक्ष्म अवलोकनावरून आमचे दृढ अनुमान होत आहे की. त्यांच्या रक्तांमध्ये रजोगुणाचाच प्रभाव जास्त दिसून येतो. त्यानी जी वेदोक्त शिव्याशापाची माला आह्माला अर्पण केली आहे. त्यावरुन आह्मी किंचित धैर्याने त्यांचे समोर उभे राहून वरील श्री तुकोबारायांची अखंड अभंग वाणी आहेर करीत आहोत. रजोगुणाचे पलिकडे आमच्या मित्रांची धांव अजून जात नाही. "श्लेश आणि शद्बच्छल या गुंतागुंतीचे जाळ्यात ते गुरफटून गेलेले दिसतात. प्रतिपक्षकार बागल म्हणतात तरी काय ? त्यांच्या टीकेचा मतलब तरी काय, याचा विचार करणेस त्याना सवडही राहिलेली दिसत नाही. श्रीमद् भगवत्‌गीतेत चातुवर्ण्याची गुणप्रधान व्यवस्था श्री कृष्णांनी दिलेली आहे. ती व्याख्या आमच्या मित्रानाही मान्य आहे ! शमोः दमः तपः शौचं शान्तिः आर्जव मेवच ।। ज्ञानं विज्ञानं आस्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।। ही कसोटी ब्राम्हण वर्ण ओळखणेची आहे. असा उच्च कोटीतील मनुष्य दृष्टीस पडेल तर "हंटर" कारांची काय बिशाद ? जाती भेदाची कठिण सीमा फोडून सर्व हिंदू समाज अशा थोर पुरुषांच्या चरणी लोळण घेण्यास तयार होईल ! परन्तु आज स्वप्नसृष्टीत सुद्धां असा पुरुष दिसून येत नाही, ही खेदाची गोष्ट आहे. पुन्हा पुन्हा आमच्या मित्राना आह्मी सांगत आहोत की, आह्माला "जाती द्वेष" माजवायचा नाही. तर आज जो तत्व विहीन पाया विरहित, कृत्रिम उच्चनीचपणाचा बडेजाव मारणारा, मानव जातीचा अपमान करणारा, समाज छिन्नविछिन्न करणारा, विराट पुरुष भरत खंडाची हाडे मोडून टाकणारा, गुलामवृत्तीची हिंदु मनुष्यास पाळण्या पासूनच दिक्षा देणारा, दास्य वृत्तीची जोपासना करून, मनुष्य प्राण्याला गुलामातला गुलाम बनवणारा आणि सगळ्या पृथ्वीतलावरील राष्ट्राना आपला अस्थि पंजर मोकळा करून दाखवून, देशाची हानी, स्वदेशाचा नाश आणि स्वराज्य संपादनाची आशा नष्ट करणारा, जगात इतर कोठेही दिसून येणार नाही, अशा जाती भेदाची इमारत उभी करून सर्वत्र द्वेषाची आणि विषाची बीजे पेरून त्राही करून सोडणारा असा जो हिंदू समाजातील "जाती भेद" त्याला कायमची मूठमाती देणेसाठी "हंटरचा" जन्म झाला आहे.

"पुरुषार्थ" कारांनी "हंटर" कारांना आपल्या "पुरुषार्थ" मधील अग्रलेखाची एक छापील नक्कल खाजगी पत्र व्यवहाराने पाठविली आहे. व सोबत एक पत्रही पाठविले आहे. त्यांच्या सौजन्याबद्दल आह्मी आभार मानीत आहोत. "आज आपसात ऐक्य स्थापनेची खास आवश्यकता आहे. देशहिताच्या दृष्टीने निष्कारण विषारी लेख कोणासही लिहिणे योग्य नाही." आमच्या मित्राना आह्मी खात्री देत आहोत की ऐक्यासाठी आणि राष्ट्रहितासाठी आजच्या स्थितीत दिसून येणारा जातीभेद नष्ट करण्याचे कामी मि. सातवळेकर आह्मास सक्रिय सहानुभूती दाखविण्यास तयार होतील तर आह्मी त्याना प्रेमाचे अलिंगन देऊन ।। माझिया जातीचे मज भेटो कोणी । निर्वाणीचा धनी फेडावया ।। या साधू उक्तीत तल्लीन होऊन जाऊ ! परन्तु शद्वांपेक्षा जास्ती, त्यांच्या लेखात आह्मास कांही दिसून येत नाही. "परोपदेशे पांडित्यम्" या म्हणीचा अनुभव त्यांच्या या लेखात दिसून येत आहे. ज्यांनी आह्माला विषारी लेख लिहिणे बरे नाही असा बोध करावा त्यानी "कोरडे सत्यशोधक संपादक" संबोधून आमची निंदा करावी 'हंटरकार' भल भलती विधाने करतात, असा आक्षेप घ्यावा, प्राचीन पवित्र गोष्टींचा विपर्यास करणारे 'कोरडे संपादक आणि त्यांच्या गोत्रातील अन्य सत्य-शोधक' असा पोक्त आणि संभाव्य शद्वांनी गौरव करावा ! 'कोरडेकार जर आंतून बाहेरून अगदी खरोखरच जर कोरडे बनले नसतील तर त्यानी (आह्मी) यापुढे आपल्या लेखणीस चांगले वळण लावावे ! अधिकारवाणी उत्तम आहे. 'पुरुषार्थातील अग्रलेख आह्मी लक्षपूर्वक वाचला. त्यांच्या वेदाच्या ज्ञानाबद्दल आह्माला आदर वाटत आहे. परन्तु आदराबरोबर प्रेमाची भावना उत्पन्न होण्याला त्यांच्या लेखात सत्व गुणाचा अंकूरही आलेला दिसून येत नाही.

परद्वेष करू नये असे वजावणारे मि. सातवळेकर यांनी या शुनःशेपाचे कथेतून जी अनुमानाची मुक्ताफळे मंथनातून बाहेर काढली आहेत, ती पहाण्या– सारखी आहेत. ब्राम्हण वर्गाची स्वार्थी, द्रव्य लोभी, दयारहित, पैशासाठी जीव देणारी, दक्षणा उपटणारी, नेहमी दुसऱ्याचे असली कनिष्ट प्रतिची, अज्ञानाचा फायदा घेणारी, संस्कृती त्या शुनःशेपाचे कथेतून स्पष्ट दिसत आहे. ही वरील संस्कृती आमच्या राष्ट्राचा पुन्हां पुन्हां घात करण्यास तयार झाली आहे आणि आज तागायत राष्ट्रैक्याला हीच प्राचीन संस्कृती आड येत आहे. हा कार्यकर्त्या आणि विद्वान नवीन पुढारी चळवळयांचा ओरडा आहे. याचा उलगडा मि. सातवळेकर करीत नाहीत. कपटी, आपमतलबी, स्वतःचे हितासाठी राष्ट्राच्या हितावर निखारे ठेवणारे असे थोर म्हणविणारे वरील प्रकारचे ब्राम्हणहृदयी निर्माण झाले नसते तर भारताला आजची केविलवाणी स्थिती प्राप्त झाली नसती.

भारत इतिहास म्हणजे या जातिद्वेषामुळे आपसात युद्धांनी परस्परांची नरडी फोडणारा इतिहास होय असे आमचे मत झाले. पुराव्यांचे कारण नाही. राष्ट्र-हित आणि समाज ऐक्य स्थापण्याची भाषा बोलणारे 'पुरुषार्थ' कार या ब्राम्हणी संस्कृतीचे मंडण करू शकत नाहीत. शुन:शेपाचा बाप अजिगर्त हा आपल्या पुत्राला शंभर गाई घेऊन देतो. त्या मुलाला यज्ञ स्तंभाला गच्च बांधून टाकण्यास तयार होतो. 'किंमत आणखी शंभर गाई !' सुरा चालविण्यास कोणी तयार होईना. हे दयाळू ब्राम्हण 'शायलाक' पुन्हा शंभर गाई घेतात ! आणि सुरा पाजळून 'आत्मावै' पुत्राच्या काळजाच्या घडाला हात घालण्यास तयार होतात ! हे तो बिचारा मुलगा डोळयानी पहातो. "देवा हे सर्व लोक खरोखरीच कसायाप्रमाणें माझा गळा तोडावयास तयार झाले आहेत, अशी दीन वाणी भाकून देवाला करूणा आळवून धांवा मांडतो ! वरूणास त्याची दया येते. वध स्तंभाचे बंद तटातट तुटतात. आणि तो मोकळा होतो.

या कथेचा अर्थ काय ? पुरुषार्थकारानी वाटेल तितक्या उलटया उडया माराव्यात. यज्ञामध्यें मुळी बळी होत नव्हता. ही आपली कल्पना शाबीत करणे-साठी वाटेल तितके शद्ब संशोधन करावे. 'हरिचंद्र रोहित, वरूण, अजिगर्त इत्यादि शद्बांचा निराधार वाटेल तितका खलबत्यात घालून खल करावा. शरीर शास्त्र, वैद्यक, देहातील सूक्ष्मजीवबीजी वगैरे शास्त्रांचा आपल्या बुद्धीचे सूक्ष्म तंतू तुटे-पर्यंत ओढाताण करोत. आमची त्यास हरकत नाही. त्या योगे शुन:शेपाचे कथेतील मर्म झाकून राहणार नाही. ते जास्तच नागडे उघडे होणार आहे. धन लोभी ब्राम्हण स्वार्थासाठी काय काय करणार नाहीत ? याचे उत्तर बरोबर या कथेत उतरले आहे. ही वालंवाल खात्री होत आहे. याबद्दल अनेक विद्वानांचे अभिप्राय झालेले आहेत. या खुलाशासाठी प्रो. गजेंद्रगडकर, करमरकर, यांचें संस्कृत नं. २ या पुस्तकात पृष्ट २४५ ते २६९ त्यात अनेक युरोपीयन व स्वदेशीय पंडितांची मते गृहित धरलेलीत आहेत.

० ० ०

## पुरुषार्थकार सातवळेकरनी ओकलेले गरळ

(ता. २१ मे १९२६)

"जनकादि क्षत्रिय राजांचे ज्ञान केवळ तुटपुंजे होते. भरतभूमीचें स्वातंत्र्य नाहीसे झाले म्हणून क्षत्रियांचे अस्तित्वच हल्ली नाही." असल्या विचित्र कल्पना आणि विलक्षण तर्कशास्त्र तुम्ही मासिकातून प्रगट केले.

कलियुगांत क्षत्रिय नाहीत. हा कुत्सित सिद्धांत स्मृति शास्त्रावरून शाबीत होत नाही. तेव्हां नवीनच विचार करून, "क्षत्रियच आतां नाहीत," हे दाखविण्याची तुमची खटपट. हे तुमचे विचार पाहून, आह्माला चमत्कार वाटला. हजारो वर्षापासून सर्व बाजूनी आणि अनेक प्रमाणांनी "ब्रह्मज्ञान हे मुळचे क्षत्रियांचे आहे." ही गोष्ट आरशासारखी स्वच्छ आहे. ब्रह्मज्ञान हे कोणाचे ?"

हे गीताशास्त्र, त्यावरील ज्ञानेश्वर महाराजांची टोका साखरेबुवा, प्रोफेसर भानु, कै. टिळक आणि मूळ उपनिषद यांनी मान्य केले आहे. रमेशचंद्र दत्तांचेही मत तेच आहे. परंतु यापुढे तुह्मी नवीन कांही आह्मांला सांगण्याचे सोडून, "ते ज्ञान" म्हणजे "जलाचे ज्ञान, भूमीचे ज्ञान," याच गोष्टीचे चर्वित चर्वण चालविले आहे. याज्ञवल्क्यानी त्या क्षत्रिय राजापासून संपादन केले ते तुटपुंजे ज्ञान नव्हे तर ते ब्रम्हज्ञान आहे, आत्मज्ञान आहे. ही गोष्ट वरील आधारांत स्वच्छ दाखविलेले आहे. रमेशचंद्र दत्तांचा इंग्रजी ग्रंथाचा आधार दिला, म्हणजे बागलाना संस्कृत समजत नाही, हे आपले न्याय शास्त्र कोठले ? बाकी बागलांनी आपण संस्कृत पंडित आहोत अशी शेखी कधी मिरवली नाही. मूळ उपनिषद ग्रंथावरून सातवळेकरांशी दोन फेका करण्यांस बागलांची तयारी आहे.

आपले शाब्दिक क्लिष्ट ज्ञान आह्मांला कांही नवीन भासत नाही. "हंटर" म्हणजे "कोरडा" आणि "कोरडा" म्हणजे "सुकलेला" या कोटया आता जुन्या झालेल्या आहेत.

पाटील, कुणबी शेतकरी, मराठा क्षत्रिय हे सारे एकच आहेत. हे पुन्हां आह्मी आमचे मित्राना उघड कळवीत आहोत. एकच इसमाने ते वेगवेगळे पत्करलेले पेषे अगर धंदे आहेत. त्यात कोणाला अपमान वाटण्याचे मुळीच कारण नाही. तुह्मी मात्र "ब्रह्म जाणणारा तो ब्राह्मण" ही जी सोपी व्याख्या केली आहे, त्यांत ब्राम्हण वर्गाचे मरण आहे. ते आचारी, पाणके, ते हॉटेल मर्चंटस्, ते कपबशीवाले, ते धोतरबडवे शागीर्द, ते टांगाहांके किंवा जोडे पायताण कॉंट्रॅक्टर्स किंवा कोंबडी अंडी मक्तेदार, हा अठरापगडी धंद्यात नाचणारा ब्राम्हण वर्ग, कोणत्या वर्गात ढकलायचा ? कारण या ब्राम्हण वर्गाचे ब्रह्माचे ज्ञान पाहून प्रत्यक्ष ब्रह्मही खजील होईल.

श्रीयुत सातवळेकर हे आपल्या अकुंचित वैदिक ज्ञानाच्या दडपणाखाली वाकलेले दुर्विदग्ध, यांना "ब्रह्मापि न रंजयति" मग बिचाऱ्या वागलांचा पाड काय ?

वैराग्याचा लेश नाही तुझ्या अंगी ।
बोलतोसि जगी शद्ब ज्ञान ।।

## श्री क्षात्रजगद्‌गुरु वि. पुरुषार्थकार

आह्मांला वाटत होते की, कालाच्या प्रभावाने इंग्रज राज्याचे दडपयाने किंवा नव्या राष्ट्रीय दृष्टीने, निदान विद्वान ब्राम्हण तरी हा ब्रम्हक्षात्र वाद मिट-विणेचा यत्न करतील,पण अनुभव उलट येतो.

श्रीयुत सातवळेकरासारखे पूर्व पश्चिम विद्याभूषित पंडितसुद्धां पक्षांध होऊन, न शोभणारी भाषा वापरतात. इतकेच नव्हे तर अग्निवर तेल ओत-तात. हे पाहून खेद होतो.

करवीर क्षात्रजगद्‌गुरुना निंदेच्या वाक्याची माला घातलेली जर पहाण्याची कुणाची इच्छा असेल तर वाचकांनी पुरुषार्थाचा अंक पहावा. ज्ञानाचा गड्डा केवळ एका वैदिकाच्याच हाती असतो. आणि तो तसा असला पाहिजे. असली वेडी हाव मनी धरून क्षात्रपीठावर जी त्यांनी गरळ ओकली आहे. त्यांचा परिणाम ब्राम्हणेतरावर बिलकूल होणार नाही. हे तर खरेच.

परंतु वामन, परशुरामापासून क्षात्र द्वेषाचा ब्राम्हणांनी जो जप सुरू केला आहे, त्याचे रडके गाणे आजही सुरू आहेच. इतके मात्र दिसून येते की चारी विद्या आणि सहा शास्त्रे युक्त, पढिक ब्राम्हण झाला, तरी त्यांची वृत्ती सुधारतेच असे नाही; हा अनादि सिद्धांत सातवळेकरांनी आपल्या वाणीने पुन: सिद्ध केला.

आजवर संकटापासून कोणी जगताचे निवारण केले असेल, दुष्टांचा संहार केला असेल, पुण्यवानांचे रक्षण केले असेल, तर ते केवळ एका क्षत्रिय वर्गानेच केले आहे. ही गोष्ट ऋग्वेद कालापासून तो आज तागाईत, हजारो उदाहरणांनी शाबीत झालेली आहे. "परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् । धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।" असे अभिवचन दिले आहे. रामकृष्णाचे अवतार घेऊन विष्णूनी ही परंपरा चालू ठेवलेली आहे. मात्र ही प्रतिज्ञा पार

पडताना, आश्रय जो केला आहे, तो केवळ क्षत्रिय देहाचाच. श्री रामकृष्ण घ्या किंवा ऐतिहासिक कालांत निर्माण झालेले प्रतापशाली महावीर, गौतमबुद्ध, अशोक श्री शिवछत्रपति शिवाजी महाराज, ही नर रत्ने घ्या. भगवान विष्णूनी या भूमीवर उतरून लोक कल्याण केले आहे. ते क्षत्रिय पुरुषांचे देहाच्याच मार्गाने ! असे असताना वामन आणि परशुराम हे ब्राम्हणी अवतार आले कसे? त्यांनी केले काय ? आणि अवतार म्हणवून घेण्याची पात्रता, त्यांचे अंगी आहे काय? हा आज वादाचा प्रश्न आहे. परशुरामांच्या (कु) पराक्रमाचे गुण गायन करणे प्रस्तुत विषयास गैर लागू आहे. तेव्हां त्यांना आह्मी स्पर्शच करीत नाही. फक्त वामनांच्या कर्माचाच विचार करू. ऋग्वेदामध्ये विष्णूचा उल्लेख आहे. त्यात त्यानी आपल्या तीन पावलानी त्रिलोक व्यापून टाकला, अशी कथा आहे, यात परमात्म्याचे जगडव्याल विश्वस्वरूप दाखविले आहे. याच कथेचे पुराणामध्ये वेगळे स्वरूप दाखऊन, आपल्यास अनुरूप असे रंग भरून ही वामनाची कथा घातलेली असावी. बलीराजा हा असूर असो, देव असो, किंवा आर्य असो, किंवा आमचे पुरुषार्थकार त्या बलीला वाटेल त्या वर्गात घालोत, पुराणांतून बलीराजा, हा क्षत्रिय वंशातील होता, हे स्पष्ट आहे. अलिकडील शोधावरून किंवा फायलालाजीवरून त्याचा देश किंवा मूळ वर्ण कोणताही मानल्यास हरकत नाही, त्या कल्पना (थियरीज) आहेत. अमूकच कल्पना निर्विवाद खरी आहे असे ठरत नाही. बलीराजा खास क्षत्रिय होता. तो कीर्तिमान होता, न्यायी होता, पुण्यवंत होता. त्याचे वैभव अगाध होते, आणि त्याच्या दातृत्वाची दुंदुभी इंद्रापर्यंत जाऊन पोचली होती. आह्मी म्हणतो, बली आणि इंद्र हे दोघेही क्षत्रिय. आणि त्यांच्यात स्पर्धाही उत्पन्न झाली असेल. क्षत्रिया क्षत्रियांतील स्पर्धेचा आज प्रश्न नाही. बलीचा पाडाव करणेसाठी, जीं योजना झाली त्यात वामनाने कोणते पराक्रम गाजविले ? आणि जे गाजविले त्यावरून देवाच्या अवतारात त्यांची गणना करता येईल काय, रावण अती बलवान झाला. त्याने परस्त्रिचा अभिलाष धरला, देवांना बंदिखान्यात घातले, या पापाचा निरास व्हावा, असल्या दुष्टाचा पराभव होऊन भूभार हलका करावा म्हणून विष्णूनी रामावतार धारण केला. तसेच कंसाने दुष्कृत्ये केली. शिशुपालाने अनंत पापे केली. दुर्योधनाने राजनीतीचे उल्लंघन करून पतिव्रतेचा अपमान केला. आणि राज्याचा अनावर लोभ धरुन कपट नीतिने पांडवाना देशोधडीस लावले, यासाठी विष्णूनी कृष्णावतार घेतला. ही त्या अवताराची परिस्थिती आहे. आणि कृत्येही तशीच दैवी आहेत. आता बली आणि वामनाकडे पहा, निराधार कल्पनेस अनुकूल व ब्राम्हणी वर्चस्वास पोषक अशी भारूडे लिहिणाऱ्यांनासुद्धां, प्रतापशाली बलीच्या मागे दुर्गुणाचा एक डाग सुद्धां कोणास लावता आला नाही. त्याचे खासगी आणि राजकीय चरित्र

निष्कलंक आहे. प्रजेपैकी कोणी एक शद्राचीही तक्रार विष्णुकडे नेली नव्हती. सर्व भूमी आनंदमय होती. असे होते तर मग विष्णुला अवतार घेण्याची उठाठेव तरी का पडली ? आणि म्हणूनच आह्मी म्हणतो हे काम विष्णुचे नसून कोणी तरी क्षात्रद्वेषी ब्राम्हणानें आपल्या मेंदूतून या अनाठायी वामनावताराची कल्पना निर्माण केली आहे ! आणि कारणावाचून कार्य झाले. म्हणजे असेच हास्यास्पद होते. या वामनानी जगांत येंऊन केले तरी काय ? तर बली राजाकडे तीन पांड भूमी दानाची भिक्षा मागितली, राजाने ती कबूल केली. त्याबरोबर म्हणे, या भिक्षुकाने दोन पावलाने विश्व व्यापले, आणि तिसऱ्या पावलाने बलीराजाला पाताळात घातला. संपली कथा. ही कथा भटजीनी सांगावी आणि मठ्ठानी ऐकावी ! यावरुन बोध करून घेणेचा ? आकंठ भोजन घालणाऱ्या यजमानाचा घात करावा ! उगीचच्या उगीच बलीने त्या वामनाचे स्वप्नातही नुकसान केले नसताना, त्याला लाथेने तुडवावे, ज्याच्या राज्यातील प्रजा आनंद सागरांत डुबत होती तसल्या राजाला एका लबाड भिकाऱ्याने टांचेने दडपून टाकावे या संगती-वरुन आह्मी शिकावे काय ? यासाठीच विष्णुने अवतार घेणे भाग होते, तर मग अन्यायाने साम्राज्य हीच स्वर्गाची शिवके मोर्तबाची किल्ली आहे ह्मणावयाची !

बरे, त्या वामनाने क्षात्रहत्या केली, विश्वास घात केला. कृतघ्नतेचे पातक झोळीत घेतले, पापाच्या शिंकाळ्या खूप उंच तयार केल्या. इतके करून शेवटी केले काय ? तर लोककल्याणकारी राजा नाहीसा केला. आणि स्वत: अखंड दास्याच्या नरकांत कायमचा खितपत पडला ! देवानीही नीच सेवावृत्ती त्यांच्या डोक्यावर आदळली ! कारण बलीच्या द्वारांत खिसमतदाराचे काम त्यांच्या गळ्यांत देवांनी घातले. त्यांच्यासारख्या अपराधाला ही शिक्षा खरोखरी कमीच आहे.

ह्या वामनाच्या अवतार कथेंपासून हाच निष्कर्ष निघतो. दुष्कृती वामनाचा गुलामगिरीतच नाश झाला. मग अशा मनुष्याला देवाचा अवतार कोणी कसा मानावा, हे सातवळेकरांनी पुन्हां एकदा आपले वैदिक अस्त्र धुऊन पुसून सांगणेचे करावेच. करवीर क्षात्रजगद्‌गुरूवर परशुरामी कोपाचा आवेश दाखवून फलप्राप्ति काय होणार आहे ? कै. कुंठे, रा. रा. भागवत वगैरे निस्पृह दृष्टीच्या विद्वान ब्राम्हणांनीही हीच मीमांसा केली आहे. वामनावतार म्हणजे ब्राम्हणांच्या डोक्या-तील क्षात्रद्वेषाचा अत्यंत गलिच्छ असा एक फुत्कार आहे. अशाने क्षात्रतेज कमी न होता ते खास द्विगुणितच होत राहील. मग जमदग्नीच्या या अनुवंशिक द्वेशाच्या इस्टेटीवर पुरुषार्थकारासारख्या वैदिक वामनानी किती मोठा जरी वारसाचा हक्क सांगितला तरी तो दावा या विसाव्या शतकात जनतेच्या न्यायाच्या कोर्टात शाबीत होणे शक्य नाही.

ही वामनावताराची व्याद एकदा आपल्या पाठिमागची टळो आणि क्षत्रियाचे धर्माचे आणि नीतिचे राज्य येवो, म्हणून आजकालही विजयादशमीच्या सुमंगल दिवशी आवालवृद्ध अवलासुद्धां देवापाशी मागणी करतात की " इडा पिडा टळो आणि बलीचे राज्य येवो."

बहुजन समाज हा परंपरा प्रिय आहे. एकदम सर्वच संस्कार टाकणे त्याला आवडत नाही. म्हणून अशा पीठाची अवश्यकता सर्वांना भासते. मराठ्यांच्या मानेवरील ब्राम्हणी जगद्गुरुचे जोखड जूं फेकून देणाऱ्याला क्षात्र जगद्गुरुंचा आश्रय अगत्याचा आहे. गादीचा वारसा हक्क वंशपरंपरेचा नाही, मठावर व्यक्तीचा खासगी हक्क राहूं नये, म्हणून वंशजाला गादी हक्क नाही, असे महा-राजांनी जाहीर केले. आणि नवीन जगद्गुरु बनवावयाचा तो दरबारच्या संमतीनेच झाला पाहिजे. अशी त्या हुकमांत एक शर्त घातली आहे. या शिवाय एक मह-त्वाची गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे ती अशी :- सक्तीची संन्यासवृत्ती पीठाच्या अधिकाऱ्यावर लादली तर परिणाम चांगला होत नाही. अनेक ठिकाणी बळजबरीने केलेल्या संन्याशानी नीती बिघडून टाकली आहे. कांही ठिकाणी तर गुरु म्हणवून देहाला भगव्या वस्त्राने शोभा आणायची. परन्तु अंतरकी बात राम जाने. आणि केव्हां केव्हां तर निर्लज्जपणाने पवित्र ठिकाणी अनाचार मांडायचा. असली लाजिरवाणी उदाहरणें घडूं नयेत म्हणून कै. शाहू महाराजांनी क्षात्रपीठाच्या जगद्गुरुंना लग्नाचीही परवानगी दिली आहे. ती गोष्ट त्यांचे इच्छेवर ठेवली आहे. आणि समाजासमोर घाणेरडे उदाहरण येऊ नये म्हणून काळजी घेण्यात आली आहे.

सोवळ्या ब्राम्हणशाही विरुद्ध प्रोटेस्टंट मताचा हा प्रभाव आहे. ब्राम्हण जगद्गुरुंच्या तुसड्या आणि चढेलपणाला कंटाळून जैनांनी वेगळा मार्ग आखला. त्यांनी आपला जगद्गुरु वेगळा केला. त्याचप्रमाणें लिंगायतांनीही वेगळा सुभा तयार केला. विश्वब्राम्हण पांचाळ सोनार वगैरेनीही आपआपले सवते सुभे उभे केले. मराठ्यांनी आजवर लोकोत्तर पराक्रमाची कामे करून दाखविली. परन्तु केव्हांही सवत्या सुभ्याची हांव धरली नव्हती. आणि याच कारणासाठी कुर्तको-टींच्या हातून हे कार्य घडवून आणावे, या सद्बुद्धीने कै. श्री शाहू महाराजांनी नाना परिश्रम घेतले. परन्तु सर्व व्यर्थ. ब्राम्हण वर्गाचा हा एकलकोंडा स्वार्थी तुसडा स्वभाव जाईना, म्हणून त्यांना हा सवता सुभा उभा करणे भाग पडले.

वैदिक शाळा :- राव पुरोहित हे मराठ्यांच्या डोक्यावर नाचणे शक्य नाही. त्यांना वतन नाही. वंशपरंपरेचे हक्क नाहीत. बोलावतील तर त्यांनी जायचे.

कसलाही शिरजोरपणा करायचा नाही. मिळून मिसळून खाऊन जेवून राहायचे. अशी स्थिती असल्याने हा स्पेशल वर्ग होणेची भिती नाही. सोवळे ओवळे नाही ही केवळ वेद शिकण्याची शाळा आहे. ज्याला वाटेल त्याने फायदा घेणेचा आहे, कोणाची कोणावर सक्ती नाही.

क्षात्रजगद्‌गुरु पीठाने ब्राह्मण शाहीची अरेरावी वृत्ती बाजूस सारली. पुष्कळ अंशानें समाजात समता उत्पन्न केली. "वेदाला अधिकार फक्त ब्राह्मणाचा" ही आकुंचित वृत्तीची स्मृती ढासळून वाटेल त्याला वेदाची द्वारे मोकळी, हा या पीठाचा पराक्रम आहे. आणि राव पुरोहित हे त्याच मार्गाने आपले काम करीत आहेत. त्याने व्यवहारही सांभाळला आहे. सुधारणा घडवून आणली आहे.

० ० ०

## क्षात्र जगद्‌गुरु पीठ कां निर्माण केले ?

(ता. १८ फेब्रुवारी १९२७)

संन्यास आश्रम :– आयुष्याची ही परमावधी आहे. आपला सर्व देह लोक कल्याणार्थ खर्च करणारा एक मनुष्य जन्मास आला तर तो केवढी क्रांती करतो. परन्तु असा नरवीर दुर्मिळ ! बहुतेक पोटाच्याच पाठी लागलेले असतात. वरील श्लोक आद्य श्री शंकराचार्यांच्या तोंडचा आहे. त्यांत केवढा मोठा अनुभव साठ–विलेला आहे, हे दिसून येईल. खरा संन्यासी पहावयास सुद्धां मिळत नाही. आणि जे थोडे खरे संन्यासी या जगांत आले, त्यांनी विचारक्रांती घडवून आणिली. ! श्री शंकराचार्य, रामानुज, विद्यारण्य स्वामी किंवा आधुनिक कालांतील श्री रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंदजी सरस्वती, म. गांधी यांचा संन्यास आश्रम पहा ! त्यांनी आपला प्रपंच टाकला, पण जगाचा प्रपंच माथ्या–वर घेतला ! अशा थोर विभूतीना इतर गोष्टींची केव्हांही गरज नसते. ते स्वयंप्रकाशित असतात. परन्तु,

मठाची स्थापना हा अवनतीचा आरंभ आहे :– ही परंपरा सुरू झाली की, देश आणि काल यांनी धर्मकार्याला मर्यादा घातलीच, अज्ञ लोकावर छाप ठेवण्याचा हा एक उपाय झाला. स्वतःचे ज्ञान आणि तेज अंगी असणा–ऱ्यांना बाहेरच्या डामडौलाची कांही गरज नाही. खरा संन्यासी असली सोंगे

फेकून देईल. परन्तु मठ आणि पीठ या संस्था अज्ञ लोकांच्या डोळयात धर्माचा भपका भरण्यासाठी उत्पन्न झाल्या. या संस्था म्हणजेच संस्थाने होत. ते सोन्याने मुगुट, त्या रेशमी कफन्या. त्या चांदीच्या खडावा. चांदी सोन्याच्या काठीचे भालदार, चोपदार, त्यांच्या पालख्या, मेणे, रथ, चौकड्या, हत्ती–घोड्याचे लवाजामे, समोर पट्टेवाले, हुद्देवाले, त्यांच्या त्या दिवसा मशाली (हागल दिवट्या,) इतक्या थाटातुन गरीब बिचाऱ्या अज्ञ लोकांची आणि त्यांची गाठ कशाची पडते ? या घोटमाळयात सापडलेले हे धर्मगुरु यांना स्वतःच धर्मशिक्षण, घेण्यास वेळ मिळणे कठिण ! मग लोकांना चार शब्द सांगण्यास त्याना फुरसत कोठून मिळणार ? संन्यास आश्रम आणि त्या थाटमाटाचे अवडंबर याचे समीकरण जुळावे कसे ?

समाजाच्या बाल्यावस्थेत या मठाधीपतीनी कांही थोडे काम केले असेल:– आह्मी नाही म्हणत नाही. वरच्या झकपकीचा परिणाम मनुष्याच्या कातडीवर काहीसा होईल, पण ही बाह्यचिन्हे कातडीतून अंत पोचून हृदयाला कशी पोचणार ? धर्मशिक्षण कसले आणि ज्ञान कसले ? खडाखडी भपक्याचा काय परिणाम होणेचा, तितका झाला. राजाला शोभतील असल्या ऐषआरामांत, लोळत पडायचे आणि इकडे मुंडन करून संन्यासाचे सोंग आणायचे, यांत अर्थ काय आहे ? तो काळ संपला. विद्याशंकर भारती, किंवा दयानंदजी यांच्या नांवावर विकण्याचे दिवस निघून गेले आहेत. आताचा काल उत्क्रांतीचा आहे. मनुष्याच्या अंगी ज्ञान पाहिजे. नुसते ज्ञान आपले पाशी साठवून ठेवणाराही आह्मांस नको आहे. देह झिजविण्याची तयारी पाहिजे. लोकसमुदायात मिळून मिसळून काम करण्याची हौस पाहिजे. आणि जो कोणी भेटेल त्यास आपल्या–पाशी जे असेल ते देऊन टाकण्याची इच्छा पाहिजे. असा पीठाधीश असेल तरच लोक त्याला विचारतील. नाहीतर कोणी त्याची मुर्वत ठेवणार नाहीत. नुसत्या गाडीघोड्याना किंवा पालखी भरजरी अबदागिरीना आता मान मिळणार नाही. आह्मी असे म्हणण्यास तयार आहोत की, यापुढे धर्मपीठे जिवंत ठेवण्याची असतील तर त्यावर बोका सन्यासी नको ! दिडकीच्या हुरमुजाने भगवी छाटी कोणालाही आणि केव्हांही करता येईल. आणि तसेच आंगात तेज असेल तर त्याला रिकाम्या साहित्याचा बोजाही नको.

सक्तीच्या संन्याशाचे खुळ आता पुरे झाले :– तारुण्यात गोसावी बनविणे म्हणजे सृष्टी क्रमाच्या उलट लढाई करण्यासारखे आहे. त्यात त्या बिचाऱ्या पोराचाच पराभव होणार. बुजबुजलेल्या शहरांत वास्तव्य करावयाचे. नव्या नव्या सुधारलेल्या सुखसाधनांत कालक्रमण करावयाचे. अनीतीच्या परिचारकांच्या

किडयांनी गजबजलेल्या संगतीत नांदायचे. अशा प्रतिकूल स्थितीत मी मी म्हणवणारा विरक्त सुद्धां नीतिभ्रष्ट होण्याचा संभव आहे खास. मग एखाद्या अपक्व तरुणाला असल्या दावणीत डांबून टाकले, आणि सदाचरणाची सक्ती केली तर ते जुळणार कसे ? दुसरा मार्ग एखाद्या,

ह्यातान्याला संन्यास देऊन मठपती करणे :– हाही मार्ग चुकीचाच आहे. अनुभवही तसाच कडू आला आहे. युरोप काय किंवा हिंदुस्थान काय, मनुष्य स्वभाव इथून तिथून सारखाच. जी गती रोमन पोपची तीच हिंदू धर्म गुरूंची एखाद्या इसमाने जन्मभर प्रपंच केला, पोरे बाळे झाली, घर जमिनी केल्या, थाटाचा प्रपंच मांडला. असल्या केल्या सवरल्या पोक्ताला सन्यास दिक्षा देऊन मठाच्या गादीवर नेऊन बसविले, तरी प्रकाश तोच पडणार ! जन्मा– पासूनच्यां सवयी सुटत नाहीत. लोभ तुटत नाही, शंका फिटत नाहीत. आणि जगाकडून हसे करून घेण्याची पाळी येते ! हे स्वामी आयत्या पीठावर येऊन बसलेले त्याचे पूर्वाश्रमीचे गणगोत त्याला सोडीत नाहीत. एकदम श्रीमंती वाढल्याबरोबर या नव्या स्वामीचा मोहही चढत्या भाजणीने वाढत जातो. आणि त्यांच्या पहिल्या मुलामुलींचे आप्त इष्टांचे खाजगी खर्चांचे पैसे फळशुभन, बाळंतपण, लग्न मुंजी, असल्या बाबी खर्चाच्या नांवाने मठाच्या रोजकीर्दीवर खर्च पडलेल्या दिसू लागतात. हीं संन्याशाला लाजविणारी अनुचित कामे त्या बिच्याऱ्याच्या गळयांत कां बांधावी ? तरुण असो अगर वृद्ध असो, हा संन्यास आणि हा ऐषआराम याची संगती जोडून देण्याचा कठीण प्रयत्न करण्यांत आज कोणा– लाही यश आले नाही. आणि पुढेही कोणास येईल असे वाटत नाही. मग याला उपाय काय ? आमच्या मते कं. शाहू महाराजांनी हा प्रश्न सोडवला आहे.

पाठगांव क्षात्र जगद्गुरु पीठ निर्माण करून वरील कोडे त्यांनी सोडवले आहे :– श्रीयुत सदाशिवराव पाटील हे एक मराठा विद्यार्थी फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत होते. त्यांची सत्यसमाजाच्या धर्तीची मते, सुस्वभाव सदिच्छा, आणि काम करण्याची हौस ही महाराजांनी पाहून, त्यांना पाठगांव पीठावर नेमून दिले. महाराजांची त्यांना पहिली आज्ञा होती की, देव आणि भक्त यामधील दलाल प्रथम काढून टाकावा. सत्यशोधक समाजाचे हे प्रमुख तत्व आहे. धार्मिक आणि सामाजिक स्वावलंबन व स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यास हे साधन अति उत्तम आहे. हे महाराजांनी पूर्ण ओळखले. पूर्व परंपरा एकदम न मोडता जुन्या नव्याचा योग्य मिलाफ करावा. सर्वांना धर्म स्वातंत्र्य मिळावे, आणि एकदम क्रांती न होता, हळूहळू विचाराची उत्क्रांती होत जावी. हा पाठगांव पीठाचा हेतू असावा, असे आमच्या नम्र समजुतीने वाटते. संन्यास कल्पना पूर्वीच फोल ठरली आहे.

हे जाणून असला अनाचार मठांत दिघू नये म्हणून नव्या मठाधीपतींना महाराजांनी लग्नाची परवानगी देऊन ठेवली होती. आणि देश काल वर्तमान पाहुन या तरुण नव्या क्षात्रजगद्गुरुंने उघडपणे आणि आनंदाने ग्रहस्थाश्रम पत्करला :- हे अगदी योग्य केले असे आम्ही म्हणतो. संन्याशाने चैनीचे कोडे सोडवीत बसण्या-पेक्षा, प्रापंचिक मठाधिपतीने लोकसेवेत देह झिजवावा. हे ध्येय कांही कमी दर्जाचे नाही. संस्थानाचा ते योग्य उपयोग करतीलच. वैदिक पाठशाला, कर्मवीर वर्तमानपत्र, या द्वाराने त्यांनी लोकसेवा चालविली आहे. अलिकडे त्यानी संचा-राला आणि धर्मप्रसाराला सूरवात केली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. बरोबर लवाजामा, गाडीघोडे, हत्ती, पागा, आणि ऑफिसची मंडळी नेणेची नाहीत. पाद्यपुजेसारखी जुनी कृत्यें अजीबात बंद केली. लोकावर बोजा पडू नये, चंदी वैरणीचा सुद्धां त्रास कमी केला. लोकांत मिसळून, धर्म जाग्रतीचे काम करीत राहावे, असा आदेश दिला. स्वतंत्र विचाराला वाव दिला.

* * *

# ऋग्वेद

## ऋग्वेदात आहे तरी काय ?

(ता. २३ नोव्हेंबर १९२८)

वेद हा पवित्र धर्मग्रंथ आहे. तो प्रत्यक्ष परमेश्वराचे मुखांतून बाहेर पडला. आणि तो मंत्र दृष्टया ऋषींनी पाहिला, वेदवाक्य शिरसावंद्य असले पाहिजेच. त्या विरुद्ध कोणीही ब्र काढल्यास, त्याचे अर्थाबद्दल कोणी शंका प्रगट केल्यास किंवा देवाचे तोंडून तो कसा पडला, अशी प्रामाणिकपणेही कोणी पृच्छा केल्यास तो मनुष्य पाखंडी आहे, धर्मभ्रष्ट आहे, तो अवैदिक आहे, वेदबाह्य आहे, नास्तिक आहे, असले प्रहार येणेचा भरपूर संभव. शिवाय दुसऱ्या प्रखर धारेचे शस्त्र ब्राम्हणंतरावर सतत उभे आहे. द्विजाशिवाय इतर कोणीही वेदाध्ययन करणेचे नाही. वेद वाचायचा नाही. कानाने ऐकायचा नाही. कोणी वाचल्यास, ऐकल्यास त्याची जिव्हा तोडणेची किंवा त्याच्या कानात शिशाचा कडकडीत रस ओतणेचा, असा ब्राम्हणी परंपरेचा कायदा आज तागायत अमलात असलेला. अशा प्रकारचे विलक्षण वातावरण आपल्या आजच्या हिंदुसमाजांत उत्पन्न झालेले आहे. तेव्हां आमच्यासारख्या एका ब्राम्हणेतर इसमाचे "ऋग्वेदांत आहे तरी काय?" या गोष्टी ब्राम्हणेतराना सांगत सुटणे हे एक सृष्टीक्रमाविरुद्ध धारिष्टयातले धारिष्टच, अविचार अधर्मातला अधर्म आणि पंचमहाभूतापैकी एक महापातक,

असे कांही जणांना वाटेल. तथापि सर्वच लोक कांही झोपी गेलेले नाहीत. सर्वां-नाच अंधश्रद्धेने पछाडलेले नाही. सारासार विचार आणि सदसद्विवेक बुद्धी समाजांतून अजिबात मेलेली नाही. सत्य जगांत नांदत आहे. या गोष्टीवर आमचा पूर्ण भरंवसा आहे. आणि याच भरंवशावर अवलंबून राहून ऋग्वेदांतील कांही भाग आह्मी जनते समोर मांडणार आहोत.

वेद पौरुषेय आहेत की अपौरुषेय आहेत. असल्या वादग्रस्त प्रश्नावर आह्मी काथ्याकूट करीत बसू इच्छित नाही. कसेही मानले तरी आमची हरकत नाही. त्यात त्रिकाल अबाधित सत्य जर असले तर, वेद माणसांनी लिहिले, असले म्हणून काय झाले ? सत्य हे नेहमी पूज्यच असणार. वेद केव्हां म्हटले गेले, आणि संहिता केव्हां रचल्या गेल्या, याही प्रश्नांचा आह्मी उहापोह करू इच्छित नाही. कै. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें पांच हजार वर्षांपलिकडे ती सूक्ते म्हटली गेली. वेदाचा काल त्या अलिकडे येत नाही. असे मानण्यास आमची कांही हरकत नाही.

येथील आर्यसमाजाच्या एका बैठकीमध्ये एकदा असा प्रश्न निघाला होता की, वेदकालीन सर्व प्रजा सद्गुण संपन्न, निष्पाप, दोषरहित आणि उच्चदशेच्या परमावधीला पोचली होती. आणि त्यानंतर कालगतीने अवनती होत होत समा-जाला हल्ली अगदी निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे. आर्यसमाजाचे हे विधान होते. आह्माला या विधानाबद्दल शंका आली. आमचे म्हणणे की, उत्क्रांतीच्या नियमा-प्रमाणें मनूष्य प्राणी क्रमाक्रमाने पुढच्या पायरीला जात आहे. मनुष्य प्राणी, पापी, दुराचारी होत चालला आहे, हा सिद्धांत आमचे मनाला पटला नाही. खरी स्थिती काय आहे ? याबद्दल पुरावा पहाण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली. ऋग्वेदाशिवाय दुसरा पुरावा कोठे मिळणार ? मूळ, ऋग्वेद, संहिता, दुसऱ्याच्या सहाय्यावाचून, केवळ पद पाठावरून आणि निरुक्तावरून व निघंटुवरून समजून घेणे महाप्रयासाचे तितके परिश्रम करण्याला सवड नाही. आणि तशा कामी यश येईल असे वाटले नाही. मॅक्स मुल्लरसारख्या पंडितानी ऋग्वेदाचे भाषांतर केले आहे. पण ते परकीय लोकांचे. इकडे शं. पां. पंडित श्रुतिबोधकार पटवर्धन, स्वामी दयानंदजी, रमेशचंद्र दत्त यांची कांही भाषांतरे आह्मी पाहिली. डॉ. केतकर सं. ज्ञानकोश यांनी एक दोन पुस्तकेच या कामी खर्च केलेली आहेत. ती वाचून आह्माला साग्र ग्रंथ वाचावा, अशी इच्छा उत्पन्न झाली. ज्ञानकोशाच्या "वेद विद्या" या भागातील टीकात्मक लेख वाचून जिज्ञासा जास्त प्रबल झालीं. पण ऋग्वेदाचे साग्र भाषांतर आह्माला आजवर मिळाले नाही.

# ऋग्वेद

## ऋग्वेदात आहे तरी काय ?

(ता. २३ नोव्हेंबर १९२८)

वेद हा पवित्र धर्मग्रंथ आहे. तो प्रत्यक्ष परमेश्वराचे मुखांतून बाहेर पडला. आणि तो मंत्र दृष्टया ऋषींनी पाहिला, वेदवाक्य शिरसावंद्य असले पाहिजेच. त्या विरुद्ध कोणीही ब्र काढल्यास, त्याचे अर्थाबद्दल कोणी शंका प्रगट केल्यास किंवा देवाचे तोंडून तो कसा पडला, अशी प्रामाणिकपणेही कोणी पृच्छा केल्यास तो मनुष्य पाखंडी आहे, धर्मभ्रष्ट आहे, तो अवैदिक आहे, वेदबाह्य आहे, नास्तिक आहे, असले प्रहार येणेचा भरपूर संभव. शिवाय दुसऱ्या प्रखर धारेचे शस्त्र ब्राम्हणेतरावर सतत उभे आहे. द्विजाशिवाय इतर कोणीही वेदाध्ययन करणेचे नाही. वेद वाचायचा नाही. कानाने ऐकायचा नाही. कोणी वाचल्यास, ऐकल्यास त्याची जिव्हा तोडणेची किंवा त्याच्या कानात शिशाचा कडकडीत रस ओतणेचा, असा ब्राम्हणी परंपरेचा कायदा आज तागायत अमलात असलेला. अशा प्रकारचे विलक्षण वातावरण आपल्या आजच्या हिंदुसमाजांत उत्पन्न झालेले आहे. तेव्हां आमच्यासारख्या एका ब्राम्हणेतर इसमाचे "ऋग्वेदांत आहे तरी काय?" या गोष्टी ब्राम्हणेतराना सांगत सुटणे हे एक सृष्टीक्रमाविरुद्ध धारिष्टयातले धारिष्टय, अविचार अधर्मातला अधर्म आणि पंचमहाभूतापैकी एक महापातक,

असे कांही जणांना वाटेल. तथापि सर्वच लोक कांही झोपी गेलेले नाहीत. सर्वा-नाच अंधश्रद्धेने पछाडलेले नाही. सारासार विचार आणि सदसद्विवेक बुद्धी समाजांतून अजिबात मेलेली नाही. सत्य जगांत नांदत आहे. या गोष्टीवर आमचा पूर्ण भरंवसा आहे. आणि याच भरंवशावर अवलंबून राहून ऋग्वेदांतील कांही भाग आह्मी जनते समोर मांडणार आहोत.

वेद पौरुषेय आहेत की अपौरुषेय आहेत. असल्या वादग्रस्त प्रश्नावर आह्मी काथ्याकूट करीत बसू इच्छित नाही. कसेही मानले तरी आमची हरकत नाही. त्यात त्रिकाल अबाधित सत्य जर असले तर, वेद माणसांनी लिहिले, असले म्हणून काय झाले ? सत्य हे नेहमी पूज्यच असणार. वेद केव्हां म्हटले गेले, आणि संहिता केव्हां रचल्या गेल्या, याही प्रश्नांचा आह्मी उहापोह करू इच्छित नाही. कै. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें पांच हजार वर्षांपलिकडे ती सूक्ते म्हटली गेली. वेदाचा काल त्या अलिकडे येत नाही. असे मानण्यास आमची कांही हरकत नाही.

येथील आर्यसमाजाच्या एका बैठकीमध्ये एकदा असा प्रश्न निघाला होता की, वेदकालीन सर्व प्रजा सद्गुण संपन्न, निष्पाप, दोषरहित आणि उच्चदशेच्या परमावधीला पोचली होती. आणि त्यानंतर कालगतीने अवनती होत होत समा-जाला हल्ली अगदी निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे. आर्यसमाजाचे हे विधान होते. आह्माला या विधानाबद्दल शंका आली. आमचे म्हणणे की, उत्क्रांतीच्या नियमा-प्रमाणें मनूष्य प्राणी क्रमाक्रमाने पुढच्या पायरीला जात आहे. मनुष्य प्राणी, पापी, दुराचारी होत चालला आहे, हा सिद्धांत आमचे मनाला पटला नाही. खरी स्थिती काय आहे ? याबद्दल पुरावा पहाण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली. ऋग्वेदाशिवाय दुसरा पुरावा कोठे मिळणार ? मूळ, ऋग्वेद, संहिता, दुसऱ्याच्या सहाय्यावाचून, केवळ पद पाठावरून आणि निरुक्तावरून व निघंटुवरून समजून घेणे महाप्रयासाचे तितके परिश्रम करण्याला सवड नाही. आणि तशा कामी यश येईल असे वाटले नाही. मॅक्स मुल्लरसारख्या पंडितानी ऋग्वेदाचे भाषांतर केले आहे. पण ते परकीय लोकांचे. इकडे शं. पां. पंडित श्रुतिबोधकार पटवर्धन, स्वामी दयानंदजी, रमेशचंद्र दत्त यांची कांही भाषांतरे आह्मी पाहिली. डॉ. केतकर सं. ज्ञानकोश यांनी एक दोन पुस्तकेच या कामी खर्च केलेली आहेत. ती वाचून आह्माला साग्र ग्रंथ वाचावा, अशी इच्छा उत्पन्न झाली. ज्ञानकोशाच्या " वेद विद्या " या भागातील टीकात्मक लेख वाचून जिज्ञासा जास्त प्रबल झालीं. पण ऋग्वेदाचे साग्र भाषांतर आह्माला आजवर मिळाले नाही.

ही उणीव श्री. चित्राव शास्त्री यांनी दूर केली. " ऋग्वेदाचे संपूर्ण मराठी भाषांतर" हा ग्रंथ लिहून शास्त्रीबुवानी मराठी भाषा जाणणाऱ्या समाजावर फार मोठे उपकार केले आहेत. याबद्दल त्यांचे आह्मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. सायणाचार्य यांचे भाष्य, त्यांनी मुख्य आधारभूत घेतले आहे. आणि तोच आधार बहूतेक विद्वानांनीही मान्य केला आहे. यास्काचार्यांचे निघंटू, निरुक्त, सायन भाष्य वेदार्थ यत्न, श्रृतिबोध, दयानंदजींचे भाष्य वगैरे ग्रंथाचे त्यांनी अवलोकन केले आहे. आणि अखेर आपल्या आर्यसंस्कृतीस धरुन, मराठी भाषेत चालू ग्रंथ जनतेच्या हाती दिला आहे. आमच्या बऱ्याचशा जिज्ञासा या ग्रंथाने पूर्ण झाल्या आहेत. पुष्कळशा शंकांचे निरसन झाले आहे. हा ग्रंथ वाचताना आह्मी ऋग्वेदाबद्दल अवास्तव अंधप्रेम किंवा पूर्ण द्वेष कांहीही मनांत ठेवलेला नाही ! आह्मी ग्रंथाचे वाचन केले, ते असे ऋग्वेद हा आर्यांचा अत्यंत प्राचीनचा ग्रंथ आहे. तो ऐतिहासिक दृष्टया महत्वाचा पुरावा आहे. त्यांच्या विचाराचा परिणाम हिंदुसमाजावर फार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. हे प्राचीनचे आर्य लोक सुधारणेच्या कोणत्या पायरीला पोचले होते, त्यांच्या चालीरिती कशा होत्या, त्यांची नीतिमत्ता त्यांची महत्वाकांक्षा काय होती, त्यांचे खाणेपिणे, त्यांचा व्यापार उद्योग कसे होते, शत्रुशी ते कसे लढत होते, त्यांचेजवळ साधने काय काय होती. त्यावेळची कला कौशल्ये, शिल्प कारागीर, शेतकी गुरे ढोरे वहातुकीची साधने कशी होती ! त्यांचे सद्‌गुण, दुर्गुण, त्यांचे सामर्थ्य, आरोग्य. रोगप्रतिबंधक उपाय काय होते. त्यावेळेचे अनेक गोष्टींचे विश्वसनीय चित्र आपणास कशा प्रकारचे पहावयास मिळते, हे जाणण्यास ऋग्वेदा इतका महत्वाचा दुसरा दस्त ऐवजी पुरावा मिळणार नाही.

श्री. चित्रावशास्त्री यांनी आपली ब्राम्हण परंपरा समोर ठेवून, पवित्र भावनेनें ऋग्वेद पाहिला असेल. पूर्वीच्या अनेक विद्वानांचा अनुभव आणि अनेक पंडितांचे परिश्रम याचा फायदा शास्त्री बुवांनी घेतला आहे. आणि त्यात त्यांनी आपले श्रम खर्च घालून हा अमोलिक "साग्र मराठी ऋग्वेद" त्यांनी महाराष्ट्राला दिला आहे. इतके परिपक्व फल आयतेच तयार होऊन आल्यानंतर त्याचा आह्मी पूर्ण उपयोग करून घेणे योग्य आहे. शंकेची ठिकाणे समोर आली, तर अर्थ बरोबर कळण्यासाठी मूळ संहिता पाहण्यास कांही हरकत नाही. परन्तु प्रत्येकाने मूळ संहिता पाहिलीच पाहिजे. त्याशिवाय भाषांतरित ग्रंथावरुन ऋग्वेदावर कोणी चार शद्ब लिहू नयेत, असे कोणी म्हणेल, तर आह्मी मोठ्या नम्रपणे कळवतो की, तसे करण्यास आह्मी नाकबूल आहोत. लोकांचे मनांत जिज्ञासा उत्पन्न व्हावी, शक्तीप्रमाणें त्यांनी मूळ सूक्ते पहावीत. याबद्दल कोणाचा वाद नाही. पण आम्रफल खाण्याचे, तर ते पूर्वी दुसऱ्यानी लावलेल्या वृक्षाला

आलेले फळ खावू नये, स्वतःच कोय लावावी. खत मूत घालावे, जोपासना करावी आणि मग त्याचे फळ घ्यावे, असे ह्मटल्यास जगाची प्रगतीच खुंटेल. पुर्वीच्या विद्वान लोकांनी आमच्यासाठी कांही गोष्टी तयार करून ठेवल्या आहेत, त्या घेऊन स्वतःचे श्रम, अनुभव आणि बुद्धी त्यांत घालून, सुधारलेले पात्र तयार करून आह्मी पुढच्या पिढीच्या हाती द्यावयाचे आहे. या म्हणण्यांत आह्माला कसला आभिमान वाटत नाही. यात कोणाचा उपमर्द नाही. प्राचीनच्या आर्य लोकांचे ऋग्वेदात दिसून येणारे चित्र, आमच्या दृष्टीने कसे काय दिसते, ते आह्मी अत्यंत नम्रपणाने जनता जनार्दना समोर मांडणार आहोत.

० ० ०

## ऋग्वेद उपयूक्त आहे.

( ३० नोव्हेंबर १९२८ )

आजच्या काळाची साखळी, आजच्या चालीरीतीचे धागे दोरे जितके प्राचीनच आपल्याला पहायला मिळतील, तितके त्या गोष्टीचे महत्व वाटते. एखाद्या कज्यात कांही वादाचा प्रश्न उत्पन्न झाला तर जुना पुरावा जितका असेल तितका तो महत्वाचा मानला जातो. म्हणून कोर्टही तशा दस्तायवजाला मान देत असते. प्राचीनचे राष्ट्र ह्मटले की, स्वाभाविकच एक प्रकारचा मनात आदर उत्पन्न होतो. घराचा पाया जितका खोल असेल, तितके ते घर जास्त मजबूत असते, झाडाच्या मुळया जितक्या खोल गेल्या असतील तितके ते झाड बळकट असते. ऊन, वारा, पाऊस असल्या बाह्य आघाताने ती इमारत अगर ते झाड दाद देत नाही. या दृष्टीने पाहिले म्हणजे भरतभूमीचा इतिहास कितीतरी हजार वर्षाचे मागे जाऊन पोचतो. ही गोष्ट लक्षात येऊन मनाला एक प्रकारचा आधार आणि आशा वाटते. आणि भवितव्यतेबद्दल, चित्त स्थिर होते. भरतभूमीचे संस्कृती इतकी प्राचीन संस्कृती जगांत कोणत्याही राष्ट्राची पहायला मिळायची नाही असे वाटते. आश्चर्यात आश्चर्य असे की, सात आठ सहस्र वर्षांपूर्वीच्या कांही चालीरिती, आचार, विचार, धर्म समजुती आणि मनोभावना जशाच्या तशा या क्षणापर्यंत चालत आलेल्या दिसतात, ही अत्यंत अभिमानाची गोष्ट वाटते. युरोप खंडाचा इतिहास पाहिला तर, रोम, ग्रीसच्या इतिहासापलिकडे तो इतिहास जाऊ शकत नाही. ग्रीस म्हणजे जुन्यांतले जुने राष्ट्र. दुसरी लक्षात घेणेसारखी गोष्ट अशी की, ज्या ग्रीक लोकांचे संस्कृतीबद्दल आधुनिक युरोपीयन राष्ट्रे कौतुक कर-

तात. गोडवे गातात. ती ग्रीक रोमन परंपरा पुष्कळ अंशाने आज नष्ट झाली आहे. स्पार्टा अथेन्सचे लोक, त्यांचे कला कौशल्य, चालीरिती, देवधर्म, हे आज त्या मूळ स्वरुपात पहाण्यास मिळत नाहीत. नव्या काळाच्या प्रवाहाने येशू ख्रिस्ताचे धर्माने ग्रीस रोमची परंपरा आज बिल्कूल उरलेली नाही. इतके रुपांतर झाले आहे की, आजचा ग्रीस, रोम आणि फ्रांन्स, इंग्लंड, जर्मनी हे त्या पूर्वीच्या काळचेच देश म्हणून कोणी सांगितले तर ते खरेही वाटणार नाही. त्या काळच्या एखाद्या इसमाला आजची राष्ट्रे दाखविली तर ती ओळखूनही येणार नाहीत. इतकी त्या प्राचीन संस्कृतीत अमूलाग्र क्रांती झालेली आहे. दुसऱ्या पक्षी आज ती नव्या जोमाची राष्ट्रे इग्लंड, जर्मनी वगैरे, समोर आली आहेत, ती तीनच हजार वर्षांपूर्वी पहावयास गेलो तर त्यांच्या इतिहासाचा पत्ताही लागत नाही, ते लोक त्या काळीही रानावनांत भटकत फिरत होते. गारगोटीची आयुधे करून, शिकार करून, श्वापदे मारून पोट भरीत होते. वस्त्राऐवजी जनावराची कातडी पांघरीत असत, अंगाला रंग लावून रानात फिरत असत आणि पर्वताचे गुहेत किंवा फार तर भिकार झोपडीत आयुष्य कंठीत असत. शेतकी, कलाकौशल्य, त्यांना माहीत नसल्यामुळे त्यांची एका ठिकाणी कायमची वस्ती नसे. शिकार आणि अन्न मिळविण्यासाठी इतस्तत: भटकत फिरत असत. अशी त्यांची दैन्यावस्था असे.

आता आमच्या भारत वर्षीय आर्य पूर्वजाकडे पहा. ऋग्वेदांतील कोणतेही मंडळ घ्या आणि कोणतेही सूक्त पहा. त्यात त्या आर्यांचे चित्र स्पष्टपणे दिसून येते. सात आठ हजार वर्षापूर्वीचे हे आमचे वाडवडील चांगल्या सुधारलेल्या स्थितीत होते, त्यांची संस्कृती उच्च दर्जाची होती. आचार, विचार, चालीरित्ती, धर्मभावना, ह्या बऱ्याच पुढे गेलेल्या होत्या. आणि त्यांची एकंदर मनोवृत्ती बऱ्याच उच्चकोटीला जाऊन पोचली होती. असे आपणाला दिसून येते. युरोपीयन लोकांच पूर्वजाप्रमाणें आमचे पूर्वज अंगाला रंग लावून कधीही फिरत नव्हते. केवळ श्वापदांचे मांसावर त्यांचा उदर निर्वांह नव्हता. त्यांची युद्धे, युद्धाच्या पद्धती, लढण्याची साधने; आयुधे, हत्यारे वगैरे फारच चांगल्या प्रकारची होती. आजच्या आमच्या हिंदुसमाजामध्ये जे उद्योगधंदे दिसून येतात, त्यापैकी अगदी नवीन यंत्रकला, वाफेची साधने वगैरेवर उभारलेले धंदे वगळले तर पुष्कळसे धंदे आजच्यासारखे त्यावेळी चालत होते. शेतीचा धंदा, त्यांची औते, त्याना जोडण्याच्या दोऱ्या वगैरे साधने ही चांगल्या तऱ्हेची होती. रथ होते, रथास चांगले घोडे जोडीत होते. लगाम, तंग, जेरबंद, गोरबंद याची त्याना माहिती होती. रथात बसून लढाईला शिकारीला जात होते. किल्ले बांधीत असत, आणि फोडीतही असत. दोन दोन तीन तीन मजली उंचीची त्यांची घरे असत. घोड्याला

ते दागिने घालीत असत. आणि मौजेची गोष्ट अशी की, आजच्याप्रमाणें त्यावेळी बैलांच्या शिंगाना धातूची टोपणेही घालीत असत. गाई बैलांची खिल्लारे होती. धातूंची त्यांना माहिती होती. त्यांची भांडी वगैरे पदार्थ ते करीत. यज्ञ चाल–विण्या प्रसंगी अनेक जिनसांची सामुग्री लागे. सुतार काम, लोहारकाम, कुंभार काम, दगडी काम, बुरडी जिन्नस वगैरे जवळ जवळ आजच्या स्थितीत चालत होते. वीणकामाचा धंदा त्यावेळी होता. लोकरीची वस्त्रे होती पाकसिद्धी त्यांना चांगली करतां येत होती. थोडक्यात लिहावयाचे तर एखाद्या आजच्या खेड्यात आपण जाऊन पाहिले, तर बारा बलुत्याचे धंदे व कारागीर आज जसे चालू आहेत, तसे त्या वेळी चालू होते. सोनार लोक दागदागीने करीत. इतकेच नव्हे तर कांही ठिकाणी मोत्यांचेही दागिन्यांचा उल्लेख आलेला आहे.

ऋग्वेद आपण येथून सर्व पाहिला तर त्यात त्यावेळचे ऋषी म्हणजे गृहस्थ यांच्या देवता व धर्मांच्या कल्पना विशेष लक्षात येण्याजोग्या दिसून येतात. पश्चिमेकडून हे आर्य लोक पंजाबात आले असावेत. ऋग्वेद कालची वस्ती विशे-षतः पंजाबात होती. निदान ऋग्वेदकाली तरी त्यांचा प्रसार पंजाबाबाहेर झाला नव्हता. चोहोकडे अनार्य लोकांची शत्रूंची राज्ये होती, ते अनार्य लोक सामर्थ्याने संपत्तीने व लोकसंख्येने फार प्रबळ होते. आर्यांची लोकसंख्या त्या मानाने थोडी होती. या अडचणीत या परकीय आर्य लोकांनी स्वसंरक्षण आणि शत्रुंचे हल्ल्या-पासून तारण करून घेण्याचे, हा फार कठिण प्रसंग होता. केवळ स्वतःचे सामर्थ्यावरच अवलंबून भागणार नाही. म्हणून ते देवाना शरण जात. आणि कळवळ्याने देवतांना पाचारण करीत.

त्यांच्या देवता म्हणजे बहुतेक सृष्टीमध्ये दिसून येणाऱ्या महान शक्ती, याच होत. इंद्र, वरुण, अग्नी, द्यावा पृथ्वी, मित्र मरुत, अश्विनी, उषा, वगैरे. म्हणजे ज्या घडामोडी दिसून येतात. ज्या शक्तींचा आकार व सामर्थ्य अफाट आहे अशा शक्तीची ते मदत मागीत असत. इंद्र ही त्यांची मुख्य आराध्य देवता होती. ढग, वीज, पाऊस, हे चमत्कार एका रूपकाने त्यानी कल्पून त्यांची प्रार्थना केलेली आहे. ढग हा एक भयंकर राक्षस आहे ! त्याने पाणी कोंडून ठेवलेले आहे. त्या राक्ष–साचे नाव अही किंवा वृत्र असे ठेवले आहे. इंद्राने मोठी गर्जना करून हातात वज्र घेऊन विजेच्या कडकडाटानें ढग फोडून टाकले. त्या शत्रुंची शहरे व किल्ले ( ढगात दिसून येणारे? ) जमीनदोस्त करून टाकले, आणि बंदीखान्यात घातलेले पाणी मोकळे करून, पर्जन्य रूपाने पृथ्वीवर आणले ! आणि या लोकांचे कल्याण केले. अशा प्रकारची रुपके सर्वत्र दिसून येतात. पर्जन्यरूप पाण्याला केव्हां केव्हां गाईचे रूपक दिलेले आहे. इंद्राने पूर्वी केलेले पराक्रम अनेक सुक्तातून गाईले

आहेत. ग्रीक रोमन लोकामध्ये युद्धाची देवता होती. त्याचप्रमाणें या आर्यांची इंद्र ही रणदेवता आहे. त्याच्या आधारावर दस्युबरोबर अनेक युद्धे करून त्याना जय मिळाले आहेत.

या इंद्रादी देवताना बोलावण्याचे, स्तवण्याचे, त्यांची प्रार्थना करण्याचे मार्ग कांही ठरीव दिसतात. अग्नी ही त्यांची आवडती गृहदेवता आहे. लाकडावर लाकूड घासून (अरणी) ते अग्नी उत्पन्न करीत. त्यांच्या देवताना बोलाविणारा दूत हा अग्नी आहे. त्यांच्या द्वाराने ते इंद्राला वगैरे आमंत्रणे करीत. कुंड तयार करायचे, त्यात अग्नी पेटवावयाचा, त्यांत तुपाच्या वगैरे धारा सोडायच्या, त्यात आहुती टाकायच्या. तोंडाने मंत्र म्हणायचे आणि देवाजवळ मागणी मागायची. गाई, बैल, घोडे, धनधान्य, मुलेबाळे, ही त्यांची ठरीव मागणी असे. इंद्रांने येऊन शत्रुंचा नाश करावा ही त्यांची प्रार्थना असे. इंद्र वगैरे देवताना वश करून घेण्याचे त्यांचे मुख्य महत्वाचे साधन म्हणजे सोमरस ! ही एक वनस्पती, हिमालयात कोठे तरी असावी. स्त्रिया दगडानी तो सोम कुटीत. लोकरीचे वस्त्रातून गाळीत. त्यात दूध, दही, मध वगैरे मसाला घालून ते मधूर करीत. इंद्राला त्या सोमरसाचे केवळ वेड होते ! ती निशा आणणारी औषधी होती त्याला तो अगदी लुब्ध होऊन जाई. तुडुंब पिऊन तो युद्धास निघाला की शत्रुंचा तो चुराडा करून टाकी! ही सोमवल्ली वस्तुतः कोणती आहे. याचा आज बरोबर पत्ता लागत नाही. असो.

इतक्या कालापूर्वी यांत्रिक साह्य नसताना, आकाशांतील ताऱ्यांचे अवलोकन ऋषीनी चांगले केलेले दिसते. पुष्कळ ताऱ्यांची व त्यांच्या गतीची त्याना माहिती होती. ऋग्वेदात अधिक मासाचा उल्लेख आलेला आहे. यावरून वर्ष मापन करुन काल गणतीची मांडणी चातुर्यांने केलेली दिसून येते. एके ठिणाणी इंद्र विमानातून आला असा उल्लेख आहे. यावरून त्यावेळी विमाने होती. असे अनुमान काढता येईल. विमानाची प्रक्रिया काय होती. ती कशी करीत असत. याची मात्र माहिती कोठे आलेली नाही.

० ० ०

## ऋग्वेदातील मंत्र तंत्र, वैद्यशास्त्र.

( ७ डिसेंबर १९२८ )

ऋग्वेदात मंत्राच्या मार्गाने, देवतेच्या सहाय्याने रोग निवारण करण्याचा प्रघात होता. याशिवाय औषधी किंवा वनस्पती यांच्या उपयोगाने आजार बरे करीत. पाण्यामध्ये रोग निवारण शक्ती आहे. हे त्यांना ज्ञात होते. शिवाय उष्णता आणि वायू यांचाही परिणाम देहावर चांगला होतो. हे त्यांना ठाऊक होते. शस्त्रक्रियेचा उल्लेख ऋग्वेदात आलेला आहे. कोणाचा हात मोडला किंवा पाय मोडला तर ते शस्त्रक्रियेच्या साधनानी जोडीत असत. एका ठिकाणी आश्चर्याची हकीकत आलेली आहे! जखमी झालेल्या मनुष्याच्या अंगातून किंवा त्या जखमेतून रक्त बाहेर बिलकुल न जाईल, अशा कौशल्याने ते शस्त्रक्रियेचे काम करीत असत.

त्यांच्या देवता म्हणजे सृष्टीत निसर्गाचे काम करणाऱ्या शक्ती. सूर्य, वायू, समुद्र, पृथ्वी, प्रभात याना त्यांनी इंद्र, मरुत, उषा, वगैरे नांवे दिलेली आहेत. हा उल्लेख वरती आलेला आहे. याना देवता कल्पून, त्यानी जी त्या शक्तीची वर्णने केलेली आहेत; ती पहाण्यासारखी आहेत, त्यात प्राचीन ऋषींची प्रतिभाशक्ती, सूक्ष्म अवलोकन, काव्य कल्पना, आणि वर्णन करण्याचे कौशल्य फार उच्च दर्जाचे होते, असे दिसून येते. इंद्राचा पराक्रम, मरुतांचा सर्वत्र विहार, आणि उषेचा म्हणजे प्रभात समयी आकाशातील पूर्व दिशेचा रमणीय देखावा, आणि नानातऱ्हेचे दृष्टांत पाहिले म्हणजे त्यांच्या बुद्धीबद्दल नवल वाटल्या वाचून राहणार नाही. विशेषतः उषादेवीचे काव्यपूर्ण सुंदर वर्णन मनाला कांही वेळ तरी आकर्षण करून सोडील. ऋग्वेदाचे दहावे मंडलामध्ये तत्वज्ञानासंबंधी कांही उल्लेख आलेले आहेत. ऋषी ज्या देवताची प्रार्थना करीत, त्या देवता म्हणजे कोणी विशिष्ट व्यक्ती अगर वीरपुरुष नव्हते. निसर्गातील शक्तीवरच त्यानी देवतेचे रूपक केले. तथापि या अनेक शक्ती म्हणजे अनेक देव होते किंवा ते एकमेकांपासून वेगळे तुटक, निसर्ग शक्ती किंवा वेगळे देव होते असे नाही. या सर्व प्रचंड शक्तीना उत्पन्न करणारी, त्यांची व्यवस्था लावणारी, त्या सर्वावर अंमल चालवणारी अशी एक महाशक्ती किंवा परमेशशक्ती पाहिजे. आणि ती एकच शक्ती हाच खरा परमेश्वर, ही कल्पना त्याना आलेली होती. केवळ त्या एका महाशक्ती वर सर्व जग अवलंबून आहे. त्या विशाल शक्तीवर अवलंबून आणि त्या धोरणाने सृष्टीतील व्यवहार चाललेले आहेत. हे त्यांनी जाणलेले होते. जीव, आत्मा, सृष्टीची उत्पत्ती, परमात्मा याही गोष्टींचा त्यानी विचार केलेला दिसतो. निदान

पुढील काळात उपनिषदे जनकादि राजाचे निष्काम कर्मयोग आणि उपनिषदाचे सार, भगवान श्रीकृष्णानी सांगितलेली श्री भगवत् गीता यांची अंधुक किरणे आणि त्रोटक बीज ऋग्वेदामध्ये दिसून येते. आता हे प्राचीनचे आर्य लोक शत्रूनी चोहोकडून घेरले असल्यामुळे आपला निभाव कसा लागतो आणि भारतात आपला पाय कसा स्थिर होतो, या विवंचनेत अहर्निश असल्यामुळे तत्वज्ञानाची पद्धतशीर रचना शास्त्र या दृष्टीने करण्यास त्याना फुरसत मिळाली नाही. त्यांचा नेहमी ओढा प्रपंचाकडे, धन संपादनाकडे होता. निवृत्ती मार्गाचा उपदेश ऋग्वेदात कोठे आढळत नाही, आणि उपनिषदाचा किंवा वेदांत तत्वज्ञानाचा अर्थ विपर्यास होऊन आणि शंकराचार्यांचे मायावादाला कांही लोकांनी भलतीच दिशा दाखवून राष्ट्राला दैववादाची दिशा दाखविली, आणि उदासीनतेचे बिजारोपण केले, तसल्या कल्पनेचा ऋग्वेदात मागमूसही दिसून येत नाही.

राजा, राष्ट्र, साम्राज्य स्वराज्य या विचाराचाही ऋग्वेदात उल्लेख आला आहे. स्वराज्याची कल्पना त्याना होती. राजा हा लोकावरच अवलंबून असला पाहिजे. लोकानी मान्य केला तरच तो राजा या पदाला प्राप्त होईल. राष्ट्राचे रक्षण करणे, हेच राजाचे मुख्य कर्तव्य आहे. राष्ट्राचे रक्षण त्याच्याने करवणार नाही तर तो त्या पदापासून भ्रष्ट होईल. असलेही या कालाला शोभणारे विचार आढळून येतात !

आजच्या सामाजिक चालीरीतीचा आणि संस्काराचा उगम त्या कालापर्यंत जाऊन पोचतो. ही गोष्ट लक्षात घेणेसारखी आहे. विवाह संस्कार आजच्या सारखेच त्याकाली होत होते. स्त्रियांचा दर्जा मोठा होता. यज्ञकर्मांमध्ये स्त्रिया भाग घेत असत. कांही सुत्रे स्त्रियांचे नांवावर दाखल झालेली आहेत. मृत संस्कार आजच्या सारखेच होत होते. प्रेत दहनही करीत होते. आणि पुरीतही होते. अशा दोन्ही चालींचा उल्लेख येतो. पतीचे शवाबरोबर पत्नी आपला देह जाळुन घेत असे. ही सतीची चाल त्यावेळीही होती. परन्तु पुरुष त्याना त्या कृत्यापासून परावृत करुन प्रपंचाचे मार्गास लावण्याचाही प्रयत्न करीत. त्या पुष्कळशा चालीरीती आणि संस्कार आज तागायत चालत आलेले आहेत. अशी अव्याहत परंपरा अन्य राष्ट्रात क्वचितच आढळून येते.

क्षत्रिय आणि ब्राम्हण हे शद्ब वारंवार आढळून येतात. क्षत्रिय हे यजमान होत. यज्ञाचा खर्च, दानधर्म जबाबदाऱ्या क्षत्रिय पत्करीत होते. आणि ब्राम्हण हे पुरोहिताचें काम करीत होते. ऋचा तयार करणे, मंत्र म्हणणे, देवाना पाचारण करणे, आहुति टाकणे ही कामे पुरोहित वर्ग करीत असे. तथापी नेहमीच असे

२०५४६
२३५८



होत असे, असे नाही. अनेक सुत्रे क्षत्रियांनी रचलेली आहेत. आणि ते स्वतःही यज्ञाची कामे चालवीत. ब्राम्हण मुख्यतः दान दक्षिणा घेत असत. ही गोष्ट आज तारखेपर्यंत चालू आहे. ब्राम्हण वर्ग त्याकाळी शत्रुवर चालून जाऊन लढाई करीत असे; ही गोष्ट विशेष लक्षात घेणेजोगी आहे ! सर्वत्र क्षत्रिय आणि ब्राम्हण यांचे नांवाचाच उल्लेख ऋग्वेदांत दिसून येतो. शुद्र हा शद्ब नऊही मंडळात कोठें आढळत नाही. फक्त अखेरच्या दहाव्या मंडळामध्ये पुरुष सुक्तांत विराट पुरुषाची अथवा राष्ट्राची जी रुपकाने कल्पना मांडलेली आहे. त्यात मात्र शूद्र शद्ब आलेला आहे, आणि अनेक विद्वान लोकांचे असे म्हणणे आहे की, हे मंडळ फार मागाहून रचले असावे. आर्य आणि अनार्य यांचा संबंध घडून आला असावा. उभय संस्कृतीचा मिलाफ झाल्यावर हे मंडळ बनले असावे. नाही तर शूद्र या शद्बाला आर्य संस्कृतीमध्ये जागा देण्याचे कारण नव्हते. असो. कांही सुक्तामधून या देशातील मूळचे राहणारे जे लोक होते, त्यांचे वर्णन दिसून येते. त्याना दास, दस्यू, अनार्य, अधार्मिक, अयाज्ञिक, काळे, लिंगपूजक, नास्तिक अशी तिरस्काराची नांवे दिलेली आहेत. आणि 'त्यांचा नाश कर, ठार कर, त्याना यज्ञात येऊ देऊ नकोस, त्या दुष्टांचा ताबा आमचेवर बसवू देऊ नकोस' अशी इंद्रादि देवाजवळ प्रार्थना केलेली दिसून येते.

कांही चमत्कारिक समजूती त्या काळी असल्याचे दिसून येतात. मग त्या मुळच्या आर्य लोकांच्याच होत्या की अनार्य लोकांच्या यांच्यात शिरल्या, हे सांगता येणे कठीण आहे. रोगावर शस्त्रक्रिया आणि वनस्पतीची औषधे देत असत. हे वरती आलेच आहे. परन्तु मौजेची गोष्ट अशी दिसते की, रोग नाहीसे व्हावेत म्हणून ते मंत्रही म्हणत असत. क्षय रोग नष्ट व्हावा म्हणून कांही सुक्तेही म्हटलेली आहेत. गर्भ सुरक्षित रहावा म्हणुनसुद्धां कांही सुक्तेही म्हणत असत. वाईट स्वप्ने पडली तर त्याचा परिणाम होऊ नये, म्हणून सुक्ते म्हटली जात असत. पारवा आणि घुबड हे त्या काली सुद्धां अशुभ मानीत ! पारवा घरात शिरल्यास त्या घराच्या माणसावर, पशुवर अपमृत्यु येतात. अशी समज होती ! सवती मत्सर आजचे सारखाच त्या कालीही होता. धननाश करणारी एक विद्रुप देवी होती, औदसीचा फेरा आला म्हणजे संपत्ती नष्ट होते. संततीचा नाश होतो. त्या देवतेचा आवाज मोठा कर्कश आहे, त्याचे शांतीबद्दल सुक्ते म्हणत असत. सवतीचे वाटोळे व्हावे म्हणून सुद्धां सुक्ते आहेत ! असो.

वरीलप्रमाणें ऋग्वेदातील आमच्या वाचनात ज्या गोष्टी आल्या, त्याचा थोडक्यात गोषवारा दिलेला आहे. ऋग्वेद एक ज्ञानाचा सागर आहे, असे म्हणतात ते कांही खोटे नाही. आजच्या हिंदू समाजाचे चित्र आज जे आपल्यास दिसून

येते, त्यातील बऱ्याच चालीरीतींचे मूळ ऋग्वेदात सापडण्याजोगे आहे. आमची दृष्टी एवढीशी, त्यातून आह्मांला ज्या कांही गोष्टी दिसून आल्या, त्या सरळ बुद्धीने जशा दिसल्या तशा ठेवल्या आहेत. अनेक सुक्ते अशी आहेत की, त्यांचा अर्थ मुळीच कळत नाही. कदाचित त्यांचा अर्थ कांही विद्वान म्हणतात त्याप्रमाणें गूढही असेल. पण ते गूढ जोपर्यंत उमगले नाही, तोपर्यंत आहे तसा सरळ, उघड, वाच्यार्थ घेऊन चालण्यास कांही हरकत दिसत नाही. पुढेमागे कांही विशेष साधने उपलब्ध झाली तर तसल्या गूढ सुक्तावर प्रकाशही पडणे संभव आहे. आमची इच्छा इतकीच आहे की, वेदाचा अर्थ कळत नाही हे ज्ञान फार गूढ आहे. वगैरे कल्पनेने भांबाऊन, स्वस्थ राहण्यापेक्षा आपल्या समजुतीने जो सरळ अर्थ दिसत असेल, तो मांडणे योग्य होईल. आजपर्यंत विचित्र संस्कृतीचे परिणामाने वेद ब्राम्हणेतराना पारखे झाले होते. मूळ वेद संस्कृत भाषेत, आणि ते संस्कृत अत्यंत प्राचीन. आजची संस्कृत भाषा वाचण्यास व समजण्यास जशी सोपी आहे, तशी वेदाची भाषा नाही. जर्मन, इंग्लिश, पंडितानी त्यांची भाषांतरे केली आहेत. परन्तु ती सार्वत्रिक उपयोगाची नाहीत. हिब्रू आणि लॅटिन भाषेमध्ये बायबल ग्रंथ होता, त्याचे भाषांतर मॉर्टिन लुथरचे काली चालू जिवंत भाषेत झालेमुळे जसे युरोपखंडाला नवजीवन प्राप्त झाले, आणि धर्मक्रांती झाली, तसाच प्रकार या मराठी भाषांतरांचा आहे. समग्र ऋग्वेदाचे मराठी भाषांतर आजवर झाले नव्हते. ते चित्रावशास्त्री यांनी करून त्यांनी महाराष्ट्रावर फार उपकार केले आहेत. अशी आम्ही आनंदाने कबुली देतो. ब्राह्मणेतर वर्ग आजपर्यंत ऋग्वेदास पारखा झाला होता. पण या मराठी भाषांतराने ऋग्वेद, निदान त्यातील मतलब समजण्यास सुलभ झाले आहे. याचा फायदा असा विशेषत: ब्राह्मणेत्तर वर्गाने घ्यावा. आणि आम्ही आजचे हिंदु म्हणविणारे लोक आठ हजार वर्षापूर्वी कसे होतो आणि आज कसे आहोत, याचा तुलनात्मक दृष्टीने विचार करावा. अशी आमची आग्रहाची शिफारस आहे.

० ० ०

## ऋग्वेदातील लिंगपूजा

(ता. १५ फेब्रुवारी १९२९)

युरोप खंडात ग्रीस आणि रोम ही प्राचीनची राष्ट्रे होऊन गेली. ग्रीस हे राष्ट्र पूर्वीचे. त्यानंतर रोमन राष्ट्राचा उदय झाला. रोमने ग्रीसला जिंकले. जरी रोमने शक्तीने जिंकले, तरी वस्तुतः बुद्धिसामर्थ्याने आणि संस्कृतीने

ग्रीसनेच रोमचा पाडाव केला आहे. कारण त्यापुढे जो इतिहास सुरू झाला, त्यावरून असे दिसून येते कीं, ग्रीसच्या चालीरीती, कलाकौशल्य तत्वज्ञान, धर्म समजूती यांचा पगडा उलट रोमन लोकावरच झाला. यासाठीच इतिहासकार मौजेने लिहीत असतात की, विजयी रोमन लोकांना पराजित ग्रीक लोकांनीच जिंकले आहे.

थोड्याबहुत प्रमाणानें तसलाच प्रकार प्राचीनकाळी या आपल्या आर्यावर्तांत घडून आलेला दिसतो. मूठभर मूळचे आर्यलोक प्रथम पंजाबात आले. ते एशियातून येवोत किंवा कै. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें उत्तर ध्रुवाजवळून " आर्क्टिक होम " मधून येवोत, त्याबद्दल चर्चा करण्याचे कारण नाही. हे आर्य लोक उच्च संस्कृतीचे होते याबद्दल वाद नाही. व त्यांची बुद्धिमत्ता श्रेष्ठप्रकारची होती याबद्दलही पुरावा भरपूर आहे. परन्तु महत्वाचा प्रश्न हा आहे की, इतक्या देशावर येऊन बरोबरीच्या आणि बलवान अशा येथील रहिवाश्यांच्या म्हणजे अनार्यांचा त्यानी पराभव करावा, हा चमत्कार कसा घडून आला. उभय पक्षकार समबल होते. लोकसंख्येने आणि इतर साधनानी मूळ अनार्य लोक बलवत्तर असले पाहिजेत. मग वैदिक आर्यांनी अवैदिक अनार्यांचा पराभव कसा केला ते मोठे गूढ आहे, या भिन्न लोकांच्या समजुती अगदी भिन्न होत्या. अलिकडील काळात भिन्न संस्कृतीचे लोकांची गाठ पडलेली उदाहरणे आहेत. कोलंबसाला अमेरिका सापडली. धनधान्य समृद्ध अमर्याद भूमी हस्तगत झाली. युरोपखंडातून खिरस्ती लोकांच्या झुंडीच्या झुंडी अमेरिकेत कायमच्या येऊन राहिल्या. नवीन वसाहती स्थापन केल्या. अमेरिकेत मूळचे राहणारे कायमचे लोक होते. त्यांची संख्या कमी होती. त्यांच्यात सुधारणा नव्हती. रानटी स्थितींत होते. अशा संस्कृतीची गाठ तेथे पडल्या नंतर भूमीसाठी आणि पोटासाठी झगडा सुरू झाला, युरोपीयन लोक उच्च दर्जाचे होते. त्यांच्या जवळ यशाची साधनेही भरपूर होती. या लढ्यामध्ये युरोपच्या लोकांनी तांबड्या अमेरिकन इंडियन लोकांचा पूर्ण पाडाव केला. त्या गरीब रानटी लोकाना केव्हां हाकलून दिले, केव्हां धरून कामाला लावले. केव्हा पशूंची शिकार करतात, त्याप्रमाणें गोळ्या घालून ठार केले. आणि आज सर्व अमेरिका युरोपच्या खिरस्त धर्मिय लोकांच्या हाती गेली. मूळचे लोक जवळजवळ नामशेष झाले. आणि आज जे कांही उरलेले दिसतात, त्यानी खिरस्ती धर्म स्वीकारला आहे आणि युरोपीयन संस्कृती पत्करली आहे.

आता आपल्या आर्यावर्तांत काय परिणाम घडले ते पहा. अनार्य लोक लेचेपेचे नव्हते. ते पद्धतशीर युद्ध करणारे लोक होते. त्यांची मोठमोठाली राज्ये व नगरे होती. त्यांची कला कौशल्य. सुधारणा, निर्वाहाची साधने चांगल्या प्रकारची होती. अशा लोकांचा पराभव करणे वैदिक आर्यांना फार कठीण गेले असले पाहिजे.

आमच्या समजुतीने येथील मूळच्या अनार्य लोकांच्या धर्म समजुती तंत्र पद्धतीच्या होत्या. मोठ मोठ्या उग्र देवता भक्ताला सामर्थ्य देणाऱ्या त्यांच्यात, असा-व्यात. याणि लिंगपूजाही त्या तंत्र पद्धती पैकीच एक असावी. लिंगाच्या मूर्तीपुढे आराधना करून त्याला प्रसन्न करून घेऊन, शत्रुवर हल्ले करावेत, असा प्रघात त्यांच्यात असावा असे दिसते. अनार्यांचा मार्ग तंत्राचा तर आर्यांचा मार्ग मंत्राचा हे दोन्ही मार्ग वैदिककालाचे पूर्वी अस्तित्वात असावेत. मंत्र संस्कृती म्हणजे आमच्या मते अग्नीकुंड पेटवून, तोंडाने मंत्र म्हणावे, त्या मंत्रात गूढ सामर्थ्य आहे अशी कल्पना करावी, काल्पनिक सृष्टिदेवता इंद्र वरुणादि भौतिक शक्तीचे देव मंत्राच्या सामर्थ्याने आकाशातून दोरी लावल्याप्रचाणे ओढून आणता येतात, त्याना अन्नाच्या आहुती, तुपाचे आणि सोमरसाचे भरपूर पेय अर्पण केल्याने देव प्रसन्न होतात, युद्धामध्ये आपल्या बाजूने हे देव प्रसन्न होतात. युद्धामध्ये आपल्या बाजूने हे देव लढत रहातात. शत्रूचा पाडाव करतात. अशी त्यांची समजूत होती. ती त्यांची समजूत खरोखरीच परिणामकारक होती की काय ? इंद्र त्यांच्या करता वज्र हाती घेऊन त्यांचे बाजूने लढत होता की काय ? हे प्रश्न आज घोटाळ्याचे आहेत, विसावे शतकातील लोकाना हे काय खूळ आहे. असे वाटेल ! इंद्र येतो काय, सोमरस पितो काय, आणि या वैदिक आर्याना धनधान्य गाई, बैले घोडे देतो काय, हा साराच चमत्कार वाटतो. पण आजकालची कसोटी वेदकाळाच्या आर्यांना लावणे प्रशस्त होणार नाही. कदाचित त्यांच्या समजूती प्रामाणिकही असतील. कदाचित भपक्याच्या मार्गाने शत्रूला भुरळ घालण्याच्याही असतील. कांही असो ही मंत्र संस्कृती आणि अनार्यांची तंत्र संस्कृती परस्पर विरुद्ध होत्या इतके मात्र स्पष्ट दिसते.

अनार्यांच्या अनेक चालीरीती पैकी लिंगपूजा ही एक होती, हे खास आणि ती लिंगपूजा आर्यांना बिलकूल मान्य नव्हती हेही खास. कसलीच मूर्तिपूजा आर्य लोकामध्ये नव्हती. अनार्य मूर्तीपूजक होते. निदान लिंगाचे ते पुजक होते यात शंका दिसत नाही. आणि त्या लिंगपूजकाचे कट्टे शत्रू वैदिक आर्य होते. या लिंग-पूजकाचा नायनाट व्हावा. त्याना देवाने नाहीसे करावे, ही आर्यांची प्रबळ इच्छा होती. आणि या कार्यासाठी आकाशातील देवतेना ते हाक मारीत असत. याबद्दल आम्ही पुढील दोन ऋचा देत आहोत.

ऋ. मंडळ ७ सूक्त २१ ऋचा ५ :- "हे इंद्रा राक्षसानी आम्हाला ठार करु नये आम्ही तुला ज्ञानपूर्वक नमुन आहोत. तू आमचा धनी दुष्ट लोकावर सत्ता चालविण्याविषयी उत्सुक असतोस" लिंगपूजक आमच्या यज्ञात न येवोत. यापैकी लिंगपूजकाबद्दल दाखविलेला तिटकारा लक्षात घेणे सारखा आहे.

मंडळ १० वे, सूक्त ९९ ऋचा ३– " युद्धाला जाणारा इंद्र सरळपणाने चालून जातो आणि शत्रूला लुटीत तो युद्ध करीत असतो. युद्धातून मागे न फिरणारा, आणि लिंगपूजकांना ठार करणारा इंद्र शंभर द्वारांची नगरे फोडून धन लुटतो. "

० ० ०

## लिंगपूजा आर्यांची की अनार्यांची.

(ता २२ फेब्रुवारी १९२९)

आर्यांचे यज्ञात लिंगपूजकानी येऊ नये, त्या लोकाना इंद्राने मारून टाकावे ही आर्यांची प्रार्थना आहे. यावरून सरळ अनुमान निघते की, वेदकाली आर्य लोकामध्ये लिंगपूजा बिलकुल नव्हती आणि त्यांच्या अनार्य शत्रुमध्ये ती होती. यात शंका राहत नाही, हे लिंगपूजक प्रबळ होते. चांगले सुधारलेले होते. असे आह्मी म्हणतो याला पुरावा आहे. कारण इंद्राने शंभर द्वाराची नगरे फोडली, असा जो पराक्रम केल्याचे वर्णन आहे, ती लिंगपूजकांची, अर्थात अनार्यांची होती, हे उघड आहे. असल्या बलवान आणि सुधारलेल्या अनार्य लोकाबरोबर टक्कर देण्याचा प्रसंग त्या कालच्या आर्य लोकावर आलेला होता. पुढे हे आर्य व अनार्यांचें युद्ध, या भिन्न संस्कृतीचा झगडा हजारो वर्षे चालू असला पाहिजे. आज आह्मी साऱ्या भरत खंडाला हिंदुस्थान असे नांव देतो, मोठ्या अभिमानाने हिंदुधर्मीय म्हणवून घेतो. वेदाची अखंड परंपरा आह्मी आजकाल चालू ठेवलेली आहे, असे, जगाला सांगत असतो. आर्यांनी अनार्यांना जिंकले. आर्यांची उच्च संस्कृती त्या अनार्य लोकावर घातली. अनार्यांना नाहीसे केले किंवा त्यांना आत्मसात केले असे म्हणताना आह्मी डौल मारतो आणि आपल्या संस्कृतीचे गौरव करतो. ही संस्कृती कोठे आहे? सर्व हिंदुस्थान धुंडाळले तरी शिवलिंगाचे स्थान नाही, असे एक खेडेगांव सुद्धां मिळणार नाही. ती अनार्यांची लिंगपूजा आमच्या देवालयात, आमच्या घरांत, देव्हाऱ्यावर सर्वत्र स्थापन झालेली आहे. लिंगपूजा करीत नाही, असा एकही हिंदु गृहस्थ मिळणार नाही, ही जी अकल्पित क्रांती आमचे धर्म समजुतीत घडून आली, ती कशी आणि कशाने आली? आमचे पूर्वज वेदकालचे आर्य. ज्या लिंगपूजेचा निषेध आणि हाडीमासी शत्रुत्व करीत होते, ज्या लिंगपूजकांचे दर्शन घेण्यासही तयार नव्हते. ज्या लिंगपूजकाना यज्ञ मंडपाचा स्पर्शही लावू न देण्याबद्दल पराकाष्टा करीत होते, तेच आजचे, त्या आर्यांचे वंशज बिनदिक्कत, मोठ्या अभिमानाने ती लिंगपूजा गौरवाने करींत आहोत. हा काय

चमत्कार !! आह्माला आर्य असे नांव कसे देण्यांत येईल? स्वत: आह्मी लिंगपूजक बनून अनार्य लोकांचा द्वेष करणे कसे रास्त होईल? हीं दोन्ही चित्रे उघड डोळयाने आज पहाण्यासारखी आहेत.

वरील क्रांतीचा खुलासा आमच्या मते खालीलप्रमाणें आहे. बरोबरीच्या प्रबळ शत्रूंची गाठ पडली म्हणजे आपल्या अस्तित्वासाठी आपण जिवंत रहावे म्हणुन तडजोड करणे भाग पडते. अशी आर्य आणि अनार्यामध्ये झालेली आहे. ही एक प्रकारची देवघेव आहे, कदाचित पुढील काळी आर्य या नांवाऐवजी हिंदु हे नांव घेतले असावे. या हिंदू नांवाखाली बरेच अनार्य लोक सामिल झालेले असतील. ' हिंदु ' या नांवाचा शिक्का या अनार्यांवर घातला, याचा मोबदला त्या अनार्यांच्या कित्येक चालीरीती आर्य लोकांनी पत्करल्या. त्यातच अनार्यांची लिंगपूजा आर्यांनी आपल्या धर्मसांप्रदायांत, आपल्या देवघरात, फार काय आपल्या गळयात ही अडकवून घेतली !

आद्य श्री शंकराचार्य चारी वेद, सहाशास्त्रे, आठरा पुराणे यात पारंगत होते. त्यांचे ग्रंथ पाहिले असता दिसून येते की, अन्य मताचा पाडाव करण्यात ते अत्यंत निष्णात होते. त्याना वैदिक मताचा अत्यंत अभिमान असलाच पाहिजे असे असून सुद्धा अनार्याची लिंगपूजा मुकाटयाने त्यांना पत्करावी लागली इतकेच नव्हे तर शृंगेरी, द्वारका वगैरे हिंदुस्थानच्या सीमेवर त्यांनी लिंगाची स्थापना करुन शत्रूंच्या संस्कृतीपुढे मान वाकवणे त्यांना भाग पडले. हा प्रभाव कोणाचा? म्हणूनच आमचा पहिला प्रश्न अखेर होत आहे. की, आर्यांनी अनार्यांना जिंकले की वस्तुत: अनार्यांनीच आपल्या संस्कृतीने आर्यांचा पाडाव केला. ! उदाहरणार्थ बोलणेचे तर ' जितग्रीक लोकानी विजयी रोमन लोकाना जिंकले' तोच प्रकार घडलेला दिसतो.

भिन्न संस्कृतीचे लोक कांही कारणानी असे शेजारी आले म्हणजे हा प्रकार झाल्याचा चोहोकडे दिसून येतो. रोमन लोकांनी आपणाव्यतिरिक्त इतर संस्कृतीचे शेजारो राहणाऱ्या लोकांना 'बार्बेरियन्स' असे नांव मोठया तुच्छतेने दिले होते त्यांना ते (बारबेरियन्स) रानटी असे समजत असत. कांही काळ असा गेला. परंतु हे त्याच कनिष्ट संस्कृतीच्या मानलेल्या रानटी लोकानी रोमन लोकांचा पाडाव केला. अखेर संपत्तीने आणि ऐश्वर्याने चढेल झालेल्या या रोमन लोकांची बादशाही, गॉथ्स आणि व्हेंडाल या रानटी मानलेल्या लोकानीच पादाक्रांत केली.

आज कोणाही मनुष्याला त्याच्या धर्मांबद्दल प्रश्न केला असता, तो चटकन उत्तर देऊन टाकतो की, जगातील सर्व धर्मापेक्षा माझाच धर्म श्रेष्ठ आहे. हिंदु-

स्थानात उत्तरेकडून येऊन वसाहत करणारे आर्यलोक आपलाच धर्म इतरापेक्षा श्रेष्ठ मानीत असत. त्या कालापासून आज तागायत शेजारचे संस्कृतीचा परिणाम झाल्याविना राहणे दुरापास्त आहे. आणि त्याप्रमाणें केव्हां न कळत केव्हा मुद्दाम होऊन, आर्य आणि अनार्य या संस्कृतीची भेसळ बेमालूम झालेली आहे असे आपल्याला स्वच्छ दिसून येते इंद्र, वरुण, मरुत इत्यादि वैदिक दैवतांची नांवेही आपले तोंडून बहुतेक नष्ट झाली आहेत आणि साऱ्या भरतखंडभर नाना प्रकारच्या देवतेच्या मूर्ती स्थापन झालेल्या दिसतात. यज्ञ तर द्वापारयुगाचे अखेर आणि कलियुगाचे आरंभाला नाहीसाच झालेला आहे. देवालये ऋग्वेद-काली नांवालासुद्धां नव्हती. आज पहावे तर एकही गांव देवालयावाचून दिसत नाही. असा हा विपरीत परिणाम आर्य संस्कृतीवर घडलेला आहे. असे असून सुद्धां आह्मांला आमच्या संस्कृतीचा अभिमान आहेच आहे. हा अभिमान पोकळ नव्हे काय ? जगाच्या धुमधडाक्यात असे होणे अगदी स्वाभाविक आहे आता ही गोष्ट खरी आहे की, मनुष्याला आपला एक विशेषपणा असावा असे नेहमी वाटत असते. आणि त्या वैशिष्ठयाचे रक्षण करण्याकरिता तो आपल्या सभोवार कृत्रिम कुंपणाचे जाळे करीत असतो. कांही दिवस हे जाती वर्णाचे, संस्कृतीचे धर्माचे रक्ताचे आणि विशिष्ठ गुणाचे रक्षण झाल्याचे दिसून येते. कालाचा प्रचंड ओघ इतका बलवत्तर आहे की, त्याच्या दणक्यापुढे असले कृत्रिम बांध टिकू शकत नाहीत. समतेचे अखेरचे तत्व हळू हळू अमलात येत जाणे हा निसर्गाचा सिद्धांत आहे. असे विचाराअंती कोणालाही वाटल्यावाचुन राहणार नाही. भेद-भाव खोटा आहे. उच्च नीचपणा हा क्षणभंगुर आहे. हा त्रिकाल अबाधित सिद्धांत आहे. अखिल दुनयेत वारंवार दृगोचर होत आहे.

० ० ०

## ऋग्वेदातील नीतिमत्ता.

( ता. १५ मार्च १९२९ )

आमच्या प्रत्येक विधानाला आमची ही प्रस्तावना संपल्यानंतर आधार देणार आहोत त्यांत सुक्त आणि ऋचा घेऊन मुख्य अर्थही देऊं त्या वरून आमचे अनुमान योग्य आहे किंवा नाही याचा योग्य विचार करणेस वाचकांना सोयीचे होईल. वेदकाली सुवर्णयोग होते. त्या युगात दुर्गूणाचा त्यांना स्पर्शही झाला नव्हता. ही कल्पना मुळीच टिकू शकत नाही. तसे विधान करणे सृष्टीनिय-

माच्या उलट आहे व उत्क्रांति वादाच्याही उलट आहे. मनाचा विकास, आत्मविकास आणि गुणोत्कर्ष ही हळूहळु होत जातात. आणि त्या कालच्या समाजाचे ध्येय आणि आजच्या समाजाचें ध्येय याची निर्बिकार दृष्टीने तुलना केली तर आमच्या समाजाच्या कल्पना फारच पुढे गेलेल्या आहेत. असे म्हणावे लागते. आजच्या काळात लोक पापे करतात. पिनलकोडाप्रमाणे त्यांची चौकशी होते. त्यांना शिक्षा होते. कदाचित लोकांच्या दृष्टीस न येणारी अशी अनेक पापेही घडत असतीत परंतु वैदिककालिही असाच प्रकार होता. चोरी दरोडे तर होत होतेच परंतु स्त्रीयाही दुराचारीणी होत चालल्या होत्या आणि चोरून मारून गर्भपातहीं होत होते. दारुचे व्यसनही शिरले होते. जुगाराचा नाद कांही माणसांना इतका लागला होता की, त्यापायी त्यांच्या कुटुंबात स्त्रियांच्या अब्रुचा नाश झालेला आहे आणि असे वर्णन काही सुत्रातून काव्यपूर्ण केलेले आढळून येते.

या वरून आर्यसमाज मंडळीचा जो आग्रह आहे की वैदिक काल हा अति उत्कृष्ट काल होता, हे म्हणणे सत्याला सुटून आहे-

जगाच्या कल्याणासांठी आपला देह झिजवावा, स्वार्थ बाजूस टाकून इतरांच्या सुखांत आपले सुख मानाने, निष्काम कर्म हेच आयुष्याचे सार्थक आहे. या परमावधीला पोचलेल्या अद्वैताच्या कल्पना आणि श्रीकृष्णानी भगत्गीतेमध्ये अनेक प्रकारानी संस्थापित केलेला निष्काम कर्मयोग ऋग्वेदात आढळून येत नाही. बहुतेक सर्व सुक्तांचे सार शोधून काढले तर थोडक्यात येवढेच देता येईल की देवाची प्रार्थना करायची ती पोटासाठी, गाई, बैल, घोडे संतती संपत्ती हे मिळवण्यासाठी, देवानी येऊन शत्रुंचा संहार करावा यासाठी देवानी येऊन संकट निवारण करावे, रोगपरिहार करावा यासारख्या गोष्टी प्रार्थनेमध्ये पुनः पुनः मागितलेल्या आहेत. वैदिककालाच्या ऋषींना कमीपणा आणावा व आह्मी आत्मप्रौढी गावी असा आमचा हेतु नाही. परन्तु सांगणे इतकेच की, तो वैदिक काल मानव जातीच्या संस्कृतीच्या पहिल्या पायरीवर होता. देवावर पूर्ण श्रद्धा ठेवून, विघ्न निवारणार्थ सृष्टीतील शक्तींना हाका मारीत राहणे यात आश्चर्य नाही. त्या कालच्या परिस्थितीच्या मानानें त्यांनी केले ते योग्यच केले. परन्तु वैदिक ऋषी हे आमचे पूर्वज म्हणून त्यांच्या प्रत्येक कृत्याबद्दल दुरभिमान पूर्वक आग्रह धरणे, वेदाचे भलतेच स्तोम माजविणे, सर्व ज्ञानाचा गड्डा वेदात आहे असे अशिक्षित लोकाना सांगत सुटणे, ही लोकांची फसवणुक आहे व स्वतःचीही फसवणूक आहे. किती जरी त्या वेदाचा अभिमान पोटाशी धरला तरी त्या कालचे आचार विचार आज सुरू केले पाहिजेत असे सांगणे, वेद कालाचा धर्म हाच

आपला खरा धर्म आहे, त्याची कास धरल्यावाचून आपला तरणोपाय नाही, असा उपदेश करीत सुटणे, म्हणजे आपण खड्डयात पडून दुसऱ्यानाही खड्डयात टाकण्यासारखे आहे. 'आर्य समाजाचा संदेश' वेदाकडे परत चला (बॅक टु दी वेदाज) हा वेड्याच्या प्रकारातला होईल. कालगतीने अनेक लोकांच्या ज्ञानाच्या अनुभवाने कित्येक चांगल्या गोष्टी आज आपल्यात आलेल्या आहेत. त्याना वेदाचा आधार नाही म्हणून त्या सर्व फेंकून द्या आणि वेदाकडे परत चला, या गोष्टी कोणी जरी सांगितल्या तरी त्या आज अप्रशस्त आहेत. ती सुधारणा नसून दुर्धारणा आहे. काय आपण आज होमकुंड पेटवायचे ? सोम पिळून तयार ठेवायचा, समिधापासून अग्नी उत्पन्न करायचा आणि पुरोडाशाच्या आहुती अग्नीत टाकीत बसून इंद्र, वरुण, अश्वी, अग्नी, मरुतगण यांच्या नांवाने मोठमोठ्याने हाका मारीत सुटायचे की, हे देवतानो आह्माला गाई, घोडे, बैल द्या, संतती, संपत्ती, घरे वाडे द्या. किंवा आजच्या कालास अनुसरून इंद्राकडे अर्ज करायचे की, आह्माला सायकली, मोटारी, मशीन गन्स, हविस्सर्स, टारपेडो द्या. देवानो आमच्या शत्रूंचा निःपात करा. हे इंद्रा, हा सोम पोटभरून पिऊन कैफाच्या धुंदीत बेहोष होऊन जा व आह्मास पूर्ण स्वातंत्र्य स्वराज्य दे, किंवा निदान नेहरू कमेटीचा रिपोर्ट तरी मंजूर कर. आमचे राष्ट्र संघटन कर, हिंदु मुस्लिम एकी कर, जातिभेद मोडून टाक, अस्पृश्यता निवारण कर अशी नवीन सुधारलेली सूक्ते गाऊन आजच्या जरुरीच्या मागण्या मिळण्यासाठी सृष्टीतील शक्तीचे धावे करायचे की काय ? आज हा सारा वेड्यांचा बाजार होईल. आमचे स्पष्ट म्हणणे त्या कालची आमची संस्कृती कशी काय होती हे बरोबर समजून घेणे. आणि ह्याच प्राचीनत्वा पुरावा या दृष्टीने ऋग्वेदाला आह्मी पूज्य मानतो.

अलिकडील विद्वानांनी एक शक्कल किंवा अक्कल लढविलेली आहे की, वेद ग्रंथ स्त्रियानी आणि शूद्रानी अगदी वाचू नयेत. तसे करणे हे पाप आहे, या मनूजाव फर्मानाला आह्माला ऋग्वेदात कोठे आधार आढळून आला नाही. उलट ऋग्वेदातील कित्येक सूक्ते स्त्रियानी म्हटलेली आहेत, असे त्या सूक्ताच्या माथ्यावरून दिसते. मग असला ज्ञान प्रतिबंध ठराव स्मृतिकारांनी कां घातला असावा हे एक मोठे कोडे आहे. परन्तु श्री चित्राव शास्त्रींचा मराठी ऋग्वेद वाचल्यानंतर ह्या कोड्यांची गाठ कांहीशीं सैल होईल असे आह्मास वाटते. ते असे. ऋग्वेदातील कांही सूक्ते अत्यंत अश्लील आहेत. कांही दृष्टांत अतिशय घाणेरडे आहेत इतके की, स्त्रियांच्या समोर ती सूक्ते वाचून दाखविणेही मर्यादे बाहेरचे आहे. शूद्र वर्ग अशिक्षित अडाणी, तामसी वृत्तीचा. त्याने ही सूक्ते, त्या बीभत्स कथा, ग्राम्य रती सुखाचे प्रकार आणि उत्तान शृंगार, ही पाहिली आणि ऐकली

तर त्यांचे मनावर अनिष्ट परिणाम हटकुन व्हायचे, स्मृतिकारानी स्त्री जातीची बोळवण चांगली केली आहे. त्या मनाने अनावर असतात. पुरुषाचे आठपट त्यांची कामेच्छा असते. अशी अमंगल विधाने कोठे कोठे केलेली आहेत.

° ° °

## स्त्री आणि शूद्राना ऋग्वेद बंद कां ?

( ता. ५ एप्रिल १९२९ )

स्त्री जात आणि शूद्र वर्ग याना ऋग्वेद वाचण्याला परवानगी दिली, तर येथून तेथून सारा भ्रष्टाकार होईल. समाजात बाष्कळपणा वाढेल. असली भीती पोटात घेंऊन स्मृतिकारानी स्त्रियांना आणि शूद्राना वेद बंद केले असावेत अशी आमची समजूत आहे. यम यमी यांची उत्पत्ती, अश्विन देवाची उत्पत्ती मंडळ ७ सूक्ते ७२ : मंडळ ८ सूक्त ९१: मंडळ १० सूक्त ८६ इंद्र आणि इंद्रायणी यांचा बाष्कळ संवाद ही सूक्ते वाचताना आह्माला पुस्तक बंद करावे लागले. कदाचित या सूक्तांचा अर्थ गूढही असेल. पण उघड अर्थ जो आहे, तो मात्र मर्यादशील मनुष्याने वाचता येण्याजोगा नाही. कदाचित त्याकाली उत्पत्तीचे प्रकार वेगळे असतील. विनय आणि स्त्रियांची मर्यादा हल्ली जशा नाजुक झाल्या आहेत, तशा नसतील. कांही असो, ही सूक्ते चित्राव शास्त्र्याना ऋग्वेदाचे भाषांतर म्हणून घालण्यास खपली. परन्तु आमच्या असल्या लेखामध्यें तसली सूक्ते देणे, धोक्याचे होईल.

आता एकच प्रश्न राहिला. आर्यसमाज सांप्रदायाचे म्हणजे स्वामी दयानंदजींच्या शिष्यवर्गाचे वारंवार म्हणणे समोर येते की, वेदामध्ये पशू हिंसा नाही. तो सर्व अर्थ चुकलेला आहे. या त्यांच्या म्हणण्याचे खरेपणासाठी यजुर्वेदाचा कांही भाग आह्मी पूर्वी वाचला होता. आणि ज्ञानकोश ग्रंथापैकी वेद विद्या हे पुस्तक काळजीपूर्वक वाचले होते. आणि त्यावरून आमची खात्री झाली होती की, वेदकाली पशुहिंसा होतीच. इतकेच तव्हे तर यजुर्वेद म्हणजे केवळ एक कसाईखानाच होय ! यज्ञाचे नांवाखाली कित्येक पशुपक्षांचे संहार बेधडक होत होते. यांत कांही शंका नाही. पण ही गोष्ट झाली यजुर्वेदाची. कदाचित ऋग्वेदात हा पशुयज्ञाचा प्रकार नसेल असे वाटले होते. पण आमच्या दुर्दैवाने या ऋग्वेदातही पशुयज्ञ स्पष्ट दिसून येतात, त्यात अश्वमेधाची तपशीलवार प्रक्रिया (प्रोसीजर) सांगितली आहे. तो अश्वयज्ञ स्तंभाला बांधावा कसा ? त्याला फाडावा तोडावा

कसा, त्याच्या बरगड्यात सुरी खुपसावी कशी? त्याची वपा अचूक काढावी कशी? त्याचे मास भांड्यात घालून शिजवावे कसे ? आणि अखेर देवाना प्रार्थना व त्या घोड्याला सुबोध, केलेला की, हे घोड्या, हे तुझे मांस, सुरीला, खांबाला, लागलेले तुकडे, तुझ्या पोटातील अर्ध्यामुर्ध्या चघळलेल्या गवतासुद्धां, हे सर्व देवाला पोहोचोत आणि तुला सद्‌गती प्राप्त होवो. मंडळ १ सू. १६२ इतका स्पष्ट पुरावा असूनसुद्धां आर्य समाजियन मंडळी म्हणत आहेतच की वेदात पशुहिंसा नाही. असो, हटवाद्याचे शांतवन कोणी करावे ? सर्वच भाष्यकारांचा अर्थ चुकला असल्यास ते यास्काचार्य सायणाचार्य जाणे. अलीकडील भाष्यकार जाणे. आणि अखेर आमचे आजचे भाष्यकार श्री चित्राव शास्त्री जाणे. यापेक्षा आह्मी कोणास जास्त त्रास देऊ इच्छित नाही. आणि घेऊ इच्छित नाही.

वेदाबद्दल आमचे भरतभूमीतील विद्वान लोकांना अत्यंत आदर आहे. तो पुष्कळ कारणांनी योग्यही आहे. आह्माला एक मौजेची गोष्ट दिसून आली ती ही की, मूळ आर्यांच्या कांही चालीरीती, धर्मकल्पना ह्या आज तागायत जशाच्यातशा चालत आलेल्या आहेत. आणि त्या आज या क्षणाला पहायला मिळतात. आर्यांची एक शाखा युरोप खंडात गेली, एक शाखा इराणात गेली आणि एक शाखा पंजाबात आली. पैकी युरोपातील आर्यन शाखेचे कल्पनातीत रूपांतर झाले आहे. अग्नीपूजा आणि कर्माला यज्ञोपवीत अशा कांही थोड्या चालीरीती आजच्या पारशी लोकांमध्ये आढळून येतात. मात्र हिंदुस्थानातील हिंदू मनुष्यामध्ये विशेषतः ब्राम्हण जातीत अत्यंत प्राचीन काळच्या वैदिक चालीरीती जशाच्या तशा आढळून येतात. ही गोष्ट ब्राम्हण वर्गाला अभिमानाची आहे. असे वाटणे स्वाभाविक आहे. मात्र या गोष्टीचा ब्राम्हण वर्गावर असा एक विपरीत आणि अनिष्ट परिणाम झाला आहे की, त्यांच्या बुद्धीचे स्वातंत्र्य कमी होऊन मनाला गुलामगिरीची सवय लागली आणि वाजवीपेक्षा फाजील अभिमान आपल्या संस्कृतीबद्दल लोकात उत्पन्न झाला. ब्राम्हण वर्गाची मनोभूमिका अशी कांही चमत्कारिक तऱ्हेची निर्माण झाली की, जगात जे कांही नाही, ते सर्व आपल्या वेदात आहे. वेदग्रंथ हे अत्यंत पवित्र, ते देवाचे प्रत्यक्ष तोंडातून पडले आहेत. त्यात वाटेल ते लिहिलेले असो, ते पवित्र मानलेच पाहिजेत. वेदाला टीकात्मक कसोटी लावणे शक्य नाही. तसे करणे म्हणजे धर्मद्रोह. देवद्रोह, देशद्रोह, तो पाखंडी, नास्तिक ठरला जाऊन, त्याची बुद्धी कितीही अलौकिक असली तरी ब्राम्हणाच्या दृष्टीने त्याला काडीचीही किंमत नाही. वेदाच्या विरुध्द शंका काढणें किंवा टीकात्मक एखादे वाक्य लिहिले तरी ते महापातक ठरत असते. एवढे मोठे गौतमबुध्द की, आज सर्व जगातील पंडित यांच्या धर्माच्या शिकवणीला माना तुकवितात. ती गौतमबुध्दाची शिकवण आमच्या भरतभूमीत रूजली नाही.

मनोदास्याने पछाडलेल्या ब्राम्हण वर्गाने या भूमीतून त्याची पाळेमुळेही खणून काढलीं. कारण गौतमबुध्दांनी वेदाला पूज्य मानले नाही आणि महावीरांच्या पवित्र वाणीला वेदबाह्य ठरवून वैदिक छत्राच्या बाहेर ढकलून दिले. याचे कारणही हेच की महावीर हे वेदाला मानीत नव्हते. हीच ब्राम्हणाची बौध्दिक गुलामगिरी आणि तोच स्पर्श्यजन्य रोग आज साऱ्या भरतभूमीला भोवतो आहे. आणि अलिकडे बाबा चांदोरकरासारख्या अभिमानाने अंध झालेल्या संशोधकाने गौतमबुध्दावर किती कुत्सित प्रकारची टीका केलेली आहे, आणि त्यांच्या उज्वल चारित्र्यावर कसा चिखल उडविणेचा प्रयत्न केला आहे, हे कोणास पहावयाचे असल्यास ज्ञानकोश पहाण्याची कृपा करावी. (बुद्धपूर्वजग विभाग तिसरा)

क्षत्रियांच्या राजसत्तेवर अफाट पैसा मिळवून विद्वान म्हणवून घेणाऱ्या भिक्षुकी बुद्धीला वेदावाचून जगात दुसरे कांहीच नाही. असा नुसता भ्रम झाला होता. वेदाभोवती सोवळ्याचे पांघरूण घातले होते. गूढार्थाचे जाळे पसरले होते. वेदाचा अर्थ कोणास कळत नाही. अशी हूल पसरून दिली होती. एका ब्राम्हण वर्गावाचुन दुसऱ्या कोणीही वेदाचे अक्षर उच्चारणेचे नाही, ऐकणेचे नाही अशी कडेकोट कुंपणे घातली होती. परन्तु कालाचे प्रचंड ओघात हे सर्व प्रतिबंध आज नष्ट झाले आहेत. आणि आमचे साऱख्या ब्राम्हणेतरालाही वेद स्वत: पाहण्याला, वाचण्याला, यथामती अर्थ करण्याला मुभा झालेली आहे. जर्मन, इंग्लिश, फ्रेंच विद्वानांनी वेदाची भाषांतरे केलेली आहेत. आणि ते आधार घेऊन आमच्या इकडील काही पंडितानी परिश्रम घेऊन शुद्ध मराठीत भाषांतर केलेले आहे. आह्मी स्वत: आमचा एक प्राचीनचा ऐतिहासिक ग्रंथ म्हणून ऋग्वेदाकडे पहात आहोत, अवास्तव अंध पूज्यभाव त्या ग्रंथाबद्दल आमच्या मनात उत्पन्न होत नाही. त्यास आमचा इलाज नाही.

० ० ०

## वैदिक धर्माची पक्कड किंवा घोरपड !!

(ता. २७ मे १९२९)

ऋग्वेदकाली समाजाची सर्वसत्ता, धार्मिकसूत्रे, बुद्धिमत्तेची कामे, विशेषत: ब्राम्हण आणि क्षत्रिय या दोन वर्गामध्ये समाविष्ट झालेली दिसून येतात, कित्येक सूक्ते क्षत्रियांचे नांवावर खर्च पडलेली आहेत. तसेच ब्राम्हण वर्ग प्रसंगविशेषी युद्धावरही जात असे. त्यावेळी जातिसंस्था निर्माण झाली नव्हतीच, परन्तु वर्ण आणि त्यांची कर्मे हीसुद्धां स्पष्टरीतीने ठरून गेलेली नव्हती. मात्र पुढेपुढे क्षत्रि-

याना राजर्षी पद देऊन दानाच्या नांवावर मुबलक संपत्ती संपादन करणे, हे काम ब्राम्हण वर्गाने चालविले होते. त्याचप्रमाणें बुद्धीची कामे केवळ आपल्या वर्गालाच राखुन ठेवून धर्माच्या बाबतीत आणि समाजामध्ये आपल्याच एका वर्गाचे महत्व वाढविण्याचा प्रयत्न त्यांचा एकसारखा चालला होता, मनुस्मृतीचे काली, वर्णाचे धंदे स्पष्टरीतीने ठरुन गेलेले दिसत आहेत. (मनु. स्मृति अध्याय श्लोक ११ व २०) या स्मृतिकाराचा हेतू स्पष्ट दिसत आहे की, शूद्र मोठा धार्मिक आणि व्यवहारज्ञ असा असला तरी, त्याला न्यायाधिशाचे जागी नेमू नये. त्या जागी ब्राम्हणच असला पाहिजे. ऋग्वेदकाली सुरूं केलेल्या ब्राम्हणी प्रयत्नाला स्मृतिकाली पूर्ण यश आलेले दिसते. मानवजातीच्या स्वाभाविक वाढीचा, परिपोष करण्याऐवजी ती बुद्धी संकुचित करणेस, इतरांच्या बुद्धीचा मोड खोडून टाकुन केवळ एका ब्राम्हण वर्गाचीच बुद्धी प्रगतीला लागेल अशी संस्कृती निर्माण करून ठेवली गेली. आणि तोच समाज त्याच प्रवाहाच्या मार्गाने वहात चाललेला आज आपणास दिसून येत आहे. एकोणीसावे शतकाचे अखेरपर्यंत आमच्या समाजाची रचना अशी बनून राहिली होती की, राज्यकारभार, न्यायदानाचे काम, ग्रंथरचना, काव्यशास्त्र, वाचनलेखन किंबहुना ज्या कामाला डोक्यातील बुद्धीची जरूरी लागते असे बहुतेक सर्व धंदे एका ब्राम्हण वर्गाच्याच क्षेत्रात येऊन पडले. इतर तिन्ही वर्गाला क्षत्रिय, वैश्य, शूद्र यापैकी कोणालाही बुद्धीचे कामाचा संबंध उरला नाही,

हजारो वर्षांपासून हा एका बाजुला कलत असलेला आंध आणि त्यातील दोष हे चाणाक्ष बुध्दिमंतांच्या लक्षात आल्यावाचून राहिले नाही. आणि ही विषम समाजाची घडी बदलून समतेच्या तत्वावर नवीन रचना करण्याचा कित्येक थोर पुरुषांनी मनोभावेकरून प्रयत्न केला परन्तु त्यांना यावे तसे यश आले नाही. साधु संतानीही ही विषमता पाहिली. आणि ती उच्चनीच भावना समाजातून नष्ट करण्याची खटपट केली. परन्तु चारी वर्गाची प्रत्यक्ष व्यवहारामध्ये समान दर्जाची स्थिती घडवता आली नाही. तात्विकदृष्टया परमार्थ संपादन करण्याचे कामी किंवा देवाचे समोर आणि तेही तत्वतः समदृष्टी आणून पोचविण्यापर्यंत मजल गेली. परन्तु स्मृतिकारांच्या ब्राम्हणी कायद्यापुढे वैदिक धर्माला अवास्तव महत्व येऊन. प्रत्यक्ष व्यवहारामध्ये धर्मदान, न्यायदान, विद्यादान, शास्त्रदान यामध्ये समतोलता येईल अशी गोष्ट एकोणीशहे सालअखेर सुध्दां कोणाचे लक्षात आली नाही. आणि " जरी तो ब्राम्हण झाला कर्मभ्रष्ट, तरीही तो श्रेष्ठ तिन्ही लोकी " असल्या कुजक्या मेंदूतून निघालेल्या सडक्या वाक्याला पुराण किर्तनाचे प्रसंगी आजही महत्व देता येतेच ! आमच्या मते वरील चरण तुकाराम महारा-

ज्यांचे नांवावर कोणीतरी लादलेले असावे एक किंवा संतांचीही मजल वैदिक कालच्या एकांगी व पक्षपाती संस्कृतीची बंधने तोडण्यापर्यंत गेली नसावी.

तत्वतः समतेचा उपदेश आणि त्या उपदेशावरहुकूम स्वतःचे आचरण आणि उघड रीतीने जुन्या वैदिक संस्कृतीचे दोषाविष्करण करून सर्व मनुष्य प्राणी एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, त्या सर्वांचा सर्वत्र एकच दर्जा आहे, भेदभाव उत्पन्न करणे हा गुन्हा आहे, एक स्पृश्य आणि एक अस्पृश्य अशी भावना मनात बाळगणे हा देवाचा अपराध आहे, ह्या तत्वावर नवीन धर्मांची आणि सांप्रदायाची स्थापना करणारे पुरुष अगदी अलीकडे पांच पंचवीस वर्षांतच या पृथ्वी तलावर जन्म घेऊ लागले आहेत. तेच खरे पुण्य पुरुष होत. उत्क्रांती तत्वाचे नियमास अनुसरून हे घडत आहे. या पुर्वीच असे लोक कां निर्माण झाले नाहीत, ज्ञानेश्वर नामदेव, तुकाराम, शिवछत्रपति यांच्यासारख्या अलौकिक बुध्दिमान पुरुषांच्या हातून हे समतेचे कार्य, हा नवीन समतासांप्रदाय कां पुकारण्यात आला नाही, याचे उत्तर आमच्या मते एकच दिसते की, विचाराला मूर्त स्वरुप येण्यालाही कांही काळ लागतो. वैदिक संस्कृतीची पक्कड साधुसंतांच्या हातून सुध्दा सैल करता आली नाही. हेच त्याचे एक उत्तर आहे.

गेल्या पंचवीस वर्षातील पराक्रमी लोकांची धडाडी आणि कार्य करण्याची रीत कांही वेगळया स्वरूपाची आहे. महात्मा फुले, कै. छत्रपति शाहू महाराज आणि महात्मा गांधी हे थोर पुरुष या नव्या मन्वंतरातील नवीन विचाराची परिपक्व फळे होत, त्यांनी समाजाची रचना मुळापासून बदलण्याचे कार्य शिरावर घेतले. प्रत्येक मनुष्याचे ठायी आत्म्यांचे वास्तव्य आहे, हे विचार महात्म्यांचे आहेत. समाजाच्या प्रत्येक अवयवाला आपल्या बुद्धिमत्तेची आणि आत्म्याचा विकास करण्याची पूर्ण मुभा देवानेच दिली आहे. मनुष्यप्राणी हा जन्मतःच स्वतंत्र आहे. उच्चनीचपणाची भावना ही सैतानाची आहे, हे विचार आज लहानापासून थोरापर्यंत, अस्पृश्यापासून उच्च वर्गाच्या स्पृश्यापर्यंत एकसारखे खेळत आहेत. या तत्वाचा थोडयाशा प्रमाणावर एका लहानशा क्षेत्रामध्ये, या करवीर संस्थानामध्ये, प्रयोग करून पहाण्यात आला आहे. प्रयोग झाला आहे. आणि त्याची फळे ही फार चांगल्या प्रकारची लोकांचे नजरेस पडू लागली आहेत. श्री शाहू महाराजांचे हे एकच कार्य त्यांना महात्मा बुद्ध आणि अशोक यांच्या मालिकेत गोवण्यास समर्थ आहे. आज करवीर संस्थानांत, या पूर्वी केव्हांही आणि इतरत्र कोठेही दिसून न येणारी सामाजिक सुधारणा राज्यकारभारात घडून आलेली आहे. मनुस्मृतीच्या आठवे अध्यायाला हरताळ फासून टाकणेत आला आहे. राज्यातील बहुतेक खाती ब्राह्मणेतर वर्गातील योग्य अधिकाऱ्याचे हाती दिलेले आहेत. आणि ती सुसूत्रपणे चाललेली आहेत.

० ० ०

## वर्णाभिमाने पडलो प्रवाही

(ता. २३ ऑगस्ट १९२९)

ब्राह्मण, क्षत्रिय, वेश्य, शूद्र हा आमचा चातुर्वर्ण्य कटिबंध. ऋग्वेदातील शेवटच्या पुरुष सूक्तात अगदी प्रथम प्रगट झालेला. आणि पुढे मनु, पाराशर, याज्ञवलक्य अशा ऋषीनी स्मृतीच्या द्वारांनी वज्राप्रमाणे अभेद्य केलेला! मांत्रिकी याज्ञिक आर्य प्रथम पंजाबांत आले त्या पूर्वी या देशात द्रवीडियन किंवा त्या पूर्वीही फार प्राचीने काळी झालेली आर्याची वसाहत, यात वर्णभेद होता. द्रवीडियन लोक काळया रंगाचे. किंचित बसकट नाकाचे होते. आर्य लोक गौर वर्ण, सरळनाक, विशालभाल असे देखणें होते. अलिकडे चातुर्वण्यांचे जवळ जवळ खोबरे आणि चिवडा दिसतो. प्रत्येक वर्णांमध्ये शेकडो जाती आणि पोट जाती झाल्या. वर्णावरुन भेद कळेनासा झाला. कित्येक ब्राह्मण मुळचे उच्च वर्गाचे आर्य म्हणत असून रंगाने काळे अगर सावळे आढळतात. शूद्र म्हणविणारेही अनेक लोक रंगाने गौरवर्णी दिसून येतात. यावरुन रंग रूप, नेत्र, नासिका, कपाळ, डोक्याचा आकार किंवा चेहरेपट्टी ही इतकी मिश्र झालेली दिसते की एकदा इसम वरील चिन्हांच्या कसोटीत घातला. तर तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अगर शूद्र असलाच पाहिजे अशी खात्री नाही. तेव्हा हा माणसा माणसात जो भेद मानलेला आहे त्यात कांही खरे तत्व आहे की काय हे पहाणे आज महत्वाचे झाले आहे.

सृष्टिक्रमाकडे पहा. ब्राह्मणाचे लहान मूल, आणि तसेच अस्पृश्याचे मूल ही परस्परात जातीभेद किंवा वर्णभेद मानताना दिसून येत नाही. चेहरेपट्टी ही इतकी मिश्र झालेली दिसते की एकदा इसम वरील चिन्हाच्या कसोटीत घातला तर तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य अगर शूद्र असलाच पाहिजे अशी खात्री नाही. तेव्हा हा माणसा माणसात जो भेद मानलेला आहे त्यात कांही खरे तत्व आहे की काय हे पहाणे आज महत्वाचे झाले आहे.

सृष्टिक्रमाकठे पहा, ब्राह्मणाचे लहान मूल, आणि तसेच अस्पृश्याचे मूल ही परस्परात जातीभेद किंवा वर्णभेद मानतात असे दिसून येत नाही. रक्तात भेद आढळत नाही ! न्युझीलंडमध्ये बहुतेक जुन्या लोकांची वसाहत आहे पण त्यांच्या मनामध्ये तेथील भिन्न लोकाच्या " माओरी " जातीबद्दल द्वेषभाव मुळीच नाही. पूर्वी एका काळी इंग्रज लोक ज्यू (यहुदी) लोकांचा अत्यंत तिटकारा करीत. पण तो विकार अलीकडे जवळ जवळ नष्ट झालेला आहे.

हा वर्णद्वेष आला कोठून ? केव्हा केव्हा याचा आरंभ मूळ तंटा बखेड्याने झालेला दिसेल. दोन भिन्नवर्णीय लोकामध्ये द्रव्य लोभाने लढाया झालेल्या आहेत केव्हा केव्हा समाजात आपल्यास जास्त मान मिळावा. आपल्याच हाती सत्ता असावी आणि आपलेच श्रेष्ठत्व ठरावे. ही कारणे तंटाबखेड्यात झालेली आढळ- तात. आपल्या हिंदुस्थान देशात जातीभेद हे एक द्वेशाचे मोठे कारण आहे. मूळचा एकच बुंधा असून, पुढे ज्या शाखा झाल्या; त्यात द्वेष इतका वाढला की, आज या जातीभेदाला स्वरुप वर्ण भेदाचेच आलेले आहे. ज्या वेळी एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याचे हातचे अन्न पाणी घेत नाही. आणि विवाह संबंध करु शकत नाही, तेव्हा त्या समाजात तुसडेपणा, उच्चनीचभाव, एकलकोंडेपणा आणि दूर- भिमान उत्पन्न होतो. यात शंका नाही. जपानमध्ये परकी लोकाबद्दल शंका व मत्सर उत्पन्न झालेला दिसतो. तर अमेरिकेतील कॅलिफोर्निया संस्थानामध्ये या जपानी लोकांना वेचुन बाहेर टाकण्याचा विचार चालू झाला आहे ! तेथील अमेरिकन लोक आजपर्यन्त आपल्या युरोपियन गोऱ्या लोकापासून निग्रो लोकाना हाकलून काढीत ! तोच द्वेषभाव आज वाढता वाढता इतक्या कळसाला गेला आहे की, तेथे हिंदी, चिनी व जपानी लोकांना सुद्धा मज्जाव होऊ पहात आहे. दक्षिण अमेरिकेत मेक्सिकोहून आलेल्या लोकानाही वस्ती करण्यास अडथळा येऊ पहात आहे ! केव्हा केव्हा असाही चमत्कार दिसून येतो कीं, दोन भिन्न जातीमध्ये देवघेव, व्यापारहाट, वस्ती आणि स्नेहभावही दिसू शकेल. परंतु त्यांच्यात शरीर संबंध होण्याला धर्माची तटबंदी उभी झालेली दिसते. ज्या वेळी या जाती वर्णं अगर संस्कृती, या भेदात धर्माचा भेद शिरतो त्यावेळी मात्र हा भेद अभेद्य किल्ल्यासारखा घनगंभीर झालेला दिसून येईल !

आमची पूर्ण समजूत आहे की, वर नमूद केलेली बहुतेक कारणे माणसाने उत्पन्न केली आहेत. देवानी केली नाहीत. यांच्या मुळाशी असत्य आणि स्वार्थं लपलेला आहे ! सत्याचा प्रकाश व खरा वेदांत लोकाना पटू लागला की, हे तट जमीनदोस्त झाल्यावाचून राहणार नाहीत. प्रश्न केवळ काळाचा आहे. इंग्लंडचे सॅक्सन लोकांचे आणि विजयी परके नार्मन लोकांचे पूर्वी हाडवैर असे. पण त्याचा आता मागमूस राहिला नाही. इंग्लंड आणि स्कॉटलंड या लोकांतील वैर भाव आपणास तिकडील काव्यांमध्यें आढळून येतो. परन्तु आज त्यांचे इतके एकरूप झाले आहे की, नित्याच्या व्यवहारात ते वैर नामशेष झाले आहे.

आपल्या भरतखंडात; आज मोजता येणार नाहीत, इतक्या जाती बुजबुजुन गेल्या आहेत ! त्यामध्ये संस्कृती, धर्म, सांप्रदाय, आचार विचार यांची एक- वाक्यता होईपर्यंत जर आपण वाट पाहूं लागलो तर प्रलय कालाचाच पल्ला

गाठावा लागेल ! या तंट्याला आणि या वैराला मारक उपाय अलिकडील अनुभवावरून पुष्कळ अंशी खात्रीचा दिसतो. तो एकच, "सर्व लोकांना एक दर्जाचे शिक्षण आणि सर्वांना सारखे राजकीय हक्क" आणि सुदैवाने या उपायाला समान धर्माची जोड मिळाली तर हा वर्णभेद लवकरच नाहीसा होणेचा संभव आहे, समान शिक्षण, समान वातावरण, एक विचार आणि सामाजिक समता या उपायानी ही खात्रीने होणारी गोष्ट आहे. आणि क्रांती किंवा युद्ध या वाचून हा तो परिणाम घडून येणार आहे. तथापी, केवळ राजकीय संस्था तयार केल्या, उच्च दर्जाचे समाज निर्माण केले, मोठ मोठे तत्वज्ञान बाहेर पडले, नवीन नवीन शास्त्रिय शोधाच्या भराऱ्या मारल्या, आश्चर्यकारक संशोधन करून अगणित माल कारखान्यांतून बाहेर पडू लागला, मानव बुद्धीच्या पराकाष्टेच्या पायरीला आपण पोचलो ! इतक्या गोष्टी झाल्या तरी मनुष्यामनुष्यातील जातिद्वेष, वर्णभेद, आणि स्वार्थ ही अजिबात नष्ट होणार नाहीत. याला बिनचूक आणि रामबाण उपाय आमच्या प्राचीन भारतीय महर्षींनी सांगितलेला आहे तोच खरा आहे. आणि तो कोणता, तर मनुष्य प्राण्याची आजची मानसिक भूमिका मुळापासून बदलली गेली पाहिजे ! म्हणजे "चित्तशुद्धी" वाचून जगाची खरी सुधारणाच अशक्य आहे. बाकीच्या सगळ्या गोष्टी या केवळ वरोपचार आहेत.

आजचा युरोप अमेरिकेचा मार्ग आह्माला तरी अशातलाच दिसतो. "विषय कर्दमात ही राष्ट्रे लोळत आहेत ! त्यांना लाज वाटत नाही ! विषय सुखाची किळस येत नाही ! !" माथ्यावरील श्लोकाचे चरण श्री समर्थांच्या तोंडचे आहे, पूर्वाश्रम सोडला. संन्यासाचा पहिला अध्याय सुरू झाला, अशा समयाचे हे करूणाष्टकांतील वाक्य आहे. "विश्रांती देही अणुपात्रनाही। कुळाभिमाने पडलोप्रवाही ।।" हा त्यांचा वैराग्यातील अनुतापाचा पहिला टप्पा आहे. जे व्यक्तीचे तेच राष्ट्राचे, पिंडी तेच ब्रह्मांडी ! गेल्या जर्मन युद्धापूर्वी इंग्लंड, युरोप, अमेरिका यांचे स्वरूप कसे होते ? जात एक, वर्ण एक, धर्म एक, संस्कृती एक आणि इंग्लंड, अमेरिका, जर्मन यांचे रक्त, हाड, मांसही एक ! ! पण जेव्हां प्रसंग आला स्वार्थ बोकाळला, खरा वेदांत नष्ट झाला, त्यावेळी परस्परांची नरडी फोडण्यास ही राष्ट्रे सज्ज झाली ! मिल्ल स्पेन्सरचा इंग्लंड, वॉशिंग्टन, बेंजामिन, इमर्सनची अमेरिका, मॅक्समुल्लर, कँट शोपेनहोरचा जर्मन यांचे तत्वज्ञान चुलीत गेले ! कवींच्या गाण्याचे रडगाणे झाले. आणि राक्षसी महत्वाकांक्षेने साऱ्या जगाला आग लागून लाखो कुटुंबे, अन्नास मोताद झाली. धनवान लढाऊ राष्ट्रे भुके बंगाल बनून अमेरिकन धनवानांचे दास बनले. याचें कारण काय ? काम, क्रोध आणि लोभ किंवा थोडक्यात सांगायचे तर, "दुर्वासना" हेच नाशाचे मूळ आहे. खरे वैराग्य हा चित्तशुद्धीचा पाया आहे "लोभ मूलानि पापानि"

हे तत्वज्ञान यापुढे तरी युरोप अमेरिकेच्या डोक्यात शिरेल काय? वर वरच्या देखाव्यात केव्हांही राम नसतो. विषय सुखाच्या भपक्यात ही राष्ट्रे दिपून आहेत. परन्तु "ही विषयाटवीची वाट" अत्यंत कठीण आहे. ।नागविले किती भले गडधानो असंख्यजन पोटी ।। हा संतांचा उपदेश पुन्हा पुन्हा अनुभवास येतो परन्तु त्या महादुर्धर प्रयोगाचें अखेर!! भगवान येशू ख्रिस्ताचे वाक्य "आपल्या शेजाऱ्यावर स्वतः प्रेमाणेच प्रीती करावी" या महावाक्याचे स्मरण तरी या धनाने मदोन्मत झालेल्या ख्रिस्ती राष्ट्रांना उरले आहे काय? केवळ ग्रंथाने काम भागत नाही. तत्वज्ञानाची बूद्धी फिक्की पडते. "बोले तैसा चाले त्याचीच पाउले वंदावी." आमचे आद्य शंकराचार्य, अद्वितीय कुशाग्र बूद्धीचे. संन्यास वृत्तीचा देखावा, बोलण्यात पूर्ण अद्वैत! पण वागणे पहावे तर चातुर्वर्ण्यांचा दुरभिमान, सोवळ्या ओवळचाचे कुलंगडे व स्पृश्य अस्पृश्यांची दुर्गंधी! बोलण्यात वागण्यात मेळ नाही, आचार विचारांची संगती नाही. अशा कार्याला एकनाथ महाराज आणि तुकोबारायासारखी दिव्य रत्नेच जन्मास आली पाहिजेत. आणि हेच सत्य राष्ट्रांनी अनुसरले पाहिजे.

० ० ०

## आत्महत्या सुरापानम्

(ता. १२ जुलै १९२९)

मूळ स्मृतीमध्ये "ब्रह्महत्या सुरापानम्" असे चरण आहे. परन्तु ब्राम्हण वर्गाचा दर्जाच पूर्वी फार मोठा होता. हिंदू समाजाला तो वंदनीय होता. या कारणाने ब्राम्हणाचा वध करणे हे पंचमहापातकामध्ये गणले जात होते. आजची स्थिती पालटली आहे. दारुबंदीची व्याख्याने कांही प्रसंगी ब्राम्हण वर्गालाच देणे अवश्य झाले आहे! हा वर्ग सुशिक्षित म्हणजे विद्वान विद्वानांच्या मागे सत्ता, सत्तेच्या परिवारात व्यसने, व्यसनात व्यसन. मद्यपान व्यसन, ब्राम्हण, क्षत्रिय वगैरे पैकी श्रीमान् आणि व्यसनी लोकांना गावठी दारूचे स्वस्ताइचे व्यसन पुरे होत नाही! उच्च दर्जाची आणि इंग्रजी दारू पिण्याने परकीय अधिकाऱ्याचे आचाराचे अनुकरण होऊन, शिष्टांच्या समाजात गणना होण्याचा भरीव संभव!

महायुद्धापूर्वी आमच्या देशात इंग्रजी दारू तयार होत नसे. १९१४ साली जर्मनीबरोबर युध्द सुरू झाल्या पासून ब्रँडी, व्हिस्की रम्, बिअर, अशा युरोपीयन तऱ्हेची दारू इकडे तयार होऊ लागली. पंजाबात कांही कार–खाने आणि एक बडोद्यास आहे, असे कळते.

श्रौतस्मार्त धर्मबंधने शिथिल होत चालली आहेत. स्वातंत्र्याचा नागडा उघडा तमाशा केव्हां केव्हां होतो. कोणी एका कलेक्टराने कांही हिंदी लोक दारु-बंदीवर व्याख्यान देत असताना विलक्षण उद्‌गार काढल्याचे आमच्या स्मरणात आहे.

इच्छास्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, आचार स्वातंत्र्य इत्यादि स्वातंत्र्याचा महिमा सर्वत्र राष्ट्रीय निशाणे फडकत राहून चालू विसाव्या शतकात जर गाईला जात आहे आणि खाद्यपेय पदार्थासाठी लाखो रुपये खर्च होत आहेत, तर मद्य पिऊ नका किंवा दारू बंद करा असे सांगत सुटणे म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यावर हल्ला करणे नाही काय? त्याला अमुक प्या किंवा अमुक नका असा नियम घालणे म्हणजे मनुष्याच्या व्यक्तिस्वा–तंत्र्यावर गदा घालण्यापैकीच होय! हे उदगार इंग्रज अधिकाऱ्यांचे आहेत. म्हणूनच खपले, नाहीतर, एखाद्या हिंदू मनुष्यानेच असले विचार प्रगट केले असते, तर त्याची गाढवावरून धिंड निघाल्याबाचून राहिली नसती!

आह्मी 'ब्रह्महत्या' या शद्बाऐवजी 'आत्महत्या सुरापानम्' अशी शद्ब योजना केली आहें. आमची गति पुढे चालली आहे. ब्राम्हण हे ब्राम्हणत्वाला मुकले असल्यामुळे त्या महनीयनामाभिधानास आज अपात्र ठरत आहेत.

सुरापान म्हणजे दारू पिण्याचे व्यसन हे आमच्या मते पहिल्या प्रतीचे गर्हणीय आहे. ते व्यसन मनुष्याचा आत्माच ठार मारून टाकते! मनुष्य-त्वाची पदवी अजिबात नष्ट होऊन दारूबाज इसम बहुतेक पशुस्थितीला जाऊन पोहोचतो.

इतकी प्रस्तावना झाल्यानंतर आता मद्यपान हे व्यसन आमच्या भरतखंडा-मध्ये कोणत्या प्रतीचे गणले जात होते, ते पहा आणि त्याचा इतिहास थोडक्यांत देता येईल तितका देऊन भाग पुरा करूं.

वेदवाङमयामध्ये दारूचा उल्लेख आला आहे. शौत्रामणि नामक यज्ञामध्ये सुरेचे, दारूचे हवन केले जात असे. त्यापित्यर्थ दारू तयार करीत असत, त्यावेळी दारूचे प्रकार आढळतात. "पौष्टी" ही धान्याच्या पिठापासून तया र होते.

आणि गौडी गुळापासून बनते. आणि फुलापासून किंवा फळापासून मिळणाऱ्या गोड रसापासून तयार करीत ती 'माधवी' तिची करण्याची तऱ्हा यज्ञाच्या पवित्र शास्त्रात सांगितलेली आहे. भट्टी लावण्याचे मार्गही कथन केले आहेत, मात्र हेही आह्मी लिहिण्यास मागे घेत नाही की, यज्ञात हवन झाल्या नंतर शिलकी दारू वारुळावर ओतून टाकीत.

यज्ञामध्येसुध्दा सुरेचे पान करावयाचे नाही. असा नियम त्याकालीही होता.

मात्र या यज्ञात भरपूर (पान १२१) दक्षिणा घेऊन शेण खाणारा एखादा ब्राम्हण मिळाला तर तो द्रव्यरूप मलिदा त्याला पुरवून तसल्या ब्राम्हणाकडून ही अवशेष दारू पिऊन टाकवीत! वायपेय मधैंत्तीर्थ ब्राम्हण १०८,५ तैतीर्य संहिता १८२१ ज्ञानकोश विभाग दोन.

यज्ञामध्ये सुरापन करीत असत. परन्तु ती रथाची शर्यंत खेळणाऱ्यांना उत्तेजनार्थ देत असत. ब्राम्हण लोक ही शर्यंत खेळत नसत. हे लक्षात घेतले म्हणजे वेदातही सुरापान निश्चतच आहे. हे उघड आहे.

मनुस्मृतिमध्ये तर मद्यपान पंचमहापातकापैकी दुसऱ्या प्रतीत गणले गेले आहे.

ब्रह्महत्या हे पहिले महापातक आणि त्याच्या खालोखाल दारू पिणे ही स्मृतिकारांची आज्ञा पुढे पुढे सर्वच चातुर्वर्णींना शिरसामान्य झालेली आहे यामुळे हिंदू म्हटला की तो सहसा मद्यपान करणारा प्राणी नव्हे हा ठरीव सिध्दांत. या नियमा विरुध्द कांही लोक चोरून मारून किंवा निर्लज्ज झाल्यानंतर उघडपणे सुरापान करीत. पण ही गोष्ट अपवादाची आहे. सामान्यत: मध्यम हिंदुसमाज या व्यसनाच्या उलट आहे. पण कोठेही कोणत्याही समाजात असली काळी मेंढरे असायचीच! आह्मां कुणबी लोकांमध्ये या दारूच्या व्यसना विरुद्ध आजही लोकमत इतके जागत आहे की, ते म्हणतात एक दारूचा थेंब जर मनुष्याचे अंगावर कोठे पडला तर तेवढा भाग हाडापर्यंत कापून काढला तरच त्या पापाचे क्षालन होईल. एरव्ही होणार नाही! परन्तु या लोकमताचा परिणाम आमच्या इंग्रज सरकारवर कांहीही होत नाही, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. इंग्रज लोक इंग्लंडचे, त्यांचा देश शीत कटिबंधातील, १२ महिने पावसाची बुरबुर, बर्फाचे अच्छादन. वारंवार धुके आणि अधुन मधुन कडक थंडीने नदी नाल्याच्या पाण्याचे बर्फ बनून प्रवाहही बंद. अशा थंडीच्या अमलात मनुष्याच्या अंगातील उष्णता

गारठ्याने कमी होत जाणार, ती उष्णता कायम राखली पाहिजे, म्हणून गरम कपडा, मांसाहारासारखे गरम खाना आणि गरम मद्यपान त्याना कदाचित जरूर म्हणून घेणे भाग असेल. कदाचित अज्ञान किंवा वेडी समजूत आणि व्यसनाची पक्कड यामुळेही समजून उमजून ते ह्या व्यसनात पडत असतील.

आमच्यातील कांही लांब कानाचे दीर्घ शहाणे मद्यपानाचे मंडन करणारे आहेत! थोडी किंवा प्रमाणामध्ये दारू घेतल्याने वाईट परिणाम होत नाहीत अशी महापंडित व्याख्याने झोडणारे आहेत. परन्तु याना हे कळत नाही की, मितपान किंवा प्रमाणबद्ध दारू पिणे या गोष्टी ९९ अंशाने अशक्य आहेत. मितपानाची सबब सांगणाऱ्या असल्या मद्यपानाकडे ढुंकुनही बघणार नाही. ज्यांचा मनावर ताबा असेल, तोच मिताहारी किंवा मितभाषी होईल. परन्तु गोष्ट खोटी आहे. इंद्रियावर ताबा नसतो, म्हणूनच या धाणीकडे त्याचे लक्ष जाते! आणि मद्यही चीजच अशी आहे की, तिची चटक एकदा मनुष्याला लागली की, ती प्रमाणात रहातच नाही. विशाळगडच्या किल्ल्यावरील घसरलेला दगड जसा एकसारखा अधःपाताच्या नियमाने घसरणीच्या नियमाला लागतो, तसा हा मितपानाची सबब सांगणारा दारुड्या एकसारखा घसरगुंडीला लागतो, आणि अखेर त्याचा पूर्ण अधःपात होऊन निर्लज्ज पशू बनतो! म्हणुनच पूज्यपाद नाटकाचार्य कै. राम गणेश गडकरी हातात "हंटर" घेऊन स्वानुभवाने सक्त ताकीद देत आहेत की, या अत्यंत नीच प्रतीच्या व्यसनापासून परावृत होण्याची वेळ एकच! आणि ती कोणती तर त्या दारूचा पहिला घोट घशात उतरण्यापूर्वीच!!

० ० ०

## ब्राह्मणी धनलोभाची प्राचीन संस्कृती.

(ता. २३ आगष्ट १९२९)

(ऋग्वेद मंडळ १ ले, सूक्त २४)

वेदस् पुत्र हरिश्चंद्राला शंभर बायका होत्या. तरी मुलगा होईना. नारदाच्या आज्ञेने तो वरुणाकडे गेला. आणि सांगितले की, मला पुत्र झाला की मी तो तुला बली देईन. वरुणाने ते मान्य केले. पुढे मुलगा झाला, वरुणाने मागणी केली, पण बाप कांही तरी निमित्त सांगून वेळ मारुन नेऊ लागला. रोहित कवच घालण्यासारखा झाला, वरुणाचा तगादा चालू होताच. शेवटी मुलग्याने राजाला

ही हकीकत कळविली, त्याबरोबर मुलगा धनुष्य घेऊन रानात पळून गेला. वरु–णाने हरिश्चंद्राला ग्रासले, तेव्हां त्याला उदर रोग झाला. सात वर्षे गेली. एकदा रोहित उपाशी तापाशी अरण्यात फिरत असता, अजिगर्त ऋषीपाशी आला. त्याला तिघे पुत्र होते, मधला शुनःशेप, त्याला शंभर गाई देऊन विकत घेतला, आणि घरी जाऊन बापाला हे सर्व सांगितले. राजाने वरुणाला सांगितले, वरुणाला क्षत्रियापेक्षा ब्राम्हण बली बरा वाटला. शुनःशेपाला तयार करुन यज्ञ भूमीकडे आणले. पण त्याला यूपाला बांधण्याला कोणी तयार होईना. पण बाप अजिगर्त तयार होताच. त्याने आणखी १०० गाई घेतल्या. आणि आपल्या मुलाला यूपाला बाधले. पुढे मुलाला मारणे कोणी सज्ज होईना, बापाने आणखी १०० गाई घेतल्या, आणि मारण्यास तयार झाला. अशा संकट समयी शुनःशेपाने देवाचा धावा करण्यास सुरवात केली, ती वरील सुक्तात दिलेली आहे. उषेच्या धाव्यानंतर त्याचे पाश तूटू लागले. आणि इकडे हरिश्चंद्राचे पोटही उतरू लागले. यज्ञा करता विश्वामित्र ऋषी आले होते. त्यानी शुनःशेपाला दत्तक घेतले, आणि त्या मुलाचे हातून यज्ञ पुरा केला. मुलगा बापाकडे गेला नाही. विश्वामित्रानी त्याचे नांव " देवानी दिला " म्हणून " देवरात " असे ठेविले. ( पैशासाठी पोटच्याला मारायला तयार व्हावे ही ब्राह्मणी संस्कृती. )

★ ★ ★

# आमच्यातील घातुक चाली

(ता. २९ मे १९२९)

लग्नाचे मंगल दिवस आले, जिकडे तिकडे ताशाच्या दनदनाटांतून सनईचे कर्णमधूर ध्वनी खर्चापायी त्रासलेल्या वर बापाची मनधरणी करीत आहे. सात नवसाने झालेल्या लाडक्या नवरदेवाची माता कुठला पुरातन कोरवी की गार्दी बाजा आणला आहे, म्हणून रागारागाने गाजावाजा करीत पतिदेवास पाश्चिमात्य देशातील कुबेरानी धाडलेला ब्यांड मागविणेबद्दल आज्ञा करीत आहे; तर इकडे 'नको ते मला रबकई की घनवडी लुगडे, मी नेसीन तर नेसींन महेश्वरी साडीच नेसीन' म्हणून करवली आक्का रुसून चालल्या आहेत, अशा प्रकारची ब्रिटिश सरकारच्या शांततेच्या राज्यातही रणवाद्ये वाजताना ऐकून या लाडू करंज्याच्या रणमैदानात हंटरचे आगमन व्हावे हे साहजिकच आहे.

नीतिने व धर्माने प्रजोत्पत्ति व्हावी व समाजाचे रक्षण व वाढ व्हावी याच सद्हेतूने हल्लीची लग्न ही संस्था अस्तित्वात आहे. पंचा देखत कुलशील बघून वधुवराची मंगल गाठ बांधली की, त्या दोघा नवरानवरीची कायमची गाठ पडली, त्यांच्यात फाट पाडणे हे त्या दुष्ट यमराजाशिवाय दुसऱ्या कोणाच्याही हाती नाही, असे आमचे शास्त्र सांगत आहे. लग्नाकरिता इतका पैसा खर्च केला पाहिजे, अमुक अमुक प्रकारची पक्वाने केली पाहिजेत, इतक्या किंमतीचे दारू

सामान उडविले पाहिजे, अमुकच बकऱ्यांना यमसदनास रवाना केले पाहिजे. क्लोरोफॉर्म देणेकरिता इतक्या मद्याच्या बाटल्या रिकाम्या केल्या पाहिजेत किंवा कोरवी बाजाने लग्न प्रसिद्धीचा डंका सर्व गांवभर न होता ब्यांड अगर मसक बाजा लावूनच शुभ मंगल म्हटले पाहिजे किंवा रौप्य मुद्रिकेच्या तोडयानेच प्रेमाची लग्नगांठ खरेदी केली पाहिजे, असे कोणत्याही पवित्र धर्मशास्त्रांत सांगितले नाही.

ज्या थोर गृहस्थांचे भाग्यवान मस्तकांवर देवी लक्ष्मीचा वरदहस्त आहे अशा लक्ष्मी पुत्रांनी सदरील पुण्य मार्गात आपल्या द्रव्य जलाचा ओघ वाहू दिला तरी तूर्त त्याच्यासंबंधी आह्मी कांही लिहू इच्छित नाही. परन्तु आमचे ते शेतकरी बंधू, जे आह्मांस अन्नवस्त्र पुरवित आहेत, ज्यांचेवर सरस्वती व लक्ष्मी या दोघींचाही रोष झालेमुळे दीन अशा त्या अनाथ व अज्ञानी शेतकऱ्यांस आठ रुपयाचा भुभुक्षित कारकुनही ओळखेनासा झाला आहे. अशा 'ऋण फिटेल पण ह्रिन फिटणार नाही' असे म्हणणाऱ्या रूढी रुपी सैतानाच्या झाडाना ताळयावर आणण्याकरिता व त्यांची स्थिती सुधारणेकरिता आह्मी चार शद्व आज लिहिण्याचे योजिले आहे.

लग्न हे प्रेम आहे, हा बाजारातील सौदा नव्हे ही गोष्ट प्रत्येकास माहित आहे. आपल्या मुलामुलीची लग्ने बाजारच्या सौद्याप्रमाणें होऊ नयेत असेही प्रत्येकास वाटत असते. परन्तु वस्तुस्थिती पहाता जेव्हां लग्नाची वेळ येते तेव्हां त्यांचे ते सात्विक विचार बर्फाप्रमाणें पार वितळून जातात, व नवरा अगर नवरी पहाण्यास आलेल्या मंडळीस माझ्या मुलांस अगर मुलीस 'हूंडा देज काय देणार?' असा प्रश्न हे खाटकी अंतःकरणाचे आईबाप घालतात. आधिच आमचे लोकांची गरिबीची स्थिती. सर्वांनी कष्ट करून जेमतेम कसा तरी प्रपंचगाडा चालवायचा. अशा प्रसंगांत मुलाचे लग्न कर्तव्य तेव्हां आपल्या मुलाला भावी स्त्री सुख लाभावे, आपण सूनमुख पहावे, या करिता कुठल्यातरी निर्दय सावकारापासून हे देज व लग्न खर्च करणे करिता म्हणून १०००।१२०० रुपये कर्ज काढून विघ्न उत्पन्न करून घेणे त्यांना भाग पडते.

इतका कर्जाचा डोंगर करून नवरी पहावी तर ४।६ वर्षाचे आतील असा-वयाची म्हणजे तिचा सेंबूड मेकूड सासू सासऱ्यानी किंवा प्रत्यक्ष पती राजानी देखील काढण्याचा प्रसंग. नवरी मोठी करावी तर तिच्या वयाबरोबर वाढलेली व्याजाची रक्कम भरावी लागणार.

म्हणजे ज्याप्रमाणें बकऱ्याचे वजनावर त्याची किंमत अवलंबून असते त्याप्रमाणें या नवरीचा सौदा तिचे वयावर अवलंबून चालतो.

पुढे कुलदेवापासून अगर ग्रामदेवापासून या मंगल कार्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये म्हणून त्यांना खुष राखण्याकरिता ज्या त्या गांवाच्या ठरावाप्रमाणें ४।६ बकऱ्याच्या मुंड्या मोडून या मंगल कार्यारंभी त्यांची तोंडे अमंगल करावी लागतात व पुढे मुखशुद्धी करिता नैवेद्यावरोबर या ग्रामदेवाच्या व कुलदेवाच्या मुखी कांही मद्याच्या बाटल्या रिकाम्या कराव्या लागतात. ही झाली ग्रामदेवाची व कुलदेवांची वोळवण. परन्तु या शिवाय आणखी गृहदेवाची तृप्ती करावी लागली ती निराळीच. या गृहदेवास तृप्ती करण्याचे कामी मात्र त्या घरधन्याचे नाकी नऊ येतात. काय म्हणे मुलगी चांगले लुगडे नाही म्हणून रुसली आहे तर दुसरीकडून जांवईबुवा आपली ओटी भरणेचे वेळी कबूल केलेली सोन्याची अंगठी दिल्याखेरीज आहेर स्विकारीत नाहीत अशी तक्रार येत आहे, यापुढे जावे तर स्वतः घरधनीनच आपले विहीणींकडून आपला इतमाम ठेवणेत आला नाही म्हणून नूतन सुनबाईचे भासिग मोडणेस तयार झाल्या आहेत, अशी एक दोन काय भाराभर विघ्ने नाहीसी; करणेची जबाबदारी त्या घर धन्यावर पडते.

याशिवाय लग्नांतील दुसरे महत्वाचे विघ्न म्हणजे आपल्या वडिलार्जित इभ्रतीस मानास शोभेलसा थाटमाट, हीनपणा फेडणेकरिता करणेचा, शेजारच्या देशमुखाने गांवास चुलबंदीचे आमंत्रण सांगितले, अनेक प्रकारची वाद्ये लावून वरात रथांतून मोठ्या थाटाने काढिली. त्याने ५० रुपयाचे दारू सामान जाळले. तो गांवात आपल्याहून कमी, आपण गांवचे पाटील, तेव्हां त्याचे पेक्षा कांहीतरी वरचढपणा करणे ही अहमन्यता धरून, आपणही वेशीस टिळा लावणे, त्याचेहून सरस वाजंत्री व तमाशगिर आणणे, त्याने रथांतून वरात काढली आपण मोटार मागविणे, याप्रमाणें वरचढीत पैशाचा धुरळा करून दोन दिवसांत अविचाराने लग्नाची समाप्ती करणारी आज शेकडो कुटुंबे आपले नजरेस येतील.

हा लग्न सोहळा झाल्यानंतर जेव्हां झाल्या कर्जाबद्दल सावकाराचा तगादा सुरू होतो तेव्हां मग या घर धन्याची त्रेधा काय होत असेल हे सर्वांना विहित आहेच.

या सर्व गोष्टींचा बांधवहो! विचार करा व लग्नाकरिता अविचाराने खर्च करणाऱ्या आपल्या आप्तइष्टास परावृत्त करण्याचा प्रयत्न करा. लग्नाचा खरा खर्च काय हे त्यास समजावून सांगून ते मंगल कार्य तडीस जाण्यास जितका योग्य खर्च करणे भाग आहे तेवढाच त्यांचेकडून होईलसे करा, एवढेच आमचे सांगणे आहे.

## शिमगा आला जपून वागा.

(ता. २६ फेब्रुवारी १९२६)

धर्माचे नांवाखाली समाजाचे नीतिमत्तेची कशी धुळवड होते, हे कोणास पहावयाचे असल्यास, त्याचे प्रत्यक्ष उदाहरण आमच्या देशात या तारखेला जिवंत आहे. जुन्या चालीचे पोशिंदे आह्मास पोक्तपणाने सांगतात की, " अहो असे चालायचेच. या देवाधर्माच्या बाबी आहेत. आपले वाडवडील काय खुळे होते ?" नवीन लोक मात्र झांकून असल्या जुन्या चालीचा कड घेणारे कांही आहेत. हे आह्माला शास्त्राचा आधार दाखवतात. ते म्हणतात समाजाच्या चालीरीती, जुन्या संस्कृतीची परंपरा या सणात साठवून ठेवली आहे. कोणी म्हणतात " ही श्रीकृष्णाची गोपी बरोबर लीला आहे. ही वैष्णवांची भक्ती आहे. कोणी ह्मणतात श्रीशंकराने मदनाचे दहन केले. असा रुद्र कथेचा आधार आहे, एक ह्मणतो वसंतऋतू जवळ आला, त्याबद्दलच्या आनंदाचा हा प्रकाश आहे. ही होळी ह्मणजे उत्सवाची बॉन् फायर आहे. दुसरा ह्मणतो श्रीकृष्णाने पुतना राक्षसीला रक्त शोषून मारले आणि तिला या होळीत टाकून शंकध्वनी करावयाचा आहे. तिसरा शास्त्री भविष्य पुराणाचा आधार दाखवून आम्हाला गार करतो. ते ह्मणतात, प्राचीनकाळी ढुंढा नांवाची एक भयंकर राक्षसी होती. ती लहान मुलाना पीडा देऊ लागली ह्मणून गावच्या लोकांनी तिला बिभत्स शिव्या देऊन, शाप देऊन, चोहोकडे अग्नी पेटवून, तिला गावाबाहेर हाकालून दिले. तो आनंदाचा दिवस साजरा करणे करिता, भांग, गांजा, दारु, मांस नाचतमाशा वगैरेनी आपला पोटातला आनंद बाहेर दाखवायाचा आहे इतकेच. यागोष्टी बद्दल इतका गवगवा कशाला पाहिजे. ही रूढी आहे आणि हाच हिंदुधर्म आहे.

शिमग्याचा सण काय आणि त्याचा डिफेन्स देण्यासाठी शास्त्राचे आणि पुराणाचे आधार काय ? हा प्रकार पाहून या बुद्धिवंताची खरोखर कीव येते. सैतान नरकाला सुद्धा शास्त्राचा आधार देतो तद्वतच हा शास्त्र पुराणाचा आधार आहे. ज्याला ह्मणून काहीतरी माणूसकीची चाड आहे, असा कोणी हिंदू या सणातील घाणेरडे आणि बिभत्स प्रकार एक क्षणभरही पाहण्याला धजणार नाही. कोठे तो श्रीकृष्ण, कोठे त्याची ती भगवतगीता आणि त्याचे नावाखाली हा शिमग्याचा धांगडधिंगा ! शंकराने मदनाचे दहन केले, आह्मी आज आमच्या तरुण पिढीच्या सद्गुणाची त्या होळीत रांखरांगोळी करीत आहोत. त्या भडंग पुराणातल्या पुतणा मरोत, नाहीतर त्या ढुंढा मसणात जावोत. आमच्या मुला

बाळांचा चांगुलपणा आणि नीतिमत्ता व त्या बरोबरच आमच्या स्त्रियांचे लाज मर्यादेचे पांघरुण आज आह्मी सरणात फेकीत आहोत, याची वाट काय? कशाचा मेळ कशास घालीत आहांत. आज आमची तरुण मुले, ज्यांच्यावर राष्ट्राचा भार आज ना उद्या आह्मी टाकणार, त्या मुलांच्या कमरा आणि माना मोडून पिरग- ळून हा शिमग्याचा सण टाकीत आहे. इकडे लक्ष केव्हा द्यायचे ? सद्‌वर्तन ह्मणजेच राष्ट्राचा कणाटा आहे. तोच आह्मी नाहीसा करीत आहोत. जे तारु- ण्याचे दिवस कडकडीत ब्रह्मचर्य रक्षण करुन ठेवणेंचे, त्याच तारुण्यात नीतीची पायमल्ली आणि दुर्वर्तनाचे शिक्षण ! शिमगा ह्मणजे उंडगेपणाचे बाळकडूची शाळाच झाली आहे. दुराचाराचे विष आणि नीच विचाराची दुर्गंधी आणि निर्लज्यपणाचा तांडवनाच, याच्या लायसेन्सचे हे निर्लज्य दुकान आहे. उघडा बाजार आहे. तरुणानी लाज टाकायची आणि संभावीत स्त्रीपुरुषानी तिकडे पाहून मुकाट्याने खाली मान घालून चालू लागायचे. ही काय रूढी की आमचे वाटोळे ? पुरुषांचे कसेतरी या सणात चालते कारण त्या कारट्यांचे हे बाप आहेत, परंतु आमच्या आया, आमच्या बहिणी, आमच्या मुली, सूना या बिचा- ऱ्यांची रस्त्याने जाताना कोण दुर्दशा ! निर्लज्य, टवाळ, हलकट पोरांचा तो शंखध्वनी, ती गलिच्छ भाषा आणि चोहोकडून असल्या उघड्या नागड्या पोरांचा गराडा व मधून मधुन घाण पाण्याच्या पिचकारीचा मारा ! आहाहा ! काय त्या अबलांची ही हीन स्थिती ! केवढा हा आमच्या मुलांचा पराक्रम ! आणि असला हा प्रकार पाहून सुद्धा बिलकूल न डगमगता, आह्मी बापयानी तसाच चालू देणे ही केवढी वेदांतिक सहनशीलता ? ज्या आमच्या स्त्रीयांचेकडे कोणी डोळा उघडून पाहिलेले आह्माला खपत नाही. त्याच आमच्या बायकावर माय- भगिनीवर आमच्या डोळ्यादेखत वाटेल तसले घाणेरडे शब्द व अश्लील चाळे करावेत, हे देशाचे दुर्दैव नव्हे तर काय ? हिंदुस्थान तत्वज्ञानी लोकांचा देश. पण या रूढीचे दडप्याखाली तिरीमिरी येऊन पडलेला ! गुलामांचा काळप होऊन राहिलेला आहे. परकी राष्ट्रे या तुमच्या किडलेल्या धर्माला पाहून हसत आहेत. तोंडात शेण घालित आहेत. याची कांही लाज बाळगा. ही मुले तुमचीच. त्यांच्यावर तुमच्या आयुष्यातील सुखदुःख असल्या या खातेऱ्यात नाचून, अनीतीच्या गलिच्छ परिस्थितीने त्यांचे वाटोळे होत आहे कीं नाही याचा विचार करावा. ज्यांचा बालपणी हा पराक्रम त्यांचे हातून मोठेपणी कसली कामे होतील, हे दिसतेच आहे.

ब्राह्मणेतरानों हा लेख विशेषतः तुमचे साठीच आहे. तुह्माला असला प्रकार पहावतो काय ? ती मुले आणि त्या मुली तुमच्याच रक्तामांसाच्या काय ?

तुमच्या मुलानी आपले आयुष्याची ही दैना करावी, आणि कित्येक बापा भावानी या धुळवडीत आकंठ दारू पिऊन गटारांत लोळत पडावे व बायका मुलांचे हालहाल करावेत ! धर्मांचे नांवाखाली कानाडोळा करून ढकलण्याचे ते दिवस आतां गेले. तुह्मी माणसे आहात चार पायाचे पशुनासुद्धा लाजविणारे प्रकार या सणांत बिन दिक्कत लाज टाकून तुह्मी चालू द्यावेत हें तुमचे काम नव्हे. आजवर झाले ते झाले, आजच कानाला खडा लावा. स्त्रियांची क्षमा मागा आणि तुमची मुले पुन्हा असे करतील तर त्याचे मुस्काडात भडकावून कान उपटून हातात द्या. असली रूढी आजच तुमच्या त्या दारासमोरील होळीत जाळून टाका.

चुकून माकून शब्द गेलेत त्याची क्षमा करावी. आंतडयावाचून अशी भाषा निघत नाही.

० ० ०

## चांडाळ नवरा आणि बिचारीचे हाल.

(ता. २१ सप्टेंबर १९२८)

राजकीय सुधारणा करणाऱ्या मनुष्याला लोकांचे हुकमी पाठबळ असते. कारण एका जुलमी मनुष्याचे हातातून सत्ता काढून घ्यायची असते. आणि त्याचे फल चटकन दिसून येते. सामाजिक बाबीची तशी गोष्ट नाही. आपल्या लोकांच्या, आपल्या समाजाच्या, आपल्या जातभाईच्या अंगांपिंडात दुष्टरुढी मुरलेल्या असतात. त्या रुढीची घाण त्यांना सवयीने अगदी येईनाशी झालेली असते. आणि तसल्या चालीत त्यांना गैर काहीच वाटत नाही. या रूढीवर शस्त्र धरणारा इसम केव्हांही अप्रियच होणार. स्त्री जातीवर आज नाना प्रकारचे जुलूम चालू आहेत, ते आपल्या डोळयाला स्वच्छ दिसतात, परन्तु नीचवृत्तीचे लोकांना त्याचे कांहीच वाटत नाही. उलट स्त्रियांना गुलामाप्रमाणें, बटकीप्रमाणें किंबहुना जनावराप्रमाणें वागवण्याचा आह्मा पुरुषाना हक्कच आहे. अशी त्यांची दृढ समजूत झालेली असते. असल्या लोकांच्या विरुद्ध त्यांचे आप्तइष्ट, शेजारीपाजारी, गणगोत जाऊ शकत नाहीत. अन्याय डोळयांनी पहात असतात. पण डोळे झाकून मुकाटयाने तो चालू देतात. रुढीला कायद्याचे स्वरुप प्राप्त होते. आणि अबला वर्गावर जुलूम होत असताना, तो पूर्ण अवगत असतानाही कायदा कांही करू शकत नाही. आणि दयाळू न्यायाधीशही मूग मिळून स्वस्थ राहतात !

हिंदु समाजातील नवरा बायकोचे संबंध पुष्कळ चांगले असतात. धर्माचे पवित्र बंधन त्यांच्या मनावर सुपरिणाम करीत असते. आमची प्राचीन परंपराही स्त्री पुरुष प्रेमासंबंधी फार वाखाणण्याजोगी आहे. या गोष्टी जरी खऱ्या असल्या तथापि त्याला दुसरी बाजूही आहे. आणि अत्यंत काळीकुट्ट आहे ! समाजाला लाजविणारी आहे. हृदयाला द्रव आणणारी आहे ! असली उदाहरणे बहुधा समाजातील खालच्या वर्गात फार आढळून येतात. आणि हा समाजच फार मोठा आहे. उच्च वर्गामध्ये अशा गोष्टी फारशा नसतात. आणि असल्या तरी दृष्टोत्पत्तीस येत नाहीत. म्हणून त्यांचा आह्मी विचार आज करू इच्छित नाही. खालील वर्गात अशी उदाहरणे सर्वत्र दिसत आहेत. नवरा दुष्ट आहे, व्यसनी आहे, दारुबाज आहे, त्याने पर स्त्री घरी आणून ठेवलेली आहे किंवा तो तिच्या घरी बारा तास पडून आहे, असले नसलेले चार पैसे असल्या उनाडपणात खर्च करून भुकेबंगाल झालेला असतो. त्या पर स्त्रीच्या घरी पडून राहून वाटेल तसली तिच्या घरची कामे करतो. लाज, मर्यादा सर्व त्याने टाकून दिली असते. समाजांत त्याला कोठेही किंमत उरत नाही, तीं बाईही त्याला कस्पटाप्रमाणें मानते. पदोपदी त्याचा अपमान करते. चारचौघा देखत त्याचा पाणउतारा करते. पण हा पाजी माणूस, इतका निर्लज्ज बनलेला असतो की, त्या गोष्टीचे त्याला कांहीच वाटत नाही. इकडे त्याची लग्नाची स्त्री हक्काची सहधर्मचारिणी हिची काय अवस्था आहे, या गोष्टीची तो परवा करीत नाही. घरी असला तर विचारीला कधी सुखाचा शब्द मिळत नाही. नवऱ्याची भेट म्हणजे मारामारीशी गांठ ! जनावराप्रमाणें तो मारीत असला तरी तिचे कांही चालत नाही. तिनें एक शद्ब बोलणेचा नाही. मुकाटयाने तीं सर्व सहन करीत असते. शेजारी पाजारी हे सर्व पहात असतात. तिच्या घरी तिच्या अंगावर बसत असलेले नवऱ्याचे प्रहार त्याची निर्दयपणाची भाषा, तिच्या केविलवाण्या हांका व आरोळचा सर्व आसपासच्या शेजाऱ्यांना ऐकू येतात ! जवळपास पोलीस गेट असले तर तो दीनवाणा शब्द त्यांचे कानीही जातो, परन्तु कोणाचे कांही चालत नाही. केव्हां केव्हां तिचा नवरा बरोबर कांही दांडगेश्वर लोक घेऊन, ती बिचारी सहज कामासाठी आली तर, माहेराहून तिला जबरीने पकडून भररस्त्यावरून तिला गुन्हेगाराप्रमाणें फरफटत ओढून नेतो, ती आक्रोश करीत असते. नवरा तिची वेणी किंवा तिचे हात पाय धरून राजरस्त्यावरून बेलाशक घेऊन जातो. अशी अनेक उदाहरणे नेहमी डोळ्यापुढे आढळून येतात. पण यापुढे कोणाचे कांही चालत नाही.

ही रूढी अशी आहे. आणि असल्या रुढीवर उभारलेला कायदाही तितकाच आंधळा आहे ! नवराबायकोचे भांडणात कायद्याचे हातपाय मोडून तो अगदी पांगळा झालेला आहे. अशी ही स्थिती किती दिवस चालू राहायची ? हा विचा-

याचा प्रश्न आहे. आज समाज प्रगतीचे मार्गाला लागला आहे. स्वातंत्र्याचे नवे नवे विचार त्यांचे डोळ्यासमोर येत आहेत. लोकलबोर्डे, म्युनिसिपालट्या, कायदेकौन्सिले यांत मेंबर निवडून देणेचा हक्क वाढत्या प्रमाणावर मिळू लागला आहे. स्त्रियांनाही हा मतदानाचा हक्क मिळत आहे. कांही ठिकाणी स्त्रियाही अशा जबाबदारीच्या संस्थांमध्ये निवडून आल्या आहेत. आह्मी वरती वर्णन केलेल्या दुर्दैवी भगिनींची स्थिती त्यांचे पूर्ण लक्षात आहे. तेव्हां अशा कालात वरील राक्षसी रूढी चालू देणे म्हणजे आपले कर्तव्य विसरण्यापैकीच आहे. स्वातंत्र्याचे विचार आणि सुखे फक्त पुरुषानाच मिळणेची आहेत. स्त्रिया त्यास अपात्र आहेत. असे कोणी म्हणू शकणार नाही. स्त्रियांना आमचेसारखीच मने आहेत. त्यांना दुःखाची कल्पना आहे. त्यांच्या देहाला दुखापती केल्या तर त्या त्यांच्या अंतर्यामी जाऊन पोचतात. नवरा अशा रीतीने क्रूरपणे वागवीत असता, आपले हालहाल करीत असता, आपणावर त्याच्यासह अक्षता पडलेल्या आहेत, या एकाच कारणावरून यांना तो त्रास सहन करणेची शक्ती आलेली असते असे मानणे हास्यास्पद आहे ! "नको हा नवरा, त्याचे दर्शनही नको. हा प्रपंच नको. हा जीव नको. या स्थितीतून आपणांस कोण सोडवील काय ?" अशी आकाशाकडे तोंड करून त्या करुणा भाकीत असतील. पण ती हांक मधल्यामध्येच वितळून नाहीशी होते ! आणि ती हताश होऊन, एक एक दिवस मरणाचा म्हणून कंठित असते !!

खालील वर्गात पुनर्विवाहाची किंवा पाटाची चाल सर्रास चालू आहे. ही देवाची मोठीच कृपा आहे. केव्हां केव्हां वरील जाचांतून या मार्गाने त्या मोकळ्या होणेंचा प्रयत्न करीत असतात. तिचे आईबाप या संकटमय अवस्थेतून तिजला मुक्त करण्याची इच्छा बाळगतात. आणि कांही प्रसंगी बिचारीचे सुदैवाने नवरा बरा असला तर तिजला सोडपत्र देऊन मोकळी करतो. आणि ती दुसरा नवरा करून घेऊन, या मृत्युच्या पाशांतुन मोकळी होते. परंतु असले दैव सर्वच स्त्रियांना मिळते असे नाही ! कित्येक नवरे इतके दुष्ट, अधम आणि पशुतुल्यवृत्तीचे असतात कीं, त्या बिचारीचे कितीही हाल झाले, तरी तेवढ्याने ते तिला सोडपत्र देऊ इच्छित नाहीत. "जन्मभर तुला अशीच कुजत पाडली पाहिजे" असा कृतनिश्चय असतो ! या स्थितीत मात्र तिचे हाल कुत्रेही सहन करणार नाही !

आज वादाचा मुद्दा आमचे लेखात एकच आम्ही मांडीत आहोत. तो असा— नवऱ्याचे हातून तिला सोडपत्र मिळाले नाही, तर तिला पुनर्विवाह करता येत नाही. आणि येथेच काय ते घोडे पेंड खाते. यानेच तो नवरा चढून

गेलेला आहे. सोडपत्र न घेता, तिने जर पुनर्विवाह केला अगर पाट लावला तर इं. पि. कोड कलम ४९४ प्रमाणे तो गुन्हा होतो. आणि नवरा तर बुद्धि पुरःसर, निव्वळ दुष्ट बुद्धीने तिला सोडपत्र देत नाही. अशा स्थितीत तिला मार्ग कोणता ? आमचे स्पष्ट म्हणणें आहे कीं, अशा स्थितीत कायद्यानेच तिला हात दिला पाहिजे. तिला अशा अडचणीचे स्थितीत कायमची डांवून ठेवणे केव्हांही उचित नाही.

कोणी म्हणतील हा प्रश्न लहान आहे. अशी उदाहरणे थोडीच आढळतील. त्याबद्दल इतकी दगदग करण्याचे कारण काय ? यास आमचे म्हणणे असे. समाजात गुन्हेगारांची संख्या, नेहमी लहानच असते. चोर, वाटमारे, लुटारू, व्यभिचारी यांची संख्या लोकसंख्येच्या मानाने केव्हांही कुठेही लहानशीच असणार परंतु ते विष आहे. त्या विषाने सर्व समाजाचे सुख व शांतता बिघडून जाते ! आणि असल्या थोडया पण भयंकर लोकासाठीच कायदा राजदंड घेऊन तयार असतो ! याच करितां चांडाळ नवऱ्याची व्यवस्था लावण्यास कायदा सरसावला पाहिजे. त्यावाचून दुसरा खात्रीचा उपाय दिसत नाही. सामाजिक चळवळीने लोकमत तयार होते. असले नवरे समाजाचे शत्रू आहेत. असे विचार तयार होतात. पण त्या विचाराची अमलबजावणी होण्यास कायद्याचाच पाठिंबा पाहिजे. आता तो कायदा कसा असावा ? वरील दुष्ट रूढी नष्ट करण्यास कायद्याने कोणत्या उपायाची योजना करावी, ते सवडीप्रमाणें पुढे मागे लोकांपुढे मांडण्याचे अभिवचन देऊन, हा निम्मा सिम्मा लेख येथेच पुरा करीत आहोत.

० ० ०

## सोडपत्र मिळेना तर कसे !

( ता. २८ सप्टेंबर १९२८ )

गेल्या खेपेस चांडाळ नवरा आणि निरपराध बायको यांचे संबंध कसे असतात. हे दाखविणेचा प्रयत्न केला आहे, स्त्री जातीवर कसा नाहक जुलूम होत आहे याचे हलकेसे चित्र आम्ही लोकासमोर मांडले आहे. त्यावरुन लोकाना इतके सहज कळून येईल की आज चाललेला प्रकार अत्यंत अनिष्ट आहे. नवऱ्याच्या अप्रतिबंधक सत्तेला काहीतरी आळा घालणे जरूर आहे. आपल्या सहधर्मचारिणीला तो कसा पशुपेक्षाही कमी मानीत आहे आणि तिचे पुरे पुरे हाल होत असताना समाजाचे हातपाय कसे जखडून गेले आहेत, हे सर्वांना

कळून चुकले आहे. याला उपाय काय ? हा आजच्या लेखाचा विषय आहे. समाजाचे विचार प्रगतीच्या मार्गांस लागले आहेत. निरपराध स्त्रीची अशी हालअपेष्टा व्हावी ही गोष्ट कोणासही इष्ट नाही. परंतु या रूढीपुढे कोणाचे काही चालेनासे झाले आहे. खालील वर्गांत " जातीचा " अम्मल अद्याप कांही अंशी चालू आहे आणि बहिष्काराचे शस्त्र अद्याप बरेच प्रखर आहे. एखाद्या इसमाने धर्मबाह्य, नीतिबाह्य आचरण केले, भलत्याच स्त्रीशी व्यभिचार संबंध केला तर त्या इसमाला जातीचे लोक वाळीत टाकतात किंवा बहिष्कार घालतात. त्याचा न्हावी परीट बंद होतो. शेजारपाजार त्याला मानीत नाही विशेष प्रसंगी त्या इसमाला बोलावीत नाहीत किंवा त्याचे घरी कोणी जात नाहीत, ही गोष्ट प्रसिद्ध झाली म्हणजे त्याशी कोणी शरीरसंबंध करीत नाहीत. एखाद्या मुर्दाडाने अशा स्थितीतही त्याशी शरीरसंबंध केला तर त्या लग्नाला किंवा लग्नसंबंधी, मांडव वगैरे घालणेस कोणी जात नाही- लग्नासारखे समारंभ एकट्या दुकट्याच्याने पार पडत नाहीत. त्यास अनेक माणसांची मदत लागते. त्याप्रसंगी त्याला कोणीच मदत करीत नाही. त्याला मोठी अडचण पडते. मरणसमयी त्याच्या घरचे प्रेतही कोणी उचलण्यास जात नाही? त्याची हीन अवस्था होते. या जाती दैवाच्या प्रभावापुढे मी मी म्हणणाऱ्यांना गुडघे टेकावे लागतात. आणि त्याला पश्चाताप झाला म्हणजे दैव मंडळी त्याला कांही तरी दंड बांधतात. शरणचिठ्ठि घेतात आणि नंतर व्यवहाराला परवानगी देतात.

या सामाजिक शक्तीचा उपयोग उनाड नवऱ्याच्या उलट आमलांत आणल्यास बराच उपयोग होणार आहे. त्या इसमाने निष्कारण आपल्या बायकोस टाकली. माराहाण करुन बाहेर घातली. दुर्व्यसनी होऊन त्याचा परिणाम त्या बिचारीला भोगावा लागला. बायको नांदण्यास तयार असता तिला सरळ रीतीने नांदवून घेत नाही. मारहाण करतो. हाल करतो तिला दुसरा कोणताही सरळ मार्ग उरला नाही. असे समाजास दिसले. आणि कोणत्याही स्थितीत त्या बिचारीला सोडचिठ्ठि मिळेना आणि छळ संपेना, तर दैवाने त्याचेवर बहिष्कार घालावा. आणि तो चांगला कडकडीत घालावा. समाजाने, अलुते बलुत्यानी बैतेदारानी, न्हावी परीट महार यानी त्याचा संबंध अजिबात तोडून टाकावा, प्लेग कॉलरा झालेल्या इसमाप्रमाणे त्याचे घर अस्पृश्य मानावे किंवा महाव्याधी झालेल्या माणसास जसे वागविण्यात येते तशी त्याची व्यवस्था करावी. या उपायाने कसलाही अडदांड नवरा असला तरी तो वठणीला येईल. अशी आमची समजूत आहे.

केव्हां केव्हां, नवरा बायको दोघाकडेही कांही दोष असतो. आणि त्याचा परिणाम दुःखमय संसारात होतो. अशा स्थितीत सुबोध करुन समेट होऊन पुन्हा नवरा बायकोचे जुळले तर पहावे. नाही जुळले तर मारुनमुटकून आणि जबरीचे

उपाय करण्यास भाग पाडणे. सुखाचे होत नाही. अशा प्रसंगी समाजास योग्य वाटेल त्या प्रकारे स्त्रीच्चा आईबापाकडून कांही तरी रक्कम नवऱ्याला देण्यात यावी. आणि त्याजकडून स्त्रीला सोडपत्र देण्यांत यावे म्हणजे ती नाखुषीच्या आणि सक्तीच्या संसारातून मुक्त होऊन योग्य मार्ग पत्करण्यास स्वतंत्र होईल. जबरीचा प्रपंच कधीच सुखाचा होत नाही. समाजाचे किंवा दैवाचे योग्य म्हणणे नवरा ऐकत नसेल तर ( जात गंगा ) दैवाने सभाभरवून निषेधाचे ठराव पास करावेत व आपले दप्तरी ठेवावेत. आपणच दुर्वर्तनी होऊन बायकोला टाकून दिली आणि दुसरे लग्न करून घेण्यास तयार होईल तर असल्या नादान मनुष्याला कोणीही आईबापाने आपली मूलगी देऊ नये. दिल्यास दैवाने त्यांचा निषेध करावा व जरुर तर तसल्या आईबापावरही बहिष्कार घालावा. केव्हां केव्हां विशेष घरगुती प्रापंचिक अडचणीमुळे नवऱ्यास दुसरे लग्न करण्याचा प्रसग येतो. अशा वेळी सुधारणेची एक पायरी म्हणून नियम घालण्यांत यावा कीं, पहिल्या बायकोचे लेखी परवानगी पत्र असल्यावाचून नवऱ्यास दुसरे लग्न करण्याचा हक्क नसावा. याने कांही थोडीशी स्त्रीच्या हक्काला मदत होईल.

आम्ही ज्या वर सूचना मांडलेल्या आहेत. त्या सामाजिक स्वरूपाच्या आहेत. हा लोक जागृतीचा एक उपाय आहे. होता होईल तो समाजाचे विचार तयार व्हावेत. मनुष्याला दुष्कृती करण्यास लाज वाटावी. गरीब पत्नीची समाजाला दया उत्पन्न व्हावी. आणि त्या समाजाच्या विचाराचा परिणाम अप्रत्यक्ष रीतीने त्या भामटचा नवऱ्यावर व्हावा, हा हेतू आहे. पण किती झाले तरी काही बदमाश असे असतात. कीं, त्याना कशाची भीती नसते. आणि कोणाची चाड नसते. अशा निलाजऱ्या माणसापुढे या सामाजिक उपायाचे कांही चालत नाही असे होते. समाजाची मनोवृत्ती, समाजाचे नैतिक विचार उदयोन्मुख झालेले आहेत. तथापी समाजांत चोर, दरोडेखोर, आणि व्यभिचारी वगैरे लोक दिसून येतातच. त्यांना राजदंडावाचुन मार्ग नाही. राजाची शासन संस्था याच हेतूसाठी उत्पन्न झाली आहे. समाजाचे योग्य विचार समाजाचे सुस्थितीसाठी सक्तीचे मार्गाने अमलात आले पाहिजेत.

दुष्टनवरा आणि निरपराधी स्त्री यांचे आजचे संबंध हिंदुधर्मास लाजिरवाणे आहेत. नवऱ्याचे बादशाही आणि राक्षसी हक्कास पायबंद लावण्यास तशीच दुसरी जबरदस्त सत्ता त्याच्यापुढे उभी केली पाहिजे. राजाने आपला राजदंड हाती घेऊन असल्या अमर्याद नवऱ्याची खोड मोडण्यास कायद्याचे शस्त्रच मागे लावले पाहिजे. आज या बाबतीतला कायदा अपुरा आहे. असे कोणासही दिसून येईल. बायकोने क्रि० कोड कलम ४८८ प्रमाणें मॅजिस्ट्रेट कोर्टात पोटगीची मागणी

करावी. दिवाणी कोर्टांत पोटगीचा दावा लावावा. आपले नवराबायकोचे संबंध कायमचे नीट करुन मिळावेत म्हणुन न्यायाचे कोर्टात दाद मागावी, हे उपाय आज जरी कायद्याने सांगितले आहेत तरी त्याचा उपयोग करुन घेणे स्त्रीला फार जड जाते. दिवाणी कोर्टांचा उपाय फार खर्चाचा आणि दीनावधीचा आहे. हे वेगळे सांगणेस नको. ती बिचारी असहाय स्थितीत असलेमुळे निर्वाहाची जेथे पंचायत तेथे मुनसफ कोर्टाची तिने पायरी कशी चढावी? फौजदारी कोर्टांत उनाड नवऱ्या विरूद्ध तिला पुरावा मिळणें कठीण. याशिवाय मोठी अडचण ती अशी. तिला प्रसंगविशेषी स्वत: कोर्टात जावे लागते. ही संधी घेऊन जबरीने तिला मध्येच गाठून टांगा मोटारीत कोंबुन आपले घरी पुन्हा नेऊन तिला कोंडून घातलेचीही उदाहरणे कित्येक आहेत, आणि फिर्यादी गैरहजर म्हणून कामे निकालात गेलेली आहेत! ही सर्व परिस्थिती पाहिली म्हणजे कायद्याचा मार्ग तिला असून नसल्यासारखाच आहे. असे दिसेल.

आमची सूचना अशी आहे.–सरकानीच अशा स्त्रीला कायद्याची पण सुलभ आणि हलकी अशीं वाट दाखवावी. लोकलबोर्डें, ग्राम पंचायत, म्यु० पालटयां अशा संस्था आज कायद्याने निर्माण केल्या आहेत. सरकारांनी मनावर घेतल्यास स्त्रीयांचा कार्यभाग सहज होण्यासारखा आहे. संकटातल्या स्त्रियांना पेटाकचेरी कोर्टं किंवा जिल्हयाचे ठिकाण येथे जाऊन दाद मागणे मुष्किलीचे पडते. ग्रामपंचायतीकडे तिने आपली हकीकत लेखी अगर तोंडी कळवावी. अध्यक्षानी ती लिहून घ्यावी. नवऱ्यास नोटीस करून त्याचे ह्मणणें ऐकून घ्यावे. जरूर तसा उभयतांचा संक्षिप्त पुरावा घ्यावा आणि आपला रिपोर्ट तालुका बोर्डाचे अध्यक्ष याना कळवांवा. त्यानी त्या गावी स्वत: जाऊन चौकशी करावी. आणि नवऱ्याचा दोष आहे, त्या कारणाने स्त्रीचे निष्कारण हाल होत आहेत असे दिसले तर तसा दप्तरी ठराव करून तिजला सोडपत्राचे नमुन्याचे सर्टिफिकेट द्यावे. या ठरावाने ती बाई पतिपत्नी संबंधातून मुक्त होईल. यापुढे तिला स्वतंत्रपणे योग्य त्या मार्गाने आपला आयुष्यक्रम चालविण्यास परवानगी असावी. आणि या सर्टिफिकेटाला सरकारातून सँक्शन मिळावे. याचा अर्थ ते सर्टिफिकेट म्हणजे सोडचिठी असे कायद्याने ठरविण्यात यावे. पिनल कोड कलम ४९४ प्रमाणे नवऱ्याचे सोडचिठी वाचुन स्त्रीने पुर्नविवाह केलेस तो गुन्हा मानलेला आहे. त्या कलमात दुरुस्ती करणेत यावी आणि तिजला वारंट काढण्यापूर्वी तिच्या हातीं वरोलप्रमाणें दाखला आहे. किंवा कसें ? याची चौकशी करणेत यावी. तिचे हाती ग्रामपंचायतीचा दाखला असेल, तर वरील कलमाप्रमाणे कज्जा चालण्यास प्रतिबंध असावा.

वरील उपाय सूचनार्थ दर्शविलेला आहे. इतर कोणीही दयाळू इसमानी आपआपले विचार प्रगट करावेत आणि लोकमत तयार करून, सरकारातून कायदा करणेस भाग पाडावे. इतकाच या लेखाचा उद्देश आहे.

• ० ०

## सोडचिटीचा कायदा आणि धटिंगणाचा फायदा !

(ता. १६ डिसेंबर १९२७)

आणि या जुलमाला कायद्याच्या कोर्टाचा पाठिंबा ! नीतीची पुष्टी आणि रूढीची पाठ थोपटणी ! आज आह्मी ज्या विषयाचा उहापोह करणार आहोत, तो विषय स्त्री–शिक्षण नव्हे. त्यांचे अज्ञान नव्हे, किंवा पुनर्विवाहही नव्हे. बायकोचा नवरा जिवंत असून त्याने वाटेल तसा धांगडधिंगाणा घालावा, याने व्यसनी व्हावे, तो गांजांखस होवो, दारूबाज होवो, तो दुराचारी होवो, बदफैली होवो. वाटेल ते अनीतीचे वर्तन त्याने करावे. त्याला कायद्याची सरपरवानगी आहे. त्याच्या लग्नाच्या बायकोची, अग्निदेवतेसमक्ष घेतलेल्या शपथेची काडीचीही किंमत नाही. नवऱ्याने व्यभिचार करावा, वेश्या बाळगावी, फार काय त्या गांवबसवीला आपल्या गृहामध्ये लग्नाच्या बायकोच्या उरावर आणून नाचवावी ! बायकोसमक्ष वाटेल ती थेरे करावीत. बायकोने मात्र या सर्व गोष्टी मुकाट्याने सहन केल्या पाहिजेत. तिला सूख पाहिजे असेल तर त्या घरघुशी बाईची मर्जी संपादन केली पाहिजे. तिचे मन दुखवले, प्रकृती बिघडली तर हे नवरोजी त्या बिचारीवरच शस्त्र उपसून राहणार आणि फुकट मार खावा लागणार. ती नंदीनी बिघडली की शंकराचा राग अनावर होणार. अशी आजची स्थिती आहे.

ही स्थिती खालील मराठा, कुणबी, शेतकरी वर्गांतच फार दिसून येते. उच्च मराठा वर्गांमध्ये सुद्धां असली उदाहरणे दिसतात. पण ती तितकी चांगली उघडकीस येत नाहीत. कायदा सगळ्याना सारखाच. तो कोणत्याही वर्गांतील स्त्रीला दयाबुद्धीने पहात नाही. कायद्याला तिची दया येत नाही. तिची हालअपेष्टा उघड उघड आणि दिवसा ढवळ्या होत असताना शेजारीपाजारी मुकाट्याने हात आखडून पहात राहतात. त्यांच्याने कांही करवत नाही. एकदा एक मौजेची गोष्ट घडली ती अशी :– वर्ग १ मॅ. समोर अशाच एका बाईने नवऱ्यावर पोटगीचे काम चालविले, तिची साक्ष घेण्याचा प्रसंग आला. बाईनें आपली अडचण कोर्टाला कळविली की, मी साक्षीला येते. परन्तु वाटेतच नवरा

भला ओढून नेईल. कोर्टाला दया आली. आपले शिपाई तिच्या घरी संरक्षणासाठी पाठवून तिला कचेरीत आणिली. साक्ष झाली. पुन्हां कोर्टाने शिपाई बरोबर देऊन कोर्टाच्या हद्दीच्या बाहेर सुरक्षित पोचवली. इतक्यांत काय झाले पहा! त्या नवऱ्याने रस्त्यावर मोटर ठेविली होती. आणि चार लोक बरोबर होते. बाई रस्त्यावर येताच तिला उचलून मोटारीत घातली आणि ती ओरडत असता पार घेऊन गला! आणि तो परहद्दीत. त्यामुळे बायकोचे कांही चालले नाही. मॅजिस्ट्रेट हात आखडून स्वस्थ बसले!

दुसरे एक गमतीचे उदाहरण घडले ते असे:— एक इसम दुराचारी, व्यसनी निघाला. आपल्या पशुवासना शांतपणे आणि अप्रतिबंध चालू ठेवाव्यात, कोणाचा अडथळा नसावा, म्हणून त्याने निष्कारण बायकोला माराहाण करून घरातून बाहेर काढून लावली. पोटासाठी तिने दुसऱ्याची भांडी घासणे, स्वैंपाककाम पत्करले. नवऱ्याने इकडे दुराचार जोराने चालविला. त्या वेश्येपासून त्याला २–४ मुलेही झाली. अशी १५ वर्षे गेली. इकडे या बायकोने पोटासाठी हाल होत आहेत, म्हणून नवऱ्याकडे सोडचिट्ठीबद्दल मागणी केली, तो सोडचिट्ठी देईना. तिचे हाल करावेत, आपण डोळ्यानी पहावे, हीच त्याची अमानुष इच्छा. तिजजवळ तो सोडचिट्ठीबद्दल भलतेच पैसे मागू लागला. दळणकांडण करून पोट भरणाऱ्या बिच्यारीने नवऱ्याच्या म्हणण्याप्रमाणें पैसे आणावेत कोठून? अखेर निरुपायास्तव तिने पुनर्विवाह (पाट) लावून घेण्याचा निश्चय केला आणि त्याजकडून कांही हलकीशी रक्कम देणेचे कबूल केले. परन्तु नवरोपंतांची हाव मोठी! तो मोठा खर्चिक झाला होता! आणि त्याचे वेश्येचा खर्च व प्रपंचही मोठा झाला होता. त्याने मोठ्या रकमेची मागणी केली. ती तिच्या शक्तीच्या बाहेर होती. त्याचे म्हणणे असे की, "तुझे आणखी मी हाल करणार असेच तुला कुजत पाडणार! आणि घरच्या रांडेची धुणी तुला धुवायला लावणार." केवढां हा थोरपणा! केवढी प्रतिज्ञा! आणि केवढा निश्चय!! कांही दिवस निघून गेले. ज्याच्या घरी ही बिचारी निराधार स्त्री पोटाकरिता दळण कांडण करीत राहिली होती, ते गृहस्थ थोर, सज्जन व अब्रुदार होते. परन्तु त्यांचे हातून त्या गरीब बिचाऱ्या बाईसाठी कांही एक करतां येईना. एके दिवशी त्या वाड्याच्या दर–वाज्यांतून पाण्याची घागर घेऊन, बिचारी आंत जात असता, त्या चांडाळ नवऱ्याने एकदम तिजवर हल्ला केला आणि तिची वेणी धरून मागे रस्त्यावर पाडली. आणि भर रस्त्यात लाथा घालीत तिजला फरफटीत तो आपल्या घरी घेऊन गेला! तिचे हाल काय होत आहेत, ते पुसू नयेत! त्याच्या घरच्या बटकीची लुगडी आणि मुलाबाळाची कापडे डोकीवर घेऊन, रोज तिला बाहेरून धुवून आणावी लागतात. असा प्रकार उघड चालू आहे.

ही स्थिती अपवादाची किंवा विरळा म्हणून आह्मी लिहिलेली नाही. आमचा खालचा वर्ग म्हणजे खरी लोकशाही. त्यांच्यातच असले व्यसन फार. आणि त्यांच्यातच असल्या जुलमाच्या, हृदयाला घरे पाडणाऱ्या गोष्टी फार. हा प्रकार गुप्त नाही. लाजन छपून नाही. कायद्याने नवऱ्याला तसे स्पेशल हक्कच देऊन टाकलेले आहेत. आणि हिंदुधर्म शास्त्राचा आणि रूढीचा या दुष्कृत्याला भरभक्कम हातभार आहे.

ही स्थिती आणखी किती दिवस चालणार ? हे विसावे शतक आहे व्यक्ति–स्वातंत्र्याचा चौघडा चहूंमुलखी वाजत गाजत आहे. पण या राक्षसी कायद्यापुढे लोकांना हातच टेकावे लागत आहेत. राजकीय संस्था आणि शासनशास्त्र ही लोकांच्या कल्याणासाठी लोकांनीच निर्माण केलेली आहेत, स्त्री जातीची ही हालअपेष्टा लोकांना आता खास पाहवणार नाही. परन्तु त्यांची समजूत अशी झाली आहे की, हाच कायदा आहे. हीच न्यायनीती आहे. आणि हीच रूढी चालू ठेवण्याचे काम राजाचे आहे. राजे लोकांना आह्मी उघड जाहीर करीत आहोत की, अन्यायाची आता परमावधी झालेली आहे. स्त्री जातीवरील जुलु–माची पराकाष्टा झाली आहे. सत्ताधारी लोकांनी डोळेझांक करण्याचे दिवस निघून गेले आहेत. असेच चालूं दिल्यास अनाथ गरीब स्त्रियांना निर्वाहासाठी पापमार्गास सक्तीने लावल्यासारखेच होणार आहे ! करिता अधिकाऱ्यांनी आतां जागे होऊन इकडे पहावे. आणि कायद्याने नवऱ्याला जो भलताच अधिकार दिला आहे. त्याची मुंडी मुरगळून टाकावी ! अशी आमची नम्र सूचना आहे.

जेथे जेथे असा प्रकार दिसून येईच, तेथे तेथे कायद्याने अशी आज्ञा घालून द्यावी की, असल्या दुराचारी नवऱ्याने दुसरे लग्न करणेचे तर पहिल्या बायकोची त्या लग्नास लेखी संमती तरी पाहिजे एक, किंवा त्याने पहिल्या बायकोचे पती पत्नी संबंध सोडचिट्ठी देऊन, नष्ट तरी करून टाकले पाहिजेत एक. त्यावाचून त्याने दुसरे लग्न करणेचे नाही. केल्यास तो पिनल कोडाप्रमाणें गुन्हा होईल. तशी कायद्यात दुरुस्ती करावी. कोणीही नव्या नवरीच्या बापाने असल्या पुरुषास आपली मुलगी देणेची तर त्याने अगोदर हे पाहिले पाहिजे की या पुरुषाचे हाती. पहिल्या बायकोची या लग्नास लेखी संमती आहे काय ? याबद्दलची खात्री करून घेऊनच, मग आपली मुलगी देणेचा विचार करावा.

यांत धर्माधर्माचा संबंधी नाही. मानव प्राण्याच्या जीविताचा प्रश्न समाज सौख्याच्या आणि शांततेचा प्रश्न आहे. आज लोकनियुक्त कौन्सिले कायदा करण्यास बसली आहेत. त्यानीही हा विषय अगत्याने हाती घ्यावा. आणि अबलावरील अन्याय दूर करण्याचे श्रेय घ्यावे.

आमच्या या सूचनेचा विचार ब्रिटिश सरकार आणि हिंदी संस्थाने करतील काय ?

° ° °

## भोजनशाही अथवा नव्या डोळ्याना जुने तमाशे ! !

( ता. १३ एप्रील १९२८ )

या लेखांत आह्मी तश्या विचाराच्या लोकां संबंधाने लिहीणार आहोत. पाश्चिमात्य विचारांच्या ओघाला तोंड देण्यासाठी म्हणून असो किंवा आपली प्राचीन संस्कृती रक्षण करण्याचे बुद्धीने असो, उलट बाजुने एक स्वदेशी विचाराची लाट उसळू लागली आहे असे दिसते. त्यात धर्म विचाराचा पाय सर्वांच्या पुढे पडणे सरळच आहे. या धार्मिक आणि सामाजिक विचाराचा मक्ता एका विशेष वर्गांकडे फार प्राचीन काळापासून आलेला आहे. तो ब्राम्हण वर्ग या बाबतीत मागासलेल्या वर्गाचा पुढारी आहे. ऊसाच्या गुऱ्हाळाला सुरवांत करण्यास मुहूर्त विचारण्यास जाणारा शेतकरी वर्ग काय किंवा जन्माचे कल्याण ज्यात निगडीत झाले आहे. अशा मंगल विवाहास मुहूर्त विचारण्यास जाणारा गृहस्थाश्रमी काय? दोघेही एकाच मानसिक दास्यत्वाने बद्ध झालेले दिसतात. आणि यज्ञा निमित्त शेकडो रुपयांची सुवर्ण दक्षिणा उपटण्याचा प्रघात पाडणारा याज्ञिक पुरोहित याने जी एकदा धर्म विचाराची अतर्क्य गुरुकिल्ली सैल केली आणि मागासलेल्या लोकांच्या विचारांना एक विचित्र दिशा लावून दिली, ती आजपर्यंत सामाजात चालू आहे. यज्ञमार्गाने तात्विक आणि परमार्थिक कल्याण कोणाचे किती झालं असेल आणि होत असेल, याचे मोजमाप आमचे जवळ नाही. त्यामुळे त्याचा हिशोब करता येन नाही. परन्तु दक्षिणा वाटणें आणि भोजणे घालणें याचा हिशोब मात्र पै न पै बिनचूक सांगता येईल. लग्नवामाप्रसंगी नाहक खर्च आणि दक्षिणा भोजनाचा खर्च हा सर्वत्र लहाना पासून थोरापर्यंत इतका बेसुमार वाढला आहे की, त्याचा हिशोब करायला बऱ्याच स्लेटपाटचा वारंवार पुसून काढाव्या लागतील ! लग्नमुंजी, जनन मरण, बारावा आणि चौदावा वगैरे सोहळा संस्काराच्या पायी आमच्या समाजाचा या निष्कारण भोजनाखाली इतका खर्च होतो को, तो पैसा हजारो कुटुंबाना ऋणमुक्त करून सुखाने प्रपंच करण्यास पुरा झाला असता गरीबांचे हाल तर पुसूच नका। या लग्नवामांतील भोजनाखाली वेगवेगळ्या प्रसंगी जेवणावळी घालतांना आणि फुकट्या भोजनभाऊना समाधान

करतांना, बिचाऱ्या यजमानांच्या कमरेचा कांटा अगदी ढिला होऊन जातो! गरिबांचे का लग्न होईना, चार-पांचशे रुपयाखाली आताशा लग्नच होणे शक्य नाही. असे झाले आहे. आणि खर्चाची यादी पाहिली तर फुकटच्या जेवाणाचाच खर्च निम्याहून जास्त होत असतो ! आणि तो लग्न वामाचा अवडंबर खर्च करण्यासाठी बिचाऱ्याला कर्ज काढणे भाग होते. खेड्यांपाड्यांतील आमचे अनुभवावरुन आम्ही खास सांगतो कीं, लग्न खर्चासाठी काढलेले कर्ज फेडण्याला आठ-आठ दहा-दहा वर्षे आपल्या जमीनी शेतकरी सावकाराच्या ताब्यात देत असतो. आणि स्वतः भुकेकंगाल होऊन, बुडत्याचा पाय चिखलांत जास्ती जास्तीच रुतत असतो.

ही लग्नवामदी सोहाळच्याची घोरपड कमी झाली ह्मणून की काय कोण जाणे, अलीकडे एक नवीनच वावटळ उत्पन्न झाली आहे ! ती उच्च ब्राह्मण–वर्गानी प्रचारात आणली आहे आणि तिचे अंध अनुकरण, भोळसट, खुळसट, श्रद्धाळू, लिंगायत, जैन, मराठे वगैरे ब्राह्मणेतराकडून ही ब्राह्मणांच्या मागे धावत जाऊन, करण्यात येत आहे. यज्ञाचा काल आणि प्रभाव (?) पूर्वीच नष्ट झाला आहे. वेदातील उच्च विचार बौद्ध सांप्रदाय भक्तिमार्ग आणि संतांचे थोर विचार या योगानी यज्ञाचा मूर्खपणा मागेच ठरून गेला आहे. असे असूनही हे गाढलेले प्रेत मधून मधून कोठे कोठे आपले डोके वर काढीत असते ! नरसिंहवाडी–कल्लोळ मांजरी, वाई आणि गडहिंग्लज पेट्यातील महागाव वगैरे ठिकाणी एक दोन सालात पुरोहित ब्राह्मण वर्गाकडून यज्ञ करण्यात आलेले आहेत. हे प्रकार पाहून आह्माला दुःख होते आणि हसूही येते. यज्ञाने देवता संतुष्ट होतात. आणि अनिष्टे टळतात व इच्छित फलप्राप्ती होते. या गोष्टी सारासार विचाराच्या मनुष्याला आता पटत नाहीत. आणि कोणी हे मार्ग खरे आहेत असे शाबीत करू लागला तर ते ऐकत बसण्याला रिकामी वेळही कोणाजवळ नाही ! आणि असल्या विषयाची काथ्याकूट करण्याचे कोणी पंडीत श्रम घेऊ लागला ह्मणजे अद्यापी जगात वेडेपीर आहेत ह्मणून हसू येते ! आणि आजची समाजाची स्थिती पाहताना अति इंग्रजी संस्कृतीशी टक्कर देणेची तर आपण कोणत्या मार्गाने परिश्रम केले पाहिजेत हे लक्षात घेतले ह्मणजे आपला पैसा अजून सुद्धा असल्या निरुपयोगी कामांत खर्च व्हावा. याबद्दल दुःख होते ब्राह्मणी भोजन शाहीने बाजीरावांची पेशवाई बुडाली ! इकडे घोड्यांना चंदी नाही. बंडातल्या शिपायांना पगार नाही तर तिकडे त्याचवेळी बंडाचे पुढारी नानासाहेब पेशवे लक्ष भोजने घालून ब्राह्मणांच्या आशिर्वादाची पुण्याई आपल्या माथ्यावर घेत बसले होते. आमच्या देशात आज उपयुक्त

कामाला, महत्वाच्या संस्थाना पैसा मिळत नाही. गरीबांना धंदा नाही, हुन्नर नाही, कला नाही, यंत्र कला शिकण्यास पैसा नाही, संशोधनाला मदत नाही, शेतकऱ्याला खतमूत, लागवड, बी बियाणाला जबर व्याजाने सावकारांची घरें उपसावी लागतात. अनेक संस्था उत्पन्न होतात. पण द्रव्या भावामुळे मरून जातात ! अशी दैन्य वाणी स्थिती चोहोकडे दिसत आहे तर इकडे धर्म संस्काराच्या नावावर लग्नमुंजीच्या बडेजावासाठी, यज्ञयागाच्या ढोंगाला, वाटेल तसा पैसा खर्च व्हावा, हे पाहून कोणालाही दुःखच वाटेल ! वेळ कशी आणीबाणीची आहे, आपण कोठे आहो आणि काय करतो आणि करावयास पाहिजे काय ? याचा विचार बिलकूल न करिता, लबाड, सोंगाडे, ढोंगी, स्वार्थी, आणि खोट्या धर्मांचा बडेजाव मारणारे धर्मगुरु, याज्ञिक, शास्त्री, पंडित, स्वामी, मठाधीश आणि पोटभरू असल्या नादान लोकांच्या नादी लागून भोळ्या जनतेने पाण्यासारखा पैसा, मागे पुढे न पहाता, खाण्यासारख्या भिकारड्या कामी खर्च करावा, हे देशाचे दुर्भाग्य होय ! आणि गरीब बिचाऱ्या मागासलेल्या लोकांचा पैसा असल्या कामी खर्च व्हावा, ही त्याहून दुर्भाग्याची गोष्ट होय ! !

गेल्या चार दोन महिन्यात करवीर इलाख्यांत गडहिंग्लज पेठ्यामध्ये असल्या कांही गोष्टी घडल्या, हे ऐकून, हा लेख लिहिण्याची प्रवृत्ती झाली. महागांव हा गांव विशाळगडकर पंतप्रतिनिधी यांचे जहागीरी पैकी आहे. तेथे परवा एक यज्ञ झाला. त्याकामी बहुतेक उंबरा ठोक-पट्टी वसूल करण्यात आली. आणि एक आठवडाभर यथेच्छ भोजनावर ताव मारून हजारो रुपयांचा चुना करणेत आला ! ही वावटळ पोचली तेथील महारवाड्यात, ब्राम्हणांनी यज्ञ केला, त्यांची नक्कल महारानी रेडे जत्रा करून केली ! त्या कामीही घर पट्टीचा भुर्दंड होताच. महारवाड्यांत रेडे मारण्याचा राक्षसी प्रकार. तर गांवात प्रत्येकाचे घरी बकरे पडलेले ! ! अशा रीतीने पैशाचा चक्काचूर ! पण या सर्वावर कळस केला गडहिंग्लज गांवाने ! तेथे कोणी लिंगायत स्वामी आले त्यानी पुराण सुरू केले. आणि तीन महिने दररोज साऱ्या गांवाला जेवण घालण्याची विचित्र कल्पना काढली ! तेथील लिंगायत लोक खाऊन पिऊन सुखी आहेत. कित्येक चांगले सधन आहेत. पैसा साऱ्या गांवावर वर्गणी घालून गोळा केला. आणि रोज मुक्तद्वार भोजन ! ! असा प्रसंग अलिकडे त्या भागात केव्हांच झाला नव्हता, असे म्हणतात ! गडहिंग्लजने अखंड किर्ती मिळविली ! लिंगायत वर्ग कृतकृत्य झाला. आता स्वर्गाचा पल्ला गांठण्याला काहीच अडथळा राहिला नाही ! !

अशा कामी श्रीमान लोकांनी पैसा खर्च करणे म्हणजे देशाचे भरपूर वाटोळे करणे होय! पण शाहाण्यांना सांगावे कोणी? धर्मगुरूनी वेडगळ विचाराची धूळ जी एकदा डोळयात फेकली आहे, ती अद्याप डोळयातून गेली नाही. डोळे उघडत नाहीत. दृष्टी साफ होत नाही. धर्माच्या नांवाखाली गोरगरीबांचा चुराडा होत आहे, इकडे कोणी लक्ष देत नाही. देश बंधूनो, हा देशोद्धाराचा मार्ग नव्हे. भोजनशाहीत देवही नाही आणि धर्मही नाही! ही आळसाला मदत आहे. गरीबाच्या पोटाला चिमटा आहे. व भोंदु लोकांच्या लुच्चेगिरीला प्रत्यक्ष सहाय्य आहे. यापुढे तरी असल्या मार्गाने जाऊन पदरी मूर्खपणा घेऊन, गरीबाच्या पदराला खार लावूं नका. पुष्ट लोकांना भोजन घातल्याने कोणताही देव संतुष्ट होत नसतो! कायद्याच्या मार्गाने यज्ञयाग, आणि रेडे जत्रा, वगैरे चाली बंद करण्याची आता वेळ आली आहे, असे सर्व विचारी लोकांना वाटूं लागले आहे सरकार इकडे लक्ष देईल काय?

• • •

## देवाचे सोहाळे व भिकेचे डोहाळे!

(ता. १९ आक्टोबर १९२८)

मूर्तीपूजा आमच्या धर्माचे एक खरे अंग आहे किंवा नाही. याबद्दलचा उहापोह करणेची आमची इच्छा नाही. वेदकाली मूर्तीपूजा नव्हती. ही गोष्ट खरी आहे. पुढेही बराच काळपर्यंत आपल्या देशामध्ये आजच्या स्वरूपाची मुर्तीपूजा नव्हती. हेही खास. परन्तु पुढे कांही कालाने एका ना दुसऱ्या स्वरूपात मूर्तीपूजा अस्तित्वात आली. गौतमबुद्धाच्या कालानंतर असो, किंवा जैन सांप्रदायाच्या अभ्युदय काली असो, मूर्तीपूजेचा प्रचार भरतखंडात चालू झाला. तो आज सुमारे तीन हजार वर्षे आजतागाईत चालू आहे. आपल्या हिंदुधर्माचे ते एक महत्वाचे अंग झाले आहे.

मूर्तीपूजा मान्य आहे, असे गृहीत धरून आह्मी त्यासंबंधी कांही विचार जनते समोर मांडीत आहो. संवयीने म्हणा किंवा मनाच्या समाधानासाठी म्हणा, अथवा इंद्रियाच्या आकांक्षा तृप्त करण्यासाठी म्हणा, देवाच्या मूर्ती स्थापन झाल्यानंतर नानाप्रकारच्या पद्धति पुजेबरोबर येऊ लागल्या. आणि त्याबरोबर मनाची हौस पुरवण्यासाठी नाना संस्कार आणि नाना उपचार या पूजा पद्धतीत शिरले. एकांतस्थळी खासगी ठिकाणी एखाद्या अवतारी पुरुषाची

किंवा महात्म्याची मूर्ती समोर ठेवून तिच्या ठिकाणी मनाचा लय लावला, नम्र भावाने आपण त्या ठिकाणी शरण गेलो, प्रपंचाचा भार त्या मूर्तीचे ठाई स्थानापन्न केलेल्या सर्वसमर्थ ईश्वरावर घातला, तर आपल्याला कांही वेळ समाधानाचे सुख खास मिळते. असा अनुभव कित्येक लोकांना आलेला आहे. या उदात्त तत्वावर मुर्तीपुजेचे मंडन करतात, असे दिसते. परन्तु ही साधी व सरळ भावना व नम्रपणाची स्थिती जाऊन डामडौलात मनुष्य शिरतो. संस्काराच्या आणि उपचाराच्या नादी लागतो, तेव्हां शुद्ध श्रद्धेचे स्वरूप पालटून जाते, आणि अंध भक्तिच्या डोलकाठीवर भकलेल्या जहाजाप्रमाणें मानव प्राणी हेलकावे खाऊ लागतो. असलाच प्रकार आज चोहोकडे दिसत आहे. आणि त्यात ‘ देव नाही, धर्म नाही ’ असे होऊन अनेक लोक पैसा, श्रम, आणि काल याचा निष्कारण व्यय करीत आहेत. आणि “ बुडत्याचा पाय खोलात ” या न्यायाने आपला देश जास्तच भुकेबंगाल होत चालला आहे. हे पाहून मनाला खेद होतो.

मुस्लिम धर्म हा मुळचा निराकार ईश्वरवादी. परन्तु कालांतराने त्यात वीर पुरुषांची विभूतिपुजा सुरू झाली. पैगंबर महंमद यांचे नातू हसन–हुसेन. ते युद्धांत मारले गेले. त्यांच्या मृतात्म्याला आदर दाखविण्यासाठी म्हणून मोहरम महिन्यामध्ये ताबूताच्या रूपाने विभूतिपुजा सुरू झाली. विभूतिपुजेच्या अंगी “ व्रतानां उत्तम व्रतं ” या न्यायांने आपली इष्ट देवता इतरांच्या देवताहून फार थोर आहे. असा दुरभिमान उत्पन्न होतो ! आणि त्या ताबूताच्या समारंभाला कोणा इतर धर्मीयांनी अडथळा आणता कामा नये. असा दुराग्रह मुसलमानास उत्पन्न झाला. नाना तऱ्हेचे मनोरंजनाचे प्रकार ताबूताच्या समारंभात येऊ लागले. नाले आणि त्यांच्या बैठकी मशीदीत अवतरल्या. जागा कांचेच्या पदार्थांनी आणि बिलोरी हंड्यानी गच्च भरून जाऊ लागली. नाल्याहैदर, घुडनपीर, बाराइमाम अवचित पीर, वगैरे विभूतिच्या भेटी कत्तल रात्री होऊ लागल्या. तो दंगा त्या मशाली, ते किटसन दिवे, या लाइटमध्ये त्या भेटी परत भेटी म्हणजे निष्कारण पैशाचा व्यय ! आमच्या महाराष्ट्रातील स्थिती पहाताना दिसून येते की, या मोहरमच्या सणामध्ये महत्वाचा भाग घेणार म्हणजे आमचे ब्राम्हणेतर हिंदुलोक. स्वतः मुसलमान लोकांचे प्रमाण यात कमी. येथपर्यंत कांही टीका होते. या सणात भाग घेणारा म्हणजे खालच्या वर्गांत फार. सुशिक्षित समाज यात फारसा पडत नसे. फक्त मशालीच्या तेलाचाच खर्च काय होईल तो होईल ! इतकेच. परन्तु पुढे लठ्ठाठ्ठीचा सुकाळ सुरू झाल्यानंतर मात्र हिंदुसमाजातील कांही पुढाऱ्यानी वेगळे विचार मनात आणले. मुसलमानांच्या ताबूताच्या सणात हिंदुलोक भाग घेतात, याचे कारण या हिंदु तरूणाना वर्षातून चार दिवस कांही तरी निमित्ताने धांगडधिंगा घालावयास पाहिजे ! ती हौस पुरवण्याजोगा मोहरमच्या

जोडीला आपण एकदा हिंदी सण शोधावा. आणि त्यांत चार दिवस त्याना मनमुराद नाचण्याबागडण्यास संधी द्यावी. म्हणजे झाले. घरोघरी गणेश चतुर्थीस गणपती बसत होतेच. त्यालाच थोडे मोठे आणि सार्वजनिक स्वरूप दिले म्हणजे झाले. याप्रकारे मोहरमला आणि ताबूताला तोडीसतोड म्हणून गणपति उत्सव हिंदू तरूणांच्या हाती देण्यात आला. आणि ती पाऊलवाट रहदारीने हमरस्त्याच्या स्वरूपाला आलेली आहे !

आजचे गणेशोत्सव बरेच पूर्णावस्थेस पोहोचले आहेत. कलेच्या दृष्टीने गजाननास नानाविध स्वरूपे देण्यात येंत आहेत. मेळ्याच्या रूपाने सामाजिक, राजकीय शिक्षण, गायन, वगैरे मार्ग देण्यात येंत आहे. दांडपट्टा, कुस्ती, लेजिमचे खेळ वगैरेनी तरूणाना कांही मर्दानी कलेची हौस फेडून घेण्यात येते. वेळ आनं–दात जातो. सुशिक्षित मंडळातील गणपति समोर व्याख्याने वगैरे देऊन लोकजागृती करण्यात येते पुराण, कीर्तन गायन, वादन झाले. तर त्यात वावगे कांही दिसत नाही. इतक्यावर हे समारंभ आटपले असते तर हा लेख लिहिण्यास आह्मास कारण नव्हते. परन्तु गजानन उत्सवाची मजल याच्या पलिकडे जाऊ पहात आहे. म्हणून आह्मी पुढील चार ओळी लिहित आहोत.

वरील निर्दशित केलेल्या हकिकतीवरुन दिसून येईल की, कोणत्याही कामामध्ये प्रमाण सुटले की, मुळ हेतू बाजूस राहतो; आणि भलत्याच गोष्टीला अवास्तव महत्व येते. देव असावेत. भक्ति करावी. पण अवास्तव सोहाळे नकोत. उत्सवाचे अवडंबर नको. "करावी ती पूजा मनेचि उत्तम। लौकिकाचे काम काय असे ?।। " (तुकाराम महाराज) हा संतांचा सवाल आहे. आज आपल्या देशाची स्थिती अगदी पालटून गेली आहे. या भरतभूमित पुर्वी सोन्याचा धूर निघत होता असे म्हणतात. पण त्याऐवजी आज दरिद्री लोकांच्या श्वासोश्वासाबरोबर दुःखाचा धूर निघत आहे ! आपल्या प्राचीन संस्कृतीने आणि रहाणीने संपत्तीची वाटणी बऱ्याच अंशाने योग्य प्रमाणात होत असे. पण आधुनिक सुधारणानी नवीन शास्त्रांनी आणि कलाकौशल्यानी देशाची संपत्ती योग्य प्रमाणांत वाटली जात नाही. एका बाजूस संपत्तीत आणि ऐशआरामात कांही थोडे श्रीमंत लोक लोळत पडले आहेत, तर दुसऱ्या बाजूस "अन्न नाही वस्त्र नाही." अशा विपन्न अवस्थेत हजारो गरीब लोक पोटासाठी भटकत फिरत आहेत ! कोणताही उत्सव समारंभ किंवा देखावा करण्यापूर्वी हा आपला खर्च योग्य कामास जात आहे काय ? हा प्रश्न प्रत्येकानी आपल्या समोर ठेवला पाहिजे. प्राथमिक शिक्षणाला पैसा नाही. शेतकीच्या कामाला पैसा नाही. किरकोळ धंद्याना पैसा नाही. ग्रंथ उत्पा-

दनला पैसा नाही. सार्वजनिक उपयुक्त कार्याला पैसा नाही. अशी बोहोंकडे ओरड चालू असता, " ना देवाय ना धर्माय " अशा वायफळ उत्सवात पैसा उध-ळून टाकणे योग्य होईल काय? या गोष्टीचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. कापराच्या बैठकीला आह्मी हसत होतो. त्यांच्या सवाई बिजली बैठकी आज होत आहेत! रंगीबेरंगी सप्तरंगी विजेच्या लखलखाटीत हे उत्सव आणि प्रोसेशन होत आहेत. परदेशीय मालाच्या वस्तू, चित्रे, तोरणे, पताकां, झालरा यात वाया पैसा जात आहे. गुढ्या तोरणाला तर सीमाच नाही, आज आहे उद्या नाही, असल्या क्षणिक शेवाळी गवताच्या कमानी उभारणे आणि असल्या देखाव्यात श्रम, वेळ आणि पैसा खर्च करणे हे आजच्या कालाला योग्य आहे की, काय? हे पाहिले पाहिजे. असल्या दगदगीपासून फलनिष्पत्ती काही आहे काय? भक्तीचा मार्ग यात कांही दिसत नाही. विघ्नहर्त्या गजाननाने देशावरची कितीसी विघ्ने दूर केलेली आहेत? जिकडे पहावे तिकडे सर्व सारखेच. कांही लोक केवळ आत्मपौढीकरिता दगदगी करून घेतात. मध्यम प्रतीच्या लोकांच्या खिशातील पैसा वर्गणीरूपाने एकत्र गोळा करण्यात येतो. नकली प्रदर्शनात हा पैसा खर्च होतो आणि पानसुपारीच्या द्वाराने आपली कामगिरी कांही लोकांसमोर मांडण्यात येते. आटपला कारभार! खरी भक्ती विरळा. स्नेह आणि प्रेमवर्धन क्वचितच. लोकोपयोगी कार्याच्या नावाने शून्य! या गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे असले " नाकापेक्षा मोती जड, " समारंभ होतील तितके कमी झालेले बरे. असे वाटू लागते. मोहरमची यहुदी काय? आणि गजानन उत्सवातील खोटी पानसुपारी काय? कशातच अर्थ नाही.

जैन सांप्रदायांमध्येही केव्हां केव्हां प्रकार हाच दिसून येतो. पंचकल्याण महापूजा घ्या. त्यानिमित्त सामाजिक परिषदा वगैरे बैठकी भरविण्यास येतात. परन्तु तो पूजेचा प्रकार म्हणजे नुसत्या भोळ्या भावाचे किंवा लौकिकाचे प्रकर-णच होय म्हटले तरी चालेल. दुध, वगैरे पदार्थांचे अभिषेक प्रमाणाबाहेर करण्यात अर्थ तो काय? देवाला तर ते पोचत नाहीतच पण माणसालाही व्हायचा तो उपयोग होत नाही. कांही दिवसा मागे गर्डहिंग्लज गांवी कोणी एक लिंगायत साधू पुरुष आले होते. त्या निमित्त कित्येक दिवस भोजन समारंभ चालू होता. या गोष्टीचा आह्मी पूर्वी एकवार उल्लेख केला होता. साऱ्या गांवभर फिरून पैसे गोळा करायचे आणि ते खाण्यात उडवून टाकायचे. जेवणास येणारे लोक आंधळे, पांगळे, निराश्रीत असेही नसताना. पण असल्या कार्याचा समावेश " धर्मकार्य " या नांवात होतो. खऱ्या सार्वजनिक कार्याला कोणी पैसा मागितला

तर ती मिळावयाचा नाही. पण असल्या नाना भोजनाला मात्र पैसा मुकाट्याने खर्च करतात. ही अंधश्रद्धा आणि वेडगळ धर्मसमजूत मुळातच नष्ट व्हावयास पाहिजे. खऱ्या धर्मश्रद्धेबद्दल किंवा सात्विक दानाबद्दल आमची हरकत नाही. परन्तु वरील कामात देशाचा पैसा खर्च होणे यात खरे दान नसून देशाची दैना मात्र खास आहे.

★ ★ ★

# कर्मयोग खरोखरोच आम्हास टिळकानी शिकवला काय ?

( ता. २४ जुलै १९२५ )

ता. १४।७।१९२५ च्या केसरीत लोकमान्यांच्या 'जन्मकर्माचे' रहस्य या मथळ्याखाली एक लेख प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून मला सुचलेले विचार वाचकांसमोर मांडीत आहे.

कै. टिळक हे जाडे विद्वान होते. प्राचीन ग्रंथांच्या अवलोकनावरून अनुमाने काढण्याची त्यांची शैली वर्णनीय होती, व कोणताही विषय हाती घेऊन त्याचे विवेचन ते करूं लागले म्हणजे त्यात त्यांची अचाट बुद्धिमत्ता दिसून येत असे, या गोष्टी निर्विवाद आहेत. तसेच पूर्वीचे राष्ट्रीय सभेच्या कामाची दिशा बदलून, तिला त्यांनी नवीन वळण लावले, अर्जाच्या पुडक्यांची किंवा सभेतील वाक्पांडित्याने स्वराज्य मिळत नसते, त्यास अतुल स्वार्थत्याग केला पाहिजे व अनेक देह खर्ची घातले पाहिजेत, हेही शिक्षण त्यांनी दिले यात शंका नाही.

परन्तु केतकरांनी टिळकांचे कर्तृत्वाबद्दल गीत गात असता त्यांना प्रत्यक्ष देवाच्या मालिकेत घातले आहे. अवतारी पुरुषात त्यांची गणना केली आहे, इतकेच केवळ नव्हे, तर हजार पंधराशे वर्षांमध्ये जे झाले नाही ते काम टिळकानी केले हे त्यांचे विधान आक्षेपार्ह आहे, आणि ते आह्मास बिलकूल मान्य नाही.

टिळकांचें अंतरंग व बहिरंग असे दोन भाग केतकरांनी कल्पिलेले आहेत, "न मां कर्माणि लिंपन्ति न मे कर्म फल स्पृहा" म्हणजे त्यांच्या मनावर कर्माचा कांही परिणाम होत नसे किंवा त्यांना कशाची अपेक्षा नव्हतीं असे म्हणण्याबद्दल तसा कांही पुरावा आमच्या समोर आलेला नाही. केतकरांचे जवळ असल्यास नकळे. "सोने रुपे आह्मां मृतिके समान." हा आमचा कुणब्याचा उपदेश आहे. पण ते सत्पुरुषांचे अंतरंग आहे, या दृष्टीने पाहूं जाता तसा कांही पुरावा टिळकांना अनुकूल असेल, असे कांही दिसत नाही.

उलट अंतकाळपर्यंत त्यांच्या जवळ असलेली भरपूर संपत्ती व मृत्यु–नंतर तिचा बाहेर किंचितही ओघळ जाऊ नये म्हणून आपल्याच गोताव-ळ्याच्या हितासाठी त्यांनी करून ठेविलेले ट्रस्ट डीड, हे पाहता मुमुक्षूच्या मार्गांत त्यानी फारशी पावले प्रवास केला असेल असेही दिसत नाही! त्यांचा द्रव्याचा लोभ सुटला होता असे म्हणण्यास प्रमाण नाही. "टिळकांच्या आठवणी" अगर आख्यायिका हे 'भगत मंडळीचे पोवाडे' आहेत! अंध भक्तीची उदाहरणे आहेत.

ती वाचून क्षणभर मौज वाटेल, अभिमान वाटेल, आदराचा पाझर फुटेल, पण या आठवणी पुराव्याच्या कसोटीस केव्हांही टिकणार नाहीत, म्हणून थोरपणाची कसोटी या दृष्टीने त्यांचा कांही उपयोग होणार नाही. तात्पर्य, टिळकांचे हृदय सत्पुरुषाचे होते, त्यांची भावना साधूची होती, असे म्हणण्यास आपले समोर कांही प्रमाण नाही. मिळून त्यांचे अंतरंग गीतेत सांगितलेल्या अवतारी पुरुषात होते, असे म्हणण्याला पुरावा समोर येत नाही.

टिळकांना आह्मी जाणतो ते त्यांच्या सार्वजनिक कामावरून. त्यांनी आपली शक्ति व बुद्धिमत्ता आजन्म सरकारविरुद्ध आजन्म राजकीय हक्क कमावण्याच्या कामी खर्च केली याबद्दल.

पण अवतारी पुरुष ठरविण्यास एवढी एकच कसोटी पुरी होणार नाही. राजकारण व धर्म यांचे सम्मेलन त्यानी केले होते काय? लोकांशी वागण्यात ते तसे उतरत होते काय? "जनतेची" त्यांची कल्पना काय होती? धार्मिक व सामाजिक बाबीत त्यानी लोकांचे हक्क कोठपर्यंत नेले? धर्मदृष्टीने आपल्या वागणुकीचा पारा त्यांनी किती अंशाला नेऊन पोहोचविला होता? त्यांच्या राजकारणात देवाच्या अधिष्ठानाचे मिश्रण किती झाले होते? पर-कीयाकडे आपले हक्क मागताना, आपल्या खालचे लोकांचे हक्क आह्मी देण्यास किती तयार झाले पाहिजे, या दृष्टीने टिळकांची वृत्ती काय होती?

दीनदुबळ्यांशी त्यानी किती सक्रीय सहानुभूतीने वागणूक केली ? व अस्पृश्य मानलेल्या आपल्याच हिंदु बांधवांशी समता आणि ममता दाखविण्याबद्दल त्यानी किती झीज सोसली व लोकापवादास पात्र होण्याचे त्यानी किती धैर्य दाखविले ? सारख्याच क्षेत्रफळाच्या एका चौकटीत एक परकीय राजकीय संस्थांचे वर्तुळ बसविताना लोकांच्या मनाची तयारी करण्यासाठी, जुन्या चालिरीतीला व रूढीला झुगारुन देऊन, या प्रगतीच्या कालास व जनतेच्या वाढत्या आकांक्षेस अनुरूप अशा धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी, टिळकांनी कितपत श्रम केले ? या चालू मनूतील खऱ्या थोर पुरुषाच्या परिक्षेचा काटा लावून जर टिळकांचा आयुष्यक्रम आपण पाहिला तर त्यांची गणना अवतारी पुरुषात तर होणे शक्य नाहीच, पण 'जनतेचा कल्याण कर्ता' या नात्याने त्यांचा दर्जा फार कमी प्रतीचा ठरेल, हे कठोर पण सत्य अनुमान वाचकासमोर मांडणे आह्माला भाग पडते, याबद्दल आमचा निरुपाय आहे.

टिळक मोठे मुत्सद्दि होते, राजकारणी होते, परन्तु हे सर्व एकांगी होते, असे आह्मास वाटते. राजकीय हक्क सरकारापासून हिसकावून घेऊन दाखवायचा हा त्यांचा मुख्य हेतू होता. यात अर्धी मुत्सद्देगिरी झाली; पण या पुढील कार्य फार कठिण आहे, ते हक्क मिळाल्यास त्यांची वाट काय करावयाची ? त्याची वाटणी कशी करायची ? जनता ह्मणजे कोण ? याबद्दल टिळकांची दृष्टी मोठी झालेली अगर दूरवर गेलेली दिसून येत नाही. राजकीय हक्क ब्राम्हणी अरिस्टाक्रसीमध्येच रहावेत, हीच त्यांची इच्छा होती. ब्राह्मणेतर लोकशाहीत तिचा प्रसार व्हावा इतकी त्याची विशाल दृष्टी झाली नव्हती. अस्पृश्याना तर त्यानी कधी महत्वही दिले नाही. आणि आपल्या संस्कृतीचा त्याना खरा लाभ द्यावा असे प्रयत्न त्यानी कधीच केले नाहीत. ही संकुचित दृष्टी त्यांच्या कुशाग्र बुद्धीला साजेशी नाही. धर्माच्या बाबतीत मनःपूर्वक त्यांनी कांही केल्याचे आठवत नाही. खरोखरच आपला धर्म व आपली सामाजिक रचना हीन दशेला गेल्याची कल्पनाही त्याना होती किंवा नाही कोण जाणे ! 'राजकीय हक्क, आपला पक्ष, आणि ब्राम्हणशाही' ह्या 'ट्रिनिटीच्या पलीकडे त्यांचे कार्य–क्षेत्र खास गेले होते असे म्हणणे हे अंधभक्तीचे लक्षण होईल.

श्रीकृष्णाचे 'दिव्य जन्मकर्म' टिळकांच्या अंगी उतरले होते आणि या कारणाने ते अवतारी पुरुष होते, हे केतकरांचे विधान ब्राह्मणेतराना पटण्यासारखे नाही. पुण्यतिथीच्या उत्सवानिमित्त व्याख्यान देताना एखाद्या मनुष्याने गुणवर्ण-

नच करणे हे बरोबर आहे, परन्तु तसे करताना दुसऱ्या पुरुषांची तुलना करणे आणि खऱ्या थोर पुरुषाना अंधारात टाकून आपल्याच देवतेचे देव्हारे माजविणे किंवा गुणसंकिर्तन करणे, हे आरती करणाऱ्यास शोभेल. ' व्रतानां उत्तमम् व्रतम् ' म्हणणाऱ्या पुराणिकास साजेल, परन्तु इतिहासात ते खपून जाणार नाही. जाणत्या जनतेस ते पटणार नाही. एखाद्या मनुष्याची जेवढी खरी योग्यता आहे तितकीच मांडणे बरे. त्याची अवास्तव स्तुती करणे म्हणजे त्याची एकप्रकारे निंदाच होते. (" अन् डयू प्रेज इज हाल्फ् सेन्सर ") हे वाक्य लक्षात ठेवून केतकरानी आपला लेख मर्यादेने लिहिला असता म्हणजे बरे झाले असते. परन्तु विभूतिपूजेच्या ( हिरो वरशीप ) भरात त्यानी इतकी अतिशयोक्ती केली आहे की, जो दोष कदाचित काव्यात अलंकार म्हणून शोभला असता, तोच वस्तुस्थितीचे चित्र रेखाटण्याचे कामी दोष होऊ पाहात आहे.

यापुढे कर्मयोग व गीतारहस्य याबद्दल लिहिताना तर भक्तीने केतकर इतके आंधळे झाले आहेत की, गेल्या दीड हजार वर्षात टिळकांच्या तोडीचा थोर पुरुष त्याना बिलकूल दिसत नाही. आणि खरा कर्मयोग हा कोणाचा आहे ! क्षत्रियांचा यात संबंध आहे की नाही. ही क्षत्रियांची ' राजर्षि परंपरा ' आहे आणि ती आज तागायत मराठ्यांच्या आंगी जागती ज्योत म्हणून सदैव तेवत राहिली आहे. ही क्षात्रवृत्ती, हा निष्काम कर्मयोग, इतका स्वतंत्र आहे की आद्य शंकराचार्यांच्याही तो पूर्वीचा आहे. आणि टिळकांच्या गीतारहस्याचा त्या वृत्तीशी कांही संबंध नाही. ही गोष्ट केतकरांच्या मुळीच ध्यानी आलेली दिसत नाही.

> हिंदू तत्वज्ञानाची अंगे दोन, सांख्य आणि योग, किंवा दुसऱ्या भाषेत सांगावयाचे म्हणजे ज्ञानमार्ग व कर्ममार्ग. शंकराचार्यांनी भाष्य लिहून ज्ञानमार्गाचे विवेचन केले, त्यांचा ग्रंथ मुख्यत: संन्यासपर आहे, आणि टिळकांचे ' गीतारहस्य ' हे विशेषत: कर्ममार्गपर आहे.

आमच्या मते वास्तविक पाहता या दोन्ही मार्गात भेदच नाही. दोन्ही एकच आहेत. " सांख्य योगी प्रथक बाला: प्रवदन्ति न पन्डिता: " असे गीताच सांगते. शंकराचार्यांचा संन्यासमार्ग वेगळा, आणि रहस्यकारांचा कर्ममार्ग वेगळा, असे म्हणणे अज्ञानाचे दर्शक आहे. खऱ्या विद्वानाना त्यात भेद दिसत नाही. असो आम्हाला गीतेतील शद्वाचा छल करून ती संन्यासपर आहे की कर्मपर आहे, हे दाखविण्याचे आज काम नाही. केतकरांनी जो एक भला मोठा सिद्धांत काढला आहे की, " आमच्या तत्वज्ञानाचा आरंभ श्री शंकराचार्यांनी केला, पुढे सुमारे दीड हजार वर्षे ते काम तसेच पडले आणि अखेर ते राहिलेले अपुरे काम टिळकांनी दूर केले; " हे विधान इतिहासास सूटून आहे.

शंकराचार्यांनी गीतेवर भाष्य लिहून हिंदू तर्कशास्त्राची परमावधी केली. त्यांचे अनुमानशास्त्र आपले सिद्धांत शाबित करण्याचा मार्ग केवळ अद्वितीय आहे, त्याचप्रमाणें टिळकांचे रहस्य हा ग्रंथही तुल्यबल व अप्रतीम विचार शक्तीचा आहे. त्याबद्दल कोणालाही अभिमान वाटेल.

वाद त्या गोष्टीबद्दल नाही, परन्तु केतकरांनी तत्वज्ञानाच्या एका टोकाला शंकराचार्य, आणि दुसऱ्या टोकाला टिळक बसवून, मधील सर्व तत्वज्ञानाचा इतिहास त्याबरोबरच मोठमोठे धर्मवीर व कर्मवीर, तसेच सद्‌गुण पंडित महासंत माला, तसेच अचाट पराक्रमाचे रणधुरंधर, व मूर्तिमंत देशाभिमानाचे पुतळे, असे क्षत्रियवीर जे होऊन गेले, त्या सर्वांना अंधारात घालून दरम्यानच्या भारतीय नकाशावर सरसकट बोळा फिरविण्याचा जो प्रयत्न झाला आहे, तो आमच्या मते अगदीच एकदेशीय, पक्षपाती, व सत्यालाप करणारा आहे. या केतकरांच्या विधानाने भक्तिप्रधान रसाचा उपमर्द झाला आहे. आणि वीररसाचा अपमान झाला आहे. काय गेल्या दीड हजार वर्षात कर्मयोगी कोणी झालेच नाही? गोष्ट अगदी खोटी आहे.

आमच्या भरतभूमीत साधुसंतांच्या आणि पराक्रमी क्षत्रिय वीरांचा दुष्काळ कधीच पडला नाही.

इतकेच नव्हे तर त्यांची सदैव सांगड जमून राहिलेली आहे. हिंदुस्थानलाच नव्हे, तर अखिल दुनियेला ज्यांच्या बद्दल अभिमान वाटेल, व ज्यांच्यापासून स्फुर्ती होईल, असे महान भगवत भक्त व रणगाजी, याच कालांत होऊन गेलेले आहेत. परन्तु केतकरासारख्या विद्वानांना शंकराचार्य एकीकडे, आणि टिळक दुसरीकडे यावाचून दरम्यानचा कोणीच थोर पुरुष दिसत नाही. दुर्दैव आमचे !

शंकराचार्यांनी गीताभाष्य व शरीरभाष्य हे ग्रंथ कोणासाठी लिहिले ? केवळ संस्कृततज्ञ महापंडितासाठी. त्यांचा तर्क बहुजन समाजाला कळण्यासारखा सुद्धा नाही. शेंकडा पांच लोकांनासुद्धा, आज त्यांच्या ग्रंथाचे पूर्ण ज्ञान होणार नाही. बहुजन समाजाशी त्यांच्या ब्रह्मज्ञानाचा काय संबंध आहे ? टिळकांनी गीतारहस्य लिहिले हे सुद्धा तसल्याच अगदी अल्पसंख्यांक लोकांसाठी. दोघांनीही सार्वजनिक आणि अज्ञान समाजासाठी मात काय केले आहे ?

अगोदरच तत्वज्ञान हा विषय कठिण, आणि त्यातही मतामतांचा गलबला करून जास्तच गुंतागुंत करून ठेविलेली आहे. गीतारहस्याच्या उलट वे. शा.

बापटशास्त्री व मारुळकर शास्त्री वगैरे पंडितानी पुस्तके लिहून त्यांच्या कित्येक सिद्धांतांचे खंडनही केले आहे. आणि अखेर संन्यास मार्ग श्रेष्ठ की, कर्मयोग श्रेष्ठ हा पूर्वीच घोटाळा होता तसाच जिवंत राखून ठेविला आहे !

शंकराचार्य व टिळक यांनी आपली विद्वत्ता लेखणीने पुस्तकात मांडून दाखविली.

परन्तु क्षत्रियांनी हेच तत्वज्ञान आपल्या प्रत्यक्ष कृतीने आपल्या अंगच्या रक्ताने तरवारीच्या लेखणीने रणभूमीच्या मैदानावर लिहून ठेविले आहे. आह्मी स्पष्ट जाहीर करतो की, खरा वेदांत, खरे अद्वैत, खरा कर्मयोग, हा क्षत्रियापासूनच निर्माण झाला आहे. त्यानीच वागून दाखविले आहे. आणि अद्याप जिवंत ठेविला आहे. मात्र तो पुस्तकात नसून भारतीय आर्यांच्या हृदयपटलावर आपल्या पराक्रमाने कायमचा वज्रलेप करून ठेविला आहे उपनिषदाच्या वेळी शंकराचार्यांच्या पूर्वी हजारो वर्षे, याज्ञवल्क्यासारख्या विद्वान ब्राम्हणाला वेदांत ही काय चीज आहे, हे बिलकूल माहीत नव्हते. त्या वेळी त्या विषयाचे ज्ञान महर्षि राजा जनकानी ब्राह्मणांना करून दिले आहे.

याची आठवण श्रीकृष्णानी अर्जुनाला गीता सांगतली त्यावेळी " कर्मणैव-हिसंसिद्धिआस्थिता जनकादय: " या चरणाने करून दिली आहे. म्हणजे संन्यास आणि कर्मयोग उत्कृष्ट रीतीने जनकादी राजांनी पूर्वी आचरणात आणून दाखविला आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे

ब्राह्मणानी आपली बुद्धिमत्ता यज्ञयाग व कर्मकांड यातच खर्च केली आहे. त्याना या प्रखर असिधाराव्रताचे, कर्मयोगाचे ज्ञान, केव्हांही नव्हते व त्यानी आचरणात आणलेही नाही. हे तत्वज्ञान म्हणजे संन्यास आणि कर्म या दोन्ही मार्गाचा अगदी बेमालूम मिलाफ, केवळ क्षत्रियानीच केला आहे.

आणि या ज्ञानावर वारसा हक्क अर्थात क्षत्रियांचाच आहे. श्री कृष्णाचीच याबद्दल साक्ष आहे, ते म्हणतात, " इमम् विवस्वते योगे प्रोक्तवांन् अहमन्ययम् । विवस्वान् मनवे प्राह मनु रिक्ष्वाकवेब्रवीत् ।। एवं परंपरा प्राप्तं इमं राजर्षयोविदु:।। अर्थ हे तत्वज्ञान, हा कर्मयोग विवस्वान मनु, इक्ष्वाकु वगैरे राजर्षीपासून परंपरागत प्राप्त झाला आहे. या पुराव्यावरुन हा कर्मयोग क्षत्रियांचा याबद्दल आता कोणासही शंका घेणेचे कारण नाही.. क्षत्रियांचा हा विशेष आहे की या कर्मयो-

गाचे ज्ञान त्यांनी ब्राम्हण वर्गाला प्रथम दिले. येथेच ते थांबले नाहीत, तर 'बोले तैसा चाले' या न्यायाने ते आपल्या देहाची काडीमात्र पर्वा न करता, दुर्जनांचा नाश करण्यासाठी आणि सज्जनांचे रक्षण करण्यासाठी सतत आपले देह खर्ची घालीत आले आहेत. केतकरांच्या भाषेत बोलायचे तर अंतरंग व बहिरंग या दोन्ही अंगानी क्षत्रियांनी आपले थोरपण प्रस्थापित केले आहे.

राष्ट्रकार्यासंबंधाने पाहताना शंकराचार्या संबंधाने बोलणे नको. ते बोलून चालून सन्यासी. त्यांना या गोष्टीचे वारेच नाही. त्यांनी बुद्धधर्माचा पाडाव केला. तो धर्म भरतखंडाबाहेर घालवून दिला. मात्र बुद्धाचीं अग्नीसारखी प्रखर तत्त्वे त्यानां नाकबूल करता येईनात, सर्व संग्राहक बुद्धधर्म आणि मूळचा आर्यांचा वैदिक प्रवृत्तिधर्म यांची तडजोड व मिश्रण युक्ति प्रयुक्तीने करून नवीन हिंदूधर्माचा गणपती करीत असताना, हल्लीचे उच्चनीचपणाचे पायावर तयार झालेले माकड आमच्या पदरी पडले, हा आमचा दैवदुर्विपाक आहे. ही झाली त्याची गति. कर्मयोग सांगणाऱ्या टिळकांची स्थिती तरी त्याहून जास्त काय आहे ? राष्ट्रियसभेचा पाया विस्तृत करावा, लहानापासून थोरापर्यंत, श्रीमंतापासून गरिबापर्यंत. सोवळ्या गरगरित गुंड भटजी पासून सोमनाईक महारापर्यंत, यच्चावत हिंदु लोकांची राष्ट्रीय सभा बनवावी, सर्वांचा तिच्यात समावेश करावा, भेदभाव नष्ट करून सर्वांना राष्ट्रीय सभा आपली वाटावी अशाबद्दल टिळकानी काही केले नाही. युनिव्हर्सिटीचे पदवीधर आणि उच्च वर्गातील पांढरपेशे या पलिकडे राष्ट्रीय सभेची सीमा टिळकानी मुळीच नेली नाही. सामाजिक किंवा धार्मिक वादात पडून किंवा वर्णाश्रमाचे कोडे कसे सोडवावे या विचाराचे स्वप्न त्याना पडले नाही. ब्राह्मण वर्गाचा थोरपणा कमी न करता जितके कांही करता येईल तितकेच त्यांनी केले आणि याच कारणासाठी सामाजिक आणि धार्मिक सुधारकांचे त्यांचे विळ्या भोपळ्या इतके सख्य होते ! हीच परंपरा केसरीकारांची आणि त्यांच्या कित्येक इतर बंधूंची आहे. आणि याच कारणाने या राष्ट्रिय पक्षाला महात्मा गांधीजी नको आहेत. महात्माजींनी राष्ट्रिय सभेचे जाळे खेड्यापाड्यात, कोष्टी कुणब्यात, साळ्या माळ्यात, आणि महारवाड्यातही नेले, हे सूरमीठ इतके खोलवर पोहोचले तर मग पांढरपेशांचे महत्व काय राहिले ? अस्पृश्यांचा आपणात समावेश आणि मुसलमानाशी सख्य ही गोष्ट म्हणजे हिंदु धर्मावर कुऱ्हाडच असे ब्राह्मण स्वराजिष्टांना वाटावे यात नवल नाही ! परकीय पार्लमेंटरी संस्थेचे झाडाचे कलम या देशात आणायचे, तर हल्लीचा दुष्ट जातीभेदावर रचलेला समाज. ही त्या झाडाला योग्य भूमि कशी होईल ? कृत्रीम विषमता काढून टाकून सर्वांच्या

स्वाभाविक हक्काला व बुद्धीला वाढण्यास सारखीच सवलत दिली पाहिजे. ही साधी गोष्ट सुद्धा दुराग्रही स्वराजिष्टांना कळत नाही हे आश्चर्य आहे ! आज एकदेशीय राजकारणाचाच कित्ता केसरीसारखीं जबाबदार पत्रेही गिरवीत आहेत, मग भोपटकरी राजकारण तर विचारूच नका ! त्यांनीही आपले लंगडे तट्टू पुढे दामटीत बोथटलेला भाला हाती घेऊन " रोटी बंद बेटी बंद " चा पाढा गाजवीत शिलेदारी सुधाराबी हे टिळकांच्या चेल्यांना उचितच आहे !

* * *

१

## स्काउट मासिकावरील शिवछत्रपति आणि रामदास

( ता. १८ मार्च १९२७ )

स्काऊट संस्थेबद्दल व तिचे तत्वाबद्दल आमचा आदर आहे. जातिद्वेष, विषमता वगैरे क्षुद्र भावनास आपल्या संस्थेत मुळीच थारा नाही असे मि, अय्यर म्हणतात. आनंद आहे. आम्ही तेच मागत आहोत. संपांदकाच्या स्वतःच्या अंतःकरणात राजनिष्ठेबद्दल शंका प्रदर्शित करण्यास अह्मास कारण नाही. तेव्हां त्या गोष्टीचे त्यांचे विवेचन वादाच्या प्रश्नाबाहेर असल्यामुळे ते आम्ही विचारात घेत नाही.

यावर आमचा सवाल असा आहे. तुमची, दृष्टी जर ऐतिहासिक नव्हती तर दाखल्याला दोघेही ऐतिहासिक पुरुष कां घेतले ? श्रीराम व विशिष्ठ अशा प्रकारच्या दैवी विभूति कां घेतल्या नाहीत. बरे शिवाजी महाराजांना कोणा एखाद्या दैवी शक्तीचा वरदहस्त पाहिजे होता तर ती निवड रामदासांचीच कां केली ? रामदास ही काय दैवी शक्ती होती ? महाराजांच्या कालात अनेक साधुसंत होऊन गेले आहेत. त्यापैकी कोणाची निवड कां नाही केली ? दैवी शक्ती महाराजांच्या वाड्यातच होती.

महाराजांच्या मस्तकी मुगुट घालण्यास प्रत्यक्ष भवानी देवी अवतरली आहे; असे चित्र तुह्मी अनेक वेळा पाहिले असेल, ज्या तरवारीच्या जोरावर यवनांच्या गळी गेलेले मराठ्यांचे राज्य महाराजांनी परत हिसकावून घेतले, त्या

तरवारीस प्रसाद म्हणून महाराजांनी 'भवानी तरवार' हे नांव मोठ्या अभिमानाने दिले, ती 'भवानी देवी' तुह्मी महाराजांच्या मागे नाही उभी केली? यावरून दैवी शक्तीचे (आरग्युमेन्ट) कारण टिकू शकत नाही हे कोणासही दिसेल. आता अलौकिक दैवी शक्तीचा पुरुष महाराजांना वंदनीयच असणार हे उघड आहे. परन्तु रामदासांच्या अंगी दैवी शक्तीचा प्रादुर्भाव झाला होता, असे इतिहास सांगत नाही. खानदेशात उपलब्ध झालेल्या ताज्या दस्तऐवजी पुराव्यावरून निर्विवाद शाबित होत आहे की, महाराजांची आणि रामदासांची जी प्रथम ओळख झाली ती फार फार उशीरा झाली. महाराजांची आपल्या आयुष्यातील, अत्यंत महत्वाची आणि पराक्रमाची कामें संपून गेल्यावर झाली. अशी जर वस्तुस्थिती आहे तर त्या पराक्रमाला कारणीभूत रामदासच होते हा इतिहासाचा विपर्यास नव्हे काय? घडलेल्या गोष्टीवर पांघरूण घालण्यासारखे होत नाही काय? एका क्षत्रियाने स्वतःच्या हिंमतीवर केलेल्या पराक्रमावर झांकण घालण्यासारखे होत नाही काय? ऐतिहासिक पुरुष चित्रांत घेणे तर ती गोष्ट इतिहासाला धरून पाहिजे. बरे रामदासना त्यावेळी जनता किती मानीत होती, किंवा त्यांचे वजन हिंदुसमाजावर किती होते ही गोष्ट कसोसीस लावली तर त्याबद्दलही शंका उत्पन्न होते. महाराज त्यावेळी ब्राम्हण वर्गाला मानीत होते. ब्राह्मण वर्ग रामदासाना मानीत होता, अशी कल्पना करायची, तर मग अभिषेक समयी महाराजांच्या क्षत्रियत्वाबद्दल क्षुद्र शंका उत्पन्न केली ती कोणत्या वर्गाने अर्थात,

ब्राह्मण वर्गाने. त्या ब्राह्मण वर्गावर रामदासांचे जर वजन होते आणि महाराजांवरही जर त्यांचा दैवी वरदहस्त होता तर मग असल्या बेवकूब बेइमान ब्राह्मणांचे कान धरून रामदासांनी त्यांना शासन कां केले नाही? आणि त्या अभिषेकाच्या कामासाठी महाराजांना काशीहून गागाभट्टास कां पाचारण करावे लागले?

मूर्खांनो यवनांच्या चरणी तुह्मी मिलिंदायमान होता. त्यांच्यावरील छत्रचामरे तुह्माला पाहवतात आणि क्षत्रिय कुलोत्पन्न शिवबावर छत्र धरण्यास आणि त्याना शास्त्रोक्त अभिषेक करण्यास तुह्माला कमीपणा वाटतो! लाज नाही वाटत असे ह्मणून रामदासांनी तोंडात कां नाही भडकावली? तात्पर्य, हेच की, रामदास कोणी राजकारणी वजनदार मुत्सद्दी नव्हते, विद्यारण्यासारखे निस्पृह राजपुरुषही नव्हते, केवळ एक व्यवहारिक बुद्धिमान चतुर पुरुष होते इतकेच आह्मी ह्मणण्यास तयार आहोत. नुसते गुण आणि दैविशक्ति त्यांचेवर लादणे हा त्यांचाच अपमान आहे असे आह्मास वाटते.

रामदासांची संतामध्ये गणना अद्याप झाली नाही. वरील ऐतिहासिक राजकीय गोष्टीप्रमाणेंच हा प्रश्नही निर्णित झाला नाही. त्यांच्या पदवीबद्दल शंका आहे. संत चरित्रामध्ये ते गायले गेले नाहीत, वारकरी सांप्रदायात साधु–संतांची नांवे सर्वतोमुखी बसून गेली आहेत. गाजत आहेत. " निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम " ही स्मरनमणीमाला आबाल वृद्धाना मुखोद्गत आहे. या पंक्तीत रामदासांचे नांव नाही. मग दैविशक्तीचा प्रश्न राहिला कोठे ? आमच्या अल्पमतीने रामदास हे अत्यंत व्यवहारचतुर पुरुष होऊन गेले. " वेश असावा बावळा । अंतरी असाव्या नाना कळा ।। " अशी लोकाना दिक्षा देणारा पुरुष मोठ्या हुषारांत मोडेल, पण तो अवतारी पुरुषाच्या येशूख्रिस्ताच्या, पायरीला पोचणार नाही. व ख्रिस्तांचा येशू, मुसलमानांचा महंमद पैगंबर तसा काय हिंदुंचा रामदास आहे ? मग असला पुरुष स्काउट मासिकाच्या मुखपृठावर दाखविण्यात संपादकांचा हेतू काय आहे असे समजावे?

दुसरी गोष्ट अशी की, त्याच शिवछत्रपतीच्या सरळ वारसांचे करवीर राज्य हे पुण्यस्थान आहे. ज्या समतेच्या तत्वाचे संपादकांनी गोडवे गायले आहेत ती समता स्थापन करण्यासाठीच कै. शाहूरायानी आपले आयुष्य खर्च केले. मूक ब्राह्मणेतर वर्गाला बोलक्या मानव प्राण्यात आणले, आणि त्याच मागासलेल्या वर्गांची उन्नत्ती करण्यासाठी श्री राजाराम छत्रपति झटत आहेत. त्या वर्गाच्या डोळ्यासमोर असले निराधार काल्पनिक चित्र कां खपावे ! स्पष्ट बोलायचे तर कसल्याही बाबतीत एका वर्गाचे दुसऱ्या वर्गांवर वर्चस्व नको, ब्राह्मण वर्गाची ब्राह्मणेतरावर छाप नको, हा ध्यास राजापासून रंकापर्यंत सारखा चालू आहे. शंकराचार्यांचे पीठ किंचित बाजूस सारुन, ब्राह्मणेतर वर्गास स्वतंत्र क्षात्रजगद्गुरु देण्यात महाराजांचा काय हेतू होता ? पाटगांव पीठ छत्रपतींच्या गादीला किती पूज्य आहे याची अद्याप लोकांना चांगलीशी माहिती नाही. आद्य शिवरायांनी महंत मौनीबोवांचे पाटगांवास जाऊन स्वत: दर्शन घेतले होते. त्याना गांवे इनाम करून दिली होती, त्यांचा आशिर्वाद शिवरायाना दिला असता तर काय हरकत होती ! किंवा जगत्वंद्य " तुकोबारायांचा " आशिर्वाद महाराजांना देत असल्याचे चित्र दाखवले असते तर सर्वांनाच मान्य झाले असते. परन्तु तसे करणे संपादक द्वयाना पसंत वाटले नाही. विवादिक मुद्दाच पुढे करून निष्कारण वादाला कारण करून ठेवले.

रामदासांच्या चित्रातून सुटका करून घेण्याचा एक दुसरा मनोरंजक मार्ग मि. अय्यर यांनी शोधून काढला आहे. ते म्हणतात " शिवाजी महाराजांचा व त्यांचे मागे दैवीशक्तीचा प्रतिनिधी असा एक ऋषी एवढाच चित्राचा दाखवण्याचा हेतू आहे. " असली सबब सांगून पळवाट कोण काढूं

देईल ! ऐतिहासिक व्यक्तींची ठराविक चित्रे प्रसिद्ध झालेली आहेत, त्याच चित्रावरुन ऐतिहासिक व्यक्तीची कल्पना उपलब्ध आहे, ते चित्र नुसत्या एका ऋषीचे आहे म्हणणे ही निव्वळ मूलथाप आहे. तथापी चित्रकाराला हे चित्र काढण्याचे वेळी श्री शिवरायांनी एका सत्पुरुषापुढे मान लवविली, किंवा पूज्यभावाने त्याना इनामे देऊन त्यांचा गौरव केला. या गोष्टी उभयताना भूषणावह आहेत. साधूचा मान सज्जनाशिवाय कोण राखी ? हे सर्व ठीक आहे. पण आजवर उपराठा इतिहास लिहिला गेला होता, आणि तो दुरुस्त केला, तर त्यात वावगे काय झाले ? साऱ्या मराठ्यांची समजूत ही की शिवरायांनी जे पराक्रम केले, जी कारस्थाने केली, जे व्यूह रचले, आणि हिंदुपद बादशाही स्थापन केली, याला मूळ कोण ? यात आत्मिक शक्ती कोणाची ? आशिर्वाद कोणाचा ? तर रामदासाचा ? ही दंतकथा रचून मराठ्यांच्या कर्तृत्वावर झांकण घालणे, पाणी ओतणे, तेरे उपर मेरी, ही खोटी कुरघोडी करणे, हा पूर्वापार सांप्रदाय ओढत आला आहे. विश्वामित्राच्या डोक्यावर वशिष्ट घातला आहे ! ही ब्राह्मणी खोटी परंपरा ढांसळून पाडणे हे आमचे कर्तव्य आहे, असे आह्मी समजतो.

## २

## करवीर राज्य व इचलकरंजी जहागीर.

(ता. २१ डिसेंबर १९२८)

ता. ४।१२।२८ च्या केसरीमध्ये 'संस्थानिकांची स्वार्थी कारवाई' या मथळ्यांखाली अग्रलेख आलेला आहे. लेखातील मजकूर पाहता इचलकरंजीकर यांचे गुणवर्णन करण्यात आले आहे आणि करवीर दरबारची अप्रत्यक्ष निंदा केलेली आहे. लेखामध्ये कोल्हापूर दरबारला अनुकूल असणाऱ्या गोष्टी दिलेल्या नाहीत. आणि इचलकरंजीकरांचा पक्षपात मनात बाळगून त्यांचे गोडवे गाइलेले आहेत. पण वस्तुस्थिती कोणी कितीही झांकून ठेविली तरी कठोर इतिहास खऱ्या गोष्टी उजेडात आणल्याशिवाय राहात नाही. कोल्हापूर दरबार गव्हर्नर साहेबांना व इतर मोठ्या अधिकाऱ्याना बोलावून आणते. त्याना पाहुणचार, मेजवान्या नजराणे वगैरे देते आणि मांडलिकावरची आपली पक्कड जास्त घट्ट करण्याचा प्रयत्न करते. इचलकरंजी अगदी भोळे, निर्दोष आणि साळसूद असून करवीर दरबार नाहक त्याला त्रास देत आहे. अशा अर्थाचा हा केवळ एकांगी मत्सरग्रस्त

लेख प्रसिद्ध झाला आहे. त्याबद्दल करवीर महालक्ष्मीचे आवारात नागरिकांची मोठी सभा भरून त्या लेखाचा जाहीर निषेध केला व केसरीचा तो अंक जाळणेत आला ! पत्र जाळण्यामध्ये लोकांची मनोभावना किती तीव्र आहे. आणि त्या विचारांचा लोक मन:पुर्वक किती तिरस्कार करीत आहेत. याची कल्पना येईल. आज आह्मी या विषयाची दुसरी बाजू जनतेसमोर मांडित आहोत, त्यावरून इचलकरंजी जहागिरीची थोडक्यात हकीकत कळून येईल. करवीर राज्याचा आणि यांचा संबंध बरेच दिवसापासून कसकसा येत गेला आहे, ते लोकाना सहज दिसेल.

सतराव्या शतकात जी कित्येक कोकणस्थांची घराणी आपले नशीब काढ-ण्यासाठी रत्नागिरीकडून घाटावर आली, त्यातच इचलकरंजीचे मूळ संस्थापक नारो महादेव जोशी हे एक होते. सुप्रसिद्ध सेनापती संताजी घोरपडे यानी नारोपंतांचे गूण पाहून त्यास आपल्या दिमतीस ठेविले. संताजीनी जे विलक्षण पराक्रम केले, त्यात नारोपंतांनी त्यास मदत केली. संताजीची नारोपंतावर वहाल मर्जी असे, आणि नारोपंतही त्यांना अतीशय भक्तीभावाने पहात. पुढे नारोपंतनी मालकाच्या भक्तिसाठी आपले मूळ नांव जोशी हे बदलून घोरपडे हे नांव धारण केले. तेच अद्याप चालू आहे. सेनापतीनी नारोपंतास मिरज प्रांताची सरदेशमु-खीचीं वहिवाट दिली होती. आणि इचलकरंजी व आजरे हे इनाम दिले होते. नारोपंतांचा मुलगा व्यंकटराव याला बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनी आपली मूलगी अनुबाई दिली. या शरीर संबंधाने इचलकरंजीला चांगलेच भाग्याचे दिवस आले. करवीर राज्यमंडळातून त्यांना सचीव पद मिळाले. (१७११) तो सरंजाम त्यांचेकडे होता. मिळून सेनापती, करवीर सरकार व पेशवाईचे मार्फत सातारकर अशा तिघाही कडून इचलकरंजीकराना उत्पन्न इनाम व सरंजाम मिळाले होते. नारोपंत वारले. त्यांचा मुलगा व्यंकटराव यास करवीरकरांनी सचीवाची जागा दिली नाही. व सेनापतीनीही आपल्या संस्थानचा कारभार व व सरदेशमुखीची वहिवाट होती ती काढून घेतली. कोल्हापूरचे रामचंद्रपंत अमात्य हे नारोपंतांचे पुरस्कर्ते. ते वारल्यामुळे करवीर राज्यमंडळात व्यंकटरावांचे नीटसे बनेना. ही परिस्थिती पाहून करवीरावरचे त्यांचे प्रेम उडाले आणि पेश-वाईचे वशिल्याने साताराच्या शाहू महाराजांचा आश्रय संपादन करण्याचे ते मार्गास लागले. १७०३ च्या सरंजाम जाबत्यांत व्यंकटरावानी सेनापतीचे हाताखाली नोकरी करावी, असे ठरले होते. पण पुढे १७२४ च्या जाबत्यांत व्यंकटरांवाचा सेनापती व करवीरकर यांचा संबंध अजिबात तुटला. आणि ते शाहू महाराजांचे स्वतंत्र सरदार झाले. तथापी व्यंकटरावाना करवीरच्या उत्पन्नाचा मोह तुटला नव्हता ! करवीरकर संभाजीनी त्याना सुळकूड, टाकळी व शिरदवाड

(दोन्ही) वगैरे गांवें इनाम दिलीं होती. पुढे पेशव्यांचे जोरावर करवीर सरकारशी व्यंकटराव बाकून राहूं लागले. करवीर दरबारने व्यंकटरावाकडे पन्हाळा प्रांताची इनाम तिजाईची मागणी केली. ती देण्याचे त्यांनी साफ नाकारले. अशी चढेलवृत्ती नेहमी दिसून येऊं लागल्यामुळेच करवीर सरकारची व इचलकरंजीकरांची नेहमी हमरीतुमरी चाले. करवीरकराना पुढे व्यंकटरावावर हक्कासाठी स्वाऱ्या कराव्या लागत. हे वैमनस्य एकसारखे वाढतच गेले. हे संबंध विकोपाला जाऊन १८२७ साली इंग्रज सरकाराला मध्ये पडावे लागले. १८३८ सालामध्ये मुख्य वादाचा प्रश्न पुन्हा येऊन उभा राहिला. इचलकरंजीकरांचा दर्जा खरोखर काय आहे. हाच या वादाचा मुद्दा होता. आणि त्यात अखेर " इचलकरंजी संस्थान हे करवीर छत्रपतींच्या ताब्यातले मांडलिक आहे " असे इंग्रज सरकारानी ठरविले.

हे वरिष्ट सरकारने ठरविलेले संबंध बरोबर रितीने चालले असते तर कटकटीचे कारण राहिले नसते. परन्तु करवीरच्या छत्रपतींना यापुढे ६०–७० वर्षे एकसारखी संकटपरंपरा प्राप्त झाली. अंतस्थ कारवाया झाल्या. आबासाहेब महाराजांचा खून झाल्यानंतर पुढे कारभारात दुफळी झाली. इचलकरंजीकर, भाऊमहाराज वगैरे मंडळींनी इंग्रजांच्या कानावर गाऱ्हाणी घातल्यामुळे इंग्रजांचा हात करवीर राज्यात शिरला. आणि जहागीरदाराच्या गाऱ्हाण्यांचा निकाल करणेची व त्यांचे संरक्षण करण्याची हमी इंग्रजांनी घेतली. (१८२६)

अशी स्थिती काही काळपर्यंत चालत राहिली. या काळामध्ये करवीर छत्रपति पूर्ण संकटावस्थेतच होते. इंग्रजी अम्मल चालू झाला. नंतर १८६२ साली एक महत्वाचा करारनामा इंग्रज सरकाराशी होऊन बाबासाहेब महाराजांचे हाती अधिकारसूत्रे आली. त्यात एक महत्वाची अट घालण्यात आली की, मांडलिक जहागीरदारांच्या नियमनाचा अखेरचा अधिकार इंग्रज सरकाच्या हाती असावा. ही अट महाराजांवर लादली गेल्यामुळे जहागीरदारांना भलतीच आकांक्षा उत्पन्न झाली. आपले वर्चस्व वाढवणेचा मोह, त्याना अनावर झाला, छत्रपतीपासून स्वतंत्र होणेची त्यांची प्रवृत्ती बेसुमार वाढली. शिंदे, होळकर जसे पेशव्यापासून स्वतंत्र झाले. तद्वतच आपण छत्रपतींना झुगारून स्वतंत्र बनावे, असली बेमुर्वत सवलत आणि संधी वरील तहाने आणून दिली. छत्रपती विरुद्ध कारस्थाने रचून आपल्या सत्तेत भर टाकण्यात त्याना पूर्ण अवसर मिळाला. याचे एक उदाहरण सन १८९५ साली घडले, त्यांची चढेल वृत्ती इतकी बेफाम झाली की, " आपण ज्या ज्या वेळी कोल्हापूरास येऊ, त्या त्या वेळी छत्रपतीनी स्वागत करण्यासाठी वेशीपर्यंत सामोरे आले पाहिजे." असा मगरूर हट्ट धरण्याचे एका जहागीरदाराने

धाष्टर्य केले ! ! करवीरच्या ब्रिटिश सरकारच्या प्रतीनिधीलाही असला मान मिळाला नव्हता ! गोष्ट लक्षात ठेवणेसारखी आहे.

पेशव्यांच्या घराण्याशी रक्तसंबंध घडून आल्यामुळे दरबाराशी इचल-करंजीकर नेहमी भेदभावाने वागत असत. आणि जहागिरदाराचे चळवळीत ते पुढाकार घेत. हल्लीचे जहागीरदार मे० बाबासाहेब यांची वृत्तीही तीच आहे. आपला दर्जा मांडलिकापेक्षा जास्त आहे. अशी त्यांची कल्पना आहे, आणि मांड-लिक या नात्याने वागण्याचे प्रसंग शक्य तितके ते टाळीत असत. १९०२ साली दिल्ली दरबार झाला. त्यावेळी मे. बाबासाहेब हे मुंबई कौन्सिलचे सभासद होते. या कारणाने दिल्ली दरबारचे त्याना स्वतंत्र आमंत्रण आले होते. म्हणून छत्रपतीशी संबंध न ठेविता स्वतंत्रपणे दरबारला हजर रहावे अशी त्यांची इच्छा होती. दिल्लीस छत्रपती कँपात त्याना जागा राखून ठेवली होती. परन्तु इतर मांडलिकांचे तंबूस तंबू ठोकण्यास ते कबूल होईनात ! यामुळे कठोर मार्गांचे अवलंबन करून जहागीरदाराना योग्य ठिकाणी बसवण दरबारला भाग पडले ! दरबारचे मार्गा-तील हे काटे बोथट करून टाकावेत. निदान ते जाचक होऊ नयेत, इकडे शाहू महाराजांचे बळ लागले. असा हा अलीकडील इतिहास आहे.

आपला मांडलिकाचा दर्जा इचलकरंजीकर विसरू लागले. त्यांचे चांगले स्मरण ठेवावे या धोरणाने छत्रपतींचा कारभार चालू असल्यास कोणासही ते स्वाभाविकच वाटेल, आणि ही सर्व स्थिती लक्षात घेऊन करवीर दरबारचे हायकोर्टचे वगैरे अधिकार इंग्रज सरकारानी छत्रपतींच्या स्वाधीन केले आहेत. कॉलेजच्या वाढीप्रसंगी जहागीरदारांची हीच मनोवृत्ती दिसून आली. छत्रपतींच्या हाती अधिकार येताच इचलकरंजीकर वगैरे ब्राह्मण जहागीरदारानी आपली कॉलेजची वर्षासने बंद केली ! आणि या कामी मुंबई सरकारचे सल्ल्याचाही काही उपयोग झाला नाही.

करवीर दरबारचा राज्यकारभार आज कोणत्या पद्धतीवर चालू आहे. तो पहावा. करवीर राज्याची लोकसंख्या १० लाख आहे. पैकी ब्राह्मणवर्ग फक्त २४ हजार आहे. त्या मानाने राज्यकारभारात सर्वच जास्तीच्या लोकाना सवलत मिळत आहे. त्याप्रमाणात अधिकारी नेमले जात आहेत. इचलकरंजी जहागीरीत लोक संख्येचे प्रमाण याच प्रमाणात असणार. खजिन्यात पैसा ज्या लोकाकडून येतो, त्याप्रमाणात जहागिरीत, नोकर लोकांची संख्या आहे काय ? अब्राह्मण मनुष्याला ब्राह्मणाप्रमाणेंच सवलती आहेत काय ? याचे उत्तर केसरीकारानीच द्यावे. तपशीलामध्ये जाण्याची आमची इच्छा नाही. वरील सर्व ऐतिहासिक परंपरा जहागीरदारांची वागणूक, त्यांचे मांडलिकांचे नाते, आणि छत्रपती

वराण्याचा उपमर्द करण्याची त्यांची प्रवृत्ती ही लक्षात घेतली असता, छत्रपतींची वागणूक दोषार्ह आहे, असे जाती द्वेषाने अंध झालेल्या लेखकाशिवाय कोणासही वाटणार नाही.

वरील वस्तुस्थितीवरून केसरीकारांचा लेख करवीर प्रजेला किती अपमानास्पद वाटला असेल, याचा विचार वाचकानीच करावा. स्वतःची अनुमाने देत बसण्यापेक्षा घडलेल्या गोष्टीच जास्त परिणामकारक असतात.

## ३

## शूद्धी चळवळ करण्याला अगोदर तुम्ही शुद्ध आहात काय ?

( १९ एप्रील १९२७ )

कांही ब्राह्मण लालचीने मूर्खपणाने अगर दुसऱ्या कांही कारणाने बाटून गेले आहेत. त्यांचीच कळकळ फारतर ब्राह्मणांना वाटत असावी. या शिवाय आह्माला या चळवळीत अर्थंच दिसत नाही. पुर्नविवाह कायद्याने मंजूर झाला. तथापी तसले जोडपे आणि त्यांची संतती ब्राम्हण समाजाला मान्य होत नाही. मग हिंदु धर्म सोडून. अजिबात बाटून गेलेला माणूस, पुन्हा कसा हिंदु होईल ! त्याचे अन्नपाण्याचे संबंध, मुलामुलींचे शरीर संबंध, बाटलेल्यात दुसऱ्या इसमाशी झालेले असतात.

असल्या लोकांना शुद्ध करून घेतल्यावर त्यांचे सर्व व्यवहार, जेवण खाणें, लग्न मुंजी, रोटीबेटी सऱ्हा आमच्या ब्राह्मणात होतात कीं काय ? पण हिंदुत्वाचा तेवढा शिक्का मारून पुन्हां त्यांची एक वेगळी जात करावयाची असेल तर मग या चळवळीस दुरुनच नमस्कार असो ! कारण आह्माला पुष्कळ जातीची सवय झाली आहे. शुद्धीचे सोंग करून या महारकीत ओढून आणून आणखी एक जात भरतीला टाकण्यात फायदा कोणता ?

बाटल्यांच्या बायका मुलामुलींचे कसे ? समजा एक ब्राह्मण आहे. बाटून ख्रिस्ती झाला आहे. त्याने तिकडे एक ख्रिस्ती बायको केली आहे. तिजपासून त्याला मुलेबाळे झाली आहेत. त्या बाबाला कदाचित ब्राह्मणी धर्माची आवड असेल. पण बायकोचे कोणास ठाऊक ? त्याची मुले मूली ख्रिस्ती धर्मात वाढ-

लेली. तिकडच्या संस्कृतित पोसली गेलेली. स्वतंत्र वातावरणाची त्यांनी गोडी घेतलेली. असल्या मुलाना ब्राह्मणी सोवळे ओवळे आवडेल काय ? नसेल तर ती तिकडेच राहणार. बापाला तुह्मी इकडे ओढणार. आईचा ओढा तिसरीकडेच त्या बिचारीचे पुरे हाल. नवऱ्याबरोबर शुद्ध होऊन तुमच्या समाजात यावे ? कां मुलाबाळासाठी तिकडेच राहून नवऱ्याची ताटातुट करून घ्यावी ? कां आईच्या मागे ही सारी वासरे पाठ लागून यायचीच ? आणि त्यांनाही इकडच्या कळपात तसेच कोंबायचे ? साराच गोंधळ.

संताळ आणि महारांची शुद्धी :– शूद्धी अभिमानी पत्रांत केव्हा केव्हां वाचण्यात येते की, संताळ समाजाला शुद्ध करून हिंदूत घेण्यात आले.

कांही महार पूर्वी खेडेची खेडी बाटले होते. ती सारी खेडीच आमच्या शुद्धी भक्तानी पावन करून घेतली. अजबजादु खरी ! हाताच्या किंवा पायाच्या तीर्थात या पडत्या काळातसुद्धा केवढी अद्‌भूत शक्ती भरली आहे ! पाहून जीव थक्क होतो !

विहिरीत किंवा तळयात पावबिस्किटांचा किंवा गोमांसाचा तुकडा टाकून पूर्वी पोर्तुगिज लोकांनी एका तडाख्यासरशी गांवेच्या गांवे बाटवून खिरस्ती केली. आज या गोष्टीचा विचार आम्ही केला ह्मणजे तशा मार्गाने धर्मप्रसार करणारे पोर्तुगीज लोक एकपटीने मूर्ख तर बाटले म्हणणारे दसपट मूर्ख !

पण आजच्या सुधारलेल्या काळांत पुरोहिताच्या मंत्राच्या जोरावर संताळाचे समाज आणि महारांचे महारवडे एकदम प्रायश्चित देऊन हिंदु करता येतात हे ऐकले म्हणजे ते दोघेही शतपटीचे मूर्ख आहेत असे वाटते. ही धर्माची थट्टा सुविचाराची हेटाळणी आणि पंडितांचा मूर्खपणा !

याना शुद्ध करून केलेत काय ? :–संताळ जेथे होते तेथेच आहेत. महार जेथे होते तेथेच आहेत. त्यांच्या डोक्यावर एक रकटे होते ते काढले. आणि दुसरे घातले. कोणत्या बाबतीत त्यांचा दर्जा वाढला ? हिंदु हा शब्द मागे लागला, म्हणजें का कातडीत पालट होतो ? कां विचारात फरक पडतो. कां भावना बदलून जाते ? काय, होते काय ? संताळ आहे त्या पूर्वीच्या स्थितीतच आहेत. महार लोक जरा मोकळया अंगाने उघडया वाऱ्यात खेळत होते. त्यांना मुसक्या बांधून हिंदुत्वाचा डाग लावून आपल्या मूळच्या महारांच्या गोतावळयांत आणले. आणि पूर्ववत गांवची गटारे उपसणे, नाहीतर उकिरडे झाडणे, या चातुर्वर्ण्याच्या पवित्र परंपरेत आणून सोडले ! हाच ना परिणाम ?

का खरोखर तुह्मी शुद्धीवाले ब्राह्मण त्या लोकांना आपल्या घरोघरी मंगलकार्यात, जेवणाखाण्यात आणि बाकीच्या सर्व व्यवहारांत मिळून मिसळून घेणार आहांत ? तसे असले तर त्या लोकांबरोबर आमचे पहिले पान मांडण्यास आह्मी तयार आहोत. शुद्धीवाल्यानी कच खाता कामा नये.

तात्पर्य बाटलेल्या महारांची शुद्धी करून, त्यांना पुन्हा "येरे माझ्या मागल्या" महारवाडाच दाखवायचा असेल, तर ही शुद्धी चळवळ आह्मी एक पातकच समजतो. मग बिचारे आहे त्या स्थितीत असलेले काय वाईट आणि ही शुद्धीची नसती उठाठेव कशाला ?

आमचा उपाय :– सारे महारवाडेच मोडून टाकावेत. मानव प्राण्याचा हिंदुधर्माचे नांवाखाली केलेला अपराध पुरा झाला आहे पुन्हा ते पाप नको. त्यांच्यापुढे आह्मी नाकदुराई काढली पाहिजे ! महारा मांगाना आजच सर्वत्र कर्मस्वातंत्र्य मिळाले पाहिजे. वाटेल त्यास वाटेल तो धंदा करण्यास परवानगी झाली पाहिजे.

हीच आमची शुद्धी चळवळ. अंतस्थ शुद्धी झाल्यावाचून ही चाललेली चळवळ व्यर्थ आहे. हल्ली समाजात रक्ताच्या गाठी बनल्या आहेत, पाण्याचे पाट तुंबून राहिले आहेत. आमच्या चळवळीने बाटण्याची भिती पार नाहीशी होईल. आणि बाहेर गेलेल्या भटकलेल्या कोकरांना आपल्या घराकडे येणेचा सहजच ओढा लागेल. भिक्षुकी, कृत्रीम, खोटया एकांगी शुध्दी चळवळीची गरजच उरणार नाही.

म्हणून आमचे म्हणणे अगोदर आपली शुध्दी करा ! आणि ती झाल्यावर दुसऱ्याकडे भीक मागणेचे कारण नाही. आपला दाम खोटा ह्मणून लोक बाटून परधर्मात जातात. ते नाणे चांगले वाजूं लागल्यांनंतर मग भीती कशाची ? आणि तसे न करता घरांतली राड तशीच ठेवून, मग दुसरे खुळे या घाणीत आणून घालायचे यात काय पुरुषार्थ आहे ? ही सारी धर्मावरच्या अंध भक्तीची किमया आहे. खऱ्या धर्माला शुध्दी नको आणि प्राय:श्चितही नको. खरा धर्म, आहे त्या स्थळीच आणि त्या क्षणीच मुक्त आहे. त्याला मंत्राची गरज नाही. संस्काराची आवश्यकता नाही.

४

## शुद्धी चळवळीचा फार्स

( २० एप्रील १९२८ )

शुद्धी चळवळीचा एक मोठा फार्सच होऊन बसला आहे. असल्या कठीण कामात ब्राह्मणासारख्या नाजूक वर्गाने पुढे यावे, ही एक गमतीची गोष्ट आहे. ज्या ब्राह्मणी संस्कृतीने आमच्या समाजांचे धिडवडे केले, त्याच वर्गाने पुन्हा इतरांची शुध्दी करण्याची शेखी मिरवावी, हे आश्चर्यातले आश्चर्य. ज्या म्लेंच्छ, यवन, महार, पॅरिया दि पंचम यानी नुसता स्पर्श केला तर तडख, सचैल स्नान करावे लागते, त्यानी दुसऱ्याला शुध्द करावे, ही एक थट्टाच आहे ! ज्या ब्राह्मणी संस्कृतीतल्या काही खालच्या भिकार खर्डे घाशा किंवा पाव बिस्किटचा भटाला तुकोजीराव होळकरांच्या हातचे पाणीही घेणे होत नाही. किंवा युनिव्हर्सिटीच्या अत्यंत उच्च डिग्री घेतलेल्या ब्राह्मण पदवीधराला डॉक्टर आंबेडकरासारख्या बरोबरीच्या माणसाच्या घरचा चहासुध्दा घेण्याचे धैर्य होत नाही; असल्या नेभळट संस्कृतीच्या पुरोहित वर्गाने गोव्याला जावे आणि तेथील खिरस्ती झालेल्या खेडीच्या खेडी हिंदु धर्मात सामिल करून घ्यावीत ही डोंबाऱ्याची उलटी उडी पाहून कोणाला नवल वाटणार नाही ? परन्तु प्रत्यक्ष परमेश्वराच्या तोंडातून बाहेर पडलेल्या वर्गाला शक्य काय आणि अशक्य काय याची परवा आहे कोठे ! आपली स्वतःची परंपरा काय आहे ? घरी दारी आणि बाहेर सोवळचा ओवळचांच्या हास्यास्पद कल्पनेने सुधारलेल्या लोकासमोर आपली कशी फट फजीती होत आहे. देव नाही, धर्म नाही, कर्म नाही, भक्ती नाही, वेद गेले, पुराण गेले, पूर्व मिमांसा आणि उत्तर मिमांसा याची ओळखही पार विसरून गेली, स्नान संध्येचा पत्ता नाही आणि गायत्रीं मंत्राला सवड नाही, असल्या ब्रह्म घोटाळ्यात पडलेला आणि स्वार्थासाठी वरिष्टांचे चरणी लोळण घ्यायला सज्ज असलेला. असला धरबंद नसलेला हा ब्राह्मण माणूस, बाटलेल्या खिरस्त्यांची मुसलमानांची आणि अमेरिकेतल्या गोऱ्या माणसांची शुध्दी करून, हिंदुंच्या पवित्र मंडपामध्ये प्रवेश करण्यास दाखला देतो, आणि तो परवाना कबूल होतो, या दुतर्फी चेष्टा पाहून, तिऱ्हाइताचे मन थक्क झाल्यावाचून राहणार नाही !

ब्राह्मण वर्ग मोटा पटाइत. व्यवहार कुशल, खरी स्थिती समजून पडक्या काळात आणि सडक्या वातावरणात वावरत असला तरी आपले डोके वर काढल्या

वाचून राहणार नाही. आजपर्यंत स्थिती वेगळी होती. भरत खंडाच्या चारी तटबंदीच्या आत आमचा हिंदू समाज नांदत होता. मांगापेक्षा महार श्रेष्ठ, महारापेक्षा चांभार श्रेष्ठ, चांभारापेक्षा शूद्र श्रेष्ठ, शुद्रापेक्षा कुणबी श्रेष्ठ, कुणब्याहून वैश्य उच्च, वैश्याहून क्षत्रिय उच्च, क्षत्रियाहून आणि बाकीच्या सर्वांहून ब्राह्मण वर्ग श्रेष्ठ ! असला गोंधळ आणि इंद्रजाल आजवर घरातल्या घरात भरपूर घातला. आणि दुरभिमानाची कमालच म्हणूनच की काय कोण जाणे, हिंदु म्हटला की तो अत्यंत नीच का असेना, कोणत्याही इतर परधर्मीयापेक्षा श्रेष्ठ ! हा कोंवडीच्या खुराडयातील न्याय किंवा कूप मंडूक नीती, आजवर कशी तरी खपली. पचल्यासारखी वाटली. परन्तु पापाचा घडा केव्हां तरी भरत असतो

आज सर्वत्र या सोवळेशाही लोकांचा केवळ वीट आला आहे. प्राचीन काळापासून ब्राह्मण क्षत्रियांच्या स्पर्धेत क्षत्रियानी सारखे ब्राह्मणांना तडाखे दिलेले आहेत. पण ते खाऊन सोसून, पड घेऊन, पुन्हा ब्राह्मण वर्ग पुढाकार घेण्याची हांव धरीत आहे. महाराष्ट्रात आणि मद्रासेकडे नव्या ब्राह्मणेतर वर्गांचा जन्म झाले-पासून, ब्राह्मणाला कोठें जागाच नाहीशी झाली आहे. सात कोटी अस्पृश्य समाज या सोवळ्या संस्कृतीच्या लबाडीनें आणि काव्याने, या भूतलावरच नरकवास भोगीत बसला आहे ! तो आपले हक्क आजवर ब्राह्मणेतरामार्फत जगासमोर समोर मांडीत आला. परन्तु आज हा अस्पृश्य वर्ग स्वतःच आपल्या जातीच्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली समान हक्काची मागणी करीत आहे. राष्ट्रीय सभेने १९१८ साली अस्पृश्यता निवारणेचा ठराव पास केला. हिंदुमहासभा, शुध्दी संघटणेची चळवळ आपल्या माथ्यावर मारून, प्रांतोंप्रांती दौरा काढीत आहे. परन्तु या ब्राह्मणी शुध्दी संघटनेचे स्वरूप थोडेसे आत जाऊन निरिक्षण केले, म्हणजे त्यात डामडौला वाचून आह्मास काही दिसत नाही. धैर्याने आणि निधड्या छातीने प्रश्न सोडविणेची ताकदच या लोकांचे अंगी उरली नाही. श्री. विनायकबुवा मसूरकर यांची प्रवचने करवीर मुक्कामी झाली. प्रवचन पूर्वी हरणासारखे ताडताड उड्या मारीत त्यांचे येणे आणि प्रवचन आटोपताच अनावर घोड्याप्रमाणें भर्रकन निघून जाणे या गोष्टी लोकाना आश्चर्याच्या वाटत खऱ्या! परन्तु शुध्दी संघटनेचा प्रश्न त्यानी प्रवचनामध्ये किंवा वस्तीच्या मठामध्ये केव्हा शांतपणे हाती घेतला आणि त्यावर उघड उहापोह केला, अशी गोष्ट झाल्याचे आठवत नाही.

त्याच मसूरकरानी गोमांतकास जावे. आणि जादूच्या कांडीप्रमाणें खेडीच्याखेडी खाडकन खिरस्त्यांची हिंदु बनवावीत, हा प्रकार पाहून कोणास विस्मय वाटणार नाही ! गायत्री मंत्राने; शेणाच्या गोळ्याने किंवा “ मंतर-

लेल्या" पाण्याने असले थवेच्याथवे शुध्द होऊ लागले, तर मग आणखी काय पाहिजे! आह्मी स्वच्छ म्हणतो की, आपला श्रेष्ठपणा कायम राहून वैदिक मंत्राचा बडेजाव करून "परस्पर समर्पयामि" या न्यायाने काडीचाही फरक न होता, गांव शुध्द करून घेणे, हा एक ब्राह्मणी सुधारलेला तमाशा आहे!

डॉ. मुंजे करवीरी आले होते. श्री महालक्ष्मीचे आवारांत व्याख्यान झाले. बरोबर चित्राव शास्त्री होते. प्रचंड श्रोतृसमुह होता. हंटरकार बागल वकील यांनी मुंजेसाहेबांना विनंती केली कीं, "आपण ब्राह्मण आहात. मी एक मराठा कुणबी आहे. (अस्पृश्य नव्हे!) आम्ही दोघे देवालयात जाऊन पुजाऱ्यासमवेत श्रीमहालक्ष्मीचा पादस्पर्श करूया. होतील ते परिणाम भोगण्यास नड नाही." परंतु कांही एक कृती झाली नाही! भाषणें मात्र भरचक्का! ह्मणूनच आह्मी ह्मणतो, की हा शुद्धी चळवळीचा ब्राह्मणी मार्ग ह्मणजे स्वतःचे अंग बचावून कांही घस न सोसता परभारा मंत्राच्या आणि पाण्याच्या अवडंबरावर गोमंतकी भोळे भाबडे भुलवण्याचा हा एक पंथ आहे!

डॉ. कुर्तकोटींनी तर कमालच केली! अमेरिकेची नुसती डीग्री मिळवून संतुष्ट न होता एका अमेरिकन मुलगीला शास्त्र रित्या हिंदु धर्माची दिक्षा दिली. केवढे अचाट धारिष्ट्य आणि केवढा अलौकिक पराक्रम! साऱ्या तात्विक थापा आणि गप्पा! केवळ "हिंदु हा शिक्का लागला. म्हणून ब्राह्मणवर्ग तिच्याशी अन्नव्यवहार करणार थोडाच! ती अंतराळीच लोंबत राहणार! पुन्हा धनगर क्षत्रियवर्गाने मिलरला दैवात सामिल करून घेतले. नंतर रोटी व्यवहाराला आणि बेटी व्यवहाराला मुभा झाली. परंतु वरील भल्या मोठ्या कामगिरी बद्दल डॉ. कुर्तकोटी यांना २ लाख रु. वट्टात देणगी आणि सहा हजार रुपयाचे वर्षासन श्री. तुकोजीरावानी देण्याचे अभिवचन दिले आहे. त्याचा उपयोग काय? तर डॉ. कुर्तकोटी आणि कंपनीने युरोप अमेरिकेत जाऊन त्या परक्या लोकाना पवित्र करून, हिंदुधर्माच्या कोंडवाड्यात आणायचे! आज अस्पृश्य वर्ग दोन्ही हातानी ठणाणा करीत आहे! कीं, "आह्माला उन्हाळ्यात पाणी मिळेना. पोटाला अन्न मिळेना, लाजेचा भाग झाकण्याला वस्त्र मिळेना, उदर निर्वाहाला साधन नाही. गावांत जाऊ अंग मोडून धंदा करूं आणि पोटभरू ह्मटले तर गावात कोणी राहूं देत नाही. दाराच्या आत कोणी घेत नाही. आमची कांही तरी कोणी दाद घेईल काय हो!" ही ओरड मसूरकराना पोचत नाही. आणि कुर्तकोटीच्या कानाचाही पल्ला मारूं शकत नाही! नरकांत पडणाऱ्या लोकांचे तारण करण्यासाठी मसूरकर जातात गोमांतकाकडे. तर कुर्तकोटी आणि मंडळी जातात

युरोप अमेरिकेकडे ! तिकडे ते हिंदुधर्माचा प्रकाश पाडणार आहेत ! इकडे सात कोटी गांजलेला अस्पृश्यवर्ग, हिंदु लोक आपली दाद घेत नाहीत म्हणून येशूच्या कळपांत आणि इस्लामच्या गोटांत जाण्यास तयार झाले आहेत ! यांची शुध्दी करणे हे आमचे आज खरे काम आहे. ते न करितां. युरोप अमेरिकेत जाऊन, आपली मिजास मिरविण्यात अर्थ तो कोणता ? घरची पोरे भाकरीच्या तुकड्या-साठी पोट बडवून घेत आहेत. मग परदेशात जाऊन लाखो रुपये चूर करून, लोकांना भुरळ पाडण्यांत शहाणपणा तो कसला ?

५

## चोरांच्या उलटच्या बोंबा

( ता. ८ जून १९२८ )

कांही आरोपी मोठे आगलावे असतात स्वतःच बडमीला काडी लावून द्यायची आणि आग लागल्याचा बोभाटा पुनः आपणच करायचा. काही चोर असले लबाड असतात की आपणच चोरी करून धावा, " पकडा पकडा " म्हणून कोणाला तरी पकडण्यास आपणच सर्वांपुढे धाव मारायाची. काहीं स्वार्थी भोंदू, वैदू, औषध देऊन एखाद्याच्या अंगात नवा रोग उत्पन्न करतात. आणि त्या रोगाबद्दलची भीती उत्पन्न करून औषध द्यायला आपणच तयार आणि व्हिजीट चार्ज व औषधाची फी खिशात टाकायला मोकळे ! असला हा प्रकार झाला आहे. वर्णाश्रमाची किंवा जाति भेदाची कीड आणि अन्नपाण्याच्या सोवळ्या ओवळ्याचे विषारी जीव जंतू मात्र संस्कृतिच्या भिक्षुक शाहीनेच निर्माण केले. उच्च नीच पणाची उतरंड, भेदभावाचे कुलंगडे, रोटी बंदीचे मुस्के, आणि बेटी बंदीचे कुसव, ही अचाट कल्पना भिक्षुकशाहीची. पहिल्या नंबरचा दर्जा एका ब्राम्हण वर्गाचा ठेवता ! क्षत्रिया सारखा शूर वर्ग आणि वैशासारखा संपन्न वर्ग भिक्षुकांच्या अर्ध्या शब्दात वाकून गेलेला. धर्माचे गाठोडे अविच्छिन एका ब्राम्हण वर्गातच अडवून ठेवल्यामुळे बाकीचा सर्व हिंदु समाज म्हणजे मेंढयाचा कळप. आणि त्याबरोबर मालकही धनगर बनले ! धर्मज्ञानाची ओळख इतराना होऊ दिली नाही.

जगांत कोठेही दिसून येणार नाही असली ही आजची हिंदु समाजाची गलिच्छ रचना कोणी तयार केली व कशाने तयार झाली ? ऋग्वेदाचा जोमदार

ऐक्यभाव कोठें गेला ? एवढीशी आर्यांची प्रथम पंजाबात आलेली वसाहतवाल्यांची टोळी प्रसार पावता पावता हां हां म्हणतां आर्यावर्त आणि गंगा यमुनांच्या दोन्ही थडी व्यापून राहिली, ती रोटी बेटी बंदीने काय ? शक, हूण, मग कंबोज म्लेंछं वगैरे परकीय लोकांना स्वकीय करून आपल्या धर्मात सामील करून घेतले तो सनातन धर्म कोठे गेला ? क्षत्रियांचा संघ निर्माण होऊन, दोन्ही वेंगापसरुन दाही दिशा उडचा मारीत ज्या धर्माने आसेतु हिमाचल सर्व जनता एका संस्कृतींने बध्द करून टाकली. ब्रम्हदेश, सयाम, चीन, सिलोन, सुमात्रा आणि इकडे असीरियासुध्दा अग्निसारखी पसरत चाललेली संस्कृती, संस्कृतीनें एक जीव करून टाकले, ती जगद्व्यापी संस्कृती आज दृष्टीआड कां झालीं ? आणि ती तशीं कोणी केली ? सर्व प्रश्नाला आमचे एकच उत्तर आहे. आणि ते हेच कीं आमच्या शुध्द सनातन धर्माचे शुध्द वाटोळे, शुध्द म्हणविणाऱ्या भिक्षुकशाहीनेच केले आज विचित्र स्थिती काय झाली आहे पहा. मी हिंदु असे कोणी म्हणेल तर तेवढ्याने भागत नाही. लागलीच त्याच्या पाठीमागून सवाल येतो कीं हिंदु खरा पण जात कोणती ? जात नाही तर हिंदु नाही. आणि ती जातहीं इतकी ठिसूळ झाली आहे कीं, त्या साडेतीन हजार जातींतील वरच्या जातीने खालच्या जातीशीं शरीर संबंध केला कीं जात बुडाली ! आणि जात बुडाली कीं, हिंदु धर्मात त्याला कोठेही जागा नाही. धर्म चालविणारा धर्माचा नेता, आणि धर्मगुरु ब्राम्हण, त्यालाच या कृत्रीम समाज रचनेने अशा पेचकटांत घातलें आहे कीं, त्याला इतरानी खाणें पिणें बेटी देणें घेणें हे तर राहोच पण रस्त्याने चालणें अस्पृश्याची सावली पडणे, किंवा वारा लागणें असल्या गोष्टीने सुध्दा भिक्षुकी संस्कृति खाडकन तळाला येऊन ब्राम्हण्य बुडून जाते ! आज हिंदुस्थानची लोकसंख्या बत्तीस कोटी आहे. त्यात ब्राम्हणवर्ग एक कोटीही भरेल न भरेल. असल्या दावणीतून आणि भरगच्च बाजार गर्दीतून आमच्या गुरुवर्य ब्राह्मण वर्गाने शिरसलामत आपल्या प्रपंचाचा मार्ग काढीत राहणे ह्मणजे व्यायाम शाळेतील मोठ्याच कसरतीचे काम आहे, यात शंका नाही !

आणि असला हा तीन ताड उडया मारीत चालणारा भिक्षुकवर्ग, शुद्धि संघटणेचे सोवळे गांठोडे खांद्यावर घेऊन बाजार मांडायला आला आहे. हिंदू समाज बुडत आहे खचत आहे. त्याचे संघटन आणि शुध्दी करणें जरूर आहे. ह्मणून समोर येण्याला या वर्गाला लाज वाटत नाही ! घाणेरड्या स्मृती शास्त्रानी, स्वर्ग नरकाच्या आचकट विचकट कल्पनां उभ्या करून, समंजस माणसाच्या बुध्दीचे मातेरे केले. अनुलोभ आणि प्रतिलोभ विवाहाचे कृत्रीम बांध समाजात घालून आपापल्यांत वेगवेगळे ह्मारवाडे तयार केले. आणि नीच व पापाच्या विचारावर प्रायश्चित म्हणून अस्पृश्य वर्गाची जात तयार केली.

आणि पूर्वज्यांच्या कल्पित पापाबद्दल पिढयान पिढयाना शिक्षा करून अस्पृश्य वर्ग वाढविला. मनुस्मृतीत अस्पृश्यांची एक उपपत्ती सांगितलेली आहे ती अशी एखाद्या ब्राम्हण स्त्रीचा शूद्र पुरुषाशी प्रतिलोभ शरीरसंबंध झाला. तर त्यांच्या संततीला शिक्षा दिली, त्या मुलाबाळाना चांडाळ ठरविण्यात आले आणि त्यांना गांवाबाहेर हाकलून देण्यात आले. ही चांडाळ मांगाची उत्पत्ती आम्ही वाचीत असताना आम्ही एक गोष्ट विसरतो. असला हा अस्पृश्य वर्ग निर्माण करण्यापूर्वी किती ब्राम्हण स्त्रिया व्यभिचारिणी झाल्या असतील, ही कल्पना येऊन उच्च वर्गाला लज्जेने मान खाली घालावी लागेल ! दुसऱ्याला अस्पृश्य ठरविताना स्वतःच्या आयामाया मुली बहिणी भ्रष्ट झाल्या असे स्मृतीकार सांगत आहेत. वेदतो व्याघाताचा दोप हाच आहे. असल्या स्मृती किंवा असला कुचका भाग जाळून टाकला तर त्यात राग कां मानावा ?

ब्राम्हण वर्गाचे एक नेहमीचे उत्तर येत असते. " अहो तुम्ही तरी अस्पृश्याशी कोठे जमवून घेंता. चांभार ढोराला मिसळून घेत नाही ढोर, भंग्याला मिसळून घेत नाही. महार माणूस मांगाशी व्यवहार करोत नाही " हे प्रश्नाला उत्तर नव्हे. असलेल्या स्थितीचे हे वर्णन आहे. शुध्द सनातन धर्म वेशीबाहेर फेकून देऊन उठल्या बसल्या ब्राम्हण वर्गाचे स्तोम माजविणारा आणि आपले वर्चस्व स्थापणारा स्मृती ग्रंथ समुच्चय समाजात मिरवू लागला. त्याच दिवशी सनातन धर्म बुडाला. चार मजली वाड्याच्या शिखराला गळते लागले. तेच गळते वैश्य शुद्रांच्या खालच्या मजल्यापर्यंत येऊन पोहचले. तसली अस्पृश्यांची पेंड ओढत ओढत खालपर्यंत आली आहे.

अजून तरी या वर्गाने आपले डोळे उघडावेत. सोवळ्या ओवळ्याच्या खुळसट कल्पना भोळ्या लोकांच्या डोक्यातघालू नयेत. वेदाचे वाटोळे करणारीमंत्र संस्कृती अथवा जादुगाराची लपंडावी, लोकासमोर नाचवू नये. भिक्षुकाच्या हातच्यापाण्याने आणि त्यांच्या तोंडाच्या वेदमंत्राने गोव्याकडील बाटलेली गावेशुद्ध करून घेतली! हा डोंबाऱ्याचा खेळ पुरे करावा! श्री. दिवेकर शास्त्री यांच्या सारख्या शुद्धीसंघटन वाल्याची श्री.शिरके यांच्या सारख्या बारा वर्षे शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित हिंदुचा "अस्पृश्य" म्हणून भर सभेत त्याचा अपमान करावा आणि त्यांचे हातचे पाणी अमंगल म्हणून फेकून द्यावे हा काय चमत्कार आहे ? एक तपाचा शिक्षणापासून मिळालेला संस्कार शास्त्रीबुवाना मान्य होत नाही. आणि एका महार मुलग्याला वेदमंत्राने शुद्ध करून आर्यसमाजांत घेतला कीं त्याच्या हातचे पाणी बुवाना मान्य होते. हे काय गौडबंगाल आहे! हीच भिक्षुकी शुध्दी आणि भिक्षुकी संघटना आम्ही लायाडण्याचा यत्न करतो. चुलीतून निघून फोपाटयांत पडण्याचा हा प्रकार आहे.

श्री. शिरके यांच्या हातच्या पाण्यात आणि आर्यसमाजी विद्यार्थी यांच्या हातच्या पाण्यात खरोखर अंतर आहे.

वैदिक संस्काराने पाण्यांतील द्रव्ये बदलली आणि त्या विद्यार्थ्यांच्या अंगांतील रक्तांत बदल झाला आहे, असे जर कोणी शास्त्रीयरित्या शाबित करील, तर आम्ही लेखणी येथेच थांबवून पुन्हा या विषयाचा अभ्यास करण्यास लागू. तसे कोणी शुध्दिसंघटना पंडीत दाखविण्यांस तयार नाही.

तर असल्या व्याख्यानमाला म्हणजे केवळ एक पोकळ बडबड आहे. तोंडच्या बाता आहेत. समाजाची थट्टा आहे. अज्ञलोकांची दिशाभूल आहे. आणि चोरांच्या उलटया बोंबा आहेत. असा आरोप ब्राम्हणेतर वर्ग बेधडक करण्यास तयार आहे. पोकळ संस्काराने शुद्धी होईल आणि संघटना होईल असे सांगत सुटणे हे हास्यास्पद आहे. म्हणूनच आम्ही म्हणतो, शुद्धी चळवळीच्या आणि संघटना विषयाच्या लोखंडी चण्याला आजचा भिक्षुक वर्ग केवळ नालायख आहे!

आमची शुद्धी संघटना हे उघडे मैदान आणि मोकळे वातावरण आहे. कोणाच्याही हातच्या अन्नपाण्याने आमचा सनातधर्म बिघडत नाही. सर्व परिस्थिती योग्य आणि अनुरूप अशी मिळाल्यानंतर वधु-वराची जात पाहण्याचे कारण नाही. शिक्षण हाच संस्कार. शुद्ध वर्तन आणि स्वच्छ राहणी हीच योग्य संस्कृती आहे. या पायावर उभा राहून अखिल दुनिया आम्ही पोटात घेण्यास समर्थ आहोत. संध्येच्या पळीतले पाणी आणि भिक्षुकी रूढीच्या तोंडचे अर्थशून्य मंत्र ही बडबडशाही निरर्थक आहे. हे भिक्षुकशाहीचे जुने बंड नव्या स्वरूपांत नाचत असणारे पिशाच्च आहे. वेळीच त्यांची मुंडी मुरगळल्या वाचून समाजात समता उत्पन्न होणे अशक्य आहे.

काही ब्राम्हण पुढाऱ्यानी शुद्धी चळवळीचा प्रश्न हाती घेऊन हिंदु समाजाची संघटना अथवा एक जूट करण्याबद्दल कंबर कसल्याचे दिसत आहे. परन्तु थोडे आत जाऊन त्यांच्या वागणुकीचे पृथ:करण केले.

म्हणजे आह्माला तरी त्याबद्दल संशय उत्पन्न होतो. मुस्लिम बंधू शिरजोर होऊं लागले, त्यांचा नक्षा उतरणेसाठी हा डाव उभारला आहे. यात मुस्लिम बंधू नाखुष झाले तरी त्यांची पर्वा आह्मी करीत नाही.

परन्तु प्राय:श्चित देऊन हिंदुधर्मात घेतलेल्या इसमाला पुढे वागवायचे कसे? हा प्रश्न जितका कठिण आहे, तितका तो नाजुकही आहे. वसंत व्याख्यान मालेत या विषयावर खडाजंगी झाली, धर्ममार्तंड मालाकार यानी

स्वच्छ सांगितले की, "पतित ब्राम्हणेतराला हिंदुधर्मात घेतला तरी त्याच्याशी, ब्राम्हणाने अन्नोदक "स्पष्ट" घ्यावयाचे नाही. असे असलेली शुद्धी चळवळ आह्माला मुळीच नको.

"श्रीयुत भोपटकरांच्या स्पष्टपणाचे कौतुक, धाडसाची तारीफ आणि कडकडीत सोवळयाची वाहवा, आह्मी खरोखरीच करीत आहोत, हे झाले नंबर १चे ब्राम्हण, आता नंबर २ चे ब्राम्हण श्रीयुत केळकर.

ते आम्हाला काय सांगतात ते पाहूं त्यांचा सल्ला असा पडतो की, "अस्पृश्य म्हणविलेल्या जातीचा प्रश्न सोडला. तूर्त ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य याचे वर्णिकात तरी सहभोजनाला शास्त्राची आडकाठीनाही." आमच्या मते वरील दोघेही अंगचोर आहेत.

"एक नंबरचा ब्राम्हण" सहभोजनातून ब्राम्हणेतरांना वगळतो, तर "नंबर दोनचा ब्राम्हण" अस्पृश्यांना वगळतो. केसरीकारांच्या पायात अद्यापी कुचक्या शास्त्रांची बेडी पडलेली दिसते ती जोपर्यंत त्यांच्याने सुटत नाही, तोपर्यंत असले प्रश्न त्यानी हाती न घेणे चांगले.

आमच्या मते या प्रश्नाला आता शास्त्राचा कोंडमारा करणेची गरज नाही. "।। शास्त्रे फार अपार जीवित तुझें अत्यल्प हीं मानवा ।।" हे वाक्य काळजाला जाऊन पोचले पाहिजे. असल्या अर्ध्यामुर्ध्या तडजोडीच्या नेभळट उपायानी संघटनेचे किंवा सहभोजनाचे प्रश्न सुटणारच नाहीत. मालाकार आणि केसरीकार दोघेही चितपावन ब्राह्मण. एकाला मराठ्याची शिवाशिव होते, तर दुसऱ्याला चांभारानी बाट पडतो. एक दगड एक वीट, दोघेही एका माळेतील मणी, एक मधला वजरबटु, तर दुसरा कडेचा शिलेमणी. दोघेही आम्हाला सारखेच अपात्र वाटतात. प्रश्न आहे सगळ्या राष्ट्राचा. त्यांत पंक्तीतून मराठ्याला वगळा किंवा महारांना वगळा. म्हणून ओरडा करीत राहिल्यास असल्या पुढाऱ्यांना कोण किंमत देईल ?

धर्मांतर केलेले लोक शेंकडा ८० तर अस्पृश्यापैकीच आहेत. इतर त्रैवर्णिक लोक फार थोडे आहेत. याना शुद्धी चळवळीने हिंदुधर्मात घेऊन पुन्हा त्याना ह्या जातीच्या कोंडवाड्यात घालायचे आणि पंक्तीची पात्रापात्रता ठरवायची, तर ही असली शुद्धीची ढोंगे हवीत कशाला ? हजारो वर्षांची जुनी स्मृति शास्त्राची अंगडी टोंपडी आता गटारात फेकून दिली पाहिजेत.

व्यापक दृष्टी, राष्ट्रीय ध्येय आणि पूर्ण समता ही उच्च तत्वे एवढ्याशा सहभोजनाचे बाबतीतसुध्दा जर अमलात येत नाहीत, तर तो नाच कशाला करा? वर्णगुरू म्हणून टेंभा पाजळणाऱ्यानी आणि लोक संग्रहाचा दिमाख मारणाऱ्यानी ही लुंगीसुंगी कार्यें कडेला नेतांना ३६ साच्या आंकड्याची वृत्ती दाखवायची, तर त्यांनी आपला समाज सुधारणेच्या पुढारीपणाचा राजीनामा द्यावा ?

पुण्यास कोठे सहभोजन झाले म्हणे. तेथे काय प्रकाश पडला, तो समोर आला नाही. परन्तु वसंत व्याख्यानमालेत जो चित्पावनी प्रकाश पडला, त्यावरुन मात्र आह्मालां अंदाज करता येतो. मराठ्यांना पंक्तीस घ्यावे, हा न्याय निवाडा पुणेरी ब्राह्मणशाहीपुढे चालू आहे तोवर आह्मी इकडे कोल्हा-पुरास महार, ढोर, साळी, कोष्टी, मराठा आणि ब्राम्हणसुध्दा एका पंक्तीला घेऊन वाडपाचे काम महार विद्यार्थीकडूनही करविले, ही गोष्ट ब्राम्हणी पत्रे झाकून ठेवीत असली तरी मर्द मराठ्यानी दुनियेपुढे उघड मांडली आहेत ! शुध्दी चळवळ आणि सहभोजने या खुल्या तत्वावर झाली, तरच हे वाद सुटतील. मात्र हे " ।। येरागबाळाचे काम नव्हे ।। "

६

## शुद्धि संघटना

(ता. ३ जुलै १९२५)

धर्माचे ज्ञान अजिबात बंद झाले. उच्च म्हणविणारा ब्राम्हण वर्ग हा केवळ स्वार्थी बनला. इतर वर्गाला धर्मोपदेश करणें हे ब्राम्हणांचे मुख्य कर्तव्य आहे ही गोष्ट ते विसरून गेले. इतर वर्ग धर्माचे बाबतीत उदासीन झाले. आणि अस्पृश्य वर्ग तर मनुष्याच्या स्वाभाविक हक्काला सुध्दा पारखा झाला. कधीकाळी, त्यांच्या पणज्याच्या पणज्याने केलेल्या कृत्रीम आणि काल्पनिक पापामुळे प्रलय काळापर्यंते पशुच मानले गेले पाहिजेत; अशा भेसूर कल्पना दृढमूल झाल्या. त्यांचा स्पर्श त्यांची छाया ही सुध्दा इतर वर्गाला पतित करते. अशा घोर कल्पना अंगवळणी पडल्या. अशा स्थितीत या खालच्या लोकाना तुमच्या गोड सनातन धर्माचा अभि-मान काय वाटावा आणि तुमची ती वर्णव्यवस्था त्यांनी उगींच काय म्हणून पोटाशी धरून बसावे ?

अशा उदासीन आणि कंटाळवाण्या स्थितीत म्लेंच्छ व युरोपियन लोकांचा संबंध आमच्या राष्ट्राशी झाला. त्या परधर्मीय लोकात असला हा स्पर्शास्पर्शांचा अमानुष प्रकार नाही. त्या परकीय लोकामध्ये अत्यंत खालच्या दर्जाचा मनुष्य आपल्या सामर्थ्याने व बुध्दीबलाने सरदार किंवा उमराव होऊं शकतो. गव्हर्नर देखिल आमच्यांतील महार मांग लोकांचे हातचे पाणी पितात. त्यांच्यात स्पर्शाने मनुष्य कधी पतित किंवा भ्रष्ट होत नाही. युरोपातला गवंडी, पाथरवट, खाटिक किंवा चांभार मोठा कवि, मोठा मुत्सद्दि व प्रेसिडेंटही होऊं शकतो. या गोष्टी इकडील अस्पृश्य तरूणांच्या नजरेसमोर येताच त्यांचे विचार पालटूं लागले आणि या नवीन ज्ञानाच्या किरणानी नवीन आकांक्षा उत्पन्न झाल्या. हिंदु समाज पहावा तर तो अगदी मठ्ठ या बाबतीत अगदी निजून राहिलेला; बोलण्यांत वेदान्त भरपूर. वागणूक पहावी तर अगदी त्याचे उलट. कोणीही खालच्या जातींचा माणूस कितीही बुध्दिवान निघाला तरी त्याची मर्यादा ठरलेली. आखून दिलेल्या मार्गाबाहेर त्याला जाता येणें शक्य नाहीं. अगोदर नवा मार्ग आख–ण्याला त्याला जातींचा निर्बंध. त्यातून एखादा तसाच पराक्रमी किंवा कर्तृत्ववान पुरुष उत्पन्न झाला तर त्याला सर्वबाजूने अडथळे; त्याचे पायात काटे घालावयाचे अंगाला बोचण्या लावायच्या. सामाजिक शिक्षा त्याची खोड काढण्यास तयार. पोटाला भाकर नाहीं. अंगावर वस्त्र नाहीं. काही काम करीन तर चोहोकडे कोंडमारा. ही विपन्न अवस्था अस्पृश्याना केवळ असह्य झाली. उच्च म्हणवणारा वर्ग यांची बिलकूल दाद घेईना. अशा दैन्य अवस्थेत आजवर ते हिंदु धर्मात राहिले हेच आश्चर्य.

परधर्मी लोक त्याना आपल्या धर्मात घेण्यास तयार. एकीकडे काळाकुट्ट अंधार, तर दुसरीकडे समान हक्काच्या अरूणोदयाचा प्रकाश, अशा स्थितीत, आपले महार मांग लोक भराभर धर्मांतर करुं लागलें. आणि देशाचे सामर्थ्य व लोकबल कमी होऊं लागले.

हा चिमटा बसताच आता कोठे उदार मताचा ब्राम्हणवर्ग यांचेकडे पाहूं लागला आहे. आमच्या मते ही पतित परावर्तनाची दिशा सुध्दा केवळ एकांगी आहे. आपल्या हिंदु धर्मात ज्या वेगवेगळ्या जाति आहेत, त्यामुळे धंद्याचा कोंडमारा झाला आहे. तेही काटेरीं कुंपण तोडून काढून जाळून टाकले पाहिजे. वाटेल त्या मनुष्याने वाटेल तो धंदा करण्यास सऱ्हा स्वातंत्र्य पाहिजे. खालच्या जातींत किंवा अस्पृश्यात गुणवान मनुष्ये निघाली तर ताबड-तोब त्याना उच्च वर्गाच्या वर्णात घेतले पाहिजे. सार्वजनिक धंदे, देवालये, सभा, पाणोते येथून तेथून सर्व ठिकाणे सर्वांस मोकळी झालीं पाहिजेत. हे

आज उच्च म्हणविणाऱ्या लोकांचे कर्तव्य आहे. जुनी शास्त्रे किंवा श्रुति स्मृति काही असोत, असले अस्पृश्यांचे प्रकार कोणत्याही कारणाने उत्पन्न झालेले असोत ती पहात बसण्याला आपल्याला सवड नाही. सात कोटी जन-समूह आज कुजत राहिल्याने हिंदुसमाजाला ग्यांग्रीन झाले आहे! अशी भयंकर आग लागली असताना, ती आग कशी लागली, त्याच्या कारणाची मिमांसा करित बसणें हे मूर्खपणाचे होईल! तसेच भराभर पाणी ओतण्याचे आग विझवण्याचे सोडून ते पाणी आडाचे आहे कीं विहिरीचे आहे. किंवा त्या पाण्यात कसली द्रव्ये आहेत; याचा शोध करीत बसणें हे केवळ शुध्द वेडे-पणाचे होईल! म्हणून मनु, पाराशर, याज्ञवल्क्य हे या बद्दल काय म्हणतात ते पहात बसणेची हीं वेळ नव्हे. आणि या योगाने अस्पृश्यांचे समाधान केव्हाहीं होणार नाही. गांव आणि महारवाडा आज एक करून टाकला पाहिजे! दरम्यान १०० फूट जागा राहिल्याने कायमचे कुंपण असेच टिकेल ही गोष्ट खोटी आहे.

स्पर्शाने उच्च वर्गाची नीती बिघडेल, हे म्हणणेच चुकीचे आहे. आणि असली नाजूक नीतिमत्ता, या धक्काधक्कीच्या मामल्यात केव्हांही टिकणार नाही. सद्‌गुणावर कसलेही प्रहार झाले, तरी तो खरा सद्‌गुण असल्यास टिकलाच पाहिजे. शुध्द सोन्याला जाळले, तोडले, ठोकले तरी त्यांत कांही कमीपणा येणार नाही.

तुमची नीतिमत्ता असल्या डळमळीत वाळूच्या पायावर उभारलेली आहे की काय? तुमची नीति भेंडाचे बाशिंग आहे की काय? किंवा लहान मुले आग-गाडीचा डोलारा उभा करितात आणि तो थोड्याशा धक्याने पडून जातो, तसा तुमचा थोरपणा आहे की काय? आणि खरोखर तसला लिचपिचीत असेल, तर तो लवकर गेलेला बरा! म्हणून आमचे म्हणणे असे की, अंत्यजांच्या स्पर्शाने तुमची नीतिमत्ता बिघडेल किंवा भाषा बिघडेल हे म्हणणे आह्मास क्षणभरही खरे वाटत नाही.

तुमचे म्हणणे अस्पृश्य लोक वाईट. मांसाहार करितात, म्हणून त्याना दूर ठेंविले पाहिजे. हा आक्षेपही जुनाच आहे. आणि तो तितकाच टाकाऊ आहे. आह्मी असे म्हणतो की, सगळेच महार मांग अशुध्द मांसाहार करितात असे नाही. आणि त्यांना चार पैसे मिळू लागून थोडीशी स्थिती सुधारली तर ते जनावरांचे मांस खाणारही नाहीत. बरे, मांसाहार केला म्हणून तरी काय झाले. तेवढ्याने मनुष्यप्राणी अस्पृश्य कसा ठरतो? कुत्री वगैरे प्राणी जनावराचे मांस खातात त्याना कांही अस्पृश्य ठरविले नाही. सर्व जातिमध्ये ही जनावरे पाळतात. मग महारांनीच जास्त पातक काय केले आहे, मराठे, कोळी, रामोशी, वडुर, कोष्टी,

बेरड वगैरे लोक मांसाहार करितात, त्याना कां समाजात प्रतिबंध नाही? मिळून कोणत्याही कारणाने पाहिले तरी व्यवहारिक रीतीने स्पर्शास्पर्शाला आधार उरत नाही. म्हणून आमचे म्हणणे असे की, आज राष्ट्राला आग लागली आहे, नागाने देहाला विळखा घातला आहे. मनुष्यबल म्हणजे देशाला सोन्यासारखे मौल्यवान झाले आहे. ही स्थिती पाहून आवश्यकता म्हणून, आपध्दर्म म्हणून असल्या ह्या चालिरीती, हा स्पर्शास्पर्श्य, घाणेरडे सोवळेओवळे टाकून दूर फेकून दिले पाहिजे. या जीर्ण वाकळेत आता कांही अर्थ उरला नाही.

७

## महाराष्ट्राचा मानबिंदू मराठाच !

( ता. ३० डिसेंबर१९२७ )

शुध्दी संघटनेची चळवळ तर सुरूं झाली आहे. परन्तु हजारो वर्षांपासून जातिभेदाच्या अनिष्ट रूढीने विस्कळीत झालेला समाज नवीन मार्गाने जोमदार तयार करणे हे काम फार कठीण आहे. ही गोष्ट आता प्रत्ययास येऊ लागली आहे. आपला मूळचा सनातन आर्य धर्म सर्व संग्राहक—आणि जगद्व्यापी होता. मूठभर आर्यांच्या वसाहतीने प्रथम पंजाबात येऊन नवीन वसाहत केली. सारा भरतखंड आर्यमय करून टाकला त्या तेजस्वी आर्य-संस्कृतीचे वर्णन काय करावे! येथील मूळचे रहिवासीही तसेच बलाढ्य होते. त्यांच्याशी युद्धाच्या मार्गाने टकरा द्याव्या लागल्या. त्यांचा पराभव केला. निबिड अरण्ये तोडून आर्यांच्या वसाहतीला नवीन प्रदेश तयार केले. आणि भिल्ल, कोळी रामोशी, मांग वगैरे सारख्या रानटी लोकांची गांठ पडताच त्याना केव्हा प्रेमाने, केव्हा धाकाने आपले अंकित केले. आणि आपल्याला सामील करून घेतले. अशा रीतीने आपल्या संस्कृतीचा साऱ्या भरतखंडभर प्रसार केला. यावरून आपल्यास एक कल्पना खास पटते ती ही आमची मूळची संस्कृती इतकी बलवान आणि सर्व व्यापी होती की तिला जग पुरेनासे झाले होते.

आता आजची स्थिती काय आहे ती पहा. ब्राह्मण वर्ग हा वर्णाश्रम धर्मी हिंदु लोकांचा पुढारी. आज आपल्या समाजाला रोग काय झाला आहे, हे ब्राह्मण वर्गाने चांगले ओळखले आहे. समजले आहे. पण उमजले नाही! बोलणे भरपूर पण वागणे शून्य! मूळ सनातन धर्मीय संस्कृती आज पार लयाला गेली आहे.

सर्वच लोकांना, गांठ पडेल त्या समाजाना, पोटांत घेऊन, " आपल्यासारखे करिती तात्काळ " असा तो प्राचीन समाज कोणीकडे. आणि आजचा एकलकोंडा तुसडा, अपलपोटी, स्वार्थी, माणूसघाण ब्राह्मणी धर्म कोणीकडे ! कशास कांही पत्ता नाही. आजची ब्राह्मणी संस्कृती म्हणजे कच्च्या मातीचे कच्चे मडके ! त्याला मराठ्याचा हात लागला की, तडा जातो. अस्पृश्याच्या स्पर्शाने पोचा पडतो, ख्रिस्ती मनुष्याच्या पाण्याने भोक पडते, मुसलमानाच्या अन्नाने ब्राह्मणी मडके फुटून जाते ! असली ही संस्कृती या स्पर्धेच्या कालात टिकणार ती काय आणि दुसऱ्याला घेऊन चालणार ती काय " स्वतःची गत काय होणार याच्या पंचायतीत आणि चिंतेत असणाऱ्या ब्राह्मण वर्गाने दुसऱ्याची शुद्धी कसली करायची ? आणि साऱ्या हिंदु-समाजाची संघटना काय डोंबलाची करायची ! त्याचे त्यालाच आज पुरे झाले आहे. परवा अकोल्यास ब्राह्मण परिषद भरली होती. त्यातला खेळखंडोबा जगाच्या निदर्शनास चांगला आला. त्यांच्या संस्कृतीचे आज पुरे दिवाळे वाजले आहे. " अखिल भारतीय हिंदुमहासभा ! " नांव तर मले मोठे अगडबंब भरमक्कम धारण केले होते. पण करणीचे नांवाने पूज्य ! तो नाद आता त्यांनी सोडला आहे, असे दिसते. आपल्या स्वतःचे घरचे वासे तरी नीट लाऊ या, म्हणून ही ब्राह्मण सभा भरविली. त्यांत शास्त्री पंडीतही आले होते. शास्त्राचा प्रकाश चांगला पडला. यांत गोवर्धन, देवरुखे वगैरे कित्येक पोट-जाती आहेत. कसाबसा रोटी व्यवहाराचा ठराव पसार झाला. पण पुढे क्रिया काय घडणार ते दिसलेच. पांचाळ ब्राह्मण (सोनार वर्ग) हे आपणास परिषदेला कां बोलावले नाही म्हणून तक्रार करीत होते. त्यांची दाद लागली नाही हे पांचाळ तर षट् कर्माचे अधिकारी आहेत. ब्राह्मणामध्ये कित्येक अशा पोट जाती आहेत की, त्यांचे पाणीसुद्धा चालत नाही. असल्या या फाटक्या समाजाने स्वतःचे अंग-रख्याला ठिगळे किती लावायची ! अंग ज्याला झांकता येईना आणि आपली लाज ज्याला राखता येईना, असल्या ब्राह्मण धर्मीय समाजाने अखिल भारतीय हिंदु-संघटनेची उठाठेव करणे हे निव्वळ हास्यास्पद आहे ! म्हणून आह्मी म्हणतो की, ज्या तुसडचा संस्कृतीच्या पेशवाईने महाराष्ट्राची गादी गमावली, त्या ब्राह्मण वर्गाचे हाती आह्मी आमची सुत्रे द्यावीत अशी पत त्यांचे अंगी उरली नाही !

आता दुसऱ्या कांही उच्च म्हणविणाऱ्या लोकांचा विचार करूं. जैन धर्म हा एका काळी फार प्रभावशाली होता. हिमालय ते कन्याकुमारी पर्यंत व द्वारका ते बंगाल असे त्यांनी आपले हातपाय पसरले होते. त्यांचे वाङमय अती महत्वाचे आहे. ग्रंथ संग्रह विपूल आहे. परन्तु आज जैन सांप्रदाय खालावत चालला आहे. दुसऱ्याला पोटांत घेऊन जाण्याची त्यांची शक्ती नष्ट झाली आहे. त्याची वाढ

खुंटली आहे. गेल्या १०।१५ वर्षांत त्यांची सारी लोकसंख्या बारा लाख होती, ती अकरा लाख झाली आहे. सोवळयाच्या बांबतीत ते ब्राह्मणांचे सख्खे बंधु. किंबहुना वडील बंधू म्हणण्यास हरकत नाही. त्याला शुद्धिचीही शक्ती नाही. आणि संघटनेचेही सामर्थ्य नाही. लिंगायत सांप्रदाय पाहिला तर श्री बसवेश्वराचे वेळची धडाडी आश्चर्याने चकीत करून सोडते ! जातीभेदाचे वारेसुद्धां हिंदु समाजात ठेवायचे नाही. ही प्रतिज्ञा घेऊन, या कार्यासाठी त्यांनी यज्ञकंकण हाती घातले. आणि थोडयाच काळात त्या लिंगायत सांप्रदायाने चौफेर उड्डाण मारले. ब्राह्मण, मराठा, कुणबी साळी, मांग, महार, चांभार ढोरानासुद्धा ही नवी दीक्षा देऊन, लिंगायत करून घेतले. आणि जातिभेदाचे हातपाय मोडून टाकले. पण तो तारा उदयास आला, चमकला गेला! झाले संपले! आज पहावे तो येरे माझ्या! आज त्याला दुसऱ्या कोणाचेही पाणी सोसत नाही. अन्न पचत नाही. ब्राम्हणा–प्रमाणेंच त्यांचा जठराग्नी अगदी मंद होऊन गेला आहे. चालू स्थितीत समाजाचा नेता होण्याची लायखी त्यांचे अंगात राहिली नाही. वीरशैव लिंगी ब्राम्हण घ्या. किंवा पांचाळ विश्वब्राम्हण घ्या. ब्राम्हण म्हणवून घेण्याची हाव मात्र दांडगी. पण त्या ब्राम्हणाची सावली यांचे अंगावर पडल्यामुळे लोकसंग्रहाचे कामी हे सारे एकाच माळेचे मणी !

आता मराठा समाज घ्या, हा समाज पूर्वीपासून आज तागायत महाराष्ट्राचा पुढारी दिसून येतो. मुसलमानांचा प्रवेश दक्षिणेत होणेपूर्वी हजारो वर्षे येथे मराठा वर्गच राज्य करीत होता. मुसलमानांची अमदानी महाराष्ट्रात गाजलीच नाही. किंवा गाजलीच तर थोडीच गाजली असेल. औरंगजेबाचा पाय एका बाजूने इकडे लागला असेल तोवर दुसऱ्या बाजूने मोंगल शाहीच्या इमारतीला मराठयांचाच भोंगा लागला आणि ती पोकरण्यात आली. मोगल आले, ते जाण्यासाठीच ! लागलीच डोंगर कठोरीच्या मराठयांनी शिवछत्रपतींच्या नेतृत्वाखाली पुन्हा मराठयांची गादी स्थापन केली. ती गादी पेशव्यांच्या कुटिल कारस्थानी ब्राम्हणी संस्कृतीत सांपडली नसती तर तिचा कदाचित नाश झाला नसता. त्याच गादीचा दुसरा भाग आज करवीर राज्यात नांदत आहे. असो.

मराठा वर्ग सर्व संग्राहक आहे. त्यांची संस्कृती जिवंत आहे. त्यांचा जठ–राग्नी प्रदिप्त आहे. मराठयाला आज कोणाच्याही हातचे पाणी चालते. ब्राम्हण जैन लिंगायत, कुणबी साळी, लोहार, कुंभार, सुतार, विश्वब्राम्हण सोनार, कोळी, धनगर, अशापैकी कोणाच्याही हातचे अन्नपाणी मराठयाला चालते. अन्नपाण्याने त्यांची प्रकृती बिघडत नाही. बध्दकोष्ट होत नाही. किंवा अतिस्राव होत नाही ! त्यांची संस्कृती फुटत नाही. आणि धर्म मोडत नाही. प्रेमाने, स्नेहाने त्याची

शक्ती वाढतच जाते. अस्पृश्य वर्गाला पंक्ती घेण्यास जवळ समावेश करण्यात त्याला भीति वाटत नाही, तो चाचपडत नाही. त्याची उदाहरणे खालसा मुलूखात आहेतच. पण करवीर राज्यात तर मराठ्यांची लोकसंग्राहक शक्ती केवढी दांडगी आहे. याचा अनुभव पदोपदी येत आहे. खऱ्या शुद्धी संघटना कार्याला मराठ्यांची केवढी तत्परता आहे, हे कोणासही दिसण्यासारखे आहे.

## ८

## जाति विध्वंसन हाच संघटनेचा खरा उपाय

( ता. ११ जानेवारी १९२९ )

जातिभेदात उच्चनीचपणा साठविलेलाआहे, उच्चनीचपणा अनर्थाचे बीज आहे. ही अनर्थपरंपरा महाभारत कालापासून आजतागायत चालू आहे. फार कशाला भारतीय युद्धाचे बीज याच जातीच्या उच्चनीच भावनेत आहे. कर्णाचा अपमान तू सारथीपुत्र आहेस, कमजात आहेस. ह्मणून अर्जुनानी भरसभेत केला नसता तर हा भारतीय संग्राम टळलाही असता. अर्जुनाला आपल्या ताकतीची खात्री नव्हती. त्याचा आत्मविश्वास कमी होता. म्हणून ही जातीची अपौरुषेय ढाल पुढे करून त्यानी आपला त्यावेळी निभाव करून घेतला. कर्णाच्या बरोबर उघड सामन्यास राहण्याची अर्जुनाची छाती झाली नाही म्हणून हा भ्याडांचा मार्ग त्याने स्वीकारला. जातीचा टेंभा मिरविणारे खास भ्याड आहेत असे समजण्यास हरकत नाही, आजच्या ब्राह्मणाना स्वतःचे गुणावर पुढे येण्याची इच्छा नाही. उघड चढाओढीत आपले श्रेष्ठत्व दाखविण्याची हौस नांही. दुसरा आपल्यापेक्षा कितीही विद्वान असो तो केव्हाही ब्राह्मणाबरोबरचा नाही. जातीने नीच म्हणून जो एकदा समजला गेला तो मरेपर्यंत नीच !

जातीभेदाला ब्राह्मण पुराणाचा. वेदकालाचा, परंपरेचा, आधार दाखवितात. पण ही परंपरा हजारोवेळा मोडली आहे. सत्यकाम जाबालाला एका ऋषीने तू कोणजातीचा म्हणून विचारिले असता " माझी आई म्हणाली, तुझा बाप कोण होता माहीत नांही " असे सरळ स्पष्ट सत्य उत्तर दिले. तेव्हा इतके सत्य उत्तर देणारा तू ब्राह्मणच असला पाहिजेस असे म्हणून त्यानी जबाला आपले शिष्य करून घेतले. म्हणजे त्यावेळी गुणावरून ब्राम्हण समजला जात

असे हे सिध्द होते. हीन जातीचे ऋषी आपल्या योग्यतेने ब्राम्हण जातीत गेल्याची अनेक उदाहरणें आढळून येतात. विश्वामित्र हे एक त्यातले मोठे ठळक उदाहरण आहे. मिश्रविवाहाचीही तशीच पुष्कळ उदाहरणे आहेत. सर्व जातीचे संबंध होत होते. पुढे स्वार्थामुळे त्याला निर्बंध पडले एवढेच. फार काय कित्येक ब्राम्हण कुळे चंद्रवंशी क्षत्रियापासून झाली आहेत, तेव्हा हा परंपरेचा आधार निव्वळ फोल आहे.

जाती मोडू नयेत. आपले जातिमहात्म्य जाऊ नये म्हणून बेटीबंदीची काटेरी कुंपणें तयार केली. पण स्वतंत्र विचाराने चालणाऱ्या लोकापुढे ही कुंपणें टिकाव धरू शकली नाहीत. बाणेदारवृत्तीच्या स्त्री पुरुषानी ती वेळोवेळी तोडून टाकिली आहेत. आतां ती कुंपणें असली तरी त्यांचे काटे बोथट झाले आहेत. ते आंतां अंगाला फारसे ओरखडत नाहीत. मिश्रविवाहाची उदाहरणें पुराणात कमी नाहीत. शुक्रकन्या देवयानीचे ययाती क्षत्रियराज्याबरोबर लग्न लागले, उलुपी अर्जुन, हिडिंबा भीमसेन, शंतनु मत्सगंधा वगैरे हल्ली तर ही बंधने तोडण्यासाठी तरुणपिढी पुढे येत आहे.

ही जातिबंधने, ही बेटीबंदी रोटी बंदी मनुष्य स्वभावाच्या उलट तर आहेच आहे, पण या असंख्य जातीने हिंदुस्तानची शकले शकले उडत आहेत. हिंदुस्थानची एकी होणेच अशक्य झाले आहे. हिंदुस्थानची एकी झाली नाही तर स्वराज्य कसे मिळणार ? ही सामाजिक परिस्थिती राजकीय प्रगती आड सारखी येत आहे. कोणत्याही एका जातीचा विश्वास दुसऱ्या जातीच्या इसमावर बसत नाही. एका जातीचे हित ते दुसऱ्याचे अनहित असे होत आहे. आता ही गोष्ट सुविचारी समंजस ब्राम्हणानाही पटत आहे, सहभोजन व मिश्रविवाह या विरुध्द हाकाटी मारणारे आपल्या जातीतील पोटजाती मोडाव्यात म्हणून प्रयत्न करीत आहेत. पण तेच तत्व जरा व्यापक तऱ्हेने पुढे आल्यास ते कचरतात. त्याना आपली जातिसंघटना करायची ती संघटित रीतीने दुसऱ्या जातीस खाली चेपण्याकरिता करायची आहे. हिंदु संघटन नांव द्यायचे पण ब्राम्हणी वर्चस्व कायम ठेवायचे आहे.

अलीकडे अस्पृश्यता निवारण्यास शाब्दिक सहानुभूती ते दाखवू लागले आहेत. पण देवालयाचा, सहभोजनाचा प्रश्न आला की त्यांची सहानुभूति वाऱ्यावरच विरून जाते.

असो ब्रम्हवृंदाने कितीही आरडा ओरडा केला तरी जाती मोडल्या पाहि-जेत. अस्पृश्यता गेली पाहिजे. सर्वांचा समान दर्जा समजला गेला पाहिजे.

हे तत्व पटू लागले आहे. एके काली ज्या काँग्रेसमध्ये सामाजिक प्रश्नाला वाव मिळत नसे त्याच कॉन्ग्रेसमध्ये सामाजिक प्रश्नाचा उहापोह होऊन कॉन्ग्रेसच्या मेंबरने अस्पृश्यता मानता कामा नये व मानणारा काँग्रेसचा मेंबर होऊ शकणार नाही असा ठराव केला आहे. ठराव तरी पास झाला आहे, हे कांही कमी नाही. मात्र अस्पृश्यता घालवून टाकण्यासाठी कोणता कार्यक्रम आखला आहे ? कोणत्या आवश्यक गोष्टीं केल्या पाहिजेत हे निश्चित झालेले नाही.

बॅ. जयकरांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या अखिल भारतीय सामाजिक परिषदेने मात्र फार मोठा पल्ला गाठला यात शंका नाही. परिषदेने अगदी मुळातच घाव घातला. जातिभेद मोडल्याशिवाय कसलींहीं प्रगती होणे अशक्य आहे. हीं गोष्ट मोठ्या नेटाने त्यानी देशापुढे मांडली आहे. जातिभेदाचे भूत हिंदुसमाजात वावरत आहे. तोपर्यंत सामाजिक सुधारणा शुद्धी अस्पृश्योद्धार या गोष्टी होणे दुरापास्त आहे. राष्ट्रीय ऐक्य घडून येण्याकरिता जातिजातीत बेटी व्यवहार व सहभोजने व्हावीत. निरनिराळ्या जातीत मिश्र विवाह होण्यास मोकळीक असावी ' बाकीही पुष्कळच उदार धोरणाचे क्रांतिकारक असे ठराव परिषदेने पास केले आहेत. जयकरांच्या धुरिणत्वाखाली सभेने फारच मोठी कामगिरी केली यात शंका नाही.

## ९

## महात्मा गांधी व बॅ. सावरकर

( ता. २५ मार्च १९२७ )

महात्मा गांधी रत्नागिरीस गेले होते. तेथे महात्माजी व बॅ. सावरकर यांची मुलाखत झाली. त्या समयी खादी आणि शुद्धी चळवळीसंबंधी प्रश्नोत्तरे झाली.

महात्माजी म्हणतात की अस्पृश्याची अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे ही गोष्ट कबूल. परंतु आपला धर्म सोडून ते लोक बाटून खिश्चन झाले किंवा मुसलमान झाले म्हणजे त्यांची अस्पृश्यता नाहीशी होते ही गोष्ट खरी आहे. परंतु तसे करणे आपल्यास मान्य नाही. अस्पृश्यानी हिंदु धर्मातच राहिले पाहिजे आणि हिंदुधर्मानेच आपले तेज इतके प्रभावशाली केले पाहिजे की

अस्पृश्यता हा कलंकच आपल्या धर्मात राहता कामा नये. अस्पृश्यता घालव- ण्यासाठी कोणी परधर्मात जाईल, तर त्याचा मी तीव्र निषेधच करीन!

शुद्धि चळवळीबद्दल महात्माजी ह्मणतात कीं, हिंदु मनुष्य बाटतो ही कल्पनाच मुळी चुकीची आहे, देहावर कोणी बाह्य सस्कांर करींल. मला मारून मुटकून मुसलमान बनवील. किंवा बळेच कोणी बाप्तिस्मा देऊन ख्रिश्चन करील, तर ते श्रम व्यर्थ आहेत. मनाने मी हिंदु आहे, कसल्याही बाहेरच्या संस्कारानी माझे हिंदुत्व केव्हांही नष्ट होणार नाही. हे महात्माजींचे म्हणणे सावरकरानाही मान्य आहे. सावरकर म्हणतात खाण्यापिण्याने कोणी हिंदु बाटतो ही समजूत मला अत्यंत हास्यास्पद वाटते.

आता आम्ही पुण्याच्या नामांकित ब्राम्हण पुढाऱ्याना नम्रपणे सवाल करीत आहोत की, या ठिकाणी ब्राम्हण ब्राम्हणेतर पक्षाचा प्रेमाचा संयोग होण्याचा संभव आहे. ब्राम्हणेतर समाज घ्या अगर सत्य समाज घ्या. महत्वाचा मुद्दा हाच आहे कीं, खाण्यापिण्यात भेदाभेद करून उच्चनीच भावनेचे क्षुद्र प्रदर्शन करून ब्राम्हण वर्ग इतरांचा प्रत्यक्ष उपमर्द करीत आहे. बॅ. सावरकर यांची ब्राम्हण वर्गातील पुढाऱ्यात आम्ही गणना करतो. पुण्याचा भोपटकरी कट्टर कँप रोटीबंदीचा धिंगाणा घालतो. तेव्हां भोपटकर व सावरकर त्यांच्या उत्तर दक्षिण मताची एकवाक्यतां कशी करायची? 'सावरकरांनी या पुण्याच्या लपंडावाना उघड थप्पड दिली पाहिजे एक. किंवा भोपटकरांनी तरी सावरकरांचे महात्म्य झुगारून दिले पाहिजे एक. नाही तर सामान्य जनाना या दोघा ब्राम्हणांनी मिळून खोड्यात घातले आहे. असेच आम्ही म्हणणार. दोघेही ब्राम्हण ब्राम्हणे- तराना सारखेच. एक ससा एक खळगा. किंवा एका बहिणीने म्हणावे ब्राम्हणे- तराचा चहा मला चालतो, दुसरीने म्हणावे मी नाही घेत. अशा स्थितीत आम्ही लोक बुचकळ्यात पडणार. हे दोघेही एकमेकाला सामील आहेत. आणि हे नुसते लपंडाव करीत आहेत. असा लोकांचा समज होईल. सत्यसमाजाने सह- भोजने केलेली पाहताच, भोपटकरासांरखे डोक्यांत राख घालून उधळणारी ब्राम्हण मंडळी तिकडे मिरवीत आहेतच. इकडे सावरकर अस्पृश्याबरोबर भोजन करण्यात कमिपणा मानीत नाहीत असे दिसते, हे ब्राम्हणी व्यस्त त्रयराशीक सोडवणे, आम्हां ब्राम्हणेतराना जरा कठीणच!

खादी चळवळ ही सावरकारांना अंशतः पटते असे ते म्हणतात! हा डावपेच कां? अंशतः म्हणजे काय? डोक्याला खादी कॅप आणि कमरेला दहा हाती जानपिल असा त्याचा अर्थ समजायचा काय? ही घेडगुजरी बतावणी कशाला?

खादी चळवळ चुकत असेल तर तसे स्पष्ट सांगा. किंवा कळते पण वळत नाही. अंगाला रुचते पण बोचते, म्हणून मागून मोकळे व्हा ! किंवा तत्वतः ही खादी चळवळ चुकीची आहे; आणि महात्माजी ही राष्ट्राची गाडी या खादी चळवळीने खड्डयांत घालीत आहे, असे तरी जाहीर करा. बोलण्यात तत्व नाही आणि वागण्याचे धैर्य नाही, असा दुटप्पीपणा नको.

बॅ. सावरकर यांचे मनाने शुद्धी चळवळ ही हिंदु धर्माच्या सत्य तत्वावर अवलंबून आहे. ते म्हणतात सत्य आपल्या धर्मात गोवले आहे. आणि ते इतर धर्मापेक्षा जास्त उच्च स्थितीत अधिष्टित आहे. हे जर कोणास पटेल तर त्याचा प्रसार कां करूं नये ? परधर्मियाला किंवा बाटलेल्याला प्रायःश्चित्त देऊन व शुद्ध करून हिंदू धर्मांत कां घेऊं नये ? आणि त्या सत्य तत्वाचे स्थापनेसाठी झेंगटे तंटेबखेडे अर्थात मारामाऱ्या झाल्या तर कां भ्यावे ! यावर महात्मा म्हणतात धर्म केवळ भावनेची गोष्ट आहे. ज्याला वाटेल त्याने वाटेल त्या धर्मात रहावे. कोणालाही तू अमुक धर्मात ये, असे आमचा धर्म सांगत नाही.

वाद मनोरंजक आहे. प्रामाणिक मतभेदाला जागा आहे. बॅ. सावरकर यांच्या मताला योग्य मान देऊन आह्मी म्हणतो कीं, आजच्या परिस्थितीला चालू शुद्धिचळवळ राष्ट्रघातक आहे. बॅरिस्टरांच्या म्हणण्याप्रमाणें आह्मालाही धर्मतत्वात दोन अंगे दिसतात. बुद्धिगम्य व भावनागम्य. बुद्धिगम्य हिंदुतत्वज्ञान फार उच्च स्थितीला पोचले असेल. आमची तक्रार नाही. परन्तु सामान्य बहुजन समाज या तत्वज्ञानाला पोहोचूं शकतच नाही. शेकडा पांच-दहा लोकांना सुध्दा तुमचे वेदांत तत्वज्ञान कळण्याजोगे नाही. त्याबद्दल कोणी हुज्जत घालीत बसत नाही. आणि तंटेही त्यासाठी होत नाहीत. तुमच्या धर्माचे बाह्यांग किंवा सोळा संस्कार, शेंडी जानवे या बाबी आणि मुसलमानांच्या सुंता, शेंडी मुंडण आणि दाढीरक्षण, असल्यात धर्माचे लढे पडतात. अज्ञजनाला हाच धर्म वाटतो. धर्मवेडे तेच असतात आणि शुध्दिचळवळीचा अनिष्ट परिणाम, तंटेबखेडे मारामाऱ्या याच खालच्या वर्गात होतात. महात्माजीसारखे पूर्ण संयमी सेनानी असूनसुध्दा या भावनाप्रधान अज्ञजनाच्या धर्मवेड्या मनोभावना आवरता आल्या नाहीत. चौरीचौऱ्यासारखे 'ब्रेक' राष्ट्रसंघटनेच्या कार्याला आडवे आले. अशी जर स्थिती आहे, तर अभिमानाने वेडे झालेल्या हिंदु पुढाऱ्यांना शुध्दि चळवळी प्रसंगी जेव्हा, तितकाच धर्मवेडा मुस्लिम पुढारी भेटेल तेव्हा झेंगटेही झाल्याशिवाय राहणार नाहीत. जसे इकडे वेडे लोक, तसे परधर्मातही वेडपीर आहेतच, आणि त्यांच्या सामन्यात मारामाऱ्या ठेवलेल्या आहेतच. म्हणून आमचे म्हणणे आजच्या परिस्थितीला ही शुध्दि चळवळ पसंत नाही. ज्याला त्याला आपापल्या इच्छेवर स्वतंत्र ठेवावे,

प्रेम, श्रध्दा, चित्तसमाधानी, सर्वच धर्मांत आहे. ही गोष्ट सावरकरही मान्य करतील.

खादी हा राष्ट्राचा प्रश्न आहे. याला धर्म जातिपंथ याचा अडथळा नाही, कुणब्यापासून थोरांपर्यंत पटण्यासारखा आहे, आधुनिक अर्थशास्त्राला मान्य आहे. गरीबाच्या पोटी चार घास पोचविणारा आहे, याच्याशिवाय आमच्यासारख्या जितराष्ट्राला, खरा कल्याणाचा दुसरा मार्ग नाही, खादीला अडथळा जो येतो तो पुढील वर्गांकडुन, अंगाला आणि खिशाला ज्यांना किंचितही घस सोसत नाही, असा पंडितमान्य पुढारी वर्ग मोठमोठ्याने ओरडणारा तोंडपाटिलकींचा पोकळ बोलका वर्ग, चैनीला सवकलेला आयितगब्बू श्रीमंत वर्ग,

* * *

# डॉ. सावरकर व महात्माजी

**सावरकरांच्या दृष्टीने महात्माजींच्या हातून कोणते पाप घडले ते पहा–**

यंग इंडिया आम्ही पाहिला. हिंदु मुसलमानांत तेढ उत्पन्न होण्यास बऱ्याच अंशी "वर्तमान पत्रे ही कारणीभूत आहेत" हेच महात्माजींचे विधान आहे. आणि त्यावरच हे सावरकर चवताळून उठले आहेत. बेजबाबदार वर्तमानपत्राचे संपादक भलभलती विधाने करून आपल्या या समाजात द्वेष उत्पन्न करीत आहेत, ही गोष्ट खोटी आहे, असे सत्याचा अभिमानी कोणी म्हणू शकणार नाही. मात्र विकारवश झालेला इसम आपल्या भाषेच्या परिणामाकडे लक्ष पोचवीत नाही. दोषी भावनेने तो अंध झालेला असतो. कित्येक वर्तमान पत्रातून या समाजाबद्दल परस्पर इतकी दुष्ट भाषा वापरली जाते, की, दोन्ही समाजातील खालच्या अज्ञ अविचारी आणि धर्मवेड्या वर्गावर त्याचा अनिष्टच परिणाम होईल. खालचा वर्ग केव्हाही भावनाप्रधान, विकारवश आणि तंट्याला तयार असाच असणार ! पण पुढारी म्हणविणाऱ्यानी आपली जबाबदारी नेहमी ओळखली पाहिजे. विकारवश व अज्ञ समाज ही एक पेट घेणारी दारु आहे तिच्याजवळ प्रखर भाषा ही अग्नीची ठिणगी आहे ? तेंव्हाच पेट घेते, भडका होतो. आणि असा कटु अनुभव

वारंवार येत आला आहे. म्हणून वृत्तपत्रकाराना महात्मा गांधीचा " भाषा जपून वापरा " हाच इशारा आहे.

पण अलौकिक पराक्रम करण्यास निघालेले महावीर सावरकर-यांना ही हिंदुमुस्लीम ऐक्याची भाषा कशी रुचणार? भरतभूमीस स्वातंत्र्य प्राप्त करुन देणारे हे रणशूर गाझी ऐक्याला कान कसे देतील? मुसलमानांना झोडून फोडून त्यांच्यावर सूड घेण्याइतकी हिंदु लोकांची संस्कृती समर्थ आहे, असे कृतीने दाखविणेस तयार झालेले डॉक्टर, अशाना आपण कोण, आहोत कोठे, करणार काय, आणि आपण दोघेही कोणाच्या दडपणाखाली आहोत, हे जाणण्या-इतकी शुद्धी कशी राहणार? डॉक्टरसाहेब जरा शांत व्हा. भलभलत्या उड्या मारण्याने पत्राला शोभा येण्याऐवजी त्या चेष्टा वाटतात आणि थट्टाही होते!

**हिंदी समाजाचा प्राणघेण्यास आणखी नव्या डॉक्टरची गरज नव्हती! :-** कै. गडकरी यांचे " एकच प्याला " या नाटकांतील 'तळीराम' या पात्राची आम्हास आठवण होते! दारुच्या व्यसनानें केवळ अस्थि पंजर मात्र उरलेला तळीराम शय्येवर पडलेला होता. त्यावर इलाज करणेंसाठी डॉक्टर, वैद्य आणि हकीम यांचा घोळका त्याचे सभोवार जमला. त्यांच्याकडे पाहून तळीराम म्हणतो " अरे बाबानों, मी काय एकाच डॉक्टराकडून मरत नव्हतो, म्हणून त्या कामासाठी हे इतकेजण आणले आहेत! " हीच स्थिती आज आमच्या समाजाची झाली आहे. स्वातंत्र्य तर गेलेच. पण त्याशिवाय अनेक अंतस्थ रोगानी आपला समाज कण्हत पडलेला आहे. त्यावर उपचार करणेंसाठी मोठमोठे मुत्सद्दी डॉक्टर, राज-कारण विषारद वैद्य, आपआपली औषधे देत आहेत. यातील काही वैद्य प्रामाणिक-पणाने औषधाची योजना करीत आहेत. पण कांहीजण या आजारी देशाला वरुन धडी पगडी आणि दिखाऊ भांगपट्टी काढून कशी तरी त्याला शोभा आणित आहेत! परंतु खरा रोग कोणता आहे, याचे बरोबर निदान ठरवून चिकित्सा करणारा एखाद दुसराच आहे. "अंतस्थ दुही" हा प्राणघातक रोग आम्हाला जडलेला आहे. त्यावर उपाय चालविण्यास म्हणून येणारे काही वैद्यबुवा अपाय करीत आहेत. आणि दुर्दैवाने असल्या वैद्याची संख्या आमच्या महाराष्ट्रातच जास्त दिसून येत आहे. हे वैद्य कांही स्वार्थी आहेत कांही मतलबी आहेत. आणि कांहीची औषधाची योजना चुकत आहे. पण परिणाम सर्वांचा एकच. म्हणजे देशाची दुर्दशा! इतकेच नव्हे तर काही सच्चे वैद्य एकीचे औषध देत असतांना इतर वैद्य त्याची थट्टा, उपहास, निंदा करीत आहेत, हे पाहून उद्वेग होतो!

**डॉ. सावरकर यांचे औषध कोणते- ?** फाटाफूट, दुही, मत्सर आणि सूड. याच जर तुमच्या मात्रा असतील, असल्या योजना महाराष्ट्रातील भाराभर पत्रकारांनी आगाऊच योजून, त्या रोगाची हाडे भरपुर मोडून ठेविली आहेत. ! मग तुह्मी आणखी असलाच एक वळसा देण्याची तसदी कशाला घेतलीत. घातकी वर्तमानपत्राचे पीक या महाराष्ट्रात आज मुबलक निपजले आहे. त्या पत्राच्या करणीचा प्रताप चोहोकडे दिसत आहे. सावरकरांची प्रतिज्ञा तर " विश्व बंधुत्व आणि समता " आहे. असे तेच ह्मणतात. तेच ध्येय महात्मा गांधीचे. हिंदुसमाजातील अंतस्थ जातीभेदाचे निर्मूलन करणे हे महात्माजींचे एक पवित्र कर्तव्य आहे. पण एवढ्याने तृप्ती होत नाही. हिंदू समाजाच्या वर्तुळाचे अतिक्रमण करून साऱ्या हिंदुस्थानातील " हिंदी " समाजाची संघटना करणे हा त्याचा व्याप आहे. कदाचीत सावरकरांचीही तशी इच्छा असेल. परंतु महात्मा गांधीवर प्रलाप करणाऱ्यांची आतून खरीइच्छा काय आहे. ती कळत नाही. व्यापक दृष्टी ठेवणाऱ्याची मनोभूमिका महात्मा गांधीना दोष देईल ही कल्पना करणे कठिण आहे. ह्मणून आह्माला भीती वाटते की, या प्रांतात जे धोतऱ्याचे पीक उत्पन्न झाले आहे. त्यांतच " श्रद्धानंद " पत्राची आह्मी गणना करावी की काय ?

**सावरकरांचे खरे म्हणणे काय आहे-** संघटना या शद्बाचा अर्थ ते काय करतात? आमचा अर्थ उघड आहे. हिंदुसमाजात ज्या अनेक जाती आणि पोट जाती होऊन जमीन फाटून गेली आहे. त्या जातीभेदाचे निर्मूलन करणे, हे एक महत्वाचे कार्य आहे. आणि त्याबरोबरच आपल्या देशाचा दुसरा जो महत्वाचा घटक मुसलमान समाज, त्यातील व्यवहारीक भेद नाहीसा करून, हिंदुमुसलमान ऐक घडवून आणणे हे दुसरे महत्वाचे कार्य आहे. ही दोन्ही कार्ये तितकीच महत्वाची आहेत. आणि ती तितकीच कठीणही पण आहेत. पण ती सोडवल्यावाचून सुटका नांही. ही द्विदल संघटना घडवून आणण्याच्या नाजूक कामाला जो हिंदी मनुष्य माघार घेईल, तो देशाचा शत्रू आहे. भ्याडधांतलाभ्याड आहे. आणि नुसता ढोंगी आहे असे आह्मी समजतो. ही सामाजिक घटना केल्यावाचून राष्ट्रात एकजीव उत्पन्न होणार नाही. आणि राजकीय स्वातंत्र्य मिळविणेच शक्य नाही. सोवळ्या ओवळ्या ब्राह्मणी ढोंगे, आणि देवळां मशीदीची पिशाच्चे समोर आणून, पुन्हा ब्राह्मणी वर्चस्व किंवा हिंदुधर्माची श्रेष्टता, स्थापन करण्याचा अट्टाहास कोणी करील तर ते सर्व तत्वज्ञान आणि पांडित्य अकाली आहे. असे आह्मी समजतो. कृत्रीम जन्मजात थोरपणाचा, वर्चस्वाचा आणि सोवळ्या आंचाराचा कोणी बागुलबुवा दाख-

वील तर तसल्या पत्रकाराला या संकटकांलात कोणी फुटक्या कवडीचीही किंमत देणार नाही !

**सूचना उपदेश कोणाला ? –**

किती जणांचा आपण सूड उगवणार ? कमी जास्ती प्रमाणाने प्रत्येक जातीमध्ये आज द्वेष आहे. पूर्वीचा इतिहास तरी द्वेषाने आणि ग्रामण्यानं भरुन गेलेला आहे. आणि मागचे इतिहास आणि हल्लीची वृत्ती हीच जर आह्मी आमचे दृष्टीसमोर ठेवली तर आमची सारी शक्ती परस्परांचा सूड घेण्यातच खर्चावी लागेल ! कदाचीत आपसांत युद्ध (सिव्हीलवार) करूनसुद्धा जुन्या जखमा भरून निघणार नाहीत. परंतु हल्लीचा काल तो नाही. झालेल्या जखमा उभयपक्षानी थोर मनाने विसरूनच गेल्या पाहिजेत. त्यावाचून आमचे राष्ट्रच बनणार नाही. आपसांत युद्धे सर्व देशांत पूर्वी झाली आहेत. परचक्रे आली आहेत. गेली आहेत. परंतु उदयोन्मुख राष्ट्रानी गतगोष्टीवर विरझण घालून " पुढे काय करायचे " या विषयाचा ध्यास घेतलेला आहे. आणि राष्ट्रैक्य घडवून आणण्यासाठी आपले विशेष हक्क, विशेष मानमरातब आणि एका वर्गाची वर्चस्वता, असल्या दुष्ट विचाराना तिलांजली देऊन स्वार्थत्यागपूर्वक यज्ञकुंडात त्यांचा होम केलेला आहे. तशी तयारी असेल, तरच " विश्वबंधुत्वा " चे नांव घ्यावे; आणि तसे हातून होत नसेल व वरिष्टांची पायधरणी करून मागासलेल्या वर्गाला लाथाडण्याची जुनी दुर्बुधीच अजून ठेवणेची असेल तर मग आपल्या विद्वतेचा व्यय निदान या कामाकडे तरी का खर्च करू नये.

★ ☆ ★

# श्री. विनोबा यांची कोल्हापूरास भेट

येथील मेथे आणि मंडळी यांनी आपल्या ब्रासफाऊंडरीमध्ये म. गांधी जन्मोत्सव फार कळकळीने साजरा केला. श्रीयुत शंकररावदेव स्वराज्यपत्राचे एडीटर त्या निमित्त आले होते. विनोबा यांना त्यावेळी जमले नाही. ह्मणून गेल्या आठवड्यांत त्यांनी महालक्ष्मीचे आवारांत वगैरे व्याख्याने दिली. त्यांचे अखेरचे प्रवचन " अस्पृश्यता " या विषयावर झाले. त्यांची मते फार उदार आहेत. म. गांधीचे ते अनुयायी आहेत. वर्धा, नागपूर सत्यागृहाश्रम शाखेचे ते संचालक आहेत. अस्पृश्यता पूर्णपणे नष्ट झाली पाहिजे असे त्यांचे मत आहे. बाजारहाट, आगगाडी शाळा, सभा, धर्मशाळा वगैरे ठिकाणी अस्पृश्यता राहणे शक्य नाही. सोय आणि व्यवहार इकडे लक्ष देऊन ती नष्ट करणे भाग झाले आहे. परंतु तत्वास अनूसरून धर्म दृष्टींने या कामास आरंभ करणेचा तर,

**देवालयातील अस्पृश्यता प्रथम नष्ट झाली पाहिजे-** असे त्यांचे साफीचे मत आहे. मानवप्राणी अस्पृश्य मानणे हे केवळ पाप आहे. वेद, इतिहास, पुराणे साधु संताची वचने यावरून निःसंशय ठरत आहे की, अस्पृश्यतेला कोठे आधार नाही. देवता ही सर्वांचीं माता आहे. तिच्याजवळ भेदभाव नाही. धाकटे मूल किंचित घाणेरडे असले तरी इतरानां सोडून ती अगोदर आपल्या पोटाशी घेते ह्मणून आपण देवालयात भेदभाव ठेवल्यास ईश्वराचे गुन्हेगार आहोत.

**देवालय ही भोजनाची जागा नव्हे–** ही पवित्र जागा परमेश्वराच्या भजन पुजनासाठी आणि आराधनेसाठी आहे. भोजनासारखे प्रकार करण्याचे हे स्थळ नव्हे. खरकटी उष्टी किंवा पान पत्रावळ्या पसरण्यास देवालय उत्पन्न केलेले नाही. ते एक प्रकारचे केवळ देहाच्यासंबंधाने अस्वच्छप्रकार आहेत. भोजन मग ते ब्राह्मणाचे असो वा अब्राह्मणाचे असो, देवालयात देता कामा नये. ईश्वर प्रार्थना आणि गंभीर कामे या पवित्र ठिकाणी होणेची आहेत.

विनोबाच्या त्यांच्या तोंडून आलेली वरील तत्वे आमच्या ब्राह्मण बंधूना पचतील की काय समजत नाही. ब्राह्मणांची दृष्टी विनोबाच्या उलट आहे. कित्येक तर त्यांच्या प्रवचनाला नाके मुरडून आपले नाक अगदी वाकडेच करून घेत होते.

**विनोबांचा वेश–** हे डोक्यास काही घालीत नाहीत. अंगांत सदरा नसतो. पायात काही नसते. अनवाणींच ते समाजात जातात येतात. असली वृत्ती ब्राह्मणी रक्ताला अगदीच घातक. पोटापाण्याच्या आणि खोट्या सोवळ्या, ओवळ्याच्या विरूद्ध बोलणारे विनोबा ब्राम्हण वर्गास मान्य होणे शक्य नाही. त्याना–

**श्री. सातवळेकरांसारखे भट्ट आणि जीर्ण मतवादी ब्राम्हण पाहिजेत–**

श्रीमन्महाराज राजाराम छत्रपतींनी मराठे वैदिक विद्यार्थ्याकडून देवीची पूजा केली. ही बातमी श्रीयुत सातवळेकरांचे कानावर जाताच त्यांचे देह-भानच सुटले आणि पुण्यश्लोक जनक राजाच्या निंदेलाही ते सज्ज उभे राहिले. तिकडे केसरीकार आणि ज्ञानप्रकाशकार वगैरे ब्राम्हणीपत्रांनीं चोहोंकडे धुरळा उडवून साऱ्या महाराष्ट्राला हाका मारून उर्ध्व बाहूने जाहीर केले की, छत्रपती सनातन धर्म बुडवित आहेत. सर्वांनी आपापल्या कमरा कसून आपल्या हक्काचे रक्षण आता केले पाहिजे. ही कोल्हेकुई कोणीकडे आणि श्रीयुत विनोबाचा कळवळा कोणीकडे !

आम्हाला स्वराज्य मिळवून देणारा ब्राम्हणपक्ष क्षत्रियाला देवालयांत मज्जाव करतो. तर गांधी पक्षीय विनोबा, महार मांगाना देवालयात अगोदर घेतले पाहिजे असे स्पष्ट सांगतात. ही ब्राम्हणी मतांची उत्तरदक्षिण ओढाताण पाहून आम्हांला मात्र कौतुक वाटते. आणि चटकन् मनांत विचार येतो की, खरोखर यांत आश्चर्याचे काही कारण नाही. ब्राम्हण वर्ग हा पूर्वीपासून एक स्वार्थी, आपमतलबी आणि पोटभरू वर्ग आहे. वैराग्य वृत्तीचे आणि यांचे पुरे वाकडे. ज्ञानोबा, एकनाथ वगैरेसारखी वैराग्य रत्ने ब्राम्हणांना कधी आवडली

होती ? त्या महापुरुषांचा यांनी सदैव छळच केलेला आहे. त्याच मुंबाजीबुवाचा हा आजचा वंश आहे. महात्मा गांधींची निंदा याच परंपरेला अनुसरून होत आहे. आणि विनोबांचीही तीच व्यवस्था होणारी आहे.

**विनोबा व्यासपीठावर बसून देवीचे देवळांत महारामांगानी जाण्यास सांगतात.** सनातनी ब्राम्हणाचे याबद्दल निखालस ठाम मत असे आहे की, विनोबा हे मुळी ब्राम्हणच नसले पाहिजेत. त्या शिवाय असली अपवित्र भाषा कशी निघेल? शिवाय त्यांच्या विरुद्ध आमच्या ब्राम्हण बंधूपाशी भरभक्कम पुरावा आहे. तो कोणता तर विनोबा हे जानवे मुळीच घालीत नाहीत ! असल्या कर्मभ्रष्ट ब्राम्हणांच्या शद्वाला आमचा ब्राम्हण वर्ग काय म्हणून मान देईल ! बाकी गळ्यात दोन पैशाचे दावे अडकून गलोगल्ली पशुप्रमाणे आचरण करणारा ब्राम्हण असला तरी तो खपतो ! असा हा आज चमत्कार दिसू लागला आहे. ही सातवळेकरी ब्राम्हणी सनातनी कसरत आणि श्री विनोबांची वैराग्य वृतीची भाषा पाहून ब्राम्हणेतर वर्ग "काय करावे म्हणून तटस्थ होऊन पहात आहे. या हिंदुधर्माच्या टग आफ वॉर" चा निकाल देण्यास परमेश्वराला हाक मारीत आहे !

## १ एप्रिल सन १९२७

मनातून अशा फार की, महात्माजीशी समक्ष भाषणाचा योग यावा. परंतु जवळ जवळ ही गोष्ट अशक्यच वाटे. आपल्या पदरी तितके पुण्य नाही. आपले हातून तितकी लोकसेवाही घडली नाही. मग अशा सत्पुरूषाचा लाभ व्हावा कसा ? परंतु प्रबळ भावनेमध्ये गूढ शक्ती असते. असे केव्हां केव्हां वाटते !

तारीख २५ मार्च शुक्रवार हा दिवस करवीरवासी जनाला मोठ्या आनंदाचा, श्रद्धेचा आणि शुद्ध भावनेचा आला. महात्माजींचा डबा प्लॅटफॉमवर उभा राहिला. स्टेशनवर लोकांची इतकी गर्दी झाली होती की, त्यांत मुंगीचाही शिरकाव होणे कठीण होते. स्टेशनबाहेर पडण्यासाठी डब्यातून उतरावे म्हणून महात्माजी उभे राहिले. पण लोक मुळीच वाट देईनांत. अर्धा तास गेला. लोकांचाही इलाज नव्हता. गर्दीतून मागे पुढे सरकून मार्ग करून देणे दुरापास्त होते.

अखेर महात्माजी डब्यातून मागच्या बाजूने उतरले. बरोबर सौ. कस्तुरीबाई होत्या, मोटार शाहुपुरीत शेठ त्रिकमलाल यांच्या बंगल्याकडे गेली.

आम्हीही तिकडे गेलो. थोड्याच वेळांत माडीवर आम्हांस बोलावणे आले. आणि तेथे महात्माजींशी सुमारे अर्धा तास बोलण्याबसण्याचा योग आला. महात्माजी जेवीत नाहीत. ते फक्त मेंढीचे दूध व कांही फळे घेतात, तेथे बंगल्यावर फराळ केला. शहरात जाण्यासाठी मोटारीत बसले. आमचे मनांतील आतुरतेने म्हणा, महात्माजींनी या सेवकाला आपल्याजवळ गाडीतच बसवून घेतले, आणि गावातून ठरलेल्या मार्गाने खासबाग मैदानावर आले; वाटेने महात्माजींचे दर्शनासाठी लोकांच्या झुंडीच्या झुंडी उभ्या होत्या. ठिकठिकाणी पुष्पहार घालण्यात आले व " महात्मा गांधी की जय " या शद्वाचा जयघोष चालू होता. गाडीतून आम्ही आपले विचार मांडित होतो. त्यांचे ते उत्तर देत होते.

सायंकाळी खासबाग एरीना ( कुस्त्याचे मैदान ) वर मुख्य भाषण झाले. तो कार्यक्रम संपल्यावर महात्माजी गंगावेस सत्यसमाजाकडे जाण्यास निघाले. तेव्हांही गाडीत आम्हास घेतल्यावर बोलण्याचा योग आला. सत्यसमाजासमोर अतोनात गर्दी होती. सुमारे ७–८ हजार तरी मंडळी असावीत. इतका मोठा जनसमूह आजवर कोणाच्या पाहण्यांत आला नव्हता. तेथे मानपत्र वाचल्यानंतर महात्माजींचेही भाषण झाले. आणि शेवटचा कार्यक्रम पुरा झाला.

या दिवशी आम्हाला महात्माजींशी जे भाषण करण्यास मिळाले आणि त्यांचे विचार प्रकट झाले, त्याचा गोषवारा आम्ही खाली देत आहोत.

खादी प्रसार हा महात्माजींचा मुख्य उद्देश आहे.

हिंदुस्थानदेश सातलक्ष खेड्यांचा बनलेला आहे. शहराची लोकसंख्या हे हिंदुस्थान नव्हे. वर्षातून चार महिने या खेड्यातील लोकाना काम नाही. सरासरीची त्यांची प्राप्ती इसमवारी एक आण्यापेक्षाही जास्त पडत नाही. अशी त्यांची गरीबीची स्थिती आहे. त्या लोकाना हे सूत काढण्याचे काम द्यावे. आणि त्यांच्या तोंडी हक्काचे आणि सुखाचे चार घास पडावेत. ही फार महत्वाची गोष्ट आहे. चरख्याशिवाय घर बसल्या सुखाचा, अल्प भांडवलाचा, कोणालाही कठीण नाही असा धंदा हा सूत काढणेचा आहे. यात स्वतंत्रता आहे समता आहे. स्वदेशाचा अभिमान आहे. आणि नीतीही आहे. कोन्याकोपऱ्यापर्यंत पोचणारा महात्माजींच्या दृष्टीने आजहा एकच धंदा वाटत आहे.

यापेक्षा सुलभ आणि खात्रीचा दुसरा धंदा कोणी सुचवल्यास, महात्माजी ऐकण्यास तयार आहेत. ज्यांना दुसरे धंदे आहेत, त्यांनी ते सोडून सूत काढीत बसावे असे त्यांचे म्हणणे नाही. त्यांचा आग्रह नाही.

कोटयावधी गरिबांना अन्न मिळत नाही. ते देण्याचा हा उपाय आहे. कापूस, लोकर, रेशीमचा, हा कपडा आपल्या देशात आपले लोक उत्तमप्रतीचा तयार करतात. अद्याप गिरणीतही होणार नाही. इतके उत्तम सूत हाताने करणारे लोक आमच्यात आहेत. तो माल सर्वांनी घ्यावा. आणि त्या लोकांना उत्तेजन द्यावे. हीच इच्छा आहे. खादीच मुख्यत: सुरू करण्याचे कारण की, कपडयाचीच आयात परदेशाहून फारच मोठ्या प्रमाणावर होत आहे आणि या कामाला लागणारा कच्चा माल भांडवल, कौशल्य आपल्या जवळ भरपुर आहे. फक्त श्रद्धा आणि निश्चय मात्र पाहिजे. मागणी वाढू लागली म्हणजे माल निघेल. आणि माल जास्त निघू लागला म्हणजे आजच्यापेक्षा खादी स्वस्तही देण्यास परवडेल.

३ अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील एक मोठा कलंक आहे. तो दूर झालाच पाहिजे. अस्पृशता अशीच राहिली तर हिंदुधर्मच नष्ट होईल. आणि तसा तो नष्ट झाल्यास आपल्याला बिलकूल वाईट वाटणार नाही.

४ जन्मावर उभे कलेले जातीभेद खोटे आहेत. अस्पृश्यतेला हिंदुधर्मात आधार नाही. त्याचप्रमाणे असल्या जाती भेदालाही आधार नाही. त्याने आपली फार नुकसान होत आहे.

५ चातुर्वर्ण्य हा मनुष्यस्वभावातील नित्यतत्वावर रचलेला आहे. तो नाहीसा होणे शक्य नाही. मनुष्याच्या अंगच्या गुणाने आणि कर्माने हे वर्ण ठरणारच. मात्र त्याचा जन्माशी संबंध नाही. जन्माचे संबंधाने उच्चनीचपणाचे भेदभाव समाजांत होत जावेत, असा महातमाजी चार्तुवर्ण्याचा अर्थ समजत नाहीत,

६ देवापुढे कोणाला मज्जाव असावा हे बरे नाही. सर्व मनुष्याला या बाबतीत सारखे हक्क असणे योग्य आहे.

७ महात्माजींचे बोलण्यात ब्राम्हण भोजनाचाही प्रश्न मी काढलेला होता. त्यात त्याचे विचार मजला दिसून आले ते असे-ब्रम्हविद् ब्राम्हण हा नेहमी निरिच्छ असतो. त्याला संग्रहाची इच्छा नसते. अशा ब्रर्म्हविदांचे रक्षण गृहस्थाश्रमी लोकानी करणे अगत्याचे आहे. मात्र याकालांत ब्राम्हण वर्गाने आपले वर्तन चोख राखिले नाही. सर्वच लोक आपापल्या कर्मापासून भ्रष्ट झाले आहेत. अशा स्थितीत ब्राम्हणभोजन प्रसंगी इतरानीं हक्क स्थापनेसाठी म्हणून बरोबर भोजनाचा हट्ट धरावा, हे महात्माजीना बरे वाटले नाही. तो कालही गेला. ब्रम्ह जाणणारे ब्राम्हणही गेले. मग अशास्थितीत ही ब्राम्हणभोजने तरी का चालू ठेवावी हे कळत नाही. आणि ब्राम्हणानी तरी या बद्दल दुराग्रह का करावा ?

माझ्या समजुतीने महात्माजीचे विचार मी लोकांसमोर मांडले आहेत. सत्यसमाजाचे विचार बहूतांशी त्यांचे विचाराशी जुळतात. ते म्हणाले मीही वैश्य आहे. ब्राम्हणेतर आहे.

गंगावेस श्री शाहू सत्य समाजाला भेट देऊन, आमच्यावर मोठा अनुग्रह केला आहे असे आम्ही समजतो. आमच्या श्रमाचेसार्थक झाले असे आम्ही मानतो.

" जन्मावर उभारलेले जातीभेद आणि अस्पृश्यता ही नष्ट झालीच पाहिजे. अस्पृश्यता नष्ट झालीं तर हिंदुधर्म बुडेल, असे कोणाचे म्हणणे असेल तर ते मला मान्य नाही. आहे या स्थितीत हिंदू धर्म बुडला तर मला त्यात काही वाईट वाटणार नाही ! वर्णव्यवस्था अंगच्या गुणावर आणि कर्मावर स्थापन झाली आहे. ती सर्वत्र आहे. आणि स्वाभाविक आहे.

परंतु जन्माचे उच्चनीच वर्णावर या चार वर्णाची उभारणी झालेली नाही. आणि वर्णभेदाचा अर्थ उच्च नीचपणा असा जर होत असेल, तर तो मला मान्य करता येण्याजोगा नाही. सांप्रत इतराबरोबर ब्राम्हणाचीही गुण कर्मे नाहीशी झाली आहेत. आज कर्माने सर्वच लोक शुद्राच्या स्थितीला आलेले आहेत. भेदाभेद आणि उच्चनीचपणाचे कारण उरलेले नाहीं. " महात्माजीची मते या अर्थाची आहेत.

तेव्हा हे ब्राम्हणेतरांना अंजन आहेत. असे म्हणण्यापेक्षा ब्राम्हण वर्गाचे कपाळावर चांगल्या झणझणीत डागण्या दिलेल्या आहेत. हे कोणासही सहज कळून येईल.

★ ★ ★

# भारत-भूषण त्रिखंडकीर्ति जगद्वंद्य महात्माजी !

आम्ही करवीर श्री शाहु सत्यशोधक समाज मंडळ, आपले अंतःकरणपूर्वक स्वागत करीत आहोत. आपली अल्पशी सेवा करणेची बहुमोल संधी दिल्याबद्दल आम्हांस आज धन्यता वाटत आहे. समता व बंधुभाव स्थापन करण्यासाठी आपण रात्रंदिवस झटत आहात. आफ्रिकेत हिंदी लोकाना सहन करावा लागणारा अपमानकारक भेदाभेद नाहीसा करण्यासाठी आपण तुरुंगवास सोसला ! त्याच बरोबर आपण अनेक हाल सोसले आणि तेच कार्य हाती घेऊन आज साऱ्या देशभर आपण दौरा काढलेला आहे.

सत्यसमाज, समता व बंधूभाव स्थापन करण्यासाठीच जन्माला आला आहे. ब्राम्हणेतर समाज उच्चवर्णियाकडून सर्व बाजूनी नाडला जात आहे. धर्माच्या पवित्र नांवाखाली भलत्याच कल्पना जनतेमध्ये रूढ झाल्या आहेत. जातीभेदाच्या अनिष्ट पद्धतीमुळे वरचा वर्ग खालच्याला कमी समजत आहे. अस्पृश्य बंधूसमाज पशुहूनही हीन समजला जात आहे. देवाची भक्ती करण्यालाही भट दलालाची जरूर घालून ठेवली आहे. हा विसंगतपणा व भेदाभेद नाहीसा करावा, यासाठीच सत्यसमाज जन्मास आला आहे

सत्यसमाजाची मूळ स्थापना १८७३ साली पुणे शहरी झाली. आणि ती महात्मा जोतीराव फुले या मराठा माळी जातीच्या एका गरीब गृहस्थाकडून झाली, हे कळविण्यास आम्हास आनंद व अभिमान वाटत आहे. अत्यंत प्रतिकूल आणि बिकट स्थितीत स्त्रियांची शाळा अस्पृश्य वर्गाचे शिक्षण, विधवा पुनर्विवाह, प्रसूतीगृह, अस्पृश्यता निवारण, असले नाजूक प्रश्न हाती घेऊन, त्यानी मोठ्या धैर्याने काम करून दाखविले.

ही समान हक्काची चळवळ अस्पृश्योधारक कै. राजर्षि शाहू महाराज यांनी हाती घेतली. करवीर राज्यांत मुख्य धंदा शेतीचा ब्राम्हणेत्तर वर्ग शेतकरी. या वर्गाची मानसिक गुलामगिरीतून मुक्तता करणे अगत्याचे वाटल्यामुळे महाराजानी सत्यशोधक चळवळीस प्रोत्साहन दिले. सार्वजनिक जागेवरील अस्पृश्यता त्यानी कायद्याने काढून टाकली. अस्पृश्याना दरबारांत नोकऱ्या दिल्या. खालसांतील

20456 ... 2348



चळवळीस प्रोत्साहन दिले. नागपुरात भर सभेत अंत्यजांचे हातचे पाणी स्वतः पिऊन महाराजानी कृतीने उदाहरण घालून दिले.

पुण्यश्लोक शाहू महाराजांचेच कृपेमुळे या समाजास स्थाईकपणा आला आहे. त्यांच्याच स्फूर्तीने या मंडळाकडून थोडीबहुत जनसेवा होत आहे. रोटीबंदी मोडण्यासाठी या त्यांच संस्थेने वारंवार सहभोजने घडवून आणली आहेत. व्याख्यान द्वारा शक्त्यानुसार लोकजाग्रतीचे काम समाज करीत आहे. कित्येक उदार मतवादी ब्राम्हणही भाग घेत आहेत.

श्रीमहालक्ष्मीचे देवालय हे आजवर ब्राम्हणांचे विशेष हक्काचे स्थान समजले जात असे त्या देवालयात सर्वांना जाण्याची मोकळीक असावी म्हणून हा समाज खटपट करीत आहे. मुक्तद्वार भोजन प्रसंगी ब्राम्हणाशिवाय दुसऱ्या पंक्ति बसत नसत. आता तेथे ब्राम्हणेतरांच्याही पंक्ती होऊ लागल्या आहेत. होईल तितके सलोख्याने काम करण्याचा सत्यसमाज प्रयत्न करीत आहे. महात्माजी साऱ्या भारतखंडात चोहोकडून आपला गौरव होत आहे. आपल्या सद्भावना पूर्ण ओळखून लोक आपल्यावर पैशाचा वर्षाव करीत आहेत. सत्यसमाज गरीब वर्गातला आणि गरीब स्थितीतला आहे. आमच्या इच्छेप्रमाणे आणि आपल्या मोठेपणास अनुसरून आपल्यास द्रव्याचे साहच करणे फार कठीण वाटते ! आमचा आकडा अति अल्प आहे. तरी ती उणीव आमच्या हृदयांतील प्रेमाने आम्ही भरून काढीत आहोत ! आणि "पत्रं पुष्प फलं तोयं" या न्यायानें, भक्तिभावानें अर्पण केलेली ही देणगी आपण गोड करून घ्याल अशी समाज आशा करीत आहे.

आपल्या पाठीमागे कामाची गर्दी आहे. पण त्यातूनही वेळ काढून आम्हा गरीब लोकांच्या विनंतीस मान देऊन, या श्रीशाहु सत्यसमाजास आपण भेट दिली, याबद्दल पुन्हा आपले एकवार आभार मानून हे मानपत्र व थैली अर्पण करीत आहोत ती स्वीकारणेची कृपा करावी.

ता. २५-३-२७ **श्रीशाहु सत्यसमाज, कोल्हापूर.**

REFBK-0020456